म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र.

REFBK-0000061

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. ५७८

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांच्या

# किरकोळ लेखांचा

# संग्रह.

उपोद्घातसहित

भाग २ रा.

निबंधमालाकार

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांच्या

# किरकोळ लेखांचा संग्रह.

संपादक

## खंडेराव भिकाजी बेलसरे.

"मराठींत जे उत्कृष्ट ग्रंथ होऊन गेले आहेत, त्यांच्या जीर्णोद्धाराचें काम मंडळीनें हातीं ... हे ग्रंथ सध्यांच दुर्मिळ झाले असून, कांहीं काळ ... ईं!"

किरकोळ लेख, भाग २ पृष्ठ ७८.

REFBK-0000061

भाग २ रा.

दोन भागांत संपूर्ण.

मुंबई—काळका देवीचा रस्ता.

प्रकाशक—के. सी. कुळकरणी.

सन १९०२.

किंमत रु. १॥

विष्णुशास्त्री चिपळूणकर
यांच्या ग्रंथांतील

# निवडक रम्य स्थळें.

" निबंधकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखांची व त्यांतील रहस्यांची जशी जशी ओळख आपल्या लोकांस होत जाईल, तसतशी देशोन्नतीची पात्रता त्यांच्या अंगीं येत जाईल. " असें एका देशाभिमानी चतुर गृहस्थाचें ह्मणणें आहे. तदनुसार शास्त्रीबुवांच्या लेखांची वाचकांस अधिकाधिक गोडी लावावी या हेतूनें, त्यांच्या लेखांतून, विचार करण्यासारखे, बोधपर चुटके व रम्य स्थळें निवडून काढून, त्यांचा यांत संग्रह केला आहे.

[ तयार होत आहे. ]

---

रा. बेलसरे यांचीं पुस्तकें **के. सी. कुळकरणी** आणि **मंडळी**कडे, काळकादेवीचा रस्ता, वैद्य मणिशंकर गोविंदजीच्या औषधालयांत मिळतील.

मुंबई.
इंग्रेजी आणि गुजराथी " जॉब प्रींटिंग " छापखान्यांत छापिला.

# समर्पण.

**नामदार रामचंद्र विठ्ठल धामणस्कर,**

दिवाणबहादुर, संस्थान बडोदें,

यांस.

**महाशय,**

प्रस्तुत ग्रंथाचा हा दुसरा भाग अर्पणासाठीं आपणाकडे अगदीं ओघानेंच येत आहे. किंबहुना तो आपणास अर्पण करणें, हें माझें कर्तव्यच होय. सांप्रत आपण श्रेष्ट अशा दिवाण पदावर आरूढ झालां असून, मागील दिवाणांनीं हातीं घेतलेलीं कार्यें पूर्णतेस नेणें हें आपणाकडे आलें आहे. तरी, प्रस्तुत भाग आपणास अर्पण करण्याची परवानगी मागितली, ती आपण थोर मनानें दिली, याबद्दल मी आपला फारफार आभारी आहें. शेवटीं, आपणास नव प्राप्त झालेल्या उच्च पदाबद्दल आपलें मनःपूर्वक अभिनंदन करून व त्याचा दीर्घकाळ उपभोग आपणास मिळावा अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून, पुरे करितों.

बडोदें,
ता. १३ डिसेंबर १९०१

आपला नम्रसेवक
**खंडेराव भिकाजी बेलसरे,**
संपादक.

# समर्पणपत्रम् ।

श्रिया विराजते राम-चंद्रोऽसौ विठ्ठलात्मजः ।
कर्तव्यहेतोर्यं द्रष्टुं मनो मे मोदतेतराम् ॥ १

का कथा मम वाणीनां, साधो ! मंदमतेरिह ? ।
वागीशानां हि हीयेत मतिस्तव गुणस्तवे ॥ २

वटोदरपुराधीशः साचिव्ये त्वां नियोजयन् ।
प्राख्यापयन्निजां बुद्धिं गुणग्रहणशालिनीम् ॥ ३

प्रायेण साचिव्यपदाधिरूढः
प्राप्नोति काञ्चित्सुषमां मनुष्यः ।
मन्ये तु ते सद्गुणसंघभाजो
लाभेन साचिव्यपदं सुशोभम् ॥ ४

राजा न, साक्षात्सचिवः सुखाय
धीरः सुमंत्री प्रभवेत् प्रजानाम् ।
इति प्रवृत्तं नवनीतितत्वं
लोकेऽधुना संमतमेव नूनम् ॥ ५

---

हे पहा रामचंद्र विठ्ठल, वैभवश्रीनें शोभत आहेत. कांहीं कर्तव्याच्या हेतूनें त्यांस भेटण्यास माझें मन आनंदित झालें आहे.

२ माझी तर अल्प बुद्धि आहे. हे भले मनुष्या ! माझ्या वाणीची गोष्ट कशाला ? वक्तेसुद्धां तुमचे गुणांची स्तुति करून थकले आहेत.

३ बडोदसरकारानें तुमची योजना सचिव पदावर केली. यांत त्यांनीं आपली गुणग्राहकताच प्रगट केली, यांत शंका नाहीं.

४ सचिव पद प्राप्त झाल्यानें कोणाही मनुष्यास प्रायः विशेष शोभा प्राप्त होते. परंतु मला तर असेच वाटतें कीं तुमच्यासारख्या-सद्गुणी मनुष्याच्या लाभानें या सचिव पदालाच शोभा आली.

५ राजा नव्हे, तर चांगली सल्ला देणारा व धीर असा सचिव प्रजांच्या सुखाला कारण आहे, असें नवीन नीतिशास्त्राचें तत्व असून, तें सांप्रत सर्वांस मान्य झालें आहे.

एतत्त्वया हृद्यवधार्य साधो !
साचिव्यमंगीकृतमेव मन्ये ।
यतः पुनःसंस्मृतरामराज्य-
सुखा हि लोकाः कृतिनो भवेयुः ॥ ६

औदार्यदाक्षिण्यदयादिकैर्गुणैः
समग्रलोकाऽभ्युदयैकहेतुभिः ।
त्वदाश्रयैरद्य यशस्करैरयं
रामावतारोऽन्य इतीह मे मतिः ॥ ७

लोकाभ्युदयलाभः स्याज्ज्ञानाऽधीनो, नृपाश्रया ।
ज्ञानाभिवृद्धिर्नृपतेस्त्वं हि विश्वासभाजनम् ॥ ८

ग्रंथोऽथ ज्ञानपूर्णोऽयं तत्प्रसारं मयेच्छता ।
नीतः प्रकाशमधुना हस्तश्चैव रसज्ञ ! ते ॥ ९

ग्रंथोपायनहस्तेन मया ग्रंथः समर्पितः ।
विद्वत्समाजमान्योऽयं प्रीतिं ते तनुतां ध्रुवम् ॥ १०

---

६ हें तत्त्व हृदयांत धरूनच, हे साधो ! तुह्मी सचिवपदाचा अंगीकार केला असावा असें दिसतें. कारण इतकेंच कीं फार काळानें रामराज्याच्या सुखाचें स्मरण झाल्यानें लोक संतुष्ट व्हावे.

७ औदार्य, दाक्षिण्य, दयाळुपणा इत्यादि गुण लोकांचा उत्कर्ष करणारे असून, ते तुमचे ठिकाणीं आश्रय करून, तुमचें यश वाढवीत आहेत. या तुमच्या गुणांनीं दुसरा रामावतारच प्राप्त झाला असें मला वाटतें.

८ लोकांचा अभ्युदय होणें ही गोष्ट ज्ञानाधीन आहे; ज्ञानप्रसार राजाश्रयावर अवलंबून आहे; व त्या राजाचा विश्वास तुमचेवर आहे.

९ ह्मणून ज्ञानानें भरलेला हा ग्रंथ, त्याचा प्रसार करण्याच्या इच्छेनें, प्रकाशित केला असून, हे रसज्ञ ! तुमच्या हातीं दिला आहे.

१० हा ग्रंथ हाच नजराणा मी आपणास अर्पण करीत आहें. हा ग्रंथ विद्वान्मंडळाला मान्य असून, दीर्घकाळ आपलीही प्रीति वाढविण्याला कारण होवो.

# अनुक्रमणिका.


१ समर्पणपत्र ... ... ... ... ... ... ... ... ३
१ समर्पणपद्यें ( संस्कृत ) ... ... ... ... ... ... ५
३ उपोद्घात ( संपादकाच्या हातचा ) ... ... ... ... ९
४ सूचना ... ... ... ... ... ... ... ... ...
५ हस्ताक्षरांचें मराठी व इंग्रेजी एकेक वळण. ... ...


## केसरी.


१ प्रसिद्धिपत्रक ... ... ... ... ... ... ... ...
२ उपोद्घात ... ... ... ... ... ... ... ... २
३ नवनीताची नवीन आवृत्ति ... ... ... ... ... ८
४ लार्ड बेकन ... ... ... ... ... ... ... ... २०
५ ज्याचा त्याचा ब्राह्मणांवर कटाक्ष ... ... ... ... २३
६ आमच्या देशांतील सभा व मंडळ्या ... ... ... ... ३८
७ मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी ... ... ... ... ... ५९
८ परभाषेंतील शब्दांची योजना ... ... .. ... ... ८१
९ अनुकरण. ... ... ... ... ... ... ... ... ८५
१० देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता. ... ... ... ११६
११ नाटकें करावीं कीं करूं नयेत ? ... ... ... ... १३७
१२ सिंहावलोकन ... ... ... ... ... ... ... ... १५७
१३ भोजनगृह. ... ... ... ... ... ... ... ... १६०
१४ मुद्रण-स्वातंत्र्य. ... ... ... ... ... ... ... १६४
१५ देशोन्नति ... ... ... ... ... ... ... ... ... १८२


## निबंधमाला.


१६ रसातळची मराठी भाषा. ... ... ... ... ... ... १९३
आत्मविषयक उद्गार ... .. ... ... ... ... २०२
१८ नं. १ सूचना ... ... ... ... ... ... ... ... "

१९ नं. २ आमच्या पुस्तकावर टीका ... ... ... ... ... २०३
२० नं. ३ दर्पोक्ति ... ... ... ... ... ... ... ... २१५
२१ ,, ,, दर्पोक्तिस कारण निंदाद्वेषत्रत नव्हे. ... ... ... २२०
२२ नं. ४ जातिभेदाविषयीं ... ... ... ... ... ... २२८
२३ नं. ५ प्रश्नोत्तराचा मासला ... ... ... ... ... ... २३५
२४ नं. ६ निबंधमाला, वर्ष ५ ... ... ... ... ... ... २४९

## पत्रव्यवहार.

२५ The Famous Elephas' Letter ... ... ... ... २६१
२६ The Defence of the Editor of the Nibandha Mâlâ ... ... ... ... ... ... ... ... ... २६७
२७ An Address to the students of the New English School ... ... ... ... ... ... ... २७३
२८ पत्रें नं. १ ते २० ... ... ... ... ... २७९ ते ३०६

# उपोद्घात.

**थोर मनुष्यें** जगांत जन्मास येतात, तीं कांहीं तरी थोर कामगिरी बरोबर घेऊन येत असतात. ही विशेष कामगिरी त्यांच्या हातूनच व्हावयाची असते, व तिला सर्व प्रकारें तेच योग्य असतात. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या हातून, वरील नियमास अनुसरून. देशहिताची जी कामगिरी झाली आहे ही दोन प्रकरची आहे. ज्या काळीं महाराष्ट्र भाषेंत गद्य ग्रंथ लिहिण्याचा विशेष प्रचार नव्हता व लोकांस वाचनाचीही फारशी गोडी लागली नव्हती, अशा समयीं विष्णुशास्त्री यांनीं, सरळ व सुबोध भाषेंत चटकदार ग्रंथरचना करून, लोकांस वाचनाची गोडी लाविली. याशिवाय त्यांनीं आपल्या लेखांच्या द्वारें लोकांच्या हृदयांत देशाभिमानाची व स्वाभिमानाची वृत्ति प्रज्वलित करून, त्यांच्या विचारांस नवें वळण लाविलें. याप्रमाणें जी दोन प्रकारची कामगिरी त्यांनीं बजाविली, ती किती महत्वाची आहे, व ती त्यांनीं किती उत्तम प्रकारें बजाविली, याचें विवेचन या ठिकाणीं करण्याचें आमचें मानस आहे. शास्त्रीबुवांचे ग्रंथ व लेख लोकांच्या हातीं देतांना, अशा प्रकारचें विवेचन जर वाचकांपुढें ठेविलें, तर सदरहु ग्रंथ व लेख यांचें यथार्थज्ञान व्हावयास त्याचा बराच उपयोग होईल, असें आम्हास वाटतें.

याशिवाय, अलिकडे विष्णुशास्त्री यांच्या योग्यतेसंबंधानें जो वादविवाद उपस्थित झाला आहे, त्याचाही उलगडा करितां येण्यास सदरहू विवेचन उपयोगीं पडेल असा भरंवसा आहे. विष्णुशास्त्री हे एक नामांकित मराठी ग्रंथकार होऊन गेले, याविषयीं कोणाचाही वाद नाहीं. त्यांची भाषासरणी मोहक असून, प्रतिपाद्य विषयाचें विवेचन असें सरळ व सुबोध केलें असतें कीं त्यांचा कोणताही लेख घ्या,

तो समजण्यास फारशी अडचण पडत नाहीं, व तो तो विषय मनांत सहज बिंबला जाऊन, वाचकांचा ग्रह शास्त्रीबुवांच्या मताला अनुकूल असा होतो. मराठी भाषेवर व लोकांच्या मनावर त्यांच्या इतकी हुकमत फारच थोड्या महाराष्ट्र ग्रंथकारांनीं चालविली असेल! याप्रमाणें ग्रंथकार या दृष्टीनें त्यांची योग्यता मोठी आहे, हें तर खरेंच; तथापि तेवढ्यानें तिचें वास्तविक स्वरूप आपणास समजलें असें होत नाहीं. चटकदार भाषा लिहिणें येवढाच गुण जर शास्त्रीबुवांच्या ठायीं असता, तर ते जीवंत असतांच, त्यांची जी येवढी बडेजाव झाली, ती झाली असती किंवा नाहीं याचा संशयच आहे. कदाचि त्यांची योग्यता इतर चार ग्रंथकारांइतकीच फारतर गणिली गेली असती. शास्त्रीबुवा लिहूं लागले त्यापूर्वीं व त्यावेळींही, मराठींत उत्कृष्ट लिहिणारे कोणी नव्हते असें नाहीं. फार लांब कशाला?—प्रत्यक्ष त्यांचे वडील कृष्णशास्त्री यांचीच उत्तम मराठी ग्रंथकार ह्मणून मोठी ख्याति होती; आणि ती अयथार्थ होती असेंही नाहीं. किंबहुना, विष्णुशास्त्र्यांच्या पेक्षां त्यांच्या वडिलांचेच लेख फार सरळ, मार्मिक व टिपदार आहेत, असें कोणासही कबूल करावें लागेल. परंतु विष्णुशास्त्री यांच्या लेखांची जेवढी चहा झाली, तेवढी कृष्णशास्त्री यांची किंवा इतर कोणाचीही झाली नाहीं. "कृष्णशास्त्री यांस मागें सारून लोकांनीं विष्णूस कसें पुढें केलें"† याविषयीं पुष्कळांस मोठें आश्चर्य वाटलें आहे, व पुढेंही कदाचित् वाटेल. परंतु विष्णुशास्त्री यांच्या लेखांची येवढी चहा झाली व त्यांवर लोकांच्या उड्यांवर उड्या

† मुंबई म्युनिसिपालिटीचे कमिशनर मि. अक्वर्थ यांनीं एल्फिन्स्टन कालेजांत मराठी कवितेवर एकदा निबंध वाचला, त्या वेळीं कै. न्यायमूर्ति काशीनाथ त्रिंबक तेलंग यांनीं अध्यक्षाच्या नात्यानें जें भाषण केलें, त्यांत, प्रसंग नसतांही मुद्दाम मराठी गद्य ग्रंथांचा संदर्भ आणून, विष्णुशास्त्री यांच्यावर तोंड सोडलें असतां, वरील उद्गार काढिले होते. केसरींतील (ता. २२ डिसेंबर सन १८९१) अनंत याचें बातमीपत्र पहा.

पडल्या, त्याचें कारण केवळ चटकदार लिहिणें येवढेंच संभवत नाहीं; त्याचें कारण कांहीं वेगळें असलें पाहिजे. तें कारण कोणतें, हें पहाणें फार अगत्याचें आहे. या कारणाचा वास्तविक बोध जर होईल, तर विष्णुशास्त्री यांच्या योग्यतेची बरोबर कल्पना आपणास होईल; एरवीं होणें कठिण आहे. या उपोद्घातांत सदरहू कारणाचा ऊहापोह ओघानेंच येणार असल्यामुळें, या एका महत्वाच्या वादाचा निर्णय लावतां येण्यास, वाचकांस कांहींसें सोपें जाईल असें आह्मास वाटतें.

विष्णुशास्त्री यांच्या देशसेवेचें जें द्विविध रूप वर सांगितलें, त्याचें विवेचन करावयाचें ह्मटलें ह्मणजे विष्णुशास्त्री लिहूं लागले, त्यावेळीं महाराष्ट्राची स्थिति कशी होती हें अगोदर सांगितलें पाहिजे. हें सांगतांना, आपणास राज्यकारणी स्थितीचा विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. तर, इंग्रज सरकारानें लोकांस शिक्षण देण्याची जी पद्धत स्वीकारली ती कशी होती, तिच्यांत कसकसे फेरफार होत गेले, तिच्यापासून मराठी भाषेच्या अभिवृद्धीला कसा काय उपयोग झाला, तसेंच तिच्यापासून लोकांची सामाजिक स्थिति कशी झाली व त्यांच्या आचारविचारांत कसकसे फेरफार झाले, हेंच मुख्यत्वें करून पाहिलें पाहिजे. कांकीं या स्थितीचा अंदाज आपणास झालेला असला ह्मणजे शास्त्रीबुवांच्या लेखांनीं जें स्थित्यंतर झालें, तें कसें झालें व कां झालें व त्याचे परिणाम एकंदरीनें बरे झाले किंवा वाईट झाले वगैरे बहुत गोष्टींचा उलगडा होणार आहे. यास्तव, प्रथम लोकशिक्षणपद्धतीपासून आरंभ करितों.

सन १८१८ मध्यें पेशवाई बुडाली, व महाराष्ट्रांत इंग्रजी अंमल सुरू झाला, हें सर्वांस ठाऊकच आहे. या राज्यकारणी स्थित्यंतराबरोबरच लोकांच्या सामाजिक स्थितींत व आचारविचारांतही अंतर पडूं लागलें. आरंभीं, इंग्रज सरकारानें, पूर्वींपासून चालत आलेल्या वहिवाटी कायम ठेवण्याविषयीं आपला मनोदय जाहीर

केला, आणि सर्वांस आश्वासन देऊन, त्यांचें प्रेम आपणावर जडेल असें केलें. याप्रमाणें पहिलीं तीन चार वर्षं देशाचा बंदोबस्त करण्यांत व शांतता ठेवण्यांत गेलीं. पुढें अंतर्गत व्यवस्थेपैकीं मुख्य अंग जें लोकशिक्षण, त्याकडे इंग्रज सरकारानें आपलें लक्ष्य लाविलें, व देशभाषा जी त्या वेळीं केवळ उपेक्षेमुळें अव्यवस्थित दशेंत होती ती सुधारण्याविषयीं यत्न मांडले. विद्येच्या उत्तेजनार्थ विद्वानांस दक्षिणा देण्याची चाल पूर्वींपासून पेशवाईत होतीच, ती, लोकांच्या संतोषार्थ, या नव्या सरकारानेंही चालू ठेविली; परंतु तिच्यांत थोडा फरक केला. तो एवढाच कीं, कोणाही नवीन विद्वानांस दक्षिणा मिळूं नये, व ज्यांस मिळत होती, ते मरण पावतांच, त्यांचीही बंद व्हावी. या नियमानें, हळू हळू दक्षिणेप्रीत्यर्थ खर्चीं पडावयाच्या रकमेंतून प्रत्येक वर्षास बरीच शिल्लक मागें पडूं लागली. तिचा विनियोग प्राचीन आर्य विद्यांचें शिक्षण देण्याच्या कामीं व मराठी भाषेस सुधारण्याच्या कामीं करावयाचा सरकारानें ठराव केला. या व्यवस्थेस अनुसरून, सन १८२१ सालीं पुणें येथें विश्राम बागेंत संस्कृत पाठशाळा स्थापण्यांत येऊन, षट्शास्त्रांचें अध्यापन सुरू झालें याच वेळीं मराठी भाषेंत ग्रंथ लिहिणारांस उत्तेजन देण्याकरितां 'दक्षिणा प्राइझ कामिटी' काढून, तद्वारा त्यांस द्रव्याश्रय देण्याचीही सरकारानें तजवीज केली. याशिवाय ठिकठिकाणीं मराठी व इंग्रजी शाळा स्थापून, विद्येचा प्रसार करण्याविषयीं आपला बेत प्रगट केला. पुढें सन १८३७ चे सुमारास पुणें येथें एक केवळ इंग्रजी शिक्षणाची शाळा वेगळीच स्थापन करण्यांत आली. संस्कृत पाठशाळेत केवळ प्राचीन शास्त्राचें अध्ययन केवळ प्राचीन पद्धतीनें होत असे, आणि इंग्रजी शाळेंत, इंग्रजी विद्येचें शिक्षण, इंग्रजी पद्धतीनें, मिळूं लागलें. पुढें सन १८४८ सालीं सदहू संस्कृत पाठशाळेंतही इंग्रजीचा एक वर्ग काढण्यांत येऊन, तेथें चालणाऱ्या अध्ययनक्रमांत इंग्रजीचा प्रवेश झाला. पुढें १८५१ सालीं ही पाठशाळ मोडून, डेक्कन कालेज स्थापन झालें. याप्रमाणें पुणें येथें लोकशिक्षणाच्या संबंधानें जे जे फेर-

फार झाले ते सांगितले. आतां मुंबई येथें लोकशिक्षणाची पद्धत कशी होती तीही सांगतों. मुंबई बेट, यापूर्वी बरींच वर्षें, इंग्रज सरकाराच्या ताब्यांत गेलें असल्यामुळें, तेथें एतद्देशीयांस शिक्षण देण्याची कांहीं तजवीज अगोदरच झाली होती; परंतु ती एवढी पद्धतशीर नव्हती. केवळ तात्पुरतें इंग्रजीचें ज्ञान विद्यार्थ्यास करून द्यावें इतकाच तेव्हां हेतु होता. मुंबई येथील लोकशिक्षणाला जें विशेष स्वरूप आलें तें सन १८२७ सालीं आलें. मुंबईचे पहिले गव्हरनर लॉर्ड मॉंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन् हे या सालीं हिंदुस्थानांतील आपली कारकीर्द संपवून शेवटचे विलायतेस गेले. त्यांनीं मुंबईकरांशीं भलेपणानें वागून त्यांचा लोभ संपादिला होता. ह्या त्यांच्या गुणास्तव मुंबई येथील एतद्देशीय व युरोपियन पुढाऱ्यांनीं जाहीरसभा भरून, त्यांचें कांहीं स्मारक करावें या हेतूने, वर्गणीनें फंड जमा केला व त्यांतून सदरहू साहेबांच्या नांवानें एल्फिन्स्टन इन्स्टिटयूट या नांवाची एक पाठशाळा स्थापन केली. या पाठशाळेंत सर्व शिक्षण इंग्रजी तऱ्हेचें होत असे हें वेगळें सांगण्याची गरज नाहीं. ही पाठशाळा पुढें मोडून एलफिन्स्टन हायस्कूल व एलफिन्स्टन कॉलेज अशीं दोन वेगवेगळीं खातीं झालीं, आणि सन १८५७ सालीं विद्यापीठाची (युनिव्हर्सिटीची) स्थापना होऊन, त्यांत सदरहू कॉलेज व पुणें येथील डेक्कन कॉलेज हीं सामील करण्यांत आलीं. या ठिकाणीं हेंही सांगणें अवश्य आहे कीं सन १८३७ सालापासून महाराष्ट्रांत गांवोगांव मराठी शाळा स्थापन करण्याकडे व मोठमोठ्या शहरीं हायस्कुलें स्थापन करण्याकडे सरकार विशेष लक्ष पुरवूं लागलें. यामुळें सामान्यतः विद्येचा, व विशेषतः इंग्रजी भाषेचा, प्रसार व्हावयास विशेष कारण झालें. मुंबई येथील विद्यापीठानें जो अभ्यासक्रम निश्चित केला, त्यांत हल्लींप्रमाणें सारें अध्ययन इंग्रजी भाषेंत व्हावयाचें ठरून, संस्कृताप्रमाणेंच मराठी ही दुसरी भाषा ह्मणून ठेविली होती. हा क्रम पुढें बारा वर्षांनीं मोडला व विद्यापीठांत देशी भाषांस टाळा मिळून, केवळ संस्कृतभाषाच आवश्यक झाली. ही गोष्ट सन १८७० सालीं घडली. ती या

देशाच्या शिक्षणपद्धतीच्या संबंधानें महत्वाची असून विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे, हें येथें सुचवून ठेवणें अगत्याचें आहे.

इंग्रज सरकारानें या देशांत लोकशिक्षणाची जी पद्धत स्वीकारली तिची माहिती थोडक्यांत वर सांगितली. ही शिक्षणपद्धति देश-भाषेच्या अभिवृद्धीस कसकशी कारण झाली, व तिच्या संसर्गानें देश-भाषांत निर्माण झालेल्या ग्रंथांमध्यें कसकसे गुणदोष उतरले, तें आतां पाहूं. इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वीं मराठी भाषेची स्थिति कशी होती हें सर्वांस ठाऊकच आहे. भाषेचे मुख्य प्रकार ह्मटले ह्मणजे दोन—गद्य आणि पद्य. पैकीं इंग्रजी अमलापूर्वीं मराठी भाषा केवळ पद्यरूपानेंच वास करीत होती. प्रायः शास्त्री पंडित वगैरे विद्वान लोकांच्या मनांत तिच्याविषयीं केवळ उदासीनता किंबहुना अनादरच वसत असे. कोणास ग्रंथ लिहिणें झालें तर बहुधा संस्कृतांतच लिहित असत; इतकेंच केवळ नव्हे, तर अशा विद्वानांचा पर-स्परांशीं जो पत्रव्यवहार चाले, तो देखील त्याच भाषेंत फार करून चालत असे. ह्याप्रमाणें विद्याव्यासंगी जनांचा आश्रय जरी मराठी भाषेस मिळावा तसा मिळाला नाहीं, तरी मराठी कवि, शाहीर व संत मंडळी यांनीं तिला आनंदानें हातीं धरिलें, व तिचा पुरस्कार करून, तिला बऱ्याच प्रौढ दशेला आणिलें. तथापि ह्या वेळ, गद्यरचनेचा संस्कार तिला मुळींच झाला नव्हता असें ह्मणावयास चिंता नाहीं. लोकांच्या बोलण्या चालण्यांत व कागदोपत्रीं वगैरे व्यवहारांत तिचा जेवढा उपयोग होत असे तेवढाच. या पलीकडे गद्यग्रंथांच्या रूपानें ती प्रकट झाल्या-चें आढळत नाहीं. नाहीं ह्मणायाला पूर्वीं त्या वेळच्या राज्यप्रकरणी उलाढालींची हकीगत लिहून ठेवण्याचा प्रचार असे. व त्यांस बखरी असें ह्मणत. या बखरींची भाषा गद्यरूप असे खरी, तरी ती अनेक ठिकाणीं अव्यवस्थित असून प्रायः पद्याच्याच धाटणीवर लिहिलेली असे. यास्तव वरील मतास यत्किंचित्‌ही बाध येत नाहीं हें उघड आहे. अशा रीतीनें केवळ व्यवहारापुरती बोलण्याचालण्यांत व लिहिण्यांत येणाऱ्या या गद्य भाषेला मनोहर असें स्थिर रूप प्राप्त होण्याचा फारच

थोडा संभव होता. तिला सांप्रतचें चटकदार व ठाकीठिकीचें जें कांहीं स्वरूप प्राप्त झालें, तें अर्थात अलीकडे इंग्रजी अमलांतच प्राप्त झालें आहे हें उघड आहे. या कामांत इंग्रज सरकारानें विशेष मन घालून, मराठी भाषेंत नवीन ग्रंथ तयार करविण्याची तजवीज केली. ही अशी, कीं प्रथम शाळाखात्यास जोडून मराठी ट्रान्सलेटराचें वेगळें ऑफिस केलें; याशिवाय दक्षिणा फंडांतून सन १८२७ चे सुमारास एक ' दक्षिणा प्राईझ कमिटी ' काढून, तिच्या द्वारें मराठी ग्रंथकारांस आश्रय देऊन उत्तेजन देण्याचीही योजना केली. आरंभीं या कमेटीचें काम बऱ्याच आस्थेनें चाललें होतें. पण पुढें तिच्या रचनेंत अनेक फेरफार होतां होतां, शेवटीं ती अगदीं निद्रावस्थेस पोचून, सन १८९५ त आटोपली. सांप्रत तिचें काम डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें आपल्या हातीं घेतलें आहे, हें सर्वांस ठाऊकच आहे. परंतु आरंभींचा प्रकार याच्या अगदीं उलट होता. त्या वेळीं मराठी [redacted] सुधारण्याविषयीं सरकाराचे प्रयत्न विशेष कळकळीनें चालले होते; व विद्वानांनींही त्या यत्नांस हातभार लाविला. मग काय विचारावें? चोहोकडून उचल झाल्यावर भराभर, अनेक विषयांवर तीमध्यें ग्रंथ होऊं लागले, व तिची वाढ झपाट्यानें सुरू झाली.

ही वाढ कशी झाली हें पाहण्यासारखें आहे. तेणें करून कोणाच्याही मनास एक प्रकारचा संतोषच होईल यांत शंका नाहीं विविधज्ञानविस्तार मासिक पुस्तकांत, सन १८२६ पासून सन १८५७ पर्यंत छापून प्रगट झालेल्या पुस्तकांची एक यादी दिली आहे.* ती कितपत तपशिलवार आहे व तीमध्यें एकूनएक पुस्तकांचा समावेश झाला आहे किंवा कांहीं राहून गेलीं आहेत, हें जरी बरोबर सांगतां येत नाहीं, तरी इतर साधनांच्या अभावीं ही यादी बरीच उपयोगाची आहे, यांत शंका नाहीं. ह्या यादीवरून असें समजतें कीं सन १८१८

---

* पुस्तक २९ अंक ७ " मराठी भाषेची सांप्रतची स्थिति व तिच्या उत्कर्षाचा इतिहास" पहा.

सालापासून सन १७२७ सालापर्यंत ह्मणजे पहिल्या १० वर्षांत जॉन्हस साहेबांची अधिकरणभूमिति एवढाच कायतो एक ग्रंथ सन १८२६ सालांत छापला गेला होता. पुढें सन १८२८ सालापासून सन १८३७ सालापर्यंत दुसरे दहा वर्षांत १० ग्रंथ छापले गेले. यानंतर सन १८३८ झालापासून सन १८४८ सालापर्यंत तिसरे दसकडींत १८ ग्रंथ छापले गेले. यापुढें मात्र मराठी ग्रंथांची वाढ कांहींशी झपाट्यानें झालेली दिसून येते; ती अशी कीं सन १८४९ सालीं जरी जर्व्हीस साहेबांचा एकच ग्रंथ टिपून घेतलेला आढळतो, तरी पुढें सन १८५७ साल अखेर ह्मणजे चवथ्या दसकडींत ४८ ग्रंथ प्रगट झाल्याचें दिसून येतें. ह्याप्रमाणें सन १८५७ सालीं मुंबई येथें विद्यापीठाची स्थापना झाली, तोंपर्यंत एकंदर ७८ ग्रंथ कायते प्रगट झाले असें या यादीवरून होतें. तथापि पुढें सन १८६४ साल अखेरपर्यंतची एक मोठी यादी कै० न्यायमूर्ति रानडे यांनी सन १८६६ सालीं तयार करून प्रगट केली होती, तींत ६६७ ग्रंथ दाखल केले आहेत. पुढें सन १८६५ च्या जानेवारीपासून सन १८६७ च्या जूनपर्यंत, अडीच वर्षांत, २२७ नवीन ग्रंथ प्रगट झाले असल्याबद्दल कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं केलेल्या यादीवरून दाखला मिळतो. ह्मणजे सन १८६७ सालीं, प्रत्येक वर्षास ९० ग्रंथ तयार होण्याइतकी मराठी भाषेच्या अंगीं पात्रता आली असें ह्मणावयास चिंता नाहीं. हेंच मान, सन १८७४ सालीं ह्मणजे विष्णु शास्त्री चिपळुणकर यांची निबंधमाला सुरू झाली त्या सालीं, दरसाल १०१ नवीन ग्रंथ व १६० एकंदर पुस्तकें प्रगट होण्यापर्यंत आलें; तें सालोंसाल पुढें वाढतच गेलें आहे. सन १८८२ सालीं ह्मणजे चिपळूणकर यांनीं केसरी पत्र सुरू केलें त्याचे पुढले सालीं, दरसाल नवीन ग्रंथ १४२ व एकंदर ग्रंथसंख्या ३२६ पर्यंत वाढत आलेली, सरकारी रिपोर्टावरून कळते. यापुढेंही ती सारखी वाढतच गेलेली आहे. अलीकडे सन १८९६ पासून मात्र प्लेग आणि दुष्काळ ह्या उत्पातांमुळें ती कांहींशी हटली आहे; तथापि या प्रतिकूळ कारणांचा लोप होतांच,

फिरून पूर्व स्थिति प्राप्त होईल व ही वाढ आजपर्यंत जशी होत आली आहे तशीच पुढेंही होत जाईल अशी अटकळ केल्यास सहसा चुकेल असें वाटत नाहीं. सन १८९७ पर्यंत मराठी भाषेंत नवीन ग्रंथ व भाषांतरें मिळून ग्रंथसंख्या ४८०८ वर झाल्याबद्दल मोजदाद एका उद्योगी शोधक मनुष्यानें केली आहे, ती मराठी भाषेच्या हितेच्छूस बरीच उमेद देणारी आहे यांत संशय नाहीं.

या ठिकाणीं, इंग्रज सरकारानें चालू केलेल्या लोकशिक्षणपद्धतीची जी हकीगत नुकतीच वर सांगितली, तिकडे अंमळ वारकाईनें लक्ष दिलें पाहिजे. मराठी भाषा अजूनही प्रगल्भ दशेस आलेली नाहीं. व ज्या वेळीं तिला इंग्रज सरकारानें हातीं धरलें त्या वेळीं तर तिची अगदींच बाल्यावस्था होती; नुकते कोठें अंकुर फुटून तिच्या वाढीस आरंभ झाला होता. अशा स्थितींत चालू असलेल्या शिक्षणपद्धतीचा हितकारक किंवा नाशकारक परिणाम तिच्या वाढीवर व्हावा व शिक्षणविशेषाचे गुणदोष तिला लागावे हें सहाजिक आहे. ह्मणजे ही शिक्षणपद्धति जशी निर्दोष किंवा सदोष असेल, त्या मानानें भाषेंतील ग्रंथसंख्येची वृद्धि होईल किंवा तिची पीछेहट होईल; याचप्रमाणें जशा प्रकारचें हें शिक्षण असेल तशा प्रकारचें प्रतिबिंब सदहू ग्रंथांत उमटेल हें उघड आहे. हे दोनही प्रकारचे परिणाम मराठीवर कितपत व कसे झाले हें आतां आपण पाहूं. प्रथम ग्रंथवृद्धीवरील परिणामाचा विचार करूं.

वर सांगितलेल्या लोकशिक्षणपद्धतीच्या हकीगतीवरून व वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल, कीं या देशांत इंग्रजी अमलापासून लोकशिक्षणपद्धतीचे दोन प्रवाह चालू झाले होते. एक केवळ संस्कृताच्या शिक्षणाचा, व दुसरा, इंग्रजी शिक्षणाचा. पैकीं सन १८२३ सालापासून सन १८३७ सालापर्यंत केवळ संस्कृताचाच अभ्यास पुणें येथील संस्कृत पाठशाळेंत होत असे. परंतु याच सुमारास या पाठशाळेंत एक नवीन प्रकार शिरला. तो हा कीं सदरहू पाठशाळेंत वैदिक अध्ययन अजी बंद होऊन व षट्शास्त्रांपैकीं कांहींचा संक्षेप होऊन,

त्या ऐवजीं इंग्रजी शिकविण्यास सुरवात झाली. यापुढें या पाठशाळेंतून जें शास्त्रिमंडळ तयार होऊं लागलें त्यापैकीं पुष्कळांस इंग्रजी भाषेंतील ज्ञानाचाही आपोआप लाभ झाला. याशिवाय ज्या ज्या ठिकाणीं जुन्या पद्धतीप्रमाणें शास्त्राध्ययन चालत असे त्या ठिकाणीं तयार झालेल्या शास्त्र्यांस देखील इंग्रजी शिकण्याची आवश्यकता भासूं लागली. कांकीं सरकारानें इंग्रजीच्या प्रसारार्थ जी खटपट चालविली, तिला बरेंच यश येऊन, इंग्रजी भाषाज्ञान संपादन केलेले लोक फडकूं लागले, व सरकारानेंही आपल्या सोईसाठीं त्यांस मोठमोठ्या नोकऱ्या देऊन हातीं धरिलें. आणि ज्या मानानें अशा मंडळीची बढेजाव जास्त होऊं लागली, त्याच मानानें शास्त्री मंडळी मागें पडत चालली. अर्थात या शास्त्री मंडळीस बढतीचा कोणता मार्ग खुला होता असें विचारल्यास, त्यांनीं इंग्रजी शिकावें हाच काय तो एक मार्ग होता. ही गोष्ट शास्त्री मंडळांपैकीं जे अंमळ चाणाक्ष होते त्यांच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिली नाहीं. याचें प्रत्यंतर, कृष्णशास्त्री चिपळूणकर व त्यांचे गुरु, मोरशास्त्री साठे, जे संस्कृत पाठशाळेचे अध्यापक होते, यांच्या संबंधाच्या एका प्रसिद्ध आख्यायिकेवरूनच येण्यासारखें आहे. मोरशास्त्री यांची कृष्णशास्त्र्यांवर विशेष मर्जी असे; व त्यांचें कल्याण व्हावें अशी मनापासून त्यांची इच्छा होती. ह्यामुळें ते त्यांस एकदा असें ह्मणाले कीं तुझी बुद्धि जरी कुशाग्र आहे तरी जुन्या शास्त्रविद्येनें तिचें तेज पडणार नाहीं. " याउपर खांद्यावर शालजोडी टाकून हिंडण्यांत प्रतिष्ठा राहणार नाहीं. तूं शहाणा असशील तर इंग्रजी शीक. "* हे सूचक उद्गार समजण्यापुरतें शहाणपण किंबहुना चाणक्षपण कृष्णशास्त्री यांच्या अंगीं होतें. ह्मणून, त्यांच्या वयाला तेव्हां जरी चोवीस वर्षें उलटून गेलीं होतीं, तरी तत्काळ ए-बी-सी शिकण्यास त्यांनीं आरंभ केला. हाच कित्ता इतर शास्त्र्यांनींही उचलिला.

---

* कै० ल. चिपळुणकर यांनीं लिहिलेलें " विष्णु शास्त्री चिपळुणकर यांचें चरित्र " पृष्ट ८ पहा. मोर शास्त्री यांनीं " स्वतः उतारवय झालें असतांही इंग्रजी विद्येचा अभ्यास सुरू केला " असेंही याच ठिकाणीं लिहिलें आहे

याप्रमाणें जुनी शास्त्रविद्या ज्यांनीं संपादन केली त्या शास्त्र्यांस इंग्रजीचाही संस्कार होण्याचा योग आला. इंग्रजी व संस्कृत या दोन्ही प्रगल्भ भाषांचा या ठिकाणीं जो संगम झाला तो मराठीसारख्या नुकत्याच वाढीस लागलेल्या भाषेला लाभल्यामुळें, तिचें फार हित झालें. कांकीं इंग्रजी शिकलेलें, जें शास्त्रिमंडळ या काळीं उदयास आलें त्यापैकीं पुष्कळांनीं मराठी भाषेंत ग्रंथरचनेचा उद्योग करून, मोठ्या आस्थेनें व उत्साहानें, तिची सेवा आरंभिली. पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें प्राचीन आर्य विद्यांचें जे कोणी संस्कृतांत अध्ययन करीत, त्यांच्या ठिकाणीं बुद्धीची तरतरी व तीव्रता कमी होती असें नाहीं. केवळ मराठींत ग्रंथरचना करण्याकडे त्यांची प्रवृत्ति झाली नव्हती. कांकीं गुरुशिष्यपरंपरेनें जुन्या शास्त्र्यांच्या ठिकाणीं प्राकृत भाषांविषयीं, व या प्राकृतांतच मराठीचा समावेश असल्यामुळें, मराठीविषयीं कशी अनादर बुद्धि वागत होती हें मागें एक वेळ सांगीतलेंच आहे. बरें, त्यांनीं संस्कृत भाषेंत कांहीं करावें तर शोधकपणाच्या अभावामुळें तींतही नवीन ग्रंथरचना करण्यास फारसा अवकाश उरलेला नव्हता. यामुळें अशा विद्वानांची मति कुंठित झाल्यासारखीच झाली होती; तिचें तेज पडावयाला जागाच नव्हती. ती जागा इंग्रजीच्या ज्ञानानें त्यांस मिळाली. संस्कृताध्ययनानें सुसंस्कृत झालेल्या त्यांच्या बुद्धीला जेव्हां इंग्रजीचा संस्कार झाला तेव्हां तिला एकदम स्फुरण प्राप्त झालें व तिचा प्रभाव विजेच्याप्रभावाप्रमाणेंच गाजला. दीर्घकाळ संस्कृत भाषेच्या कोंडलेल्या जलाशयांत कोंडून राहिल्यामुळें, ज्यांच्या बुद्धीची गति मंद झालेली दिसत होती, अशा शास्त्रिमंडळाचा इंग्रजीच्या विस्तीर्ण महोदधींत प्रवेश होतांच, ज्ञानमर्यादा विस्तीर्ण झाल्यामुळें, त्यांच्या बुद्धीची गति सहजच बळावली; आणि हें इंग्रजीचें ज्ञान संस्कृत भाषेच्या साहाय्यानें स्वभाषेंत आणण्याची त्यांस हौस उत्पन्न झाली. इतर इंग्रजी विद्वानांपेक्षां या इंग्रजी शास्त्री मंडळींत ग्रंथकर्तृत्वाची विशेष आवड कां दिसूं लागली त्याचें कारण हें होय, असें आम्हास वाटतें. या आरंभींच्या मराठी ग्रंथसमूहांत ज्यांचीं नांवें ग्रंथकार म्हणून झळकतात, त्यांपैकीं पुष्कळ

जण चांगले नांवाजलेले शास्त्री होते, हें, त्यांच्या नांवांपुढें शास्त्री ही पदवी जोडलेली असे, यावरून सहज लक्षांत येतें. मराठी भाषेचा आद्य-कोश सिद्ध करणारे जगन्नाथ शास्त्री व इतर शास्त्री; आद्यव्याकरणकार बाळ शास्त्री जांभेकर, कृष्ण शास्त्री राजवाडे, कृष्ण शास्त्री चिपळुणकर, विष्णु शास्त्री पंडित, रामचंद्र शास्त्री मोडक, महादेव शास्त्री पुराणिक, कोलंबसाच्या वृत्तांताचे कर्ते महादेव शास्त्री, भाऊ शास्त्री थेऊरकर, गंगाधर शास्त्री फडके, कृष्ण शास्त्री भाटवडेकर, शंकर शास्त्री गोखले, कृष्ण शास्त्री तळेकर, केशव शास्त्री गाडगिळ, रावजी शास्त्री व कृष्ण शास्त्री गोडबोले वगैरे अनेक संस्कृतज्ञ व आंग्लभाषाभिज्ञ शास्त्र्यांचीं नांवें उत्तम ग्रंथकार ह्मणून प्रसिद्ध आहेत. याप्रमाणें संस्कृताचा व इंग्रजी ज्ञानाचा हा संगम ह्मणजे

पवनाग्निसमागमो ह्ययम् ।

या संगमानें मराठी भाषेंत ग्रंथसंख्येचीच वृद्धि झाली असें नाहीं; तर इंग्रजी शिकलेल्या या संस्कृतज्ञ शास्त्र्यांच्या हातून मराठींत जे ग्रंथ निर्माण झाले, ते भाषासरणीच्या व ज्ञानप्राचुर्याच्या दृष्टीनेंही विशेष योग्यतेचे आहेत. या काळच्या शास्त्रिमंडळानें रचलेल्या ग्रंथांत, इंग्रजी व संस्कृत भाषांतलें जें मार्मिक ज्ञान त्यांच्या कर्त्यांनीं संपादिलें, त्याचें प्रतिबिंब स्पष्टपणें उमटलेलें आढळतें. त्यांनीं या आपल्या ग्रंथांत त्या त्या भाषेंतील उत्तमोत्तम गुण मराठी भाषेंत आणण्याचा यत्न केला आहे. हे ग्रंथ इंग्रजींतील विविध प्रकारच्या माहितीनें व विचारांनीं जसे ओतप्रोत भरले आहेत तशीच त्यांतील भाषासरणी संस्कृताच्या संसर्गानें विशेष प्रौढ व अति-मधुर अशी आहे. याच गुणास्तव हे ग्रंथ लोकादरास पात्र झाले असून, मराठी भाषेस विशेष हितावह झाले आहेत. याप्रमाणें सन १८३७पासून सन १८५१ सालापर्यंत १५ वर्षांत संस्कृत व इंग्रजी या दोन्ही भाषांचें चांगलें ज्ञान असणाऱ्या शास्त्रिमंडळाचें जें एकदां पीक आलें तें आलें. यापुढें तसा योग येण्याचा मार्ग उरला नाहीं. कांकीं ज्यांच्या हातून

मराठी भाषेची एवढी उत्तम सेवा झाली, तें शास्त्रिमंडळ तयार होण्याचें स्थान जी पुण्यांतील संस्कृत पाठशाळा ती सन १८५१ सालीं मोडली व तिच्या जागीं पूना कॉलेज अर्थात सांप्रतचें डेक्कन कॉलेज स्थापन होऊन, प्राचीन शास्त्राध्ययनाची सोय नाहींशी झाली.

संस्कृत शिक्षणाच्या या प्रवाहाच्या बाजूनेंच, इंग्रजी अंमल सुरू झाल्या-पासून, दुसरा इंग्रजी शिक्षणाचा प्रवाह चालू झाला होता. त्यांतील पाण्यानें जे वृक्ष व जीं झुडपें पोसलीं गेलीं, त्यांनीं मराठी भाषेस कशी काय शोभा आणली हें आतां पाहूं. ह्या प्रवाहास आरंभ इंग्रजी अमलापासून झाला असून, वेळोवेळीं पुष्टि पावत पावत, सन १८५७ सालापर्यंत ह्मणजे इंग्रजी विद्यापीठ स्थापन होईतोंपर्यंत तो अव्याहत चालला होता. किंबहुना सन १८७० सालापर्यंत देखील त्यास आणून सोडिलें तरी चिंता नाहीं. कांकीं सन १८५७ साला-पासून जरी संस्कृत शिक्षणाचा प्रवेश विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत झाला तरी तें आवश्यक झालें नव्हतें. व संस्कृत न घेतां केवळ मराठीवरच-निर्वाह करण्याची कोणा विद्यार्थ्याची इच्छा असली तरी चालण्यासारखी होती. मग श्रेष्ठ अतएव स्पृहणीय खरें, पण कठीण असें जें संस्कृताचें ज्ञान तें संपादन करण्याच्या भरीस कोण पडणार? संस्कृताच्या शालजोडीला मान नव्हता, व इंग्रजीच्या दोन बुकांनींही पोट भरण्याचा मार्ग खुला झाला होता; अशा स्थितींत संस्कृताकडे इंग्रजीच्या ज्ञानास लोलुप झालेल्या पोटभरू विद्यार्थ्यांचें दुर्लक्ष झाल्यास नवल नाहीं. याचें प्रत्यंतर पहावयाचें असल्यास, विद्यापीठाची स्थापना झाल्यापासून सन १८७० सालापर्यंत किती विद्यार्थ्यांनीं संस्कृत घेऊन विद्वत्ता संपादन केली हें पाहिलें असतां, चांगलें मिळेल. सन १८६२ सालांत बी. ए. च्या परीक्षेस सुरवात झाली, तेव्हांपासून सन १८७० सालपर्यंत १०१ विद्यार्थ्यांस पदव्या मिळाल्या. * पैकीं ३७ जण मात्र संस्कृत घेऊन

* यांत स्वाभाविकपणें संस्कृत शिकण्याची उत्सुकता असणाऱ्या हिंदु विद्यार्थ्यांचाच समावेश केला आहे: ल्याटिन फारशी वगैरे घेणाऱ्या पारशी फिरंगी, युरेशन वगैरे विद्यार्थ्यांस धरलें नाहीं.

पास झाले. यावरून एकंदर पदवीधरांच्या संख्येशीं संस्कृतांत पास झालेल्यांचें प्रमाण किती थोडें आहे, हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. यास्तव एकट्या इंग्रजी शिक्षणाचा हा प्रवाह, संस्कृताच्या संसर्गापासून मुक्त असा, सन १८७० सालापर्यंत थेट वहात आला हें उघड आहे. आतां, इंग्रजीच्या प्रवाहांत आलोडन ज्यांनीं केलें त्यांपैकीं कितीकांची प्रवृत्ति मराठी भाषेची सेवा करण्याकडे झाली, हें पाहूं. प्रथमतः येथें हें सांगितलें पाहिजे कीं नुसतें इंग्रजी शिकून जे मोठ्या पदास चढले व यामुळेंच लोक ज्यांस शहाणे व विद्वान समजूं लागले, त्यांचे आपणास दोन वर्ग केले पाहिजेत. पैकीं इंग्रजीचें संपूर्ण ज्ञान संपादून जे खरोखर विद्वत्तेच्या उच्च पदास चढले त्यांचा एक वर्ग, आणि इंग्रजीचीं दोनचार बुकें शिकूनच जे इंग्रजीचे ज्ञाते झाले व ज्यांस सोईखातर सरकारनें हातीं धरून मोठ्या पगाराच्या जागा दिल्यामुळें जे स्वतःस विद्वान ह्मणवूं लागले किंवा ज्यांस लोकही ह्मणूं लागले, त्यांचा दुसरा वर्ग. आणि या दुसऱ्या वर्गांतील लोकांचीच संख्या एकंदरीनें त्यावेळीं फार झाली होती. अशा अर्धकच्च्या मंडळीच्या हातून मराठी ग्रंथवृद्धीला कितपत मदत होण्याची आशा आहे हें कोणासही सांगावयास नकोच. आतां पहिल्या वर्गांतील विद्वानांनीं भाषावृद्धीचें कार्य हातीं घ्यावयाचें; पण एकतर, त्यांजवर सरकारी नोकरीची जबाबदारीचीं मोठमोठीं कामें येऊन पडल्यामुळें फुरसत कमी; व दुसरें, पगार भरपूर मिळत असल्यामुळें सुखासीन वृत्ति प्राप्त झालेली. मग, केवळ हौसेखातर मराठींत ग्रंथ लिहिण्याच्या भरीस कोण पडतो? तशांत, या मंडळींत जे अंमळ तरतरीत होते त्यांचा सारा भर इंग्रजीवर होता. इंग्रजी लिहिण्याची योग्यता त्यांच्या अंगीं होती व शिवाय इंग्रजींत लिहिणें बढतीच्या रूपानें त्यांस विशेष फायदेशीरही होतें. आतां कधीं मधीं मराठीकडे त्यांची प्रवृत्ति झालीच, तर भाषेच्या अज्ञानामुळें त्यांच्या लेखणीस यश येण्याचा फारसा संभव नव्हता. कारण कीं, बहुधा त्यांचे ग्रंथ इंग्रजीच्या ढबीवर जावयाचे. त्यांस संस्कृताचा गंध नव्हताच, व मराठी वाचकांची स्थिति

काय आहे, त्यांची ज्ञानग्रहणपात्रता कोठवर आहे यांची त्यांस अटकळ नसल्यामुळें मराठीची पोंच कोठवर आहे याचेंही त्यांस भान नव्हतें. इंग्रजींतले मोठमोठे ग्रंथ, मोठमोठाले विचार व उंची तत्वज्ञान त्यांच्या दृष्टीपुढें होतें, व अनुकरणेच्छेनें तसे जाडे ग्रंथ मराठींत लिहावे व तसे विचार व तसें तत्वज्ञान मराठींत उतरावें अशी त्यांस इच्छा होती. परंतु ती इच्छा कशी तडीस न्यावी हा मार्ग त्यांस सांपडला नाहीं. कोणा एका ग्रीक तत्ववेत्याविषयीं लार्ड बेकन यानें असें ह्मटलें आहे, कीं तो अनंत आकाशांतील दूरदूरच्या गोलांविषयीं उच्च विचार करण्यांत निमग्न होत्साता, वर दृष्टि लावून, चालला असतां, पायाखालीं काय आहे हें न दिसल्यामुळें, एका खाड्यांत पडला व सामान्य प्रेक्षकजनांच्या उपहासास पात्र झाला; हीच गति आमच्या ह्यां इंग्रजी विद्वानांची झाली! इंग्रजी ज्ञानमार्गानें विद्वत्तेच्या उच्च शिखरावर जों जों ते चढून जाऊं लागले, तों तों त्यांस आपल्याच आजुबाजूची स्थिति बरोबर दिसेनाशी झाली व स्वभाषेचा पोंच कोठवर आहे हेंही कळेनासें झालें. मग, अनेक प्रकारच्या भ्रमांचा, दुर्मतांचा व दुर्ग्रहांचा एकच गोंधळ त्यांच्या मनांत माजून, तोच त्यांच्या ग्रंथांतही प्रगट झाला. हे ग्रंथ पाहिले तर त्यांतील भाषासरणी इंग्रजी ढबीवर गेलेली, विचारसरणी तशीच विचित्र, व विवेचनाचा वस्तुस्थितीशीं विसंगतपणा—अशा प्रकारचे होत. असे ग्रंथ मराठी वाचकांस दुर्बोध, अप्रिय व अग्राह्य वाटल्यास व मराठी भाषेच्या अभिवृद्धीस आपायकारक झाल्यास नवल नाहीं. या ग्रंथांमुळें मराठी भाषेची जी हानि झाली ती एका प्रकारानें नाहीं, पण अनेक प्रकारांनीं झाली आहे. एकतर, अशा निरर्थक ग्रंथांची मराठी ग्रंथसंग्रहांत भर पडून, त्यास तिरस्करणीय विद्रूपपणा आला. दुसरें, मराठी ह्मणजे अगदीं भिकार भाषा, तिच्यांत अभिप्रेत अर्थ प्रगट करतां येण्याचें बिलकूल सामर्थ्य नाहीं, असा मराठीचा रिकामका बोभाटा होण्यास मात्र कारण झालें. पण याशिवाय आणखी जी एक हानि झाली ती सर्वांत मोठी आहे. ती ही कीं हे ग्रंथ रचण्यांत त्यांच्या

कार्यास जें अपयश आलें, तेणेंकरून लोकांत त्यांचा उपहास तर झालाच; पण त्याबरोबरच, त्यांच्या मनांत मराठीविषयीं अप्रीति किंबहुना तिरस्कारही उत्पन्न होऊन, मराठींत ग्रंथ लिहिण्याकडे त्यांची प्रवृत्ति बंद झाली; इतकेंच नाहीं, तर त्यांच्या उदाहरणांवरून इतरही चांगल्या होतकरू विद्वानांच्या मनाचा हिरमोड होऊन, मराठींत लेखणी चालविण्यास ते कचरूं लागले. हळुहळू अशा विद्वानांचे यत्न शिथिल होत जाऊन, लौकरच जें सर्वत्र सामसूम झालें त्यावरून वरील गोष्टींची सत्यता कोणाच्याही लक्षांत येईल. पहा कीं पहिल्या दमाला ज्यांनीं मोरोपंती बृहद्दशमावर उडी घालून त्याचा उद्धार केला व ज्यांनीं "मन" "राजा शिवाजी" असे विषय उचलून काव्यरचनेनें मराठी भाषेस भूषविण्याचा आव घातला त्यांची तरतरी शेवटीं सरकारी रिपोर्ट खरडण्यांत व इंग्रजींत निबंध लिहून युरोपीयनांच्या हातें इनामें व शाबासक्या मिळविण्यांत विराम पावावी हें आश्चर्य नव्हे काय? खरें ह्मटलें, तर या इंग्रजी विद्वानांनीं मराठीची सेवा मोठ्या उत्सुकतेनें व नेटानें चालवून, मराठींत उत्तमोत्तम ग्रंथांची रगाडीच रगाडी करून द्यावयास पाहिजे होती; निदान इंग्रजी शिकलेल्या शास्त्रिमंडळाच्या बरोबरीनें तरी, हातांत हात घालून, मराठीच्या सुधारणेचा उद्योग त्यांनीं करावयास पाहिजे होता. पण तसें त्यांच्या हातून घडलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर अनेक प्रकारीं त्या बिचारीची विटंबना मात्र मांडून, अखेरीस त्यांनीं तिला सोडून दिलें! इंग्रजींत जे चांगले निष्णात झाले व ज्यांनीं मनावर घेतलें असतें तर ज्यांच्या हातून मराठीची उत्तम सेवा झाली असती, त्या विद्वानांची ही कथा! मग, एक दोन बुकांच्या जंगी अध्ययनावरच जे जाडे विद्वान बनले त्यांची काय गोष्ट सांगावी? अशी अर्धकच्ची पायलीची पंचवीस, कचरेवजा जी मंडळी देशांत उत्पन्न होऊन, चोहोंकडे पेरली गेली होती, तिच्या अंगीं खरी विद्वत्ताही नव्हती व मराठीला साहाय्य करण्याचें सामर्थ्यही नव्हतें; पोकळ घमेंड मात्र विपुल होती. 'ही मिरविण्यास व आपलें अज्ञान झाकून नेण्यास

त्यांस कांहीं युक्ति सांपडेल तर पाहिजे होती, ती पहिल्या वर्गाच्या इंग्रजी विद्वानांच्या मराठी ग्रंथरचनाचातुर्यावरून त्यांस आपोआप सांपडली. या ग्रंथांचा भिकारपणा पाहून या मंडळीनें असें आपलें मत ठरविलें कीं "मराठी भाषाच मुळीं पडली भिकार; तिच्यांत धड नाहीं शब्दभरणा, कीं धड नाहीं प्रौढ अर्थ प्रथित करण्याचें सामर्थ्य; मग मराठींत चांगले ग्रंथ व्हावे कसे?" असें एकदा त्यांच्या मनानें घेतल्यावर, मराठींत ग्रंथ लिहिण्याच्या भरीस पडावें कोणी? एवंच भाषेच्या भिकारपणाचें फायदेशीर तत्व एकदा हातीं लागतांच, तें तत्काळ त्यांनीं आवडीनें झेललें, व मोठ्या भक्तीनें त्यांनीं त्याचा प्रसार केला! या मंडळीच्या हातून मराठीसंबंधानें जें कांहीं झालें तें हें झालें; यापलीकडे कांहीं नाहीं. व होण्याचाही फारच थोडा संभव होता हें वर सांगितलेंच आहे.

याप्रमाणें मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ केवळ इंग्रजी शिकलेल्या मंडळीनें काय केलें, हें सांगीतलें. त्यावरून दिसून आलेंच असेल, कीं या मंडळीच्या हातून मराठीची सेवा ह्मणण्यासारखी मुळींच झाली नाहीं, इतकेंच नाहीं, तर इंग्रजी प्रयोगोपायांनीं तिला छिन्नभिन्न करून, त्यांनीं अनेक प्रकारांनीं तिचे हाल मात्र केले, असें स्पष्टपणें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.* हा या मंडळीचा क्रम, सन १८१८ पासून तों १८७० पर्यंत, म्हणजे सरासरी ५० वर्षांवर, अव्याहत चालला होता. मध्यंतरीं इंग्रजी शिकून तयार झालेल्या शास्त्रिमंडळानें हातपाय हलविले व यथाशक्ति मराठीचें संगोपन केलें, ह्मणून बरें झालें. नाहींतर, वरील केवळ इंग्रजी शिकलेल्या मंडळीनें तिला 'पवित्र शास्त्रा' तल्या मराठी भाषेच्या पवित्र स्वरूपाला व 'मरे आणि लान्मन' यांच्या 'रसातळच्या मराठी भाषे'† च्या 'साखरावगुंठित' स्वरूपाला नेऊन कधींच

---

* या मंडळीच्या ग्रंथांसंबंधानें विष्णुशास्त्री यांचें काय मत होतें तें पाहणें असेल तर वि. चि. यांच्या 'किरकोळ लेखांचा संग्रह' भाग १ पृष्ठ ८४–८५. पहा

† वि. चि. यांच्या 'किरकोळ लेखांचा संग्रह' भाग १, पृष्ठ १९३ पहा.

मिळाले असतें; किंबहुना, खरोखर 'रसातळा'-ला देखील नेलें असतें! परंतु तसें तिचें दैवी नव्हतें, इतकीच गोष्ट! म्हणून मध्यंतरी इंग्रजी शिकलेल्या शास्त्रिमंडळाचा आधार तिला मिळाला. पुढें, सन १८५१ सालीं, संस्कृत पाठशाळा मोडल्यानें, तोही आधार तुटला. हा आधार तुटतांच, तिला कोणी विचारीनासें झालें व तिच्या दैन्यावस्थेस आरंभ झाला. तिच्या आंगी नुकतीच दिसूं लागलेली टवटवी लोपली व तिला क्षयाची भावना झाल्याचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. परंतु सन १८७० सालीं फिरून तिच्या दैवानें उचल करून, त्या वेळच्या विद्येच्या पुरस्कर्त्यांच्या मनांत संस्कृतविषयीं पक्षपात उत्पन्न केला, आणि इंग्रजी विद्वानांस संस्कृताचें ज्ञान प्राप्त करून देऊन, इंग्रजीप्रमाणें संस्कृताचेंही साहाय्य मराठीस मिळावें असा शुभ योग जुळवून आणला. या सालीं विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत देशी भाषांस टाळा मिळून, इंग्रजीबरोबर संस्कृत भाषा आवश्यक करण्यांत आली, हें प्रसिद्धच आहे.

आतां, हा जो फेरफार झाला त्यासंबंधानें एक मोठ्या महत्वाचा प्रश्न या ठिकाणीं उत्पन्न होतो. त्याविषयीं त्याच वेळीं पुष्कळ चर्चा होऊन, एकदाचा निर्णय झाला होता. तरी अलीकडे कित्येक उद्योगी गृहस्थानीं ही चर्चा फिरून सुरू केली आहे; म्हणून, हें जरी स्थळ नव्हे, तरी या प्रश्नासंबंधानें दोन शब्द येथें लिहिल्यास, अप्रासंगिक होतील असें वाटत नाहीं. हा प्रश्न असा आहे, कीं विद्यापीठाच्या श्रेष्ठ अभ्यासक्रमांत देशभाषा ठेवाव्या कीं ठेवूं नयेत? याचें उत्तर, आमच्या बुद्धीनें, हें आहे कीं संस्कृत आवश्यक करून, देशभाषा ठेवतां येतील तर खुशाल ठेवाव्या. परंतु या अभ्यासक्रमांत विषयांची अगोदरच गर्दी झाली असल्याकारणानें, तो इतका कठिण म्हणून ओरड आहे, कीं संस्कृत ठेवून, आणखी देशभाषांस त्यांत पाऊल ठेवूं देण्यासही स्थळ नाहीं. मग, संस्कृत व कोणती तरी एकाद देशभाषा अशी वैकल्पिक योजना करणें

येईल हें उघड आहे. पण तसें होईल तर तें मात्र इष्ट नाहीं असें निक्षून ह्मटल्यावांचून राहवत नाहीं खरें ह्मटलें, तर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत मूळापासूनच नीट सुधारणा होण्याची फार गरज आहे. विद्यापीठाच्या स्थापनेच्या घमाड मुहूर्तावर जो एकदा ठरीव क्रम सुरू झाला, त्यास आज जवळजवळ ४५-५० वर्षें होत आलीं; त्या पक्षीं त्यास चांगलें चलन देण्याची वेळ आज येऊन ठेपली आहे, असें ह्मणावयास चिंता नाहीं. पहा, कीं विद्यापीठाचा ह्माडून सार अभ्यास हल्लीं इंग्रजींतून होत असतो; त्यांपैकीं संस्कृत, गणित वगैरे कांहीं विषय जर देशभाषांतून शिकवले जातील, तर आज अभ्यासाचें जें एवढें निष्कारण काठिण्य भासत आहे, तें बरेंच मोडून, आणखी कांहीं नवे विषय त्यांत सामील झाले, तरी देखील विद्यार्थ्यांस त्यांचें दुःख वाटणार नाहीं व त्यांची कुरकूर कानीं येणार नाहीं. देशभाषांचे कैवारी अशा कांहीं सुधारणा करण्याची खटपट करतील, तर तेणेंकरून त्यांचे हेतु विशेष सुलभतेनें तडीस जातील. परंतु देशभाषांच्या कैवाराच्या निमित्तानें संस्कृतास खो घालून, काडी इतकेंदेखील हित होणार नाहीं; उलट तसें करणें, देशभाषांचें जें कार्य ते करूं इच्छितात, त्याच्या हानीस मात्र कारण होईल. हें आमचें ह्मणणें उगीच निराधार आहे, असें कोणास वाटेल. परंतु विद्यापीठाची स्थापना झाल्यावर पहिलीं दहा बारा वर्षें देशभाषा संस्कृतादि प्राचीन भाषांच्या बरोबरीनेंच ठेवलेल्या होत्या, त्यावेळचा कसा काय अनुभव होता, त्याकडे लक्ष दिलें असतां, वरील म्हणण्याविषयीं कोणाचीही खात्री होईल. त्यावेळीं जो हा फेरफार केला तो विचारपूर्वकच केला होता, व त्याविषयीं पुष्कळ वाटाघाटही झाली होती. यास्तव, देशभाषा बंद करून संस्कृत भाषा कोणत्या कारणावरून आवश्यक करण्यांत आली व उभयपक्षीं कसा काय कोटीक्रम लढविण्यांत आला होता हें पाहणें आज फार अगत्याचें आहे. परंतु कोणी एक ' देशभाषांचे कैवारी ' ह्मणतात—"कोणत्याही प्रश्नाच्या मागील इतिहासावरून त्याच्या संबंधानें पुढें काय केलें पाहिजे,

याचा अंदाज लागत असतो, अशा दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केला, तर जुन्या हकीगतींत विशेष महत्त्वाचें असें फारसें कांहीं नाहीं.*' या दुरभिमानास काय म्हणावें? हा दुरभिमान सोडून, या प्रश्नाचा विचार होईल तर बरा, एवढें प्रांजलपणें त्यांस सांगून, 'जुन्या हकीगतींत विशेष महत्त्वाचें' असें काय आहे तें पाहूं.

वर, अभ्यासक्रमांत जो फेरफार झाला म्हणून सांगितलें, त्याच्या योगानें देशभाषांस विद्यापीठाच्या द्वारीं मज्जाव झाला, हें चांगलें झालें नाहीं खरें; तरी इंग्रजीशीं संस्कृताचा जो हा संगम झाला, तो देशभाषांच्या हितार्थच झाला, असें म्हणणें भाग आहे. कांकीं, देशभाषा सुधारण्याला संस्कृताची अनुकूलता असणें अवश्य आहे. परंतु संस्कृत भाषा आवश्यक करण्यांत आली त्यापूर्वी संस्कृताचा अभ्यास व्हावा तेवढा होत होता कोठें? तो व्हावा अशाविषयींच कांहीं तजवीज करणें अगत्याचें होतें. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत देशभाषांप्रमाणें संस्कृतभाषाही आरंभापासून नेमिली होती खरी; परंतु वस्तुस्थिति अशी होती कीं इंग्रजीभाषेसारख्या अगदीं परकीय कठिण भाषेच्या आवश्यक व जबर अभ्यासाच्या पायीं संस्कृतभाषेकडे मुद्दाम लक्ष देण्यास फारच थोड्या विद्यार्थ्यांस अवकाश व बुद्धिसामर्थ्य होतें. ही गोष्ट, सत्तर सालापर्यंत किती विद्यार्थी संस्कृत घेऊन विद्यापीठाची पदवी मिळविण्यास समर्थ झाले हें मागें दाखविलें आहे, त्यावरून चांगली सिद्ध होत आहे.

आतां कोणी म्हणतील कीं "संस्कृताचा अभ्यास न होईना, देशभाषांचा तर होत होता? सर्वांनीच संस्कृताचा अभ्यास करून काय करावयाचें आहे? संस्कृत शिकावयाचें तें तरी देशभाषांच्या सुधारणेसाठीं कीं नाहीं? मग, विद्यापीठांत संस्कृताप्रमाणेंच देशभाषाही नेमि-

---

* "देशी भाषांचा शिक्षणक्रमांत समावेश" हा विषय पहा. विविधज्ञानविस्तार. पृष्ठ २५५ पुस्तक ३३, अंक ८-९ आगस्ट–सप्टेंबर १९०१.

लेल्या असल्यामुळें, ज्यांनीं संस्कृत घेतलें नसेल त्यांनीं देशभाषा घेतल्या असतील. एवढ्या पुष्कळ विद्यार्थ्यांनीं देशभाषांचा अभ्यास केला यांत वाईट काय झालें?" हें ह्मणणें सकृद्दर्शनीं बरेंच समंजस व योक्तपणानें दिसतें. पण थोडा खोल विचार केला ह्मणजे त्यांतील पोंचटपणा तेव्हांच लक्षांत येण्यासारखा आहे. पहा, कीं देशी भाषांचा अभ्यास ह्मणजे काय? देशी भाषांत ग्रंथसंग्रह त्या वेळीं होता कोठें? व अजूनही कोठें आहे? मग देशी भाषांचा अभ्यास, अर्थात् त्या भाषांतील ग्रंथसंग्रहाचा अभ्यास, करूं सांगणें ह्मणजे शश-शृंगान्वेषणाचाच खटाटोप करणें नव्हे काय? असें असून, केवळ देश-भाषांच्या कैवारास्तव कित्येजण देशभाषांच्या अभ्यासाचा जो एवढा आग्रह धरतात, त्यांचा तो निरर्थक आग्रह पाहून, आह्मास वामन पंडिताच्या एका प्रसिद्ध श्लोकार्धाची आठवण होते. पंडित ह्मणतात:—

> शशाचेंही लाधे त्रिभिन फिरतां शृंगहि, परी
> महामूर्खाचें तें हृदय धरवेना क्षणभरी।

खरें ह्मटलें, तर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत, आरंभीं देशभाषा घातल्या होत्या, व विद्यार्थी त्यांचा अभ्यास करीत होते, असें बोलायाला मात्र जागा होती; पण देशभाषा केवळ अप्रगल्भ दशेंत असल्या कारणानें त्यांचा अभ्यास नांवाला मात्र होत असे. अथवा देशभाषांचा अभ्यास ह्मणजे निव्वळ ढोंग होतें असेंही स्पष्टपणें ह्मणावयास चिंता नाहीं. ज्यांस संस्कृत नको होतें, जे संस्कृताचे उघड उघड द्वेष्टे होते, ज्यांस संस्कृतांत सांठविलेल्या आपल्या प्राचीन आर्यविद्यांची परंपरा विच्छिन्न करावयाची होती, अशा ख्रिस्ती मिशनऱ्यांचा आणि तदनुयायी मनुष्यांचा देशी भाषांचा कैवार हा गुप्त कावा होता. हा कावा न ओळखून इतरही कित्येक एतद्देशीय व युरोपीयन गृहस्थ त्यांच्या तावडींत सांपडून त्यांस अनुकूळ झाले होते. त्यावेळीं, जसें इतर ठिकाणीं तसें विद्यापीठाच्या दरबारीं, या मिशनऱ्यांचें केवढें प्राबल्य होतें तें सर्वश्रुतच आहे. तथापि नव्या पिढीच्या अलीकडील मंडळी-पैकीं ज्यांस ही माहिती नसेल, त्यांच्यासाठीं, एका देशी भाषांच्या कै-

वऱ्याचा एक शिथिल लेख नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांतून पुढील उतारा येथें घेतों. हे शिथिल लेखक ह्मणतात:—

"मूळारंभीं युनिव्हर्सिटी स्थापन झाली, तेव्हां देशी भाषा इतर भाषांच्या बरोबरीनें विद्याभ्यासक्रमांत घातल्या होत्या. त्या वेळीं डा० वुइल्सन, मेजर क्यांडी, सर अलेक्झांडर ग्रँट व आणखी कित्येक युरोपीयन मिशनरी हे देशी भाषांचे कैवारी होते. अशा प्रकारें सन १८७० सालापर्यंत सर्व सुरळीत चाललें परंतु या वेळीं, कोणत्या कारणानें कोण जाणे, कित्येकांस असें वाटूं लागलें कीं देशी भाषा विद्याभ्यासक्रमांत असल्यानें विद्याप्रसारास कहीं तरी अडथळा येत आहे. असें मनांत आल्यावर, त्यासंबंधानें कमज्यास्त प्रयत्न होऊन, देशी भाषा उच्च परीक्षांतून मुळींच काढून टाकल्या. त्या काढून टाकल्या त्यावेळीं डा० वुइल्सन हे मुंबईतच होते. परंतु विरुद्ध पक्षाच्या मंडळीनें, ते सभेंत हजर नाहींत अशी संधि साधून आपलें काम उरकून घेतलें."*

येथें डा. वुइल्सन वगैरे संस्कृतद्वेष्ट्या मिशनरींच्या अमर्याद प्राबल्याचें जे एवढ्या आदरानें वर्णन केलें आहे, त्याविषयीं वाद नाहीं. तें अक्षरशः खरें आहे. तथापि संस्कृतपक्षाची मंडळी देशभाषांस वरिष्ठ अभ्यासक्रमांतून काढून टाकण्यास सिद्ध झाली, त्याचें जें कारण सदहू लेखकानें आपल्या बुद्धीनें दर्शविलें आहे, तें मात्र बरोबर आहेसें वाटत नाहीं, हें येथें सांगितलें पाहिजे. "देशीभाषा विद्याभ्यासक्रमांत असल्यानें, विद्याप्रसारास अडथळा येत आहे असें कित्येकांस वाटूं लागलें," ह्मणून देशीभाषा काढून टाकल्या असाव्या, अशी त्याची अटकळ आहे; परंतु ती अगदीं चुकीची आहे. देशीभाषा काढून टाकल्या, त्या "कोणत्या कारणानें कोण जाणे ' असा संशय स्वतां त्यानेच आपल्या मनाशीं घेतला आहे; यावरून या कारणाचा बोध

---

*"देशीभाषांचा शिक्षणक्रमांत समावेश" हा विषय पहा. विविधज्ञानविस्तार, पृष्ठ २५५ पुस्तक ३२ अंक ८-९. आगष्ट–सप्टेंबर १९०१.

त्याला नीटसा झालेला नाहीं, हें उघड आहे. तो झाला असता, तर संस्कृतद्वेष्टया मिशनरीस मराठीचे कैवारी व संस्कृतपक्षाच्या मंडळीस तिचे शत्रु, त्यानें खचित लेखिलें नसतें. संस्कृतपक्षास देशभाषांचा तिटकारा होता असें नाहीं; पण त्यांस संस्कृत मात्र आग्रहपूर्वक अवश्य हवें होतें, व तेंही देशभाषांच्याच कल्याणार्थ हवें होतें. मिशनरींची गोष्ट याहून वेगळी होती. देशभाषांचा कैवार घेण्यांत मिशनरींचा काय कावा होता, त्याचें दिग्दर्शन वर केलेंच आहे. त्याचा विचार वरील लेखकासारखे मराठीचे कैवारी ह्मणविणारे गृहस्थ करतील तर फार बरें, एवढेंच आह्मी ह्मणतों. मिशनरींचा हा कावा जर आजला देखील आमच्यापैकीं कित्येकांच्या लक्षांत येत नसेल तर खरोखर हें आपलें मोठें दुर्भाग्य समजलें पाहिजे! तथापि त्या वेळच्या संस्कृताच्या, व खरें ह्मटलें तर देशभाषांच्या, खऱ्या पुरस्कर्त्यांच्या लक्षांत तो पुरतेपणीं आलेला होता 'देशभाषांचा अभ्यास करा' असें मिशनरी ह्मणत होते; पण देशभाषांचा अभ्यास ह्मणजे काय, हें संस्कृतपक्षाच्या मंडळीला चांगलें ठाऊक होतें. 'देशभाषांचा अभ्यास करा' असें म्हणणें ह्मणजे 'संस्कृत शिकूं नका, इंग्रजी मात्र शिका' असें ह्मणण्यासारखेंच होतें. कांकीं जे विद्यार्थी देशभाषा घेऊन परीक्षा देत, त्यांस, खरें ह्मटलें, तर इंग्रजीचेंच काय तें ज्ञान होत असे. अशा एकट्या, एकदेशीय, इंग्रजीच्या ज्ञानापासून देशभाषांच्या अभिवृद्धींत कितीसा उपयोग हा वेळपर्यंत झाला होता, याचा अनुभव त्यांच्या डोळ्यांपुढें होताच; व त्यावरून पुढें तो कितपत होण्यासारखा आहे याचेंही अनुमान त्यांस होऊन चुकलें होतें. ह्मणून देशभाषांच्याच हितार्थ, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत संस्कृत अवश्यक करावें, असें त्यांस, वाटलें, अशी आमची समजूत आहे.

ही समजूत बरोबर असल्यास, संस्कृत भाषा आवश्यक करणार नीं देशभाषांची खरोखर एक मोठी कामगिरी केली असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं. तसेंच, ती करतांना त्यांनी जें धैर्य दाखविलें त्याबद्दलही त्यांची जेवढी स्तुति करावी तेवढी थोडीच, असें आम्हास वाटतें. विद्यापीठाच्या दरबारीं

मिशनरीप्रमुख संस्कृतद्वेष्ट्यांचें केवढें प्राबल्य होतें तें लक्षांत आणलें असतां, वरील कामगिरी कांहीं सामान्यपैकीं नव्हती. ती बजावण्याची या मंडळीस जी बुद्धि झाली ती कोठून सुचली, व ती तडीस नेण्यास त्यांस जें धैर्य आलें तें कोठून प्राप्त झालें, याचा जों जों विचार करावा, तों तों मोठें आश्चर्य वाटूं लागतें! आणि मराठी भाषेला दैवच या वेळीं अनुकूळ झालें, असें ह्मणावें लागतें! खरोखर, हें दैवच या वेळीं ऐन संकटांत धावून आलें, व त्यानें हा सारा अद्भुत चमत्कार केला! त्यानेंच या वेळीं संस्कृतरक्षाच्या मंडळीस सुबुद्धि व धैर्यबळ दिलें! त्यानेंच, डा० वुइल्सनसारखा जोरावर मिशनरी मुंबई शहरीं हजर असतां, त्यास घरीं राहविलें! व त्याचे नेटे साथीदार, जे मी मी ह्मणून विद्यापीठमंदिरांत हजर झाले होते, त्यांचीं तोंडें बंद केलीं, व जे साहेबांकडे पाहून आपलीं मतें देणार होते त्यांच्या डोळ्यांस पट्टे बांधले! आणि ज्या दैवानें पुराणांतरीं महामायेस कंसाच्या पंजांतून निसटवून उंच आकाशांत विजेच्या रूपानें तळपत ठेवलें, त्याच दैवानें, याही वेळीं, स्वर्गीय गीर्वाण वाणीला निर्वाणपदवीस पोंचवूं पाहणाऱ्या मंडळीच्या हातून सोडवून, वैभवासहित विद्यापीठमंदिरांत तिला तिच्या उच्चपदीं स्थापिलें, व तिच्या साहाय्यानें, **विष्णु-कृष्ण**-प्रमुख जी **बाळ-गोपाळ** मंडळी पुढें लौकरच मातृभाषेच्या उद्धारार्थ निघाली, तिला जन्मास घालून, महाराष्ट्रांत दुष्ट विचारांचें व दुर्मतांचें निर्दाळण करविलें!

असो; विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत संस्कृत आवश्यक करण्याला काय कारणें झालीं त्यांचा खुलासा वर केला. आतां, हीं कारणें कोणतींहीं असोत, तरी एकंदरीनें पाहतां, झाली ती गोष्ट चांगलीच झाली यांत शंका नाहीं. कांकीं, सन १८५१ सालीं पुण्यांतली संस्कृत पाठशाळा मोडून इंग्रजी शिकलेली शास्त्रिमंडळी निर्माण होण्याचें द्वार बंद झाल्यापासून, इंग्रजीचा व संस्कृताचा संबंध निखालस तुटल्यासारखाच झाला होता, तो फिरून १९-२० वर्षांनीं वरील खटपटीनें जुळला. आणि हा संबंध जुळून येतांच, मराठीचें जें कार्य पूर्वीं इंग्रजी शिकलेल्या शास्त्र्यांच्या हातें झालें होतें, तेंच, विद्यापी-

ठाच्या परीक्षा देऊन बाहेर पडलेल्या संस्कृतज्ञ पदवीधर मंडळीनें पुनः आरंभिलें. या संस्कृतज्ञ पदवीधर मंडळींत विष्णु शास्त्री चिपळूणकर हे, कालमानानें व योग्यतेनें, अग्रगण्य होत.

विष्णु शास्त्री यांचें जन्म सन १८५० त झालें असून, त्यांची प्रवेश परीक्षा १८६५ सालीं व बी. ए. ची १८७३सालीं उतरली. प्रवेशपरीक्षेंत त्यांनीं दुसरी भाषा मराठी घेतली होती, पण संस्कृताचाही त्यांचा अभ्यास खासगी रीतीनें झालेला होता. पुढें लौकरच विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांतही संस्कृत आवश्यक करण्यांत आल्यामुळें, त्यांनीं पुढील दोन परीक्षा संस्कृतांत दिल्या. त्यांचे वडील उत्तम विद्वान व प्रौढ मराठी लेखक म्हणून प्रख्यात होते, व मराठी शाळांतील मास्तरांच्या उपयोगार्थ 'शालापत्रक' म्हणून एक मासिक पुस्तक ते काढीत असत. त्यांनींच विष्णु शास्त्री यांस सन १८६८ त मराठींत लेखनप्रविष्ट केलें. त्या सालीं 'रासेलस' चें भाषांतर शालापत्रकांत येत होतें व त्याचीं वीस एक प्रकरणें छापून निघालीं होतीं. पुढील प्रकरणें वडिलांनीं विष्णु शास्त्री यांजकडून लिहविलीं. पुढें १८७१ पासून सर्व शालापत्रक विष्णुशास्त्री हे एकटेच चालवूं लागले, आणि १८७४ च्या जानेवारींत त्यांनीं आपल्या प्रसिद्ध "निबंधमाले" चा पहिला अंक काढला. ही माला सात आठ वर्षें चालून, तिचे एकंदर ८४ अंक निघाले. प्रसिद्ध 'केसरी' पत्र काढण्यास त्यांनीं १८८१ च्या जानेवारींत सुरवात केली. मध्यंतरीं १८७७-८१ पर्यंत "काव्येतिहास संग्रह" काढण्यांतही त्यांचें अंग होतेंच. याशिवाय "पुणें चित्रशाळा," "आर्यभूषण छापखाना," व "किताबखाना" याही त्यांनींच काढलेल्या संस्था होत. अशा विलक्षण तरतरीचा हा पुरुष, मराठी भाषेचा उद्धार करून व देशबांधवांस स्वदेश सुधारणेचा एक मार्ग दाखवून, ही नश्वर नरदेहाची यात्रा संपवून सन १८८२ च्या मार्च महिन्यांत स्वर्गस्थ झाला.

याप्रमाणें, इंग्रजी अमलाखालीं मराठी भाषा सुधारणेच्या पंथास लागली, तेव्हांपासून तों विष्णु शास्त्री यांनीं आपल्या निबंधमालेस

सुरवात केली तोंपर्यंत, ती क्रमक्रमशी सुधारत आली व तिच्या सुधार-णेला कोणकोणत्या मंडळींचे प्रयत्न कारणीभूत झाले वगैरे इतिहास येथवर सांगितला. आतां, प्रत्यक्ष विष्णुशास्त्र्यांच्या वेळची मराठी भाषेची स्थिति कशी होती, हें समजण्याची कोणास इच्छा असेल तर त्यानें सदरहू निबंधमालेचा पहिला अंक वाचून पहावा म्हणजे झालें. त्याचा विषय 'मराठी भाषेची सांप्रतची स्थिति' हाच आहे. यांत, मराठी भाषेविषयीं दाहा वीस वर्षांतल्या पदवीधरांची अनास्था, मराठीच्या भिकारपणाविषयीं या पदवीधरांचें चुकीचें मत व मराठीच्या उत्कर्षाविषयीं त्यांची कर्तव्यशून्यता, सध्यां मराठी भाषा कोणत्या मोठ्या कचाटींत सांपडली आहे व इंग्रजीसारख्या प्रबळ भाषेचा तिजवर अगदीं पगडा बसला असून, तिचें स्वत्व म्ह० वेगळेपणा ठेवायास कसें जपलें पाहिजे वगैरे ज्या अनेक गोष्टी प्रतिपादल्या आहेत त्या काल्पनिक नाहींत, अगदीं खऱ्या आहेत, याविषयीं वरील हकीगतीवरून कोणाचीही खातरी होईल. या गोष्टी येथें सांगून त्यांची पुनरुक्ति करीत नाहीं. तथापि, सन १८५१ सालीं संस्कृत पाठशाळा बुडून, शास्त्री मंडळ मोडत चलल्यापासून मराठी ग्रंथरचनेचें कृत्य कसें मंदावत चाललें होतें व नवीन इंग्रजी विद्वान मराठीकडे ढुंकुनही पाहात नाहींत म्हणून कसा बोभाटा होऊं लागला होता, त्याचें वर्णन शास्त्री बुवांनीं केलें आहे, तें मासल्या करतां येथें देतों. पहिल्याच अंकांत ते लिहितात:—

"अलीकडील विद्वानांनीं तर जुन्या शास्त्री लोकांवरही चढ केला! त्यांस देशभाषेचा विटाळही सोसत नाहीं. दहावीस वर्षांमागें शिकलेल्या लोकांस मराठींत ग्रंथ लिहिण्याची बरीच हौस वाटत असे; पण आतां ती भाषा कोणास डोळ्यांसमोरही नको! आपले अमूल्य विचार प्रसिद्ध करणें झालेंच, तर इंग्लिश भाषेहून हलक्या द्वारानें ते लोकांच्या मनांत शिरकविणें त्यांस अगदीं आवडत नाहीं. पण सद्धर्मोपदेश करतांना अगर देशहितासंबंधें बोध करणें झाल्यास, असल्या अडाणी लोकांशा जेव्हां गांठ पडतेच, तेव्हां क्षणभर आपली योग्यता

त्यांस एकीकडे ठेवावी लागते. तरी अशा प्रसंगीं सुद्धां आपली मानहानि त्यांस सर्वथा सहन होत नाहीं. प्रतिपादन करावयाचे गहन अर्थ कोत्या मराठी भाषेस झेपण्यास कठिण असें वाटून, विलायती शिक्षणाचे नवे शब्द त्यांस पदोपदीं आपल्या भाषणांत आणावे लागतात."

या उताऱ्यांत वर्णिलेला हास्यस्पद बोभाटा हळूहळु मोडत चालला असून, मराठींत ग्रंथरचना करण्याचा संस्कृतज्ञ इंग्रजी विद्वानांचा उद्योग जो एकदा चालू झाला, तो दिवसेंदिसत कसा वाढत्या प्रमाणावर आहे हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. प्रत्यंतरासाठीं अशा कांहीं मराठी ग्रंथकारांचीं नांवें येथें दिलीं असतीं. पण एकतर तीं बहुतेक सर्व प्रसिद्ध आहेत; व दुसरें असें कीं असानें बाकीच्यांचा अपमान झालेसें होणार आहे. यास्तव तसें करणें प्रशस्त नाहीं. तथापि एवढें सांगणें अवश्य आहे कीं मराठी ग्रंथरचनेच्याच उद्योगाला वाहिलेली बरीच मंडळी अलीकडे निघूं लागली आहे; व यांत विशेष गोष्ट ही कीं या मंडळीचे बहुतेक ग्रंथ, भाषा, निरूपण व विचार या तिहींच्या संबंधानेंही असंस्कृतज्ञ इंग्रजी विद्वानांच्या ग्रंथांहून विशेष योग्यतेचे आहेत. आमच्या मतें, हें सारें फळ इंग्रजी व संस्कृत यांच्या मिलाफाचें होय. त्याकडे मराठीच्या कैवाऱ्यांनीं दुर्लक्ष करून चालणार नाहीं, हें स्पष्ट आहे.

आतां विष्णुशास्त्र्यांच्या वेळची सामाजिक स्थिति कशी होती हें पाहूं. या संबंधानें विष्णुशास्त्री यांच्या निधनतिथिनिमित्त भरलेल्या सभेपुढें केसरीचे समर्थ कर्ते रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं एक निबंध वाचला होता. त्यांत विष्णुशास्त्री यांच्या वेळच्या सामाजिक स्थितीचें वर्णन मार्मिकपणें केलें आहे. त्याहून चांगलें फारच थोड्यांस साधेल असें वाटतें. यास्तव त्यांतून कामापुरते कांहीं उतारे येथें उतरून घेतों. समाजस्थितीच्या क्रांतीचें स्वरूप ते येणेंप्रमाणें वर्णितात:—

"प्रत्येक समाजांत त्या आधारस्तंभ ह्मटलें ह्मणजे त्यांतील विद्वान विचारी आणि संभावित गृहस्थ होत. कोणत्याही समाजांत पुढारीपणा प्राप्त होण्यास विद्वत्तेची नेहमींच अपेक्षा असते असें नाहीं. मानमान्यता, संपत्ति, चांगलें कुल व वर्तन आणि साधारण समजूतदारपणा व व्यवहारचातुर्य इतके गुण कोणाच्या आंगीं असले ह्मणजे तो आंगीं हिंमत असल्यास आपापल्या वर्गांत पुढारीपणा घेऊं शकतो. पुणें शहरांत स्वराज्यच असल्यामुळें अशा प्रकारचे पुरुष पेशवाई अखेर प्रायः जुन्या सरदारमंडळींतच दृष्टीस पडत असत, व कांहीं वर्षेपर्यंत नव्या सरकारानेंही त्यांचा तशा प्रकारें बोज ठेविला होता. पण पुढें लवकरच या पुढाऱ्यांचीं नखें व दांत काढून घेतल्यानें 'पिंजऱ्यामध्यें वाघ सांपडे, बायकामुलें मारिती खडे' अशी त्यांची स्थिति झाली. नवीन राज्यपद्धतींत या जुन्या सरदारमंडळीस देण्यासारखें कांहीं काम नव्हतें असें नाहीं; पण "यथा राजा तथा प्रजा" या न्यायानें नवीन तऱ्हेच्या इंग्रजी शिक्षणानें तयार झालेली मंडळीच हातीं धरणें राज्यकर्त्यास अधिक सोयीस्कर वाटून, ती तयार करण्याचे कारखाने ऊर्फ शाळा काढण्यास त्यांनीं सुरवात केली. इंग्रजी राज्यापासून आह्मास जे पुष्कळ लाभ झाले आहेत त्यांतच शिक्षणाची गणना प्रमुखत्वानें करण्याचा प्रघात आहे. पण जरा विचार केला असतां आपणास असें आढळून येईल कीं, हें पाश्चिमात्य शिक्षण अगदीं एक आंगीं असून त्या शिक्षणाचा परिणामही तसाच झाला. आमच्या सरकारानें धर्मौदासीन्याची शपथ घेतल्यामुळें, धर्म व नीति यांच्याबद्दल इंग्रजी धर्तीवर काढलेल्या शाळांतून चकारशब्दही काढावयाचा नाहीं अशी पहिल्यापासूनच रीत पडली होती. यामुळें इंग्रजी शाळांतून पहिल्यापहिल्यानें जी मंडळी बाहेर पडली त्यांच्या मनाची स्थिति एक प्रकारें फारच भयंकर व शोचनीय झालेली होती. स्वधर्माचें किंवा त्यांतील नीतितत्त्वांचें शिक्षण बिलकुल नाहीं आणि परधर्माचेंही नाहीं; समाजाच्या परंपरागत बंधनाबद्दल आदर असावयाचा तोही नाहींसा झालेला, आणि दोन चार बुकें झाल्याबरोबर

इंग्रजीच मोठ्या पगाराची जागा त्यावेळीं मिळत असल्यामुळें, अधिकार-मदाचाही बराच अंमल यांच्या मनावर बसलेला होता. युरोपांतील किंवा विलायतेंतील शाळांतून अशाच तऱ्हेचें शिक्षण मिळतें; पण स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदर व प्रेम, सदाचरणाची गोडी वगैरे जे गुण बुद्धीचा चांचल्यदोष घालवितात त्यांच्या साहाय्यानें तें शिक्षण मनुष्यास बेहोष करीत नाहीं. आमच्याइकडे या सर्व बंधनांचा अभाव असल्यामुळें त्याच शिक्षणापासून स्वल्प ज्ञानानें संतुष्ट, बेपर्वा, स्वहितापलीकडे लक्ष न देणारे आणि स्वतःसच विद्वान् मानून इतर सर्व प्राचीन मतांचा उपहास करणारे असे नवे छोकरे या कारखान्यांतून प्रथमतः तयार झाले परंतु याहीपेक्षां विशेष दुर्दैवाची गोष्ट ह्मटली ह्मणजे या लोकांचा सरकारांतून त्यावेळीं जो मान होत असे, तो होय. राज्यकारभाराच्या नवीन पद्धतीस इंग्रजी जाणणाऱ्या माणसांची त्यावेळीं जरूर होती. यामुळें या अर्ध्याकच्च्या विद्वानांस मोठ्या नोकऱ्या मिळून, अधिकारामुळें त्यांस समाजांत एक प्रकारचा मोठेपणा प्राप्त झाला. तात्पर्य, अव्वल देशवाईत कुलशील, पराक्रम, सदाचरण, संपत्ति वगैरे गुणांनीं ज्यांच्या पूर्वजांनीं लोकनायकत्व संपादन केलें होतें त्याचे वंशज लवकरच भिकेस लागून, त्यांचें स्थान समाजाच्या खालच्या वर्गांतील अर्धवट इंग्रजी शिकलेल्या या मंडळीस प्राप्त झालें."

याप्रमाणें राजक्रांतीबरोबरच समाजाच्या पुढाऱ्यांतही क्रान्ति होऊन, खालच्या वर्गांतली जी अनधिकारी मंडळी पुढारी ह्मणून पुढें आली, तिला धर्मशिक्षण किंवा नीतिशिक्षण नव्हतें ह्मणून 'त्यांच्या मनाची स्थिति फार भयंकर व शोचनीय झाली होती' असें रा. टिळक यांचें वर ह्मणणें आहे, तें जरी सर्वांशीं बरोबर आहे असें ह्मणवत नाहीं, तरी मंडळीच्या वर्तणुकीचें व त्या वर्तणुकीचा गृहस्थितीवर झालेल्या परिणामाचें जें चित्र त्यांनीं रेखलें आहे, तें अगदीं सुरेख व यथार्थ रेखलें आहे यांत शंका नाहीं. या पुढाऱ्यांस "शाळेमध्यें जीं दहापांच इंग्रजी पुस्तकें शिकवीत असत, त्यांपलीकडे विद्येचा विशेष

संस्कार झाल्याचें आढळत नाहीं;" "बहुतेक चुटपुटत्या ज्ञानाचेच अधिकारी होते," अशी त्यांची ज्ञानमर्यादा दर्शवून, रा. टिळक हे पुढें ह्मणतातः—

"इंग्रजी राज्यांत नवीन मिळालेल्या अधिकारानें ही मंडळी बेपर्वा झालेली होती हें वर सांगितलेंच आहे. याखेरीज यांच्या अद्वातद्वा विचारांचा समाजावर व विशेषेंकरून पुढारी मंडळीच्या गृहस्थितीवर फारच वाईट परिणाम झालेला होता. सौम्य पण शिस्तवार गृह-शिक्षणाचा व गृहस्थितीचा लहानपणीं मुलांच्या मनावर किती परि-णाम होत असतो हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. किंबहुना ज्या देशांतील पुढारी कुटुंबांची गृहव्यवस्था बिघडलेली असते त्यांत चांगले पुरुष निपजणें कठिण आहे असें ह्मटलें तरी चालेल. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे इंग्रजी शिक्षणपद्धतीचा आमच्या समाजावर पहिला वाईट परिणाम ह्मटला ह्मणजे, त्यामुळें झालेली आमच्या पुढाऱ्यांच्या मनाची अव्यवस्थित वृत्ति, आणि सदर वृत्तीच्या योगानें बिघडलेली गृहव्यवस्था, हा होय. पहिल्या पिढींतील लोकांस लहानपणींतरी एक प्रकारचें जुन्या तऱ्हेचें गृहशिक्षण मिळालेलें होतें. पण दुसऱ्या व तिसऱ्या पिढींत त्याचाही लोप झालेला होता. या दुसऱ्या पिढीं-तील एका गृहस्थाचें व माझें कांहीं वर्षांपूर्वी भाषण झालें होतें, तेव्हां त्यानें मला असा प्रश्न विचारला कीं, 'कांहो, आह्मी आतां स्नानसंध्या करीत नाहीं खरे, पण आमच्या लहानपणीं आह्मास कांहीं एक प्रकारचा जुना आळा असल्यामुळें आह्मी त्यावेळीं मेहनत आज करून कांहींतरी उदयास आलों. पण आमच्या मुलांनीं एव्हांपासून सर्व निर्बंध सोडून दिले तर त्यांची पुढें वाट काय होणार?' हा प्रश्न मोठा मार्मिक होता. परंतु गृहशिक्षणाचें व गृहव्यवस्थेचें नुसतें महत्व कळून उपयोग काय? ज्या वेळीं ही गोष्ट त्या गृहस्थास कळली, तेव्हां तो बहुतेक उतारवयांत आला होता; व पुढें लवकरच त्याचा अंत झाला. कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं मृत्युसमयीं नास्तिक-

पणाचे) काढलेले उद्गार विष्णुशास्त्री यांच्या चरित्रांत दिलेलेच आहेत. या बृहस्पतितुल्य विद्वानाच्या बुद्धिमत्तेबद्दल कोणाचाही पूज्यभाव असणें स्वाभाविक आहे; पण खासगी वर्तनाच्या दृष्टीनें पाहतां यांज-बद्दल तीच बुद्धि कोणाही निःपक्षपाती मनुष्याच्या अंतःकरणांत उद्भवेल असें वाटत नाहीं. इतर विद्वानांचीही स्थिति बहुतेक अशाच प्रकारची होती. मद्यपान, वेश्यागमन वगैरे दुर्गुण तर बहुतेक संभावित गणले जात असत; व मलातर असें आठवतें आहे कीं, त्या वेळच्या खासगी शाळेच्या एका मास्तरास, सकाळची शाळा असतां, शाळेंतील विद्यार्थी त्याच्या आंगवस्त्राच्या घरांतून कित्येकदा बोलावून आणीत असत! अशा प्रकारच्या बिघडलेल्या वातावरणांत धर्मनिष्ठा, नीतिधैर्य किंवा सदाचरण यांचें बीजारोपण नवीन पिढीच्या मनांत कितपत होणें शक्य आहे?"

येथें रा. टिळक यांनीं धर्म व नीति यांच्या पाताची तीन उदाहरणें दिलीं आहेत, त्याकडे मननपूर्वक पाहिलें असतां असें दिसून येईल कीं त्यावेळीं समाजांत निव्वळ इंग्रजी, संस्कृतज्ञ इंग्रजी, व निव्वळ मराठी असे सुशिक्षितांचे जे तीन मुख्य वर्ग पडले होते, त्या तीहींचें चित्र यांत उत्तम रेखलें गेलें आहे. हे तीनही नमुने मार्मिकपणें निवडून घेतले असून, ते लोकांच्या मनाचें वळण कोणीकडे होतें हें दाखवितात. पहिला नमुना संशयग्रस्त अव्यवस्थित मनाचा आहे; दुसरा ज्ञान-पूर्वक स्वीकारलेल्या निश्चित नास्तिकपणाचा; व तिसरा पूर्ण अज्ञानाचा. या तिहींतही एके दृष्टीनें नीति व धर्म यांच्या शैथिल्याचें भयंकर स्वरूप प्रगट झालें आहे. ही दुर्धर स्थिति प्राप्त होण्यास मूळकारण धर्मशिक्षण व नीतिशिक्षण यांचा अभाव असें रा. टिळक हे वर ह्मणतात; व त्यांच्या या साऱ्या निबंधाचा रोखही ह्याच आहे. परंतु थोडा विचार केला तर असें दिसून येईल, कीं या अनीतीच्या दोषाचें सगळें खापर धर्मनीति-शिक्षणाभावावर फोडणें वाजवी होणार नाहीं. देशाच्या अवन-

तीसाठीं जीं कित्येक कारणें कार्य करीत होतीं, त्यांत या धर्मशिक्षणाच्या व नीतिशिक्षणाच्या अभावानें कदाचित अल्पांशानें मदत केली असेल, इतकें फार तर ह्मणतां येईल. कारण एकतर, जो मनुष्य समाजांत राहतो त्यास गुरुमुखानें धर्म-शिक्षण व नीति-शिक्षण जरी मिळालेलें नसलें तरी तें थोडें बहुत त्यास आपोआपच प्राप्त होतें. तशांत नवीन पुढारीपण पावलेली ही मंडळी ह्मणजे अगदीं अडमुठी होती, सदसद्विचार करण्यास सर्वथा अपात्र होती, असेंही नाहीं. चांगलें कोणतें, व ईट कोणतें, हित काय, अहित काय, इतकें समजण्या पुरती बुद्धि क्षुद्र कीटकांसही असते, मग ती ही त्यांस नव्हती असें ह्मणण्याचें धाडस कोणासही करवणार नाहीं. तात्पर्य, सामान्य नीतितत्वें व धर्मतत्वें यांचें ज्ञान या मंडळीपैकीं सर्वांसच नाहीं तरी पुष्कळांस होतें यांत शंका नाहीं, व कित्येकांसतर तें उत्कृष्ठ प्रकारचें होतें असेंही खात्रीनें सांगतां येईल. असें असून, त्या सर्वांचीच वृत्ति वर वर्णिल्याप्रमाणें कां झाली, ही मोठी विचार करण्यासारखी गोष्ट आहे. याशिवाय दुसरें असें कीं रा. टिळक यांनीं ह्मटल्याप्रमाणें जें या मंडळीस धर्मनीतिव्यतिरिक्त शिक्षण मिळालें तसेंच तें युरो-पांतील व विलायतेंतील लोकांनही मिळतें, इतकेंच नव्हे, पण धर्म-शिक्षणच घेतलें, तर पाश्चत्य तत्वज्ञानाचा जनक लार्ड बेकन, याच्या-पासून तों लॉक, गिबन, मिल्ल, बेन्थाम वगैरे ऐहिकसुखवादी नास्तिकांपर्यंत सर्वांचे ग्रंथ तिकडील लोकांस, चर्चेंमधील धर्मोपदेशाबरोबरच, नास्तिक मताचाही उपदेश नेहमीं करीत असतात, हें सर्व-प्रसिद्धच आहे. मग तिकडील लोकांचीही स्थिति आमच्या इकड-ल्यासारखी कां होऊं नये, हें कळत नाहीं. आतां, चांचल्यदोषनि-वारक स्वदेशप्रीत्यादि कित्येक गुण तिकडील लोकांच्या आंगीं परि-स्थितिविशेषाच्या योगानें आपोआप प्रगट होतात असें एक सोडवणुकीचें वाक्य त्यांनीं वर घालून ठेवलें आहे. पण तें शुष्क आहे. कांकीं, विलायतेंतील लोकांस जर चांचल्यनिवारक गुण अद्वातद्वा भडकूं देत नाहींत, तर आपल्या इकडील धर्मतत्वांची व नीतितत्वांची परंपरा विच्छिन्न होऊन देशांतून

समूळ नाहींशी झाली होती असें नाहीं, मग त्यांचा थोडा तरी प्रभाव गाजून, इकडील धर्मभ्रष्ट व नीतिभ्रष्ट मंडळीला ताळ्यावर आणण्यास उपयोगी पडावा कीं नाहीं? परंतु मुळीं धर्मनीतितत्वांच्या शाब्दिक शिक्षणानें व उपदेशानें मनुष्यांस आचरणानें धार्मिक व नीतिमान करतां येईल किंवा नाहीं यांविषयीं शंकाच आहे. प्रायः, असे उपदेश ह्मणजे पुर्वीकारनालिकान्यायानें विफळ होत असा अनुभव आहे. बेकन याच्या ऐहिकसुखवादाची प्रशंसा करून, मेकालेनें ह्मटलें आहे, कीं शेकडों ग्रंथकारांनीं व धर्मोपदेशकांनीं रागद्वेषादिकांचें दमन करवें ह्मणून मोठमोठे नीतिग्रंथ लिहिले आहेत व लांबलांब व्याख्यानें झोडलीं आहेत, परंतु आजपर्यंत पुष्कळांनीं जरी ह्या ग्रंथांचें मननपूर्वक पठन केलें आहे व ह्या व्याख्यानाचें भावानें श्रवण केलें आहे, तरी रागाची वेळ आली असतां ज्यानें तो आवरला असा शेकडा एकादा सांपडेल तर मोठें भाग्य! हीच गोष्ट धर्मनीतितत्वांच्या शिक्षणाची व उपदेशाचीही होय! आतां हें शिक्षण ह्मणजे अगदींच फुकट असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे ही शुभतत्वें आचरणद्वारा प्रगट व्हायाला अनुकूळ परिस्थिति पाहिजे, परिस्थिति वांचून शिक्षण वृथा शीण होय, अशी आमची समजूत आहे.

अर्थात्, वर वर्णिल्याप्रमाणें या मंडळीची जी दुर्दशा झाली, ती धर्म व नीति यांच्या शिक्षणाच्या अभावाचें फळ ह्मणण्या ऐवजीं, त्यावेळीं सज्ञानता व राज्यसत्ता या दोहोंच्या संबंधानें देशाचें जें स्थित्यंतर होत होतें त्याचें तें फळ समजणें विशेष सयुक्तिक आहे असें आम्हास वाटतें. अशा स्थित्यंतराच्या वेळीं कितीही धर्मज्ञान लोकांस दिलें असतें व कितीही नीतिशास्त्र पढविलें असतें, तरी फारसा उपयोग होता असें वाटत नाहीं. हिंदुसमाजाचा जो जम स्वराज्य-सत्तेच्या छत्राखालीं होता, तो परछत्राखालीं मोडून विकलित होत चालला होता. ही मोडामोड, खरें ह्मटलें, तर मुसलमानी अमला-पासूनच होऊं लागली होती, व समाजाची दोन अंगें जीं धर्म व

नीति त्या दोहोंतही उणेपणा येत चालला होता. मध्यंतरीं दक्षिणेंत मराठ्यांनीं डोकें वर काढलें त्यामुळें धर्मबुद्धि व नीतिमत्ता ह्या वृत्ति अंमळ जागृत झाल्या होत्या. त्या, इंग्रजी राज्य स्थापन होतांच, फिरून शिथिल होऊन लोकरच गाढनिद्रावश झाल्या. असें होणें हें आह्मासतरी निदान स्वाभाविक वाटतें. जोंपर्यंत एकाच हिंदुधर्मातील बंधुभावानें वागणारे देहसि कोठी देवांशीं गांठ होती तोंपर्यंत हिंदुलोकांनीं ज्ञानमार्गाचें अवलंबन करून कशीतशी त्यांची समजुत केली व सगुणनिर्गुण-भेदानीं एकेश्वराची कांस धरली; परंतु पुढें जेव्हां भिन्नभिन्न कडून विरोधभावनें अल्ला आले व भोळानाथ पुढें करून कालानें ख्रिस्त आले, तेव्हां त्यांची स्वधर्मांतील मतस्वतंत्रता पाहून आमचे लोक भांवावले व सर्वत्र धर्म खोटे व ईश्वर ह्मणजे सबझूट अशी त्यांच्या मनाची भावना होऊन 'न हिंदुर्न यवनः' अशी दशा झाली. तशांत ही भावना दृढ होण्याला या देशांत आणखी एक मोठ्या मौजेचें कारण झालें. तें हें कीं ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं स्वधर्मप्रसारार्थ बिचाऱ्या अनाश्रित हिंदुधर्मावर खरेखोटे हवे तसे हल्ले केले व इकडे खुद्द इंग्लंडांतच ख्रिस्ती धर्मावर नास्तिक मंडळीनें हल्ले चालू केले! ही स्वधर्माबरोबरच ख्रिस्ती धर्माची विटंबना जेव्हां इंग्रजीभाषेंतील ज्ञानाबरोबर इकडील विद्वानांच्या दृष्टीस पडली, तेव्हां त्यांच्यांत जी थोडीथोडकी धर्मबुद्धि तगून राहिली होती तीही समूळ बुडाली, व ते पक्के नास्तिक बनले! धर्मबुद्धीच्या लोपाप्रमाणेंच या स्थित्यंतरानें त्यांच्या नीतिमत्तेचाही लोप केला. कांकीं या स्थित्यंतरामध्यें जी बेदाली व अंदाधुंदी माजली, त्यांच्या घोटाळ्यांत ज्याला जसें वाटेल तसें त्यानें हुशारीनें वागावें असें होऊन, कोणास कोणाचीही चाड राहिली नाहीं. लोभाचें प्राबल्य झालें, द्रोहबुद्धि फैलावली व तिच्या पायीं नीति सुटली! शेवटीं, चार रुपड्यांच्या लोभानें बहिणीनें उमाजी नाइकाला धरून द्यावें व बढतीच्या आशेनें कुलीन गृहस्थांनीं इनामें, वर्षासनें, जाहागिरी वगैरे बुडविण्यांत इंग्रज सरकारास मदत करून, देशबंधूंचे गळे कापण्यास सिद्ध व्हावें

येथवर पाळी आली. अशी स्थिती झाल्यावर, अविश्वास, निश्चयाभाव, असत्यभाषण, व्यसनाधीनता वगैरे जे खंडीभर दुर्गुण प्राय: जित लोकांच्या ठायीं प्रगट व्हावयाचे त, ते आपल्या लोकांच्या ठायीं प्रगट झाल्यास नवल कसलें !

असो, आमच्या लोकांच्याठायीं वरील दुर्गुण प्रगट होण्यास व रा. टिळक यांनीं वर्णिल्याप्रमाणें त्यांची दुर्दशा होण्यास कारणें कोणतींही झालीं असलें, तरी त्यांनीं वर्णिलेली स्थिति खोटी आहे, असें कोणाच्यानेंही म्हणवणार नहीं. तथापि ती स्थिति प्राप्त होण्याच्या कारणाचें वर जें निरूपण केलें आहे, तें बरोबर असल्यास, त्यावरून या स्थितिच्या प्रतिकाराचा उपाय निश्चित करण्यास बरीच मदत होईल असें आम्हास वाटतें. हा उपाय म्हटला म्हणजे अर्थात धर्मशिक्षण व नीतिशिक्षण हा नव्हे. कारण धर्माचें बंड यापुढें सांप्रतच्या ज्ञानसंपन्न काळांत फारसें टिकेल असें वाटत नाहीं; व नीतितत्वे परिस्थितिसापेक्ष असून इतकीं अनिश्चित आहेत कीं त्याच्या नुसत्या पठनानें कांहींच कार्य होणारें नाहीं. मग यास उपाय तरी काय ? आमच्या मतें हा उपाय रा. टिळक यांनीं वर सुचविला आहे तोच. म्हणजे "स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, समाजाबद्दल आदरबुद्धि व प्रेम, सदाचरणाची गोडी वगैरे जे गुण चांचल्यदोष घालवितात, त्यांचें साम्राज्य" घेणें हेंच सांप्रत आपणास हितावह आहे. पण ही गोष्ट त्यावेळीं जी देशाची स्थिति होती तशा स्थितींत शक्य नव्हती. मग, ज्याची दृष्टि इंग्रजीच्या ज्ञानानें फांकली आहे, त्यांस हे गुण कोठले ? ज्यांस नुसतें इंग्रजाच ज्ञान प्राप्त झालें होतें, त्यांस स्वतांच्या ज्ञानाचीच थोरवी वाटूं लागली, व ती थोरवी मिरविण्याला इंग्रजी विद्वानांस राजाश्रयाचा जोर मिळाल्यामुळें ही मंडळी फुगून गेली, व वरील गुणाचा विपर्यास करून स्वदेशाविषयीं, स्वधर्माविषयीं, स्वभाषेविषयीं व स्वजनांविषयीं, फार काय सांगावें?—सदाचरणाविषयीं देखील एक प्रकारचा अनादर व

तिरस्कार दाखवूं लागली! यास्तव त्यांस ताळ्यावर आणण्याचा जर कांहीं उपाय असला तर त्यांस आपल्या स्थितीचें व प्राचीन विद्यांचें यथार्थज्ञान करून देणें हाच होय. पण तें त्यांस संस्कृताच्या व इंग्रजीच्या अध्ययनावांचून होणें शक्य आहे काय? असें आह्मी विचारतों. याचें प्रत्यंतर पाहणें असल्यास, आपणास इंग्रजी अमलामध्यें मिळालेल्या शिक्षणाच्या इतिहासाकडे वळलें पाहिजे. हा इतिहास मागें दिलाच आहे, त्याकडे अमळ लक्ष दिलें तर असें दिसून येईल कीं लोकशिक्षणामध्यें इंग्रजी व संस्कृत असे जे दोन प्रवाह चालले आहेत, त्यांच्या योगानें मराठी भाषेच्या अभिवृद्धीवर जसें कार्य झालें तसेंच तें समाजाच्या सुस्थिती-वर व धार्मिक आचारविचारांवरही झालें. हें पाहणें जसें मनोरंजक तसेंच तें आपल्या सुधारणुकीच्या दृष्टीनें अत्यंत उपयोगाचेंही आहे. हें कार्य असें झालें कीं इंग्रजी ज्ञानानें संपन्न झालेल्या मंडळीला संस्कृताचा व त्यांतील ज्ञानाचा संसर्ग नसल्याकारणानें, या मंडळीचे आचारविचार इंग्रजीवर गेले व तिनें देशहितार्थ आरंभिलेलीं सगळीं कृत्येंही अनुक-रणेच्छेनें इंग्रजी नमुन्यावर गेलीं. परंतु तीं इकडील लोकांच्या विचार-परंपरेला फारशीं अनुकूल नसल्या कारणानें, थंड हवेंतलें झाड उष्ण प्रदेशांत जसें नीट वाढूं लागत नाहीं, लौकर मरगळीस येतें, तशींच तींही मरगळीस येऊन, त्यांच्या उत्पादकांच्या उपहासास मात्र कारण झालीं. हेंच कार्य इंग्रजी शिकलेल्या संस्कृतज्ञ मंडळीनें फार वेगळ्या तऱ्हेनें केलें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. उदाहरणार्थ, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या खटपटी मोडून काढण्याकरितां आपल्या इकडील केवळ इंग्रजी व संस्कृतज्ञ इंग्रजी विद्वानांनीं काय केलें तें पहा. संस्कृतज्ञ मंडळीनें हिंदुधर्मावर व हिंदुसमाजव्यवस्थेवर हल्ले करणाऱ्या मिशनऱ्यांच्या कोटिक्रमास उत्तरें देऊन त्यांस हटविण्याचे यत्न मांडले. या संस्कृतज्ञ मंडळींनें याच कार्यासाठीं 'विचारलहरी' या नांवाचें एक स्वतंत्र पत्रही काढलें होतें. व त्यांत त्या वेळच्या संस्कृतज्ञ विद्वानांचे अग्रणी कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचें अंग होतें. मिशनरी लोकांस राज्यकर्त्यांचा भरपूर

आश्रय असल्या कारणानें, ते अशा केवळ तार्किक वादानें वठणीस येण्यासारखे नव्हते; तरी वरील प्रयत्नांनीं, एतद्देशीयांपैकीं जे पुष्कळ लोक बाटून ख्रिस्ती होण्याच्या बेतांत होते, त्यांस थांबविलें यांत शंका नाहीं. आतां याच बाबतींत केवळ इंग्रजी विद्वानांनीं काय केलें तें पाहण्यासारखें आहे. त्यांच्या कृतीचें व त्यापासून झालेल्या परिणामाचें वर्णन रा. टिळक असें करतात:—

" ख्रिस्तिधर्माचा प्रतिकार करावयाचा असल्यास तो त्याच धर्मांतील बाह्योपांगें घेऊन, त्यास एकेश्वरी किंवा प्रार्थनामपाज असें नांव देऊन, नवीन पंथ काढल्यानें होईल, हीच कायती त्या वेळच्या पुढाऱ्यांची प्रमुख कल्पना होती; व ही कल्पना तडीस नेण्यास आपण योग्य आहों असेंही त्यांस वाटत असे. परंतु लौकिकदृष्ट्या आणि तात्त्विकदृष्ट्याही हा समज चुकीचा होता. नवीन धर्मपंथ स्थापणाराच्या अंगीं कोणत्या प्रकारचे गुण असावे लागतात, याची इंग्रजी शिकलेल्या पहिल्या दोन पिढीच्या लोकांस बिलकुल कल्पना नव्हती. इंग्रजी दहापांच बुकांचें अध्ययन झालें, मोठी नौकरी मिळाली किंवा अधिकार प्राप्त झाला म्हणजे तो मनुष्य सामाजिक किंवा धार्मिक बाबतींत पुढाकार घेण्यास नेहमींच योग्य असतो असें नाहीं, हें तत्त्व आमच्या मंडळीस पहिल्यानें कित्येक वर्षें बिलकुल समजलें नव्हतें. त्यामुळें असा परिणाम झाला कीं, इंग्रजी शिकलेल्या पहिल्या दोन पिढींतील मंडळी समाजास ज्या दिशेनें ओढण्याचा प्रयत्न करूं लागली, तिच्या उलट समाजाची प्रतिक्रिया सुरू होऊन, दोघांचा बेबनाव सुरू झाला. कोणत्याही समाजाचा ज्यास पुढाकार घ्यावयाचा असेल त्यानें आपल्या एकनिष्ठपणानें, नीतिमत्तेनें, स्वार्थत्यागानें व समाजाबद्दलच्या खऱ्या कळकळीनें समाजाचा विश्वास पहिल्यानें संपादन केला पाहिजे. पण हे गुण वर सांगितलेल्या इंग्रजी शिकलेल्या नव्या पिढींतील लोकांच्या अंगांत दिसून येत नव्हते. यांच्यापैकीं बरीच मंडळी विद्वान् होती खरी, पण समाजाचे पुढारी होण्यास विद्वत्तेपेक्षां

सदाचरण, धर्मनिष्ठा आणि स्वार्थत्याग यांची अधिक जरूर लागत असते. ही गोष्ट या पिढींतील विद्वान् मंडळी अगदींच विसरली होती, असें ह्मटलें तरी चालेल. त्यांस असें वाटे कीं, आह्मी नवीन विद्या संपादन केली, सरकारांत आमचा मान झाला, तरी अद्यापि आमचे लोक ऐकत नाहींत, हें काय! दुसऱ्या पक्षीं—आणि हा पक्ष अगदींच अज्ञानी होता असें नाहीं—लोकांस असें वाटे कीं, पाश्चिमात्य शिक्षणाचा थोडाबहुत लाभ झाल्यानें मनुष्य कांहीं सर्वज्ञ होतो असें नाहीं. त्यांतून या नवीन पिढीचे अद्वातद्वा आचरविचार, आहार, मतें वगैरे लोकांच्या नेहमीं नजरेस पडत असल्यामुळें त्यांच्याबद्दल लोकांची चांगली बुद्धि राहिलेली नव्हती. हजारों वर्षे चालत आलेली समाजाची व्यवस्था व रचना आणि चुटकीसरशी उडवून देऊं, असें मानणारा किंवा ह्मणणारा मनुष्य उपहासास पात्र झाल्यास, त्याचा दोष लोकांकडे देणें चुकीचें होय. परंतु पाश्चिमात्य शिक्षणाच्या पहिल्या मदानें धुंद झालेल्या मंडळीच्या नजरेस ही विसंगतता आली नाहीं, व स्वदेशकल्याण करण्याची मोठी हाव धरून, कोणी धर्माच्या तर कोणी सामाजिक सुधारणेच्या मागें ते लागले. हिंदुराष्ट्राचें इंग्रजांच्या अमलापासून हित होत आहे कीं अहित होत आहे, लोकांच्या उपजीविकेचीं साधनें उत्तरोत्तर कमी होत आहेत कीं वाढत आहेत, संघशक्तीनें काम करण्याची सवय त्यांस लागण्याचा कितपत संभव आहे, मनुष्याच्या अंगची बुद्धि, कर्तबगारी किंवा हुषारी दाखविण्यास नवीन राज्यव्यवस्थेंत अवकाश आहे कीं नाहीं इत्यादि ज्या गोष्टींचा सन १८७५ नंतर महाराष्ट्रांत खल होऊं लागला, त्यांजकडे तत्पूर्वीच्या दोन तीन पिढ्यांनीं फारसें लक्ष दिलेलें दिसत नाहीं. त्यांचा भर कायतो धार्मिक आणि सामाजिक सुधारणेवर होता. आणि या दोन्ही बाबतींत पुढारीपणा घेण्यास ज्या गुणांची अवश्यकता असते त्यांचा बहुतेकांच्या अंगीं पूर्ण अभाव होता."

विष्णुशास्त्री यांनीं लेखणी हातीं धरली, त्यावेळीं शिक्षणासंबंधानें व शिक्षितसमाजासंबंधानें या देशाची स्थिति कशी होती, तिचें येथवर

निरूण केलें. ही स्थिति त्यांच्या डोळ्यांसमोर होती. ती एकंदरीनें चांगली नव्हतीच. तींत काय काय दोष आहेत ते दाखवून ती सुधारण्याची यथाशक्ति खटपट करणें हें प्रत्येक मुज्ञ ह्मणविणाराचें कर्तव्य होय. हें लक्षांत आणून त्यांनीं आपल्या लेखणीस इष्ट वळण दिलें. विष्णुशास्त्री हे बहुश्रुत ग्रंथकार होते. अर्थात् त्यांच्या हातून जे जे व्यवसाय झाले ते सर्व याच संबंधाचे असल्यास नवल नाहीं. त्यांचें चरित्र जो कोणी लक्ष्यांत आणील त्यास सहज कळेल कीं त्यांचा सारा जन्म विद्याव्यासंगांतच गेला. विद्याभ्यास करणें, निबंध लिहिणें, विद्यार्थ्यांस शिकविणें, मासिक पुस्तकें व वर्तमानपत्रें काढणें, शाळा घालणें, छापखाना घालणें वगैरे, हींच कामें कृत्यें त्यांनीं केलीं. याशिवाय देशांतील राजकीय व सामाजिक सुधारणेच्या कोणत्याही खटपटींत व उलाढालींत ते प्रत्यक्ष पडल्याचें ठाऊक नाहीं. त्यांच्या आयुष्यक्रमाचा व कर्तृत्वाचा रोंख अगदीं पहिल्यापासून निश्चित होता. त्याचा उल्लेख पहिल्यानें त्यांनीं जरी कोठें केला नाहीं तरी पुढें सरकारी नोकरी त्यांनीं सोडिली व रुपेरी शृंखळा तोडून, शाळा, वर्तमानपत्रें वगैरे काढिलीं, त्यावेळीं त्यांनीं सर्वांस जाहीर केलें कीं "इतउत्तर अध्ययन, अध्यापन व ग्रंथलेखन या तीन उद्योगांत आह्मी आपला कालक्षेप करणार.*" अशा प्रकारचें त्यांच्या उद्योगांचें स्वरूप असल्यामुळें, त्यांच्या कृत्यांचा समाजाच्या स्थितीवर कांहीं परिणाम घडावा, लोकांच्या मनामध्यें चळवळ उत्पन्न व्हावी व त्यांनीं आपली सुधारणा करण्यास झटावें असें व्हावें असें सकृद्दर्शनीं कोणासही वाटत नाहीं. कोणी मोठा विद्वान पंडित झाला तर तो आपल्या व्यासंगाच्या कक्षेंतच काय तो गाजेल, अशी बहुधा समजुत असते. परंतु विष्णुशास्त्री यांच्या विद्याविषयक व्यवसायाचा कक्षाप्रदेश फार विस्तीर्ण होता. किंबहुना त्यांत येत नाहीं असा सर्व सामान्य लोकांच्या उपयोगाचा कोणताही विषय नाहीं. बहुश्रुत

---

* वि. चि. किरकोळ लेखांचा संग्रह भाग २ पृष्ठ २५५ पहा.

ग्रंथरचनेंत अगदीं सामान्य व्यावहारिक गोष्टींपासून तों फार गहन अशा तात्विक विचारांपर्यंत सर्वांचा समावेश होण्यास नड नसते. व सर्व लोकांस तें ज्ञान सुबोध आणि सुलभ करून देण्याचा त्यांत यत्न असल्यामुळें, अशा ग्रंथरचनेचा लोकस्थिति सुधारण्यास फार उपयोग होतो. तशांत अलीकडे मुद्रणकला निघाल्यापासूनतर वरील प्रकारच्या ग्रंथरचनेस विशेष महत्व प्राप्त झालें आहे. कांकीं, ह्या कलेच्या योगानें वरील ज्ञान फार त्वरेनें प्रसार पावून व त्याचा साऱ्या जनसमाजावर परिणाम होतो. ही गोष्ट विष्णुशास्त्री यांच्यासारख्या चतुर ग्रंथकाराच्या तत्काळ लक्ष्यांत आली व त्याच दिशेनें त्यांनीं आपल्या व्यवसायांचें धोरण ठेविलें हें उघड आहे. शास्त्रीबुवा हे एक देशभक्त होते, सुधारक होते, कल्पक होते, व कर्तृत्ववान होते. ज्या वेळीं अभ्यासक्रम पुरा करून, इंग्रेशी विद्यापीठाचे संस्कार पावून, ते बाहेर पडले, त्या वेळीं लोकांची स्थिति कशी झाली होती ती त्यांच्या डोळ्यांपुढें होती, व ती कशी सुधारतां येईल तो उपायही त्यांच्यापाशीं सिद्धच होता. हा उपाय ह्मटला ह्मणजे जें ज्ञान एवढ्या परिश्रमांनीं आपण संपादन केलें त्याचा लाभ ग्रंथरचनाद्वारा आपल्या देशबांधवांस सुलभतेनें मिळेल असें करून, त्यांस आपल्या स्थितिविषयीं सज्ञान करणें हा होय. लोकांची स्थिति सुधारण्याला कांहीं तरी त्यांच्या हातून योग्य मार्गानें क्रिया घडली पाहिजे; व या क्रियेचा उगम ज्या मनाशीं तें मन जर सज्ञान करतां येईल तर मोठेंच काम झालें असें होईल. यास्तव याच उपायाचें अवलंबन करून विष्णुशास्त्री यांनीं लेखणी हातांत धरिली व निरनिराळ्या अनेक विषयांवर निबंध लिहून प्रगट केले. ते लोकांस इतके प्रिय झाले कीं त्यांच्या योगानें मोठी चळवळ उडून, लोकांचे विचार ज्या दिशेनें चालले होते ती दिशा फिरली शास्त्रीबुवा प्रथम लेख लिहूं लागले त्या वेळची सुशिक्षित ह्मणविणारांची स्थिति कशी होती, त्यांच्या विचारांचें वळण कसें होतें व खासगी व सार्वजनिक कृत्यांचा प्रवाह कसा चालला होता, हें वर दाखविलेंच आहे, तें लक्षांत आणून, त्याशीं पुढील स्थितीचो तुलना

करून पाहावी, म्हणजे वरील चमत्कार कसा झाला, हें चांगलें लक्षांत येईल. ही तुलना थोडक्यांत स्वतां शास्त्री बुवांनींच एके ठिकाणीं करून दाखविली आहे, ती येणेंप्रमाणें:—

"साहा वर्षांपूर्वी आह्मीं आपल्या पुस्तकास जेव्हां सुरवात केली, तेव्हां आमच्या देशाची व भाषेची स्थिति फार निराळी होती. पूर्वीपासून अबाधितपणें चालत आलेल्या मतांचा प्रचार तेव्हां जारीनें सुरू होता. आपल्या देशांत जें जें दृष्टीस पडतें तें तें प्रायः अप्रयोजक व निंद्य, व आपली देशभाषा ह्मणजे अडाणी व कोती, हीं दोन मुख्य तत्त्वें विद्वज्जनांस संमत असल्यामुळें व त्यांनीं त्यांचें नेहमीं प्रणयन केल्यामुळे, तीं लोकांच्या मनांत बळकट खिळून राहिलीं होतीं. वरील दोन ग्रह आमच्या लेखांच्या योगानें शेकडों लोकांचे शिथिलित झाले असतील, असें ह्मणण्यास मोठीशी हरकत दिसत नाहीं. हल्लीं मराठींत ग्रंथरचना करण्याचा प्रघात किती वाढला आहे, व आमच्या आचारविचारांच्या संबंधानेंही लोकांत किती चलबिचल होऊं लागली आहे, या दोन गोष्टींकडे कोणाही शोधक मनुष्याचें लक्ष गेलें नसेलसें नाहीं. आह्मी लेखणी हातीं धरण्याचे पूर्वी, हीही एक चमत्कारिक गोष्ट आह्मास आढळून येत असे, कीं नवीन मंडळींतून कोणाचे मनांत देशहितार्थ ग्रंथरचना करण्याचें आलें असतां, विषय सांपडण्याचीच त्यांस मारामार पडे. लिहावयास विषय तरी काय आहे, बहुतेक लोकांस माहीत असणाऱ्या गोष्टींचेंच चर्वितचर्वण करायाचें कीं नाहीं, या प्रकारचे उद्गार कर्त्यांमधीं कानावर येत! पण जो लिहावयास लागेल त्यास सारा लोकव्यवहार व अवघी सृष्टि हीं अनंत वर्षें पुरण्यासारखें विषयभांडार होय, व संस्कृतादि प्राचीन भाषा व इंग्रजी वगैरे अर्वाचीन भाषा यांच्या ठायीं ज्ञानाचीं केवढालीं अपरंपार कोठारें आहेत, या गोष्टी फार करून कोणाच्याही मनांत येत नसत. इंग्रजी भाषेंत आजपर्यंत हजारों हजार ग्रंथ होऊन गेले असून, अद्याप कोणा ग्रंथकाराची लेखणी विषयाच्या अभावामुळें थांबली आहे असें आढळत नाहीं;

आणि आमच्या इकडे अजून कशास कांहीं ठिकाण नसतां, काय पंचाईत येऊन पडते पहा ! ! हें सर्व फळ आलीकडील चमत्कारिक शिक्षणपद्धतीचें होय. हिच्या योगानें मनुष्य चोहोंकडून गुंडा बनतो खरा; पण या गुंडेपणाचे परिणाम म्हटले म्हणजे चोहोंकडे गुडघाभर पाणी, विषयविशेषावर अरुचि, हे होऊन बसतात. असें झाल्यावर यापूर्वी शेकडों वेळां उल्लिखित केलेले नवीन मंडळीचे दोष, जे पंडितंमन्यता, कृतकृत्यताबुद्धि, श्रमविमुखता इत्यादि, ते सहजच उत्पन्न होतात. जे देशकार्यधुरीण, त्यांची अशी स्थिति असल्यावर, मग त्यांच्या दृष्टीवर निर्वाह करणाऱ्या प्राकृतजनांची हालअपेष्टा तर काय विचारावी ! तेव्हां, वरील कारणांमुळें अशी कांहीं चमत्कारिक लोकस्थिति होती कीं, एकादा मजकूर छापलेला असला, कोणी बड्या मनुष्यानें एकादें मत प्रगट केलें असलें, आणि त्यांतून एकाद्या इंग्रेजी ग्रंथकाराचा कांहीं उल्लेख असला, कीं मग बोलण्याची कांहीं सोयच उरली नाहीं—ब्रह्मवाक्यो जनार्दनः !........याप्रमाणें बड्या नांवास भुलून एकदम हुरळून जाण्याचाही प्रकार आमच्या देशांत बराच आढळतो. दोन चार बड्या मंडळींनें एकादा डोलारा कोणत्याही उद्देशानें उभारला, कीं दुल्ला करून मंडळी लागलीच मागें ! मग हें प्रकरण आहे काय, आपण काय करीत आहों, याचा कांहीं विचार नाहीं.......तर, आमच्या गेल्या साहा वर्षांतील उद्योगापासून हीही एक गोष्ट आमच्या देशबंधूंच्या मनांत बरीच बिंबली असेल, कीं पुरा कस लाविल्याखेरीज सोन्याचा सोनेपणा धरूं नये. तसेंच कोणी लौकिकानें मोठा, येवढ्यावरच जाऊन, त्याच्या वचनाचें जें प्रामाण्य मानायाचें, त्यापेक्षां आपण स्वतः होईल तितकी यथातथ्य परीक्षा करून नंतर कोणचेंही मत ग्राह्य कीं अग्राह्य तें ठरवावें, हें उत्तम. हें ठरविण्याचा अधिकार लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांस सारखा आहे, हेंही तत्त्व आमच्या पुस्तकावरून सर्वांस कळण्यासारखें आहे."

याप्रमाणें, विष्णुशास्त्री यांच्या लेखांनीं मराठी भाषेची स्थिति व महाराष्ट्रांतील विद्वान आणि पुढारी लोकांचे विचार या दोहोंच्याही

ओघांत जी फिरवाफिरव केली, तिचें स्वरूप आहे. त्याकडे लक्ष दिलें असतां, विष्णुशास्त्री यांनीं महाराष्ट्र भाषेची व महाराष्ट्र देशाची केवढी महत्वाची कामगिरी केली व तेणें करून त्यांनीं महाराष्ट्रीयांवर केवढे उपकार करून ठेवले, हें कोणासही सहज कळेल. शास्त्रीबुवांनीं काय कामगिरी केली, तिचें ऐतिहासिक दृष्ट्या निरीक्षण करून, विवेचन करण्याचा काळ सांप्रत येऊन ठेपला आहे. तें योग्य रीतीनें झाल्यावांचून आणि त्यांस ज्या गोष्टींचें निराकरण व निवारण करावें लागलें, त्या गोष्टी कोणत्या हें समजून घेतल्यावांचून, कोणासही त्यांच्या लेखांची व त्यांनीं केले या कामगिरीची वास्तविक योग्यता कळणें कठिण आहे. ह्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे, त्यांच्या पूर्वींच्या इंग्रजी शिकलेल्या मंडळीनें देशसुधारणुकीचें बंड उभारून, आचार व विचार यांच्या संबंधानें जीं अनेक खुळें माजविलीं होतीं, तीं होत. त्यांचा घडा भरत आला होताच; इतक्यांत सन १८७० सालीं विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत संस्कृत अवश्यक झालें, तेव्हांच त्यावर टोला बसला, असें ह्मटलें पाहिजे.* कांकीं संस्कृत आवश्यक होतांच, त्याचें अध्ययन विशेष आस्थेनें होऊं लागून, आमच्या विद्वानांचें लक्ष त्यांत सांठविलेल्या आपल्या पूर्वजांच्या अपूर्व बुद्धिवैभवाकडे गेलें, व त्यांस सहजच त्याचें कौतुक वाटू

---

* संस्कृताध्ययनाच्या योगानें मराठींत ग्रंथरचना करण्याची योग्यता संस्कृतज्ञ इंग्रजी विद्वानांच्या आंगीं येऊन, त्यांची प्रवृत्ति मराठींत ग्रंथ रचण्याकडे झाली, हें जसें मराठी भाषेच्या अभिवृद्धीवर कार्य झालें, तसेंच तें त्यांच्या आचारविचारांवर ही झालें, हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. निव्वळ इंग्रजी शिकलेल्या विद्वानांनीं इंग्रजी नकलेच्यावर जें सुधारणेचें बंड माजविलें होतें, तें मोडून प्राचीन आर्य विद्यांस व योग्य आचारविचारांस अनुसरून जो देशोद्धाराचा मार्ग अलीकडे निघाला आहे, त्याच वळण सर्वत्र लागत चाललें आहे, हें सारें फळ संस्कृताध्ययनाच्या सार्वत्रिक प्रचाराचें होय! परंतु हें वळण ख्रिस्ती धर्मास बाधक असल्या कारणानें, मिशनऱ्यांस व त्यांचा अनुवाद करीत आलेल्या सुधारक वर्गास तें नापसंत आहे हें सांगणें नकोच. "विद्यार्थी

लागलें. याचा परिणाम असा झाला कीं या संस्कृतज्ञ इंग्रजी विद्वानांच्या हृदयांत आपल्या पूर्वजांविषयीं योग्य पूज्यबुद्धि उत्पन्न झाली, व स्वदेशाविषयीं आणि स्वभाषेविषयीं योग्य अभिमानवृत्ति ते धरूं लागले. मग जसजशी ही त्यांची पूज्यबुद्धि व ही अभिमानवृत्ति बळावत चालली, तसतसा तत्पूर्वींच्या इंग्रजी विद्वानांनीं काढलेल्या सुधारणेच्या खुळांचा अप्रयोजक ओंगळपणा त्यांस भासूं लागला; व ते या खुळांनीं ओतप्रोत भरत आलेल्या घड्याकडे साभिप्राय दृष्टीनें पाहूं लागले. त्यांचा अभिप्राय काय होता हें येथें फोडून सांगण्याची गरज नाहींच. पहिला फटका, शाळापत्रकांतील लेखांच्या द्वारें, सन १८७२ सालीं विष्णुशास्त्री यांनीं मारला, व त्या घड्याचा कर्णमधुर बदबद अवाज आश्चर्यस्तब्ध जगाच्या कानीं पडला! पुढें १८७४ सालीं निबंधमाला सुरू केल्यापासून तर त्यांनीं त्यावर निर्भयपणें यथास्थित तडाखे चालविले! ते एकसारखे सात आठ वर्षे चालले होते. तेवढ्या अवधींत त्या बिचाऱ्या घड्याचे तर तुकडे तुकडे झालेच; पण त्यांतून बाहेर पडलेल्या अपूर्व सुधारणेच्या खुळांचे व अनेक दुर्मतांचे जे वेगवेगळे मासले सर्व जगापुढें आले ते पाहून तर सर्वांस मोठें आश्चर्य झालें. त्या वेळचा तो देखावा काय सांगावा! क्षणभर त्या देखाव्यानें, मळ्यांतील रोपांस अपाय करणाऱ्या गरोदर खेकडीचे पाठीवर माळ्याचा बडगा पडला असतां, तींतून पटापट

---

बिचरत चालले," "प्रतिकार (reaction) सुरू झालें," म्हणून जी ओरड अलीकडे होऊं लागली आहे, तिचें बीज वस्तुतः या संस्कृताध्ययनांतच आहे. हें जाणून, मिशनरी व जुने सुधारक यांनीं मिलाफानें मराठीला पुढें करून, तिच्या नांवावर संस्कृताला विद्यापीठांतून हद्दपार करण्याचा व इंग्रजी सुधारणेचा हुतूतू पूर्वीप्रमाणें सुरू करण्याचा घाट घातला आहे, हें सर्वांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यासंबंधानें मागें एके ठिकाणीं लिहिलेंच आहे. येथें एवढेंच सांगतों कीं हा यांचा घाट सिद्धीस गेला तर मराठीला कांहींएक लाभ न होतां, तिचें उलट मोठें नुकसान मात्र होणार आहे, हें मराठीच्या आप्तेवाइकांनीं लक्षांत आणून, हा घाट सिद्धीस न जाऊं देण्यास जपावें.

बाहेर पडणाऱ्या व स्वतांच्या वक्रवक्र गतीनें प्रेक्षकांच्या मनांत कौतुक उत्पन्न करणाऱ्या चिमकुल्या पिल्लांच्या देखाव्यासही मागें सारलें, असें ह्मणावयास चिंता नाहीं! असो. हा तडाखा शास्त्रीबुवांनीं चालविला असतां, त्यांचीच कांस धरून, या संस्कृतज्ञ इंग्रजी मंडळीनें, संस्कृत विद्यादंडाच्या साहाय्यानें व इंग्रजी ज्ञानाच्या प्रकाशानें, चोहोंकेर व्यापून राहिलेल्या अज्ञानांधकारांतून एक नवाच मार्ग काढला व त्या मार्गानें स्वदेशाच्या व स्वभाषेच्या उद्धारार्थ खटपट चालविली; ती अजून चा .- लीच आहे व पुढेंही ती तशीच अव्याहत चालू राहील यांत शंका नाहीं. ही मंडळी अगोदरच्या सुधारकांच्या संबंधानें आपणास उद्धारक ह. .वते हें प्रसिद्धच आहे.

वरील प्रकारावरून हें स्पष्ट आहे, कीं जुन्या सुधारक वर्गानें सुधारणेच्या नांवावर काढलेलीं अनेक खुळें, संस्कृताच्या ज्ञानानें जरी आपोआप मोडत चाललीं होतीं, व आरंभीं सुधारक मंडळीस सरकारी मोठमोठ्या नोकऱ्या एकदम मिळत ह्मणून त्यांच्या या खुळांस कांहीं वेळ प्राप्त झालेलें नसतें महत्व, सरकारी नोकऱ्यांचा दर कमी कमी होतांच, जरी नाहींसें होत आलें होतें, तरी त्यांच्या वास्तविक ओंगळ स्वरूपाचें प्रदर्शन करून, त्यांस लौकर धुळीस मिळविण्यास साक्षात् व मुख्य कारण झटलें ह्मणजे विष्णुशास्त्री यांचे लेखच होत, यांत शंका नाहीं. याचप्रमाणें, समाजाचें व्यवस्थित स्वरूप कायम ठेवून, जी सुधारणा करावी असेल ती केली पाहिजे; इंग्रजी शिकल्यानेंच कोणास सर्वज्ञता येते असें नाहीं, हें ध्यानांत ठेवून, केवळ बड्या नांवावर न जातां, आपल्या सदसद्विवेकशक्तीचा स्वतंत्रपणें उपयोग करून जी गोष्ट कसोटीस उतरेल तीच मानावी व तदनुसार आपलें वर्तन ठेवावें; आणि सतत उद्योग, सदाचरण, व्यवस्थितपणा, देशाभिमान वगैरे सद्गुण संपादून, यथाशक्ति देशाच्या हितार्थ झटावें हें प्रत्येक सुशिक्षित मनुष्याचें कर्तव्य होय—ह्या गोष्टी जर आजकाल कोणाच्या मनांत बिंबल्या असतील, तर तें श्रेयही शास्त्रीबु-

वांसच देणें योग्य आहे. इंग्रजी विद्येच्या व इंग्रज लोकांच्या वाढत्या परिचयानें, अलीकडे त्यांच्या तत्वज्ञानाची व त्यांच्या मुत्सद्दी धोरणाची अधिकाधिक माहिती होऊं लागल्यामुळें, आपल्या लोकांचे डोळे बरेच उघडत चालले आहेत, यांत शंका नाहीं; तथापि इंग्रजी ज्ञानामृताच्या पहिल्या घुटक्याबरोबर जो अव्यवस्थितपणाचा मद त्यावेळच्या विद्वानांच्या ठायीं चढला होता, तो उतरून, त्यांस ताळ्यावर आणण्याचा व्यवस्थेशीर यत्न प्रथम शास्त्री बोवांनींच केला हेंही विसरतां कामा नये. अशा प्रकारें लोकमताचा प्रवाह एकाच बाजूला वाहूं लागला असतां, त्यास केवळ लेखणीच्या जोरावर अडवून धरून, स्वदेशाविषयीं अभिमान, पूर्वजांविषयीं पूज्यबुद्धि व देशबांधवांच्या हिताविषयीं आस्था, याकडे तो वळविणें, हें कांहीं लहानसान काम नव्हतें. तें शास्त्रीबुवांनीं इच्छिल्याप्रमाणें यथास्थित तडीस नेलें व तेंही केवळ वत्तिशीच्या आंत; यावरून त्यांची योग्यता चारचौघांहून पुष्कळ पटीनें अधिक असली पाहिजे हें उघड आहे!

आतां कोणी असें ह्मणतील कीं शास्त्रीबुवांच्या आंगीं जे कित्येक दोष होते व जे त्यांच्या लेखांतही उतरले आहेत, त्यांच्या योगानें त्यांच्या या योग्यतेला बराच उणेपणा आलेला आहे. यास्तव, हे दोष कोणते हें पाहणें व सामान्यत: त्यांच्या गुणदोषाचेंही विवेचन करणें, हें त्यांनीं बजावलेल्या कामगिरीचें स्वरूप दाखवितांना, अवश्य आहे. तथापि प्रस्तुत उपोद्घात बराच वाढल्यामुळें, तसें येथें करवत नाहीं. याशिवाय हें गुणदोषविवेचन कित्येकांनीं केलें आहे. त्याहूनही तें अधिक विस्तृत व वेगवेगळ्या रूपानें होणें जरी इष्ट आहे, तरी तूर्त त्यावरच हवाला देऊन, ज्यांनीं हें गुणदोषविवेचन केलें आहे अशा या शास्त्रीबुवांच्या टीकाकारांच्या संबंधानें सामान्यें करून मात्र कांहीं येथें लिहितों.

शास्त्रीबोवा जीवंत असतां, त्यांच्या लेखांवर ज्यांनीं ज्यांनीं टीका केली, त्यांचा समाचार स्वतां त्यांनींच घेतला आहे. त्यांत बहुधा "निर्वीर्यमुर्वीतलम्" असाच प्रकार दृष्टीस पडतो. तेव्हां, ते स्वर्गस्थ

झाल्यावर त्यांच्याविषयीं ज्यांनीं टीकारूप लेख लिहिले, त्यांचाच उल्लेख येथें करावयाचा. अशा टीकाकारांचे दोन वर्ग केले पाहिजेत; एक त्यांस अनुकूळ अशांचा व दुसरा त्यांस प्रतिकूळ अशांचा. प्रथमतः, प्रस्तुत उपोद्घात लिहिणारांनीं * व विष्णुशास्त्री यांचे बंधु कै. लक्ष्मणराव यांनीं † शास्त्रीबुवांचीं चरित्रें लिहिलीं आहेत, त्यांचा उल्लेख केला पाहिजे. या दोहोंतही, पूज्यबुद्धिपूर्वक त्यांच्या कर्त्यांस वाटले, त्या त्या शास्त्रीबुवांच्या गुणांचें व दोषांचेंही निरूपण केलें आहे. यानंतर अलीकडे, रा. लक्ष्मणराव–कृत शास्त्रीबुवांच्या चरित्राचें परीक्षण करतांना, त्यांच्या गुणदोषांचें निरूपण रा. देव यांनीं केलें आहे. ¶ हें बरेंच विस्तृत असून, विचारानें काळजीपूर्वक लिहिलेलें आहे. तसेंच यांत प्रतिकूळ पक्षाकडून येणाऱ्या बहुतेक आक्षेपांचेंही दिग्दर्शन झालें आहे. या प्रकरणांत एवढा तीव्र, एवढा विस्तृत व एवढा शोधपूक लिहिलेला दुसरा लेख निदान आमच्या तरी पाहण्यांत नाहीं. यावर आमचे मित्र रा. मुंडले ‡ यांणीं खंडनरूप एक विस्तीर्ण लेख प्रगट केला असून त्यांत रा. देवांचे सर्व आक्षेप सरळ भाषेनें मोडून काढले आहेत व शास्त्रीबोवांचे गुण दाखवून त्यांची प्रशंसा केली आहे. रा. देवांच्या याच लेखास उत्तर म्हणून जरी स्पष्ट म्हटलेलें नाहीं तरी त्याच हेतूनें, केसरीचे समर्थ कर्ते रा. टिळक यांनींही एक लेख लिहून

---

* "विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या चरित्राचें व लेखांचें साधारण स्वरूप" कर्ते रा. खंडेराव भिकाजी बेलसरे; किंमत रु. १॥. हें १८९१ सालीं छापलें असून, रा. के. सी. कुळकरणी यांच्या नांवें काळकादेवी रोड, मुंबई, या पत्यावर मागविल्यास मिळेल.

† "विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र" सन १८९५ किं. १॥

¶ "विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र" पुस्तकपरीक्षण "ग्रंथमाला" अंक ७५ पहा.

‡ "वि. शा. चि. यांजवर रा. देवांनीं सोडलेलें टीकास्त्र." ग्रंथमाला अंक ७८ व ८० पहा.

'सद्वर्तनप्रवर्तक मंडळी'च्या वार्षिक मेळयापुढें वाचला.* यांत शास्त्री बुवांच्या पूर्वींची व तत्कालीन स्थिति दर्शविली असून, त्यांजवर येणाऱ्या आक्षेपांचेंही खंडन केलें आहे. ही खंडनात्मक टीका, (वाणीचा कठोरपणा सोडून दिला तर) विस्तृत असून, इतकी मुद्देसूत, समर्पक, जोरदार व विशद झाली आहे कीं तिच्या योगानें प्रतिपक्षाचीं तोंडें बहुधा बंद झाल्यासारखींच झालीं, ह्मणावयास चिंता नाहीं. किंबहुना, नवीन एखादा मुद्दा निघेतोंपर्यंत बहुधा हा लेख या प्रकरणांत शेवटला असेंही ह्मणतां येईल. या लेखांतून कांहीं उतारे आह्मीं मागें घेतलेच आहेत, व जागेची सवड असती तर शास्त्रीबुवांवर येणाऱ्या दोषारोपांच्या खंडनाचाही बाकीचा भाग येथें उतरून घेऊन, त्यास चिरस्थायी करून ठेवला असता; परंतु निरुपाय जाणून, तो समग्र लेख वाचून पहावा एवढीच वाचकांस आग्रहपूर्वक सूचना करून, पुढें चालतों. या ठिकाणीं, रा. दामले यांच्या "हेतु की परिणाम"† ह्याही लहानशा निबंधाचा उल्लेख ओळीनेंच करणें येत आहे. यांत रा. दामले यांनीं, लेखाच्या परिणामावरून शास्त्रीबुवांचा हेतु 'सवंग लोकप्रियता' मिळविण्य'चा नव्हता, असें रा. देवांच्या वरील लेखांतील ह्मणण्यावरूनच, तर्कशास्त्राच्या प्रमेयाधारें सिद्ध करून दाखविलें आहे. याशिवाय व्यापक व विचारपूर्वक लिहिलेला असा आणखी एखादा नांव घेण्यासारखा स्वतंत्र लेख आमचे पाहण्यांत नाहीं. तथापि कांहीं किरकोळ लेख व भाषणें, प्रसंग असतां व नसतांही, लहरीप्रमाणें प्रगट झालेलीं कधींमधीं वाचण्यांत व ऐकण्यांत येतात, त्यांचा अगदींच अव्हेर करणें वाजवी होणार नाहीं असें वाटतें. यामध्यें, प्रत्येक वर्षीं "सद्वर्तनप्रवर्तक मंडळी" शास्त्रीबुवांच्या निधनतिथिनिमित्त एक मेळा जमविण्याचें स्तुत्य कृत्य करीत असते, त्या वेळीं होणाऱ्या भाषणांचा समावेश होतो.

---

* केसरी, ता० १९ मार्च १९०१ व ता० २ एप्रील १९०१ हे अंक पहा.

† ग्रंथमाला अंक ७९.

हीं भाषणें प्रायः शास्त्रीबुवांच्या गुणानुवादाचींच असतात; तरी ह्या वेळीं त्यांच्या गुणांचा विषय चर्चेसाठीं लोकांपुढें येतो व त्यांकडे त्यांचें अनायासें लक्ष लागतें, हा त्यांपासून मोठा उपयोग आहे. असे मेळे जर गांवोंगांव होत जातील व त्या वेळीं निबंधमालेंतीलच एकाद दुसऱ्या निवडक मुद्याचें वाचन होऊन, त्यावर चर्चा होत जाईल तर तें फार इष्ट आहे, एवढें, जातां जातां, येथें सूचवून ठेवतों. याच्याच बरोबर, प्रत्येक वर्षी या मेळ्यांतल्या भाषणासंबंधानें कांहींतरी खुसपट काढून, अनर्गलपणें शास्त्रीबुवांची निंदा करण्याचा जो परिपाठ सुधारक पत्रानें ठेवला आहे, त्याचा उल्लेख येथें करणें जरूर आहे. याशिवाय, एकदा न्यायमूर्ति तेलंग यांनीं एल्फिन्स्टन कालेजच्या विद्यार्थ्यांपुढें इंग्रजींत भाषण करतांना, विष्णुशास्त्री यांच्यावर यथेच्छ ताशेरा झाडून, पोटांत डवचणारे विषविचार ओकून टाकण्याची संधि साधली, याही गोष्टीचा, व त्यावर केसरीकर्त्यांनीं जशास तसें जें समर्पक उत्तर दिलें, त्याचा विसर पडूं देणें, न्यायमूर्तींच्या संबंधानें, अन्यायाचें होणार आहे.* आतां

---

* केसरी ता० २२ डिसेंबर १८९१ यांतील "अनंत" याचें पत्र व त्यास अनुलक्षून केसरीकारांचा "विष्णु आणि तेलंग" हा प्रमुख लेख पहा. कै. तेलंग यांच्या पोटांत 'विष्णुशास्त्री यांच्या संबंधानें विषमय विचार डवचत होते व ते वरील भाषणाची संधि साधून त्यांनीं ओकून टाकले,' असें जें वर आम्हीं म्हटलें आहे, तें कशावरून याचा खुलासा प्रांजलपणें येथें केला पाहिजे. प्रस्तुत उपोद्घाताचे लेखक यांनीं विष्णुशास्त्री यांचें चरित्र जेव्हां लिहिलें, तेव्हां त्याची हस्तलिखित प्रत न्या. मू. तेलंग यांस दाखविण्याची संधि एकदा त्यांस आली होती. तेव्हां न्या. मू. नीं दोनतीन दिवस प्रत ठेवून घेऊन वाचली व शेवटीं परत देते वेळीं शास्त्रीबुवांच्या व त्यांच्या लेखांच्या गुणदोषासंबंधानें सहजच वाद काढला. तो वाढतां वाढतां बराच कडाक्यानें होण्यापर्यंत पाळी आली. पुढें १५ च दिवसांनीं वरील भाषणाचा योग येऊन, न्या. मू. नीं वरील वमनविधि संपादून आत्मशुद्धि करून घेतली!

आणखी एकाच स्थळाचा उल्लेख करतों; आणि तो, ज्यानें निबंधमाले-प्रमाणेंच मराठीची नावाजण्यासारखी सेवा केली आहे, अशा "विविध-ज्ञानविस्तार" मासिक पुस्तकाचा होय. या पुस्तकानें "कविपंचका-"च्या परीक्षणाखेरीज एकदोन प्रसंगींच कायतें शास्त्रीबोवांसंबंधानें थोडथोडकें लिहिलें आहे; बाकी एकंदरीनें श्रेयस्कर असा मूकभावच धारण केला आहे. इतकेंच केवळ नव्हे, तर विस्तारें करून लिहिण्याचे प्रसंग आले असतांही, त्यानें त्याची टाळाटाळ केली असेंही दिसून आलें आहे.*

आतां शास्त्रीबुवांच्या टीकाकारांची माहिती देऊन झाल्यावर एवढेंच सांगावयाचें कीं शास्त्रीबोवांनीं जे लेख लिहिले व तद्द्वारा जे विचार प्रगट केले, तसेच ते प्रगट करण्यांत जो मार्ग स्वीकारला, त्याविषयीं कोणाचाही मतभेद होणार आहे, व या मतभेदाबद्दल त्यांस दोष देण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि एवढें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं, कीं त्यांचा मार्ग आपणास आवडत नाहीं किंवा स्थितिविशेषा-

---

* वि. ज्ञा. विस्ताराच्या मूळ उत्पादकांपैकीं कै. रा. रामचंद्र भिकाजी गुंजीकर होत. हे उत्कृष्ट मराठी ग्रंथकार असून, त्यांच्या हातून मराठीची केवढी बहुमोल सेवा घडलेली आहे, तीही प्रसिद्धच आहे. खुद्द "विस्तारा-"च्या आफिसांतच, सन १८८२ सालीं, त्यांच्या भेटीचा योग आला. विष्णुशास्त्री नुकतेच वारले होते, तेव्हां सहजींच त्यांच्या संबंधानें बोलणें निघालें. "विष्णुशास्त्री यांनीं केलें आहे काय? निव्वळ बाष्कळ लिहिण्यास मात्र त्यांनीं लोकांस शिकवलें" या अभिप्रायाचा अनुवाद करून, "शास्त्रीबोवांचें चरित्र तुम्ही लिहून आणा, आह्मी तें छापून काढवितों, मग त्यावर लेखी चर्चा करण्यास ठीक पडेल," असें प्रस्तुत उपोद्घाताच्या लेखकास त्यांनीं ह्मटलें. पुढें सुमारें दहा वर्षांनीं चरित्रलेखनाचा योग आपोआप आला, व आमच्या "शास्त्रीबोवांच्या चरित्रा"ची एक प्रत त्यांजकडे आह्मी पाठवून, फार दिवसांचा आपला संकेत पूर्ण करावा ह्मणून

वरून तो आपणास इष्ट नाहीं, एवढ्यासाठीं त्यांस नांवें ठेवणें बरोबर नाहीं. तसेंच ज्या गोष्टीबद्दल आपण त्यांस नांवें ठेवण्यास तयार होतों त्यासंबंधाचीही प्रथम पुरी माहिती त्यांनीं करून घेतली पाहिजे; केवळ अमुक मनुष्य त्यांस नांवें ठेवतो, तेव्हां तें वाईट असलेंच पाहिजे, अथवा अमुक एक गोष्ट वाईट वाटते ह्मणून बाकीच्याही वाईटच, असा मनाचा ग्रह दृढ करून ठेवून चालणें रास्त नाहीं. शास्त्रीबोवांच्या लेखांचा व मार्गांचा विचार करतांना हे नियम नीट ध्यानांत धरले पाहिजेत. पण पक्षाभिमानाच्या भरांत असें होत नाहीं खरें. चरित्रकारांस चरित्रनायकविषयक 'आंधळी पूज्यबुद्धि' जशी आड येते तशी दोषैकदृष्टि टीकाकारांसही "नावडतीच्या आळणी मिठा" ची बाधा झालेली हरहंमेश दृष्टीस पडते. मग, गुणदोषविवेचनाचा कांटा हातीं धरून, समबुद्धीनें परीक्षण करण्याचा कोणी कितीही आव घातला, तरी शेवटीं दोष मात्र खरमरीतपणें दाखवावयाचे व गुण घेण्याची वेळ आली कीं ते नाकें मुरडीत घ्यावयाचे असा प्रकार होऊं लागतो. याचें प्रत्यंतर शास्त्रीबोवांच्या टीकाकारांच्याच लेखांवरून मिळतें. तें मौजेचें असल्यावरून येथें दाखविण्यासारखें आहे. शास्त्रीबोवांविषयीं पूज्य बुद्धि धरणाऱ्या टीकाकारांविषयीं येथें लिहिण्याचें कारण नाहींच. आता

---

पूर्वस्मरणपूर्वक आव्हान केलें. तसेंच "विस्तारा-" चे पूर्ण हितचिंतक कै. हरि महादेव पंडित यांसही स्वतां भेटून, सदर चरित्राची एक प्रत दिली व शास्त्रीबोवांच्या संबंधानें चर्चा करावी ह्मणून प्रार्थना केली परंतु "विस्तारा-"च्या इतर हितचिंतकांप्रमाणें त्यांनीं ही प्रार्थना मनावर घेतली नाहीं. या मूकभावाचें कारण कदाचित् "विस्तारा" च्या चालकांचा विचारीपणा असेल; कदाचित् लेखकांचें विविधत्वही असेल. तथापि विनयपूर्वक त्यांस कळवितों, कीं "विस्तारा"चें मत शास्त्रीबोवांसारख्या का मान्य ग्रंथकाराच्या संबंधानें काय आहे, हें जाणण्याची पुष्कळांस ठी उत्कंठा आहे. ती त्यानें, मूकभाव सोडून, पूर्ण केल्यास, त्याचे मोठे कार होतील.

प्रतिकूल टीकाकारांचे लेख वाचून पाहतां, ' प्रत्येक प्रश्नाच्या दोन बाजू' दाखविण्याच्या भरांत, त्यांस ' परंतु रामायण ' रचण्याची फार गरज पडल्याचें आढळतें ! तें असें कीं " शास्त्रीबोवा हे उत्तम लेखक खरे परंतु त्यांनीं लोकांस वाईट मार्ग दाखविला," " ते स्वातंत्र्याचे भक्त खरे परंतु त्यांनीं पोरांचीं मनें बिघडविलीं, " " त्यांनीं लोकांची रुचि बिघडविली खरी परंतु त्यांस वाचण्याची गोडी लाविली " " ते चांगले खरे पण वाईट होते व वाईट खरे पण चांगले होते" इ०इ०. असा हा या टीकाकारांनीं घोटाळा कां उडवावा, कांहीं कळत नाहीं ! जर ते समदृष्टीनें व पूर्ण माहितीनें शास्त्रीबोवांच्या गुणदोषांचें विवेचन करतील तर हा त्यांचा सारा घोटाळा सहज मोडून, " परंतु-" चेंही त्यांस प्रयोजन पडणार नाहीं, हें निःसंशय आहे.

हा घोटाळा कोणास कदाचित् काल्पनिक वाटेल; किंबहुना शास्त्रीबोवांविषयीं आमच्या मनांत जी पुज्यबुद्धि आहे तिचेंही हें फळ होय असें कोणी ह्मणतील. यासाठीं त्यांनीं पुढील उताऱ्यांकडे अंमळ लक्ष पुरवावें ह्मणजे झालें. प्रथमतः शास्त्रीबोवांवर शस्त्र उचलून, त्यांच्या प्रतिपक्षाचें ह्मणणें शिस्तवार प्रतिपादणारे रा. देव यांचाच टीकालेख घेऊं. येथें " जर तर " " जरी तरी " व " आतां " हे पक्षांतरबोधक शब्द एकाच पंक्तीचे होत एवढें सांगून ठेवून, रा. देवांनीं शास्त्रीबोवांच्या " टीकालेखांचें स्वरूप " दाखवीत असतां कसा खेळ केला आहे तो दाखवितों. ते ह्मणतात:—

" त्यांचा ( शा० चा ) कोटिक्रम बेमालूम दिखाऊ ... अढळ व अपरिच्छेद्य असा आहे. **परंतु** अनेक वेळां फारच एकतर्फी वकिली बाण्याचा ... असा आहे. ... ... या टीका लेखांस अद्वितीय तेज व बळ हीं चढलीं आहेत. **परंतु** खरी विचारजागृति आणि कर्तव्य कर्तव्यपरिज्ञान यांचा मात्र त्यांपासून किती उदय झाला याची मो शंका आहे. "—ग्रंथमालेंतील देवांची टीका, पृष्ठ २३.

" कांहीं दोष **जरी** ( शा० नीं केलेल्या ) अतिशयोक्तीनें भरलेले होते, **तरी** ते निर्मूळ किंवा केवळ अयथार्थ होते असें सिद्ध करतां येत नाहीं; त्यामुळें हा कोटिक्रम अभेद्य व अढळ झाला आहे.....**परंतु** अशी लोकप्रियतेवर दृष्टि ठेवून टीका करणें.....अपायकारक आहे. "—सदर, पृष्ठ २४.

" त्यांत ( मालागत टीकालेखांत ) जो भाग आला आहे तो बहुतेक **जरी** सत्य असला, **तरी** त्यांत संपूर्ण सत्य स्वरूप दिलें नाहीं."—सदर पृष्ठ २५.

" मालाकारांची टीका **जरी** एकतर्फी असली **तरी** पुष्कळ अंशीं मार्मिक, अनुलक्षणीय आणि केव्हां केव्हां विचारणीय होती."—सदर पृष्ठ ४०.

हे उतारे रा. देव यांनीं दोषच काढावयाच्या बुद्धीनें लिहिलेल्या प्रकरणांतून घेतले आहेत. आतां गुण दाखवितांवेळची रा. देवांची तऱ्हा पहा:—

" विचारक्रांति घडवून आणण्याची शक्ति त्यांच्या ( शा. च्या ) लेखांत होती, ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं; **परंतु** ती विकारवशतेमुळें प्रगट झाली ( !! )"—सदर पृष्ठ ४२.

आतां आणखी एकच उतारा. शास्त्रीबुवांनीं स्वार्थत्याग करूनच भाषेची उत्कृष्ट सेवा केली, ही गोष्ट एवढी उघड असतां, रा. देवांचें त्यांस हें बक्षीस पहा:—

" भाषासेवा केल्यानें मालाकारांस लाभ झाला नाहीं असें **जरी** नाहीं, **तरी** ती त्यांनीं निरपेक्ष बुद्धीनें कर्तव्य ह्मणूनच केली, याबद्दल त्यांचा जो मान झाला तो योग्य आहे."—सदर, पृष्ठ ४३.

खरोखर, शास्त्रीबुवांनीं निबंधमालेची कडाकूट करून व दरमाहा शंभराची नोकरी गमावून, जे दहा पांच रुपये गांठीं बांधले, ते त्यांच्या श्रमांच्या मानानें फारच झाले ह्मटलें पाहिजे! शिवाय 'सवंग लोकप्रियता'

फुकटांत पाडली ती वेगळीच! याखेरीज रा. देवांच्या मतें, शास्त्रीबुवांनीं निरपेक्ष बुद्धीनें कर्तव्य ह्मणून केलेल्या भाषासेवेबद्दल त्यांस जो मान द्यावयाचा त्यासहीं ते फारसे पात्र नाहींत! तथापि शास्त्रीबुवांबद्दल-रा. देवांच्या मनांत "परम पूज्यभाव जागृत होता" ह्मणून शास्त्री-बुवांचा "जो मान झाला तो योग्य आहे" असें ह्मणूनच ते स्वस्थ बसतात! एकंदरींत रा. देवांचा "परम पूज्यभाव" कांहीं अलौ-किक खरा! त्याचें रहस्य, लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचें नस-ल्यास, पुष्कळांप्रमाणें आह्मास बिलकूल कळत नाहीं, हें आह्मी प्रांज-ळपणें कबूल करतो. तथापि, ज्यांच्या हृदयांत शास्त्रीबुवांविषयीं (रा. देवांप्रमाणें नव्हे) खरा पूज्यभाव वसत आहे, व त्यांचे सुधारणेचें मार्ग ज्यांस संमत आहेत, असे जे हजारों हजार सुजाण लोक या देशांत आहेत, त्यांच्या तर्फेनें आह्मी रा. देवांस व त्यांच्या सारख्या सुधा-रकांस इतकेंच सांगतों कीं शास्त्रार्थानें निषिद्ध अशा पुनर्विवाहाच्या कामांत पडलेल्या कित्येक पुढाऱ्यांचा निर्वंश झाल्याबद्दल संतोष मान-णाऱ्या बिचाऱ्या एका भावड शास्त्र्याची एकवेळ कींव करणें योग्य होईल, पण जसें त्या शास्त्र्यानें ह्मटलें तसेंच "एखाद्या माथेफिरू सुधार-कानें या विचारक्रांतीच्या कर्त्यांबद्दल ह्मटलें" तर या सुधारकाचें सोंग घेणाऱ्याची बरोबर गय करणें योग्य नाहीं. त्याची गणना मुज्ञ जन 'पुच्छविषाणहीन' अशा सर्वोत्तम नरपशूंतच करील, हें खास आहे! पण हा शुष्क वाद हवा कशाला? अशा मंडळीनें एव-ढेंच लक्षांत ठेवावें, कीं शास्त्रीबुवांनीं उद्धारगारूप वंश (वेळू) वृक्षाचें जें बीज या देशांत चोहोंकडे पेरलें, तें रुजून सांप्रत चांगलें वाढीस लागलें आहे, व त्याची जागोजाग छांदार जाळखंडें व बेटें बनलीं असून, आजलाच इतकीं दृढमूळ झालीं आहेत कीं, रा. देवांनीं कितीही तीक्ष्ण शस्त्र उचललें व सुधारकचमूचे केवढालेही त्यांवर हल्ले पडले, तरी त्यांच्या पानांसही धक्का लागावयाचा नाहीं!—मग शास्त्रीबुवांच्या उद्धारगारांच्यासंबंधानें 'निर्वंशत्वा'च्या धास्तीचें नांव कशाला?

असो, येथवर एक प्रकार झाला; दुसरा 'विविधज्ञानविस्तार'-कारांचा पहा. शास्त्रीबुवांच्या भाषासरणीचें अनुकरण करणाऱ्या एका लेखकाच्या लहानशा पुस्तकाचें परीक्षण करीत असतां, हे लेखक ह्मणतात:—

"ख्रिस्ती धर्म, आमचे विद्वान लोक, त्यांनीं उपस्थित केलेले सुधारणेचे मार्ग........वगैरे विषयांस......विन्मुख न जाऊं देतां, दहापांच थट्टेचीं वाक्यें तत्प्रीत्यर्थ घालून त्यांची बोळवण करण्याची आमच्या बंधूनें दीक्षा घेतली आहे. **आतां** मालाकारांचें हें लिहिणें खोटें असतें, असें कोणीही ह्मणणार नाहीं. **परंतु** जशी त्यांची लेखणी पूर्वोक्त विषयांची थट्टा उडविण्यांत चालते तशी तत्स्तुत्यर्थ कधींच चालत नाहीं......हा एक प्रकार. दुसरा प्रकार......पाल्हाळ करण्याचा यांचा फार प्रघात आहे. **आतां** मालाकार विद्वान आहेत, व......त्यांची भाषाशैली व विषयाची मांडणी सुंदर व चित्तवेधक असते." इ०—पुस्तक ९ अंक ७; सन १८७१.

हे लेखक विशेष मार्मिक व खरे गुणज्ञ असल्याकारणानें, येथें त्यांनी पूर्ण संभावितपणा धरून, फार नाजुक रीतीनें शास्त्रीबुवांच्या लेखांतले दोष दाखविण्याचा यत्न केला आहे. तथापि तसें करतांना देखील, 'आतां' व 'परंतु' यांच्या मध्यस्थीनें कां होईना—शास्त्रीबुवांच्या उघड उघड गुणांचा उल्लेख केल्यवांचून त्यांच्यानें राहवलें नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे!

आतां एकच तिसरा प्रकार दाखवितों, आणि हें प्रकरण आटपतों. हा प्रकार, सदर 'विविधज्ञानविस्तारां'तल्याच एका अलीकडील लेखकाचा होय. हे लेखक ह्मटले ह्मणजे रा. वा. गो. आपटे होत. यांनीं 'टीका आणि टीकाकार' याविषयावर वि ज्ञा. विस्तारांत कांहीं लिहिलें आहे. त्यांत प्रथम ते, ग्रंथावर टीका कशी असावी, कोणकोणते गुण उत्तम टीकेस अवश्य आहेत वगैरे निरूपण करतात, नंतर 'एवंगुणविशिष्ट टीकाकार महाराष्ट्रांत आज दुर्मिळ आहेत,

याबद्दल खेद प्रगट करून, व पुस्तकपरीक्षण विस्तृत करण्याचा प्रथम मान विविधज्ञानविस्तारास देऊन, 'खरी, सपक्षपाती, निस्पृह, आणि दोषरहित अशी टीका कोणास पाहणें असेल तर ती त्यास वि. विस्तारांत सांपडेल, टीकाकारांमध्यें अग्रेसरत्वाचा मान जो त्यानें एकदा पटकावला तो ध्रुवाप्रमाणें अजूनपर्यंत अचळ आहे' असें उत्तम सर्टिफिकेट, स्वतां टीकाकार या नात्यानें ते आपल्या लेखास स्थळ देणाऱ्या या मा. पुस्तकास कृतज्ञपणें देतात; आणि शेवटीं 'टीकापर लेखांत गुणांपेक्षां दोषांचेंच प्रमाण अधिक असणाऱ्या' निबंधमालेच्या कर्त्याकडे ते वळतात. ते म्हणतात:--

"निबंधमालाकारांनीं आपल्या जोरदार व रसाळ वाणीनें वाचकवृंदांस तल्लीन करून महाराष्ट्र भाषेचा भाग्योदय करण्याचें श्रेय घेतलें, याबद्दल त्यांचे गुणानुवाद गाणें अगदीं योग्य आहे. परंतु त्या बरोबरच टीकापर लेख लिहिण्यांत नवे नवे दोष गोंविण्याचें वाईट वळण त्यांनीं पुढील पिढीस लावून दिलें!"--लेखनव्यवसाय; वि. ज्ञा. विस्तार, पुस्तक ३१, अंक ३, सन १८९९.

रा. आपटे यांस मराठीचा कितपत व्यासंग आहे, हें आह्मास माहित नाहीं. तरी वरील उद्गारांवरून असें ह्मणावयास चिंता नाहीं, कीं रा. देव व वि. ज्ञा. विस्तारांतले वरील लेखक यांनीं मालाकराविषयीं लिहितांना, त्यांचे लेख लक्षपूर्वक वाचण्याचे तरी चांगले श्रम घेतले होते, व आपली टीका विचारपूर्वक जपूनही लिहिली आहे; परंतु रा. आपटे यांनीं तसेंही केल्याचें दिसत नाहीं. कांकीं, शास्त्रीबुवांच्या पुस्तकपरीक्षणात्मक टीकातर फार सौम्य, थोर मनाच्या, मार्मिक व बोधपर अशा आहेत. खरें पाहिलें तर पुस्तकपरीक्षणांत 'विस्तारां'तल्याच टीका फार कडक--निदान 'माले'तल्यापेक्षांतरी--फार तीव्र आहेत असें ह्मणावें लागेल. पडताळ्यासाठीं कीर्तन्यांच्या 'टेंपेस्ट' नाटकाच्या भाषांतरावरील 'माले'तली व 'विस्तारां'तली अशा दोनही टीका त्यांनीं वाचून पहाव्या, अशी त्यांस शिफारस आहे. ही एक गोष्ट; दुसरी,

टीकाशब्दाच्या अर्थासंबंधानेंच आपटे यांनीं जी चूक केली आहे ती होय. ती तर केवळ हास्यास्पद आहे. 'टीका' शब्दाचे 'निंदा' व 'परीक्षण' असे जे दोन अर्थ मराठींत प्रसिद्ध आहेत ते रा. आपटे यांच्या लक्षांत नाहींत असें दिसतें. शास्त्रीबुवा हे कडक टीकाकार ह्मणून जो बोभाटा आहे, तो, त्यांनीं लिहितां लिहितां, कित्येक प्रसिद्ध व्यक्तींस व त्यांच्या अप्रयोजक कृत्यांस अनुलक्षून ज्या निंदात्मक खोचा मारल्या आहेत, त्यासंबंधाचा आहे; पुस्तकपरीक्षणात्मक टीकेचा नाहीं. हा भेद लक्षांत न आल्यामुळें फसून, रा. आपटे यांनीं टीकाशब्दाच्या अर्थाचा वर लिहिल्याप्रमाणें एकच घोटाळा केला आहे, व विनाकारण त्या द्वाड 'परंतु' च्या ते अधीन झाले आहेत !

शास्त्रीबुवांच्या कृतींवर आजपर्यंत जी टीका झाली आहे, तिचें स्वरूप वर दाखविलें असें आहे. त्यावरून कोणासही सहज कळणार आहे, कीं शास्त्रीबुवांच्या कृतीची चर्चा जेवढी व्हावयास पाहिजे तेवढी झालेली नाहीं. ती एकच रूपानें व एकच दृष्टीनें नव्हे, पण अनेक प्रकारांनीं होणें इष्ट आहे. या चर्चेनें शास्त्रीबुवांच्या कीर्तीस धक्का पोंचेल ही धास्ती स्वप्नीं दखील नलगे. कांकीं, त्यांच्या कृतीमध्यें इतका गुणसंग्र भरला आहे, कीं जों जों ह्या कृतींवर चर्चारूप संस्कार होत जाईल, तों तों त्यांचें तेज अधिकाधिक उज्वल होत जाईल अशी आमची समजूत आहे. ह्मटलें आहे.—

> तप्तं तप्तं पुनरपि पुनः कांतवर्णं सुवर्णं,
> घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चंदनं चारुगंधि ।

हाच सर्वप्रसिद्ध अनुभव या प्रकरणींही येणार आहे. आतां ही चर्चा, शास्त्रीबुवांच्या लेखांचा नीट लक्षपूर्वक अभ्यास करून व त्यांच्या कृतीचें शुद्ध मनानें मनन करून जर करण्यांत येईल तर उत्तम. अशा चर्चेपासून नेहमीं आपलें हितच होईल. एका प्रौढ व चतुर गृहस्थाचें असें म्हणणें आहे, कीं "निबंधकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या लेखांची व त्यांतील रहस्यांची ओळख आपल्या लोकांस

जसजशी होत जाईल, तसतशी देशोन्नति करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येत जाईल, असें समजावें." हें अगदीं खरें आहे. सारांश, शास्त्रीबुवांच्या लेखांत जो व्यक्तिविषयक कडकपणा आला आहे तो, कालांतरानें लोपून जाऊन, त्यांच्या लेखांचें व कृतींचें निर्मळ स्वरूप व्यक्त होऊन, तें स्थिर होईल, हें निःसंशय आहे. हाच अभिप्राय एका पोक्त व अनुभवी गृहस्थानें, शास्त्रीबुवांच्या कृतीला नदीची उपमा योजून, फार सरळ, साध्या व प्रौढ वाणीनें प्रगट केला आहे, तो किती हृदयंगम आहे, पहा! हे गृहस्थ ह्मणतात:—

"शास्त्रीबुवांनीं सार्वजनिक हिताच्या कृत्यांविषयीं कडक लेख लिहि- ल्यामुळें, सदर कृत्यांशीं ज्यांचा संबंध अशा कांहीं लोकांचीं मनें कदाचित् दुखावलीं असतील पण आपणास जें कांहीं सत्य वाटलें तेंच शास्त्रीबुवांनीं लिहिलें. दुसऱ्याच त्यापासून दुःख होईल किंवा संतोष होईल, याची परवा त्यांनीं बाळगिली नाहीं. हें तरी एक सत्या- भिमानाचेंच लक्षण होय. नवीन ग्रंथकार प्रथम जेव्हां उदयास येतो, तेव्हां थोडाबहुत असा प्रकार घडतोच. कांहीं लोकांस त्याचे लेख फार सुंदर दिसतात; कांहींकांस ते मुळींच पसंत पडत नाहींत. कालिदासास वाटलें, कीं भास आदिकरून विख्यात कवींच्या कृतींपुढें आपल्या काव्याचा अनादर होईल भवभूतीस तर असें वाटलें, कीं आपण हयात आहों तोंपर्यंत आपल्या ग्रंथांची खरी परीक्षा होणारच नाहीं. ह्मणून त्यानें मग कालांतराचा भिस्त ठेविली. याचें कारण हें, कीं प्रथमतःच कोणी ग्रंथ लिहिला असला, तर त्याची चहा होतांना पुष्कळ अडचणी येतात. केव्हां केव्हांतर ग्रंथकाराच्या लेखांमुळेंच त्यास शत्रु उत्पन्न होतात. पण लेखांत जर कांहीं नैसर्गिक गुण असले, तर त्याची उत्तरोत्तर वाहवाच होते, द्वेष व मत्सर लुप्त होतात, आणि ग्रंथकाराची ग्रंथमयमूर्ति मात्र जगांत अजरामर होऊन रहते! कारण ग्रंथाचे गुण कायम असून, त्याचा लोप करूं पाहणारीं प्रतिबंधक कारणें तेव्हां नष्ट झालेलीं असतात. पहा, नदीचा उगम ज्या पर्वतारिकांत होतो, तेथें तिच्या प्रवाहास खडक वगैरे प्रतिबंध

करणारीं कित्येक कारणें असल्यामुळें पाण्याचा खळखळाट होत असतो, व तें क्वचित गढूळही होतें; पण तीच नदी जसजशी आपल्या उगमापासून दूरदूर वाहत जाते, तसतशी तिची गति अस्खलित होते, पात्र रुंद व गंभीर होतें व पाणीही स्वच्छ होतें. अशीच गोष्ट विष्णुशास्त्री यांच्या वाणीची आहे. ती पुढील पिढ्यांस अगदीं निर्मळ वाटून, जगांत अजरामर होईल, असा भरंवसा आहे."

शास्त्रीबुवांचे टीकाकार व या टीकाकारांनीं केलेल्या टीका यांच्या संबंधानें, जातां जातां, येथें दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. ते हेच कीं शास्त्रीबुवांच्या चाहत्या मंडळीनें त्यांच्या गुणांची क्वचित् फाजील स्तुति केली असेल व त्यांचें स्तोमही माजविलें असेल; पण त्यांच्या प्रतिपक्षानें यांचे दोष दाखविण्यांत किंवा गुणांवर ही दोषारोप करण्यांत हार खाल्ली आहे असें मात्र ह्मणवत नाहीं. असें असतां, मौज ही आहे, कीं दोषाविष्करणाच्या अगदीं भरांत, शास्त्रीबुवांच्या गुणांबद्दल त्यांच्या शत्रूंसही मान डोलविल्यावांचून गत्यंतर नाहीं असें झालें आहे. वस्तुतः शास्त्रीबुवांचा गुणसंघ एवढा विपुळ आहे व त्याचें तेज एवढें उज्वल आहे, कीं त्यापुढें सदरहू दोष सहज लोपून गेले आहेत; व कित्येकांचें तर दोषरूपत्वही कालांतरानें नाहींसें होत चाललें आहे. या गुणसंघाच्या योगानेंच शास्त्रीबुवांवर लोकांचे एवढें प्रेम जडलें व त्यांच्याविषयीं लोकांच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. शास्त्रीबुवांनीं लोकरंजन केलें असें कित्येकांचें ह्मणणें आहे, आणि तें खरें आहे. पण लोकरंजन करण्यांत वाईट तें काय? आणि न करण्यांत किंबहुना लोकांचा उपमर्द करण्यांत तरी भूषण काय? दोषाविष्करण खोटें आहे कीं काय, ही मुख्य मुद्याची गोष्ट आहे. बहुधा हें दोषाविष्करण खोटें नव्हतें असें त्यांच्या प्रतिकूल टीकाकारांसही कबूल आहे. मग अशा वास्तविक दोषाविष्करणानें जर सहजीं लोकरंजनही होत असलें तर अशी उत्तम संधि कोण चतुर ग्रंथकार दवडील? टीकाविषयांतल्या दोषांचें आविष्करण करतांना, भीड न धरतां, खरमरित लेख लिहिण्याबाबतर शास्त्रीबुवांचा पाह-

त्यापासून बाजाच होता, व तो बाजा त्यांनीं शेवटपर्यंत कायम ठेव-ण्याचा बुद्धिपुरःसर यत्न केला होता. तथापि असें करतांना, विद्वान व अविद्वान, गुणी व गुणहीन यांमध्यें योग्य भेदभाव त्यांच्या मनांत वसत नव्हता असें मात्र नाहीं.* आतां लोकरंजन करतांना लोक-भ्रमपोषणही त्यांनीं आपल्या लेखांत केलें असा एक मुद्दा आहे. पण ही गोष्ट दुष्ट बुद्धीनें कोणी विचारी मनुष्य करील हें संभवत नाहीं; आणि शास्त्रीबुवांनीं समजून उमजून असें केलें असें आह्मास तर वाटत नाहीं. कित्येक सामान्य 'लोकभ्रमां' चें तर त्यांनीं स्वतांच आविष्करण करून भ्रमिष्ठ लोकांची योग्य कानउघाडणी केली आहे, व प्रसंग पडून इंग्रज लोकांच्या 'अनुकरण'-योग्य गोष्टी कोणत्या, त्यांचेंही कांहीं लेखांत दिग्दर्शन केलें आहे. आयुष्य खुंटलें, त्याला उपाय नाहीं; नाहींतर "ज्या सुधारणा करण्यांत शहाणे शहाणे ह्मणविणारेही अगदीं हताश होऊन, हातटेकीला आले होते, त्या कदाचित् शास्त्रीबुवांनीं आपल्या लेखणीच्या बळावर सहज घडवून आणल्या असत्या," अशी जी कित्ये-कांची अटकळ होती ती निराधार नव्हती. तात्पर्य, देशकल्या-णाची खरी कळकळ, स्वातंत्र्यप्रियता, निर्लोभता, स्वार्थत्याग इत्यादि अनेक गुणांनीं जी लोकप्रियता शास्त्रीबुवांनीं संपादन केली होती, ती कांहीं एवढी 'स्वस्त' नव्हती, हें कोणाच्याही लक्षांत येण्या-सारखें आहे.

लोकप्रियता हा शास्त्रीबुवांच्या कीर्तिरूप प्रदीपाचा स्तंभ आहे. लोकप्रियता हा त्यांच्या थोरवीच्या इमारतीचा पाया आहे. लोक-प्रियता ही त्यांच्या कर्तृत्वाची लखलखीत तलवार आहे. लोकप्रियता ही त्यांच्या योग्यतेची किंमत आहे. त्यांची कीर्ति, त्यांची थोरवी, त्यांचें कर्तृत्व व त्यांची योग्यता यांचा ज्या लोकप्रियतेवर आधार अशी ही लोकप्रियता त्यांनीं दीर्घ परिश्रमांनीं व मोठ्या काळजीनें संपादिली होती.

---

* वि. शा. यांचे किरकोळ लेख, भाग २, पत्रव्यवहार नंबर १०, पृष्ठ २९२ पहा.

"लोकांस कोणत्या गोष्टींची गरज आहे" हें जाणूनच त्यांनीं आपले लेख लिहिले होते, व "आपले लेख लोकांस कसे प्रिय होतील" याच चांगलें मनन करूनच ते त्यांनीं प्रगट केले होते, असें आह्मी आपल्या "शास्त्रीबुवांच्या चरित्रां-" त दहा वर्षांपूर्वी ह्मटलें होतें. त्यावर त्यावेळीं कित्येकांनीं आक्षेप घेतले होते. पण तेंच ह्मणणें आज, शास्त्रीबुवांचा जो थोडकासाच पत्रव्यवहार हातीं आला आहे त्यावरून व त्यांच्या लेखांचें विशेष परिशीलन करूनही, दृढ होत आहे. या लोकप्रियतेस वर दर्शविलेले शास्त्रीबुवांच्या आंगचे गुण कारण खरे, तरी या गुणामध्येंही त्यांच्या आंगच्या एका विशेष गुणासच प्रधानत्व दिलें पाहिजे असें आह्मास वाटतें. त्यांची विद्वत्ता, त्यांची निर्लोभता, स्वार्थत्याग व लोकरंजनाची आवड, ह्या गुणांनीं त्यांस लोकप्रियता संपादन करून घेण्यांत बरीच मदत केली आहे, यांत संशय नाहीं. तथापि त्यांच्या ठिकाणीं जो एक विशेष गुण होता, तो जर नसता तर ह्या बाकीच्या गुणांचें तेज जेवढें सध्यां पडलें तेवढें कधीं पडलें असतें किंवा नाहीं याची शंकाच आहे. शास्त्रीबुवांहून अधिक विद्वान, अधिक कल्पक, अधिक कर्तृत्ववान पुरुष त्यांच्या वेळीं व त्यांच्या पूर्वी कोणी नव्हते असें नाहीं. तथापि त्यांच्यासारखी लोकांच्या मनावर कोणा-चीही छाप बसली नाहीं. व्यापाऱ्यांची बाजारांत जशी साख तशीच शास्त्रीबुवांची ग्रंथकर्तृत्वाची ही छाप होय. ती ज्या गुणानें त्यांस बस-वितां आली, तो गुण त्यांच्या सर्व गुणांत श्रेष्ठ समजला पाहिजे. अर्थात हा गुण आपणास समजल्यावांचून शास्त्रीबुवांच्या वास्तविक योग्यतेची पूर्ण कल्पना आपणास झाली असें ह्मणतां येणार नाहीं. यासंबंधानें आरंभीं थोडेसें आह्मीं लिहिलें असून, योग्य स्थळीं त्याचें विवेचन करूं ह्मणून ह्मटलें होतें, त्याप्रमाणें तें येथें करतों.

शास्त्रीबुवांच्या लोकप्रियतेचें बीज कशांत आहे, हें प्रत्यक्ष किंवा पर्यायानें दर्शवून, त्यांच्या योग्यतेचें मान काढण्याचा यत्न त्यांच्या टीकाकारांपैकीं कित्येकांनीं केला आहे. परंतु शास्त्रीबुवांच्या कृति-

प्रदेशाच्या अंतर्गत भागांत प्रवेश करून शोध करण्याची व्हावी तशी खटपट कोणाकडेही होऊन झालेली दिसत नाहीं. 'विविधज्ञान विस्तार'कार एके प्रसंगीं ह्मणतातः—" यांची ( शा. चो ) भाषेची शैली व विषयाची मांडणी फार सुंदर व चित्तवेधक असते, यामुळें मालेचे ग्राहक फार आहेत व त्या मानानें अनुकरण करणारेही पुष्कळ आहेत. " अर्थात्, त्यांच्या मतें, शास्त्रीबुवांच्या लोकप्रियतेचें कारण त्यांची सुंदर व चित्तवेधक भाषासरणी व विषयाची मांडणी. तेलंग यांचें मततर असें आहे कीं 'शास्त्रीबुवांनीं बाष्कळ लिहिण्यास मात्र शिकविलें.'' अर्थात बाष्कळ लिहिण्यानेंच त्यांनीं लोकांस आपल्या लेखांचें वेड लाविलें असा त्यांचा भाव. पण एकंदरीनें हेंही कारण स्वतां त्यांसच वाजवी दिसत नाहीं; ह्मणून " कृष्णशास्त्री यांस मागें सारून लोकांनीं विष्णूस कसें पुढें केलें " याबद्दल ते मोठ्या आश्चर्यांत पडतात. ह्याच न्यायमूर्तींचा शिक्का चालवून, देव स्पष्टपणें शास्त्रीबुवांच्या लोकप्रियतेचीं कारणें सांगतात तीं अशीं:—"मालाकरांच्या लेखांसच एवढा बाजारभाव कां चढला याचीं कारणें अन्य असलीं पाहिजेत. तीं कारणें उघड आहेत; ह्मणजे महाजनस्य दोषदर्शन, महाजनविडंबन, उपहास, अतितीव्र व प्रखर वाग्रूपी शस्त्रास्त्रप्रयोग, अद्वितीय व बराच एकदेशीय कोटीक्रम, समाजभ्रमपोषण, समाजाची फाजील बडेजावी, त्याची धन्यता व कृतकृत्यता वगैरे वृत्तींचा पक्षपात, पूर्वकालीन स्थितीचा धन्यवाद, प्राचीन वैभवाची महती, भाषामनोहरत्व, हींच प्रमुख दिसतात." यावर आमचें एवढेंच ह्मणणें आहे, कीं ह्या गोष्टी मालेचा बाजारभाव 'चढविण्या'ला कदाचित् कारण होतील; पण तिच्या ठिकाणीं नसती किंमत उत्पन्न करण्याला किंपत उपयोगी पडतील हें कोणासही सांगणें नलगे. याचें प्रत्यंतर एकाच गोष्टीवरून येणार आहे. शास्त्रीबुवांच्या लेखांतलें मर्म काय तें हेंच, असें देवांप्रमाणें पुष्कळांचें! ह्मणून त्यांनीं आपल्या लेखांत ह्याच गोष्टींचें अनुकरण करण्याचा यत्न केला होता. पण शास्त्रीबुवांचा जो मान झाला त्याच्या अल्पांशाइतका देखील इतरांचा झाला नाहीं, हें प्रसिद्धच आहे. यावरून देवांच्या तरोध

वरील कारणांचा शुष्कपणा तेव्हांच लक्षांत येईल. आतां सुधारक मंडळांच्या चळवळींवर हल्ले करून जी ही लोकप्रियता शास्त्रीबुवांनीं मिळविली, तिच्या संबंधानें टिळक काय ह्मणतात तें ऐका.—" शास्त्रीबुवांस, सदर चळवळींवर व त्यांच्या पुरस्कर्त्यांवर हल्ला करून, त्यांच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण करण्याचा जो मान मिळाला, तो, ते ज्या काळीं जन्मले, त्या काळाचें फळ होय; त्यांच्या इच्छेचें नव्हे. कारण शास्त्रीबुवा नसते तर दुसरा कोणी तरी पुरुष ह्या कार्याला प्रवृत्त झाला असता." यावरून, टिळकांच्या मतें, शास्त्रीबुवांनीं 'सवंग लोकप्रियता' मिळविण्याचा मुद्दाम होऊन जरी यत्न केला नाहीं, तरी तें सारें कालगतीचें कृत्य होय. ह्मणजे हें सवंग लोकप्रियतेचेंच सगासोयरें भावंड झालें! हें ह्मणणें बरोबर दिसत नाहीं. आह्मास तर असें वाटतें, कीं शास्त्रीबुवांनीं लोकप्रियता मिळविण्यासाठीं मनःपुरःसर यत्न केला होता; इतकेंच केवळ नव्हे तर शास्त्रीबुवांनीं "सदर चळवळींतील पोंचटपणा ओळखून, तिकडे आपल्या लक्षांचा मोर्चा फिरविला" हें जसें "त्यांच्या मार्मिकपणाचें व प्रसंगावधानाचें फळ आहे;" त्याचप्रमाणें कालगतीनें प्राप्त झालेल्या लोकप्रियतेला विन्मुख लावून न देतां, तिला यत्नांनीं आपल्या पदरीं पडेसें केलें हें त्यांच्या चातुर्याचें लक्षण लेखण्यास काय चिंता आहे? शास्त्रीबुवा नसते तर जो दुसरा कोणी पुरुष या कार्याला निघाला असता, त्यास, शास्त्रीबुवांच्या अंगीं जो विशेष गुण होता त्याच्या अभावीं, त्यांच्याप्रमाणें यश आलें असतें किंवा कसें, याची शंका आहे. असो, शास्त्रीबुवांच्या योग्यतेचा ज्या लोकप्रियतेवर सर्वस्वीं आधार, तिच्या प्राप्तीला कोणकोणते गुण कारण झाले, याचें निदान वेगवेगळ्या लेखकांनीं कसें कसें केलें आहे हें वर सांगितलें. आह्मी सांगणार आहों तो गुण या सर्वांहून फार वेगळा आहे.

शास्त्रीबुवांच्या अंगचा हा विशेष गुण ह्मटला ह्मणजे त्यांचा धूर्तशीरपणा पाहा. यास दूरदृष्टि, विचारीपणा, समयोचितता वगैरे अनेक पर्याय शब्द आहेत. यासच इंग्रजींत "प्रॅक्टिकल गुड सेन्स" ह्मणजे

व्यवहारज्ञता, व्यावहारिक ज्ञान असें ह्मणतात. या प्रॅक्टिकलपणाचें पाश्चात्य लोकांत केवढें स्तोम आहे! प्रॅक्टिकल स्टेट्स्मन, प्रॅक्टिकल मर्चंट, प्रॅक्टिकल रायटर, हें तर काय? पण धर्मासारखा पारमार्थिक विषय, त्यासही प्रॅक्टिकल रिलिज्यान या नांवानें पाश्चात्यजनांनीं सामान्य व्यावहारयोग्य करून टाकलें आहे! असा जो प्रॅक्टिकल गुण पाश्चत्य जनांच्या ठायीं विशेषें करून दिसून येतो, तो शास्त्रीबुवांनीं त्यांच्यापासून संपादला होता किंवा जन्मतांच त्यांच्या ठायीं तो निर्माण झाला होता, हें सांगणें कठिण आहे. तरी तो त्यांच्या आंगीं चांगल्याच प्रकारें वसत होता यांत शंका नाहीं. याच गुणास आम्ही मुत्सद्दीपणा असें नांव देतों. तो शास्त्रीबुवांच्या जसा वागणुकींत तसाच लेखांतही प्रगट झाला आहे. हें आमचें ह्मणणें अंमळ फोडून सांगितलें पाहिजे. यास्तव त्यांच्या आयुःक्रमांतील कांहीं ठळक गोष्टी सांगून, त्यांत त्यांनीं हा आपला मुत्सद्दीपणा कसा प्रगट केला हें येथें दाखवितों.

रीतीप्रमाणें मराठीचा साधारण अभ्यास पुरा होतांच शास्त्रीबुवा इंग्रजी शिकूं लागले. तींत बरीचशी गति होतांच व बुद्धीला प्रगल्भता येतांच, त्यांचें मन सहजच देशाच्या निकृष्टतेकडे वेधलें, व सुधारणुकीच्या कार्यांत आपणही यथाशक्ति देशाची सेवा करावी असें त्यांस वाटूं लागलें. परंतु त्यावेळीं इंग्रजींत पदवी मिळविल्यावांचून आपल्या कर्तृत्वाचें तेज पडणार नाहीं हें जाणून, त्यांनीं बी. ए पर्यंत कसा बसा पल्ला रेटण्याचा संकल्प केला. तथापि या अवधींतही त्यांचें सारें लक्ष अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर इंग्रजी पुस्तकें वांचून उपयुक्त ज्ञान मिळविण्याकडेच मुख्यत्वें होतें. यामुळें प्रत्येक परीक्षेंत त्यांस एकेक दोन दोन वेळां गोते खावे लागले. शेवटीं १८७३ सांत ते बी. ए. च्या परीक्षेंत पास झाले, व इष्टोद्देशानें, १८७४ सांत त्यांनीं आपली निबंधमाला सुरू केली. पदवीधर झालों ह्मणजे आपण काय वाटेल तें करूं अशी अद्याप कित्येक पदवीधरांची घमेंड असते. यामुळें पुष्कळ जण देशकल्याण करण्याच्या भरांत एकादें मासिक

पुस्तक काढतात व दुकान घालून गिऱ्हाइकाची वाट पहात बसतात. पण या नवशिक्यांस धड भाषा लिहितां येत नसतें, व मराठी वाचकांस कोणता विषय कसा समजावून सांगावा हें माहीत नसतें, मग त्यांस ग्राहक मिळावे कसे? असें झालें ह्मणजे सारा बखेडा करून, हे नवशिके लेखक, लोकांत सदभिरुचि नाहीं असें ह्मणून, अपेशाचें खापर लोकांच्या शिरावर फोडतात. आतां, याच प्रसंगीं शास्त्रीबुवांनीं काय केलें तें पहा. मराठी ही आपली जन्मभाषा खरी, तरी ती चांगली लिहितां येण्याला तिचा बराच सराव असणें जरूर आहे, हें जाणून, त्यांनीं १८६८ सालापासून प्रथम आपल्या वडिलांच्या देखरेखीखालींच शाळा-पत्रकांत लेख लिहिण्यास सुरवात केली. पुढें कांहीं दिवस त्याप्रमाणें काढल्यावर १८७२रा पासून सबंद पत्रक ते एकटे चालवूं लागले. याच वेळीं ते इंग्रजी विद्वानांविषयीं व मिशनऱ्यांविषयीं आपले नवे धरतीवरचे विचार हळूहळू प्रगट करूं लागले. हे विचार जरी त्या वेळीं पुष्कळांस पसंत पडले व सर्वत्र शास्त्रीबुवांची प्रशंसा होऊं लागली, तरी ज्या शाळाखात्यांतून शाळापत्रकास द्रव्याश्रय मिळत असे, त्या खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस ते पटण्यासारखे नव्हते. हें जाणून, कधींना कधीं शाळापत्रकाचा हा आश्रय तुटेल व पत्रक बंद करावें लागेल अशी शास्त्रीबुवांस अटकळ होऊन चुकली होती; ती खरी होण्याची वेळ शेवटीं सन १८७५ सालीं आली! पण मौज काय झाली?—शाळा-पत्रक बंद होण्याची वेळ येत आहे त्याच्या अगोदरच, ह्मणजे १८७४ रांतच त्यांची निबंधमाला तयार! उत्तम मराठी लेखक ह्मणून शास्त्रीबुवांची कीर्ति अगोदर पसरली होतीच, तिला वरील हकीगतीची आणखी भर पडली! आणि शाळापत्रक बंद होतांच, त्यांच्या साऱ्या वाचकांच्या उड्या निबंधमालेवर पडल्या! अशा रीतीनें शाळापत्रकाचे ग्राहक निबंधमालेला आयतेच मिळून, वर्गणिदार नाहींत ही हाकाक कधीं ऐकूं आली नाहीं!! हें शास्त्रीबुवांच्या मुत्सद्दीपणाचें पहिलें कृत्य होय. याप्रमाणें त्यांच्या शत्रूंनीं त्यांस अडविण्याचा जो प्रयत्न केला तोतर यावेळीं वायां गेला; पण तेणेंकरून त्यांच्या पिच्छेस

लागलेली मंडळी हताश होऊन स्वस्थ बसली असें मात्र नाहीं. इकडे निबंधमाला सर्वस्वीं लोकाश्रयावर चालू होतांच, त्यांच्या लेखणीचें तीव्रत्व अबाधितपणें त्यांच्या लेखांत जसजस गाजूं लागलें, तसतसें तिकडे त्यांच्या शत्रूंसही चेव येत चालला. शेवटीं, ज्या शाळाखात्यांत त्यांस मास्तरकी मिळाली होती, त्या खात्याच्या वरिष्ठांकरवीं त्यांच्या शत्रूंनीं त्यांस रत्नागिरीस बदललें, व कोठून तरी ही व्याध दूर करून टळेल तर पहावी ह्मणून खटपट केली. पण शास्त्रीबुवा त्यांच्या बारशाला जेवलेले होते! वडिलांच्या बहुमानास्तव प्रथम ते रत्नागिरीस गेले खरे; तरी तेणेंकरून माला गुंफण्याच्या कामांत बराच व्यत्यय येतोसें पाहतांच त्यांनीं नोकरीवर पाणी सोडण्याची तयारी केली! पुढें वडील वारले, व ते रजा घेऊन पुण्यास आले. जे आले ते फिरून नोकरीवर गेले नाहींत. पुढें लौकरच त्यांनीं खासगी शाळा घालण्याचा बेत केला. याबद्दल कित्येक दिवस पुण्यांत भुमका पसरली होती. शास्त्रीबुवांच्या नव्या विचारांची व कर्तृत्वाची अगोदरच चहोंकडे वाहवा होऊं लागली होती; तशांत इकडे पदवीधरांचाही बाजार फार मंदीचा होत चालला होता. यामुळें नवीन नवीन उद्योगांची दिशा धुंडूं लागलेल्या पदवीधरांपैकीं कित्येकजण शास्त्रीबुवांस येऊन भेटले, व त्यांच्या यांच्या विचारानें एक शाळा, दोन वर्तमानपत्रें व एक छापखाना, इतके कारखाने काढण्याचें ठरलें. ही अवाई, शास्त्रीबुवांनीं उत्पन्न केलेल्या देशाभिमानाच्या उकळीबरोबर सर्व शहरभर उठली, व शाळा उघडण्याची खोटी, तों शिक्षक व विद्यार्थी यांची शाळेच्या दरवाज्याशीं गर्दी! शाळा उघडून सरासरीं तीन चार महिने झाले नाहींत, तोंच हजेरीपटावर तीनशें साडेतीनशें मुलांचीं नांवें! ह्यापैकीं बहुतेक मुलें, ज्या हायस्कुलांतून शास्त्रीबुवांची उचलबांगडी झाली, त्याच हायस्कुलांतलीं होतीं, व त्यामुळें तें बिचारें हायस्कूल अगदीं ओस पडलें! हें पाहून त्यांच्या शत्रूंस किती समाधान वाटलें असेल बरें! ही जी शाळेची हकीगत, तीच केसरी पत्राची. आरंभाळाच दोन हजार वर्गणीदार! एवढे वर्गणीदार मुंबई इलाख्यांत कोणत्याही पत्राला मिळाले नव्हते. काठेवाडांत आमचा

एक स्नेही त्यावेळीं होता, त्यानें आह्माला तेव्हां असें लिहून कळविलें होतें कीं "येथली भाषा काय, गुजराथी; पण मी खटपट करून केसरीला पंधरा वर्गणीदार येथें करून दिले!" दुसऱ्या एका नागपुरकर मित्रानें लिहिलें होतें कीं "केसरीचा फैलाव व्हावा एवढ्याच हेतूनें मी कित्येकांस व्याख्यानें देऊन वर्गणीदार होण्याला त्यांचें मन वळवित असतों!" ज्या कृत्यांशीं शास्त्रीबुवांचा संबंध, त्या कृत्यांविषयीं लोकांच्या मनांत केवढें प्रेम व केवढी आस्था उत्पन्न झाली होती! ही आपली लोकप्रियता शास्त्रीबुवा पूर्णपणें जाणून होते, व तिच्याच बळावर त्यांनीं आपले हेतु तडीस नेण्याला कंबर बांधली होती. याप्रमाणें जम बसतांच, त्यांनीं आपली नोकरी सोडली. ती त्यांनीं माथेफिरूपणा करून सोडली नाहीं. तें केवळ त्यांच्या दूरदृष्टीचें व सुविचाराचें दर्शक होतें!* याचप्रमाणें, केसरीवर बऱ्यांची फिर्याद होतांच, पैशांच्या मदतीसाठीं "केसरी फंडा"ची जाहिरात. सारांश, वस्तुस्थिति मार्मिकपणें ओळखून, तिच्यांतून आपलें हित कसें करून घ्यावें ही युक्ति त्यांस चांगली अवगत होती. असें करतांना त्यांस अनेक अडचणीही आल्या; पण त्यांतूनही युक्तीनें वळवून त्यांनीं आपलें तारूं नेहमीं इष्ट अशा बंदरांतच वल्हवून नेऊें. त्यांच्या शत्रूंनीं त्यांस जागोजाग अडवून कोंडण्याचा पुष्कळ यत्न केला, पण त्यांनीं त्यांस काडीभरही दाद दिली नाहीं. प्रसंग आला, तेव्हां तेव्हां शत्रूंच्या कारस्थानांचा व्यूह फोडून ते बाहेर पडले व स्वतंत्र आणि मोकळ्या हवेंत संचार करूं लागले! शालापत्रक बुडविलें, निबंधमाला काढ; सुखकर नोकरी दुःखकर केली, नोकरीच सोडून दे; देशहिताच्या खटपटींत कोणी पोटास महाग झाला तर द्रव्यदृष्टि लोक त्याचा उपहास करतात, तर अगोदरच निर्वाहाचें साधन उभें करून ठेव व मिजासखोरांपुढें तोंड वेंगाडण्याची वेळ येऊं नये असें कर—ही सारी त्यांच्या आयुःक्रमाची दिशा होती. त्या दिशेनें जाऊन, त्यांनीं जो

---

* पत्रव्यवहार नं. १० पहा. किरकोळलेख भाग २, पृष्ठ. २९५.

हेतु मनांत धरला होता व ज्यासाठीं ते जगांत अवतरले होते, असें म्हणावयास चिंता नाहीं, तो आपला हेतु मात्र त्यांनीं ढळूं दिला नाहीं, तर न डगमगतां, इच्छेप्रमाणें, तो त्यांनीं तडीस नेला! याहून त्यांच्या चातुर्याचें, विचारीपणाचें व मुत्सद्दीपणाचें प्रमाण कोणतें पाहिजे?

शास्त्रीबुवांनीं निबंधमालेचें उत्पन्न शाळापत्रकाहून जास्त होतेंसें पाहून, शाळाखात्याच्या आश्रयावर चालणाऱ्या शाळापत्रकाला रजा दिली; नोकरी सोडतेवेळीं, पगाराहून जास्त प्राप्ति होईल असें निर्वाहाचें साधन करून ठेवलें; व भाषेची सेवा करण्याचा आव घालून, पैसे मिळविले; मग यांत त्यांनीं स्वार्थत्याग तो काय केला? असा अप्रयोजक प्रश्न त्यांचें एक टीकाकार रा. देव हे करतात. यावर आम्ही त्यांस उलट असें विचारतों कीं 'मग काय, शास्त्रीबुवांनीं भाषेच्या व देशाच्या सेवेसाठीं कफल्लक होऊन बसावयाचें होतें कीं काय? आणि असे ते होऊन बसले असते म्हणजे मात्र त्यांनीं स्वार्थत्याग केला असें म्हणावयाचें कीं काय? एकतर ही, स्वार्थत्यागाची कल्पना मोठी विलक्षण आहे; आणि दुसरें, घटकाभर समजा कीं अशा प्रकारचा कफल्लकी स्वार्थत्यागही त्यांनीं केला असता, व त्यांजवर पोटासाठीं व इष्ट देशकार्यासाठीं चौपदरी घेण्याची पाळी आली असती, तर अशा ह्या (देवांच्या मताप्रमाणें) स्वार्थत्याग करणाऱ्या महान साधूपुढें नाकें घासून, त्याच्या पायावर पैशाच्या थैल्या ओतण्याला, एक लाख जवळ झाले असतां दोन लाखांची अपेक्षा करून नोकरींतच मृत्यूस गांठणाऱ्या, पदराला खार न लावतां माजवितां येईल तर सुधारणेचें बंड माजविणाऱ्या, देशकल्याणाच्या कार्यासाठीं मदत (पुस्तकालाच यःकश्चित मदत) मागणारास मूर्खांत काढून वेळीं त्याच्यावर तुटून पडणाऱ्या, व देशकल्याणाच्या गप्पा झोडणाऱ्या, द्रव्यदृष्टि, लोभी, आपमतलबी, निर्लज्ज ठगांपैकीं कितीकजण निघाले असते व अजूनही निघतील हें रा. देव सांगूं शकतील काय? पण देवांच्या प्रश्नाचें उत्तर आम्ही त्यांस पाहिजे आहे तसेंच देतों, आणि असें म्हणतों कीं वरील कृत्यें करण्यांत शास्त्रीबुवांनीं स्वार्थत्याग केला

नाहीं; या कृत्यांनीं त्यांचा लाभच झाला. हीं कृत्यें त्यांनीं लाभाकरतांच केलीं. पण येथें एवढेंच ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं तीं त्यांनीं लोभाकरतां मात्र खास केलीं नाहींत. त्यांस जो पैसा हवा होता तो त्यांनीं तो टाकण्यासाठीं, बायकोच्या व क्वचित् मातुश्रीच्याही, अंगावर दागिने चढविण्यासाठीं, किंवा रा. देवांनीं निर्मिलेल्या माथेफिरू सुधारकांचें कोड पुरल्यामुळें शास्त्रीबुवांस अपयें नव्हतींच ह्मणा, पण असतीं तर त्यांच्या लग्नामुंजींच्या समारंभासाठीं नको होता; तर लोकहितार्थच तो हवा होता. जीं लोकहिताचीं कृत्यें त्यांनीं उभीं केलीं होतीं तीं उजगारीस लावण्यासाठींच हा पैसा यांस हवा होता; पैशासाठीं पैसा त्यांस नको होता. लोकोपयुक्त कृत्यें काढून पैसा मिळवावा आणि फिरून तो लोकोपयोगी कृत्यांकडेसच लावावा, असा त्यांचा संकल्प होता; व त्याप्रमाणेंच त्यांनीं केलें. वस्तुतः शास्त्रीबुवांनीं आपला सारा जन्म लोकसेवेला वाहिला होता असें ह्मणावयास चिंता नाहीं हा जर स्वार्थत्याग नव्हे, तर स्वार्थत्याग तरी कोणता, हें आह्मास कळत नाहीं. जेथें द्रव्यलोभापुढें द्रव्यत्याग कसा व कोठें करावा हें सुद्धां कळत नाहीं तेथें स्वार्थत्यागाचीही बरोबर कल्पना नसल्यास मोठेंसें नवल नाहीं. तथापि देवांच्या उद्गारांवरून, शास्त्रीबुवांस एकदा कफल्लक झालेले पाहण्याची रा. देवांची फार इच्छा होतीसें दिसतें. जवळचा पैसाअडका सगळा घालविला आहे, फाटकीं लक्तरें अंगावर परिधान केलीं आहेत, फाटका जोडा पायांत आहे व पोटांत दोन दिवस अन्न नसल्यामुळें तोही उचलत नाहीं अशी स्थिति झाली आहे, मग देशकल्याणाच्या तातडीन शास्त्रीबुवांची स्वारी, डा. जान्सन जसा 'लार्ड चर्चिलचे बंगल्यावर गेल्याचें चित्र आपण पाहतों, त्याप्रमाणें कोणा अधिकारमदांध न्यायमूर्तीकडे किंवा कोणा मोठ्या रावबहादुरांकडे मदत मागण्यासाठीं गेली आहे व रावबहादूर त्यांस धनकावून लावीत आहेत व इकडे, 'कांचनांतच सर्व गुण' पहाणारे अज्ञ मूढजन ही त्यांची फटफजेती उडवून टवाळकी करीत आहेत—असा सोहळा पाहून रा. देवांचे डोळे निवाले असते व भासा मात्र शास्त्रीबुवांनीं स्वार्थत्याग केला

खरा, असें कदाचित् त्यांनीं कबूल केलें असतें! पण दुर्भाग्य त्यांचे!—कीं तसा योग येण्याचा संभव नव्हता. शास्त्रीबुवांस आपल्या लोकाची रीत पुरी माहित असल्यामुळें, त्यांनीं अगोदरच या समारंभाचा बंदोबस्त करून ठेवण्याची सावधगिरी ठेवली! शास्त्रीबुवांनीं काढलेल्या बहुतेक कृत्यांत, एके बाजूनें सार्वजनिक स्वरूप व एका बाजूनें खासगी स्वरूप, असा दुहाजबीपणा त्यांनीं ठेवला होता, हें कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. हें त्यांच्या दूरदृष्टीचें व मुत्सद्दीपणाचें लक्षण होय असें आम्ही समजतों.

याप्रमाणें, शास्त्रीबुवांचा मुत्सद्दीपणा त्यांच्या वागणुकींत कसा दिसून आला. तो दाखविला. आतां तो त्यांच्या लेखांतही कसा प्रतिबिंबित झाला आहे, हें दाखवितों. प्रथमतः हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं वस्तुतः भाषा हें विचार प्रगट करण्याचें साधन असून, भाषेची स्थिति सुधारावयाची ती देशस्थितीचें ज्ञान लोकांस व्हावें ह्मणून सुधारावयाची, असाच शास्त्रीबुवांचा भाव होता; चटकदार भाषा लिहितां आली ह्मणजे झालें इतकीच त्यांची बुद्धि नव्हती. मालेच्या पहिल्याच अंकांत, मुख्य उद्देश भाषा शोधनाचा, व त्याबरोबरच मनोरंजन व बोध यांचाही लाभ वाचकांस होईल असें करण्याचा आहे असें शास्त्रीबुवांनीं ह्मटलें आहे, तरी तसा त्यांचा बेत खास नसावा. मालेचा आरंभ जरी "मराठी भाषेची स्थिति" येथून झाला होता तरी आठ वर्षांनीं तिचें पर्यवसान "लोकहितवादी यांच्या मतांचें खंडन" व "आमच्या देशाची स्थिति" या उत्कृष्ट निबंधांत झालें, हें उघड आहे. आतां मालेंत विवेचन करण्यासाठीं जे विषय त्यांनीं निवडून घेतले, तेही अशा क्रमानें घेतले कीं ज्यांत वादाला स्थळ कमी असे प्रथम, नंतर अंमळ अधिक वादग्रस्त, व शेवटीं शेवटीं आपणास जीं जीं नवीं नवीं मतें प्रदर्शित करावयाचीं होतीं व ज्यांविषयीं मतभेद होण्यासारखा होता, किंबहुना जीं इंग्रजी सुधारकांस व इंग्रज लोकांसही आवडण्यासारखीं नव्हतीं अशा प्रकारचीं. हींच वादग्रस्त मतें जर आरंभींच त्यांनीं ओकून देण्याची घाई केली असती, तर तीं लोकांस रुचून, बिनबोभाट मान्य

झालीं असतीं किंवा नाहीं याची शंकाच होती. परंतु कुशल माळी जसा प्रथम जमीन नांगरून, कुळवून व पहरचा मालमसाला आंत घालून; ती तयार करतो आणि मग त्यांत वाटेल तें बीं पेरतो म्हणजे तें लौकर रुजून जीव धरूं लागतें; त्याचप्रमाणें निबंधमालाकारांचेंही वर्तन होतें. प्रथम त्यांनीं अविवाद्य असेच विषय घेतले. मराठी भाषेची स्थिति, विद्वत्व आणि कवित्व, संपत्तीचा उपभोग इ०—असले विषय कोणास रुचणार नाहींत? हे विषय वाचून, असें सांगतात कीं काशीनाथ त्रिंबक तेलंग, जे त्यावेळीं एल्फिन्स्टन कालेजांत फेलो होते, ते डा. भांडारकर यांजपाशी वारंवार असें म्हणत:—"पंडित, अलीकडे पुण्यास एक नवीन मासिक पुस्तक निघूं लागलें आहे; आपल्या पाहण्यांत आलें आहे काय? नसल्यास अवश्य पहावें. चांगलें आहे." पुढें शास्त्रीबुवांनीं आपला पंजा पसरून नखें बाहेर काढलीं व तीव्र लेख लिहून सुधारकांची खरडपट्टी काढण्यास सुरवात केली तेव्हां सुधारक मंडळींत त्यांच्या नांवाचा एकच हाहाकार झाला. पण मागाहून उपयोग काय? शास्त्रीबुवांनीं आपल्या विपुल वाचक वर्गाचीं मनें आपल्या विचारांनीं व मतांनीं अगोदरच भारून अगदीं आपलीशीं करून टाकलीं होतीं, त्यामुळें सुधारक मंडळीस चित होऊन मूग खात बसावें लागलें! पुढें शास्त्रीबुवा वारले, व त्यांची शिफारस करण ज्या तेलंगांनीं, न्यायमूर्ति बनल्यावर, त्यांच्यावर यथास्थित तोंडसुख घेतलें, तेव्हां देखील त्यांच्या भाषणास कोणी वजन दिलें नाहीं. याप्रमाणें अनेक उपयुक्त विषयांवर लेखणी चालवून, व त्यांच्यांतच, संधि साधून, आपले नवे विचार गुंफून देऊन, शास्त्रीबुवांनीं आपल्या शेवटल्या दोन निबंधांतलें विवेचन ग्रहण करण्यास वाचकांस समर्थ करून ठेवलें! हा सारा घाट शास्त्रीबुवांनीं इतका उठावाचा घातला कीं त्यांच्या इच्छेप्रमाणें तो यथास्थित निर्वेधपणें तडीस गेला. त्यांच्या ऐवजीं जर दुसरा कोणी अशाच कार्यास प्रवृत्त झाला असता, तर त्यानें आरंभींच व्यर्थ बखेडा माजवून, आपली फटफजिती करून घेतली असती. असा प्रकार

शास्त्रीबुवांचा झाला नाहीं हें त्यांच्या मुत्सद्दीपणाचेंच फळ समजलें पाहिजे.

याशिवाय, आपल्या प्रतिपक्षाच्या मतांचा पाडाव करण्याची जी युक्ति शास्त्रीबुवांनीं आपल्या लेखांत वारंवार योजलेली आहे. तीही तशीच लक्ष देण्यासारखी आहे. ती युक्ति ह्मणजे अफाट मोंगली लष्करावर शिवाजी महाराजांनीं घातलेल्या छाप्यांची होय. बादशाही लष्कराच्या निदर्शनीं जों शिवाजी महाराज दिसतात, तोंच ते नाहींतसे होऊन, क्षणभरांत मोंगलांच्या पिछाडीवर त्यांचा छापा. मग मोंगल जों आपला मोर्चा मागें फिरवतात तों महाराजांची फौज गेली निघून पार! असे छापे घालून घालून शिवाजी महाराजांनीं मोंगलांचा बादशाही अवजड लष्कर कसें जेरीस आणलें, तें प्रसिद्धच आहे, तसाच प्रकार शास्त्रीबुवांनीं सुधारकांवर, मिशनऱ्यांवर, हिंदुस्थानच्या द्वेष्ट्यांवर झोड उडविण्यांत केला. या मंडळींच्या तोंडीं लागून वाद खेळण्यांत कांहीं जीव नाहीं हें ते जाणून होते, व त्यांच्याशीं एकट्यानें त्यांनीं कोठवर पुरें पडावें? मग इतर विषयांच्या अनुसंधानानें त्यांनीं मधून मधून वरील मंडळींच्या मुख्य मुख्य पेंचदार मतांवर व कृत्यांवर फुटकळ टीका गोवून देण्याचा क्रम मांडला. यामुळें झालें काय, कीं ही टीका सामग्र्यें करून केलेली नसल्याकारणानें, कोणी त्यास उत्तर देऊं ह्मणेल तर तसें करतां येण्याला त्यास सोय नसे. सारांश, शास्त्रीबुवांची मात्र जेरबंदी गोळी त्यांवर बरोबर बसे, पण उलट त्यांवर प्रतिपक्षाचा शह बसविण्याची सोय नसे. अशाप्रकारें कांहीं काळपर्यंत मराठी भाषेवर त्यांनीं अद्वितीय आधिपत्य भोगलें तें केवळ त्यांच्या मुत्सद्दी गनिमी काव्याच फळ होय, हें वाचकांच्या लक्षांत येईलच.

यासंबंधानें लिहूं गेलें तर पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. पण हा उपोद्घात बराच लांबला असल्यामुळें, येथें अधिक लिहीत नाहीं. इतकेंच सांगतों कीं शास्त्रीबुवांच्या अंगच्या या मुत्सद्दीपणाच्या गुणाचें हें दिग्दर्शन मात्र केलें आहे. तें लक्षांत आणून जर आपण त्यांच्या

निबंधमालेचा व त्यांच्या इतर कृतींचा विचार करूं, तर ज्या कित्येक गोष्टी सकृद्दर्शनीं विसंगत, निर्हेतुक व दुष्टहेतूच्या अशा कित्येकांस दिसतात, त्यांचेंच स्वरूप फार वेगळ्या तऱ्हेचें त्यांस भासेल असा आह्मांस भरंवसा आहे. उदाहरणार्थ, मागें एके ठिकाणीं (पृष्ठ ४७) आह्मीं ह्मटलें आहे कीं "देशांतील राजकीय किंवा सामाजिक सुधारणेच्या कोणत्याही खटपटींत किंवा उलाढालींत ते प्रत्यक्ष पडल्याचें ठाऊक नाहीं," असें असतां, "त्यांच्या (लेखांच्या) योगानें मोठी चळवळ उडून, लोकांचे विचार ज्या दिशेनें चालले होते ती दिशा फिरली." यास्तव, कोणाही सुधारकाच्या बहुविध खटपटींनींही जी फिरवाफिरव होऊं शकली नाहीं, ती शास्त्रीबुवांनीं आपल्या वाड्याच्या सोप्यांत बसून, लेखणीच्या फटकाऱ्यानें करण्याचें श्रेय घेतलें याहून त्यांच्या मुत्सद्दीपणाचें उत्कृष्ट प्रमाण कोणतें पाहिजे? पण शास्त्रीबुवांच्या अंगच्या ह्या मुत्सद्दीपणाच्या गुणाची कल्पनाही त्यांचे टीकाकार रा. देव यांस नाहीं; यामुळें ह्या गोष्टीबद्दल शास्त्रीबुवांनाच दोष ठेवून, ते पुढें लिहिल्याप्रमाणें विचित्र कोटीक्रम लढवितात:—

"प्रत्यक्ष रीतीनें लोकसुधारणेच्या कोणत्याही कामांत त्यांनीं कोणताही कार्यभाग उचलिला होता असें दिसत नाहीं किंवा त्यांत त्यांचा हात तरी होता असें ह्मणतां येत नाहीं. कोणताही प्रगतिमार्ग, एखादा संस्थेच्या, मंडळीच्या, सभेच्या किंवा अन्य द्वारानें त्यांनीं दाखविला होता असें नाहीं." "ग्रंथकाराच्या नात्यानें जी लोकसेवा त्यांच्या हातून घडली, लोकांत चळवळ सुरू झाली, त्यांचें मतांतर झालें, त्यावरून कदाचित लोकनायक हें पद अप्रत्यक्ष रीतीनें त्यांस लागण्यासारखें आहे असें ह्मणतां येईल." "पण यासंबंधानें त्यांची कोणती प्रत लागेल हा मात्र वाद आहे."

सुधारणुकीच्या ह्मणून ह्मटलेल्या कृत्यांत शास्त्रीबुवांचा प्रत्यक्ष हात नसतांना, त्यांनीं हातांत लेखणी धरूनच एवढ्या उलाढाली केल्या

यांतच त्यांच्या वागणुकींतील गोम व त्यांच्या कर्तृत्वाची थोरवी आहे, असें, आम्हास वाटतें. पण या दोहोंतलेंही रहस्य रा. देव यांस बिलकूल कळलें नाहीं. एकतर, ज्या सुधारणुकीच्या चळवळी शास्त्रीबुवांस संमत नव्हत्या, त्यांत ते शिरले नाहींत, यांत त्यांचा काय बरें अपराध? दुसरें असें कीं निरर्थक अवाढव्य चळवळी चालवून, गगनाला गवसणी घालण्याचा वृथाशीण न करतां, आपल्या ऐपतीप्रमाणें लहान प्रमाणावर देशहिताचे उद्योग काढून त्यांत यश संपादणें हें उत्तम, अशी त्यांची समजूत होती व अशाच समजुतीनें त्यांनीं आरंभीं न्यू स्कूल, चित्रशाळा वगैरे उद्योग सुरू केले होते. लायक मनुष्यें निर्माण झाल्यावांचून व अनुकूळ परिस्थिति असल्यावांचून राष्ट्रीय सभा, धर्मपंथ वगैरे संस्था काढणें व्यर्थ होय. परंतु आमच्या देवांची समजूत अशी आहे कीं लोकनायकत्व प्राप्त होण्याला सुधारणेच्या संस्थांत कांहीं तरी काम केलें पाहिजे. अशा समजुतीमुळें, सेक्रेटरींपासून तों शिपायापर्यंत सुधारणेच्या कार्यांत प्रत्यक्ष राबणाऱ्या माणसांस मात्र ते खुशाल लोकनायकही पदवी देण्यास तयार होतील, परंतु ज्या मनापासून क्रियेचा उगम, त्या मनांत शिरून, ज्यानें लोकांचें मतांतर होण्यापर्यंत उलाढाल केली, तो मात्र लोकनायक पदवीस अपात्र! हा केवढा विचित्रपणा आहे!

शास्त्रीबुवांच्या वागणुकीला मुत्सद्दीपणामुळें व्यावहारिकपणा आला होता खरा; तरी त्यामुळें त्यांच्या कल्पनासृष्टींतील थोर विचारांचा लोप झाला नाहीं हीच गोष्ट विशेष होय. शाळा काढण्यांत व्यवहारदृष्ट्या पोट भरण्याचाच त्यांचा हेतु नव्हता, तर मास्तरकीहून श्रेष्ठ अशा महामहोपाध्यायत्वापर्यंत उडी मारण्याकडे त्यांची नजर होती. न्यू स्कुलाच्या पहिले वर्षीच मेची रजा होण्यापूर्वीं जो एक "अड्रेस" त्यांनीं वाचला, त्यांत न्यूस्कुलांतील शिक्षकांच्या भावी स्थितीचें भव्य चित्र रेखाटलें आहे. हें चित्र अर्थात् पोटभरू मास्तराचें नव्हे, तर शास्त्रीबुवांसारखे जे महान विचारी महत 'टाटाच्या रिसर्च युनिव्हर्सिटी' मध्यें बसून नवे नवे शोध लावणार व त्याविषयीं आपल्या

अधिकारी शिष्यवर्गास व्याख्यानें ऐकविणार, त्यांचें आहे! यावरून शास्त्रीबुवांची दृष्टि, सूर्याकडे टक लावून उडणाऱ्या गगनगामी चंडोल पक्ष्याप्रमाणें, किती उन्नत होती हें स्पष्ट समजतें. तथापि हें तत्व न समजतां, सुधारकपत्रकर्त्यांनीं, "टाइम टेबलें फेकून देऊन घड्याळ फोडून टाकून शिक्षण देणाऱ्या" शास्त्रीबुवांची कुचेष्टा केली आहे, ती पाहून सदर पत्रकर्त्यांच्या दुराग्रह जन्य अंधतेची कींवच करणें जरूर आहे. तसेंच, न्यू स्कुलनें सरकारी देणगी स्वीकारून सरकाराचा मिंधेपणा पत्करला, हें शास्त्रीबुवांच्या तत्वाविरुद्ध झालें, असा जो सदर स्कूलाच्या सांप्रतच्या चालक मंडळीवर आरोप आहे तो निरर्थक आहे, असें प्रतिपादन करण्याच्या हेतूनें सुधारक पत्रकर्ते ह्मणतात कीं 'ज्या स्वातंत्र्याखातर सरकारी देणगी पत्करा-वयाची नाहीं, तें स्वातंत्र्य सरकारास अन्योपायांनीं हिरावून घेतां येणार नाहीं काय? उद्यां पेनाच्या फटकाऱ्या सरसा, या शाळेचीं मुलें युनिव्हर्सिटीच्या परीक्षांस घेऊं नये, म्हणून हुकूम बड्या लाट साहेबां-नींच सोडला तर स्वतंत्रता कोठें राहील? असा विचार करून स्वतां शास्त्रीबुवांनींसुद्धां सरकारी देणगी नाकारली नसती. इ० इ०.' पण हा कोटीक्रम लटका आहे. शास्त्रीबुवा सरकारी देणगीवर तटून बस-णारे नव्हते, व अशा अडवणुकीलाही मोजणारे नव्हते. युनिव्हर्सि-टीच्या द्वारीं न्यू स्कुलाला मज्जाव झाला असता तरी मुक्तिफौजेप्रमाणें शिक्षकचमू निघण्यास कांहीं अवधि लागता असें वाटत नाहीं. पण हा वाद शुष्क आहे. तेव्हां त्यांत न शिरतां, एवढें ह्मणावयास चिंता नाहीं कीं शास्त्रीबुवांच्या मुत्सद्दीपणानें त्यांना असाच कांहीं निर्वेध मार्ग सुच-विला असता हें खचित.

मुत्सद्दीपणाचा गुण शास्त्रीबुवांप्रमाणें महाराष्ट्रांतल्या पुढाऱ्यांपैकीं पुष्कळांच्या ठिकाणीं दिसून आलेला आहे. ज्यांनीं आपापले संसार उत्तम प्रकारें आज थाटले आहेत व ज्यांनीं आपापले कारखाने व उद्योगधंदे जमविले आहेत, त्या सर्वांच्या आंगीं हा गुण

दिसून येण्यासारखा आहे. एका वृद्ध ग्रंथकारानें अनेक चरित्रें व बडाच्या इतिहासासारखीं पुस्तकें लिहून, विपुळ पैसा मिळविला, त्यास तो या मुत्सद्दीपणावांचून खचित मिळाला नसेल. याचप्रमाणें, कोणी आपणापाशीं एक लाखाची तर कोणी दोन लाखाची माया केली, कोणी वकिलीवरून न्यायमूर्तित्व संपादलें, कोणी सरपदव्या मिळविल्या, कोणी आपल्या तोलाच्या रावसाहेब्या व रावबहादुऱ्या मिळविल्या,—ही सर्व प्राप्ति एकेप्रकारचा मुत्सद्दीपणा आंगीं असल्यावांचून झालेली नाहीं हें उघड आहे. परंतु या सर्व मंडळीनें आपला हा गुण स्वार्थसंपादनाकडे लावला. यांच्या मुत्सद्दीपणांत व विष्णुशास्त्री यांच्या मुत्सद्दीपणांत जमीनअस्मानाचें अंतर आहे! वरील मंडळीप्रमाणें शास्त्रीबुवांचा मुत्सद्दीपणा स्वार्थपरायण नाहीं! त्यांनीं त्याचा व आपल्या इतर गुणांचा उपयोग, लोकांस सज्ञान करण्यांत, त्यांस सावध करून आडमार्गापासून परावृत्त करण्यांत, व उन्नत विचारांचा मार्ग दाखविण्यांतच केला; स्वतांचा लाभ शोधण्यांत केला नाहीं! असा पुरुष म्हटला म्हणजे खरोखर साधुच होय! मागें ज्ञानदेव, तुकाराम, रामदास वगैरे साधु होऊन गेले, तसेच सध्यांच्या काळचे विष्णुशास्त्री हे साधु होत! असे साधुजन देशाचे पुढारी नव्हत—लोकनायक नव्हत, तर त्या पदवीला योग्य कोण हें कळत नाहीं. इतर स्वातंत्र्यशाली देशांत गुणी मनुष्यांस संपत्ति, मानमान्यता, अधिकार वगैरे ऐहिक वैभवाचा लाभ व्हावा अशी योजना असते; पण वरील वैभव जो मिळवील तोच गुणी असा हिंदुस्थानांत सध्यां मनु आहे. यास्तव संपत्यादिक वैभवलाभामुळें, गुणहीन असून पुढारीपणाला कोण पावले आहेत व खरे गुणी असून पुढारीपणाला योग्य असे कोण आहेत, हें पाहून त्यांची निवड करणें सध्यां फार अगत्याचें आहे. अशी निवड केली, तर विष्णुशास्त्री यांसच **लोकनायक** ही पदवी द्यावी लागेल. त्यांच्या दोन्ही चरित्रकारांनीं त्यांस ही पदवी त्यांच्या चरित्र ग्रंथांत योजली आहेच, ती अत्यंत समर्पक होय असें दिसून येईल.

गुणी मनुष्यच गुणवंताचे गुण ओळखतात, गुणहीनास त्यांची किंमत होणें कठिण आहे, असें एका संस्कृत कवीनें ह्मटलें आहे तें अगदीं खरें आहे. विष्णुशास्त्र्यांची किंमत इतर पामर जन कशीही लेखोत, तथापि जो पुरुष सुधारकचमूचा अग्रणी ह्मणून गाजला व ज्यास विष्णुशास्त्री यांनींही the first man of the age* (सद्यांच्या काळचा नरश्रेष्ठ) असें ह्मटलें, त्या न्यायमूर्ति रानड्यांनीं विष्णुशास्त्र्यांची योग्यता पूर्णपणें ओळखली होती. विष्णुशास्त्र्यांची निधनवार्ता ऐकून त्यांची कशी अवस्था झाली पहा! व त्यांच्या मुखावाटे काय उद्गार निघाले ते ऐका! ही स्थिति व हे उद्गार एका साक्षेपी गृहस्थानें टिपून ठेवले ले एका वर्तमानपत्रांतीं "माझ्या स्मरणवहींतली कांहीं पानें" या सदराखालीं अलीकडे प्रसिद्ध झाले आहेत, ते येणेप्रमाणेः—

"ती सकाळची वेळ होती. मुंबईस आंग्र्याचे वाडींत, कै. शंकर पांडुरंग पंडित रहात असत त्या बंगल्यांतली गोष्ट. माधवरावजी खुर्चीवर बसून श्मश्रु करवित होते व भोंतालीं मित्रमंडळी गोष्टी बोलत व्हरांड्यावर बसली होती. कोल्हापुरप्रकरणांत केसरी व मराठा पत्रांवरील खटल्याच्या संबंधानेंच या गोष्टी होत्या. इतक्यांत पुण्याहून रात्रीचे गाडीनें आलेला एक गृहस्थ तेथें अवचित आला, व त्यानें शास्त्रीबुवांची निधनवार्ता सांगितली! त्याबरोबर बसल्या मंडळीस एकदम धक्का बसल्यासारखें झालें! सर्वांचीं मुखें म्लान झालीं! कांहीं वेळ कोणाच्याही मुखावाटे शब्द निघेना! माधवरावजींच्या नेत्रांतून टपटप अश्रुबिंदु पडले! ते मला पक्के स्मरत आहेत! त्यांच्या मुखांतून जो पहिलाच उद्गार निघाला तो हा–'He had no business to die so soon.' यांतील प्रमेय एवढेंच कीं......ज्या कामासाठीं शास्त्रीबुवा अवतरले होते व जें काम त्यांनीं अंगीकारलें होतें, तें पुरें करून त्यांनीं जावयाचें होतें!"

---

* किरकोळ लेख भाग २ रा. पृष्ठ ५९१ पत्रव्यवहार नंबर १०.

† सुधारक, ता. २५ फेब्रुवारी सन १९०१. पत्रव्यवहार.

शास्त्रीबुवांची मृत्युवार्ता ऐकून, एका आधुनिक कवीची जी स्थिति झाली तीही अशीच झाली, असें तोच कवि आपल्या मोहक वाणीनें वर्णितो. कवि हे सहृदय असल्यामुळें, त्यांचे उद्गारांत न्यायमूर्तींच्या वरील करुण स्थितीचें, किंबहुना महाराष्ट्रांतील त्या वेळच्या सर्व आबाल-वृद्धजनांच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब उमटावें हें स्वाभाविक आहे. आमचे मित्र, कवि मोगरे, यांचा काव्योद्गार "विष्णुशास्त्र्यांच्या निधन-विलापांत" येणेंप्रमाणें प्रगट झाला आहे:—

"हस्तीं घेउनि केसरी तव गुणां वर्णीत होतों जयीं,
विष्णो ! त्या अरुणोदयें कळविली त्वन्मृत्युवार्ता तयीं ।
वाटे सत्य न वृत्त तें प्रथमतां माझ्या मनाला, परी
झाला संशय दूर सर्वहि पुढें एका क्षणाभीतरा ॥

"हातांतून गळोन शीघ्र पडला भूमीवरी केसरी,
आला दाटुनि कंठ, मोह शिरला येवोनियां अंतरीं ।
केलें भाषण काय, काय करणें आहे पुढें, ही स्मृति
गेली सर्व निघोनि, एक घटिका भ्रांतींत होती मति ॥

"दिवस निघुन गेला ह्याच चिंतेंत सारा
क्षणभरहि न चित्ता होय शांतीस थारा ।
हरहर ! जगदीशा ! काय हा घात केला
म्हणुनि वदत दुःखें घालवीलें निशीला ॥

"उद्योगें पारतंत्र्यीं असुनिहि करितों आर्यभूद्धार, ऐशी
तुझी भीष्मप्रतिज्ञा तुजविण दुसरा कोण ने शेवटासी ?
आवेशें कास तुझी धरुनि सरकले जे पुढें याच कार्या,
जावें सोडोनि त्यां, हें उचित तुज कसें वाटलें बंधुराया ?॥"

मुंबई, ता० १ डिसेंबर सन १९०१. — खं. भि. बेलसरे.

# सूचना.

प्रकृत पुस्तकाला सुमारे पांच वर्षांपूर्वी आरंभ झाला, तेव्हां हा संग्रह एकाच भागांत काढण्याचा विचार होता. परंतु सन १८९६ सालीं प्लेगाची जी गर्दी झाली, तिच्यामुळें पहिला बेत रहित करून, जेवढा भाग तयार झाला, तेवढाच बांधून लोकांपुढें आणण्याचें अगत्य पडलें. पुढें दुसरा भाग काढावयाचा; परंतु प्रत्येक वर्षीं प्लेगाची फेरी येत गेल्यामुळें व त्यांतच दुष्काळानेंही आपलें उग्र स्वरूप प्रगट केल्यामुळें, पुढील काम हातीं घेण्यास हिय्या होईना. बरें, पहिले भागाला ग्राहक मिळाले, त्यांचीं संख्या मोजण्यास हाताचीं बोटेंही फार होतीं; यामुळें दुसरा भाग काढूं नये असाच आमचा विचार होता. परंतु आमचे मित्र रा. बेलसरे यांनीं आपला हेका सोडला नाहीं. पुढें रा. देव यांची 'विष्णुशास्त्री चिपळुणकर यांचे चरित्रावर टीका' ग्रंथमालेंत प्रगट झाली, व तिला उत्तर देण्याचा यत्न रा. मुंडले यांनीं केला, तेव्हां त्यांस विष्णुशास्त्र्यांविषयीं माहिती मिळविणें भाग पडलें. ते एके दिवशीं रा. बेलसरे यांस येऊन भेटले, व प्रकृत पुस्तकाचा दुसरा भाग काढण्याचें काम शेवटास नेण्याविषयीं त्यांस त्यांनीं आग्रहपूर्वक सांगितलें. रा. बेलसरे यांचे मनांत ही गोष्ट घोळत होतीच. शेवटीं कांहीं व्यवस्था करून, लागलीच दुसरा भाग काढण्याचा बेत त्यांनीं कायम केला. मध्यंतरीं ज्या कित्येक अडचणी आल्या, त्यांतून निभावून

हें काम पुरें होऊन, एकूण हे की अही भाग वाचकांच्या हातीं ... संकल्पाप्रमाणें, याचा शुभ योग प्राप्त झाला आहे. ... बेलसरे यांच्या मतें, हें सारें श्रेय त्यांचे मित्र रा. मुंडले ... सच देणें योग्य आहे. यांतूनच थोडा वांटा आमचे मित्र व साहाय्यकर्ते रा. काशीनाथ नारायण आठवले ... र्क, आर्यन् एज्युकेशन सोसायटीज हायस्कूल, मुंबई, ... सही दिला पाहिजे. कांकीं त्यांनीं पैशाची मदत वेळेवर ... ली नसती व मागाहून निकड लावण्याचा त्रास घेतला ... सता, तर हें काम जेवढें लवकर झालें तेवढें कदाचित् ... लें नसतें. असो; सध्यां आमचें कर्तव्य आमच्या इच्छे-माणें आह्मी करून चुकलों आहों व आपल्यापैकीं एका ... मांकित ग्रंथकाराचे लेख कालनाशभयाच्या तडाक्यांतून ... डवून एकत्र करून ठेविले आहेत. त्यांचा परामर्श महारा-ष्ट्रांतील विद्याभिलाषी जन अवश्य घेतील, असा आह्मास भर-... आहे. शास्त्रीबुवांचे लेख एकत्र करून छापविण्याविषयीं ... परवानगी त्यांचे बंधु कै. वा. लक्ष्मणराव चिपळुणकर ... नीं मोठ्या उत्साहानें व संतोषानें दिली, इतकेंच नाहीं ... शास्त्रीबुवांच्या हातचीं आपणापाशीं असलेलीं पत्रें-... दिलीं; तसेंच शास्त्रीबुवांचे संवगडे रा. रा. शंकर तुकाराम शाळिग्राम यांनींही कित्येक पत्रें वगैरे दिलीं, ... सर्वांबद्दल त्यांचे आह्मी मनःपूर्वक फार फार आभार मानितों. शेवटीं प्रकृत संग्रह बाहेर पडण्यास फार उशीर झाला, याबद्दल आगाऊ वर्गणीदारांची क्षमा मागून वाच-कांची रजा घेतों.

प्रकाशक.

# केसरी.

जानेवारी सन १८८१—मार्च १८८२.

# विष्णुशास्त्री चिपळूणकर

## यांच्या

# किरकोळ लेखांचा संग्रह

## प्रसिद्धिपत्रक.

स्थितिं नो रे दध्याः क्षणमपि मदांधेक्षण सखे
गजश्रेणीनाथ! त्वमिह जटिलायां वनभुवि।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा-
गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः॥

**जगन्नाथराय.**

वरील नांवाचें वर्तमानपत्र निव्वळ महाराष्ट्रभाषेंत येत्या ( १८८१ ) सालच्या आरंभापासून दर मंगळवारीं काढण्याचा विचार खालील मंडळीनें केला आहे. या पत्रांत एरवींच्या वर्तमानपत्रांप्रमाणें बातम्या, राजकीय प्रकरणें, व्यापारसंबंधी माहिती, वगैरे नेहेमीचे विषय तर येतीलच; पण याखेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथांवर टीका, वगैरे विषयांचाही त्यांत समावेश केला जाईल. तसेंच विलायतेंत ज्या राज्यप्रकरणांची वाटाघाट होते, ती इकडील लोकांस समजणें अवश्य असल्यामुळें त्यांचाही सारांशरूपानें यांत संग्रह करण्याचा बेत केला आहे. आजपर्यंत वरील तीन विषयांवर, ह्मणजे देशस्थिति, देशभाषेंतील ग्रंथ, व विलायतेंतील राज्यकारण, या विषयांच्या संबंधानें जसें यथास्थित उद्‌घाटन व्हावयास पाहिजे होतें, तसें कोणत्याहीवर्तमा-

नपत्रांतून झालें नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तर ही मोठी उणीव नाहींशी करून टाकण्याचें आह्मी मनांत आणिलें आहे.

वरील वर्तमानपत्रांत प्रत्येक विषयाचें विवेचन जें करावयाचें, तें केवळ निःपक्षपातबुद्धीनें व आह्मांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें, असा आमचा कृतसंकल्प आहे. आलीकडे बादशाही अमलाच्या सुरवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून, देशाच्या हितास अपायकारक होय, हें कोणीही प्रांजल मनुष्य कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास ठेविलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें.

या पत्राचा सांचा 'सुबोधपत्रिके' सारखा धरण्यांत येईल. किंमतही त्याच मानानें अगदीं थोडी ठेवली आहे. ती सालीना आगाऊ १ रुपया व खेरीज टपाल हशील १८/१० इतकी आहे. मागाहूनचा दर मुदलींच ठेवला नाहीं. सरतेशेवटीं आमच्या आर्यबंधूंस येवढीच विज्ञापना करण्यांत येते कीं त्यांनीं या लोकहिताच्या नवीन कृत्यास आपला उदार आश्रय द्यावा. तो जसजसा मिळेल तसतशी आह्मास उमेद येऊन, हें पतकरलेलें काम यथाशक्ति तडीस नेण्यांत आह्माकडून बिलकुल कसर होणार नाहीं.

| | |
|---|---|
| विष्णु कृष्ण चिपळुणकर बी.ए. | बाळगंगाधर टिळक बी.ए.एल्.एल्बी. |
| वामन शिवराम आपटे एम्. ए. | गणेश कृष्ण गर्दे एल्. एम्. आन्ड् एस् |
| गोपाळ गणेश आगरकर बी.ए. | महादेव बल्लाळ नामजोशी. |

---

# उपोद्घात.

[ केसरी, तारिख ४ जानेवारी १८८१ ]

आज मुंबई इलाख्यांत इतकीं वर्तमानपत्रें निघत असतां व या शहरांतही तीन चार चालत असतां, नव्या वर्तमानपत्राची काय जरूर आहे, हा विचार आमच्या वाचकांच्या मनांत सकृद्दर्शनीं येणार आहे. यास्तव प्रथमतः या पत्राचा उद्देश कळविणें अवश्य आहे.

वर्तमानपत्रांचा प्रघात पडल्यास आज वीस पंचवीस वर्षे जरी होऊन गेलीं, व गेल्या दहा पंधरा वर्षांत त्यांच्यांत जरी पुष्कळ सुधारणा झाली, तरी अद्याप वर्तमानपत्र कर्त्यांस आपणावरची जबाबदारी पुरतेपणीं कळूं लागली आहे किंवा लोकसुधारणेस आपल्या परिश्रमानें केवढें साहाय्य होणारें आहे, याविषयीं त्यांचा पक्का समज झाला आहे असें सामान्यतः पाहतां आढळणार नाहीं. दोन चार नामांकित वर्तमानपत्रां खेरीज बाकीच्यांची जर स्थिति पाहिली, तर वर्तमानपत्र म्हणजे जागोजागच्या बातम्या प्रसिद्ध करण्याचें साधन, याचे पलीकडे वर्तमानपत्र या शब्दाचा अर्थ वर्तमानपत्रकर्त्यांचे मनांत कधींहीं येत असेलसें वाटत नाहीं. आलीकडे तर लहानसान गांवांतून सुद्धां वर्तमानपत्रें निघूं लागलीं आहेत. छापखाना घालणें व पत्र काढणें हा एक व्यापारच बनल्यानें, ज्यास विद्येचा विशेष संस्कार नाहीं अशा मंडळीच्या हातींच वरील दोन साधनें पडलेलीं बहुधा आढळतात. आतां एवढें खरें आहे कीं, कोणत्याही तऱ्हेनें कां होईना, वरील दोन साधनांची वृद्धि ही एकंदर देशास श्रेयस्करच होय. निदान पक्षीं लोकांत वाचण्याचा प्रघात तरी होण्यास वरील साधनांचा उपयोग आहे. पण त्याच उद्योगांत वरच्या पेक्षां चांगली मंडळी पडली असतां, लोककल्याणाचा मार्ग जास्त खुला होणार आहे हें उघड आहे.

वर्तमानपत्रांचा मुख्यतः दोन प्रकारांनीं मोठा उपयोग आहे. एक हा कीं, त्यांनीं आपलें काम निःपक्षपातपणें व निर्भिडपणें बजावलें असतां, सरकारी अधिकाऱ्यांवर योग्य दबदबा राहतो. रस्तोरस्तीं रात्रीं दिवे लागलेले असल्यानें व पोलीसाची गस्त सारखी फिरत असल्यानें जो उपयोग होतो तोच त्या त्या जागीं वर्तमानपत्रकर्त्यांची लेखणी सदोदित चालू असल्यानें होत असतो. सरकारी अधिकाऱ्यांनीं आपापलीं कामें चोख रीतीनें चालविलीं असतां त्यांत प्रजेचें केवढें कल्याण होतें हें कोणासही सांगावयास नकोच. पण वरील चोखपणा राहण्यास त्यांचा सर्व कारभार लोकांच्या नजरेसमोर वरचेवर येत असला पाहिजे. सर्व गोष्टी सर्वांच्या समक्ष होत

असल्या म्हणजे अर्थातच लांचलुचपत वगैरे जे अन्यायाचे प्रकार एरवीं होण्याचा संभव असतो ते पुष्कळ अंशीं टळतात. जुन्या एतद्देशीय संस्थानांतून वरील प्रकार किती चालत असे, व अझूनही किती चालतो हें क्षणभर लक्षांत आणलें असतां, पत्रकर्त्यांची गस्त किती हितावह आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. विलायतेंत तर खुद्द महाराणी साहेबांपासून व मुख्य प्रधानापासून तों अगदीं छोटया सरकारी कामगारापर्यंत सर्वांच्या कारभाराकडे लोकांची नजर वर्तमानपत्रांचे द्वारें सारखी लागून राहिलेली असते, यामुळें कोणताही अन्याय प्रायः छपला जात नाहीं. यामुळें तेथील लोक यूरोपांतील इतर राष्ट्रांहून सुखी आहेत ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे.

तर, सरकारी अधिकारी आपापलीं कामें कोणत्या तऱ्हेनें बजावतात या विषयीं केवळ निःपक्षपात बुद्धीनें व कोणाची भीड न बाळगतां मजकूर लिहिण्याचा आमचा इरादा आहे. अमुक अमुक गोष्ट अशी आहे तेव्हां तिच्या विरुद्ध कसें लिहावें, किंवा सरकारानें अमुक अमुक गोष्ट केली तर तिजवर चर्चा केली असतां सरकाराची मर्जी जाईल वगैरे क्षुद्र विचारांस आम्ही थारा देणार नाहीं. वर्तमानपत्र-कर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील आहेत. तर हे दोन्ही अधिकार होइल तितक्या दक्षतेनें बजावण्याचा आम्ही संकल्प केला आहे. सन १८७८ च्या नवव्या आक्टामुळें वरील अधिकाराचा जोर कांहींसा कमी झाला आहे खरा; तरी आपलें काम यथास्थितपणें व रास्त रीतीनें चालविण्यास वरील कायद्यानें कोणाही लिहिणारास प्रतिबंध होईल असें आम्हास वाटत नाहीं.

वर्तमानपत्रांचा दुसरा मोठा उपयोग लोकस्थितीच्या संबंधानें आहे. तिची सुधारणा होण्यास वर्तमानपत्रासारखें दुसरें साधन नाहीं. कोणकोणत्या गोष्टी लोकांस हितकारक आहेत व कोणकोणत्या अ-हितकारक आहेत, जुन्या चाली टाकून देण्यासारख्या कोणत्या आहेत, व नवीन घेण्यासारख्या कोणत्या आहेत. वगैरे गोष्टींचा वर्तमानपत्रांच्या द्वारें ऊहापोह चालला असतां किती फायदा

होणार आहे! पण या गोष्टींकडे आजपर्यंत हवें तसें लक्ष कोणीच दिलें नाहीं असें म्हटलें असतां चालेल. विलायतचीं कारस्थानें कुटण्याखालीं व नवें धर्म तयार करण्याच्या खटपटीखालींच आजपर्यंत आमची मंडळी बेजार झाली. लोकांचे वास्तविक हक्क काय आहेत, ते संपादन करण्यास काय काय केलें पाहिजे, लोकांचा चरितार्थ चालण्यास पुढें मार्ग कोणता, आजपर्यंत लोकांच्या कल्याणाकरतां उभारलेल्या कामांची काय वाट झाली, व ती कशानें झाली, लोकांत कोणकोणते गुण अवश्य पाहिजेत, ते कसे यावे वगैरे विषयांवर लिहूं गेलें असतां मोठमोठे ग्रंथ होतील; पण आजपर्यंतची आमच्या पुढारी मंडळीची प्रवृत्ति पाहिली तर कांहीं निराळ्याच तऱ्हेची! पार्लमेंट सभेत एतद्देशीयांचा प्रवेश होण्याची तजवीज करणें, सर्व धर्मांचें सार काढून नवें धर्म बनविणें, ज्ञाति भेदाचा एका तडाख्यासरसा विध्वंस करून टाकणें, विलायतच्या व्यापाराशीं टक्कर मारणें, शेर अलीकडे जाऊन त्यास नीतिशास्त्राचा उपदेश करणें, असल्या अकटोविकट कृत्यांत आह्मी पडल्यामुळें, आजपर्यंत आमचा अमोलिक वेळ व्यर्थ गेला! तर, वरील याही चुकीची दुरस्ती करण्याचा आमचा विचार आहे.

याशिवाय वर्तमानपत्रकर्त्यांनीं आजपर्यंत बहुधा मुळींच वगळलेला तिसरा मोठा विषय म्हटला म्हणजे विद्याखातें व देशी भाषेंतील ग्रंथ हा होय. विद्याखात्याची स्थिति दिवसेंदिवस किती विलक्षण होत चालली आहे हें बहुधा सर्वांस माहित आहेच, व प्रस्तुतचे अधिकारी कामावर आल्यापासून तर ह्या खात्याची किती खराबी होत चालली आहे, हेंही कोणास सांगावयास पाहिजें असे नाहीं. पण ही मोठी चमत्काराची गोष्ट आहे कीं, लोकशिक्षण हा विषय देशस्थितीच्या संबधानें पाहतां येवढ्या महत्वाचा असतां, व विद्याखात्याकडे देशांतील उत्पन्नाची येवढी मोठी रक्कम खर्चीं पडत असतां, तिचा विनियोग कसा काय होत असतो, या गोष्टीकडे कोणी फारसे लक्ष देत नाहीं. जें आंधळें गारुड आज कित्येक वर्षें चाललें आहे, तेच पुढें चालू

आहे. पहिली लोकस्थिति आज बिलकूल राहिली नाहीं. गेल्या दहा वीस वर्षांत विद्येचा प्रसार इकडे पुष्कळ झाल्यानें लोकांच्या समजुती आज पुष्कळ बदलल्या आहेत. पण लिहिण्यास अत्यंत खेद वाटतो कीं, लोकशिक्षणाची जी पद्धत एकदां कधीं काळीं घालून ठेवलेली आहे ती आहे; व ग्रंथकारांची जी स्थिति गेल्या वीस वर्षांपूर्वी होती तीच कायम आहे. आम्हीं मोठे झालों तरी आमचें जुनें आंगडेंटोपडें आम्हास अद्याप सुटत नाहीं! तर, याही दोन विषयांच्या संबंधानें आमच्या 'केसरी' ची गर्जना वरचेवर होत जाईल.

येणेंप्रमाणें स्वस्वरूपाचें कथन झालें. आतां एवढेंच सांगून आटपतों कीं, या आमच्या आरंभिलेल्या कार्यास आमच्या देशबंधूनीं यथायोग्य साह्य केल्यास आम्ही आपलें कर्तव्य बजावण्यांत बिलकूल कसूर करणार नाहीं.

---

## नवनीताची नवीन आवृत्ति.

[ केसरी ता० ११ जानेवारी १८८१ ]

आम्हीं गेल्या अंकांतल्या उपोद्घातांत लिहिलेच आहे कीं, विद्याखातें हा विषय आमच्या मराठी वर्तमानपत्रांत बहुधा येतच नाहीं, व त्यांत आजपर्यंत जी अनादिसिद्ध व्यवस्था चालत आली आहे ती आहे सरकाराच्या इतर कामगारांच्या संबंधानें वर्तमानपत्रांतून पुष्कळ-वळ बोभाटे ऐकूं येतात, पण **डायरेक्टर** साहेबांनीं अमुक अमुक नवीन नियम केले, किंवा अमुक अमुक गोष्ट मोडून टाकली किंवा नवी केली, त्याबद्दल कोठें कधीं हूं का चूं सुद्धां होत नाहीं. विद्याखातें ह्मणजे भिक्षाखातें; ज्यास इतर धंदा करण्याची अक्कल नाहीं; त्यानें ह्या मेंढवाड्यांत पडावें! तेव्हां, यांत काय फेरफार होतात, व याची दिवसेंदिवस काय व्यवस्था होत चालली आहे, याकडे कोण लक्ष देतो? पण या उपेक्षेमुळें आजपर्यंत लोकांचें किती नुकसान झालें आहे व सध्यांची ही कारकीर्द अशीच आणखी दहावीस वर्षें चालली तर काय परिणाम होईल, याची आम्हांस तर बिलकूल कल्पना होत नाहीं!

आजपर्यंत Literature, Politics, Commerce and News ( ग्रंथसंबंधी, राजकीय संबंधाची, व व्यापाराची माहिती आणि किरकोळ वर्तमाने ) येवढी धनत्तर प्रतिज्ञा अग्रभागीं बाळगली असतांही, मोठमोठ्या वर्तमानपत्रांच्या हातून वरील चौकड्यांतलें पहिलें सदर तर बहुतेक कोरडेच राहत गेलें. कधीं मधीं कपिलाषष्ठीचा योग आला, तर एकादा लहानसा अभिप्राय एकाद्या पुस्तकावर दृष्टीस पडावयाचा, नाहींतर बहुतेकांची बोळवण 'सवडीप्रमाणें अभिप्राय प्रगट करण्यांत येईल' येवढ्यावरच व्हावयाची, असा आजपर्यंतचा सामन्यतः प्रकार आहे. Literature ( ग्रंथसंग्रह ) या सदराखालीं देशभाषेविषयीं, तींत होणाऱ्या नव्या ग्रंथांविषयीं, किंवा विद्याखात्याचे सुकर्णधार जे डायरेक्टर साहेब, त्यांच्या हातून नवीन ग्रंथांचा कसा काय परामर्श घेण्यांत येतो, याविषयीं मजकूर येणें खरोखर पाहतां जरूर आहे. पण आजपर्यंत वरील हयगयीमुळें वरच्या अनेक गोष्टींच्या संबंधानें कोणी प्रायः चकारशब्द सुद्धां काढला नाहीं. ही आजची अत्येक वर्षांची उणीव दूर करण्याचा व इतके दिवसांचें कर्ज अंगावर अून तें फेडण्याचा आमचा संकल्प यापूर्वी कळविण्यांत आलाच अहे; यास्तव आतां एकदम त्याच कार्यास लागतों. देशभाषेंत चांगले ग्रं होणें, व तसे होण्याच्या तजविजी ज्या आमच्या दयाळू सरकारें करून ठेविल्या आहेत त्यांची कशी काय व्यवस्था होत असते उपाहणें हीं दोन्ही कामें लोकहितार्थी असून अंत्यत महत्वाचीं होत, हें आज कोणाला समजावून सांगायाला पाहिजे असें नाहीं.

मेहेरबान चाट्फील्ड साहेब हे विद्याखात्यावर नियुक्त होऊन, त्याचीं सूत्रें त्यांच्या हातांत गेल्यापासून ज्या कित्येक घडामोडी झाल्या, त्यांतील एक मोठी घडामोड 'नवनीत' या ग्रंथाची होय. सन १८७३ सालापर्यंत या ग्रंथाच्या आठ आवृत्ति निघाल्या, त्या सर्व प्रख्यात परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्याच हातून निघाल्या. पुढें पुष्कळ तऱ्हेच्या अनेक सुधारणा करून सन १८७८ सालीं वर लिहिलेली नवीन आवृत्ति काढण्यांत आली. ही काढण्याचें काम साहेबब-

हादुरांनीं रावजीशास्त्री गोडबोले व के० श्रीकृष्णशास्त्री तळेकर यांच्याकडे सोंपविलें होतें. सदरील कामावर दोघा नेटिव पंडितांचीच योजना होऊन, त्यांच्यावर आणखी कोणी फालतू सुपरिंटेंडेंट नेमला नाहीं ही मोठ्या भाग्याची गोष्ट होय. पण या अनुष्ठानाच्या सांगतासिद्ध्यर्थ मोठीशी सुवर्णदक्षिणा ठेवण्यांत आली नसेल, ह्मणून बहुधा वरील गोष्टीची जरूर पडली नसावी. नाहींतर 'संस्कृत तिसरें पुस्तक' बनवितांना बुल्हर साहेबांची जशी वरणी लागली होती, त्याप्रमाणेंच 'नवनीता'च्या नवीन आवृत्तीच्या वेळीं एखादे क्याप्टन जेकब् सारखे महाराष्ट्रभाषाधुरंधर पुढें व्हावयाचे !

सदरील ग्रंथाचें काम वरील दोघा प्रकाशकांनीं फार उत्तम रीतीनें बजाविलें आहे, हें वरील नवीन आवृत्ति वरवर चाळून पाहतां कोणासही समजणार आहे. त्यांनीं या आवृत्तींत एकंदर बारा प्रकारांनीं सुधारणा केली आहे, तिचा तपशील प्रस्तावनेंत दिलाच आहे. या सुधारणा होणें हें अत्यंत इष्ट होतें हें उघडच आहे, व त्या अमलांत आणल्याबद्दल महाराष्ट्रकवितेचें अध्ययन करणारांनीं डा रेक्टर साहेबांचे व दोघा शास्त्री मजकूरांचे आभार मानणें अ होय. वरील सुधारणांपैकीं दोन तीन कलमांविषयीं मात्र आक्षेप घेण्या सारखे आहेत. हीं कलमें येणें प्रमाणें:—

"(१) मागील आवृत्तींत जे फार दुर्बोध आणि अध्यात्मसंबंधी किंवा वेदांतसंबंधी वेंचे होते ते गाळून नवे सुलभ, मनोरंजक आणि तरुण पुरुषांनीं वाचण्यास योग्य असे वेंचे घातले आहेत."

"(१०) मकुंदराज आणि ज्ञानेश्वर ह्यांच्या कवितांत सर्व वेदांतच असल्यामुळें त्यांचा अर्थ समजण्यास कठीण, म्हणून त्यांची कविता त्या आवृत्तींतून अजीच काढून टाकली आहे."

"(११) जे कवि ह्या आवृत्तींत गाळले आहेत त्यांच्या बदला दुसरे कवि घातले आहेत."

तेव्हां 'नवनीत अथवा मराठी कवितांचे वेंचे' ही ज्या पुस्तकाची मुखपृष्ठावर प्रतिज्ञा त्यांत मुकुंदराज व ज्ञानेश्वर या दोघांस अजीच

फांटा ! बरें, त्यांस फांटा दिला तर दिला, पण त्याबद्दल विद्यार्थ्यांची व वाचकांची समजूत कोणत्या रीतीनें घालावयाची, तर ज्ञानोबाला घालवून दिला आणि त्याच्याबद्दल. अनंतफंदीला सामील केला ! आतां या दोन्ही सुधारणा कितपत समंजसपणाच्या आहेत याच्याविषयीं विचार करूं.

'नवनीता' विषयीं विचार करतांना प्रथमतः ही एक मोठी गोष्ट लक्षांत आणली पाहिजे कीं, एकंदर महाराष्ट्रकवितेचें तें सार होय; म्हणजे, एकंदर मराठी कविता अत्यंत विस्तीर्ण आहे तेव्हां स्थालीपुलाक न्यायें करून, अथवा मराठींत ह्मणतात कीं 'शितावरून भाताची परीक्षा करायाची' त्याप्रमाणें, थोडक्यांत ज्याला तिच्या स्वरूपाचें ज्ञान करून घेणें असेल त्याला तें वरील पुस्तकावरून व्हावें, अशी त्याची रचना असली पाहिजे. मग हें जर खरें आहे, तर महाराष्ट्रकवींपैकीं कोणीं अध्यात्म किंवा वेदांत विषयच मुख्यतः वर्णिला असतां, त्यास 'नवनीतां' तून अजीच काढून टाकणें हें काय उपयोगी ? मेहेरबान चाट्फील्ड साहेब किंवा क्यांडी साहेब यांस जरी आमच्या ज्ञानोबांचें ब्रम्हज्ञान दुर्बोध वाटलें, किंवा त्याविषयीं त्यांचीं खासगत मतें कांहींही असलीं, तरी 'नवनीतां' तून मुकुंदराज किंवा ज्ञानदेव यांजसारख्या अत्यंत प्रसिद्ध कवींवर अर्धचंद्रप्रयोग करणें ह्मणजे केवढा अन्याय होय ! इंग्रेजी कवितेचें सार ह्मणून एकादा ग्रंथ रचला, आणि त्यांत बायरन् कवीच्या ग्रंथांत अश्लीलत्व आहे किंवा शेलीच्या ग्रंथांत नास्तिकपणा आहे ह्मणून त्यांचे वेंचे जर मुळींच घेतले नाहींत, तर चालेल काय ? या दृष्टीनें पाहतां पूर्वोक्त कविद्वयाचा निषेध अत्यंत असमंजसतेचा होय हें उघड आहे. क्यांडी साहेबांनीं, मराठी भाषेंत आज शेंकडों वर्षें रूढ झालेल्या प्रयोगांस जसें आपल्या कायम ठशांनीं छापलेल्या साहा क्रमिक पुस्तकांतून पिटून लावून, महाराष्ट्र भाषेवर आपली कदर चालविण्याचा वेडगळ प्रयत्न केला आहे, त्याप्रमाणेंच 'नवनीता' च्या नवीन आवृत्तींत केलेल्या वरील 'सुधारणां' ची [illegible]ति होय. त्यांस कोणीही समंजस किंवा मार्मिक वाचक 'सुधा-

रणा म्हणणार नाहीं. 'हेकटपणा' किंवा 'अरसिकता' हींच नांवें वरील प्रकारास यथायोग्य होत.

[ केसरी, तारिख १८ जानेवारी १८८१ ]

आलीकडे हायस्कुलांतल्या शिक्षणपद्धतींत महाराष्ट्रभाषेच्या संबंधानें एक जाडी सुधारणा कोणती झालेली आहे, ती बहुधा आमच्या वाचकांस माहीत असेलच. ती ही कीं, एका भाषांतराखेरीज दुसरा मराठीचा मागमूसही इंग्रेजी शाळांतून ठेवलेला नाहीं. त्यांतून कवितेविषयीं तर कांहीं बोलायालाही नको. विद्यार्थ्यानें मराठी शाळेंत चौथी पांचवी यत्ता शिकत असतांना, आपल्या देशभाषेचें काय ज्ञान पैदा करून घ्यावयाचें असेल तें घ्यावें; तो तेथून निसटून एकदा इंग्रेजींत पडला कीं मग त्याची आणि त्याच्या जन्मभाषेची फारकत! हायस्कुलांत प्रवेश झाल्यापासून तों युनिवर्सिटीचा अंत्य संस्कार होऊन निर्गमन होईपर्यंत विद्यार्थ्यानें मराठी शब्दही तोंडावाटे काढतां कामा नये, कीं मराठी पुस्तक हातांत धरतां उपयोगीं नाहीं! ही वेडगळ सुधारणा झाल्यापासून काय विलक्षण परिणाम झाले आहेत ते सर्वांस माहीतच आहेत. म्याट्रिक्युलेशनचा पुरा अभ्यास व्हावा, आणि अमुक अमुक समास कोण ह्मणून विचारावें तों पंचाईत! गवर्नर साहेबांच्या हातची तिसऱ्या प्रतीच्या सरदारीची सनद घेऊन सनदी विद्वान् होऊन बसावें, आणि चार ओळी मराठींत लिहिण्याचा प्रसंग आला, तर क्यांडी साहेबांचा कोश जवळ घ्यावा तेव्हां सरासरी धेडगुजरी पाटाव नेसलेली सरस्वती प्रगट व्हावी! आह्मी एका 'बड्या' बी. ए. ची अशी गोष्ट ऐकली आहे कीं, त्यांस कांहीं ठेंचायाचें होतें तेव्हां ते पाकशाळेंत आपल्या पलीकडे गेले आणि तिला ह्मणूं लागले, "अगे, ते दगड कोठें आहेत, ते असे असे फिरवायाचे व वाटायाचे,—ते!" त्यांच्या मनांत पाटावरवंटा ह्मणावयाचें होतें, पण शब्द कोठून आठवावा! साऱ्या जन्मभाषेवर एकदांच पाटावरवंटा फिरून जावा अशी डायरेक्टरप्रमुख पंडितसमाजानें पक्की

तजवीज करून ठेवली; मग आमच्या खाशा पंडितांची सैंपाकघरांत अशी फटफजिती उडाल्यास नवल काय ?

कांहीं वर्षांपूर्वी महाराष्ट्रकविता हा विषय हायस्कुलांतून चालत असे, व वरच्या वर्गांतून 'ज्ञानेश्वरीं'तले वेंचेंही शिकवीत असत. पण आलीकडे काय मन्वंतर फिरलें असेल तें असो; तो क्रम आतां बंद झाला. आमचे डायरेक्टर साहेब जातीनें मोठे मुज्ञ आहेत, व त्यांचे मंत्रीही एकेक मोठे रसिक व विद्याभिमानी पडले; मग काय विचारावयाचें! सन १८७५सालांत डायरेक्टर साहेबांचें पेन बिचाऱ्या 'शालापत्रका' वरून फिरलें. येवढें पंधरा वर्षें चाललेलें पुस्तक गरीब बिचाऱ्या गांवठी मास्तरांचें विद्यासर्वस्व होऊन बसलेलें;—पण हूं, द्या फांटा! रा० किर्लोस्कर यांनीं पुष्कळ मेहनत घेऊन 'गद्यपद्यावली' म्हणून एक खरोखर अत्यंत उपयोगी पुस्तक, 'नवनीता'च्याच धाटणीचें, तयार करून आपल्या खर्चानें छापविलें; अर्भकास जसा जन्मसंस्कार करतात त्याप्रमाणें विद्याखात्यांत शिरण्याची सदर पुस्तकाच्या अंगीं विशेष पात्रता यावी ह्मणून वरील ग्रंथकारानें गीर्वाणाधिपति डा० किलहॉर्न् साहेब यांस तें अर्पणही केलें; पण वरील सर्व विधि करूनही कांहीं उपयोग झाला नाहीं. मोठमोठे संस्कार केले म्हणून शूद्राचें अपत्य कधीं द्विजत्व पावलें आहे काय? डॉक्टर बुल्हर साहेबांच्या देखरेखीखालीं झालेलें पुस्तक कोणी कडे? आणि नेटिव कितीही विद्वान् असला किंवा त्यानें कितीही योग्यतेचें पुस्तक केलेलें असलें, तरी तें कोणीकडे? पहिल्याची सर दुसऱ्यास कोठून यावी? तेव्हां झालें तें ठीकच झालें. विद्याखात्याच्या अधिपतीचें आज्ञापत्र निघालें, कीं वरील भिकार पुस्तक कोठेंही कोणी चालवूं नये! आमच्या सरकारी डिपोंतून वर्षानवर्षें पडून राहिलेला किराणा जिन्नस सगळा खपला पाहिजेना; नवे ग्रंथ चालू करून उपयोग काय? परंतु पुढें लवकरच संस्कृत विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां 'तिसऱ्या पुस्तकाची' पुनः एक खाशी दहापांच हजारांची आवृत्ति निघाली! या जन्मांतराच्या वेळेस वरील पाश्चात्त्य जनित्याची मात्कयान् संभावना झाली असेल हें सांगायाला नकोच!

तर, वरील प्रकरणीं विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांनीं जशी आपली सारासारबुद्धि प्रगट केली, त्याप्रमाणेंच महाराष्ट्रभाषेंतील दोघा आद्यकवींस अजीबात रजा देतांनाही केली असावी असें वाटतें. महाराष्ट्रभाषेवर चाळीस वर्षें आधिपत्य चालविलेले माजी मेजर क्यांडी यांनीं वरील अर्धचंद्रप्रयोगाचें श्रेय घेतलें अशी वार्ता आहे. या साहेबाचे आमच्या भाषेवर बहुत उपकार झाले आहेत, व त्यांच्या कारकीर्दींत ती बरीच नियमित झाली हें आम्ही कबूल करतों; पण ग्रंथावर अभिप्राय देण्याच्या वगैरे कामाला ते मोठेसे लायक होते, किंवा कोणी युरोपियन केवढाही भाषामर्मज्ञ झाला तरी तो सहसा होईल कीं काय, याविषयीं आम्हास मोठाच संशय आहे. मेजर मजकुरांच्या दीर्घकालिक आधिपत्यानें आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्रभाषेचें आजपर्यंतच थोडें थोडकें नुकसान झालें आहे असें नाहीं. असो; हा विषय विवेचनास घेतला असतां, त्यावर पुष्कळच लिहिण्यासारखें आहे. तूर्त इतकेंच सांगतों कीं, वरील साहेबांचीं पुष्कळ मतें अगदीं हेकटपणाचीं व कोतीं अशीं असत. या मतांपैकींच त्यांचा वेदांतमतविरोध हा होय. क्यांडी साहेब हे जरी उघडपणें मिशनरी बाणा बाळगीत नसत, तरी त्यांचा आंतला कल पाद्रीमंडळीकडेच असे. तेव्हां ख्रिस्ती मतास सर्वथा विरुद्ध जें वेदांतशास्त्र, त्याचा प्रसार विद्याखात्यांत होऊं नये, ही एक त्यांची विलक्षण समजूत होती. याविषयीं आमच्या कानावर कांहीं वर्षांमागली एक चमत्कारिक गोष्ट आलेली आहे, तीही येथें सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. आमच्या वाचकांस, साहा सात वर्षांपूर्वीं रा० योगी यांनीं प्रसिद्ध केलेली 'प्रेमबधंन' नामक कादंबरी आठवत असेलच. हीस ब्रह्मस्तुति या नांवाचा एक लहानसा मंगलाचरणरूप पद्यसमूह ग्रंथकारानें जोडला होता, तोही पुष्कळांनीं पाहिला असेल. वरील कादंबरी मराठी ट्रान्स्लेटरांकडे जेव्हां डायरेक्टर साहेबांकडून अभिप्रायाकरितां गेली, तेव्हां त्यांनीं बरा वाईट अभिप्राय आपल्या समजुतीप्रमाणें दाखल करून, पुस्तकाची शिफारस तर केली; पण एक विलक्षण आडकाठी मध्यें घालून

ठेवली. ती ही कीं, जर ग्रंथकार ‘ब्रह्मस्तुति’ काढून टाकील तरच त्याच्या प्रति सरकारानें उत्तेजनार्थ घ्याव्या. कादंबरीकार बिचारा करतो काय? ‘ब्रह्मस्तुती-’ विषयीं आग्रह धरावा, तर सरकाराचा आश्रय बुडतो! तेव्हां ग्रंथाचे टाके पुनः उसवून त्यास जेव्हां सोंवळा केला, तेव्हां तो विद्याखात्यांत शिरण्यालायक झाला. तात्पर्य माजी मराठी ट्रान्स्लेटर साहेबांचा वेदांताशीं व ब्रम्हज्ञानाशीं इतका उभा दावा होता!!

[ केसरी तारीख २९ जानेवारी १८८१ ]

‘नवनीता’च्या या नव्या आवृत्तींत माजी मेजर क्यांडी यांच्या सूचनेवरून व मेहेरबान चाट्फील्ड साहेब यांच्या मंजुरीवरून जो विलक्षण फेरफार करण्यांत आला आहे, त्याचीं अंतस्थ कारणें काय असावीं, हें मागील अंकांत आह्मीं कळविलेंच आहे. आतां वरील ‘सुधारणे’च्याच संबंधानें आणखी कांहीं थोडेंसें लिहिण्यासारखें आहे तें लिहून, हा विषय संपवितों.

विद्याखात्याच्या वरील दोघा सूत्रधारकांनीं वरील ‘सुधारणा’ अमलांत आणण्यापूर्वी हाही एक मोठा विचार मनांत आणणें अवश्य होतें कीं, मुकुंदराज व ज्ञानदेव यांचे वेंचे वगळण्याला इतर कितीही कारणें असतीं, तरी वरील कविद्वयाचें प्राचीनत्व हें स्वतः त्यांच्या तर्फेचें लहानसान कारण आहे असें नाहीं. मराठी भाषेचें मार्मिक ज्ञान होण्यास वरील दोघा कवींच्या ग्रंथांचा कांहीं तरी परिचय असणें अवश्य आहे हें सांगायाला नकोच. इंग्रेजी कवींत जसे चॉसर व स्पेन्सर, त्याप्रमाणेंच महाराष्ट्रभाषेच्या संबंधानें वरील दोघे वेदांती कवि होत. मराठीची मूळ भाषा जी प्राकृत, तिचें स्वरूप समजणें हें भाषाज्ञानास फार उपयोगी आहे. तेव्हां या दृष्टीनें पाहतां ही ‘नवनीतां’तली ‘सुधारणा’ कोणाही समंजस मनुष्यास पसंत होण्यासारखी नाहीं. एम्. ए च्या परीक्षेस इंग्रेजींत चॉसरची कविता व संस्कृतांत ऋग्वेद नेमण्याचा काय हेतु आहे, हें जो लक्षांत आणील

त्यास वरील ' सुधारणा ' करणाऱ्या वरील दोघा अधिकाऱ्यांच्या कौत्या नजरेचें नवल वाटल्यावांचून खास राहणार नाहीं. एकादें घर बांधावें आणि आढें तेवढें ठोकायाचें ठेवावें, किंवा देवालय बांधून कळस तेवढा वगळावा, यांत जितपत शहाणपण आहे तितपतच साऱ्या मराठी कवींचा संग्रह करून दोघा वरिष्ठांसच नेमकें गाळण्यांत आहे !

विद्यार्थ्यांची गोष्ट सोडून देऊन, इतर वाचकांच्या संबंधानें जरी विचार केला, तरी त्यांचीही वरील गोष्टीनें लहान हानि झाली आहे असें नाहीं. आमच्या महाराष्ट्रकवींची कविता अगोदर छापून निघाली आहे असें नाहीं. पूर्वी ' सर्वसंग्रह ' कांहीं वर्षें चाललें होतें, पण डायरेक्टर साहेबांनीं एकाएकीं आश्रय तोडल्यावरून, तें पुस्तक पुढें कांहीं दिवस रडत कढत चालून शेवटीं बंद पडलें. हल्लीं दुसरा एक ' संग्रह' निघून त्याच्या द्वारें महाराष्ट्रकवींचा जीर्णोद्धार कांहीं थोडाथोडका होत आहे; पण सरकाराच्या आश्रयाचें नांव नको. ' संग्रह-' कारांनीं केलेल्या विनंतीस नेहेमींचा ठोक शेरा आला, कीं ' तुमच्या पुस्तकाची विद्याखात्यास बिलकुल जरूर नाहीं ! ' इतर कोणी एकादा जुना ग्रंथ स्वतंत्र रीतीनें छापून वरील खात्याकडे आश्रयार्थ पाठविला, तरी वरचाच सरसकट शेरा वांट्याला यावयाचा! सरकाराच्या घरीं वरणी लावायाची म्हटली म्हणजे जेथें तेथें वशिल्याचें काम. कोणा महोपाध्यायाचा कांसोटा जेव्हां बळकट धरावा, तेव्हां आंत यजमानांपर्यंत दाद लागायाची. बरें, विद्याखातें हें मुळींच भिक्षाखातें, तेव्हां इकडे कोठले इतर खात्यांतल्याप्रमाणें सरदारी खर्च चालायाला, असा जर आपण सिद्धांत घेऊन बसलों, तर तोही नीट लागू पडत नाहीं. गवर्नर साहेबांच्या मनांत आलें, कीं तुकाराम हा बरा कवि आहे, याचे ग्रंथ छापून काढा, कीं झाली बडोदेशाई सुरू ! ग्रांट साहेबांच्या कारकीर्दींत इंदुप्रकाश छापखान्याला सुपारी देऊन, जे अभंग बिचाऱ्या ' सर्वसंग्रह-' वाल्यानें पूर्वींच छापले होते, व जे महाराष्ट्र देशांत बुडून जाण्याचा तर, निदान शेंदोनशें वर्षें तरी, संभव नाहीं, ते छापण्याचा कौंसलांतून हुकूम झाला. ज्या बिचाऱ्या

घोंगड्या कवीनें शिवाजी महाराजांचा आदरसत्कार नाकारला, त्याच्या कपाळीं, दोन शतकानंतर, तीच संभावना द्वीपांतरवासी प्रभूच्या हस्तें येऊन, त्याच्या यजंतीच्या प्रीत्यर्थ चोवीस तोडे मोकळे करण्याचा संकल्प सुटला! ही गोष्ट मनांत आली असतां, भर इंग्रेजी राज्यांत किती मोंगलाई चालली आहे हें कोणाच्याही मनांत बिंबल्यावांचून राहणार नाहीं.

तर, वरील बेबंदशाईमुळें ज्या अर्थी आमच्या महाराष्ट्रकवींचें दैन्य फिटण्याचा अद्यापि योग आला नाहीं, व पुढें तरी केव्हां येईल याचा आज कांहींच सुमार करवत नाहीं, त्या अर्थी, साऱ्या मराठी कवितेचें सार ज्यांत आणलेलें आहे, त्या ग्रंथांत तरी साऱ्या प्रसिद्ध कवींचा संग्रह होणें इष्ट होय हें उघड आहे. त्यांतून महाप्रसिद्ध ग्रंथ जो 'ज्ञानेश्वरी,' त्यांत केवळ वेदांतच भरला असून, धादांत्याला त्यांत कांहींच गोड लागण्यासारखें नाहीं असेंही नाहीं. सदरील ग्रंथाची रचना किती प्रौढ आहे, व दृष्टांतानें विषयविवरण करण्याची हातोटी त्यांत किती उत्तम आहे, हें सर्वप्रसिद्धच आहे. पण आमच्या सर्वप्रसिद्ध गोष्टि माजी मराठी ट्रान्सलेटरांस व हल्लीं अधिकारनियुक्त असलेल्या डायरेक्टर साहेबांस काय होत? क्यांडी साहेबांचा असा लौकिक सांगतात, कीं जोंपर्यंत गद्य आहे तोंपर्यंतच कायतें त्यांचें पांडित्य; पद्य आलें कीं तो मग साहेबांचा विषय नव्हे. एकादी ओंवी कां असेना, ती आली कीं लागलींच त्यांचे पंडित गोडबोले यांच्याकडे ती जावयाची! ही ट्रान्सलेटर साहेबांची विद्वत्ता झाली. मेहेरबान चाट्फील्ड साहेब यांची महाराष्ट्रभाषेंत कितीशी निपुणता आहे हें आमच्यानें सांगवत नाहीं; पण महाराष्ट्रकवितेची बहुतकरून त्यांस जानपछानही नसेल असें वाटतें. मग अशी स्थिति असल्यावर, वरील बिचाऱ्या दोघा आरोपींची वरपर्यंत दाद कोण लावतो? ती लागण्याचे दोन तीन मार्ग होते; पण त्यांच्या कमनशिबामुळें त्यांपैकीं एकही त्यांस उपयोगीं पडला नाहीं. एक उपाय तर हा कीं, खुद्द डायरेक्टर साहेबांनीं आह्मीं सुचविलेल्या

गोष्टी ध्यानांत आणणें जरूर होतें; कां कीं, थोडासा विचार केला असता तर त्या त्यांच्याही लक्षांत येऊन चुकत्या. मागील डायरेक्टर हावर्ड साहेब यांनीं मिशनरी लोकांची हाकाटी मुकाट्यानें गुंडाळून ठेवून, मराठी कविता हायस्कुलांतून शिकविण्याची जशी बेलाशक सुरवात केली, त्याप्रमाणेंच साठी उलटून गेलेल्या वृद्ध क्यांडी साहेबांच्या अभिप्रायाकडे त्यांनीं कानाडोळा केला असता, तर मोठीशी चूक झाली असती असें नाहीं. क्यांडी साहेब मोठे पंडित नव्हते, व त्यांच्या समजुतीही ह्मणण्यासारख्या पोक्त नव्हत्या; तेव्हां त्यांनीं वर सांगितलेली 'सुधारणा' करण्याविषयीं जरी सूचना केली असली, तरी तिचा यथार्थ विचार करणें डायरेक्टर साहेबांचें काम होतें. निदान दुसऱ्या कोणाचा सल्ला घेऊन मग तरी येवढा फेरफार करावयाचा होता. हें एक झालें.

दुसरी गोष्ट अशी कीं, ज्या दोघा पंडितांकडे सदरील काम क्यांडी साहेबांनीं सोंपविण्याविषयीं शिफारस केली, त्यांनीं तरी वरील 'सुधारणे'स आडवें येणें अवश्य होतें. जो आपला विषय आहे, व तसें असल्यामुळें ज्यासंबंधानें सरकारानें आपल्याकडे मुकत्यारी दिली आहे, त्यावर आपलें वास्तविक जें काय मत असेल तें कळविणें हा सर्व नियुक्त पुरुषांचा धर्म होय. पण ही गोष्ट प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशकांनीं केली असेल कीं नसेल हें आमच्यानें सांगवत नाहीं. येवढें मात्र आम्हास खास माहीत आहे कीं, इंग्लंडांत जर वरच्यासारखी 'सुधारणा' करण्याविषयीं खुद्द केसर-इ-हिंदच्या मोर्तबानिशीं हुकुम सुटता, तर, लूथर यानें पोपसाहेबांच्या आज्ञापत्रास जितपत मान दिला, तितपतच बहुधा वरील बादशाही हुकुमासही मिळाला असता!

तिसरी गोष्ट ही कीं, वरील फेरफाराची बातमी ऐकून, किंवा निदान तो झालेला पाहून, इकडील वर्तमानपत्रांनीं विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांची कानउघाडी करावयाची होती. पण या शेवटल्या उपायाविषयीं तर बोलायालाही नको. आमची पक्की खात्री

आहे कीं, उद्यां सगळें विद्याखातें जरी बुडालें तरी देखील आमचे बंधु त्याबद्दल हूं कां चूं सुद्धां फार करून करणार नाहींत. मग 'नवनीता' ची नवी आवृत्ति निघाली आहे कीं काय याविषयींतरी कितीकांना खबर असेल ती असो!

'नवनीता' च्या या नवीन आवृत्तीची पुन: दुसरी आवृत्ति निघत आहे असें आह्मीं ऐकिलें आहे. तर या वेळेस तरी आमचे डायरेक्टर साहेबांनीं मेहेरबानी करून महाराष्ट्रभाषेचे आद्यकवींची कांहीं कींव करून, त्यांस सांप्रत जो निवळ अर्धचंद्र मिळाला आहे, त्याविषयींचा कडक हुकूम रद्द करावा, व कोठें एकाद्या कोनाकोपऱ्यांततरी त्यांस जागा द्यावी, अशी सदर कवींच्या तर्फेनें त्यांस आमची विज्ञापना आहे. आतां हें जर त्यांस अवघड वाटेल कीं अनंतफंदीस आह्मी एकदा आंत घेऊन चुकलों आणि ज्ञानोबाला एकदा घालवून दिला असून पुन: घेतला, तर फंदीबोवांची काय तजवीज करावी? तर आमच्या दोघा कुळांच्या तर्फे आह्मी कोर्टास असें समजावितों कीं आणखी शेकडों फंदी जरी आंत सामील केले तरी बद्दल आमच्या भावड्या कुळांकडून कधीं कांहीं तक्रार येईल ची धास्ति नको. शिवाय सध्यांच्या आवृत्तींतील कविसमाज पाहतां तोही कांहीं भावावल्यासारखाच आह्मास दिसतो. नामदेवाला अगदीं पहिल्या जागयावर बसविलें आहे; पण येथें त्यास कसेंसेंच होऊन, तो आपल्या अग्रजाच्या अग्रासनाची विमानना करण्यास अगदीं नाखुष दिसत आहे. त्याप्रमाणेंच पंतांची स्वारी येऊन, ते जों 'नंदन-' त्वाच्या नात्यानें 'वंदन' करून, मग आपलें स्थान पतकरावें अशा बेतानें, सभाग्रभागीं दृष्टि फेंकतात, तों शालजोडीच्या जागीं घोंगडी पाहून भयचकित झालेसे दिसतात! तर हें अब्रम्हण्य दूर झालें असतां, त्यांत सर्वांचीच शोभा राहणारी आहे असें आम्हास वाटतें.

# लार्ड बेकन.

[ केसरी, ता० १ फेब्रुवारी १८८१ ]

'लॉर्ड बेकन याचें चरित्र व त्यानें केलेल्या ग्रंथांचें वर्णन' या नांवाचें एक लहानसें पुस्तक, रा० गोविंद नारायण काणे यांनीं नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. तें त्यांनीं आमच्याकडे अभिप्रायास्तव पाठविल्यावरून, त्यावर आम्ही आपलें मत या अंकांत प्रसिद्ध करतों.

ग्रंथकारानें प्रस्तुत पुस्तकाचे चार भाग केले आहेत. ते येणेंप्रमाणें:—( १ ) आयुष्यवर्णन, ( २ ) युरोपीय तत्त्वज्ञानाचा मूळापासून तों बेकनचे काळापर्यंत संक्षिप्त वृत्तांत, ( ३ ) बेकन् याची तत्वज्ञ मंडळींत योग्यता, व ( ४ ) बेकन्च्या ग्रंथांचें संक्षिप्त वर्णन. शेवटीं एक परिशिष्ट जोडलेलें आहे; त्यांत प्रस्तुत ग्रंथकाराच्या निबंधापैकीं चार निबंधांचें भाषांतर दिलें आहे.

प्रस्तुत ग्रंथावर ग्रंथोत्तेजक मंडळीचा छाप आहे. हें येथें सांगण्याचें कारण असें कीं, वरील उल्लेख अग्रभागीं करण्याचें तात्पर्य काय, चांगलेंसें आमच्या लक्षांत येत नाहीं. 'हा ग्रंथ मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीनें पसंत केला आहे' म्हणजे काय समजावें? वरील 'मंडळीं' कोणत्या व्यक्तींचा अंतर्भाव करावयाचा? ग्रंथारंभीं पहावें तों 'गोपाळराव हरि देशमुख' या सहीची एक लहानशी शिफारस मात्र आढळते. ही शिफारस आहे मुळीं इंग्रजींत, व तिचा एकंदर घाट पाहतां, 'छोटी सही कीं बडी सही' असें शिरस्तेदारास विचारून विलायती कोंबडें कागदावर उठवून देणाऱ्या एकाद्या बड्या ऑफिसराच्यासारखा दिसतो आहे. आपल्या अज्ञान देशबंधूंस त्यांच्या जन्मभाषेच्या द्वारें ज्ञानप्राप्ति करून द्यावयाची म्हणून मुळीं आपल्या आनरेबल साहेबांचा उद्योग, आणि ग्रंथावर त्यांचा शिक्का पाहावा तों इंग्रेजी!! हा शिक्का समजण्यापुरती जर बिचाऱ्या वाचकांस अक्कल असेल, तर मग ग्रंथोत्तेजक मंडळीचीच मुळीं काय जरूर आहे? व रा० काणे यांची येवढी खटपटही सगळी फुकटच नव्हे काय? ज्यास इंग्रजी येतें

आहे, तो खुशाल चार आठ आणे खर्चून मेकॉलेकृत अगर दुसऱ्या कोणीं केलेलें एकादें बेकन्‌चें चरित्र कोठेंही घेईल, व आपली जिज्ञासा तृप्त करील ! असो; सदरील मंडळीच्या संबंधानें आम्हास पुढें मागें एकदा सविस्तर लिहावयाचेंच आहे, यास्तव तूर्त येवढाच उल्लेख बस आहे.

ग्रंथाची परीक्षा जी करावयाची ती दोन प्रकारांनीं; एक त्याच्या बाह्यस्वरूपावरून व एक अंतःस्वरूपावरून. बाह्यस्वरूप म्हणजे सुंदर वेष्टन, सुंदर ठसे वगैरे नव्हे. या बाह्यस्वरूपाचेही पुष्कळ चाहते असतात खरे; व पुस्तकालय म्हणजे एक मिजाशीचें कलम; याच्या पलीकडे ज्यांच्या बुद्धीचा प्रवेश झालेला नाहीं, त्यांची नजर, बांधणी व छापणी यांच्यापर्यंतच पोंचणार हें उघड आहे. पण आमचें बोलणें या बाह्यस्वरूपाच्या संबंधानें नव्हे. ग्रंथाचें बाह्यस्वरूप म्हणजे त्याची भाषापद्धति होय. ही पद्धति अगोदर शुद्ध असावी; म्हणजे व्याकरणास, रूढीस, व सभ्यतेस अनुसरून ती असावी. अशुद्ध प्रयोग, परभाषेची भेसळ, व अश्लीलत्व हे प्रकार तींत नसावे. शिवाय विषयाच्या योग्यतेप्रमाणेंही ती असावी; म्हणजे प्रौढ विषयास प्रौढ, हलक्या विषयास हलकी, अशी अनुरूपताही तींत असणें अवश्य आहे. हें बाह्य स्वरूपाविषयीं झालें. अंतःस्वरूपाच्या संबंधानें ग्रंथांतील गुण म्हटले म्हणजे विषयाची यथास्थित मांडणी, त्याचें सुबोध व मनोरम रीतीनें विवेचन, व त्याचा यथार्थ ऊहापोह, हे होत.

आतां रा० काणे यांच्या पुस्तकाविषयीं वरील दोन्ही रीतींनीं विचार करतां, त्यांतील भाषापद्धति प्रायः व्याकरणशुद्ध आहे खरी, तरी नवीन विद्वानांच्या नूतन ग्रंथरचनेंत बहुधा आढळणारा जो भाषादूषणाचा दोष, तो त्यांत ठिकठिकाणीं बराच आढळतो. एरवीं त्यांची लिहिण्याची सफाई सदरील ग्रंथावरून बरी दिसून येते, व ग्रंथरचनेचा क्रम त्यांनीं पुढें चालविल्यास त्यांच्या हातून ज्ञानवृद्धीच्या कामाला पुष्कळ साहाय्य होण्याजोगें आहे.

खुद्द ग्रंथाविषयींच विचार केला, तर तो एतद्देशीय वाचकांस म्ह-

णजे ज्यांस इंग्रेजीची माहिती नाहीं व इतिहास वगैरे अवगत नाहीं, त्यांस मोठासा गोड लागेल असें आह्मास वाटत नाहीं. आमच्या लोकांस युरोपच्या इतिहासाचें ज्ञान अद्यापि सामान्य प्रकारचें-सुद्धां नाहीं. प्राचीन राष्ट्रें, ग्रीस व रोम, यांचे इतिहास येवढे मनोरम असतां व इंग्लंडाचा इतिहास तर आह्मास येवढा उपयोगाचा असतां, त्याविषयीं कोणी देशभाषेच्या द्वारें कांहीं माहिती करून घेईन ह्मणेल तर अद्यापि मुळींच सोय नाहीं. कधीं त्रेतायुगांत 'ज्ञानप्रसारकां'त कांहीं ग्रीसदेशाचा इतिहास आलेला आहे. जांभेकर यांनीं 'इंग्लंडाच्या बखरी'चा एक भाग करून ठेवला आहे, तसाच दुसऱ्या कोणी एकानें एक पुरातन 'जगाचा संक्षिप्त इतिहास' कधीं काळीं करून ठेवला आहे, त्यावर आज वीसपंचवीस वर्षांत कांहीं हालचाल नाहीं. नवी सुरू नाहीं, व जुनीचा मागमूसही नाहीं; अशी कांहीं मौजेची स्थिति आज दृष्टीस पडत आहे. असो; तर असें असल्यामुळें एलिझाबेथ राणी कोण व एसेक्स कोण, हें वाचकांस काय समजणार? त्याप्रमाणेंच प्रस्तुत ग्रंथकारानें अगदीं जुन्या तत्ववेत्त्यांपासून तों थेट ऑगस्ट कॉन्ट याच्यापर्यंत रीग आणून पोंचविली आहे, पण उपयोग काय? प्रस्तुतच्यासारखे ग्रंथ लोकांस समजण्यास एकतर अवांतर इतिहासादि ग्रंथ पुष्कळ झालेले पाहिजेत, किंवा ग्रंथकारानें तरी वरील साधनांच्या अभावीं आपला विषय पुष्कळ सविस्तर रीतीनें लिहिला पाहिजे. सदरील पुस्तकांत बेकनूचें चरित्र अवध्या वीस पृष्ठांत आटपून टाकलें आहे, तें उपयोगी नाहीं. एरवीं बेकनूचें चरित्र हा विषय कांहीं वाईट नाहीं. त्यावर यथास्थित विवेचन केलें असतां, मेकॉले साहेबांचा इंग्रजींतील निबंध जसा चित्तवेधक झाला आहे तसाच तो मराठींतही होण्याजोगा आहे. बेकनूची विशाल बुद्धि, त्यानें पाडलेल्या नवीन प्रवृत्तीचा आज चोहोंकडे दृष्टीस पडणारा अद्भुत प्रभाव, एलिझाबेथराणीची कारकीर्द, बेकनचा उत्कर्ष व अपकर्ष, त्याचा हांजी हांजी करावयाचा स्वभाव, वगैरे अनेक गोष्टींविषयीं किती शानदार मज-

कूर येण्यासारखा आहे! तर सध्यांचा छोटेखानी थाट सोडून, मेकॉलेकृत निबंधाच्या नमुन्यावर सविस्तर ग्रंथरचना करण्याविषयीं प्रस्तुत ग्रंथकारास सूचना करून त्याचा निरोप घेतों.

---

## ज्याचा त्याचा ब्राह्मणावर कटाक्ष.

[ केसरी तारीख १५ मार्च १८८१. ]

अलीकडे असें झालें आहे कीं, ज्यानें उठावें त्यानें ब्राम्हणांवर हत्यार धरावें. विश्वास घातकी, राजद्रोही, आपमतलबी, कपटी, कारस्थानी, अट्टल चोर ह्मणजे ब्राम्हण!! ठीकच आहे; "पिंजऱ्यामध्यें व्याघ्र सांपडे, बायकामुलें मारिती खडे." त्यांचें राज्य नष्ट होऊन, ते धुळीस मिळाले आहेत, तेव्हां आतां कोणीं कांहीं म्हटलें तरी चालण्याजोगें आहे. ते राज्यसुखाचा अनुभव घेत असतां, व सर्व जातींवर त्यांचा पगडा चालू असतां, अशीं दूषणें त्यांस कोणाच्यानें-तरी देववलीं असतीं काय? अधिकाराचा महिमा मोठा विलक्षण आहे. अधिकारारूढ अशा, भेकड, नीच, दुष्ट आणि लोभी मनुष्यास देखील शूर, कुलीन, दयालु आणि उदार अशीं विशेषणें प्राप्त होतात; आणि अधिकारभ्रष्ट कितीही मोठा असला, तरी तो यःकश्चित् वाटूं लागतो. ही जनरूढि जो नेहमीं मनांत बाळगील, त्याला ब्राम्हणांवर येणारीं दूषणें पाहून अचंबा वाटणार नाहीं. हें सर्व जरी स्वाभाविक आहे, तरी स्वभावाला कांहीं औषध नाहीं असें म्हणून स्वस्थ बसतां कामा नये. आजपर्यंत हीं दूषणें बिनबोलतां ऐकून घेतल्यानें आमचा आमच्यावरच वाईट परिणाम होऊं लागला आहे. अन्य हिंदू जातींनीं किंवा अन्यद्वीपस्थ लोकांनीं ब्राम्हणांचा हेवा करावा ही गोष्ट संभवनीय आहे. पण ब्राम्हणा ब्राम्हणांनींच एकमेकांचीं उणीं बाहेर काढण्यास प्रवृत्त व्हावें, हें किती विलक्षण!! इतकेंच नाहीं, अलीकडे ज्याचा त्यालाच वीट येऊं लागला आहे. ज्याप्रमाणें एखाद्या शाहण्या मनुष्याला चार चौघा चटोर थट्टेखोरांनीं वेडा वेडा म्हणून चोहींकडून वेढून टाकिलें असतां, त्या बिचाऱ्याची भ्रांति नष्ट होऊन,

तो आपणास वेडा समजूं लागतो, व खरोखरींच वेडावून जातो, त्याप्रमाणेंच पाजी म्हणून घेतां घेतां, ब्राम्हणांला ब्राम्हण पाजी वाटूं लागले; इतकेंच नाहीं, तर कित्येकांना आपल्या ब्राह्मणजन्माचाच धिक्कार वाटूं लागून, आपण शार्मण्य किंवा आंग्लभौम मातापितरांच्या उदरीं आलों असतों, तर मोठीः बहार झाली असती, अशी निंद्य व असंभवनीय कल्पना कित्येकांच्या शुष्क अंतःकरणांत वास करूं लागली आहे! ही कल्पना मूळासुद्धां आतांच उपटून टाकण्याचा प्रयत्न केला नाहीं, तर हिचा लवकरच मोठा वृक्ष बनून जाऊन, त्याच्या विषतुल्य कटुफलांचा उपभोग पुढल्या पिढ्यांना घ्यावा लागेल. यास्तव तिचा प्रतिकार करणें अवश्य आहे.

ब्राह्मणांमध्यें इतर जातींपेक्षां किंवा इतर लोकांपेक्षां एकादा वाईट गुण अधिक असेल, पण ह्यामुळें ते अशा सार्वजनिक निंदेस व तिरस्कारास पात्र झाले आहेत, असें आम्हास बिलकुल वाटत नाहीं. इतर जातींप्रमाणें व इतर लोकांप्रमाणेंच ब्राम्हण हे लोक होत. त्यांना जें वर्चस्व प्राप्त झालें, तें त्यांच्या करामतीमु आपल्या सभोंवतीं धर्मासंबंधीं आणि व्यवहारसंबंधीं ज्या शेक उलथापालथी नित्य घडून येत आहेत, व विचार न करणाऱ्यां ज्या आकस्मिक आणि निष्कारण वाटतात, त्यांचेंच चांगल्या रीती पर्यालोचन केलें, तर आपणास असें दिसून येईल कीं, आरंभापासून आज तारखेपर्यंत सृष्टींत घडून आलेल्या गोष्टी परस्परांशीं कार्यकारणबंधानें गच्च खिळून गेल्या आहेत. यावरून पाहतां, त्यांस जें वर्चस्व प्राप्त झालें तें निष्कारण नव्हते. हें वर्चस्व दोन प्रकारचें; पहिलें धर्मसंबंधी, दुसरें राज्यसंबंधी. प्रथम धर्मसंबंधानें त्यांनीं आपला जो अंमल चालविला, त्याबद्दल ते दोषास पात्र आहेत कीं काय, हें पाहूं. मागचा पुढचा विचार न करितां, सकृद्दर्शनीं आपल्या धर्मामुळेंच आपणास हवें तसें वागतां येत नाहीं, असें वाटून, संतापानें हिंदुधर्माची सर्वथैव विटंबना करण्यास निघालेले जाडे विद्वान, दुर्दैवानें, आज काल, या देशांत कित्येक सोम-

अश्या घालण्यापुरते सांपडतील ! ! या तापट व दांडग्या बाळ्यांच्या विचारांचें, आणि सूक्ष्म व शांत अशा ऐतिहासिक दृष्टीनें वस्तूंचें पर्यवलोकन करून निर्माण झालेल्या विवेकांचें, सापामुंगुसाच्या वांकड्याप्रमाणें हाडवैर आहे. अमुक वेळीं अमुक एका वर्गाचें वर्चस्व कां झालें, तें पुष्कळ वर्षे कां चाललें, त्याचा ऱ्हास होण्यास काय कारणें झालीं, त्या ऱ्हासाचा इतर वस्तूंवर काय परिणाम झाला वगैरे गोष्टींची चर्चा विचारानें करून, त्यांतील कार्यकारणाचें दावें शोधून काढणें, हा एक प्रकार; व आपणास मन मानेल त्याप्रमाणें वागण्यास सांपडत नाहीं, यासाठीं वस्तुस्थितीवर रागावणें, हा दुसरा गांवढळ प्रकार. इतर जातींवर असलेल्या ब्राम्हणांच्या वर्चस्वाची तर काय कथा? ज्यांना युरोपखंडाचा इतिहास यत्किंचित् माहीत असेल, त्यांना इतालीच्या पोपांनीं सर्व युरोपखंड एका करांगुलीवर कसें धरलें होतें हें माहित असेल. युरोपांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणाऱ्यांस रोमन लोकांपासून व रोमन लोकांचा ऱ्हास होण्यास कारणीभूत झालेले, उत्तर युरोपांतील मूळचे, जर्मनी शाखचे, ह्रीन्डाल, गाथ्स, विसीगाथ्स वगैरे रानटी- लोक यांपासून किती त्रास व पीडा सोसावी लागली, पण या सर्वांस न जुमानतां, त्यांनीं आपल्या इष्ट कृत्यावर नजर देऊन बेताबेतानें आपली छाप कशी बसविली हें फार फार ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. ज्यांस शहाणपण व सामर्थ्य आहे, त्यांना दुसऱ्यांवर आपलें वर्चस्व बसवावेंसें वाटतें, व त्यांस तें बसवितांही येतें. असें होते ह्मणून, ज्यांस दुसऱ्याच्या वर्चस्वापासून भोगावें लागतें, त्यांनीं त्यांवर विनाकारण शिव्या हासडण्यांत कांहीं हशील नाहीं, किंवा पोकळ संतापून जाण्यांत कांही फायदा नाहीं. अशानें वर्चस्वाचा पेंच सुटेल असें नाहीं. पेंच सुटण्यास योग्य उपाय म्हटला ह्मणजे ज्यांना त्या पेंचानें रग लागली असेल, त्यांनीं शहाणपण शिकावें व सामर्थ्य संपादावें, व दिवसा उजेडीं त्यांच्याशीं दोन हात मारून व त्यांच्यावर चढ करून, त्यांच्या हातून निसटून जावें. हा कोणाच्याही जुलमापासून सुटण्याचा राजमार्ग. बायकां

प्रमाणें टिपें गाळणें, किंवा मूर्खाप्रमाणें शिव्या देणें, याच्या योगानें कोणाचीच देखील निष्पत्ति होत नाहीं. ज्यांस ब्राह्मणांचें धर्मवर्चस्व रुचत नसेल, ज्यांना ब्राह्मण धर्म संमत नसेल, त्यांनीं खुशालपणें नवे धर्म स्थापावे, व इतरांचें अनुकरण करावें. ब्राम्हण धर्माला शिव्या दिल्यानें, तो ज्यांना आवडत आहे, तें तो सोडतील असा अर्थ नाहीं. मात्र तोंडाच्या पोकळ वटवटीचा परिणाम इतकाच व्हावयाचा कीं, दोघेही बळकट वर्दळीला येऊन, उभयतांत रणें पडावयाचीं, व दोघां-च्याही संसारसुखाची होळी व्हावयाची !! युरोपखंडांत रोमीश पोपांचें बंड फार माजून जाऊन, क्याथोलिक धर्मांत ज्या वेळेस पराकाष्ठेची बजबजपुरी होऊन गेली, त्या वेळेस लूथरप्रभृति नवीन पंथाच्या मंडळीनें जुन्या धर्माच्या नांवानें व्यर्थ खडे फोडण्याचा क्रम न चालवितां, त्यांस योग्य वाटणाऱ्या मतांप्रमाणें नवीन धर्माची संस्थापना करण्याचा निश्चय करून, तसा घाट घडवून आणण्यासाठीं जीव देण्याची देखील तयारी केली व इष्ट हेतु तडीस नेण्यासाठीं कंबर बांधून दुसऱ्यांची मनवळवणी केली. असा प्रकार जर घडलेला डोळ्यांपुढें आहे तर ब्राह्मणांच्या वर्चस्वाबद्दल त्यांची नुसती निंदा व द्वेष करण्यांत अर्थ काय ?

[ केसरी ता० २२ मार्च १८८१ ]

मागल्या अंकांत ब्राह्मणांच्या धर्मसंबंधीं वर्चस्वाविषयीं बहु-तेक लिहिण्यांत आलें. तथापि या मुद्याचा विचार करीत असतां, एक गोष्ट सांगावयाची राहिली. ती अशी कीं, ब्राह्मणधर्माचा सार्व-जनिक प्रसार करण्यासाठीं ब्राम्हण लोकांनीं जे उपाय योजिले, ते इतर धर्मप्रसारकांच्या उपायांप्रमाणें राक्षसी नव्हते. ख्रिस्तभक्तांनीं लिहिलेलें कोणतेंही पुस्तक घ्या; त्यांत महंमदी धर्माला दहापांच ठिकाणीं दोष दिला नाहीं, असें व्हावयाचेंच नाहीं. एका हातांत कु-राण आणि एका हातांत तलवार धरून मुसलमानांनीं इस्लामाचा झेंडा जिकडे तिकडे नाचविला ही गोष्ट जगत्प्रसिद्ध आहे, व कोणी-ही सत्याभिमानी मनुष्य तिच्यावर पांघरूण घालणार नाहीं. परंतु पृ-

थ्वीवरील सर्व मनुष्यें आकाशांतील बापाचीं लेंकरें, असें पढविणाऱ्या ख्रिस्ती धर्मांतच जेव्हां दुफळी झाली, तेव्हां क्याथोलिक बाळांनीं प्राटेस्टंट बाळांची जी कत्तल उडविली, तिचा इतिहास वाचून ख्रिस्ती धर्माविषयीं अश्रद्धा आणि तिरस्कार उत्पन्न होतात; इतकेंच नाहीं, तर धर्मतत्व मनुष्याच्या अकलेच्या बाहेर आहे, व तें आपणास गवसलें असें ह्मणणारे सर्वच महामूर्ख, असा बुद्धीचा घट्ट ग्रह होतो. हें एक असू द्या; ख्रिस्ती लोकांनीं यहुदी लोकांचा तरी किती छळ केला? राजनिष्ठा प्रदर्शित करण्यासाठीं आलेल्या यहुदी लोकांच्या माना कापून, त्यांच्या रक्ताचे टिळे कित्येक इंग्रजी राजांनीं राज्याभिषेकाच्या दिवशीं आपल्या कपाळीं लाविले! या गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत. अझूनतरी रोमन क्याथोलिक आणि प्राटेस्टंट ग्रंथांत केवढा वाद सुरू आहे! परवां परवांपर्यंत क्याथोलिक लोकांना इंग्रजी पार्लमेन्ट सभेंत बसण्याची परवानगी नव्हती. राज्यांतील मोठमोठ्या हुद्यांच्या जागा क्याथोलिक लोकांस न मिळण्याबद्दल केलेल्या कायद्यांचीं जुनीं भेंडुळीं इंग्रजी दप्तरांत अझून सांपडतील. पण हें सिद्ध करण्यास फार दूर जाणें नलगे. आपले सध्यांचे गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन साहेब क्याथोलिक धर्माचे आहेत. इंग्रजी कायद्याप्रमाणें इंग्लडाचा राजा अथवा राणी प्रॉटेस्टंट धर्मानुयायी पाहिजे. या नियमाला अनुसरून, इंग्लडाच्या राजाचें प्रतिनिधित्व ज्याचेकडे येईल तोही प्रॉटेस्टंट धर्माचा पाहिजे, असा सहज प्रश्न, लॉर्ड रिपन यांस हिंदुस्थानांत प्रतिनिधित्व मिळाल्यावर, खरोखरींच निघाला. व मुख्य प्रधान मि० ग्लाडस्टन यांस प्रॉटेस्टंट धर्माभिमान्यांनीं चोहोंकडून कावकाव करून सोडिलें. आतां, त्या हुशार, पोक्त व दूरदृष्टि, शहाण्या ह्मातान्यानें या वितंडवाद्यांचीं तोंडें कशींतरी दाबून धरिलीं ही गोष्ट वेगळी. पण इंग्लंडासारख्या सुधारलेल्या देशांत एकोणीसाव्या शतकाच्या शेवटल्या पंचविशींतला हा धर्मसमजुतीचा प्रकार! असा एखादा धर्मविषयक तंटा पूर्वेकडील लोकांत झाला, तर बायबलभक्त पूर्वाल्यांच्या डोक्यावर

रानटीपणाचें खापर फोडितात, हें पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं? आह्माला असें वाटतें कीं, धर्मसंबंधानें सगळेच अंध होत, किंवा सगळेच धर्म मृगजळाप्रमाणें ज्याला त्याला चकवितात. कांहीं-हीं असो, एवढी गोष्ट खरी आहे कीं, इतर धर्मांप्रमाणें ब्राम्हण— धर्म गळेकापू नाहीं, व बरगड्यांत खंजीर खुपसून त्यामुळें झालेल्या भोंकांत वेदाच्या पुस्तकाला खिडकी करून देण्याची खटपट त्यानें कधीं केल्याबद्दल आम्हीं ऐकिलें नाहीं. आपला धर्म पवित्र व शुद्ध, व इतर धर्मांच्या लोकांनीं त्याचा अंगीकार केल्यानें त्याची पूति कमी होते, अशी आमची समजूत; असें असल्यावर, दुसऱ्याची हत्या करून, त्याच्या गळ्यांत आपल्या धर्माचें लोंढणें अडकविण्याचें काम आम्हास कसें मानवणार? यावरून एक गोष्ट सिद्ध होते; ती ही कीं, ब्राम्हणांनीं धर्मवर्चस्व मिळविलें, तें माना कापून नव्हे, तर शुद्ध मनवळवणीनें. व कोणतींही मतें लोकांत पसरविण्याचा योग्य मार्ग म्हटला तर एवढाच दिसतो. यासाठीं केवळ सामोपचारानें संपादिलेल्या धर्मसत्तेबद्दल ब्राम्हणांस दोष देणाऱ्यांचें वायकळ बोलणें आह्मास अगदीं ऐकावेंसें वाटत नाहीं.

दुसरें, एक राजकीय वर्चस्वाच्या संबंधानें ब्राह्मण लोकांवर मोठें किटाळ येत असतें. या संबंधानें एकदोन शब्द लिहून, हा लेख पुरा करावा असा आमचा हेतु आहे. ब्राह्मणांचें मुख्य काम म्हटले ह्मणजे, वेद घोकण्याचें व श्राद्धें झोडण्याचें; त्या लबाडांनीं तें सगळें टाकून, विद्येचें यच्चावत् भांडार आपल्या हाताखालीं घालून दिलें, व दुसऱ्या जातींस अज्ञानाच्या अंधरांत चांचपत ठेंचा खाण्यास लाविलें, व नाहीं नाहीं तीं कपटें करून महाराष्ट्र राजघराण्याकडून राज्यसत्ता हिरावून घेतली व सरते शेवटीं ती आपणास व त्यांस नाहींशी करून तिसऱ्याच्याच घरांत नेऊन घातली. असा गुन्हा वारंवार ब्राह्मणांवर लादण्यांत येत असतो. याच्या शाबितीसाठीं ब्राह्मणद्वेषी परदेशीयांनीं व तदनुयायी एतद्देशीयांनींही अतोनात खटपट केली आहे. यांतून ब्राह्मणांची सुटका करणें तर कित्येकांस बहुधा दुरापास्त

दिसतें. पण ब्राह्मणांनीं असें केलें हें निदान आम्हास तरी स्वाभाविक वाटतें. असें ते न करिते तर मात्र त्यांनीं मनुष्यस्वभावाला व इतिहासशास्त्राला बट्टा आणिला असता. पहा कीं, शहाणपणा अंगीं असल्यावर त्याच्यापासून आपलें हित करून घेण्याचा कोण प्रयत्न करीत नाहीं ? एकाच्या अज्ञानामुळें होणारा लाभ दुसऱ्यांनीं मिळविला नाहीं, असें कोठें झालें आहे ? धर्माची किल्ली एकदा हातीं सांपडून, लोकांचीं मनें वश करून घेतां आल्यावर, धर्माधिकाऱ्यांनीं हरएक प्रकारचा अंमल त्यांच्यावर चालविण्याची खटपट केल्याचीं उदाहरणें प्रत्येक देशाच्या इतिहासांत सांपडतात. या साधारण नियमास ब्राह्मणच कोठून अपवाद होतील ? अझूनपर्यंततरी "बळी तो कानपिळी" अशीच जगाची राहटी आहे.

असें नसतें तर पृथ्वीवरील सगळेच देश आज स्वतंत्र असते. पण दुर्दैवानें असें नाहीं. धर्मांत, व्यहरांत आणि राज्याधिकारांत सर्वांचें एकमेकाशीं सारखें कंदन चाललें आहे. बडा मासा छोट्या माशास गिळण्याचा सदा प्रयत्न करीत असतो. यासाठीं, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, बड्या माशाच्या नांवानें वृथा रड गात बसून कांहीं फायदा नाहीं. त्याची भीति नाहींशी करण्यास एकच उपाय; आणि तो,छोट्या मंडळीनें कट करून बड्यांशीं सामना करण्याचा. सुदैवानें सर्व वर्णांस सम दृष्टीनें वागविणारें कनवाळु सरकार अपणास मिळालें आहे; तसेंच नशीबानें त्याचा थोडा बहुत डोळाही ब्राह्मणांवर आहे. यासाठीं ब्राह्मणांचा अभ्युदय न साहणाऱ्यांस आमची सूचना आहे कीं, त्यांनीं ब्राह्मणांच्या वर्चस्वाचें जूं झुगारून देण्याचा हा अमोलिक प्रसंग दवडूं नये. इतकेंच परमेश्वराच्या कृपनें न होवो कीं, दोन बोक्यांच्या तंट्यांत सगळाच खवा भांडण मिटविणाऱ्या कार्यसाधु वानराच्या तोंडांत पडावा. पण सध्यां आह्मांत ज्या फळ्या होऊं लागल्या आहेत, त्यांवरून, सगळ्या जाति मोडून जाऊन, त्यांच्या दोन होतीलसें वाटतें; एक इंग्रजी ब्राह्मण आंग्लभौम शाखेचे; दुसरी जात पहिल्या जातीच्या अंकित—सगळ्या भारतीय जातींच्या मिश्रणानें झालेली. हाच परि-

णाम खास होईल असें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. तरी पण हा किंवा दुसरा कोणता तरी परिणाम लागेपर्यंत, ब्राह्मण, ज्यांनीं राज्यें मिळविलीं व चालविलीं, व ज्याबद्दल त्यांना दुःखाचा चटका लागणें अगदीं साहजिक आहे, असे ब्राह्मण, आपलें सरकार व इतर जाति-कांहींही करोत, पूर्वापार आपणाकडे चालत आलेलें वर्चस्व सोडतांना फडफड केल्याशिवाय राहणार नाहींत.

---

# आमच्या देशांतील सभा व मंडळ्या.

[ केसरी, तारीख २२ मार्च १८८१ ]

या देशांत इंग्रजी विद्येचा फैलावा होऊं लागून, आमच्या पाश्चात्य राज्यकर्त्यांची थोरवी जेव्हां आमच्या लक्षांत येऊं लागली, तेव्हांपासून त्यांच्या कृतीचें अनुकरण करण्याची इच्छा आम्हामध्यें साहजिकपणेंच उद्भवली. या अनुकरणाचेंच फळ, आमच्या देशांत आज पांचपन्नास वर्षांत ज्या सभा व मंडळ्या उत्पन्न झाल्या, त्या होत. कलकत्यास राजाराम मोहनराय यानें काढलेल्या ब्रम्हसमाजापासून तों परवां निघून इतक्यांतच निकृष्ट दशेस येऊन ठेपलेल्या येथील क्रीडाभुवनापर्यंत, कोणत्याही लौकिक कृत्याचें मूळ पाहिलें, तर तें वरीलच आढळेल. अनुकरण ही मनुष्यस्वभावाच्या नैसर्गिक प्रवृत्तीपैकींच एक असल्यामुळें, वरील प्रकार पाश्चात्यांच्या समागमानें उत्पन्न झाले यांत कांहीं नवल नाहीं. तसेच वरील सभादिकांपासून जितकें व्हावें तितकें कार्य जरी अद्याप झालें नाहीं व होत नाहीं, तरी इतक्या कल्पना लोकांच्या मनांत नव्या ठसल्या, इतका तरी निदान त्यांच्यापासून उपयोग झाला असें म्हणणें भाग आहे. लौकिक हितासंबंधानें बहुधा कोणतीच हालचाल आजपर्यंत जी मुळीं होत नसे, ती स्थिति जाऊन, लोकांस आज इतकें तरी कळूं लागलें, व आपणास देशाच्या हितासंबंधानें कांहीं उद्योग करणें अवश्य आहे, नुसती आपली व आपल्या कुटुंबांच्या निर्वाहाची तजवीज केली म्हणजे कृतकृत्यता

झाली असें नाहीं, इतकें वाटूं लागलें तरी थोडें नाहीं. वरील औदास्याची स्थिति आज शेकडों वर्षे आमच्या हाडामांसास खिळलेली होती, असें ह्मटलें असतां चालेल. तेव्हां ही बधिरता मोडून, मूळचा रुधिराभिसरणव्यापार पूर्ववत् आमच्या राष्ट्ररूप शरीरांत चालू झाला हें लहानसान कार्य झालें असें नाहीं.

त्यांतून, गेल्या दशकांत ह्मणजे सन १८७० पासून १८८० पावेतों, पुष्कळच नव्या नव्या गोष्टी सुरू झाल्या, व लोकांत देशहिताच्या संबंधाची बरीच चवचळ होऊं लागली. सार्वजनिकसभा, वक्तृत्वोत्तेजक मंडळ्या, स्वदेशी दुकानें, लवाद कोर्टें वगैरे कित्येक प्रकार पूर्वी नसलेले उदयास आले; निदान कित्येकांचा उत्कर्षतरी वरील दशकांत विशेष झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. पत्रें, मासिक पुस्तकें व ग्रंथ यांचीही रेलचेल होत चालली आहे. आतां हें खरें आहे कीं, आज पांचपंचवीस वर्षांत इकडे जितका इंग्रजी विद्येचा फैलाव झाला, त्याच्या मानानें पाहतां, व आमच्या लोकांच्या बुद्धिमत्तेचा व कर्तृत्वाचा विचार केला असतां, आजला एकंदर देशाचें जितकें पाऊल पुढें पडायाला पाहिजे होतें, तितकें अझून मुळींच पडलें नाहीं. तसेंच पुनर्विवाह, स्वदेशी व्यापार वगैरे प्रचंड उद्योगांपसून तों मासिक भोजनें, क्रीडाभुवनें यांच्यासारख्या छोटेखानी उद्योगांपर्यंत पाहतां, 'तेरड्याचा रंग तीन दिवस' 'सरड्याची धाव कुपणापर्यंत,' 'आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः' या वचनांचीच वारंवार उजळणी होते! तरी ज्या अर्थी ही परद्वीपची सुधारणा आमच्या देशांत नुकतीच संचार करूं लागली आहे, त्या अर्थी पहिले पहिले प्रयत्न कितीही निष्फळ झाले, तरी त्यांकडे विशेष कडक नजर पुरवितां येत नाहीं, एवढें आरंभीं सांगून ठेवणें अवश्य आहे.

आतां या खेपेस आह्मी ज्या विषयाचें विवेचन करणार आहों तो असा आहे कीं, आमच्या देशांत सभा, मंडळ्या, समाज वगैरे अनेक प्रकारच्या उद्योगांची उभारणी झाली असतां व प्रत्येक वर्षी कांहीं ना

कांहीं तरी नवा आरंभ होत असतां, आमची लवकरच मजल खचते व लोकोपहास्यतेला बहुधा कारण होतें, असें कां व्हावें? इतर देशांत पर्वतप्राय उद्योग जर शेंकडों वर्षें निभतात, तर येथेंच त्यांस मरगळ कां यावी? विलायतेंत पांचपन्नास व्यापाऱ्यांनीं मिळून एक कंपनी काढावी, आणि शेंदोनशें वर्षांत तिनें या देशीं असें राज्य कमवावें कीं त्यांचा स्वतांचा देश याच्या पासंगाला देखील पुरावयाचा नाहीं, ही केवढी अजब गोष्ट आहे! तशाच दुसऱ्या कांहीं मंडळ्या निघाव्या आणि त्यांनीं साऱ्या भरतखंडाला लोहशृंखळांनीं जखडून टाकून, नलराजाच्या रथाच्या वेशानें, त्यांवरून आपले अपूर्व रथ धावडावे, आणि डोंगराला न मोजतां, दर्याला न जुमानतां, मोठमोठ्या नद्यांची पर्वा न बाळगतां, खुशाल कोड्यवधि रुपये नासून, देशाच्या या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत सारखा हमरस्ता करून द्यावा, हें काय गौडबंगाल आहे बरें! पण तेच आमच्या देशाकडे वळा, आणि येथील एकेक मौज पहा. फक्त जेवणाचें काम, महिन्यांतून एकदा पांचपंचवीस मंडळीनें एके ठिकाणीं जमावयाचें, आणि साहा आणे वर्गणी देऊन सहभोजनाचा सोहळा करावयाचा; पण तेंसुद्धां आमच्या मंडळीस झेपलें नाहीं! दहाबारादा आर्यजननीच्या नांवानें मासिक निवृत्ति झाली असेल कीं नसेल, कोण जाणे? आटपला कारखाना! हीतरी कांहीं वर्षांमागची हकीगत; नुकती ताजी हकीगत पाहिजे असल्यास क्रीडाभुवनाची आहे. आमच्या दूरदूरच्या वाचकांपर्यंत वरील भुवनाची अद्याप वार्ताही गेली नसेल. यास्तव त्यांच्या माहितीकरतां येथें इतकें कळविणें अवश्य आहे कीं, येथील पुढारी मंडळीनें, शहरांतल्या शहरांतच एक बरीच मोठी जागा भाड्यानें घेऊन, ती कांहीं दिवस खपून नीटनेटकी केली, आणि गेल्या जान्युवारीच्या पहिल्या तारखेस क्रीडाभुवनाची स्थापना मोठ्या समारंभानें केली; पण आमच्या लोकांची गंमत पहा काय आहे?—बिचाऱ्या क्रीडाभुवनास पहिल्या आठवड्यांतच कुलूप पडलें! अत्तरगुलाबाला व अध्यक्षांच्या व्याख्या-

नाला गाडीघोड्यानिशीं एवढी वडीवडी मंडळी प्रथम दिवशीं जुळली असतां, बहुधा दुसऱ्याच दिवसापासून क्रीडाभुवन शुष्क झालें! हल्लीं तर तें अजीच माजी पडल्यासारखें झालें आहे. मग, सन १८८२ च्या पहिल्या तारखेस त्या बिचाऱ्याची कोणाला कळकळ वाटून, हिराबागेंतल्या रिफॉर्म असोशियेशनप्रमाणें, त्यानें आपल्या वाढदिवशीं पुन्हा डोकें उचललें तर कोण जाणे!

वरील विवेचना वरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल कीं या बाबतींत इतर देशांतली स्थिति व आपल्या देशांतली स्थिति ताडून पाहिली असतां, जमीनअस्मानाचें अंतर आहे. आतां हें अंतर कां व या आर्यभूमींत सभादिक लौकिक कृत्यें रुजत कां नाहींत आणि रुजलींच तर तीं लवकर कां वठतात, या गोष्टीचा विचार करणे आज फार जरूर आहे. या खेपेला या महत्वाच्या विषयाचा आम्हीं केवळ उपन्यास केला आहे. पुढील अंकापासून, आजपर्यंतच्या अनुभवावरून वरील विषयासंबंधानें आमचीं जीं मतें होऊन बसलीं आहेत, तीं वाचकांस सादर करतों.

[ केसरी ता० २९ मार्च १८८१ ]

मागील अंकांत आह्मीं दिलगिरीची एक गोष्ट दाखल केली, तीही कीं आमच्या देशांत कोणतेंही लौकिक कृत्य आरंभलें आणि तें चार दिवस बोभाट्याशिवाय सुरळीत चाललें असें प्रायः आढळत नाहीं; हिचें पहिलें मोठें कारण आह्मास हें वाटतें कीं, पाश्चात्यांची नवी सुधारणा अद्याप आमच्यामध्यें चांगलीशी मुरली नाहीं. इंग्रज लोकांचीं एकेक वडीं कृत्यें पाहून त्यांचें आह्मी अनुकरण करतों खरें, पण हें अनुकरण पुष्कळ अंशीं लहान मुलें जशीं मोठाल्या माणसांचें अनुकरण करतात त्यासारखेंच होय. ह्मणजे मुलें हीं मोठाले टोलेजंग भोजनसमारंभ पाहून भातुकल्यांनीं खेळतात, किंवा मदनव्यापाराची कल्पनाही नसतां, बाहुला व बाहुली यांचें लग्न लावून देतात; त्याप्रमाणेंच लोककल्याणार्थ आरंभलेल्या मोठमोठ्या कृत्यांची आज येथें स्थिति आहे. इंग्लंडांत मोठमोठ्या बडे लोकांपासून तों

यःकश्चित् मजुरापर्यंत सर्वांस लोकांचे हक्क ह्मणजे काय हें कळतें आहे, तेव्हां तेथें पार्लमेंटासारख्या सभा आहेत व त्यांचे सभासद निवड-तांना तिकडे मोठी गडबड उडून जाते, हें ठीकच आहे. पण इकडे पहावें तो अगदीं प्राचीन काळापासून राजा ह्मणजे ईश्वराचा अंश, 'राजा हरति सर्वस्वं तत्र का परिदेवना' (राजाच जर सर्वस्व हरण करूं लागला तर मग कोणाकडे रडत जावें?) या कल्पना मनूच्या कारकीर्दीपासून तों थेट आजपर्यंत सर्वांच्या हृदयांत खिळून राहिलेल्या आहेत. मग अशा स्थितींत येथें शंभर सार्वजनिक सभा झाल्या ह्मणून त्यांचे काय तेज पडणार? विलायतेंतील वधूवरें, विवाहग्रंथि पडतांच, मधुमास भोगण्यासाठीं कोठें तरी रमणीय स्थलीं जाण्यास निघतात, ह्मणून इकडच्याही दहा वर्षांच्या नवऱ्यानें पांच वर्षांच्या नवरीस हातीं धरून, तोच सोहळा भोगण्याचा जर आव घातला, तर 'जयपाळां-'तील नायिकेसारखाच अत्यंत हास्यास्पद प्रकार होणार नाहीं काय? याप्र-माणेच येथें कोठले तरी मुकत्यार गल्लीकुच्चींतून धरून आणून, त्यांच्या-कडून, मारून मुटकून, सार्वजनिक सभेचें सभासदत्व करावयाचें; हा प्रकार यशोलाभाला कसा यावा?

धर्मप्रकरणांतही आज चाळीसपन्नास वर्षांत बरीच गडबड उडून राहिलेली आहे. पण हिचाही प्रकार वरच्यासारखाच! राजा राममो-हनरायाची काय स्थिति असेल ती असो; पण अलीकडे तर आमच्या पाहण्यांत जी तऱ्हा येत आहे तिजवरून विचार करतां, आमची नवीन भक्तमंडळी कितीशी धर्मनिष्ठ असेल याची आह्मास फार शंका आहे! जेवढे ह्मणून नवीन समाजांचे अनुयायी आहेत, तेवढे सर्वच दांभिक आहेत असें आम्ही ह्मणत नाहीं; पण आमची येवढी खात्री आहे कीं, ज्या लूथरप्रभृति मंडळीचा आव आमचे धर्म-सुधारणेच्छु घालतात, त्या मंडळीच्या अंगीं जो आवेश संचरलेला होता त्याचा एक-सहस्रांशसुद्धां वरील आमच्या सामाजिकांत आढळत नाहीं. हल्लींच्या काळांत धर्मसुधारणेचा डौल घालणें हें फार सोपें झालें आहे. मागें युरोपांत कोणी नवीन मताचा प्रस्थापक निघाला कीं, त्यास

जाळून टाकण्याचा सपाटा चालू असे, तसें हल्लीं तिकडे सुद्धां नाहीं. मिल्लसारखे अधर्मी, किंबहुना ब्राडलॉ, बेसंट बाई, यांसारखी स्पष्ट-वक्ती नास्तिक मंडळी, यांस हल्लीं काडीइतका देखील उपद्रव करण्याचें कोणास सामर्थ्य नाहीं. त्यांतून इकडे तर काय, कोणाचाच जोडा कोणाच्या पायांत नाहीं, मग हवीं तशीं मतें प्रगट केलीं किंवा हवें तसें आचरण केलें, म्हणून कोणती आडकाठी आहे? पण इतकी सोय हल्लीं झाली असतांही, बाबू केशव चंद्रसेन हे मूर्तिपूजकास कन्यादान करतात; येथील एक समाजाध्यक्ष, आम्हीं आजपर्यंत समाजांत उपदेश केला तो सारा व्यर्थ, असें बेधडक आपल्या श्रोत्यांस सांगून मोकळे होतात, इत्यादि प्रकार नजरेस येतो! यांतील बीज काय? अर्थात हेंच कीं हा धर्मावेशाचा उमाळा केवळ अंतःकरणांतला नाहीं; तर लोकस्फीतीच्या उद्देशानेंच हीं प्रकरणें प्रायः उपस्थित झालीं आहेत.

राज्यकारण व धर्म या दोहोंच्या संबंधानें वर जें सांगितलें तेंच बहुधा इतर सर्व प्रकरणांसही लागू आहे. अगोदर, एकंदर देशाच्या कल्याणार्थ झटणें हें भूषणप्रद होय, किंबहुना प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य कर्म होय, ही कल्पनाही पुष्कळांच्या मनांत अझून चांगलीशी रुजली नाहीं. परदेशांतील झाड आणून आपल्या जमिनींत लावलें असतां, तें येथें रुजण्यास व वाढण्यास जसा अवकास लागतो, त्यासारखीच परकीय आचारविचारांची गोष्ट आहे. युरोपाशीं या देशाचें ज्यास्त दळणवळण पडे तोंपर्यंत किंवा त्यांच्या ग्रंथांवरून त्यांचें स्वरूप आपल्या मनांत पूर्णपणे बिंबे तोंपर्यंत हल्लीं लोककल्याणाच्या कामांची जी दुर्दशा आढळते, तीच दृष्टीस पडावयाची. स्वदेशाच्या प्रीत्यर्थ तनमनधन अर्पण करणें हें किती थोरपणाचें काम आहे, केवळ स्वोदरपूरणार्थ परिश्रम करून जन्मभर आपली व आपल्या बायकापोरांची भर करणें यापेक्षां आपल्या असंख्य बंधूंच्या कल्याणार्थ देह झिजवणें व जगांत नांव करणें यांत किती अधिक समाधान आहे, वगैरे मतें आमच्या लोकांत ज्या मानानें अधिकाधिक दृढ होत

जातील, त्याच मानानें आमच्या सर्व उद्योगांसही विशेष यश येत जाईल हें उघड आहे.

[ केसरी तारीख ५ एप्रील १८८१ ]

**[ चर्चा—रा० रा० केसरी पत्रकर्ते यांस.—वि० वि० गेल्या अंकांत तुह्मी " सभा व मंडळ्या " ह्या विषयावर लिहीत असतां, येथील नूतन ' क्रीडाभुवन ' नामक बालकावर खरनखरप्राय आपला अभिप्राय पाहून अतिशय वाईट वाटलें. व खरीच तशी स्थिति आहे किंवा कसें हें पाहण्याकरितां मुद्दाम तेथें गेलों; तों तेथें जागा नीटनेटकी करण्याचें काम चाललें असून, एक सोपा बांधण्याचें कामही सुरू होतें, व कांहीं मुलें खेळत होतीं. तथेंच व्यवस्थापकां-पैकीं एक गृहस्थ उभे होते, त्यांस हकीगत विचारितां तुमच्या लेखाचा कोठेंच जम बसेना. मंडळी कां येत नाहीं वगैरे प्रश्न विचारितां, त्यांणीं, जागा नीट होण्याचे नडीमुळें लोक जमत नाहींत, पण एकंदर सर्व व्यवस्था आटपल्यावर मंडळी जमणार आहे ह्मणून सांगितलें. पत्रकर्ते राव, आपल्यास व आपल्या सर्व बंधुवर्गास कर जोडून येव-ढीच विनंती आहे कीं, निष्पक्षपातानें जशी स्थिति असेल तशीच आपण आम्हा वाचकांस कळवावी. आमच्या देशांत अनेक कार-णांस्तव कोणत्याही प्रकारच्या लौकिक कृत्याची उभारणी होत नाहीं. चारचौघांनीं मिळून कशी तरी उभारणी केली तर त्यांत मतभेदामुळें अपरिहार्य अनेक अडचणी येतात. त्याही कदाचित् सुदैवानें न आल्या तर तुमच्यासारखे पत्रकर्ते, व्यंग पुरतेपणीं समजण्याचासुद्धां धीर न धरतां, थट्टा करण्यास तयार आहेतच. ही स्थिति खरोखर शोच-नीय होय. तुह्मीं पत्रकर्त्यांनीं असें चालावें कीं, तेणेंकरून कोणतेंही आरंभलेलें सत्कृत्य यशोलाभास येऊन त्यांतील व्यंगें क्रमशः निघून जातील.—आपला एक शोधक ]**

आमच्या ' शोधका ' नें स्वतः तसदी घेऊन, " क्रीडाभुवनादि-षयींची खरी हकीगत सर्वांस जाहीर " केली हें त्यानें फार चां-गलें केलें यांत संशय नाहीं. पण जर चालू सालाच्या पहिल्या तार-खेस वरील ' भुवना ' ची एकदा स्थापना होऊन चुकली होती, तर पुनःस्थापनेचा इतक्यांतच विचार झाला हें कसें ? खरोखर, हें विचित्रच नव्हे काय ? त्यांतून जर कांहीं अधिक सुधारणा करण्याचें

मंडळीनें मनांत आणिलें असेल असें ह्मणावें, तर ती होई तोंपर्यंत 'क्रीडा' तहकूबच करण्याची कांहीं जरूरी होती असें आह्मास वाटत नाहीं. आमचा मजकूर अंमळ कडक आहे हें आह्मी कबूल करतों; तरी असे मजकूर वर्तमानपत्रांत आल्यामुळें आमच्या सार्वजनिक कृत्यांस धोका कसा पोंचतो हें मात्र आम्हास चांगलेंसें कळत नाहीं. आमच्या सारख्यांच्या टीकात्मक लेखामुळें लौकिक कृत्यें उदयास येत नाहींत किंवा आलेलीं लयास जातात असें ह्मणणें, म्हणजे गांवांत वैद्य असल्यामुळें लोक मरतात या म्हणण्याइतकेंच आम्हास समंजस वाटतें. वैद्यांच्या कटु औषधिही जशा हितावह, त्याप्रमाणेंच वर्तमानपत्रांतील प्रतिकूळ टीकाही, खरोखरी पाहतां, लौकिक कृत्यांस हितकारकच होत. यास्तव अशाविषयीं कोणीही विषाद मानण्याचें कारण नाहीं. आपली स्थिति सुधारून वरील आक्षेपांच्या तडाक्यांतून सुटण्याचा यत्न करणें, किंवा त्यांस पात्र न होण्याची पहिल्यापासून उमेद बाळगणें, हेंच यशोलाभाचें खरें साधन होय असें आह्मास वाटतें.—**केसरीकर्ते**.

[ केसरी, ता० ५ एप्रील १८८१ ]

आमच्या देशांतील सार्वजनिक उद्योग यथास्थित न चालण्याचें दुसरें एक मोठें कारण असें आहे कीं, प्रथमतःच नीट विचार करून ते उपस्थित केलेले नसतात. घराचा पाया कच्चा ठेवून, मोठी टोलेजंग इमारत उठवली असतां, ती ढासळली ह्मणून जसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, त्याप्रमाणेंच आपण केलेला संकल्पच जर अगोदर नीट नसला तर तो सिद्धीस तरी जावा कसा ? कोणतेंही कार्य उपस्थित करणें झालें तर तें अगोदर होण्यासारखें असलें पाहिजे, काम करणारी मंडळी त्याच्या सिद्धीविषयीं समर्थ असली पाहिजे, व उपायांचीही अशी योजना झाली पाहिजे कीं त्यांच्या योगानें सदरील कार्य साध्य व्हावें. कर्ता, कर्म, करण ही त्रिपुटी याप्रमाणें जुळली असतां, सहसा असिद्धि होण्याचें भय उरणार नाहीं. पण वरील गोष्टीकडे आमच्या देशांत विशेष लक्ष दिलेलें फार करून आढळत नाहीं.

चार होळीचे होळकर मिळून एखाद्या मोठ्या कार्यास आरंभ करतात, परंतु त्यांत खरा झटणारा बहुधा विरळच असल्याळें, लवकरच सारा डोलारा खालीं येतो. मग ' आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः ' हें आपलें एक वचन ज्याला त्याला म्हणायाला आहेच, किंवा ' आमच्या देशाचें नशीबच खोटें ' असें म्हणून औदासीन्य पतकरण्यास मोकळीक आहेच !

वरील सिद्धांताच्या उदाहरणार्थ आह्मी येथील दोन तीन मंडळ्यांची हकीगत सांगतों. तीवरून आम्हीं वर दाखविलेला दोष व्यक्त होईल.

सन १८७१ सालीं येथें 'डेक्कन् कॉलेज क्लब्' म्हणून एक मंडळी निघाली. कै० विष्णु परशुराम रानडे हे वरील मंडळीचे उत्पादक ह्मटले असतां चालतील. रानडे हे चांगले विद्वान् असून मंडळीचे चाहते होते, यास्तव त्यांनीं प्रथमतः ही कल्पना काढली कीं, पुण्यांत इंग्रेजी विद्येचें पीठ स्थापन झाल्यापासून जी जी मंडळी त्यांत पैदा होत गेली, त्या सर्वांच्या हृदयांत आपल्या मूळ ठिकाणाचा अभिमान असावा, म्हणून दरवर्षी मे महिन्यांत आयती मंडळी पुण्यांत जमतेच, तेव्हां एक दोन दिवस त्यांनीं वरील निमित्तानें उत्साह करावा; सर्वांनीं परस्परांस भेटून, खेळ खेळण्यांत, भाषणें करण्यांत वगैरे काळक्रमणा करावी, आणि त्याबरोबरच भोजन व उपहारही एकत्र करावा. आतां ही कल्पना जर वस्तुतः पाहिली तर ती उत्कृष्ट होय हें कोणीही कबूल करील. आपल्या जन्मभूमीचें दर्शन झालें असतां संतोष होणें हें जसें साहजिक आहे, त्याप्रमाणेंच जेथें आपला विद्याभ्यास झाला त्या स्थलाचें दर्शनही अभिमानजनक व आल्हादजनक होय हें उघड आहे. या सदरील उद्देशानें सदरील क्लबाची स्थापना होऊन, तो आज दहा वर्षे सतत चालला आहे. आतां त्याची आजपर्यंतची हालहवाल जर पाहिली, तर गुजराथ्यांचें जसें ज्ञातिभोजन होतें, किंवा मुलींची भातुकली होते, त्याप्रमाणें पांचपन्नास मंडळी दरसाल एकत्र जमून एक दिवस मौजेनें

घालवते व पुष्कळांच्या एके ठिकाणीं भेटी होऊन सहभोजनाचा थाट उडतो, इतकेंच कायतें! यापलीकडे गेल्या दशकांत वरील मंडळीपासून कांहींएक निष्पन्न झालें नाहीं. पहिल्या पहिल्यानें विद्वत्समाज मोठा जमल्यामुळें, सदरील ' क्लब् ' हा केवळ भोजनार्थ नसून, त्यांत व्याख्यानें, निबंधवाचन वगैरे अनेक प्रकार होतील असा सुमार दिसत होता; व कित्येकांनीं तर ग्रीक लोकांतील ' ऑलिंपिक् गेम्स ' वगैरे सार्वजनिक उत्सवांचेंही साम्य वरील मंडळीच्या क्रीडेस दिलें. तसेंच पहिलीं चारपांच वर्षें, निबंध नेण्यांत व त्याविषयीं बाटा-घाट करण्यांत जात असत. एकदा तर, कोणी निबंध लिहून पाठविला होता त्यास बरेंचसें बक्षीसही देण्यांत आलें. पण आलीकडे आलीकडे पहावें तों निव्वळ जेवणावरच बहुधा बस्तान येऊन बसलें आहे! बाहेरून जी मंडळी येते त्यांची वरील ' क्लबा- 'च्या योगानें येवढी बरीक खाशी सोय झाली आहे कीं एका दीड रुपयांत चमचमीत वनभोजन घडून, अनायसें सर्वांच्या गांठी पडत असल्यामुळें, इतक्या मित्र मंडळीकडे क्षेमसमाचारार्थ पृथक् पृथक् जाण्याचें अगत्य पडत नाहीं. आम्हास तर वाटतें कीं या सोईमुळेंच आलीकडे ' क्लब् ' कांहींसा बरा चालला आहे, व पुढेही तो चालेल असा सुमार दिसतो. बाकी चवथ्या पांचव्या वर्षीं ह्याची मजल पुष्कळच खचत खचत येऊन, तो एक दोन वर्षांत बुडतो कीं काय असा देखील एकवेळ धाक वाटायाला लागला होता!

आतां, या भोजनमंडळीविषयीं विचार केला असतां, ती एक मजलशीची मंडळी आहे अशा दृष्टीनें पाहिलें तर तिला नांवें ठेवण्याला जागा नाहीं. पांचपन्नास मंडळीनें, वर्षाच्या कांठीं, हिराबागेसारख्या रमणीय ठिकाणीं जमून, एक दिवस आनंदांत घालवावा ही गोष्ट कांहीं वाईट नाहीं. पण मंडळीचा मूळचा उद्देश म्हटला म्हणजे सर्व विद्यालयीन बांधवांचा परिचय होऊन स्नेह वृद्धिंगत व्हावा व त्यांचें बंधुप्रेम जागृत रहावें, हा होय, तो बरीक आजपर्यंत कितीसा सिद्धीस गेला असेल तो असो! पहिल्यापासून

शेवटपर्यंत पहावें तों वरील क्लबामध्यें सतरा कोंडाळीं दृष्टीस पडतात; खेळण्याच्या वेळेस, जेवणाच्या वेळेस, पानसुपारीच्या वेळेस, शेवटल्या सभेच्या वेळेस, जो तो आपल्या कोंडाळ्यांत असतो. इतकें मात्र नाहीं ह्मणायाला होतें, कीं खालच्या मंडळीला येथें बड्या मंडळीची सहज तोंडओळख होते, कीं अमुक अमुक रावसाहेब किंवा अमुक अमुक रावबहादुर म्हणतात ते हे! बाकी आंतली स्थिति पाहिली तर चमत्कारिकच. कारण, जुन्या बुधवारच्या वाड्यांत शिकलेल्या वृद्ध कपींस आलीकडील मंडळी सारी टारगी वाटत असेल, व आलीकडील तरुण बांडांच्या मनांतही आमच्या प्राचीन बंधूंविषयीं फारशी भक्ति किंवा प्रेम वाटत नसेल, अशीच स्थिति सरासरीं दृष्टीस पडते!

[ केसरी, ता. १२ एप्रील १८८१ ]

गेल्या खेपेस आह्मीं 'डेक्कन् कॉलेज् क्लब्-' ची थोडीशी हकीगत आमच्या वाचकांस कळविली. आतां, त्याच्यासारखीच दुसरी एक मासिक मंडळी येथें जमत असे, तिजविषयीं कांहीं लिहितों.

वरील 'क्लब्-' मध्यें माजी बुधवारच्या वाड्यांतील शाळेंत, पूना कॉलेजांत, व डेक्कन् कॉलेजांत ज्या लोकांनीं विद्याभ्यास केला त्यांसच तेवढी येण्यास मुभा आहे, इतर कोणीही त्यांत येऊं शकत नाहीं; तेव्हां यास्तव, इतर लोकांमध्येंही सहभोजनाची तऱ्हा सुरू असावी या उद्देशानें कांहीं मंडळीनीं पुढाकार घेऊन, मासिक भोजन सुरू केलें. कोठें तरी बागेंत पांचपन्नास मंडळीनें एके ठिकाणीं जेवणाच्या निमित्तानें जमावें, मग लोककल्याणाच्या कामांची सहजच चर्चा होऊन पुष्कळ लोकांचें दळणवळणही आपोआप पडेल असें करावें, हा या मंडळीचा मुख्य उद्देश होता. वर्गणी दरमहा साहा आणे ठेविली होती. सदरील मंडळी, प्रथमतः कांहीं महिनेपोवतों, येथें बुधवार पेठेंत खासगीवाल्यांच्या बागेंत जमत होती, व शेवटीं शेवटीं मोदीच्या गणपतीच्या देवळांत जमत असे. हा खुलासा येथें करण्याचें कारण येवढेंच कीं, जरी वरील मंडळी सुमारें सात आठ महिने टिकली होती, तरी येथल्या पुष्कळ लोकांस तिची वार्ताही ठाऊक नसेल!

वरील मासिक मंडळींत 'डेक्कन् कॉलेज् क्लब्- ' प्रमाणेंच पहिल्या एकदोन खेपांस, पानसुपारी झाल्यावर, देशकल्याणाच्या बऱ्याच गोष्टि निघाल्या. त्यांत विशेषेंकरून प्रत्येक आळींतल्या लोकांनीं एकेक सभा करावी, व अनाथ प्रेतांचा अंत्यविधि वगैरे सामान्य सार्वजनिक कामें करावीं, असें ठरलें. पण मौज काय सांगावी कीं, बहुधा तिसऱ्या चौथ्या खेपेपासून देशहिताच्या गोष्टी कोणीकडेच राहून, साहा आण्यांचा ऐवज काढून घेण्याच्या पलीकडे भोक्त्या मंडळीचें लक्ष जाईनासें झालें! आमच्या विद्यालयबंधूंपैकीं कित्येकजण जसे केवळ भोजनबंधु बनून, अत्तरगुलाब झाल्याबरोबर, अंमळ दिवस कलला कीं हळुहळू घराची वाट सुधरतात, व पुढील सभादिक कार्यें केवळ गौण होत अशी त्यांची समजूत असतें, त्याप्रमाणेंच वरील मंडळीचाही प्रकार दृष्टीस पडूं लागला. जेवण व गप्पा झाल्या कीं कृतकार्य झालों असें त्यांस वाटूं लागलें. असें होतां होतां वरील सभा केव्हां कधीं लयास गेली तीही कोणास समजली नाहीं!

वरच्या दोहोंप्रमाणेंच तिसरें अगदीं आलीकडचें उदाहरण 'क्रीडाभुवन' हेंच होय. हें इतक्यांतच निकष्ट स्थितीला येऊन पोंचलें आहे असें आह्मीं पूर्वीं लिहिलें होतें; पण वरील लेख आह्मीं गैरसमजानें लिहिला असें आतां आम्हास कळतें. इंग्रेजी पाडव्याला सदरील भुवनाची जरी प्राणप्रतिष्ठा झाली होती, तरी तें पुनः एकदा चांगलें दुरुस्त झाल्यावर, त्याची आणखी जारीनें सुरवात होणार आहे असें आह्मास 'शोधका- ' च्या सांगण्यावरून समजतें. देव करो आणि आमचा लेख खोटा ठरून, 'क्रीडाभुवन' सुरळीत चालो, येवढीच आमची इच्छा आहे!

आह्मीं वर तीन मंडळ्यांचीं जीं उदाहरणें घेतलीं तीं मुद्दाम अगदीं सोप्यांतलीं घेतलीं आहेत. सार्वजनिक सभा, पुनर्विवाहोत्तेजक सभा, ब्रह्मसमाज, स्वदेशी मालाच्या खपास उत्तेजन देणारी मंडळी, कौशल्यशिक्षक मंडळी, अशा बड्या बड्या प्रकरणांच्या खोल पाण्यांत आम्ही शिरलों नाहीं. नुसतें जेवणें, खेळणें हीं दोन तर अ-

गर्दी बिनभानगडीचीं व सहज होण्यासारखीं कामें आहेतना? मग हींसुद्धां ज्याअर्थी आमच्या हातून चांगलींशीं वहिवाटत नाहींत, त्याअर्थी आमच्या अंगांत कांहींच जोर उरला नाहीं असें म्हणावयास काय चिंता आहे? ज्या महाराष्ट्रवासी लोकांचा 'नऊ लाख घोडा' दिल्लीअटकेपर्यंत नुकता गेल्या शतकांत गर्जत होता, ते आज निर्माल्य होऊन गेले काय?

कोणतेंहि काम नीट चालेनासें झालें म्हणजे अर्थातच त्यांत कांहीं तरी रोग उत्पन्न झालेला आहे, किंवा मूळांतच कांहीं दोष आहे असें म्हणणें अवश्य आहे. जसें मनुष्य अन्न खाईनासें झालें, त्यास ग्लानि वाटूं लागली, वैगरे प्रकार दृष्टोत्पत्तीस आले असतां, आंतील सूत्र कोठें तरी बिघडले आहे असें अनुमान करावें लागतें, त्याप्रमाणेंच इतर व्यापारांचीही गोष्ट आहे. कोणतेंही कार्य यथास्थित व्हावयाचें म्हटलें म्हणजे त्याची व्यवस्था नीट चालणें अवश्य होय. या व्यवस्थेचें एकादें अंग जरी बिघडलें तरी त्याच्या योगानें एकंदर कार्यास थोडाबहुततरी व्याघात घडणारच! यास्तव वरील तीन कार्यें सुयंत्र चालण्यास कोणकोणत्या गोष्टींची आडकाठी आहे याचा येथें विचार करूं.

आतां रोगनिदान करण्याचें हें काम जें आम्हीं आंगावर घेतलें आहे, त्यास लागण्यापूर्वी एका गोष्टीबद्दल आमच्या वाचकांस व विशेषतः आमच्या देशांतील सभांच्या व मंडळ्यांच्या पुरस्कर्त्यांस एक सूचना करून ठेवणें जरूर आहे. ती ही कीं, वैद्यास जशी स्पष्टोक्तीची परवानगी असावी लागते, त्याप्रमाणेंच ती आम्हासही असली पाहिजे. हांजी हांजी करणारा वैद्य जसा रोग्याचा शत्रु होय, त्याप्रमाणेंच खुषामत करणारीं व दोषाविष्करण करण्यास भिणारीं वर्तमानपत्रेंही देशास परम अहितकारकच होत असें आम्ही समजतों. जो खरा देशहितेच्छु असेल त्यानें 'भीड भिकेची बहीण' ही बिलकुल धरतां उपयोगीं नाहीं. त्यास जे जे दोष जेथें जेथें दिसतील, ते ते, तेथच्या तेथें, त्यानें सर्व स्पष्टपणें सांगितलेच पाहिजेत. लोकांनीं त्याबद्दल कितीही हाकाटी केली,

तरीआपल्या कर्तव्यास जागून तिजकडे त्यानें अगदीं लक्ष देतां कामा नये. तर प्रस्तुत पत्राच्या प्रसिद्धिपत्रकांत नमूद केलेल्या प्रतिज्ञेस अनुसरूनच वरील स्पष्ट विवरण करण्यास आह्मी लागणार. तें ज्यांस रुचणार नाहीं त्यांनीं आमच्या तर्फेनें महाकवि भारवीचें एक सर्वप्रसिद्ध वचन ध्यानांत आणावें. तें वचन हें:—

हितं मनोहारिच दुर्लभं वचः।

[ केसरी, तारीख १९ एप्रील १८८१. ]

मागें ज्या तीन मंडळ्या आम्हीं उदाहरणार्थ घेतल्या, त्या नीट न चालण्याचीं जीं कारणें आमच्या दृष्टोत्पत्तीस येतात त्यांचें येथें आज उद्घाटन करतों.

'डेक्कन् कॉलेज क्लब्' ही मंडळी मधें मधें मोडकळीस येत चालली होती, ह्याचें एक मोठें कारण हें होय कीं, तींत फक्त जेवणाखेरीज दुसरें कांहीं होत नसे. सदरील आक्षेप हा न येणाऱ्या मंडळीपैकीं ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येतो. "तेथें जाऊन नुसता पुख्खा मारायाचा, येवढेंच कीं नाहीं? मग तेवढ्याकरतां एक सबंद दिवस मोडा, व दीड रुपया खर्चा, यांत काय हाशिल आहे?"—ही कोटी आजपर्यंत कितीकांनीं लढवून दीड रुपया वांचविण्याची युक्ति केलेली आहे. आतां, एका तऱ्हेनें पहातां, वरील आक्षेप बरोबर आहे, व एका तऱ्हेनें पहातां, बरोबर नाहीं. बरोबर असा आहे कीं, जेथें येवढा विद्वत्समाज जमतो तेथें केवळ आहारविहाराखेरीज तिसरी गोष्ट होऊंच नये, हा चमत्कार नाहीं काय? युरोपांत जेथें चारचौघे विद्वान् एके ठिकाणीं झाले तेथें भाषणाचा प्रकार, व्याख्यानाचा प्रकार, नवीन शोध वगैरे, हें कांहीं ना कांहींतरी आढळायाचेंच. उदाहरणार्थ जॉन्सनचा 'क्लब्' घ्या. पण आमच्या 'क्लबा'मध्यें गेल्या दहा समारंभांस हजर असलेल्या मनुष्यास गैरहजर असणाऱ्याच्याहून अमुक एक गोष्ट विशेष समजली असें सांगतां येईल काय?— नाहीं. मग या दृष्टीनें पाहतां, उलट पक्षाचीं बाजू साजरी होण्यासारखी आहे असें ह्मणणें भाग आहे. आतां दुसऱ्या पक्षीं पहातां,

असेंही म्हणतां येईल कीं, वरील निबंधादि प्रकार जरी वरील 'क्लब्-' मध्यें न झाले, तरी केवळ त्याच्याच करतां समजदार मनुष्यांनीं आडून बसून, सदरील मंडळीला मोडता घालावा हेंही बरोबर नाहीं. कां कीं, पूर्वीं एके ठिकाणीं वागलेल्या मंडळीचा, वर्षाच्या काठीं एकदा, एके ठिकाणीं मिळण्याचा योग जर येतो आहे, तर वरच्यासारखा कांहींतरी अडथळा घालून, त्यास व्याघात करणें हें माणुसकीला शोभत नाहीं. त्यांतून निबंधाकरितां तटलेल्या मंडळीनें स्वतःच त्या निबंधाची खटपट कां करूं नये, हाही एक मुद्दा आहेच. ज्यांनीं 'क्लब्' काढला त्यांनींच निबंध पुरविण्याचाही मक्ता घेतला पाहिजे असें कांहीं नाहीं. ज्यांस धमक असेल किंवा हौस असेल, त्यांनीं वरील उणीव भरून काढली असतां, कांहीं गैरवाजवी प्रकार होणार आहे असें नाहीं. पण ही गोष्ट इतकी उघड असतांही, लोभानें ह्मणा अगर कुरेंबाजपणानें ह्मणा, पुष्कळजण आजपर्यंत 'क्लब्-'पासून अलग राहिले आहेत.

आतां, अशी जर या क्लबाची स्थिति झाली आहे, तर तो काढणारांनीं पहिल्यापासूनच त्याचें भावी स्वरूप प्रसिद्ध केलें असतें, कीं हा जेवणाकरितां व दोन दिवस करमणूक करण्याकरतांच काढलेला आहे, तर वरील बखेडा मोडला असता असें आह्मास वाटते. ज्यास वरील उद्देश पतकरले असते तो 'क्लब्-'मधें सामील झाला असता, व इतर मंडळीसही रिकामे आक्षेप काढण्यास अवकाश न सांपडता. हल्लीं तरी सदरील मंडळीचें स्वरूप वरच्या बेतानेंच प्रगट झाल्यामुळें, तिचा पहिल्यापेक्षां अधिक जम बसलासा दिसत आहे.

मागें सांगितलेल्या मासिक भोजनाच्या मंडळीच्या अपकर्षासतरी हेंच कारण लागू पडतें. आलोआलीस सभा करायाच्या, आणि यंव करायाचें, त्यंव करायाचें, हें पोकळ पांडित्य सोडून देऊन, आह्मी दर महिन्याला निव्वळ जेवणाकरितां आमक्या अमक्या ठिकाणीं जमणार, येवढीच प्रतिज्ञा करून जर वरील मंडळी स्वस्थ राहती, तर ती लयास जाण्यास विशेष कारण होतें असें आह्मास वाटत नाहीं. कांकीं, आमच्या जुन्या वसंतपूजा, वनभोजनें वगैरे प्रकार जर आज अनादि-

सिद्ध चालत आहेत, तर नव्याच मंडळ्यांनीं काय पाप केलें आहे ? पण आमची नवीन मंडळी पहिल्या प्रथमच मोठें ओझें उचलायाला बघते, त्यामुळें अखेरीस हें नाहीं आणि तें नाहीं असा फजिता होतो !

वरील दोन मंडळ्यांचें बस्तान नीट न जमण्याचें दुसरेंही एक मोठें कारण असें आहे कीं, त्यांचे प्रमाण बेतानें धरायाचे टाकून फार अवाढव्य धरलेलें होतें. वार्षिक समाजांत जी डेक्कन् कॉलेजची मंडळी घ्यावयाची, तीत अगदीं बुधवारवाड्यांतील मंडळीपासून आरंभ केल्यानें, अत्यंत वृद्ध पुरुषाची व नव्या नवरीची जशी सांगड घालून दिल्यानें धूसफूस होऊं लागते, त्यासारखाच प्रकार या समारंभाचे वेळींही झाल्यास नवल नाहीं. केली सवरलेली व पूर्ववयींचा हुरूप निघून जाऊन थंडी झालेली मंडळी कोणीकडे ? आणि युनिवर्सिटींत प्रविष्टमात्र होऊन, नुकती कवची फोडून बाहेर पडलेली मंडळी कोणीकडे ? त्याप्रमाणेच माजी मासिक भोजन समाजांतही, ज्यांची स्थितिरीति व अभिरुचि हीं [illegible] गृहस्थांचा समावेश करून, पुष्कळ मंडळी जुळविली होती पण असें केल्यानें समाजाचा मुख्य हेतु सिद्धीस जावा कसा ? याविषयीं मागें लिहिलेंच आहे. यास्तव आतां येवढेंच कळवितों कीं, असा गोंधळ न करतां, कांहीं निवडक गृहस्थांस मात्र घेऊन जर वरच्यासारख्या मंडळ्या स्थापन होतील, तर त्यांपासून इष्ट हेतु चांगल्या प्रकारें सिद्धीस जाईल व त्यांचें हसेंही होणार नाहीं, असें आम्हास वाटतें.

आमच्या नुकत्या स्थापलेल्या 'क्रीडाभुवना-'च्या ठिकाणींतरी हाच मोठा दोष आहे. ज्यांनीं कधीं जन्मांत ब्याट आणि बॉल् हातीं धरला नाहीं, अशा बड्या धेंडांचा व छोटेखानी मंडळीचा संयोग या भुवनांत होणार; मग अशांचा खेळ जुळावा कसा ? ज्या त्या बड्या सेञाड्रस दुसऱ्यांस पाहून संकोच वाटणार, व धाकटीं पोरें आपला नेभळेपणा पाहून आपणास हासतील म्हणून लाज वाटणार. युरोपियन लोक वयानें कितीही मोठे अगडबंब झाले तरी त्यांस नेहमींच्या सरावामुळें अशी पंचाईत येऊन पडत नाहीं. आमच्याकडची

मंडळी ह्मटली म्हणजे नुसती रपेटछुट! त्यांस गाड्यांशिवाय व्हाव-याची नाहीं, अशा प्रकारची! मग असले गडी, क्रीडाभुवनांगणीं खेळावयास सज्ज होऊन, टोला मारण्यास अवसान घेऊं लागले म्हणजे प्रेक्षकांनीं हसूं दाबून, डोळे मिटून धरावे तरच त्यांची निभावणूक! पण हो; आमचे 'शोधक' महाराज वरील गोष्टींतही कदाचित् आम्हास मोडून काढतील. यास्तव, कांहीं दिवस धीर धरून, बड्या मंडळीचें अवसान अगोदर प्रत्यक्ष पाहावें आणि मग त्यांच्या रामटोल्यावर टीका करावी, हें बरें! यास्तव लेखणी पुसून तूर्त नळकंड्यांत टाकून देतों.

[ केसरी, ता० २६ एप्रील १८८१ ]

येथवर, 'आमच्या देशांतील तीन मंडळ्या उदाहरणार्थ घेऊन, त्यांच्या संबंधानें प्रस्तुत विषयाचें विवेचन केलें, व त्या नीट न चालण्याचीं कांहीं कारणें दर्शविलीं. आतां, सामान्यतः पाहतां, ज्या आणखी कांहीं गोष्टी एतद्देशीय सभांच्या प्रसिद्धीस कारणभूत होत असतात, त्यांविषयीं थोडेंसें विवरण करून, हा विषय आटपतों.

संस्कृतांतील एक प्रसिद्ध म्हण आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेल; ती ही कीं, "समानशीलव्यसनेषु सख्यम्" (ज्यांचे स्वभाव सारखे व उद्योग सारखे त्यांचें सख्य जमतें). या वचनाचें चांगलें स्मरण ठेवून, जर आमचे लोक सभादिक उद्योग करूं लागतील, तर त्यांत त्यांस अधिक यश येईल यांत संशय नाहीं. सभा किंवा मंडळी स्थापन होणें म्हणजे विवक्षित लोकांचा एकोपा होणें; व हा एकोपा जर होणें आहे, तर ज्या द्रव्यांचें एकीकरण व्हावयाचें, त्यांच्या ठिकाणीं ती योग्यता तरी पाहिजे. पाणी आणि तेल हीं कितीही एके ठिकाणीं ढवळलीं तरी तीं एकवटतील काय? किंवा दारू आणि विस्तव यांस एकीच्या माहात्म्यावर मोठें व्याख्यान देऊन, एके ठिकाणीं राहण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली, तर ती सफळ होणार आहे काय?- नाहीं. करितां, केवळ लोककल्याणावर नजर देऊन, लोक एकत्र होतील व एका जुटीनें काम करतील ही व्यर्थ आशा सोडून

देऊन, ज्या लोकांचे स्वभाव, अभिरुचि, वयें, शिक्षा वगैरे एकसारखीं असतील, त्यांचे समाज प्रथमतः जुळले पाहिजेत. असें झालें म्हणजे एकाचें तोंड दक्षिणेकडे व दुसऱ्याचें उत्तरेकडे, ही जी बजबजपुरी माजते, ती माजणार नाहीं. मंडळीच्या सभासदांत वरील साम्य असल्यापासून दुसरी जी एक मोठी गोष्ट साध्य होते ती ही कीं, सर्वांस सर्वांशीं मोकळेपणानें वागायाला सांपडतें. नाहीं तर, हल्लीं पीडा काय होते कीं एक सभासद मोठे सरकारी हुद्देदार, तर दुसरा त्यांच्या हाताखालचा हलका नौकर असायाचा; किंवा अमुक अमुक मोठे जहागिरदार किंवा सावकार असले, तर त्यांच्या शेजारचा मनुष्य कोणी कफल्लक असायाचा! हें विलक्षण प्रकारचें स्थितिवैचित्र्य असल्यानें, सगळेच सभासद आपआपल्या ठिकाणीं अडचणलेले होऊन राहतात. वाघाच्या पिंजऱ्यांत जशी शेळी कोंडायाची, किंवा कोंवळ्या वधुवरांच्या पदराला गांठ देऊन, दोघांस एकत्र जखडून टाकायाचें, त्यासारखी त्यांची स्थिति हो[illegible] वाटणार कीं हा तर आमचा असिस्टंट किंवा सबार्डिनेट् आहे, तेव्हां आम्ही एकाद्या गोष्टीची सूचना केली तर तिला यानें आडवें येतां कामा नये. इकडे छोट्याशा अफिसरालाही मनांतल्या मनांत वाटणार, कीं आपल्या यजमानांशीं जर आपल्याला दिवस काढणें आहेत तर आपले स्वतंत्र विचार तोंपर्यंत आपल्याला तादृश बाहेर काढतां नये; न जाणों, आपल्यावर खावंदांचा घुस्सा होईल! जहागिरदार व सावकार हे मनांत घमंड बाळगणार, कीं आह्मी अमक्या अमक्या प्रतीचे सरदार, किंवा आमच्या पेढीवर दररोज हजारों रुपयांचा खळखळाट होत असतो; आणि हा दुसरा सभासद काय यःकश्चित, यास दररोज मध्यान्हीचीही भ्रांत! हा दुसरातरी वरील कारणास्तव आपल्या ठिकाणीं बिचकूनच असणार. ही स्थिति जुटीला सहजच अगदीं प्रतिकूल आहे.

तर, आमच्या सभांत हा समानत्वाचा विचार न राखल्यानें, वर सांगितलेल्या ज्या शेंकडों पंचाइती होत असतात, त्या 'समानशील-व्यसन-' त्वाचा नियम राखला असतां, एकदम नाहींतशा होणार आहेत. अर्थात् अमुक उंच व अमुक निंच हा भिन्नभाव नाहींसा झाला असतां, हवें त्यास हवें तें बोलण्याची व सभेच्या हितार्थ आपले विचार स्पष्टपणें प्रगट करण्याची कोणासही अडचण उरणार नाहीं.

आतां हें खरें आहे कीं, कोणी मोठा असला आणि कोणी लहान असला, म्हणजे त्यांची जूट जमणारच नाहीं असें कांहीं नाहीं. दोघांनीही जर आपापलें कर्तव्य लक्षांत आणून एकमेकांशीं वागणूक केली, तर अधिकारानें, श्रीमंतीनें, किंवा विद्वत्तेनें ज्यांच्यांत अतिशयित अंतर आहे असे दोघे मनुष्यही एकोप्यानें सहज राहूं शकतील. तसाच एरवीं आपला परस्पर कांहींही संबंध असला तरी सर्व कामांत तो संबंध मनांत वागवला पाहिजे असें नाहीं, हेंही थोर समजुतीच्या मनुष्यांच्या तेव्हांच लक्षांत येणारें आहे. पण आमची स्थिति पाहिली तर सामान्यतः असें आढळून येईल कीं, आमच्यामध्यें देशहिताच्या गप्पा मारायास जरी पुष्कळ लोक शिकले आहेत, व असें वागावें आणि तसें वागावें वगैरे चांगल्या समजुतीच्या गोष्टी सांगणारे जरी अनेक आढाळतील, तरी केवळ प्रांजळपणानें एकाद्या कार्याला झटणारी मंडळी फारच थोडी निघेल. लोकसमाजांत आपला दर्जा व आपली विद्वता खुशाल गुंडाळून ठेवण्यास राजी, असे लोक क्वचितच सांपडतील. आपण अमक्या संबंधानें मोठे आहों, तेव्हां आमचा मानमरातब यथास्थितपणें लोकांनीं ठेवला पाहिजे, आमचा शब्द कधीं खालीं पडतां कामा नये, एकादें हलकें सलकें काम दिलें तर आम्ही बिलकूल पतकरणार नाहीं, वगैरे अयोग्य कल्पना ज्यांच्या मनांतही कधीं येत नाहींत, अशी निष्प्रांजळ मंडळी आमच्यांत किती असेल ती असो! तेव्हां सांगायाचें काय कीं, जोंपर्यंत वरील कुत्सित भाव आमच्या लोकांच्या मनांतून समूळ गेले नाहींत, व लोककल्याणाचें खरें स्वरूप त्यांच्या ठायीं चांगलें बिंबलें गेलें

नाहीं, तोंपर्यंत थोडक्या व सारख्या दर्ज्याच्या मंडळीनेंच एकादें कार्य उचलून, तें सिद्धीस नेण्यास झटावें हें फार चांगलें. लहान थोरांची सरोबरीनें भेसळ करून कांहीं तरी दुल्ला उभा करावा, आणि सारा गप्पागोंधळ करून ठेवावा हें कांहीं बरें नव्हे. अशा बारभाईच्या रामरगाड्यांत कोणतेंच काम कधीं नीटपणें तडीस जावयाचें नाहीं. तर हीं बाजारबुणगीं अगोदर नाहींतशीं होऊन, कवायतीच्या पलटणी जेव्हां आमच्या देशांत एकेक तयार होतील तेव्हां चोहोंकडे फत्तेच फत्ते होऊन जाईल असा आम्हास भरंवसा आहे.

याशिवाय सभांच्या व मंडळ्यांच्या अपकर्षाचीं इतर जीं अनेक कारणें सामान्यत: चोहोंकडे आढळतात, त्यांचाही येथें स्पष्टपणें उल्लेख केला पाहिजे. हीं कारणें म्हटलीं म्हणजे अविश्वास,आपमतलब, मत्सर, कपटभाव वगैरे क्षुद्रवृत्ति होत. पोटांत रोग झाला असतां तो निघाल्याखेरीज जशी शरीराची वाढ कधीं होत नाहीं, त्याप्रमाणेंच वरील कुत्सित वृत्ति जोंपर्यंत सभाजनांच्या ठायीं वास करताहेत, तोंपर्यंत सभांचें व मंडळ्याचें कामही, हल्लीं आढळतें त्याप्रमाणेंच, रडतकढत चालणार हें उघड आहे. प्रकृति हुशार राहण्यास मन जसें सदोदित प्रफुल्लित असणें अवश्य आहे, त्याप्रमाणें सभेचें काम चोख रीतीनें वहिवाटण्यास तिचे सर्व अवयव निर्दोष व विकाररहित असले पाहिजेत हें स्पष्ट आहे.

वरील चिकित्सा आम्हीं आरंभली आहे ही गोष्ट इकडे अगदीं अपूर्व असल्यामुळें, आम्हास ज्या एका गोष्टीविषयीं मोठा धाक वाटतो, ती ही. आमच्या प्रस्तुत विवेचनावरून साध्याभोळ्या वाचकांस बहुधा असा अचंबा वाटणार आहे कीं, येवढी बडी बडी मंडळी जी आजपर्यंत इतके उद्योग करायाला निघाली आहे, तिच्या ठायीं वर सांगितलेल्या दुष्ट मनोवृत्ति असतील तरी कशा? चारचार पांचपांच परीक्षा दिलेली मंडळी, साऱ्या देशांचे इतिहास ज्यांनीं पालथे घातले, मॉरल् फिलॉसफी (सदसद्विवेचनशास्त्र) या विषयांत जे पसार झाले, अशा या लोकांच्या ठायीं लोककल्याणाचीं तत्वें म्हटलीं म्हणजे कशीं सदोदित जागृत अ-

सावीं, व कुत्सित वृत्तींपासून तर त्यांचें मन कसें निष्कलंक व सोज्वल असावें! याप्रमाणें बाहेरून पाहणाराच्या मनाचा ग्रह होणार आहे हें खरें आहे: पण अशा भ्रांत मनुष्यानें 'रासेलस्-' मधल्या वक्त्या पंडिताची किंवा 'इसापनीती-' तील खोकड आणि बोका यांची गोष्ट अंमळ ध्यानांत आणावी म्हणजे झालें. तसें केलें असतां, कोणाचीही खात्री होईल कीं, चांगल्या गोष्टी ठाऊक असणें किंवा त्यांचें सुरस रीतीनें प्रतिपादन करतां येणें हें निराळें; आणि आचरणद्वारा त्या अमलांत आणणें हें निराळें. पुराणिक बोवांनीं चार महिने वांग्यांचा वाग्द्वारा निषेध केला असतांही, त्यांचें जिव्हालौल्य जसें त्यांस भोजनसमयीं अनावर झालें, व 'पुराणांतलीं वांगीं पुराणांत' हा सर्वप्रसिद्ध शास्त्रार्थ आयत्या वेळेस काढून, त्यांनीं आपली सोडवणूक बिनधास्तपणें करून घेतली, त्याप्रमाणेंच समयीं एकादा मोठा डल्ला मारायाला सांपडतो आहे तर कानांवर हात ठेवून, कक्षाप्रदेश आकाशगोचर [illegible]करायाला, किंवा दिवाळें वाजवून आपली कीर्ति उज्वलित करायाला, एका क्षणाचाहीं विलंब न करणारी मंडळी आमच्यामध्यें नाहींशी नाहीं!

असो, आतां वरील वृत्तींच्या विवरणास लागतों. त्यांत प्रथमतः मुख्य रिपु लोभ. लोभास अग्र स्थान देण्याचें कारण प्रसिद्धच आहे,—'लोभमूलानि पापानि!'

या दुष्ट मनोवृत्तीचा प्रादुर्भाव आमच्या देशांतील मंडळ्यांतून अनेक तऱ्हांनीं दृष्टीस पडतो. त्यांत पहिली तऱ्हा ही कीं, पदरास दमडीचाही खार न लागतां, नुसती तोंडानें जेवढी देशहिताची बडबड होईल, किंवा शुष्ककारभार करतां येतील, तितके करायाचे. आर्यजननीचा महिमा यथेच्छ गावा, देशाची हलाखी हवी तितकी वर्णन करावी, वर्णन करतांना मोठा गहिंवर आणावा, दुसरेही नाटकी आविर्भाव लोकांस पाहिजेत तितके दाखवावे;—पण हें सर्व कोठपर्यंत?-थैलीशीं येऊन बेतली नाहीं तोंपर्यंत! दर महिन्याला हजारों रुपये आर्यजननीच्या खजिन्यांतून खासगत थैलींत उतरताहेतना? ठीकआहे. त्यांतला सहसा छदामही परत यावयाचा नाहीं किंवा

अनाठायीं जावयाचा नाहीं! एरवीं, इंग्रजी कलालाला, किंवा डायमंड बूटवाल्याला, जितका अधिक पैसा जाईल तितका चांगलाच! तसेंच, डायरेक्टर साहेब अगर गव्हर्नर साहेब सभास्थान सुशोभित करताहेत, तर अशा पर्वकाळींही जितक्या ओंजळी दक्षिणा टाकावी तितकी चित्रगुप्ताच्या दप्तरांत दाखल होणार! अशी दृढ समजूत असून, या मंडळीचा पैसा अशा मार्गांनीं खर्चत नाहीं असें मात्र नाहीं. पण खरोखरच जें लोकोपयोगाचें काम आहे, व ज्यानें शेकडोंजणांच्या निर्वाहाची वगैरे तजवीज लागणार आहे, असा एकादा नवा उद्योग जर कोणी काढूं लागेल तर तो मरेना; त्याला कोणीही अनुकूल व्हावयाचें नाहीं! जन्मभर दगदग करून व दररोज काबाडकष्ट करून जी जोड करायाची, ती आपण व आपल्या बायकापोरांनीं जर भोगली नाहीं तर मग काय राहिलें? साऱ्या देशाचें आपण काय घेतलें आहे? त्यांतून उद्यां जर सारा हिंदुस्थान देश रसातळास गेला तर जाईना? त्याची कोणाला पर्वा आहे? आहे तोंवर तर ध्या चैन उडवून, उद्यांचें कोणीं पाहिलें आहे? आप मरा और जग डुबा!— सध्यां आमच्या देशांतील स्थिति पाहिली, तर शंभरांतली नव्याण्णव मंडळी वरच्या तऱ्हेची आहे असें आढळून येईल. युरोपांत आपल्या देशाकरतां प्राण खर्ची घालणारी जितकी मंडळी सांपडेल, तितकी इकडे चार पैसे उचलून देणारीसुद्धां सांपणार नाहीं. आणि त्यांतून थोडेंबहुततरी औदार्य खालच्या प्रतीच्या साध्याभोळ्या अडाणी लोकांत एकवेळ आढळेल, पण त्याचा दशांशही वरच्या खाशा मंडळींत फार करून आढळणार नाहीं! इंग्रजींत एक म्हण आहे कीं, " The nearer the church, the farther from God" ( मनुष्यें जितकीं जितकीं भजनालयाच्या सन्निध, तितकीं तितकीं तीं भक्तीपासून दूर ), या न्यायानें लोककल्याणाचा वेदांत शतशः ज्यांच्या कानावरून गेला, व शतशः ज्यांनीं स्वतः त्याचा उपदेश इतरांस केला, त्याच वाक्पटूंच्या हृदयावर त्याचा ठसा पाहूं गेल्यास कितीसा उमटलेला आढळणार ?

[ केसरी, तारीख १० मे सन १८८१ ]

मागील खेपेस लोभाचें एक स्वरूप सांगण्यांत आलें. यापासून देशहिताच्या कामाला वारंवार अनेक अडचणी येत असतात. आतां, त्याहूनही विशेष प्रत्यूहकारक व अश्लाघ्य असा दुसरा प्रकार सांगतों.

स्वहितपरता हा मनुष्यस्वभावाला एक खिळलेला गुण असल्यामुळें, द्रव्यलोभ हा बहुतेक मनुष्यांत अत्यंत प्रबळ आढळतो यांत कांहीं नवल नाहीं. यास्तव लोककल्याणाच्या कामाला साक्षात् द्रव्यद्वारा साहाय्य करणारे फार थोडे आढळतात हें ठीकच आहे. नुसता प्रलाप मात्र करून वेळेवर हातांतून कांहीं न सुटणें हें जरी निंदेश व हास्यास पात्र आहे, तरी याबद्दल कोणाही व्यक्तीस विशेष दोष ठेवतां येत नाहीं; तशांत, ज्याची त्याची आपापल्या पैशावर मालकी असल्यामुळें, त्याचा व्यय करणें किंवा न करणें हें ज्याच्या त्याच्या खुषीवर आहे. पण पुष्कळजणांचे ठायीं वरील मनोविकार येवढ्याच रूपानें आविर्भूत होऊन राहात नाहीं; तर तो विकोपास जाऊन त्याचे निंद्य परिणाम निर्दशनास येऊं लागतात. यामुळें एकाद्या कामांत आपण पडलों असतां, आपला जो रास्त वांटा असेल, त्यापेक्षांही ज्यास्ती मिळण्याविषयीं आशा करणें, किंबहुना परप्रतारणा करून अभिलाषबुद्धि धरणें, हे प्रकार आमच्या देशांत फार आढळतात. कोणतीही सभा व मंडळी उपस्थित होवो, तींत प्रतिष्ठेचा वांटा किंवा पैशाचा वांटा यांच्या संबंधानें स्पर्धा उत्पन्न झाली नाहीं असें क्वचितच आढळेल. कोणत्याही मंडळींत सभासद होणें तें केवळ लोकहिताच्या इच्छेनें होणं, किंवा चिटणिशी अगर खजिनदारी पतकरणें ती प्रतिष्ठेच्या लोभाशिवाय किंवा द्रव्याशेशिवाय पतकरणें, हे विचार आमच्या देशांत कोणाच्या गांवींही नसतील. आतां ते मुळींच आढळणार नाहींत असें आमचें ह्मणणें नाहीं, पण इतकी लोककल्याणाची खरी कळकळ फारच थोडी आढळणारी आहे यांत मात्र बिलकुल शंका नाहीं; नेहमीचा प्रकार ह्मटला ह्मणजे हाच, कीं ज्याला लोकांच्या पुढें पुढें करायाला पाहिजे, किंवा आपलें नांव वर्तमानपत्रांतून वगैरे प्रसिद्ध व्हावें ही ज्यांस भारी हौस,

तेच वरील कामांत नेहेमीं झटून पडायाचे. मग असल्या अयोग्य इच्छा मनांत धरून जी मंडळी देशकल्याणाचीं कामें अंगावर घेण्यास तयार होणार, तिच्या ठायीं स्पर्धा, लोभ, मत्सर वगैरे दुष्ट मनोवृत्ति क्रमाक्रमानें उदयास येतात यांत नवल कसचें? चारचौघांनीं जें कार्य आरंभिलें, तें चांगलें सफळ व्हावें अशी जर इच्छा असेल, तर तें दृढनिश्चयानें व जुटीनेंच शेवटास नेलें पाहिजे! पण आमच्या मंडळ्यांतून वरील गोष्टींची प्रायः वार्ताही नको. अगोदर जुटीनें काम व्हावयाचें नाहीं; आणि त्यांतून यदाकदाचित् झालेंच तर फार काळ गेला नाहीं तों लागलींच सभाजनांत फूट पडायाला लागायाची! एकानें म्हणावें, मला काम ज्यास्ती पडतें, तेव्हां मला अधिक वांटा द्याल तर मी तुह्मामध्यें राहीन, नाहीं तर मला जरूर नाहीं; दुसरा ह्मणणार कीं अमुक अमुक गोष्टींत तुम्हीं माझें ऐकलें नाहीं, तेव्हां हें आपणास खपायाचें नाहीं;—याप्रमाणें थोड्या थोडक्या काळांतच एका कार्यांत अनेक फांटे फुटतात! पण या फांटे फोडणारांत येवढी समजूत फारच थोड्यांचे ठायीं आढळते कीं जो मुख्य उद्देश मनांत धरून या अमक्या कार्याला आपण जुडलों आहों, तर त्यांत व्याघात होईल असें आपणास चालतां नये. तशांत अमक्या अमक्यानें अमक्या अमक्या गोष्टींत आपला हेका चालविला तर चालवीना? मुख्य कार्यास जोंपर्यंत व्याघात होत नाहीं, तोंपर्यंत येवढ्याशा तेवढ्याशाकरितां तंटाबखेडा करणें बरोबर नाहीं. जो आपणास खरा देशहितेच्छु म्हणवीत असेल, व 'पिंडे पिंडे मतिर्भिन्ना' हें तत्व ज्यास चांगलें माहीत असेल, त्यानें अनेक प्रसंगीं वरच्यासारखेच विचार मनांत आणणें जरूर आहे, हें कोणासही सांगायाला नको. पण वरील समजुतीची आवश्यकता आणि तिचें वास्तव्य हीं बहुधा आमच्या देशांत व्यस्त प्रमाणांतच आहेत, हें, इकडील कांहीं सभांची हालहवाल ज्यानें लक्षांत आणली असेल, त्याच्या ध्यानांत आल्यावांचून बहुधा राहणार नाहीं

[ केसरी, तारीख १७ मे सन १८८१. ]

येथवर, वरील विषयाच्या संबंधानें जे कांहीं विचार आमच्या देशबंधूंस कळविण्यासारखे आम्हास वाटले, ते सादर केले. आतां, प्रस्तुतसारख्या विवेचनाच्या संबंधानें लोकांचे जे एकेक विलक्षण ग्रह प्रसंगवशात् होतात, त्यांच्या संबंधाने थोडेंसें लिहून, हा विषय आटपतों.

आमच्या देशांत अलीकडे चमत्कारिक दुफळी झालेली आहे. वीसपंचवीस वर्षांपूर्वी वरील दुफळी म्हटली म्हणजे जुने व धर्मभोळे लोक हा एक पक्ष, व अलीकडील विद्वान् मंडळी हा दुसरा पक्ष, अशा प्रकारची ती होती. हल्लीं ती स्थिति पालटून गेली आहे. मागें ज्या ठिकाणीं जुनी मंडळी होती, तेथें आतां, आमच्या संबंधानें जी जुनी मंडळी, म्हणजे अव्वल सुधारणेंतले पुढारी लोक, ते झाले आहेत. तेव्हां या जुन्या मंडळीनें आजपर्यंत काय काय कृत्यें केलीं, व त्यांत गुणदोषांचे भाग कोणकोणते होते, याविषयीं हल्लींच्या नवीन मंडळीने चर्चा चालू केलेली आहे. खरोखर पहातां, आमच्या नवीन सुधारणावाल्यांस ही चर्चा एवढी दुःसह होऊं नये. कां कीं, एक तर, त्यांनीं जो चर्चेचा कित्ता आरंभीं घालून दिला तोच आम्हीं पुढें चालविला आहे. याशिवाय पूर्वीच्या लोकांस बरेंवाईट म्हणण्याचा अधिकार जसा आमच्या मागच्या मंडळीनें खुशाल घेतला तसाच तो आह्मासही घेण्यास प्रत्यवाय कोणता ? पण ही गोष्ट येवढी उघड असतां, मनुष्यस्वभावास खिळलेला जो स्वाभिमान, त्याच्या प्राबल्यास्तव, पुष्कळ पंडितंमन्य जनांस ती चांगलीशी दिसत नाहीं असें वाटतें. त्यांचा ग्रह असा झालासा वाटतो कीं आजपर्यंत दुसऱ्यांचें दोषाविष्करण आम्हीं केलें तें ठीक होतें; पण आमच्यावर तोच प्रयोग होऊं लागेल, तर मात्र आपण त्यास पात्र नाहीं; कांकीं आपल्या करणीस नांवें ठेवण्यास कोणासही अधिकार नाहीं.

वरील असमंजसपणाच्या उक्ति, केवळ अशाच स्पष्ट रीतीनें, कोणी बोलण्यांत आणीत नाहींत हें खरें; तरी आमच्या पुढारी मंडळीच्या

आजपर्यंतच्या वागणुकीवरून, एकंदरींत पाहतां, हाच मतलब नजरेस येतो. आपणावर येणारा वाजवी दोषही कबूल करण्यास त्यांस मोठी पंचाईत पडते; इतकेच केवळ नव्हे, तर कांहीं तरी लटपट करून, तो आपणावर न येऊं देण्याविषयीं त्यांची उत्सुकता आढळते. मग मत्सर, अनुभवशून्यता वगैरे कांहीं तरी खऱ्या खोट्या गोष्टींचा आरोप आपल्या प्रतिपक्ष्यावर करून, ते आपले समाधान करूं पाहतात! हा सर्व प्रकार आम्हास तर फार अश्लाध्यतेचा वाटतो. शहाणपणाचा प्रवाह आपल्यापर्यंत काय तो येऊन, तेथेंच जान्हवीप्रमाणें गुप्त झाला, ही समजूत अगोदर किती बरें कोती आहे! आपण जो अधिकार आपल्या पूर्वींच्या मंडळीवर चालवला, तोच चालवण्याची आपल्या पुढल्या पिढीस मात्र मनाई, ही केवढी कुत्सित दृष्टि म्हणावी! जें जे दोषाविष्कारण आपण जन्मभर करीत आलों तेवढें मात्र सर्व लोकहितार्थ; पण तेंच व्रत जो कोणी यापुढें चालवूं ह्मणेल, तो मात्र तसें करण्यानें खोडसाळ, हा केवढा अन्याय ह्मणावा!

हा सर्व प्रकार मनांत आणून, या आमच्या पत्रांतील लेखांच्या संबंधानें आम्ही येथे सरते शेवटीं पुनः सर्वांस स्पष्टपणें सांगून ठेवतों, कीं हातीं घेतलेल्या कोणत्याही विषयावर आमचीं जीं जीं मतें, विचार करतां करतां, ठरलीं आहेत, तीं तीं, जशींचीं तशीं, प्रांजलपणें व निर्भीडपणें, येथें सादर करण्याचा आमचा कृतसंकल्प आहे. मनुष्याच्या प्रमादपात्रत्वास्तव तीं कधींकधीं चुकीचींही असतील, नाहींतशीं नाहींत; पण सत्यनिष्ठेहून अन्य ज्या कुत्सित मनोवृत्ति, त्यांपासून मात्र त्यांचा उद्भव कधींही असणार नाहीं, याविषयीं आमची आम्हाला खात्री आहे. कोणाची हांजीहांजी करून, 'भूमौ निपत्य वदनोदरदर्शनञ्च' इत्यादि प्रकार जसा 'केसरी'च्या स्वभावास सर्वथा विरुद्ध, त्याप्रमाणेंच आडून घाला घालण्याचें घातुकत्व व भीरुत्व हींही त्याला अपरिचितच होत ह्मणून समजावें. वरील निंद्य मनोवृत्तींची संभावनाही आमच्या वाचकांनीं करूं नये. सर्व प्रकरणांच्या संबंधानें लोकांस यथार्थ ज्ञान व्हावें व त्यांस आपले योग्य अधिकार नीट समजावे हा

उद्देश सिद्धीस नेण्यास स्पष्टोक्तीशिवाय दुसरा मार्ग नाहीं. हें कसें लिहावें, तें कसें बोलावें, या वाक्यानें सरकाराची खप्पा मर्जी होईल, तें विशेषण अमक्या तमक्याला बोंचेल, या भीतीनें जो आपलीं खरीं मतें बाहेर काढण्यास भिईल, त्याच्या हातून वरील हेतु चांगल्या रीतीनें कधींही तडीस जाणार नाहींत. करतां, याच पूर्वसंकल्पास अनुसरून, आमच्या देशांतील सभा व मंडळ्या यांच्या संबंधानें जें जें आमच्या दृष्टोत्पत्तीस आलें, तें तें आम्हीं सर्वांस स्पष्ट भाषेनें जाहीर केलें, त्यांत सत्यनिरूपणाखेरीज दुसरा कोणताही आमचा हेतु नाहीं. यास्तव सदरील सभांचा अभिमान धरणाऱ्या गृहस्थांस जरी आमचे विचार न रुचले तरी ते यथार्थ आहेत कीं अयथार्थ आहेत याविषयीं त्यांनीं अवश्य विचार केला पाहिजे. केवळ वृथाभिमानानें जर सदरील मंडळ्यांतल्या दोषांवर पांघरूण घालण्याचा ते प्रयत्न करतील तर ते दोष कधींही निघावयाचे नाहींत. मग दोष न निघाल्यानें आमच्या सभांची व्यवस्था आजपर्यंत जशी चालली आहे तशीच ती पुढेंही चालेल हें उघड आहे. पण असें झालें असतां काय परिणाम होईल तो सांगायास नकोच. तो अर्थात् हाच कीं अशा सभांपासून अपेक्षित जें लोकहित तें कधींही लाभणार नाहीं

याप्रमाणें उपसंहार करून, याविषयासंबंधानें आम्ही आपली लेखणी खालीं ठेवतों.

---

# मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी.

[ केसरी, ता २४ मे सन १८८१ ]

ही मंडळी निघून आज तीन वर्षे होऊन गेलीं. या तीन वर्षांतल्या तिच्या एकंदर कारभाराची हकीगत, परवां, येथील टौनहॉलांत, मंडळीचे नवे चिटणीस नामदार गोपाळराव हरि देशमुख यांनीं, जाहीरसभा भरवून, सर्वांस कळविली. नवे चिटणीस म्हणण्याचें कारण सर्वांस महशूर आहेच कीं, रा० रावजी प्रभाकर भावे यांनीं मंडळीचें दिवाळें काढण्याचा रंग आणल्यामुळें नामदार साहेबांस जातीनें हिचा कारभार

हातीं घ्यावा लागला. परवांचे प्रसंगीं, मंडळीचे दुसरे उपस्थापक राव-बहादूर महादेव गोविंद रानडे यांनीं सभाजनांस उघडपणें सांगितलें, कीं मंडळीची सध्यांची स्थिति अगदीं वाईट आहे; ती गेल्या सालीं मोडून टाकण्याचाही विचार निघाला होता; पण आणखी एक वर्षभर दम धरून, काय होतें तें पाहावें, या उद्देशानें आणखी एका वर्षाची अवधि तिला दिली आहे. या वर्षांत एक नवा नियम अमलांत आणण्याचा त्यांचा विचार आहे; त्याच्या संबंधानें पुढें लिहिण्यांत येईल. सध्यां प्रस्तुत मंडळीच्या संबंधानें बऱ्याच गोष्टी वाचकांस कळविण्यासारख्या आहेत, व या तिच्या हकीगतीवरून बराच उपदेशही घेण्यासारखा आहे. तर येथूनच प्रथमतः आरंभ करतों.

प्रस्तुत मंडळीचा उद्देश तिच्या नांवावरून स्पष्टच आहे. तो हा कीं तिच्या योगानें चांगले चांगले ग्रंथ मराठींत होऊं लागावे; ह्मणजे लोकांपासून जी वर्गणी सालीना गोळा होईल तिच्या रकमेंतून चांगल्या ठरलेल्या ग्रंथांच्या प्रति मंडळीनें विकत घ्यावयाच्या व त्या वर्गणीदारांकडे पाठवायाच्या, व अशा रीतीनें चांगल्या ग्रंथकारांस उत्तेजन द्यावयाचें. सदरील मंडळीच्या नुसत्या नांवावरून पाहतां, अशी समजूत होते कीं, जशी आज तीस वर्षें दक्षिणा प्रैज कमिटी आहे, व ती सर्वानुमतें उत्कृष्ट ठरलेल्या ग्रंथांस बक्षीसें देऊन ग्रंथकाराची संभावना करते, तसाच कांहीं उद्देश हिचाही असावा. पण राव-ब. रानडे यांनीं पहिल्या व दुसऱ्याही खेपेस मंडळीचा उद्देश स्पष्ट-पणें असा सांगितला कीं, ही केवळ ग्रंथप्रकाशक मंडळी आहे; ह्मणजे ग्रंथकारांनीं तयार केलेला माल पारखून, तो चांगला ठरल्यास हिनें बाजारांत मांडावयाचा, व आपल्या विद्यमानें त्याची जी विकरी होईल, ती, आपलें कमिशन कापून घेऊन, मालकाच्या पदरांत टाकायाची, इतकेंच या मंडळीचें काम! आतां, वरील उद्देशाविषयीं विचार करतां हें कोणीही कबूल करील, कीं वरच्या इतकें जरी ग्रंथकारांचें काम उरकलें तरी थोडें नाहीं. आपण तयार केलेला जिन्नस कोणत्या वसुलाचा उतरला आहे, व त्यास बाजारांत कोणी विचारील कीं नाहीं,

हेंच अगोदर निश्चयानें समजण्याची ग्रंथकारास मोठी मारामार पडते. असें होण्याचीं कारणें अनेक आहेत. एक तर आपल्या कृतीविषयीं आपणास नेहमीं यथार्थ परीक्षा होते असें नाहीं; कधींकधीं आपण तिची योग्यता थोडी असतां, स्वाभिमानास्तव ज्यास्त समजतों; आणि कधींकधीं संकोचवृत्तीस्तव किंवा अनभिज्ञतेस्तव उलटा प्रकारही होतो. हें ग्रंथाच्या वास्तविक गुणावगुणांविषयीं झालें. बाजारांत त्याचा काय दर ठरेल हें तर एक निराळेंच प्रकरण आहे. तें समजण्यास बाजारांत फिरून गिऱ्हाइकांच्या अभिरुचीचें मान ध्यानांत आणलें पाहिजे. 'मंजुघोषे-' च्या चार आवृत्ति निघून गेल्या आहेत, व 'जय-पाळा-' ची मारामारीनें दुसरी निघाली आहे, या एका उदाहरणावरून वरील मान बरेंच ध्यानांत येण्यासारखें आहे. हे सर्व प्रकार मनांत आणले असतां, ग्रंथांची स्वतंत्र रीतीनें परीक्षा व्हावी हें किती आव-श्यकतेचें आहे हें कोणासही कळून येईल. वरच्यासारखी परीक्षा झाली असतां, ग्रंथकारांचीतर उत्तम सोय होणार आहे हें उघडच आहे; पण वाचक मंडळीची अभिरुचि सुधारण्यासही हा एक मार्ग होणार च आहे. वाईट ग्रंथांच्या ऐवजीं चांगले ग्रंथ त्यांच्या हातीं पडल्यानें, त्यांस न चांगलें कोणतें व वाईट कोणतें यांतील तारतम्य थोडेबहुत कळूं लागेल, हें एक; आणि शिवाय विद्वन्मान्यता कोणत्या प्रकारच्या ग्रंथांस मिळते हेंही त्यांस समजूं लागेल, हें दुसरें.

यावरून एकंदरींत पाहतां, राव ब० रानडे व देशमुख यांनीं न-वीन ग्रंथकार व वाचकमंडळी या दोघांच्याही हिताचा हा चांगला उपाय योजला होता यांत संशय नाहीं. आतां तो सिद्धीस कां गेला नाहीं, व करायाचें एक असून भलतेंच कां झालें, याचीं जीं कारणें आमच्या बुद्धीस वाटतात त्यांचें उद्घाटन पुढील अंकीं करूं.

[ केसरी, तारीख ३१ मे १८८१ ]

सदरील मंडळी ही इंग्लंडांतील 'ट्राक्ट सोसाइटी' या नांवाच्या मंडळ्यांच्या धर्तीवर निघालेली आहे. 'ट्राक्ट' म्हणजे स्फुट ग्रंथ; म्हणजे ज्या पुस्तकांत थोडक्यांत, सुबोध रीतीनें, एकाद्या विषयाचें

विवेचन केलेलें असतें तो. अशा मंडळ्या विलायतेंत या शतकांत पुष्कळ चालू झाल्या. विशेषतः पाद्री लोकांनीं स्वधर्मोन्नत्यर्थ वरील पुस्तकांची प्रवृत्ति पुष्कळ पाडली. एतद्देशीय भाषांतूनही बारीकसारीक पुस्तकें, शेंकडो तऱ्हेचीं, मिशनरींनीं प्रसिद्ध केलीं आहेत. लोकांत सुलभतेनें ज्ञानाचा प्रसार करण्यास वरील उपाय फार उत्तम आहे हें उघडच आहे. पण विलायतेंत अशा मंडळ्या सुरळीत रीतीनें कां चालतात, व आमच्या येथें मात्र तशी एक मंडळी सुरू झाली न झाली, तोंच ती अशा पेचांत कां पडली, याचा विचार आतां करूं.

अशी मंडळी यथास्थितपणें चालण्यास अनेक साधनांची आवश्यकता आहे. प्रथमतः लोकांस बरीच वाचनाभिरुचि पाहिजे. म्हणजे एकादा चांगला ग्रंथ झाला तर त्यांतले गुण समजण्यापुरती थोडीबहुत मार्मिकता त्यांच्या अंगीं पाहिजे; निदान नवीन ग्रंथ वाचण्याचा छंद तरी पुष्कळांस असला पाहिजे. या गोष्टीच्या संबंधानें विलायतेंत व हिंदुस्थानांत केवढें जमीनअस्मानचें अंतर आहे हें बहुधा कोणालाही सांगायाला नको. तिकडे कित्येक दररोजच्या वर्तमानपत्रांच्या लाख लाख प्रति काढाव्या लागतात; इकडे आमचें 'पुणेंवैभव' रोजकरी होतें, त्यास आठवडेकरी होणें भाग पडतें. तिकडे अगदीं सामान्य ग्रंथाच्यासुद्धां कित्येक आवृत्ति निघून जातात; इकडे दुसऱ्या आवृत्तीचा योग आला म्हणजे ग्रंथकाराचें परम भाग्य! तिकडे मोलमजुरी करणाऱ्या लोकांचींसुद्धां हजारों वाचनालयें आहेत; इकडे पुण्यासारख्या ज्ञानामृतानें उचंबळणाऱ्या शहरांत कधीं काळच्या एका वाचनालयानें सरकारवाड्याबरोबर सहगमन केलें, तों दुसरें स्थापन होतां होतां किती सायास व पंचाइती! तेव्हां तिकडील मंडळ्यांस ही एक मोठी सोय आहे कीं, त्यांनीं एकादा ग्रंथ छापायास घेतला तर त्यांस त्याच्या पुष्कळ प्रति काढतां येतात; व प्रति पुष्कळ काढल्यानें किंमतही त्यांस कमी ठेवतां येते. इकडे वाचकांच्या अल्पसंख्येमुळें वरील दोन्ही गोष्टी होऊं शकत नाहींत. अलीकडे खेड्यापाड्यांतूनसुद्धां शाळा झाल्यामुळें पुस्तकें वाचतां येणारांची संख्या

जरी वाढली आहे, तरी विद्याखात्याच्या विचित्र शिक्षणपद्धतीमुळें लोकांत अभिरुचि म्हणून फारच थोडी आढळते. त्यांतून, ज्यांस कर्मणुकीखातर पुस्तक वाचावेंसें वाटतें, त्यांस हातचा पैसा सुटे इतकी उत्कट वाचनेच्छा अद्याप झालेली नाहीं. तेव्हां आमच्या देशांत ग्रंथोत्तेजक मंडळी हवी तशी चालण्यास, पहिली मोठी अडचण म्हटली ह्मणजे वाचनाभिरुचीचा अभाव ही होय.

आतां दुसऱ्या पक्षीं हेंही खरें आहे कीं, वरल्यासारख्या मंडळ्या निघाल्यावांचून किंवा अन्यद्वारें पुस्तकांची पुष्कळ समृद्धि होऊन तीं लोकांच्या हातीं पडल्यावांचून, वाचकांचे ठिकाणीं अभिरुचि तरी उत्पन्न व्हावी कशी? संस्कृतांत अन्योन्याश्रय ह्मणतात त्यांतलाच हा प्रकार आहे. जसा बीजावांचून वृक्ष नाहीं, व वृक्षावांचून बीजही नाहीं; किंवा धनावांचून व्यापार नाहीं, व व्यापारावांचून धनही नाहीं; त्याप्रमाणेच लोकांच्या ठायीं अभिरुचि असल्याखेरीज भाषेत ग्रंथसंग्रह होणें कठीण, व ग्रंथसंग्रह झाल्याखेरीज अभिरुचि उत्पन्न होणें कठीण! अशा गुंतागुंतींत मार्गक्रमण करावें कसें, असें जर कोणी विचारील, तर त्यास उत्तर यवढेंच आहे कीं, ग्रंथकार व वाचक या दोघांनींही वरील द्वैधाकडे लक्ष पुरवून थोडथोडी घस सोसली पाहिजे. केवळ आपल्या श्रमांप्रमाणें किंवा योग्यतेप्रमाणें जरी आपल्या ग्रंथापासून आपणास लाभ झाला नाहीं, तरी चिंता नाहीं; पुष्कळ अंशीं लोकोपकारावर व लोकाभिरुचीच्या वृद्धीवर नजर ठेवून, आपली कृति वाचकांस जितकी सुलभतेनें मिळेल तितकी मिळण्याची तजवीज ग्रंथकारानें ठेविली पाहिजे. तसेंच दुसऱ्या पक्षीं लोकांनींही, नवीन ग्रंथकारांस उत्तेजन देण्याची बुद्धि मनांत धरून, व ग्रंथांचा प्रसार हेंच ज्ञानवृद्धीचें व सुधारणेचें उत्कृष्ट साधन आहे हें लक्षांत आणून, होईल तितका इकडे आपल्या धनाचा व्यय करण्याचा संकल्प केला पाहिजे. असें झालें असतां, थोड्याच काळांत, लोकांच्या अज्ञानाचा व ग्रंथकारांच्या दैन्याचा, एकसमयावच्छेदेंकरून, परिहार होण्यासारखा आहे असें आम्हास वाटतें.

[ केसरी, ता० १४ जून १८८१ ]

प्रस्तुतसारखी मंडळी चालण्यास दुसरें अवश्य साधन हें होय कीं, पुस्तक लोकप्रिय होईल अशा रीतीनें त्याची रचना करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यामध्यें आहे, अशा ग्रंथकारांची तिला अनुकूलता पाहिजे. लोकप्रिय ग्रंथरचना म्हणजे अशी कीं, सुबोधतेमुळें व मनोवेधकतेमुळें ग्रंथांतील विषयांचें ग्रहण वाचकांस त्वरित व्हावें व तो विषय त्यांच्या मनांत चांगला ठसावा. अशी रचना झाली असतां, लोकांस ग्रंथवाचनाची गोडी लाविण्यास व ते सुलभ करण्यास, ती किती कारणीभूत होणारी आहे, हें कोणासही सांगणें नलगे. पण ही कला इतर कलांप्रमाणेंच श्रमसाध्य होय. कांकीं, अमुक विषय उत्तम रीतीनें अवगत आहे ह्मणून तो दुसऱ्यास सुबोध रीतीनें समजावून देतां येईलच, असें ह्मणतां येत नाहीं; हें जसें खरें आहे, त्याचप्रमाणें कोणत्याही एका विषयावर यथास्थितपणें विवरण करणारे ग्रंथकार जरी पुष्कळ सांपडतील, तरी नवशिक्यांच्या मनांत तो सहज उतरेल अशा रीतीनें त्याचें उपपादन करतां येणें बरेंच कठिण आहे, यांत शंका नाहीं. यास्तव, ग्रंथरचनेच्या कामांत जे चांगले वहिवाटलेले आहेत, त्यांच्यावांचून इतरांच्यानें लोकप्रिय ग्रंथ रचण्याचें काम सहसा निभणार नाहीं. ज्यांनीं आपापल्या विषयाचा पुरा अभ्यास करून व त्याचें सतत मनन करून ते करतलामलकवत् करून टाकले आहेत व ग्रंथरचनेच्या कामांतही जे घटावलेले आहेत, तेच ग्रंथकार या कामाला योग्य; व अशा प्रकारच्या ग्रंथकारांचा जितका अधिक जमाव जमेल तितका ग्रंथोत्तेजक मंडळीच्या फार उपयोगाचा आहे.

आतां, हें साधन तरी आपल्या देशांत सध्यां कितपत सिद्ध आहे, असा जर कोणीं प्रश्न केला, तर पहिल्या साधनासारखीच याचीही अत्यंत उणीव आहे, हेंच उत्तर द्यावें लागेल. प्रथमतः ही एक गोष्ट तर सर्वांस माहीत आहेच, कीं हल्लींच्या शिक्षणपद्धतींत सतरा विषय घुसडून दिले असल्यामुळें, कोणत्याही एकाच विषयांत एकाद्यानें पारंगत व्हावें, ही गोष्ट बहुतकरून घडत नाहीं. सर्वांनीं गुडघाभर पाण्यांत पोहावें

हीच एकंदर स्थिति ! त्यांतून, कोणास एकदा विद्येची चट लागून, अमुक एका विषयाची गोडी लागली, व त्यांत आपण निष्णात व्हावें असें वाटूं लागलें, तर आपला हेतु सिद्धीस नेण्यास त्याला कितीतरी अडचणी असतात ! पहाकीं, एकाच विषयाकडे जों जों तो विशेष लक्ष देऊं लागतो, तों तों त्याचे इतर विषय त्यास अंतरतात. यामुळें अखेरीस परीक्षेच्या धोशापुढें त्यास तसें सहसा करवत नाहीं. शिवाय अगत्याच्या पुस्तकांच्या वगैरे अभावाच्याही अडचणी थोडया असतात असें नाहीं. समजा कीं, एकाद्यास रसायनशास्त्राचा किंवा भूगर्भशास्त्राचा अभ्यास करावासा वाटला, तर त्यानें इतकें सामान कोठलें पैदा करावें ? मोठमोठे मूळ ग्रंथ कोठून मिळवावे ? व ते समजावून सांगणारा तरी त्यास कोण भेटावा ? आतां, असेही दुसरे कित्येक विषय आहेत कीं ते केवळ स्वतांच्याच मेहनतीनें व अभ्यासानें साध्य होण्यासारखे आहेत; पण मेहनत व अभ्यास हें भांडवल-तरी आमच्या देशांत इतर भांडवलाच्याच तोडीचें आहे ! केवळ स्वतःच्या हौसेनें अभ्यास करणारे गृहस्थ आमच्यांत आज-मितीला कितीसे निघतील ?-फारच थोडे, यांत संशय नाहीं. मग, अनेक विषयांत अनेकजण पारंगत आहेत, व एकेकानें एकेक विषय हातीं घेऊन त्यावर महाराष्ट्रभाषेंत उत्कृष्ट ग्रंथरचना करण्याची खटपट चालविली आहे, असा शुभ योग जुळण्याचा सांप्रत कितीसा संभव आहे, हें सांगावयास नकोच.

तिसरें साधन द्रव्याची अनुकूलता. प्रस्तुत मंडळीनें हातीं घेतलेलें काम, हें, देशहिताच्या इतर सर्व कामांप्रमाणेंच, द्रव्याधीन आहे, हें उघडच आहे. दाणेवाल्यास कोठारें भरून ठेवणें जसें जरूर, व असा गल्ला, पैसा भरपूर असल्याखेरीज, जसा जमा होणें नाहीं, त्याप्रमाणेंच विद्येचे भुकेल्या लोकांस लागतील तसतसे तऱ्हेतऱ्हेचे ग्रंथ पुरवण्याचा ज्यांनीं मक्ता घेतला, त्यांनीं प्रथमतः पैसाही तसाच विपुळ खर्चला पाहिजे. ग्रंथकारांस पैसा भरून, ग्रंथ पैदा केले पाहिजेत, व ते छापून तयार करण्यासही पिशवीचें तोंड मोकळें सोडलें पाहिजे

आतां, हें कृत्य झटलें म्हणजे, अर्थातच, तें एकाद्या हुरडेफुंक्याचें किंवा दीडदमडीच्या मंडळीचें खचित नव्हे. तें घेतलेंच तर एकाद्या धनाढ्य सावकारानें हातीं घेतलें पाहिजे, किंवा त्यासाठीं एकादी टोलेजंग मंडळी निघाली पाहिजे, किंवा सर्वांचे मायबाप जें सरकार त्यानें स्वतः ते अंगीकारलें पाहिजे. दरम्यान, तुकारामबोवांच्या ह्मणण्याप्रमाणें ‘ येरा गव्हाराचें काम नाहीं ’ अशीच त्याची स्थिति व्हावयाची ! आतां वरील तिहींपैकीं पहिल्या दोन पुरस्कर्त्यांविषयींतर बोलायाला नकोच; कांकीं, सावकार मंडळी आपल्या व्याजबट्टयांत चूर, व सरदार मंडळी अजून रागरंगांतच धुंद आहे ! एकादी बडी मंडळी निघायाची, तर आजपर्यंत कितीकांच्या किती वाटा लागल्या त्या सर्वांनीं पाहिल्याच असल्यावर, आणखी मग नवीन काढली असतां, तिला कितीसें यश येणारें आहे तें दिसतेंच आहे. राहिलें साहिलें तिसरें सरकार. चोंहोंकडचा उपाय हरला, म्हणजे शेवटली प्रार्थना या महादेवताची करायाची ! तीही केली तर त्यास म्हणायाला सवड ्‍ हेच, कीं आम्हीं महाराष्ट्रभाषेच्या प्रीत्यर्थ दोन सत्रें घालून ठेवलींच आहेत;—एक दक्षिणाप्रेज कमिटी, व दुसरें मराठी ट्रॅन्स्लेटरांचें आफिस. या दोन दरवाजांशीं जा, आणि पवित्रशास्त्रांतील वचनाप्रमाणें तेथें ‘ ठोका, म्हणजे उघडेल. ’ दक्षिणाप्रेज कमिटी तुमच्याकरतां आज तीस वर्षे सतत खपत आहे, व डायरेक्टर साहेब दरवर्षीं अनेक ग्रंथकारांचा परामर्श घेत आहेत; मग अझूनही तुमची हाकाहाक आहे ती आहेच, यास काय ह्मणावें ! याप्रमाणें तिघांच्या तीन वाटा झाल्यावर, हें तिसरें साधन जें द्रव्य, त्याचें आनुकूल्यही आमच्यापाशीं जितक्यास तितकेंच आहे हें उघड झालें !

[ केसरी, तारीख २१ जून १८८१ ]

येथवर, प्रस्तुत मंडळीच्या संबंधानें आम्हीं सामान्यतः विवेचन केलें. आतां, या मंडळीस हल्लीं जी निकृष्टावस्था प्राप्त झाली आहे ती कशामुळें, याविषयीं आह्मास जे वाटतें, तें वाचकांस सादर करतों. हें रोगनिदान करण्यांत सत्याचा परिस्फोट हाच आमचा मुख्य उद्देश आहे हें सांगणें नकोच.

घर बांधायाचें असेल आणि तें पुष्कळ दिवस टिकावें असें मनांत असेल, तर त्याचा पाया भक्कम भरून, खांब, तुळ्या वगैरे सामानही चांगलें मजबूत घ्यावें लागतें; याच नियमानें एकादें लौकिक कृत्य, चांगल्या रीतीनें, सुरळीत चालावें अशी जर इच्छा असेल, तर अगोदर त्याची व्यवस्थाही तशीच ठाकठिकीची करून ठेवणें जरूर आहे. ही व्यवस्थाच जर मुळीं लटपटीत असली, तर द्रव्याचें व मनुष्यांचें कितीही आनुकूल्य असलें, तरी कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. या दृष्टीनें पाहतां, ग्रंथोत्तेजक मंडळीच्या व्यवस्थेंत पुष्कळच उण्या गोष्टी आढळतात, असें ह्मणणें भाग आहे. कोणत्या, त्या पुढें सांगतों.

या मंडळीची पहिली विलक्षण व्यवस्था ही कीं, आमच्याकडे वर्गणीदारांनीं वर्षाचा आकार ह्मणून पांच रुपये पाठवून द्यावे, आणि जीं पुस्तकें प्रसिद्ध होतील तीं आह्मी त्यांच्याकडे पाठवूं, त्यांपैकीं जीं पसंत पडतील तीं ठेवून बाकीचीं त्यांनीं आमच्याकडे परत पाठवावीं. हा असला भोपळसुती नियम, लोकव्यवहार जाणणाऱ्या आमच्या दोघा रावबहादुरांनीं कसा केला, हें आम्हास कांहींच समजत नाहीं. असल्या भलेपणाचा नियम सत्ययुगांत कदाचित् चालला तर न जाणों; बाकी कलिमहाराजांच्या कारकीर्दींततर तो बिलकूल चालण्यासारखा नाहीं हें कोणीही सांगेल ! सदरील मंडळीकडे एकदा पांच रुपये भरले, किंवा निदान फुकाची सही गुतवून ठेवली, कीं तिचे सारे ग्रंथ, आपण होऊन, आपल्याकडे यावयाचेच; मग ते सारे वाचावे, आणि मुकाट्यानें परत करावे; शेवटीं एकदा कळवावें म्हणजे झालें, कीं यांतून आमच्या पसंतीस एकही उतरला नाहीं ! कारण एकादा तरी ग्रंथ घेतलाच पाहिजे असा मंडळीचा कांहीं नियम नाहींच ! मग ग्राहकांनीं तरी कां मागें पुढें पहावें ? मंडळीला अर्थात् तीं चोळवटालेलीं पुस्तकें परत घेणें भाग ! त्यांतही, अशीं चोळवटलेलींतरी परत पाठविणारे ग्राहक किती भेटणार, कोण जाणे? कां कीं, पदरचे दोन चार आणे टपालखात्याला द्या व फुकाच्या सहीवारीं घरीं चालत आलेल्या सरस्वतीस माघारीं दवडा, एवढा अनुदार व इतका कठोर कोण सांपडेल !

आतां, आमच्या रावबहादुरांनीं कदाचित् असा विचार केला असेल कीं, आपण जसे संभावित आहों, त्याप्रमाणेंच आपले एकंदर देशबांधवही आहेत; यास्तव वरील प्रतारणा करण्याची बुद्धि त्यांच्या ठायीं उत्पन्न होणार नाहीं. अशी थोर बुद्धि मनांत वागविली असतां, तींत कांहीं गैर नाहीं; पण जगांत वस्तुतः काय प्रकार आढळतो, त्याकडे लक्ष दिल्यावांचून एकाद्या कार्यास प्रवृत्त होणें हें बरीक नीट नव्हे. पैशाच्या कामाला मोठमोठे बडे ह्मणविणारेही किती जड असतात, वर्तमानपत्रांच्या किंवा मासिक पुस्तकांच्या वर्गणीपैकीं किती तरी वसूल वर्षोनवर्षे थकून, शेवटीं त्यावर पाणी सोडण्याचा कसा प्रसंग येतो, 'तुमचीं नांवें प्रसिद्ध करूं' हें शेवटचें पाशुपतास्त्र काढण्याविषयीं 'इंदुप्रकाशा-' सारख्यांनीं धमकी दिली असतां, तीसही न जुमानणारी खमंग मंडळी किती आहे, खोटीं नांवें धारण करून वर्गणीदारांच्या पटांत सामील होणारे, व खात्याचा उतारा आला असतां 'मालक सांपडत नाहीं' किंवा 'या ...ंत्राचा इसम येथें नाहीं' या महामंत्राच्या प्रयोगेंकरून अंतर्धान ...वणारे सिद्धपुरुष किती आहेत, इत्यादि गोष्टी सदरील मंडळीच्या ...स्कर्त्यांपैकीं कोणाच्याही बिलकूल लक्षांत आल्या नाहींत, हें मोठें ...ाश्चर्य आहे!

पण हा निव्वळ लबाडीचाच प्रकार झाला. तो सोडून, सर्व वर्गणीदार प्रामाणिक व साळसूद आहेत असें जरी घेऊन चाललें, तरी सदरील मंडळीचा वरील नियम कसा निभणार, हें कळत नाहीं. पहा कीं, मंडळीनें प्रथमतः साडे तीन रुपयांचें 'कृषिकर्म' आपल्या साऱ्या वर्गणीदारांकडे पाठविलें. वर्गणीदारांनींही वरील पुस्तकाचा आभारपूर्वक स्वीकार केला. पण पुढें काय? सदरील पुस्तक कितीकांनीं सबंद वाचलें असेल बरें! कृषिकर्म हें साऱ्या राष्ट्राच्या जीवनाचें मूळ असल्या कारणानें त्यांत सुधारणा होणें इष्ट आहे; व त्यावर एखादा ग्रंथ झाला असतां, त्यांत कांहीं वावगें नाहीं. या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; पण हल्लींच्या स्थितींत

वरील पुस्तकाचा काय उपयोग होण्यासारखा आहे, हें पहावयास नको काय? त्याचा खरोखरी उपयोग म्हटला तर शेतकरी लोकांस. पण ते तर अक्षरशून्य पडले! असें असल्यामुळें तो त्यांच्या कामास खास पडणारा नव्हे. दुसऱ्या पक्षीं, वरील ग्रंथाचे जे खरे भोक्ते, ते शेतकीचें काम करणारे नाहींत; यामुळे वरील शुष्क वचनापासून त्यांसतरी काय फळ होणार? विलायतेंत शेतकरी लोक चांगले वाचणारे आहेत, तेव्हां तिकडे असले ग्रंथ होतात व चटकर खपून जातात, हें ठीकच. तसें इकडे काय आहे? हीच गोष्ट, दोन रुपयांचा 'स्वाध्याय' व दीड रुपयाचें 'आश्वलायनगृह्यसूत्र' यांचीही होय. हीं दोन पुस्तकें कितीशा वाचकांस पसंत पडण्यासारखीं आहेत बरें! 'तारा नाटक,' 'स्वपराक्रम,' 'तुर्क व रूस या देशांतील लढाईचा इतिहास,' 'लार्ड बेकन्' या पुस्तकांविषयीं पाहतांही असेंच म्हटलें पाहिजे कीं, निव्वळ मराठी वाचकांस तीं विशेष आवडण्यारखीं नाहींत. ज्यांस इंग्रजीचें ज्ञान आहे त्यांसच तीं रुचण्यासारखीं, किंबहुना समजण्यासारखीं आहेत. तेव्हां, हें सर्व ध्यानांत आणलें असतां, ग्रंथोत्तेजक मंडळीचीं जीं पुडकीं वर्गणीदारांच्या नांवानें रवाना होतात, तीं बहुतेक, जशींचीं तशींच, माघारीं आल्यास नवल कसचें? यांत अपराध कोणाचा? आणि असा प्रकार चालला असतां मंडळीचा कारभारतरी नीट चालावा कसा?

शेवटीं वरील अडचण जेव्हां भासूं लागली, तेव्हां व्यवस्थाकांनीं, आपला पाहिला घबाड नियम मोडून, असा प्रघात सुरू केला कीं, आम्ही नुसतीं ग्रंथांचीं नांवेंमात्र प्रसिद्ध करूं; तितक्यावरूनच पुस्तकाची पसंती करून, वर्गणीदारांनीं मागण्या कराव्या. हा नियम वरील ग्रंथसत्रापेक्षां कांहीं बरा आहे हें खरें; तरी यांतही विचित्रपणा कमी आहे असें नाहीं. नुसत्या नांवावरून ग्रंथाच्या अंतर्गत स्वरूपाची परीक्षा करतां येणें किती दुर्घट आहे, किंबहुना अशक्य आहे, हें कोणालाही सांगायाला नकोच. त्यांतून, ज्यांस सज्ञान करण्याकरितां मुळीं ग्रंथोत्तेचक मंडळीची स्थापना झाली, त्यांसच तिनें, वरील विलक्षण तऱ्हेनें,

पुस्तकें पसंत करावयास सांगणें म्हणजे किती विचित्र आहे! वरील प्रकार म्हटला म्हणजे एकाद्या दुकानदारानें आपला माल कुप्यांतून किंवा भिंगाच्या कपाटांतून ठेवून द्यावा, आणि गिऱ्हाइकांस तो दुरून पहावयास सांगावा, यासारखाच तऱ्हेवाईक होय, असें आम्हास वाटतें.

हल्लीं तर, असें कळतें कीं वरील प्रकारही सुटला आहे. परवां येथें सदरील मंडळीनें जी सभा भरवली होती, तींत असें ठरलें आहे कीं, जीं जीं नवीन पुस्तकें मंडळीकडून प्रसिद्धीस येतील, तीं झाडून सारीं वर्गणीदारांनीं घेतलींच पाहिजेत! यांत आवडनिवड करण्याची पंचाईतच मुळीं ठेवली नाहीं! ह्या नियमाच्या रास्तपणाविषयीं कांहीं लिहावयासच नको. हा केल्यापासून, मंडळीस अगोदरच जो गळाठा आला आहे, तो कितपत मोडेल, हें सांगावयाचें साहस आह्मी आपल्या अंगावर घेत नाहीं!

[ केसरी, ता० २८ जून १८८१ ]

या मंडळीच्या आरंभींच्या पहिल्या जाहिरातींत असा मजकुर होता वर्गणीदारांची संख्या हजारपर्यंत जुळली ह्मणजे ग्रंथप्रकाशव्या कामास सुरवात होईल. ही गोष्ट प्रसिद्ध केली असल्यामुळें, व दर खेपेस ‘ ज्ञानप्रकाश ’ पत्रांत नांवांची भरती येऊं लागल्यामुळें, पुष्कळांस असें वाटूं लागलें कीं, या मंडळीच्या व्यवस्थापकांस हजार सह्यांची जरूर असून, तेवढ्या मिळाल्याखेरीज मंडळीच्या कार्यास ‘ सूत उवाच ’ व्हावयाचें नाहीं; मग मारून मुटकून पांचपन्नास जणांच्या सह्या गोळा कराव्या आणि द्याव्या रावबहादुरांच्याकडे धाडून! ग्रंथ तयार होऊन आपणाकडे येतील, मागून बिल येईल, तेव्हां वर्गणी भरण्याची गोष्ट! त्यांतून, मागील अंकांत दाखविलेली मोठी पळवाटतर, पाहिजे त्याला आयत्या वेळेस उपयोगीं पडण्यासारखी, व्यवस्थापकांनींच अगोदर करून ठेवली होती! मग हजार किंवा दहा हजार वर्गणीदारही जुळण्यास

कोणती अडचण ? तात्पर्य सदरील मंडळीस हजार पुरस्कर्त्यांचा जो तांडा थोड्याच दिवसांत मिळाला, यांतलें बीजतरी, वर सांगितलें, हें होय. यास दुसरें विशेष निश्चयात्मक प्रमाण पाहिजे असल्यास, तें परवांच्या जाहिरसभेंत व रिपोर्टांत सर्वांस श्रुत झालेलेंच आहे. तें हें कीं, पहिल्या सालीं वर्गणदारांपैकीं शेकडा दहा जणांकडून वसूल आला; दुसऱ्या सालीं पांचाकडून; व तिसऱ्या सालीं एकाकडून ! ! तेव्हां अशा खोगीरभरतीच्या आश्रयदात्यांवर भिस्त ठेवून, ‘ वाऱ्यावर वरात आणि भुशावर चिठ्ठी ’ असा जो प्रकार आमच्या दोघा रावबहादुरांनीं केला, तो त्यांजकडून खरोखर मोठा प्रमाद घडला, असें म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. आमच्या देशांत सध्यां अशी स्थिति आहे कीं, कोणास जर कांहीं उद्योग करणें असेल, तर तो त्यानें, आपल्या अंगमेहनतीनें किंवा स्वतःच्या पैशाच्या जोरावर, जेवढा होईल, तेवढाच करावा; इतरांच्या उसन्या बळावर भिस्त टाकून राहणें, हें, बहुधा ‘ लावीपक्षीण आणि तिचीं पिलें ’ या गोष्टींतल्याप्रमाणें, विषादास व अनुतापास कारण होणारें ... त्यांतून, पहिल्या पहिल्यानें कदाचित पुष्कळसे होळीचे होळकर ..., तील; पण सारे कडेचे पोहणारे ! निदानींच्या समयीं उपयोगीं ... णारा त्यांत क्वचितच सांपडायाचा ! तेव्हां, हजार किंवा दहा हज... जरी सह्या नुसत्या कागदावर पडल्या, तरी त्यांवर कोणत्याही कामाची इमारत बांधूं पाहणें हें वेडेपणाचेंच काम होय, यांत संशय नाहीं. आजपर्यंत झालेल्या व सध्यां चालू असणाऱ्या बहुतेक लौकिक कृत्यांची हकीगत पाहिली, तर तिजवरून वरील सिद्धांताचीच प्रतीति येणार आहे. मग असें असतां, सदरील मंडळीच्या व्यवस्थापकांचें तिकडे बिलकुल लक्ष पोंचलें नाहीं ही चमत्काराचीच गोष्ट म्हटली पाहिजे !

वरच्यासारखीच दुसरी मोठी गोष्ट म्हटली म्हणजे कारभाऱ्याची ( व्यवस्थापकाची ) योजना. कारभारी हे कोणत्याही नियुक्त कार्याचे साक्षात् चालक असल्यामुळें, त्यांच्या अंगीं दक्षता व प्रामाणिकपणा

हे दोन्ही गुण अवश्य असावे लागतात. त्यांतून, पहिल्या गुणांत कमतरपणा असलेला पुष्कळ अंशीं चालवून घेतां येईल; पण दुसऱ्याच अभाव असला म्हणजे मात्र घडगत नाहीं, असें खास समजावें! सदरील मंडळी निघतांना काय विचित्र वेळ लागली असेल ती असो; तिला कारभारी पण अशा वसुलाचे मिळाले कीं, तसे राजश्री पाहूं जातां सांपडावयाचे नाहींत ! त्यांच्या कारभाराची एक एक शिस्त ऐकावी तों तोंडांत बोट घालावें लागतें ! वर्गणीदारांकडून पैसा आला कीं तो खिशांत! रावबहादुरांकडून बुकें आलीं कीं त्यांचा पैसा बनवून तोही खिशांत ! ! इकडे रावबहादूर आपल्या ठिकाणीं अचंबा करतात, कीं वर्गणीदारांस पुस्तकें कां पोंचत नाहींत ह्मणून ? व तिकडे वर्गणीदार चकित होऊन राहतात, कीं आमच्या पैशाची काय वाट झाली म्हणून ? असें झाल्यामुळें काय गम्मत झाली आहे कीं, प्रस्तुत मंडळीच्या कित्येक वर्गणीदारांचाच मुळीं पत्ता नाहीं; त्यांची रक्कम मात्र येऊन पडली आहे !

याप्रमाणें, हजार वर्गणीदारांच्या पांच हजार रुपयांचा ऐवज ज्याच्यापाशीं राहावयाचा, व इतक्या मंडळीची व्यवस्था ठेवणें, ग्रंथकारांशीं बोलणें लावणें वगैरे कामांची ज्याच्यावर सोपवणूक व्हावयाची, तो कोणी चांगला मनुष्य निवडून काढणें अवश्य होतें, हें उघड आहे. आमच्या लोकांत 'लोककल्याण' 'देशहित' वगैरे शब्दांचा नुकतासा कोठें उच्चार होऊं लागला आहे; त्यांचा पुरता अर्थही पुष्कळांस कळत नाहीं, मग तो हृदयांत बिंबलेला, असे लाल तर किती सांपडतील कोण जाणे ! सामान्यतः पाहतां, 'लोककल्याण' करणें ह्मणजे एकाद्या सभेचें मेंबर होणें, चिटणिशी किंवा खजीनदारी पतकरणें, असेंच बहुतेकजण समजतात. याच्या पलीकडे वरील शब्दांची मीमांसा ते करीत नाहींत. झटून मेहनत करणें, निरपेक्ष बुद्धीनें कारभार करणें, वेळेनसार घस लागली तरी सोसणें, सर्वस्वाचा नाश झाला तरी न डगमगणें, हे प्रकार जसे युरोपांत आढळतात, तसे इकडे आढळत नाहींत; त्यांची यत्किंचित् छाया देखील इकडे दृष्टिगोचर होत नाहीं. त्यांतून, कित्येक

तर असे बहाद्दर आढळतात कीं, लोककल्याणांत पडायाचें, म्हणजे बड्या मंडळींत वागायास सांपडतें, वरिष्ठांची मर्जी आपणावर होण्यास मार्ग होतो, मंडळीचा पैसा वापरायाला सांपडतो, वेळेनसार डल्ला मारण्याचें मनांत आल्यास तीही संधी मिळते—इत्यादि लाभ होतात म्हणून ? अशा प्रकारच्या अनेक क्षुद्र बुद्धि त्यांच्या हृदयांत वास करीत असतात. आमच्या ग्रंथोत्तेजक मंडळीस जे कारभारी मिळाले हे या शेवटल्या कोटींतले होत, ही गोष्ट आज कोणाला सांगायाला पाहिजे असें वाटत नाहीं. असो; तर या महत्त्वाच्या कामावर योग्य माणसाची योजना करतांनाही आमची ही रावबहादुरांची जोडी अगदीं घसरली, असें म्हणणें भाग आहे. तशांत, वरील बंडाळी माजतां माजतां, बिचाऱ्या मंडळीस त्रिदोषाची भावना होई तोंपर्यंत ते अगदीं गैरसावध कसे राहिले, ही गोष्ट तर पुष्कळ अंशीं आश्चर्याचीच होय यांत संशय नाहीं !

[ केसरी, तारीख ५ जुलै सन १८८१. ]

येथवर, प्रस्तुत मंडळीच्या कामाच्या संबंधानें ज्या चुका झाल्या, त्यांच्या विषयीं आम्हीं लिहिलें. आतां, मूळ संकल्पांतच मंडळीच्या हातून जी एक मोठी चूक झाली आहे, तिच्या संबंधानें कांहीं विचार प्रगट करतों.

मूळ संकल्पांतली मोठी चूक ही होय कीं, काव्यें, नाटकें, कादंबऱ्या वगैरे ग्रंथांस सदरील मंडळीनें मूळसंकल्पांतच अगदीं फाटा देऊन, आजपर्यंत तसाच क्रम ठेवला आहे. नाहीं म्हणायाला सदरील मंडळीच्या यादींत 'तारानाटक' व 'शिवाजीचरित्र' हीं दोन पुस्तकें मात्र सामील झालीं आहेत. पहिला ग्रंथ तर प्रसिद्धच आहे; तेव्हां त्याच्या संबंधानें कांहीं लिहावयास नको. दुसरा मात्र पुष्कळांस माहीत नसेल; वास्तव तो, नाशिकचे प्रसिद्ध कवि गणेशशास्त्री लेले यांनीं केलेला, पद्यात्मक ग्रंथ होय, एवढें येथे सांगणें जरूर दिसतें. हे दोन्ही ग्रंथ आमच्या रावबहादुरांनीं आपल्या ग्रंथमालेंत मागाहून

निरुपायास्तव सामील केले असावे असें वाटतें; म्हणजे, दुसरे कोण-तेच ग्रंथ येईनात, व इकडे वर्गणीदारांचातर तगादा लागला कीं नवे ग्रंथ पाठवा. तेव्हां प्रथमतः 'तारानाटका-'वर त्यांनीं मंडळीचा छाप ठोकला, आणि वेळेपुरती गरज भागवली ! 'शिवाजीचरित्रा- 'चा-तरी प्रस्तुत ग्रंथावलींत अशाच कांहीं कारणानें रिघाव झाला असावा; किंवा तें काव्य असलें तरी इतिहासपर आहे, यामुळें त्याजवर कांहीं मेहरनजर झाली असावी, असेंही म्हणतां येईल. आतां प्रस्तुत मंड-ळीच्या प्रस्थापकांचा कृतनिश्चय दिसतो कीं ऐतिहासिक, शास्त्रीय वगैरे प्रकारचींच पुस्तकें वाचकांच्या हातीं द्यावयाचीं, व 'मनोरं-जक' या वर्गांत मोडणारीं जीं काव्यकादंबर्यादि पुस्तकें, त्यांचा अगदीं स्पर्शही महाराष्ट्रदेशीय वाचकांस होऊं द्यावयाचा नाहीं. पण या हठाग्रहास काय म्हणावें, हें आह्मास समजत नाहीं. या त्यांच्या आग्रहावरून, खिदळणाऱ्या पोरासोरांस पुष्कळ वेळां शिष्ट वृद्धजनां-कडून जो उपदेश होत असतो, त्याची बरीक आह्मास येथें आठवण होते. हा उपदेश असा कीं, "अरे ! किती नेहमीं खिदळतां रे ? चांगलें एके ठिकाणीं बसावें, अभ्यास करावा, तें सोडून देऊन सारा दिवस धिंगाणा काय घालतां !" या उपदेशाच्या समयीं, जेठा मारून स्वस्थ बसलेले उपदेशक आपलें लहानपण जसे अजीबात विसरून जातात, व ज्याच्या योगानें पोट भरत नाहीं तो खेळ काय उपयोगी, असें त्यांचें ठरीव मत होऊन, ते तें निःशंकपणें बोलून दाखवतात, त्यांतलाच ग्रंथोत्तेजक मंडळीच्या व्यवस्थापकांचा हा प्रकार होय ! 'कृषिकर्मांतर्गत रसायनशास्त्र,' 'रसायनशास्त्र,' 'आश्वलायनसूत्र,' 'स्वाध्याय' इत्यादि ग्रंथ चाळिशीच्या किंवा साठीच्या अमलांत कितीही रुचण्यासारखे असले, तरी ज्यांच्या विचारांचा कोंब नुक-तासा कोठें फुटूं लागला आहे, त्यांस ते काय बरें उपयोगी ? वरच्या दपटशानें तो बिचारा कोंवळा कोंब, दडपून, कोणीकडच्या कोणीकडे कोमेजून मात्र जाईल, असा धाक आमच्या रावबहादुरांस वाटत नाहीं काय ? पेलवान तयार करायाचा असला, तर त्याला जिलबीचा

रतीब लावतात, म्हणून तान्हें पोर आईच्या थानापासून तुटलें न तुटलें, तोंच त्यास जिलबी सुरू केली, तर काय परिणाम होईल बरें!

तर, वाग्देवतेचें कोमल स्वरूप ज्यांत प्रगट झालें असतें, असे जे काव्यनाटकादि मनोरंजक ग्रंथ, त्यांचा तिरस्कार, निदान आरंभींतरी, बिलकुल करतां उपयोगी नाहीं, असें आम्हास वाटतें. जर लोकांस वाचनाची गोडी लावायाची असेल, तर तें काम, 'मुक्तमाला' किंवा 'आरबी भाषेंतील गोष्टी' अशांपैकींच एकाद्या ग्रंथानें जसें होणारें आहे, तसें शेकडों 'स्वाध्यायां-'नीं किंवा हजारों 'रसायनशास्त्रां-'नींहि खास होणार नाहीं! त्यांतून, साऱ्या पृथ्वींत सुधारलेले म्हणून गाजणारे जे इंग्रज लोक, त्यांच्या घरची जर अशी स्थिति आहे, कीं तेथें शेकडों शास्त्रें उजगारीस आलीं असतां व कित्येक नवींही उत्पन्न झालीं असतां, नवीन कादंबरी निपजल्याखेरीज आठवडाही लोटत नाहीं, व नाटकाचा प्रयोग झाल्याखेरीज दिवस जात नाहीं, तर इकडे अझून कशालाच कांहीं ठिकाण नसतां, काव्यनाट्यादिकांविषयीं आम्हास येवढें परम वैराग्य कशाला धारण करायाला पाहिजे? यास्तव, प्रस्तुत मंडळीच्या व्यवस्थापकांनीं, अशा प्रकारें, आपल्या जरठ अभिरुचीनें, कोंवळ्या नवीन वाचकांचा हिरमोड करूं नये, असें आम्ही ह्मणतों. आपले सारे देशबंधु एकदम तत्त्वज्ञ व शास्त्रनिपुण व्हावे असें जरी त्यांस वाटत असलें, तरी त्यांनीं सृष्टीच्या क्रमाकडे लक्ष पोंचवून, मग काय अपेक्षा करणें ती करावी हें चांगलें. बीजारोपण केल्याबरोबर एकदम फलाचाच प्रादुर्भाव व्हावा, असें कोणीं इच्छिल्यास, ती इच्छा पूर्ण होईल काय? प्रथमतः पल्लव, नंतर पुष्प, आणि या दोहोंच्या मागून फळ, असा नैसर्गिक क्रम आहे. तर ह्याला अनुसरून, प्रथमतः मनोरंजक पुस्तकांचाच पुष्कळ भरणा भाषेंत व्हावयाला पाहिजे. शास्त्रीय विषय आलाच, तर मुलांस जसा भात सुरबुरीत करून द्यावा लागतो, त्याप्रमाणें तो, अगदीं मूलतत्त्वरूपानें किंवा संभाषणाच्या रूपानें, नवशिक्या मंडळीस सादर करायास पाहिजे. विलायतेत इतकी सुधारणा झाली आहे, तरीदेखील सामान्य

वाचकांकरतां शास्त्रीय ग्रंथ रचावयाचा ह्मटला म्हणजे तो वरच्यासारख्या अत्यंत सुबोध रूपानेंच रचला जातो. या उघड गोष्टीकडे आमच्या दोघा रावबहादुरांनीं लक्ष पुरविलें नाहीं, इतकेंच केवळ नव्हे, तर वाचक मंडळीच्या अभिरुचीकडे व अधिकाराकडेही बिलकुल लक्ष न देतां, आपलीच अभिरुचि त्यांनीं पुढें ढकलली, असें स्पष्ट दिसून येतें. यास्तव त्यांच्या हातून हाही दुसरा एक मोठाच प्रमाद घडला असें आह्मी समजतों. अर्थात् मंडळीचें काम नीट न चालण्यास हें एक मोठेंच कारण झालें आहे असें आम्हास वाटतें.

[ केसरी ता० १२ जुलै १८८१ ]

येथपर्यंत, सदरील मंडळीच्या प्रस्तुत अपकृष्ट स्थितीविषयीं आह्मीं आपले विचार वाचकांस कळविले; आणि अशी स्थिति प्राप्त होण्याचीं कारणें दाखविलीं. आतां, हीच मंडळी कोणत्या तऱ्हेनें चांगली चालेल याविषयीं आमचा अभिप्राय प्रगट करतों.

कोणतेंही देशहिताचें काम मनांत आणलें म्हणजे प्रथमतः 'पैसा' हा विचार मनांत उभा राहतो. पैशाशिवाय कांहीं होणें नाहीं हें सर्वांस ठाऊकच आहे. 'सर्वारंभास्तंडुलप्रस्थमूलाः' अशी संस्कृतांत म्हण आहे, ती अक्षरशः खरी आहे. तर, प्रथमतः या ग्रंथोत्तेजनाच्या कामास भरपूर पैसा पाहिजे हें चांगलें ध्यानांत ठेवलें पाहिजे. इंग्लंडांतल्या ट्राक्ट सोसाइटीच्या नमुन्यावर रावबहादुरांनीं ही मंडळी इकडे स्थापन केली खरी, पण वरील सोसायट्यांच्या खजिन्यांत लक्षावधि रुपये लोळत असतात, व गरीब बायाबापड्यासुद्धां आपल्या मोलमजुरीपैकीं पेनी अर्धी पेनी, वर्षाच्या कांठीं, मंडळीच्या पेटींत टाकायाला चुकत नाहींत. तसें इकडे काय आहे? इकडे साऱ्याच गोष्टींचा आनंद आहे. अगोदर देशांत पहिल्यासारखा मुबलक पैसा नाहीं. त्यांतून, ज्यांच्यापाशीं आहे, त्यांनीं त्याचा विनियोग म्हटला ह्मणजे नथ, बाटली, गाडीघोडा, आफगाणस्थानची वर्गणी, विश्रामबाग-फंड, प्रार्थनासमाजमंदिर इत्यादि सत्कृत्यांकडे करायाचा!

हजारों लोक पटापट प्राण टाकताहेत, बी. ए. वाले बारनिशीवर आले, आमचीं ढुंगणाचीं वस्त्रेंसुद्धां आम्हाला विलायतेनें पुरवावीं, नाहीं तर आह्मी नागवे बसणार, अशी लज्जास्पद व भयंकर स्थिति येऊन पोंचली— इतकें झालें तरी देशांत स्वतंत्र उद्योग काढण्याची कल्पना कोणाच्या स्वप्नींही यावयाची नाहीं. त्यांतून, कोणी वेडेपीर उभे राहिलेच, तर सारी मंडळी मौज पहायाला उभी राहणार; कोणी म्हणजे कंबर बांधून त्याच्या मदतीला उभा राहील अशी गोष्ट घडायाचीच नाहीं. बरें, यदाकदाचित् इतकेही योग जमून आले, व मंडळी उपस्थित होऊन तिचें काम कांहींसें चालू झालें, तर पुढें परस्परांत तंटे, मत्सरबुद्धि इत्यादि विकार बहुधा लवकरच उत्पन्न व्हावयाचे. व शेवटीं, एकाद्या बिलंदराशीं गांठ पडून, येथील भिक्षागृहाची किंवा प्रस्तुत ग्रंथोत्तेजक मंडळीची जी अवस्था झाली, तीच व्हावयाची ! अशी आहे येथली स्थिति. यास्तव कोणताही उद्योग उपस्थित करावयाचा ह्मटलें, म्हणजे वरील सर्व गोष्टी प्रथमतः मनांत आणल्या पाहिजेत हें उघड आहे.

आतां, आहे स्थितींत प्रस्तुतसारखी मंडळी चालावी कशी, व इतका पैसा आणावा कोठला, ही शंका वाचकांच्या मनांत येईल. आह्मास तर प्रस्तुत स्थितींत दोनच मार्ग सुचतात. एक हा कीं आमच्या रावबहादुरांसारख्या कांहीं जाडी मंडळीनें एकत्र मिळून डायरेक्टर साहेबांस किंवा सेक्रेटरी साहेबांस अर्ज करावा, आणि सालीना अमुक अमुक रकम ग्रंथोत्तेजक मंडळीकडे येत जावी ह्मणून विनंती करावी. सदरील मंडळी ही विद्याखात्यांतच सामील धरली पाहिजे; कां कीं, लोकशिक्षणाचेंच एक मोठें काम तिनें अंगावर घेतलें आहे. यास्तव, जेकब साहेबांनीं 'मेघदूता-' चें इंग्रेजी गद्यात्मक भाषांतर केलें, द्या त्यांस दोन हजार रुपये बक्षीस, रा० सा० सीताराम विश्वनाथ पटवर्धन, बी. ए. यांनीं 'उजळणीचें पुस्तक' केलें, द्या त्यांस एक तोडा इनाम, बुल्हर साहेबांनीं 'तिसरें पुस्तक' केलें, तर त्यांची संभावना करण्याकरतां सोडा अमुक सहस्रमुद्रांचें उदक इत्यादि जे प्रकार आज अनादिसिद्ध या धर्मखात्यांत चालले आहेत,

त्यांतच आमच्या बिचाऱ्या या मंडळीची थोडीबहुत संभावना झाली असतां,केवळ अंत्यजाच्या पदरांत हविष्यान्न टाकल्यासारखेंच होईल असें आम्हास वाटत नाही! तर आमच्या नूतन विद्वज्जनांपैकी ज्या कोणास खरोखरीच आपल्या देशभाषेच्या उन्नतीविषयीं कळकळ वाटत असेल व लोकांच्या अज्ञानाचा विध्वंस व्हावा म्हणून उत्कट इच्छा ज्यांच्या मनांत वसत असेल, त्यांनीं एकत्र होऊन वरील उद्योग करावा. जर वरच्यासारखी बडी मंडळी जमली, आणि विद्याखात्याकडे अर्ज गेला, तर त्याविषयीं कांहींच विचार होणार नाहीं असें आह्मास वाटत नाहीं. शिवाय, देशोन्नत्यर्थ मनःपूर्वक परिश्रम करणारे, एतद्देशीय विद्वानांचीच वरच्यासारखी मंडळी जर एक विचारानें वागून ग्रंथपरीक्षणाचें काम करूं लागली, तर आज वर्षानवर्ष चाललेल्या 'दक्षिणाप्रैझ कमिटी-'ची किंवा मराठी ट्रान्स्लेटरांच्या आॅफिसाची बिलकुल जरूर राहणार नाहीं, असें आम्हास वाटतें. तर, आमच्या दोघा रावबहादुरांनीं व आमच्या इतर सर्व विद्वान देशबंधूंनीं या सूचनेचा अवश्य विचार करावा, असें आम्ही इच्छितों.

[ केसरी, ता० १९ जुलै १८८१ ]

मागील खेपेस सदरील मंडळी नीटपणें चालण्याचा आह्मीं एक उपाय सुचविला. आतां दुसऱ्याविषयीं लिहितों.

दुसरा उपाय हाच कीं, जर सरकार मदत करीना, तर आमच्या देशांतल्याच मंडळीनें एक मोठी रक्कम जमवून या कृत्यास आरंभ करावा. एरवीं शेकडों वाटांनीं आमचा पैसा थोडा खर्च होत आहे काय? आलीकडे, नव्या इंग्रजी शोकांत, ह्मणजे बाटली, बूट, डगले, चहाकाफी वगैरे चैनींत थोडा पैसा जातो काय? मग, एकंदर देशाच्या हितार्थ वरील खर्चांतला थोडासा अंश जर लावला, किंवा वरच्यांपैकींच हें एक कलम समजून तें खर्चांत अधिक घातलें, तर चालणार नाहीं असें नाहीं. पण हें करतो कोण? सरकारानें कितीही नवे कर बसवले,–इन्कम् टाक्स, लायसेन्स टाक्स, फीस्ट टाक्स (मेज-

वान्यांवर कर (हा कांहीं वर्षांपूर्वीं बसविण्याचें कौंसलांत घाटत होतें हें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस आठवत असेलच!)—तरी आमचे सत्वस्थ लोक ते खुशाल देतील, हूं कां चूंसुद्धां करणार नाहींत; पण एकंदर लोकांस ज्यापासून अतिशयित उपयोग घडणार आहे, अशा कृत्याबद्दल कोणी पै मागितली असतां बिलकुल बधणार नाहींत! 'सोनारानेंच कान टोचला पाहिजे' ही ह्मण येथें चांगली लागू पडते. आह्मी येवढे विद्वान् ह्मणवितों, देशाभिमानाचा डंका खुशाल पिटतों, आणि आमच्या अंगची कुवत ह्मटली तर इतकी कीं, युरोपांतले लोक जीं अगदीं भिकार कामें खुशीनें आंगावर घेऊन करतात, त्यांतलें एकादें अल्पस्वल्पही आमच्यानें झेपत नाहीं! जेथें तेथें, आमचें मायबाप जें सरकार, त्यानें आमच्या करतां मेलें पाहिजे. ही पराधीनतेची स्थिति किती लज्जास्पद आहे बरें! सरकारानें विद्यारूप शस्त्रानें आह्मास सज्ज केलें असतां, तें आमच्या हातें शत्रूवर मारविण्याचेंही काम त्यानेंच केलें पाहिजे काय? खरोखर, हें आमचें दौर्बल्य अत्यंत शोचनीय होय. 'रडतराव घोड्यावर बसवायाचे' त्यांतलीच आमची स्थिति आहे. त्यांतून, जे आमचे पुढारी ह्मणवितात, त्यांनीं-तरी कंबर बांधून असल्या कार्याचा नेटानें पुरस्कार करावा? केवळ लोकांवर भिस्त ठेवून, तुरीची काठी तुरीवर झाडण्याचा संकल्प त्यांनीं केला तर कसें चालणार? जें कार्य मीं अंगीकारलें तें हरप्रयत्नानें तडीस नेईन, कितीही विघ्नें आलीं तरी कचणार नाहीं, अंगास घस लागली तरी ती मुकाट्यानें सोसून हें स्वदेशहिताचें काम मी पार पाडीन, अशा कृतनिश्चयानें जेव्हां कोणी प्रवृत्त होतो, तेव्हांच त्यास बहुधा त्या कार्यांत यश येतें. नाहीं तर, शाळू सोबती या जगांत हवे तितके मिळणारे आहेत; अशांच्या हातून कांहींएक होणें नाहीं.

तेव्हां, या रीतीनें पहातां, ज्या दोघा रावबहादुरांनीं हें ग्रंथोत्तेजनाचें काम प्रथमतः पतकरलें, त्यांनीं हल्लीं हवालदील होऊन मंडळीचें काम रेंगाळत चालवावें हें बरोबर नाहीं. तसें करून आतां उपयोगी नाहीं. मंडळी सुरळीत चालती व आज जर तिच्या खाजन्यांत दहा

हजार रुपये असते, व पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध होऊन ते मराठी वाचकांच्या हातीं पडते, तर तें यश घ्यावयाला जसे तिचे हे प्रस्थापक पुढें सरसावते, त्याप्रमाणेंच त्यांच्या हयगयीमुळें किंवा जरा दुर्लक्ष झाल्यामुळें, मंडळीला जें अपयश आलें आहे, तेंही त्यांनीं पतकरून त्याच्या परिमार्जनार्थ अधिक परिश्रम करण्यास कंबर बांधणें हे त्यांस उचित होय. पण सांप्रत त्यांचें एकंदर धोरण पहावें तों वर्गणीदारांच्या माथीं हें खापर फोडून आपण निसटायाचें असें दिसतें, हें आमच्या मतें अगदीं बरोबर नाहीं. आरंभापासून जी गैरव्यवस्था झाली, तिची जबाबदारी अर्थात् सर्वप्रकारें त्यांच्याच शिरावर आहे. येवढ्या मोठ्या कामाच्या संबंधानें जी दक्षता ठेवायाला पाहिजे होती ती त्यांनीं ठेविली नाहीं, हा दोष कोणाचा आहे, हें त्यांस कोणी सांगितलें पाहिजे असें नाहीं. आज या देशांत कशीं बशीं पांच-पन्नास वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें चालू आहेत कीं नाहींत ? मग त्यांचा उद्योग जर बऱ्याच प्रकारें आज वर्षानवर्ष चालू आहे, तर आमच्या देशांतील दोघा धुरंधुरांनीं त्याच नमुन्याच्या ज्या कामाची जोकड आपल्या खांद्यावर घेतली तेंच काम तेवढें येवढ्या मरगळीस कां यावें ? आणि जर आलें, तर तें लोकांच्या हयगयीमुळें व लोकांनीं फसवल्यामुळें आलें, हें म्हणणें योग्य आहे काय ? याच लोकांच्या आश्रयावर ‘ इंदुप्रकाशा- ’ सारख्या टोलेजंग वर्तमान-पत्रापासून तों ‘ ज्ञानचक्षु ’ किंवा ‘ शिवाजी ’ या लुंग्यासुंग्या पत्रांपर्यंत सर्वांचें उपजीवन चाललें आहे कीं नाहीं ? तेव्हां प्रस्तुत सभेच्या पुरस्कर्त्यांस आम्ही अशी सूचना करतों कीं, ज्याप्रमाणें आपली फौज रांग मोडून माघारी पाय घेऊं लागली असतां, सेनानायकानें स्वतः पुढें होऊन, तिचें खचलेलें धैर्य पुनः तीस आणावें लागतें, त्याप्रमाणेंच या समयाला त्यांचा गाडा जरी चिखलांत रुतला आहे, तरी त्याला त्यांनीं स्वतः आपल्या खांद्याचा नेट दिला पाहिजे. किंवा एकाद्या सालीं पर्जन्याच्या आसीमुळें वगैरे साऱ्याचें उत्पन्न थकलें असतां, सरकार जसें तगाई देऊन, पुढें ती वसूल करून घेतें, त्याप्रमाणें हल्लींच्या निकृष्ट स्थितींत जर तिच्या दोघा व्यवस्था-

पकांनीं सभेला हात दिला, तर कांहीं गैर होईल असें आम्हास वाटत नाहीं. आज जरी त्यांस आपल्या पदरचें बीं मातींत टाकावें लागलें, तरी तें कालांतरानें बहुगुणित होणारें आहे, या गोष्टीकडे त्यांनी नजर द्यावी. एकंदरींत पाहतां, प्रस्तुत मंडळीच्या प्रस्थापकांनीं, व सामान्यतः जो कोणी असे नवे उद्योग उपस्थित करील, त्यानें पुढील वचन नेहमीं लक्षांत ठेवावें.

अनारंभो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम्।
प्रारब्धस्यांतगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम्॥

"कार्याला अगोदर हात घालूं नये, हें बुद्धीचें पहिलें लक्षण होय; आणि दुसरें हें कीं, एकदा तें स्वीकारलें म्हणजे मग तें तडीस नेल्याखेरीज राहूं नये !"

[ केसरी, ता. १८ जूलै १८८१ ]

आतां सरतेशेवटीं, सदरील मंडळीस एक सूचना करण्यासारखी आहे तेवढी करून, ही टीका आटपतों.

ही सूचना अशी आहे कीं, आजपर्यंत मराठी भाषेंत अनेक उत्कृष्ट ग्रंथ होऊन गेलेले आहेत, त्यांचा जीर्णोद्धार करण्याचें काम मंडळीनें मनावर घेतलें, तर मोठा उपयोग होणार आहे. हे ग्रंथ फारच दुर्मिळ झाले असून, कांहीं दिवसांनंतर त्यांचा मागमूसही नाहींसा होणार आहे. ते कोणते ह्मणाल तर संस्कृत नाटकांचीं भाषांतरें, माजी कृष्णशास्त्री चिपळूणकर, गोविंद नारायण वैगेरे गृहस्थांचे फुटकळ ग्रंथ व निबंध इत्यादि होत. दक्षिणाप्रैज कामिटीच्या विद्यमानें बहुतेक संस्कृत नाटकांचे मराठींत तर्जुमे होऊन गेले आहेत; त्यांपैकीं कांहीं मात्र छापून निघाले असून, बाकीचे कमिटीच्या आफिसांत 'डेड स्टॉक्'-दाखल इतर अनेक ग्रंथांबरोबर अझून लोळत पडले असतील! म[illegible] शास्त्रीबोवांसारख्या रसिकाची लेखणी फिरून जीं संस्कृतकविश्रेष्ठां[illegible] नाटकें महाराष्ट्रभाषेंत उतरलीं गेलीं, तीं आज वर्षानवर्षे लो[illegible] दृष्टिगोचरही होऊं नयेत; इतकेंच केवळ नाहीं, तर तीं टार [illegible] जाण्याचा समय येऊन ठेपावा, यासारखी विद्याखात्याला व आम्हां[illegible]

लोकांला लज्जास्पद गोष्ट आह्मास कोणतीही वाटत नाहीं ! असो; तर, सदरील मंडळीनें वरील मृतप्राय ग्रंथांवर आपलें संजीवनोदक थोडेंसे शिंपडलें असतां, केवळ वायां जाईल असें वाटत नाहीं. हीच गोष्ट इतर अनेक ग्रंथांसही लागू आहे. मुंबईस 'ज्ञानप्रसारक' नांवाची सभा पुष्कळ वर्षे चालली होती, व वरील नांवानेंच एक मराठी मासिक पुस्तक चांगलें पंधरासोळा वर्षे चाललें होतें. या पुस्तकाचे अंक हल्लीं ' इंदुप्रकाश ' आफिसांत कदाचित् लोळत पडलेले सांपडतील, किंवा यापूर्वीच ते हिंगजिऱ्यांवारी साऱ्या शहरभर वांटलेही गेले असतील, सांगवत नाहीं ! या मासिक पुस्तकाच्या इतक्या वर्षांच्या कारभारांत, माजी भास्कर दामोदर, गोविंद नारायण, विश्वनाथ नारायण, केरो लक्ष्मण वगैरे कितीतरी विद्वानांच्या हातचे लेख येऊन गेले ! पण त्या सर्वांची आजला गति काय ?—तर वाण्याचें दुकान ! ! याप्रमाणेंच माजी ' शालापत्रकां-' तही ( हें पुस्तक ' माजी ' झालें ही मेहेरबान चाटफील्ड साहेबांच्या कारकीर्दीतील एक लक्षांत ठेवण्यासारखी लहानशी गोष्ट होय ! ) अनेक उत्कृष्ट लेख येऊन गेलेले आहेत; पण त्यांची कोण कधीं पूसतपास करतो काय ? ' उत्पद्यंते विलीयंते ' ही साऱ्या जगाची राहटी त्यासही लागू ! बाकी दरवर्षी Native Literature Encouragement Fund ( एतद्देशीय भाषांत होणाऱ्या ग्रंथसंग्रहाच्या प्रीत्यर्थ धर्मादाय ) म्हणून बरीचशी रक्कम खर्ची पडायाला कांहीं कमी होत नाहीं; पण वरील फंड, बहुधा किताबवाल्या रावसाहेबांच्या ' धुळाक्षरां'त, किंवा गौरवर्ण दीक्षितांनीं अक्षरजननीस शिणविली असतां तिचा शीण दूर करण्यांत, खल्लास व्हावयाचा ! तात्पर्य, ' मेघो गिरिजलधिवर्षी च ' हा न्याय ! मेघराजांची मर्जी फिदा कोणावर व्हावयाची ?—तर पर्वतावर किंवा समुद्रावर ! !

याप्रमाणेंच दक्षिणाप्रैज कमिटीच्या दप्तरांत सटरफटर धुंडलें असतां, त्यांतही प्रस्तुत मंडळीच्या हातास बराचसा माल लागेल, असा अजमास आहे. हा माल बाजारांत आणून मांडण्याचा थोडासा उद्योग माजी विष्णु परशुरामशास्त्री पंडित यांनीं कांहीं वर्षांपूर्वी केला होता,

हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेल. 'दक्षिणा प्रैज कमिटीनें बक्षीस दिलेल्या ग्रंथांची माला' या नांवाची एक ग्रंथावली काढून, तिचे पांच सात अंकही त्यांनीं प्रसिद्ध केल्याचें आह्मास आठवतें. पुढें विद्याखात्याचें प्रभ्वंतर झाल्यानें ह्मणा, अगर दुसऱ्या कोणत्या कारणानें ह्मणा, तो उद्योग तसाच राहिला; व आमच्या देशांतील नेहेमींच्या पद्धतीप्रमाणें, पंडितजींच्या बरोबरच, त्यांची 'माला-' ही थकली ! असो; तर या 'माले-' च्या पुनरुज्जीवनाकडे रावबहादुरद्वयानें लक्ष पुरविलें असतां बरें होईल, असें आह्मास वाटतें.

आतां, सदरील मंडळीचा आह्मी निरोप घेतों. तिच्या आजपर्यंतच्या कारभाराविषयीं आह्मास जें लिहावयाचें होतें, तें आह्मी लिहून चुकलों; त्याप्रमाणेंच मंडळीला आमच्या मनांतून कांहीं सूचना कर्तव्य होत्या, त्याही केल्या. सदरील मंडळी त्यांचा विचार करील अशी आह्माला आशा आहे. आपल्या देशांत जो जो प्रकार दृष्टोत्पत्तीस येईल, त्याच्या संबंधानें आपल्या समजुतीनें बरेंवाईट विचार प्रगट करणें, हें प्रत्येक पत्रकर्त्यांचें कामच आहे. या आमच्या कर्तव्यास अनुसरून, देशकल्याणाचें येवढें मोठें कृत्य जी ही सभा, तिच्या संबंधानें आह्मीं आपले अभिप्राय सर्वांस कळविले. शेवटीं आम्ही एवढेंच इच्छितों कीं प्रस्तुत सभेचें काम पुनः नीट थाऱ्यावर येऊन, तें चांगल्या प्रकारें चालो, व ग्रंथकारांची आणि वाचकांची दैना फिटण्याचा लौकरच योग येवो. तर, ही इच्छा सफळ करण्याविषयीं परमेश्वरापाशीं प्रार्थना करून कलम खालीं ठेवतों.

[ केसरी, तारीख ९ आगष्ट सन १८८१. ]

[ **चर्चा—महाराष्ट्र ग्रंथोत्तेजनाचा उपाय. रा० रा० केसरीपत्रकर्ते यांस:—**वि० वि० आपण "मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी-" विषयीं लिहीत असतां, कित्येक उत्तम सूचना केल्या आहेत. त्यांत मंडळीस द्रव्यसाह्य कसें मिळेल, याविषयीं सूचना केली आहे. तिच्या जोडीला मला एक उपाय सुचतो, त्यापासून मंडळीस कांहीं फायदा होईल असें जाणून तो तेथें दाखल करतों. हिंदुस्थानांत जे देशी संस्थानिक व राजेरजवाडे आहेत, त्यांचेपासून

द्रव्यसाह्य मिळविण्याचे जर मंडळीनें प्रयत्न केले तर तीस बरीच मदत होईल असे वाटतें. इंग्लंडांत पाहिलें तर तेथील डयूक्स आणि नोबल्स लोकांनीं विद्याप्रीत्यर्थ सोसायट्यांस व युनिव्हर्सिटयांस लाखो रुपये बक्षीस केले आहेत. तसें येथील संस्थानिकांनीं केलें असतां, मोठा उपयोग होईल. त्यांतून हिंदुस्थातांतील इतर भाषांपेक्षां मराठी भाषेस ही एक मोठी अनुकूळ गोष्ट आहे कीं मराठे लोकांचीं जीं संस्थानें चोहोंकडे पसरलीं आहेत, त्यामुळें तिची हद्द मोठी झाली आहे व चोहोंकडे मराठी वाचक मिळण्याचाही विशेष संभव आहे. शिवाय आमच्या संस्थानिकांचा स्वजन्मभूमीविषयीं आणि स्वदेश-भाषेविषयीं अभिमान असणेंही साहजिक आहे. ह्मणून त्यांनीं आपल्या देशबांधवांच्या व स्वतःचे सौख्याकरितां मराठी ग्रंथोत्तेजनास मदत केली तर वावगें होणार नाहीं. तसेच त्यांच्या संस्थानांतून मराठी बोलणारांचा भरणाही मोठा आहे. त्यांपैकीं पुष्कळ तर तेथें स्थायिक होऊन राहिले आहेत, आणि संस्थानच्या इतर प्रजांप्रमाणे रयतेच्या नात्याचे सर्व हक्क त्यांस प्राप्त झाले आहेत. यास्तव त्यांस विद्यादान देणे हें संस्थानाचें कर्तव्यच आहे. ह्मणून आमच्या राजांनीं मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीस साह्य केलें असतां, "रशीदंड व पुलीटीकाल यांच्या प्रीत्यर्थ किंवा नाच, तमाशे, ख्यालीखुशाली यांच्या खातर" जो अतोनात खर्च नेहमी होत असतो, त्या व्यर्थ खर्चाप्रमाणें, यामध्यें 'केवळ अंत्यजाचे पदरांत हविष्यान्न टाकल्याचा' दोष येणार नाहीं. तेव्हां मंडळीचे व्यवस्थापक रावबहादुरांनीं कांहीं खटपट करून जर कांहीं उपयोग झाला तर संस्थानिकांनीं एक मोठें स्तुत्य कर्तव्यकर्म बजाविलें असें होऊन मंडळीचेंही चांगलें काम होइल. यास्तव या सूचनेकडे लक्ष देण्यास आमच्या मंडळीस व संस्थानिकांस सविनय विनंती करून हें पत्र पुरें करितों. काठेवाड, ता० १ आगष्ट १८८१. **आपला एक संस्थाननिवासी 'खं. बे.'**]

---

# परभाषेंतील शब्दांची योजना.

[ केसरी, ता० २ आगस्ट १८८१ ]

आपली मराठी भाषा सध्यां बनत चालली आहे. वर्तमानपत्रें, सभा, मासिकपुस्तकें, ग्रंथ, या सर्वांची अभिवृद्धि ही भाषावृद्धीचीं कारणें होत; यास्तव हीं हल्लीं जारीनें चालू असल्यामुळें, जसें झाड

किंवा प्राण्याचें शरीर वाढतें, त्याप्रमाणें महाराष्ट्र भाषेची वाढ हल्लीं सुरू आहे. इकडे इंग्रेजी विद्येचा आलीकडे फैलावा होऊं लागल्यापासून, नवे नवे विचार आपल्या भाषेतील शब्दांनीं व्यक्त करण्याचें अगत्य पडूं लागलें आहे. तेव्हां या संधीस ही एक मोठ्या विचाराची गोष्ट आहे कीं परकी भाषांतील शब्द आपल्या भाषेत घ्यावे कीं नाहींत; व जर घ्यावे, तर ते कोणत्या प्रमाणानें घेतले पाहिजेत, वगैरे.

या विषयाच्या संबंधानें कित्येकांची अशी समजूत झालेली दृष्टीस पडते, कीं परभाषांतले शब्द म्हणून मराठींत बिलकुल घेऊं नयेत. इंग्रजी, फारसी, आरबी, वगैरे सर्व शब्द काढून टाकून, निवळ मराठी शब्द योजीत जावे. ही बुद्धि कशामुळें झाली आहे हें कोणासही सहज समजेलच. आलीकडे आमच्या राष्ट्रांत देशाभिमानाची थोडीशी झुळूक सुटली आहे; यामुळें जुने आचारविचार चांगले, इंग्रेजी तऱ्हा बिलकुल उपयोगी नाहीं, स्वदेशी कापडच वापरायाचें, परदेशी वस्तु घ्यावयाच्या नाहींत, वगैरे लोकांचे ग्रह जसे हळुहळू होत चालले आहेत, त्याप्रमाणेंच परभाषेंतील शब्दांवर कांहीं जणांचा मोठा कटाक्ष दृष्टीस पडतो. वस्तुतः पाहतां, ही स्वभाषेविषयींची पूज्यबुद्धि सर्वथा अप्रशस्त म्हणतां येत नाहीं, हें खरें; कांकीं, ही बुद्धि भाषादूषणावर अत्यंत मारक होय. ती हृदयांत न वसल्यामुळें, आजपर्यंत, पुष्कळ ग्रंथकारांनीं व वक्त्यांनीं, परकी भाषेच्या पायीं, आपल्या भाषेची विटंबना केली. मुंबईशाही मराठीचा प्रकार पाहिला, किंवा 'वेदार्थयत्नां'तल्या सारखा मासला पाहिला, तर वरील प्रकार किती हास्यास्पद व अनर्थकारक होय, हें तेव्हांच लक्षांत येईल. **ड्रायडन्** नामक प्रख्यात ग्रंथकारानें एके ठिकाणीं ह्मटलें आहे–" जर परकी शब्दांची देशभाषेवर फारच गर्दी करून सोडली, तर मूळभाषेस त्यांपासून साह्य व्हावें तें न होतां, त्यांचाच जसा कांहीं मूळ शब्दांवर शिरजोरपणा दिसूं लागतो. " *परभाषेंतून वाजवीपेक्षां फाजील

---

* **ड्रायडनचें वरील वचन हें** :–" If too many foreign words are poured in upon us, it looks as if they were designed, not to assist the natives, but to conquer them."

शब्द घेतले, ह्मणजे येथें जसा इंग्रेजांनीं प्रकार केला, तसा होऊं लागतो, हें उघड आहे. पण या प्रतिबंधासतरी कांहीं मर्यादा अवश्य ठेवली पाहिजे. ती अशी कीं, जेथें मूळ भाषेंत शब्दच नाहींत, तेथें परभाषीय शब्दांस निमंत्रण करण्यास चिंता नाहीं. उदाहरणार्थ, छापखान्याचाच कारखाना घ्या. यांतील परिभाषा, अर्थातच सारी इंग्रेजी आहे. प्रूफ, स्टीक, प्रेसमन, पायका, प्रायमर, कंपाजिटर, करेक्टर वगैरे सर्व शब्द हे, आगगाडीच्या किंवा तारायंत्रांच्या परिभाषेप्रमाणें, आमच्या भाषेंत रूढ झाल्यासारखेच आहेत.

आतां कोणीं भाषाभिमानी पुरुषानें उठून 'प्रूफ'च्या जागीं 'खर्डा,' 'करेक्टर'च्या जागीं 'शोधक' असें जरी कांहीं शब्दांतर केलें, तरी टैपांचे छप्पन्न प्रकार, किंवा रेल्वे एंजिनांतील प्रत्येक भाग अथवा जहाजाच्या शंभर दोऱ्या, इतक्यांस नांवें धुंडीत बसणें म्हणजे भगीरथ प्रयत्नच आहे! शिवाय हा प्रयत्न कितपत सिद्धीस जाईल याविषयीं आह्मास शंकाच दिसते. संस्कृतांत पाहिलें तरी त्यांतही कित्येक शब्द परभाषेंतलेच येऊन मिसळलेले आहेत. विशेषतः ज्योतिष ग्रंथांतील कित्येक पारिभाषिक शब्द ग्रीक भाषेंतून किंवा प्राचीन मिसरी भाषेंतून घेतल्यासारखे दिसतात. अर्वाचीन काळीं मोठ्या योग्यतेस चढलेली जी इंग्रजी भाषा, तींततर हजारों शब्द परभाषांतूनच आलेले आहेत. हें तर काय? पण ज्या भाषेनें वरील भाषेंत कांहीं ना कांहीं तरी साहित्य केलें नाहीं, अशी बहुधा थोडकीच सांपडेल. यावरून काय समजायाचें?—इतकेंच कीं परभाषांचा मिलाफ सर्व भाषांत व्हावयाचाच, व तो झाला असतां त्यांत कांहीं मोठें अनिष्ट आहे असेंही नाहीं. इतकें मात्र व्हायाला पाहिजे कीं जेथें जरूर नाहीं तेथें वरील भेसळ होऊं देऊं नये; व परभाषेच्या पायीं मूळ पद्धतीस ह्मणजे वाक्यरचनेस वगैरे धक्का लागूं देऊं नये.

त्यांतून, आरबी व फारसी शब्द तर आमच्या भाषेला अगदीं खिळूनच गेले आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. लहानथोर, विद्वान् अविद्वान्, बायका पुरुष, या सर्वांच्या तोंडीं जे शब्द आज

पिद्यानपिढ्या घट्ट बसले आहेत, ते आतां कांहीं केल्या निघायाचे नाहींत. आणि ते निघून हल्लीं निर्वाहही लागणार नाहीं. तेव्हां, यासंबंधें आग्रह धरला असतां, तो केवळ मूर्खपणा होणार आहे. हे शब्द व महाराष्ट्रभाषा या दोहोंचा, जणों काय, एकजीवच होऊन गेला आहे; तो इतका कीं त्यांचा परकेपणा अगदीं बुजून जाऊन, ते मूळचे यवनी म्हणून ओळखण्याचीसुद्धां पुष्कळ वेळां पंचाईत पडते. फार तर काय ? पण येवढे सोंवळे जे महाराष्ट्रकवि, त्यांनींसुद्धां पुष्कळ ठिकाणीं त्यांचा प्रयोग केलेला आढळण्यांत येतो. तेव्हां, आजपर्यंत जे जे आरबी व फ़ारसी शब्द मराठी भाषेंत येऊन प्रविष्ट झाले आहेत, त्यांच्याविषयींतर सध्यां विचारच नाहीं. विचार करावयाचाच झाला तर नवीन शब्दांविषयीं; पण यांसही प्रसंगविशेषीं आव्हान करणें अवश्य होईल. जेथें इंग्रेजी शब्दास मराठींत किंवा संस्कृतांत प्रतिशब्द आढळणार नाहीं, तेथें वरील दोन भाषांचीच प्रार्थना बहुधा करावी लागेल हें उघड आहे.

आतां, इंग्रजी शब्दांविषयीं विचार केला, तर त्यांसही वरील गोष्टी पुष्कळ अंशीं लागू पडतील. 'खुर्ची' निवळ मराठी बनली आहे, तिजहून 'टेबल' कमी बनलें आहे असें नाहीं. 'अहंमदनगर' या विशेषनामास जशी मराठी भाषेंतून सनद मिळाली आहे, त्याप्रमाणेंच 'मालकमपेठे-' सही मिळाली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हें तर काय ? पण 'रांग' 'संत्री' 'पलटण' 'फेरेट' 'कडाबान' 'काडतूस' वगैरे शब्दतर इतक्यांतच आमच्याशीं इतके लगट करून राहिले आहेत कीं, जणों काय त्यांची व आमची आज कितीका दिवसांची गट्टी बनून गेली आहे! मोठ्या सोंवळ्या आजीबाईलाही जसा आतां 'बटाटा' परका वाटेनासा झाला आहे, व 'तंबाखू-'चीतर आलीकडे द्रोणागिरीच्या-पर्यंत परंपरा लागत आली आहे, त्याप्रमाणेंच शेकडों इंग्रजी शब्द आलीकडे आमच्या भाषेंतील शब्दांबरोबर खुशाल वावरू लागले आहेत. देशाचा उदीम वाढण्याकरतां, ज्याप्रमाणें सर्व ठिकाणच्या

व्यापाऱ्यास व्यवहार करण्याची साऱ्या देशांत मोकळीक असते, त्याप्रमाणेंच अर्थवाहक जे शब्द, त्यांसही तशीच सर्वत्र सदर परवानगी असली पाहिजे. ती असली म्हणजे भाषेस शब्दप्राचुर्य, वैचित्र्य इत्यादि लाभच होणार आहेत. इतकेंच मात्र कीं, ते शब्द भाषेवर शिरजोर होऊं देतां कामा नयेत, व त्यांच्या योगानें भाषेची शिस्त न बिघडे अशी तजवीज ठेवली पाहिजे.

---

# अनुकरण.

[ केसरी, ता ९ आगस्ट सन १८८९ ]

अनुकरण म्हणजे काय, हे बहुधा कोणालाही सांगायाला नकोच; दुसऱ्याचे पाहून, तसें करणे, याचें नांव अनुकरण. हें अनुकरण दोन प्रकारचे आहे; एक शारीर व दुसरें मानसिक. शारीर अनुकरण म्हणजे दुसऱ्याचा हुबेहुब कित्ता उचलून, त्याच्याप्रमाणे बोलणें, चालणें, पेहराव करणें वगैरे; आणि मानसिक अनुकरण म्हणजे दुसऱ्याची विचारपद्धति उचलणे, त्याच्या मतांचा अनुवाद करणें इत्यादि होय.

प्रस्तुत काली वरील विषयाचा विचार करण्याचे किती अगत्य आहे, हे कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. तें असें कीं, आमचे राज्यकर्ते आम्हांपासून आचार, विचार, विद्या वगैरे सर्व गोष्टींत अगदीं भिन्न आहेत; तर त्यांचें अनुकरण आम्हीं करावें कीं नाहीं, व करणें झाले तर कोणत्या गोष्टींत, कितपत करावें, वगैरें गोष्टींचा विचार करणें या कालीं अत्यंत महत्वाचें आहे. या समयासच वरील विवेचनाचे एवढे महत्व काय आहे, असें जर कोणी विचारील, तर त्यास उत्तर देणे सोपें आहे. जोंपर्यंत घडा ओला असतो किंवा झाड कोवळें असतें, तोंपर्यंत त्यावर विवक्षित संस्कार घडण्याची शक्यता असते; त्याप्रमाणेंच आमच्या पाश्चात्य बंधूंचा समागम आम्हास नुकता कोठे घडला आहे, तोच प्रस्तुत विषयाचें विवरण केलें असतां विशेष उपयोगाचें होईल. एकदा या नव्या मुशीनून

निवून आम्ही कठीण होऊन बसलों म्हणजे बसलों; मग नाइलाजाची गोष्ट होणार आहे. वास्तव तसें होई तोंपर्यंतच या विषयाची चर्चा करून, योग्यायोग्यत्वाचा निर्णय केला पाहिजे हें उघड आहे.

आतां, अनुकरणाविषयीं सामान्य विचार केला असतां, ही गोष्ट कोणासही स्पष्ट दिसणार आहे, कीं ही प्रवृत्ति मनुष्यस्वभावा-सच खिळलेली आहे. याहूनच, मनुष्य हा अनुकरणशील प्राणी आहे ( Man is an imitative animal ) अशी एका तत्व-वेत्यानें 'मनुष्य' या शब्दाची व्याख्या केली आहे. मनुष्य जें बरें वाईट आचरण करितो, त्याच्या अंगीं जे गुणावगुण दृष्टीस पडतात—हें सर्व अनुकरणाचें फळ आहे, असें सामान्य अनुभवावरूनही कळते. पहा कीं, खाटकाचें पोर आणि गुराचें ओरडणें ऐकून कळवळूं लागलें, किंवा कळावंतिणीचीं पोर आणि व्यभिचाराची गोष्ट ऐकून तिच्या अंगा-वर कांटा आला, या गोष्टी बहुधा असंभाव्य होत. संस्कारविशे-षाच्या योगानें पुढें कांहीं वेगळा प्रकार झाला तर न जाणों; पण जोंपर्यंत तो झाला नाहीं, तोंपर्यंत मनुष्याच्या मनाचे धर्म हे सर्व साहजिक अनुकरणानें जसे बनावे, तसेच बनतील, हे उघड आहे. तेव्हां ही प्रवृत्ति मनुष्यांच्या ठिकाणीं स्वभावतांच एवढी प्रबळ असल्यामुळे, अलीकडे आमच्या देशांत पाश्चात्यांच्या अनुकरणाचा जो प्रकार आढळतो, तो साहजिकच म्हटला पाहिजे. पूर्वी मुसल-मानांच्या कारकीर्दीत त्यांच्या अनुकरणानें किती फेरफार झाले, ते सर्वांस मशहूर आहेतच. मराठे लोकांचा गोंपा, एकंदर लोकांच्या पोषाकाची तऱ्हा, ऐषआरामाचे प्रकार, या सर्व गोष्टी वरील प्रवृत्ती-चींच फळें होत. तर, या दृष्टीनें पाहतां, अलीकडे डगला, बूटस्टा-किंग, चहा, काफी, स्त्रियांबरोबर सहल करणे वगैरे रिवाज व याहूनही आणखी कित्येक विचित्र प्रकार प्रचारांत आले आहेत व कि-त्येक येऊं पहात आहेत, ते मनुष्यस्वभावाच्या या कलास पूर्णपणें **अनुसरून आहेत, हें** उघड आहे.

आतां, वरील प्रकार आमच्यामध्यें अनुकरणाच्या रूपानें प्रवृत्त होणे

हें जरी साहजिक आहे, तरी त्यांत पोरकटपणाचा, पोकळ डौलाचा व मूर्खत्वाचाही थोडा अंश आहे असें नाहीं.यास उत्कृष्ट उदाहरण चष्म्याचें घ्या. चष्मा हा खरोखरी वृद्ध लोकांकरितां आहे.त्यास चाळिशी हा पर्याय शब्द वरील कारणावरूनच होऊन बसला आहे. पण मौज पहा काय आहे?—कीं मिऱ्याएवढी पारशांचीं पोरें व ऐन उमेदीत झांकीनें मिरवणारे फाकडे विद्वान, यांच्या नाकावर पाहावें तों उपनेत्राचें अधिष्ठान! ज्यांस आपली श्रीमंती दाखवायाची असेल, त्यांस आट-बारा आण्यांच्या खर्चांत ती दाखवण्याचा मार्ग म्हटला म्हणजे हीं भिंगे झालीं आहेत! ज्याची विद्वत्ता तुटपुंजीची असेल, व आपलें वजन पोरासोरांवर वगैरे (कांकीं आंतली ओळख ज्याला पोंचली आहे तो नुसत्या चष्म्यानें कधींही दबकला जाणार नाहीं) बसवावयाचें असेल, त्यानें नाकावर चष्मा चढविला कीं पुरे; त्याचा वरचष्मा झालाच! रस्तोरस्तीं शिपाई वगैरे अनभिज्ञ लोकांकडून ज्यांस ओजळी ओजळी रामराम, सलाम व नमस्कार घेण्याची हौस वाटत असेल, पण तो पुरण्यास तर काडीइतकाही अधिकार नसेल, त्यानें खासा जामानिमा करून, खऱ्या डोळ्यांवर खोटे डोळे लावून घ्यावे, म्हणजे झालें काम! आतां, या नकली डोळ्यांचा खरोखर उपयोग किती आहे म्हणाल, तर जेव्हां पाहण्याचा खराखुराच प्रसंग पडतो तेव्हां अस्सलांचाच उपयोग करणे त्यांस भाग पडतें. अशा वेळीं काचचक्षु कपाळावर सारून, पशुपति जो त्र्यंबक त्याच्यावरही ताण त्यांस करावी लागते! पशुपति भालनेत्र खरा; पण त्या बिच्याराच्या कपाळी तिसरा एकच डोळा होता; आमच्या पाशीं जोडी!! त्यांतून विद्वत्तेच्या अगदीं शिखरावर आरूढ झाल्याचा भ्रम जर अज्ञाणी लोकांत पाडावयाचा असेल, तर एकेरी चष्मा घ्यावा; आणि कांहीं सूक्ष्म रीतीनें पाहावयाचें असेल तर चटदिशीं एका डोळ्यावर भिंग ठेवावें आणि त्याचें काम झाल्याबरोबर चट-दिशीं तें आपोआप सोडून द्यावें! आमच्या देशास सज्ञान दशेची कळा उगीच नुकती कोठें येऊं लागली आहे; हिंदुस्थानांतले गिबन,

मेकॉले, वेब्स्टर वगैरे ग्रंथकाररत्नें अजून पुढेंच निपजावयाचे आहेत; मग, इतक्यांतच आमचे चर्मचक्षु मंदतेज होऊन, विलायती कांचांनी त्यांस पाठबळ देण्याची जरूरी पडूं लागली, तर मोठमोठे इतिहास, मोठमोठे कोश, आमच्या देशभाषांतून निपजण्याची महापर्वणी जेव्हां येईल, तेव्हां सत्यलोकींच्या डोळ्यांचा नवा कारखाना काढण्याविषयीं ब्रह्मदेवास येथून नोटीस पाठवावी लागेल कीं काय, कोण जाणे! वरील वेडगळ हौस पुरविण्याच्या पायीं कित्येकांनीं आपल्या जन्माचेंदेखील नुकसान करून घेतल्याचें आढळतें! तें असें कीं, पहिल्या प्रथम शौकाखातर म्हणून ज्या गोष्टीचा अंगीकार करावा, तीच पुढें उरावर बसून शोकास कारण व्हावी, असें अनेक वेळां झालें आहे. प्रथमतः ज्ञानचुकीचें कलम म्हणून डोळ्यांस आरशीची संवय करून घेतल्यानें, पुढें ती आयतीच नाकावर बसून, तिजवांचून गत्यंतरच नाहीं अशी फजिती झाल्याचीं अनेक उदाहरणे आहेत!

वरील उपनेत्राप्रमाणेंच हातमोजे, पायमोजे, गळपट्टा वगैरे जीं सोंगें अलीकडे निघालीं आहेत, तींही आम्हास निवळ उपहासास्पद वाटतात. एकतर, वरील शरीरत्राणावांचून आजपर्यंत कधीं कोणास इजा पोंचल्याचें ऐकिवांत नाहीं. यास्तव वरील सारे ढंग बायकोपणाचे होत, असें आम्ही समजतों. शिवाय, त्यांपासून विनाकारण देशाचा पैसा खर्च होत आहे हें निराळेंच. चहाकाफीलाही आम्ही वरील अनावश्यक वस्तूंतच काढणार. समयविशेषीं जरी त्यांचा उपयोग होतो, तरी नेहमीं त्यांचें लचांड बाळगणें हें आम्हास बिलकुल पसंत नाहीं. त्यांतून, हल्लीं देशाच्या विपन्नस्थितींततर वरील शौकांस भिकारचाळे असें नांव देण्यासही आम्हास धास्ती वाटत नाहीं.

[ केसरी, तारीख १६ ऑगस्ट सन १८८१ ]

मागील अंकांत, बारीकसारिक गोष्टींस आढळणाऱ्या अनुकरणाच्या प्रकाराविषयीं आम्हीं लिहिलें. या खेपेस, पाश्चात्त्यांच्या अनुकरणाचे जे कांहीं भयंकर प्रकार आम्हामध्यें सुरू झाले आहेत, त्यांच्या संबंधानें लिहितों.

वरील प्रकारांत अग्रगण्य कोणता, तो आज कोणालाही सांगायाला पाहिजे असें नाहीं. हा प्रकार मद्यप्राशन होय. हा कुत्सित विषय हातीं घेऊन, आमच्या लोकांच्या मूर्खत्वाचें विवेचन करण्याचा प्रसंग यावा, ही गोष्ट मोठी शरमेची आहे; पण तीस इलाज नाहीं. आपल्या भाषेंत म्हण आहे कीं, 'दुखणें झालें कीं तें वेशीवर बांधावें'. तर, हाच न्याय पतकरून, आमच्या लोकांत, आणि त्यांतून विद्वान् व सुधारलेले म्हणविणाऱ्या मंडळींत, हें जें अत्यंत लज्जास्पद व हानिकारक दुर्व्यसन प्रविष्ट होऊं पाहत आहे, त्याच्या संबंधानें या खेपेस प्रसंगानुसार चार शब्द लिहिल्यावांचून राहवत नाहीं.

मद्यप्राशनाचा प्रचार या देशांत प्राचीन काळीं सार्वलौकिक होता असें दिसतें. तो पुढें दैत्यगुरु शुक्राचार्य यांनीं निषिद्ध केला, अशी महाभारतांतर्गत आदिपर्वांत कथा आहे, हें सर्वांस माहीत आहेच. या काळापासून, म्हणजे निदान दोन हजार वर्षेंतरी, ही दुष्ट प्रवृत्ति ब्राम्हणजातींत विच्छिन्न झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. नाहीं म्हणायाला, शक्तिपूजेच्या मिषानेंमात्र हा निंद्य प्रकार चालू होता, व अद्याप कोठें कोठें असेल तेथें असेल. पण, अलिकडे इंग्रेजी विद्येची प्रवृत्ति इकडे झाल्यापासून, तज्जनित दुर्विकार लोकांत दृष्टीस पडूं लागले व आमच्या मद्यप्रिय मंडळीस देवीपूजेचे वगैरे बंड माजवण्याची व चोरून कोणीकडे मध्यरात्रीं वरील सुरोपासना करण्याची जरूर राहिली नाहीं. समुद्रमंथनकाळीं जशीं अमृत, विष व मद्य हीं तिन्ही रत्नें एकदम प्रादुर्भूत झालीं, त्याप्रमाणेच आंग्लभाषाविद्योदधींतून ज्ञानामृत, दुर्ग्रहविष व साक्षात् मद्य ह्या तिहींचा एका कालींच आम्हास लाभ झाला, असें ह्मणण्यास चिंता नाहीं. त्यांत केवळ ज्ञानामृताचेच चाहते व भोक्ते असे थोडेच निघाले. अमृताच्या अंशाबरोबर ज्यांच्या अंतःकरणास वरील विषार थोडाबहुततरी झोंबला नाहीं, असे विरळाच. त्यांतून, या कालकूटाचा अर्क जी सुरा, तिनेतर पुष्कळच भक्त आपल्या चरणीं लोळवले. फार तर काय?—पण ज्या बेट्यांस वरील सुधाविषमय पात्राचा फारसा योग घडला नाहीं, त्यांच्या

वाड्यासतर त्याच्यावर आलेला फेसच केवळ आला; मग तोच चाखून, तेवढ्यानेंही आलेल्या लहरींत ते रथ्योदकानिमग्न झाले ! तात्पर्य, ही सुरादेवी अर्वाचीन सुधारलेल्या काळांत अशी राजरोस प्रगट झाली असल्यामुळें, आतां तिला पूर्वीप्रमाणें अभिसारिकावेष धारण करण्याची बिलकुल गरज उरली नाहीं. तिनें आलीकडे वेश्येप्रमाणें उघड माथ्यानें रोजगार आरंभला असून, ती जणूं काय इंग्रेजी विद्येची सहचरीच बनली आहे. त्यांतून, आधुनिक गौरकाय प्रभूंचा तिजवर कृपाकटाक्ष ! मग काय विचारतां ? या रत्नाचें तेज विशेष झळकूं लागलें यांत नवल नाहीं. आमच्या दयाळू सरकाराचें मुख्य लक्ष आपली पोतडी भरण्यावर; यास्तव, श्वेतद्वीपजन्य द्राक्षावल्लींतून आमच्या आर्यबंधूंनीं काढलेला जो अर्वाच्य सोमरस, त्याचें आनंदानें सेवन करून, आह्मी जर मोठ्या खुषीनें सरकारी खजिन्यांत भर टाकीत आहों, तर आमच्या प्रभूंच्यानेंतरी आमचें मन कसें मोडवेल बरें ! खरोखरच, नाहीं मोडवणार. कालिदासानें म्हटलें आहे:—'राजा प्रकृतिरंजनात्,' राजा कोण ?— तर जो प्रजेस रंजवील तो ! ! याप्रमाणें राजकृपेचा हा एक मासला झाला. याशिवाय बाटलीबाईची पारमार्थिक दृष्ट्यातरी योग्यता लहान आहे काय ? छे छे, कोण म्हणेल ! प्रभु येशूचीतर ती साक्षात् अर्धांगी होय. प्रभुभोजनांत या महातीर्थावांचून कधीं चालावयाचेंच नाहीं. ज्या प्रभुरुधिराच्या सेचनानें या पापी भूलोकाचें पातकक्षालन झालें, त्याचेंच प्रतिनिधित्व ख्रिस्ती शास्त्राप्रमाणें मद्याकडे आहे, हें मत आमच्या कित्येक वाचकांस माहीत असेलच. आतां, इकडच्या दृष्टीनें पाहिले, तरीसुद्धां मद्याची थोरवी कांहीं कमी नाही बरें ! 'वेदार्थयत्न-' कारांनीं सोमवल्लीचे व द्राक्षावल्लीचें अद्वैतत्व कसें प्रतिपादन केलें आहे, तें पुष्कळांस माहीत असेल ! तेव्हां, या सर्व जबरदस्त प्रमाणांपुढें बिचाऱ्या शुक्राचार्यांच्या निषेधाची मातब्बरी आजकाल कोण मानणार आहे ?

असो, येथवर हा विनोदाचा प्रकार झाला. वस्तुतः पाहतां, या द्वाड व्यसनापासून आपलें कितीका प्रकारचें नुकसान आहे, हें जर मनांत

आणलें, व मद्यपी मनुष्य कसा कुचकामाचा होऊन जातो व केवळ पशूच्या योग्यतेस तो कोठवर पोंचतो,या गोष्टींचा जर क्षणभर विचार केला, तर विनोदाकडे ज्याची प्रवृत्ति होईल असा मनुष्य, खरोखर, फार विरळा. ज्या इंग्रज लोकांचें आचरण पाहून आमच्यांतल्या मूर्खांनीं ही छाकटेगिरी उचलिली आहे, ते, या योगानें इतर राष्ट्रांत इंग्रेजांची किती बदछान आहे,हें जर लक्षांत आणतील, व इंग्रेजी भाषेंतल्याच एतद्विषयक कित्येक म्हणींकडे जर ते अंमळ लक्ष पुरवतील,* तर त्यांनीं उचलेली ही तऱ्हा किती निंद्य आहे, हें त्यांच्यासुद्धां सहज मनांत येऊन चुकेल. त्यांतून, अलीकडे आह्मास जो शक्तिक्षय व द्रव्यक्षय लागला आहे, त्यांत आणखी या वारुणी बाईनें कृपा केली म्हणजे मग कडेलोटच झाला ह्मणायाचा! अगोदर आमचीं युनिवर्सिटीचीं बाळें ह्मणजे कसले जंगी पहिलवान, कीं वाऱ्याशी झुंजावयाचे! गादवाच्या ओझ्याचीं बुकें उराशीं बाळगून, त्यांचें पीठ पाडतां पाडतां अगोदरच कंठाशीं प्राण येऊन पोंचलेले! मग त्यांत बाटलाबाईची गळ्यांत मिठी पडली म्हणजे आटपलाच कारखाना!! आमची मागली हाधीभोळी मंडळी पन्नाशीला साठीलासुद्धां दाद न देतां, काळाशीं टक्कर देऊन रहात असे, आणि आतांची सुधारलेली संतति पाहवी; तो विशीतिशीलाच त्यांची मजल थकून, ज्ञानवृद्धतेमुळें जरेचीं चिन्हें त्यांजवर उमटावयाला आरंभ होतो! हाय! हाय! ही स्थिति केवढी शोचनीय आहे बरें!

प्रस्तुत विषयाचें समग्र विवेचन करूं गेल्यास, एक स्वतंत्र ग्रंथच होणार आहे. पण येवढ्या विस्ताराची तूर्त जरूर नाहीं. प्रस्तुत प्रसंगीं, हा अनुकरणाचा प्रकार किती निंद्य व हानिकारक आहे, येवढेच सांगावयाचे आहे; यास्तव वरील दिग्दर्शन बस आहे असें

---

*अशा ह्मणींपैकीं मासल्यासाठीं कांहीं खालीं देतों:–'Bacchus has drowned more than Neptune' ह्म० समुद्रांतल्यापेक्षां मद्यांत पुष्काळ बुडून मेले आहेत; 'When wine is in, wit is out' ह्म० दारू आंत आली कीं बुद्धि बाहेर जाते, वगैरे.

आह्मास वाटतें. शिवाय या दुर्व्यसनापासून काय काय परिणाम घडतात ते सर्वांस स्पष्ट दिसणारें असून, त्यांवर वर्तमानपत्रांतूनही अनेक वेळां चर्चा झालेली आहे. यास्तव हें प्रकरण येथेंच संपवितों.

[ केसरी, ता० २३ आगष्ट १८८१ ]

मागील दोन खेपेस, अनुकरणाच्या दोन प्रकारांचें निरूपण केलें. आतां, या अंकांत, तिसऱ्या एका प्रकाराविषयीं लिहितों.

हा प्रकार धर्मसंबंधी अनुकरण होय. अलीकडे आमच्या देशांत ख्रिस्ती धर्माच्या योगानें किती चलबिचल झाली आहे, ती सर्वांस माहीत आहेच. पुष्कळांची स्वधर्मावरील श्रद्धा उडाली आहे, कित्येक तर येशूच्या कळपांत जाऊन सामील झाले आहेत, कित्येक मुळींच 'सब् झूट है' म्हणून निवळ नास्तिक बनले आहेत, कित्येक 'न हिंदुर्न यवनः' अशा अधल्या मधल्या स्थितींत त्रिशंकूप्रमाणें अडकून राहिले आहेत, आणि कित्येक नवीन नवीन धर्मपंथ काढून त्यांस लोंबकळत राहिले आहेत. या सर्व तऱ्हा, ख्रिस्ती धर्म व इंग्रेजी विद्या यांचा इकडे प्रचार झाल्यापासून, उत्पन्न झाल्या आहेत, हें कोणासही सांगावयास नकोच. यापैकीं प्रस्तुत विषयांत अंतर्भाव म्हटला, म्हणजे शेवटल्या प्रकाराचा होतो, हे उघड आहे. तर त्याविषयीं आज निरूपण करूं.

ब्रम्हसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, हे वस्तुतः पाहतां एकाच वस्तूचे पर्याय होत. बंगाल्यांतील बाबूंनीं जो सुधारलेला नवीन पंथ काढला, तो ब्रम्हसमाज; मुंबईतील कांहीं प्रमुख मंडळीनें काढला तो प्रार्थनासमाज; आणि येथील कांहीं शूद्रमंडळीनें काढला, तो सत्यशोधक समाज. याप्रमाणें वरील तिहींस केवळ स्थलभेदेंकरून व पुरुषभेदेंकरून निरनिराळें नामाभिधान प्राप्त झालें आहे; बाकी मूळाशीं जातां, साऱ्यांचीं मतें एकच आहेत. मुसलमानांचा धर्म या देशांत प्रवृत्त झाला असतां, जसे नवे धर्मभेद निर्माण झाले, तसाच चालू शतकांत ख्रिस्ती धर्माचा प्रभाव प्रगट होत आहे. शीक हे मूळचे हिंदु असून, त्यांचा

काल कुराणाकडे वळला, व उलट पक्षी, कबीरपंथी हे मूळचे मुसलमान असून रामोपासक बनले. ही चलबिचल जशी मागील काळांत झाली, त्याप्रमाणेच सध्यांच्या शतकांतही असाच चमत्कारिक योग आला आहे. पहा कीं, हिंदु लोकांस आपल्या धर्माचा कंटाळा आल्यासारखें झाल्यामुळे, त्यांनीं ख्रिस्ती धर्माकडे धाव घेऊन वरील समाज काढले आहेत, आणि ख्रिस्ती मंडळीला बैबलाचा वीट येऊन ते हिंदुधर्मांत शिरूं पहात आहेत ! दोन तीन वर्षांपूर्वी 'थियोसोफिस्ट' पंथाची मंडळी अमेरिकेहून निघून, मुंबईस येऊन दाखल झाली, व ख्रिस्तस्वामीस झुगारून देऊन त्यांनीं दयानंदस्वामींच्या चरणसरोजीं आपला माथा ठेविला, ही अजब गोष्ट आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस अवगत असेलच ! एकंदरींत पाहतां, चालू शतकाचा महिमा असा दिसतो कीं, ज्याचा धर्म त्यास नकोसा झाला असून, इतरांच्या धर्मांची काय काय मौज आहे ती अनुभवावयाची लहर पुष्कळांच्या ठायीं आढळते. त्यांतून, कित्येक बहादर तर असेही आमच्यांत आहेत कीं, त्यांचा धर्म आणि सरड्याचा रंग हीं एक!—म्हणजे सरडा जसा घटकेंत तांबडा, घटकेंत पांढरा, आणि घटकेंत हिरवा; त्याप्रमाणेच वरील तत्त्वजिज्ञासु हे प्रार्थनामंदिरांत पाहिले तर प्रार्थनामंदिरांत आहेत, येशूच्या मठांत पाहिले तर तेथेंही समन् एकतातच आहेत, मुल्लासाहेब भेटले तर त्यांच्याबरोबर नमाज पढायालाही तयारच, व इकडे वेदमूर्तींची सभा पहावी तों तींतही शालजोडी परिधान करून आपले प्रतिष्ठितपणें विराजमान आहेतच ! अशांच्या धर्माची मीमांसा करतांना बिचारा जैमिनिदेखील हात टेकील असें वाटतें ! !

सध्यां धर्मप्रकरणीं आमची स्थिति पाहिली तर ती अशा प्रकारची आहे. हिचा तूर्त आम्हास कांहीं विचार कर्तव्य नाहीं. तसेच वरील समाजाचीं मतें कोणत्या तऱ्हेचीं आहेत, व त्यांत सत्याचा किंवा समंजसतेचा कितपत अंश आहे, याविषयीं येथे विवेचन करणें नलगे. तूर्त एवढेच पाहणें बस आहे कीं, या समाजवाल्यांनीं अनुकरणाचा

प्रकार कितपत स्वीकारला आहे, व त्याच्या योगानें त्यांच्या इष्ट कार्यास कितपत साह्य होत आहे. यास्तव याच विवेचनास आतां आरंभ करतों.

प्रार्थनासमाज हा पंथ आपणास हिंदुधर्माहून अत्यंत भिन्न म्हणवतो. यास्तव त्याच्या मंदिराचा घाट आमच्या देवळासारखा नाहीं हें ठीकच आहे. शिवाय त्याचें व्यासपीठ, त्याची उपदेशपद्धति, त्याचें धर्मपुस्तक वगैरे-या सर्व गोष्टींत निराळीच तऱ्हा दृष्टीस पडते; तीसंबंधानेंही आमचें कांहीं म्हणणें नाहीं. तथापि वरील प्रकाराकडे एकंदरीत पाहतां, हिंदुधर्मापेक्षां ख्रिस्ती धर्माकडेच सदरील पंथाचा अधिक ओढा दिसतो, इतकें सांगणें अवश्य आहे. आतां, ज्या अर्थीं मुख्यतः ख्रिस्ती धर्मापासूनच सदरील मंडळीस मूळ स्फूर्ति प्राप्त झाली आहे, त्या अर्थीं तसा कल असणें साहजिकच आहे हें आम्ही कबूल करतों. तसेंच. ख्रिस्ती धर्मातला प्रार्थनेचा दिवस जो आदितवार, तोच प्रस्तुत भक्तजनांनीं पतकरला आहे, याबद्दलही सांगायाला त्यांस अशी सबब आहे कीं, हा दिवस मोकळा असल्यामुळें विशेष सोईचा झालेला आहे. सारांश, अनुकरणाच्या या आनुषंगिक गोष्टींच्या संबंधानें आम्ही त्यास नांवें ठेवीत नाहीं. पण, याखेरीज ज्या एक दोन गोष्टी सदरील धर्मपंथांत आढळतात, व परमार्थसाधनाला ज्यांची येवढी आवश्यकताही दिसत नाहीं, त्यांचा आदर कां झाला आहे याचें कारण मात्र कांहीं कळत नाहीं. आम्हासतर ही केवळ अनुकरणेच्छेचींच फळें होत असें वाटतें. यास्तव त्यांविषयीं दोन शब्द लिहितों. हे अनुकरणाचे प्रकार येणें प्रमाणें:—

पहिला प्रकार गाणें बजावणें. प्रत्येक समाजांत एकेक गवई ठेवलेला असून, तो भक्तमंडळीच्या संगीतास साहाय्य करीत असतो. त्यानें 'प्रार्थनासंगीतां-'तलीं पद्यें तालसुरावर बसवून प्रथमत म्हणण्यास आरंभ करावा, आणि नंतर साऱ्या सामाजिकांनीं त्याच्यामागून सूर ओढीत असावें; हीच पद्धति सध्यां चोहोंकडे चालू आहे. आतां, हा प्रकार, ख्रिस्ती देवळांतून जी तऱ्हा

आढळते, तिचेंच केवळ अनुकरण होय, हें कोणासही सकृद्दर्शनींच भासणार आहे. गाणें बजावणें हे श्रवणेंद्रियास अत्यंत तोषकर असल्यामुळे, आमच्या जुन्या धर्मांतसुद्धां त्याचें साहाय्य कीर्तनप्रसंगीं घेतात हें खरें; पण नुसत्या साध्या उपसनेच्या वेळीं तालसुराची काय गरज आहे, हें आम्हास कळत नाहीं. ब्राम्हणानें संध्या तालसुरांत केली, किंवा मुसलमानानें नमाज तालसुरांत म्हटला, तर किती विलक्षण वाटेल! त्यांतून, गायाचेंच झालें तर मुख्य उपदेशकानें किंवा गवयानेंच तेवढें गाईलें असतां, बस नाहीं काय? साऱ्या मंडळीनें मागून ढेल ओढावे, आणि कोणाचा मंजुळ स्वर तर कोणाचा भसाडा आवाज, अशी सळमिसळ होऊन, 'आठरा धान्यांचें कोडबोळें' वर 'आकाशांतील बापा-' कडे जावें, यांत समाजवाल्या मंडळीस काय मौज वाटत असेल ती असो! आम्हासतर असेच वाटतें कीं अनुकरणबुद्धीचाच केवळ हा खेळ आहे, यांत शंका नाहीं.

दुसरा प्रकार स्त्रीजनांचा. आमचे सुधारलेले भक्तजन हे केवळ स्वतःच जुन्या धर्मास कंटाळलेले आहेत असें नाहीं, तर त्यांतून सहकुटुंब सहपरिवार आपली मुक्ति व्हावी, अशी त्यांतील पुष्कळांची इच्छा दिसते. यास्तव उपासनेच्या दिवशीं प्रार्थनामंदिरांत जें जावयाचें, तें, शानदार पोषाक करून, लेडीला हातीं धरून, अशा थाटानें जावयाचें, असा प्रघात पडत चालला आहे! हाही केवळ अनुकरणाचाच प्रकार असून, अनवश्यक असल्यामुळे, आह्मास अत्यंत दूषणीय वाटतो. आमच्या सामाजिकांस मोठमोठे ग्रंथ वाचल्यानें उपरति होऊन खऱ्या प्रभूच्या नांवानें डोळे मिटण्याची खरोखर अंतःकरणापासून प्रेरणा झाली असेल, हें आम्हास कबूल आहे; कां कीं तो प्रकार संभवनीयतरी आहे. पण नवऱ्यावर 'पवित्र आत्म्या-'नें झडप घातली, म्हणजे नवऱ्याबरोबर बायकोच्या अंतःकरणांतही तितकें तत्त्वज्ञान उतरलेंच, असें समजलें पाहिजे काय? कोण जाणे बोवा! इंग्रजांत बायकोस Partner (भागीदारीण) म्हणतात, किंबहुना Better half (अर्धाधिक अंश) म्हणतात; तेव्हां नवऱ्याच्या हातास हात

लागल्यानें नवऱ्याच्या विद्वत्तेंतला अर्धा किंवा अर्धाधिकही भाग 'अर्द्धांगी-' च्या ठायीं उतरत नसेल कशावरून? रसायनशास्त्रांत good conductor (संक्रामक) आणि bad conductor (असंक्रामक) असे पदार्थांचे दोन भेद सांगितले आहेत; तेव्हां ब्रह्मदेवानें स्त्रीजातींत तसाच कांहीं चमत्कार ठेवला नसेल कशावरून? परंतु धर्मस्फूर्तींच्या संक्रमणधर्माविषयीं आम्ही अनभिज्ञ असल्यामुळें, त्याजविषयीं कांहीं बोलत नाहीं. तरी लोकव्यवहारदृष्ट्या पाहतां, आह्मास इतकेंच नवल वाटतें कीं, जरी सद्धर्माकडे आमच्या देशभगिनींची मनोदेवता वाहत असली, तरी त्या स्फूर्तींचा नट्टापट्ट्याशीं कांहीं एक संबंध दिसत नाहीं. 'पवित्र आत्मा' खोप्यांतील गजऱ्यावर एवढा फिदा होतो काय? आह्मास तर तसें होईलसें वाटत नाहीं.

असो; आतां सरतेशेवटीं, प्रकृत विषयाच्या संबंधानें एक घडलेला प्रकार येथें दाखल करून, आटपतें घेतों. मुंबईत प्रथमतः वरील समाजाची जेव्हां स्थापना झाली, तेव्हां उपासनेच्या वेळेस स्त्रीजनांनीं माडीवरील सज्जा सुशोभित करावा, असा प्रघात मंडळीनें सुरू केला. स्त्रीजनांच्या कंठांत विधात्यानेंच माधुर्य हा धर्म विशेष ठेविला असल्यामुळें, वरील प्रसंगीं तो धर्म धर्मोन्नतीच्या कामीं फार उपयोगीं पडूं लागला. कारण, दिवसेंदिवस समाजांत उपासकांची विशेष गर्दी होऊं लागली. प्रथमतः या गर्दीची योग्य मीमांसा बिचाऱ्या भोळ्या भक्तजनांस झाली नाहीं असें दिसतें. कारण, बलरामाच्या संबंधानें पंतांनीं वर्णिलें आहे कीं,—

मथि कामशर ज्या, त्या
राम ह्मणे साधु मोक्षसत्पथिका।

तसाच कांहीं प्रकार वरील प्रसंगीं झाला असावा असें वाटतें. किंवा सामाजिकांनीं कदाचित् असाही विचार मनांत आणला असेल, कीं ख्रिस्ती देवळांतूनसुद्धां पुष्कळ लोक कर्णेंद्रियाची व चक्षुरिंद्रियाची तृप्ति करावयाला जात नाहींत काय? मग येथेंही तसा प्रकार

कदाचित् असला ह्मणून काय हरकत आहे ? पण पुढें पुढें जेव्हां देवळांत रिकामकी दाटी फारच व्हावयाला लागली, तेव्हां त्या दाटीचें कारण त्यांच्या लक्षांत येऊन, तें त्यांनीं मोडून टाकलें....* या हकी-गतीवरून, केवळ अनुकरणाच्या प्रकारापासून काय परिणाम होतात, हें आमच्या वाचकांच्या चांगले लक्षांत येईल, असें आम्हास वाटतें.

[ केसरी, तारीख ६ सप्टेंबर सन १८८१. ]

येथपर्यंत अनुकरणाच्या दूषणीय प्रकारांविषयीं लिहिलें. आतां, पाश्चात्त्यांपासून आम्हीं ज्या अनेक गोष्टी घेण्यासारख्या आहेत, व ज्यांपासून वरील प्रवृत्ति आम्हास हितावह होण्यासारखी आहे, त्या सांगतों.

पाश्चात्त्य लोकांपासून, आणि त्यांतून विशेषतः इंग्रजलोकांपासून, कित्ता घेण्यासारखी सर्वांत मोठी गोष्ट ह्मटली म्हणजे व्यवस्थितपणा ही होय. या लोकांचें प्रभुत्व इकडे स्थापित झालें, व ते आह्मास अजेय होऊन, त्यांचा थोड्याच काळांत इकडे पगडा झाला,—हें सर्व कार्य वरील एका गुणाचेंच होय, असें म्हणायास हरकत नाहीं. बाकी, आमचे लोक त्यांच्याशीं थोडे झगडले असें नाहीं, व आम-च्यांत मर्दुमकीच्या संबंधानें उणेपणा होता असेंही नाहीं; कित्येक-वेळांतर यशवंतराव, हैदर वगैरे मंडळीनें त्यांस अगदीं जेरीस आणून सोडलें होतें, हें इतिहासांत प्रसिद्धच आहे. पण यांची व्यवस्था कांहीं लोकोत्तर; तिच्यापुढें आमचे लोक अगदीं चीत होऊन गेले ! अझून-तरी वीस कोटी लोकांवर येवढ्याशा मंडळीचा जो अंमल चालू

*येथें मूळ अंकांत थोडी जागा सोडली आहे. त्याचें कारण असें कळतें कीं येथें समाजस्थांस लागेल असा कांहीं कडक मजकूर शास्त्री बुवांनीं लिहिला होता, तो केसरीचे चालक रा० गोपाळराव अगरकर यांनीं, आपल्या अधिकारांत, गाळला. हें सहजच शास्त्री-बुवांस आवडलें नाहीं. परंतु त्यासंबंधानें त्यांनीं अवाक्षरही तोंडावाटे न काढतां, पुढील अंकाकरतां लेख लिहून पाठवावयाचा तो मात्र पाठविला नाहीं ! एवढें औषध पुरे झालें; फिरून त्यांच्या लेखांत फिरवाफिरव केल्याचा प्रसंग आला नाहीं !— संपादक

आहे, आणि तो पुनः असा कीं येवढ्या अवाढव्य देशांत कोण कोठें हूं कीं चूं करील– हा सारा प्रभाव कशाचा बरें ? एका व्यवस्थितपणाचा, दुसरें कांहीं नाहीं ! कोणत्याही गोष्टींत इंग्रजलोकांचें वर्तन पहा; राज्यकारभार, व्यापार, सामान्य व्यवहार,—चोहोंकडे जसा काय घड्याळाचा ठोका ! अमक्या अमक्या वेळेस अमकें अमकें काम व्हावयाचें, म्हणजे त्या वेळेस तें झालेंच म्हणून समजावें; त्यांत कधीं अंतर पडावयाचें नाहीं ! सृष्टीचे व्यापार जसे आज अनादिसिद्ध सुयंत्रपणें चालले आहेत, तसाच प्रकार आमच्या राज्यकर्त्यांच्या व्यवहाराचा होय, असें म्हणायास चिंता नाहीं.

आतां, तिकडून आमच्या मंडळीकडे जों वळावें, तों सगळा प्रकार याच्या उलटा. मोठमोठ्या संस्थानांतील कारभारापासून तों साधारण जेवणावळींच्या कामापर्यंत सारा एक प्रकार; तो काय ?–तर सुस्ती, अंदाधुंदी, अलगरजीपणा, कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं ! हा सर्व गैदीपणा आमच्या इतका आंगवळणी पडून गेला आहे कीं, त्याचें दोषरूपत्वही आम्हास भासेनासें झालें आहे. जुन्या लोकांच्या तोंडून मराठी दरबाराची किंवा मोगलाईची तारीफ कधीं कधीं ऐकूं येते, ती काय ?—तर 'अंदाधुंद कारभार !' 'अलीजाही कारखाना !' पण ही आलीजाही आम्हास पुरती भोंवून, तिनें अगदीं अभ्यास मोताद करून टाकलें असतांही, अद्याप आमचे डोळे उघडले आहेत असें नाहीं. आमचा श्रीमंतीचा धूर व वाचळाई खाका अजून आहे तो आहेच !

असो; आतां एक दोन गोष्टींचीं उदाहरणें घेऊन, व्यवस्थितपणाच्या संबंधानें आमच्यांत व इंग्रजलोकांत किती अंतर आहे, तें दाखवतों.

पहिली गोष्ट लौकिक कृत्यें. लौकिक कृत्यें ह्मणजे सार्वजनिक कल्याणार्थ उभारलेलीं सभादिक कार्यें, हीं होत. यांची व्यवस्था सामान्यतः कोणत्या प्रकारची आढळते, याविषयीं पूर्वीं आम्हीं सविस्तर विवेचन केलेंच आहे. हलीं यासंबंधानें इंग्रज लोकांचा नियमितपणा कितपत

आढळतो, तो सांगतो. कोणतेंही कार्य म्हटलें म्हणजे तें झटल्याशिवाय सिद्धीस जाणार नाहीं, हें उघडच आहे; याविषयीं कोणाच्याही मनांत संदेह असेल असें वाटत नाहीं. पण हा झटण्याचा प्रकार आमच्या मंडळींत इतक्या तऱ्हेचा आढळतो, कीं सभेला नियमित वेळीं येण्यापासूनच रड ! पांचपन्नास मंडळीस चार वाजतां येण्याविषयीं जर आमंत्रणपत्रिका गेल्या असल्या, तर साडेचाराला पांच सात मंडळी जुळलेली आढळली तर मोठें भाग्य ! निमेशिमे मंडळीतर मुळीं यावयाचीही नाहीं; आणि त्यांतली निमेशिमे जी येणार, तीही सरासरी काम आटपण्याच्या बेताला आली तर आली ! मुळीं आव्हानापासूनच जर इतकी व्यवस्था, तर नेमलेलें काम वेळच्या वेळीं करायाचें, मनापासून झटून करायाचें, वगैरे गोष्टी तर कोठच्या दूरच ! आमच्या मंडळ्यांपैकीं बहुतेकींतून असा प्रकार नेहमीं आढळतो व अनेक वेळां आढळलाही आहे कीं, एकादा चांगला व्यवस्थित व मेहनती मनुष्य असला, तर त्याच्या आमदानीपर्यंत सभेचा कारभार बरा चालतो,पण तो गेला कीं आटपलें ! याचें कारण स्पष्टच आहे, कीं ' भांगेंत तुळस ' या न्यायानें आमच्यांत जर एकादा कोणी उद्योगी मनुष्य निपजला, तर त्याचें सारें कर्तृत्व त्याच्याबरोबर जातें; इतर लोकांचा जन्मसिद्ध गुण कधीं पालटायाचा नाहीं !

दुसरी गोष्ट जेवणाची घ्या. या संबंधाचा अनुभव नेहमीं सर्वांस आहेच. बोलावणेकऱ्याला ताकीद, कीं सर्वांस दहा वाजतांचें आमंत्रण कर; लोक नेहमीचे घटलेलेच, त्यांनीं मुळींच घरून बारा वाजतां किंवा एक वाजतां बाहेर पडायाचें; मग तेथें जाऊन चार घटका भोजनप्रतीक्षा झाल्यावर, उपरांतिक अन्नाचा लाभ व्हावयाचा ! त्यांतून, एकादे बडे गृहस्थ यावयाचे असले, किंवा कांहीं मानपानाची मंडळी यावयाची असली, म्हणजे तर कांहीं विचारूंच नये; मग बुभुक्षु जनांनीं बिछाइतीवर एकेक झोप काढून घ्यावी, हा उत्तम मार्ग ! आणि या मार्गास कित्येक अनुसरतात देखील ! कां कीं, आमच्यांत आढ्यतेचें व श्रीमंतीचें विशेष लक्षण म्हटलें म्हणजे हें, कीं निदान दोन

बोलावणीं तरी घेतल्याखेरीज जागचें हालूच नये. आणि त्यांतून बाच्लाई मिजास म्हटली म्हणजे ही, कीं दोन बोलावणीं परत लावून, तिसऱ्या खेपेला सांगायाचें, कीं कोणी येत नाहीं हो ! ! खरोखरी पाहतां, हा केवढा मूर्खपणा आहे बरें ! ज्या वेड्यांना वेळेची किंमत कळत नाहीं, आपल्या एकट्याकरतां शेकडों मंडळीस विनाकारण ताटकळत ठेवण्याची ज्यांस शरम वाटत नाहीं, व पोरकटपणाची आढ्यता मिरवून आपलें हसें करून घेतल्याचीही ज्यांस पर्वा नाहीं, त्यांस काय म्हणावें ! असो; परमेश्वर करो, आणि असल्या जडशिरोमणींच्या डोक्यांत थोडीतरी समजूत शिरो ! या प्रार्थनेखेरीज त्यांस सुधारण्याचा दुसरा कांहीं मार्ग आम्हास दिसत नाहीं !

यासंबंधानें युरोपियन लोकांचे रिवाज किती उत्तम आहेत ! निमंत्रण व्हावयाचें, तें नुसत्या एका चिठ्ठींत. पांच वाजतांचें बोलावणें असलें तर पावणेपांचपावेतों कोणाला कांहीं गडबडसुद्धां दिसायाची नाहीं; पांचांच्या ठोक्याला पहावें तों तमाम मंडळी हजर! कोणास यावयाचें नसलें, कीं त्याची माफीची चिठ्ठी हजर व्हावयाची ! या उत्तम व्यवस्थेमुळें सर्वांस किती सोईकर होतें बरें ! हीच गोष्ट सभादिकांची. फार करून, पांच मिनिटेंही त्यांचीं कधीं आगेमागे व्हावयाचीं नाहींत. सारें काम एकाद्या यंत्राप्रमाणें चालायाचें ! पण आमचें यंत्र एकदा कधीं काळीं बिघडलें आहे, तें आज मितीपर्यंत ! तें परमेश्वरसत्तेनें कधीं ताळ्यावर येईल तें येवो; येईल तो सुदिन, इतकें बरीक खरें !

[ केसरी. ता० १३ सप्तेंबर १८८१ ]

इंग्रज लोकांपासून कित्ता घेण्यासारखी दुसरी गोष्ट म्हटली, म्हणजे साहस होय. हा गुण ज्या मानानें राष्ट्रांत असतो, त्या मानानेंच त्याचा उत्कर्ष किंवा अपकर्ष सामान्यतः आढळतो. शरीराचें चालक जसें मन, त्याप्रमाणेंच मनाचें चालक साहस हें होय. साहसजन्य उत्साह ज्याच्या मनाला नाहीं, तो केवढाही बुद्धिमान् असला, तरी सुस्तींत पडलेल्या अजगराप्रमाणें किंवा मेलेल्या हत्तीप्रमाणेंच तो होय, यांत

संशय नाहीं. त्याचा मोठेपणा म्हणजे अवजडपणा; त्यापासून उपयोग म्हणून कांहीं एक नाहीं!

इंग्रज लोक केवढे साहसप्रिय आहेत, हें येथें सविस्तर सांगायाला पाहिजे असें नाहीं. त्यांच्या उलाढालीपासून व उपद्व्यापापासून कांहीं सुटलें असें या जगांत आहे काय? विजयी नॉर्मन लोक आणि पराधीन झालेले साक्सन लोक, यांची सळमिसळ होऊन, त्यांचा एकवटपणा जेव्हांपासून झाला, व इंग्लिश हें दोघांचें सामान्य अभिधान जेव्हांपासून प्रवृत्त झालें, तेव्हांपासून या राष्ट्राची जी चळवळ सुरू झाली, ती या घटकेपर्यंत सारखी चालली आहे! स्कॉटलंड, वेल्स, एर्लंड, फ्रान्स, पालिस्टाइन, येथपर्यंत त्यांचा शस्त्रप्रभाव गाजला; पुढें आपल्या राजाशीं त्यांनीं कटकट करून, दोघा असामींस चीत करून टाकलें, व आणतां आणतां, राजसत्ता अगदीं संपुष्टांत आणून सोडली; एक मंडळी पश्चिम दिशेकडे वाहवली, तिनें तिकडे टोलेजंग वसाहती उठवल्या व आलीकडे त्यांचें एक बलाढ्य राष्ट्र बनवून दिलें; दुसरी मंडळी पूर्वदेशांकडे वळली, तों तेथेंही तिनें दिगंतकीर्ति जोडून, अश्रुतपूर्व असा राज्यव्यूह रचला. बाकीच्या जगांत तरी या प्रतापी मंडळीचा सुळसुळाट म्हणजे चुकला आहे, असें कांहीं नाहीं. कोणी जहाजांत बसून ध्रुवांकडच्या हिममय प्रदेशांत थंडीनें व भुकेनें मरायाला जातच आहेत; कोणी आफ्रिकेच्या मध्यभागांत मुशाफरी करायाला निघाले आहेत; कोणी विमानांत बसून मेघमंडलास भेदून वर चालले आहेत; कोणी भूमध्यसमुद्र व तांबडा समुद्र यांचा प्रीतिसंगम करून देण्याच्या घाटांत आहेत; कोणी भरतखंडास लोहशृंखलेनें जखडण्याच्या खटपटींत आहेत; कोणी आटलांटिक महासागराच्या खालून 'नवीन जगां-'त जातां येण्यासारखें अपरंपार विवर निर्माण करण्याची वाटाघाट करीत आहेत;—याप्रमाणें आमच्या राज्यकर्त्यांचा उपद्व्याप सारखा चालू आहे; त्यास खळ म्हणून नाहीं! राजकारण, युद्धकर्म, व्यापार, विद्या, कला, मुशाफरी,—कांहींही घ्या; कोठें म्हणजे या लोकांची यत्किंचितही कसूर आहे, असें कांहीं नाहीं. यामुळें ते

या युगींचे, जणों काय, विश्वकर्मेच होऊन बसले आहेत; व यामुळेच, आजपर्यंत होऊन गेलेल्या महाविख्यात राष्ट्रांसही त्यांनीं दिपवून टाकलें असें म्हणायास चिंता नाहीं !

आतां, वरील अमोलिक गुण आमच्या येथें कितपतसा दृष्टीस पडतो, हें पाहूं. आरंभीं सांगीतलेल्या सिद्धांताप्रमाणें, आमच्या सध्यांच्या स्थितीवरून पाहतां, तो येथें कितपतसा वास करीत असावा, याचें प्रमाण सहज निघणार आहे. हें प्रमाण अर्थात् हेंच कीं, जसा उत्कर्षाच्या संबंधानें या राष्ट्रांत अभाव दृष्टीस पडतो, तसाच, त्याचें कारण जें साहस त्याच्या संबंधानेंही तो आढळतो. दीर्घकालिक परवशतेमुळें ह्मणा, अगर आमच्या दुर्दैवामुळें ह्मणा, हल्लीं तर अशी स्थिति येऊन पोंचली आहे कीं, कोणत्याही कामांत साहसाचें म्हणून नांव आम्हास माहीत नाहींसें झालें आहे. यामुळें आमचेंच घर आम्हास पारखें होऊन, 'खाजविलें जेंवि आपलें घोडें '* या पंतवचनाची सार्थकता आमचेठायीं पूर्णपणें दिसून येत चालली आहे; इतकेंच नव्हे, तर परकी लोकांनीं आमच्या तोंडांत मारून, आमचे व्यापार बसवले, आमच्या कला नाहींशा केल्या, सुईदोऱ्यापासून तों मोठ्या उंची सणंगांपर्यंत आम्हास खुळ्यांप्रमाणें आपल्या तोंडाकडे बघायाला लावलें—इतकें झालें तरी आम्हास त्याची बिलकुल शरम वाटेनाशी झाली आहे ! ज्या हिंदुस्थानाच्या व्यापारावर, केवळ परंपरेच्या संबंधानें, अलेकझांड्रिया व व्हेनिस हीं शहरें एकदम भरभराटलीं, आणि तो धागा फिरंगी लोकांनीं तोडून टाकतांच, एकदम खचूनही गेलीं, त्याच आपल्या देशाची आज तीनचार शतकांत काय दशा होऊन गेली आहे पहा ! कामधेनूसच जसा गवताचा चारा दुर्लभ व्हावा, किंवा अन्नसत्रवाल्यास जसा चौपदरीचा योग यावा, त्याप्रमाणें आजला यो

---

* 'गदापर्वा-'त पुढील अभिमानोक्ति युद्धांत पडलेल्या दुर्योधनाच्या भाषणांत आली आहेः—

> होउनि पराजित पर-प्रेष्य न मी जाहलो, न हें थोडें ।
> अरिहतपदोपजीवन खाजविलें जेंवि आपुलें घोडें ॥

भरतभूमिवासी जडभरतांची अवस्था होऊन बसली आहे. तुमची धोतरें फाटलीं काय ?–मांजरपाटी धागा आणा. तुमची चूल अडली काय ?–आगकाडीची पेटी आणा आणि अग्नि सिद्ध करा. एकादा झुरका ज्यास्ती होऊन तुम्ही गटारांत पडलां आहां काय ? विलायती 'मेकर-'ची मेणबत्ती काढा. तुम्हाला रक्तशुद्धि करवणें आहे काय ?–हालोवेला किंवा मेरे आणि लानमन यांना बोलावा. तुम्हाला संहिता पढायाची आहे काय ?–भट्ट मोक्षमूलर यांचा गाथा आणवा. तुम्हाला मराठी किंवा संस्कृत शब्द अडला आहे काय ?–मोलस्वर्थ किंवा मॉनियर विलियम्स् यांनीं निर्मिलेलीं सरस्वतीभांडारें काढा. याप्रमाणें आम्ही होतां होतां, निवळ आयतोजी होऊन बसलों आहों; आमच्या ढुंगणचें वस्त्र सोडून नेलें, व चामडीचाही चट्टा निघण्याची वेळ आली, तरी आमची आह्मांला शुद्ध नाहीं ! नुसत्या अल्पस्वल्प जिनसांच्या व्यापाराची वरच्यासारखी रड; मग याहून धाडसाच्या कृत्यांविषयीं तर बोलावयासही नको. हल्लींच्या सत्ययुगांत आह्मास दारुगोळा दृष्टीस पडावयाचा म्हटला ह्मणजे दिवाळींत, व आमचीं शस्त्रास्त्रें ह्मटलीं ह्मणजे आफिसांतली चाकूकात्री ! ज्या महाराष्ट्र देशांतले वीर साऱ्या हिंदुस्थानास पुरून उरत असत, त्यांच्यांत आज इतकी वीरश्री उरली आहे, कीं एक दोन जण इंग्रेजी पलटणींत शिरून आफगाणिस्थानावरच्या मोहिमेंत गेले, तों चोहोंकडे आश्चर्य झालें व हाहाकार उडाला ! एका फडक्यानें हातचें पेन टाकून देऊन, तलवार घेतली, तों मोठा उत्पात झालासा सर्वांस वाटला ! इतर देशांत जी नेहेमीच्या आंगवळणांतली गोष्ट, ती आमच्या देशांत धूमकेतूप्रमाणें किंवा धरणीकंपाप्रमाणें मोठी अपूर्व वाटूं लागली आहे. फार दूर कशाला ?– ज्या आमच्या पुणेशहरचे पठ्ठे गेल्या शतकांत साऱ्या हिंदुस्थानभर हुतूतू घालीत होते, त्यांच्यांत, आजला शिळोप्याच्या वेळीं, दोन रामटोले मारायालाही कोणी न मिळाल्यामुळे, बिचारें 'क्रीडाभुवन' इंद्रभुवनाच्या भेटीस जाण्याच्या लागांत आहे ! आणि जेथली मंडळी 'पानपत्या वारू-'वर स्वार होऊन 'चौमुलखांत धौशा वाज-

वून ' माघारीं येत होती, तेथें आतां मर्दुमकी कोठें राहिली आहे, तर जातीनें घोड्याची रेन धरून सारथ्यकर्म बजावण्यांत ! !

तेव्हां, एकंदरींत पाहतां, आमच्या देशांत साहसाचा अगदींच ऱ्हास होऊन गेला आहे, यांत संशय नाहीं. जिकडे तिकडे आपलप्रोटेपणा व कमकुवतपणा माजल्यामुळें, कोणतीही गोष्ट म्हणजे आह्मी आपल्या हिमतीवर करूं, असा जोम आमच्यांत मुळींच राहिला नाहीं. अगोदर कोणाचा कोणाला विश्वास नाहीं, कोणी कोणाचें ऐकायाचा नाहीं, जो तो दुढ्ढाचार्यपणा मिरवूं पाहणार, यत्किंचित् लाभ होण्याचा सुमार दिसूं लागला न लागला तों लठ्ठालठ्ठी सुरू करणार,–ही सर्व तयारी आमच्या घरीं भरपूर असल्यामुळें, जरी कोणाला एकाद्या कार्याविषयीं स्फूर्ति झाली तरी ती लवकरच लयाला जाते. शेकडों बुदबुदप्राय उद्योग आजपर्यंत उभारून क्षणभरानें नाहींसे झाले, ते वरील गुणामुळेंच झाले ! सर्वांस एकाद्या गोष्टीविषयीं जर उत्साह वाटत आहे, आणि सर्वजण मनापासून झटताहेत, तर ती गोष्ट सिद्धीस जाणार नाहीं असें सहसा घडायाचें नाहीं. पण ज्या आमच्या फांकड्या मंडळीनें नुसत्या साहेबी विजारी व साहेबी बूट घालून, बाह्य ढंग तेवढे पतकरले आहेत, तेच जर यांच्याबरोबर पाश्चात्त्यांच्या आवेशाचें व साहसाचें अनुकरण करूं लागतील, तर किती बरें होईल ! पण ही गोष्ट कांहीं सोपी नाहीं हें कोणासही सांगणें नलगे. कोणी कवि म्हणतो:—

* आबद्धकृत्रिमसटाजटिलांसभित्ति-
रारोपितो मृगपतेः पदवीं यदि श्वा ।
मत्तेभगंडतटपाटनपंडितस्य
शब्दं करिष्यति कथं स मृगाधिपस्य ?॥

---

*वरील श्लोकाचें भाषांतर येणें प्रमाणें:-
बांधोनि कृत्रिम जटा, भरि मान सारी.
झाला जरी शुनक सिंहपदाधिकारी ।
मत्तेभगंडतटभेदनपंडिताची
तो गर्जना कशि करील मृगाधिपाची ? ॥

[ केसरी, तारीख २० सप्टेंबर १८८१ ]

मागील खेपेस इंग्रज लोकांच्या आंगच्या साहसगुणाच्या संबंधानें कांहीं विचारांचें दिग्दर्शन केलें. आजरोजीं त्यांच्या जात्यभिमानाच्या संबंधानें लिहावयाचें आहे.

कोणत्याही राष्ट्रास नीच स्थितींतून उच्चस्थितीस येण्यास जे गुण अवश्य आहेत, त्यांपैकींच जात्यभिमान हा एक होय. ज्या देशच्या लोकांत हा गुण चांगलासा वसत नाहीं, त्या देशाच्या हातून मोठीं कामें होण्याचा संशयच आहे. ज्याप्रमाणें कार्पासतंतु, निरनिराळ्या मौक्तिकफलांत प्रवेश करून, त्यांचा एक हार बनवून सोडितो, त्याप्रमाणें जात्यभिमानाचा बंध, एका जातीच्या अनंत व्यक्तींस एकत्र करून, त्यांस प्रेमबद्ध करून टाकितो. हा अभिमानाग्नि लोकांच्या अंतःकरणांत प्रज्वलित झाला ह्मणजे त्यापुढें कोणाचें कांहीं चालत नाहीं. एखाद्या वेळेस हा विकोपास जाण्याचा संभव आहे हें खरें; व तसा गेला तर त्याच्यापासून फार वाईट परिणाम होतात, हेंही आम्ही कबूल करितों. परंतु बाह्य जगांत अशी कोणती वस्तु आहे, किंवा अंतःकरणांत असा कोणता मनोविकार आहे कीं, त्याचा दुरुपयोग केला असतां तो घातुक होत नाहीं? बचनागसोमलादि मी मी म्हणविणारीं जालीम विषें, सदुपयोग केला असतां, गुणावह होतात, व संजीवनी, सुवर्णमालिनी किंवा मोक्तिकरस यासारखीं राजमान्य रामबाण औषधेंसुद्धां अज्ञानामुळें व दुरुपयोगामुळें प्राणहारक होतात, ही गोष्ट चांगली अनुभवसिद्ध आहे. तथापि कोणत्याही मनोवृत्तीस किंवा बाह्य वस्तूस चांगलीवाईट म्हणायाचें, तें तिच्या सामान्य स्वरूपावरून होय. मदमत्त झालेल्या द्विपेन्द्रानें एखादे वेळीं क्वचित् प्राणनाश केला, म्हणून ज्याप्रमाणें ऐरावती लक्ष्मीचा अनादर करणें योग्य नाहीं, त्याप्रमाणेंच कांहीं प्रसंगीं प्रकुपित होणाऱ्या जात्यभिमानापासून जरी घोर अनर्थ घडतात हें खरें असलें, तरी त्यासाठीं या अनुपमेय गुणाचा तिरस्कार करणें बरोबर नाहीं. जात्यभिमानापासून वाईट परिणाम होण्याचे कारण, कधीं कधीं धर्माभिमा-

नाशीं त्याची घट्ट गट्टी असते, हें होय. हे दोघे बंधु स्वभावरीत्या एकत्र झाले, ह्मणजे सर्व जगास भारी होऊन बसतात. या दोघांपैकीं मागून निर्देशिलेल्या गुणाची प्रकृति विशेष तऱ्हेवाईक, लहरी आणि जलाल आहे. यामुळें या वडील बंधुराजांनीं एखादे वेळेस उग्ररूप धारण केलें ह्मणजे छोटे बंधु त्यांच्यापुढें हूं कीं चूं देखील करीत नाहींत; केवळ ज्येष्ठांच्या तंत्रानें ते आपलें आचरण ठेवितात. ही गोष्ट नीट लक्षांत वागविली असतां व एकाचा दुसऱ्यावर वरचष्मा न होऊं देण्याची खबरदारी घेतली असतां, जात्यभिमान हा गुण कांहीं वाईट नाहीं; एवढेंच नाहीं, तर स्वोन्नत्यर्थ व देशोन्नत्यर्थ त्याची अवश्यकताच आहे.

आतां, हें सर्वांस श्रुतच आहे कीं हा जात्यभिमानाचा गुण इंग्रज लोकांत पूर्वींपासूनच पूर्णपणें वसत आहे. साक्सन लोकांच्या आंगीं जात्यभिमानाचा खरा पीळ नसता, तर नार्मन लोकांनीं त्यांस दहा-पांच वर्षांत चीत करून, खचित नामशेष करून टाकिलें असतें. नार्मन लोकांनीं जंगजंग पछाडले, पण त्या रगदार आंग्लद्वीपस्थांनीं आपलेपणा कधीं सोडिला नाहीं. कित्येक वर्षेपर्यंत नार्मन लोकांनीं त्यांच्यावर हवा तसा कहर करून सोडिला, पण परिणामीं त्या दृढ-निश्चयी लोकांनीं नार्मन लोकांची नांगी उतरली; इतकेंच नाहीं, तर तिसऱ्या एडवर्ड राजाच्या अमलांत आपली भाषा, आपल्या चाली-रीति आणि आपला धर्म यांची दीक्षा त्यास देऊन, शेवटीं त्यासच आत्मस्वरूप करून टाकिलें! खरोखर, प्रस्तुत गुण, इंग्रज लोकांच्या ठायीं आहे, इतका नसता, तर या अनेकधर्मवर्णोपेत अफाट आर्य-भूमीचें राज्य त्यांच्या हातून कधींच रेटलें गेलें नसतें. इकडे लाखो इंग्रज सर्व देशभर पसरले आहेत, पण प्रसंग पडला तर सगळे कसे एकाच आईच्या उदरांतून आलेले सख्खे भाऊ! अशा प्रकारचें प्रेम जोंपर्यंत यांच्यांत राहील, तोंपर्यंत शेकडो वासुदेव बळवंत पाताळां-तून वर आले, किंवा आकाशांतून खालीं उतरले, तरी त्यांच्यानें यांच्या एका रोमाला देखील धक्का बसणार नाहीं, अशी आमची पक्की खात्री आहे. दोन हजार कोसांवर आपला देश सोडून देऊन, एकाच

हेतूनें येथें येणाऱ्या इंग्लंडपुत्रांत परस्पराविषयीं सख्ख्या भावंडांप्रमाणें प्रीति नसती, अथवा हरएक प्रसंगीं एक दिलानें ते एकमेकांस पाठबळ देतात तसें न देते, तर येथें कधींच त्यांची नाचक्की झाली असती, व त्यांचें वजनही केव्हांच उडालें असतें. आपल्या राज्यकर्त्यांनीं, या देशांत या जात्यभिमानामुळें, आपल्या जातीच्या वजनाचें (Prestige) केवढें थोतांड माजविलें आहे! त्यासाठीं त्यांस कायदे वेगळे! त्यासाठीं हिंदु लोकांपासून अलग एकीकडे कंपूंत राहण्याचे त्यांस बंगले वेगळे! एखाद्या दिवाणी किंवा फौजदारी खटल्यांत या श्रेष्ठ जातीचा कोणी इसम सांपडला तर त्याची चौकशी नेटिवाकडून होणें नाहीं; त्याचा न्याय सजातीयाच्या हातेंच झाला पाहिजे, अशी अट! कोणीं रंगेल गड्यानें, बाटलाबाईच्या नादांत किंवा कधीं कधीं जाणून बुजून सुद्धां, नेटिवाचा खून पाडला, तरी त्याच्यावर पांघरूण घालण्यासाठीं सर्वांची कोण धूम तारंबळ! हे प्रकार कोणास ठाऊक नाहींत? पण आमची तऱ्हा पहा! एकाचें तोंड पूर्वेकडे-तर दुसऱ्याचें पश्चिमेकडे, आणि कोणाची दाद कोणास नाहीं! आम्ही हिंदु लोक मूळचे चतुर्वर्णाश्रमी असतां, कालांतरानें आम्हांत कितीतरी जाति उद्भवल्या, आणि पुढें आणखी किती उद्भवणार आहेत, परमेश्वर जाणे! या जात्यनंतत्वामुळें आमच्या जात्यभिमानाचे तुकडे तुकडे झाले, आणि हीच गोष्ट पुढें हरएक प्रकारें आमच्या नाशास आणि दुर्दैवास कारण झाली, हें उघड आहे. यास्तव ही गोष्ट निरंतर लक्षांत ठेवून, या जात्यभिमानाच्या बाबतींत इंग्लिश लोकांचे अनुकरण करणें आपणास किती योग्य आहे, याचा वाचकांनींच विचार करावा म्हणजे झालें.

[ **चर्चा— रा० रा० केसरीपत्रकर्ते यांस:—** आपण परवांच्या अंकांत अनुकरणाविषयीं लिहिलें तें फार उपदेशपर आहे. सदरहु लेखांत आपण जात्यनंतत्वामुळें हिंदुस्थानाचें आजपर्यंत पुष्कळ नुकसान झालें आहे असें जें लिहिलें तेंही खरें आहे. कारण आपल्या देशांत जात्याभिमान हा गुण अजून पूर्णपणें वास करीत आहे खरा; तरी महान् व प्रशंसनीय गुण जो देशाभिमान, त्याचा आपल्या लोकांत पूर्ण अभावच आहे. जोंपर्यंत आपल्या देशबांधवांच्या अंगीं

देशाभिमान वसणार नाहीं, तोंपर्यंत आपल्या हिंदुस्थानवासी जनांची स्थिति खरोखरच शोचनीय ह्मटली पाहिजे. ज्या आईचे उदरांतून आपण जन्मलों, तिच्या वाईट स्थितीविषयीं तिच्या मुलांनाच जर कांहीं दुःख वाटत नाहीं, तर मग त्या मुलांनीं जन्मून उपयोग काय ? जात्यभिमानाचा आपले लोकांहीं आजपर्यंत वाईट उपयोग केला आहे. केवळ परस्परांशीं तंटे करून आपल्या देशाची व आपली फार हानीमात्र करून घेतली आहे. आपल्या चतुर्वर्ण हिंदुलोकांचा एकोपा पूर्वींप्रमाणें ह्मणजे भारतादिक ग्रंथांत ऐकितो त्याप्रमाणेंच, असता, तर खरोखर परकीय राष्ट्रांना आपला अंमल हिंदुस्थानावर चालविण्यास फार प्रयास पडले असते. आपल्याकडे पूर्वींपासून देशाभिमानाचे अभावामुळें व जात्यभिनाचे प्रादुर्भावामुळें, कोणी आपल्या देशाचे हिताकरितां कांहींजरी प्रयत्न करूं लागला तरी दुसरा त्याचेंच विरुद्ध आचरण करूं लागतो. हा काय देशाभिमान ह्मणावा! असो, आमच्या देशबांधवांना आतां एवढीच प्रार्थना आहे कीं परस्परांविषयीं द्वेषबुद्धि न धरितां, आपले सुधारलेले राज्यकर्ते इंग्रजलोक, यांचे अंगच्या सद्गुणाचें अनुकरण करावें व केसरी व इतर वर्तमानपत्रें यांच्या उपदेशाचा आपले मनावर चांगला ग्रह करून घ्यावा ह्मणजे खरोखर त्यांचें कल्याणच होईल. मुंबई. भायखळा. ता. २२ सप्टेंबर १८८१. आपला—दा० सा० चि० ]

[ केसरी, तारीख २७ सप्टेंबर १८८१ ]

पाश्चात्य लोकांपासून आमच्या लोकांनीं घेण्यासारखी दुसरी एक मोठी गोष्ट एकी होय. एकी ह्मणजे अवघ्या राष्ट्राची जूट. ही जूट आमच्या देशांत अनेक कारणांनीं कामी असल्यामुळें, आमच्यांत पारतंत्र्य शिरण्यास मार्ग झाला. वरील गोष्ट इतिहासाच्या द्वारें हवी तशी सिद्ध करून देतां येईल, व प्रत्यक्ष अनुभवही तसाच आहे, हें कोणास ठाऊक नाहीं, असें नाहीं. तर, या संबंधानें आम्हांत व आमच्या राज्यकर्त्यांत कितीसें अंतर आहे, तें आतां पाहूं.

इंग्रज लोकांचा तिकडला व इकडला इतिहास ज्यास अवगत असेल, त्यास, वरील गुण त्यांच्या अंगीं कितपत आहे, हें सहज कळून येईल. याचा प्रत्यय दोन तीन ठळक गोष्टींवरूनसुद्धां पूर्णपणें येण्यासारखा आहे. एक गोष्ट, स्पेनच्या राजानें इंग्लंडावर केलेली स्वारी. ही स्वारी

एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत झाली; तेव्हां वरील राजानें इंग्लंडावर आपलें ' अजिंक्य आरमार ' पाठवून दिलें होतें, हें सर्वप्रसिद्धच आहे. या स्वारीच्या वेळीं इंग्लंडांत धर्मसंबंधानें केवढी जबरदस्त दुफळी माजली होती, व प्रॉटेस्टंट लोकांचा हात फावला कीं त्यांनीं क्याथलिक लोकांस जाळावें व क्याथलिक लोकांची सरशी झाली कीं त्यांनीं प्रॉटेस्टंट मंडळीचा खरपूस समाचार घ्यावा, असा क्रम किती काळपावेतो तरी चालला होता, हें इतिहासज्ञांस विदित आहेच. त्यांतून आदल्या वर्षी केलेला मेरी राणीचा वध, आणि नुकती होऊन गेलेली बार्थेलोम्यूची कत्तल, या दोन गोष्टी क्याथलिक लोकांच्या मनांत जळत होत्या. अशा वेळीं ह्मटलें म्हणजे इंग्लंडांत किती फंदफितुर व्हावा बरें! फिलिप राजाचा असा कृतसंकल्प होता कीं सुधारलेल्या धर्माचा बीमोड करून टाकायाचा. आणि तो संकल्प सहज सिद्धीस नेण्यासारखें त्याच्यापाशीं साधनही तसेंच जबरदस्त होतें. कां कीं, त्या वेळीं जमिनीवर किंवा समुद्रावर त्याच्याशीं टक्कर मारण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. त्यांतून सारें इंग्लंड घाबरून गेलेलें; मग देवावर व नशिबावर हवाला ठेवून तें सामन्याला उभें राहिलें खरें, पण त्याचा त्यासच भरंवसा नव्हता! पण इतकें असून काय? वरील स्वारीचा पुकार होतांच, साऱ्या राष्ट्रास असा आवेश चढला कीं जुना धर्म व नवा धर्म हा भेद तत्क्षणीं लोपून गेला, व आपण सारे इंग्लिस्थानवासी आहों येवढी काय ती कल्पना सर्वांनीं धारण केली. असें झाल्यावर त्यांनीं ' अजिंक्य आरमारा-'ची वाताहत करून सोडली, यांत नवल काय? असाच प्रकार पुढें नेपोलियनाच्या वेळीही घडून आला. त्या महावीरानें सारें भूमंडळ पालथें घालण्याचा संकल्प योजून, इंग्लंडावर फार दिवसापासून डोळा ठेवला होता. सन १८०३ सालीं तर त्यानें उघड उघड इंग्लिश खाडीच्या दुसऱ्या कांठावर बरेंचसें सैन्य व आरमार जमवून, इंग्रजांवर चढाई करून जाण्याचा घाट घातला. पण इकडे जों ही तयारी, तों दुसऱ्या बाजूस काय?-तीन लाख पठ्ठे, घरदार सोडून व बायकापोरांचा निरोप घेऊन,

त्याला तोंड द्यावयाला एका जुटीनें उभे! हा कट्टा सरंमजाम जेव्हां नेपोलियनानें पाहिला, तेव्हां साक्षात् युद्धप्रसंग करण्याचा नाद सोडून देऊन, अन्य उपायांनीं आपल्या शत्रूस जेरीस आणण्याचा क्रम त्यानें आरंभला. हा क्रम, युरोपाच्या तमाम बंदरांची नाकेबंदी करून इंग्रजांचा व्यापारच खुंटवणें, हा होय. ही जबरदस्ती कांहीं वेळ थोडी थोडकी चालली; पण हीच पुढें परंपरेनें त्यास रशियाच्या द्वारें कशी भोंवली हें सर्वांस ठाऊकच आहे!

वरील दोन उदाहरणें इंग्लंडाच्या इतिहासांतलीं झालीं. आतां वरील राष्ट्राची नांदणूक आजपर्यंत येथें झाली, ती जरी पाहिली, तरी तोच प्रकार आढळून येतो. गेल्या शंभर सवाशें वर्षांच्या कारकीर्दीत कोणी इंग्रज ह्मणजे फितूर करून शत्रूस सामील झाला, असें एकही उदाहरण नाहीं. बाकी त्यांच्यावर कसे कसे प्रसंग येऊन गुदरले होते, हे बहुधा कोणाला सांगायाला नकोच. कोंडमारे झाले, कत्तली झाल्या, वृषोत्सर्गाचा प्रकार झाला,—सर्व कांहीं होऊन चुकलें! पण स्वदेशाशीं निमकहरामीपणा म्हणून त्यांनीं कोठेंही केला नाहीं. याच सद्गुणाचें फळ, ते आज युधिष्ठिर राजाची व अकबर बादशाहाची गादी चालवून, अनुभवीत आहेत! बाकी येथेंसुद्धां त्यांच्यांत कलागती व मारामाऱ्या झाल्या नाहींत असें नाहीं. प्रथम कलहाला आरंभ म्हटला म्हणजे हेस्टिंग्स व त्याचे कौंसलदार यांनीं पहिल्या सलामीपासूनच केला. त्यांतही सर फिलिप फ्रान्सिस् याचेंतर पहिल्या लाटसाहेबांशीं कोणत्या तऱ्हेचें सूत होतें, व त्यानें 'जूनियस' या नांवानें पुढें इंग्लंडांत अधिकाराधिष्ठित पुरुषांवर कसें वागस्त्र उचललें होतें, तें प्रसिद्धच आहे. फार काय सांगावें?—च्यावम्याव झाल्याखेरीज कौंसलांतली एकही बैठक पार पडत नव्हती. अशी खडाजंगी दररोज होतां होतां, शेवटीं एके दिवशीं उघड्या मैदानावर फ्रान्सिस व हेस्टिंग्स या दोघांची पिस्तुलापिस्तुलीसुद्धां झाली! तींत फ्रान्सिस् साहेबाचा हात लुला झाला, तरी तो अलगत बांधून, स्वारी पुनः वाग्युद्धाला उभीच! पुढें निजधामास गेल्यावर, तेथेंही सारखा आठ वर्षें भर पार्लमेंटांत त्यांचा उभा दावा!! इतके धिडवडे झाले तरी फितुर करून

राज्यकारणाच्या प्रवाहाला जबरदस्त अडथळा होईल असें वर्तन कोणीं केलें नाहीं, हे ध्यानांत ठेवण्यासारखें आहे ६९.

आतां, इकडे भरतपुत्रांकडे वळा. सध्यां आह्मास जी येवढी लाजिरवाणी स्थिति प्राप्त झाली आहे, तिचें काय कारण बरें? जुटीची कल्पनाच कोणाच्या मनांत नाहीं हें; दुसरें काय? स्वदेशाविषयीं अभिमान नाहीं; आपल्या स्वार्थावर काय ती नजर; आपल्या एकट्याच्या हिताकरतां सारें राष्ट्रही बुडवायाला मागे पुढें पहावयाचें नाहीं; कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं; गुलामगिरीचें मेलेलें अन्न खाण्याची हौस, हे सारे प्रकार चहोंकडे माजले आहेत; त्यांचेंच,वरील अवस्था हें कार्य होय.साऱ्या राष्ट्राची तर गोष्ट राहिलीच; पण आपली ज्ञाति, आपलें कुटुंब, आपली मंडळी, येवढ्यापुरतीसुद्धां आमच्यांत एकी आढळेनाशी झाली आहे. म्यांचेस्टर, लिव्हरपूल येथल्यासारखे कारखाने तर दूरच; पण एकादे यःकश्चित् काम कां असेना; त्यांतही एकाचें तोंड पूर्वेकडे तर दुसऱ्याचें थेट पश्चिमेकडे, असा प्रकार असावयाचा! एकानें एकादी गोष्ट काढली कीं दुसऱ्यानें ती मोडून काढलीच! स्वतः हातून कांहीं व्हावयाचे नाहीं; दुसरा कांहीं करूं लागला तर पदरच्या भाकरी खाऊन, त्यास होईल तेवढा उपद्रव करण्यासमात्र मनापासून झटायाचें, त्याच्या कामांत नाहीत तितके फांटे फोडायाचे, आणि ही इमारत खचेल केव्हां आणि आह्मी आनंदानें नाचूं केव्हां, ही वाट पहात बसायाचें! रिकामटेकडेपणांत, गप्पा झोकण्यांत,किंवा गटारांत उलथून पडण्यांत काळ घालवण्यापेक्षां, शेकडों उद्योग करून फसलेला मनुष्यही किती थोर आहे, ही कल्पनासुद्धां आमच्या देशांतील पंडितंमन्य मंडळीच्या मनांत येत नाहीं! वस्तुतः पाहतां,या भरतभूमीसारखा भाग्यशाली देश साऱ्या भूमंडळावर दुसरा नसेल! किती प्रकारच्या सोई, कितीका तऱ्हेची समृद्धि, किती प्रकारची अनुकूलता येथें आम्हास मिळालेली आहे! पहाकीं, सुधारणेंत श्रेष्ठ पदवीस पोंचलेल्या राष्ट्रांचा निकट समागम आपोआप आह्मास घडला आहे. ज्यांनीं आह्मास पादाक्रांत करून टाकलें, तेच होऊन

आह्मास उच्चस्थितीस नेण्यास झटत आहेत व आमचे डोळे बळेंच उघडीत आहेत,—पण हें सर्व आह्माला काय होय? आमचे अवगुण आम्हाला सुटतील तेव्हां पुढें सर्व गोष्टी! या अवगुणांचा राजा ह्मटला ह्मणजे ऐक्याभाव हा होय. त्यांतून विशेष लज्जास्पद गोष्ट ही कीं, एकवेळ गांवढळ व अज्ञान लोकांची जूट बऱ्याच प्रकारें बनवतां येईल; पण चार अक्कलवान व शहाणेसुर्ते जमले कीं चौघांचीं तोंडें चार दिशांस झालींच! कुणव्यामाळ्यांत पाहिजे तसा कट करतां येईल, पण 'वर्णानां ब्राम्हणो गुरुः' असें ह्मणविणाऱ्यांत, एकी करतांना बिचारा ब्रह्मदेवही थकेल असें वाटतें. सरेच बृहस्पति पडले; मग कोणीं कोणाचें ऐकावें? इंग्रजींत एक म्हण आहे कीं, † "बबर्जी फाजील झाले कीं सैंपाक बिघडलाच!" हिचा येथें चांगला अनुभव येतो. खरोखर हाच प्रकार आह्मास आज भोवतो आहे. तर, इंग्रज लोकांकडे पाहून, त्यांच्या आंगचा हा जुटीचा गुण ज्या दिवशीं आमच्या लोकांच्या हृदयांत बिंबेल, तोच सुदिन समजला पाहिजे!

[ केसरी, ता. ४ अक्टोबर १८८१ ]

येथवर, या निबंधांत बऱ्याच विषयांचा विचार केला. आतां, आणखी एकाच गुणाविषयीं विवरण करून, हें प्रकरण आटपतों.

हा गुण मानसिक धैर्य, ज्यास इंग्रजींत 'मॉरल करेज' म्हणतात, तो होय. शारीर धैर्य ह्मणजे काय, हे कोणाला सांगायाला नकोच. अंगधिटाईनें शत्रूवर चालून जाणें, संकटसमयीं न डगमगणें इत्यादि व्यापार ज्या गुणाचे आविर्भाव होत, त्यास शारीर धैर्य नांव आहे. आतां, मानसिक धैर्य म्हणजे काय, हें सांगतों. स्वतंत्रतेनें विचार करणें, व तसा विचार करून, जें तथ्य वाटेल तें बिनदिक्कत बोलून दाखविणें, आणि बोलण्याप्रमाणें आचरण ठेवणें, या तीन गोष्टींस वरील नांव दिलें आहे. खरा शूर आहे, तो जसा शत्रूच्या संख्येची पर्वा न करितां, त्यांच्यावर बेलाशक तुटून पडतो व धारातीर्थीं पतन पावण्याचा उत्साह धरतो, त्याचप्रमाणें मानसिक धैर्य ज्याच्या ठायीं खरें वास करतें, तो पुरुषही

† "Too many cooks spoil the broth."

प्रतिपक्ष्यांच्या आक्षेपांस किंवा निर्भर्त्सनेस खुशाल एकीकडे गुंडाळून ठेवितो, आणि आपल्या मतांचें निःशंकपणें प्रतिपादन करून, त्याप्रमाणें आचरणही करावयास चुकत नाहीं. "तस्मान्मूर्खसहस्रेभ्यः प्राज्ञ एको विशिष्यते" हा न्याय ध्यानांत आणून, हा तत्वज्ञ मनुष्य, जगाच्या अप्रमाण हाकाटीस केवळ कोल्हेकुई समजतो, व आपल्या शुद्ध मनानें ज्याविषयीं ग्वाही दिली, तेंच खरें असें मानतो. साऱ्या जगाचा असा असा समज आहे, किंवा मोठमोठे शहाणे ह्मणून नाणावलेले लोक अमुक अमुक तऱ्हेचे अभिप्राय देतात, किंवा आपले वाडवडील अनादिसिद्ध असें असें म्हणत आले, वगैरे गोष्टींस वाजवीपेक्षां फाजील मान देऊन, आपल्या सदसद्विचारशक्तीचा लोप होऊं देणें त्यास प्रशस्त वाटत नाहीं. हल्लींच्या काळीं वरील धैर्याची किती अवश्यकता आहे, हें सांगणें नकोच. जुलमाचे मुख्य प्रकार दोन; एक ऐहिक व दुसरा पारलौकिक. पहिला प्रकार ह्मटला म्हणजे सरकार व सरकारी अधिकारी यांचा जुलूम; व दुसरा प्रकार धर्माधिकारी व धर्माध्यक्ष यांचा. वस्तुतः पाहतां वरील दोघा प्रभूंचा अधिकार पुष्कळ मर्यादित आहे. राजानें लोकांच्या जीविताचें व संपत्तीचें रक्षण करण्याच्या तजविजींत रहावें, व धर्माधिकाऱ्यांनीं लोकांची नीति न बिघडे इतक्या पुरता अंमल चालवावा, हा मूळचा संकेत. पण मनुष्यमात्राची ही रीतच आहे, कीं एकदा अधिकार प्राप्त झाला कीं तो वाढविण्याचा होईल तेवढा प्रयत्न करावयाचा. या प्रवृत्तीस अनुसरून, राज्यावर व धर्मावर जे अधिकृत असतात, ते नाहीं नाहीं तेथपर्यंत अमल चालवून लोकांस नाडूं लागतात. हल्लीं आमच्या देशांत या दोहो प्रकारांनीं मोठी चमत्कारिक स्थिति झाली आहे. मागें मोगलाई किंवा पेशवाई अंमल होता, तेव्हां लोकांत बरीच कुवत होती व त्राण होतें. पण हल्लींच्या सुधारलेल्या अमलांत, एवढ्या अफाट हिंदुस्थान देशाची मेंढवाड्यासारखी अवस्था होऊन गेली आहे. पहा कीं, केवढाही मोठा मेंढ्यांचा कळप असला तरी जसें एखादें पोर त्यास खुशाल वळूं शकतें, त्याप्रमाणें सालोसाल पंचवीस तीस वर्षांचीं

पोरें इंग्लंडाहून इकडे पाठवून दिलीं जातात, आणि तीं येऊन खुशाल वीस कोटी लोकांवर पाहिजे तसा अंमल चालवितात! यापेक्षां प्रजेच्या दौर्बल्याचें आणखी प्रमाण कोणतें पाहिजे? अगोदर परकी अंमल, त्यांतून एक धनी नाहीं, आणि राज्याची कदर व सामर्थ्य विलक्षण! यामुळें दिवसेंदिवस प्रजा अगदींच नामर्द व नादान होत चालली आहे. मग सरकारी अंमलदार काय करतील ती पूर्व दिशा, असा प्रकार झाला आहे, यांत नवल कसलें?

वर सांगितली, ही एका प्रकरणांतली हालहवाल झाली. दुसरें प्रकरण धर्माचें. या संबंधानें तर वरच्याहूनही विलक्षण स्थिति आज दृष्टीस पडत आहे. एखादें जहाज तुफानांत सापडून त्याची दुर्दशा व्हावी—डोलकाठी पडावी, सुकाणूं सुटून जावें, नांगर नाहींसा व्हावा आणि लाटांचे तडाखे खात खात तें पाहिजे तिकडे भडकत सुटावें, किंवा कोठेंतरी रेंदाळांत अडकून रहावें, अशा सारखीच सरासरीं हल्लीं हिंदुधर्माची स्थिति झाली आहे. धर्माचा आणि देशस्थितीचा मेळ असावा, तो नसल्यामुळें, एक अगदींच धर्मशून्य किंबहुना अधर्मीतरी व्हावें, किंवा अंधपरंपरेनेंतरी चालावें, अशी पाळी लोकांवर येऊन ठेपली आहे. पूर्वीं वेळोवेळीं एतद्देशीय धर्मास तत्कालानुरूप जसे संस्कार मिळत गेले, तसें आलीकडे दीर्घकाळ पावेतों न झाल्यामुळें, धर्म, आचारविचार, रीतरिवाज ह्या सगळ्यांचा एकच गप्पागोंधळ होऊन गेला आहे! खचित, ही स्थिति फार शोचनीय आहे.

यास्तव, अशा प्रसंगीं वरील दोन्ही प्रकारांचा पोक्तपणें विचार करणारे व ते अमलांत आणणारे, कर्तृत्ववान् पुरुष आमच्या देशांत निपजले पाहिजेत. असे पुरुष युरोपांत आजपर्यंत कितीतरी होऊन गेले, व अद्याप किती होत आहेत, हें येथें सांगूं लागल्यास फारच विस्तार होणार आहे. यास्तव येथें थोडक्यांत इतकेंच सांगतों, कीं पाश्चात्य राष्ट्रांत हरएक प्रकरणीं आपले विचार स्पष्टपणें प्रगट करणारे जे अनेक पुरुष वेळोवेळीं होऊन गेले, त्यांच्या योगानेंच त्या देशांची सुधारणा आज इतक्या दशेला येऊन पोंहचली आहे यांत शंका नाहीं. हे मी कसें बोलूं, लोक मला

काय ह्मणतील, 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाकरणीयं नाचरणीयम्' 'जिकडे वारा वाहील तिकडे पाठ द्यावी' वगैरे भेकडपणाचे विचार त्या महापुरुषांच्या मनास शिवलेही नाहींत. आणि याप्रमाणें आपलें शिर हातीं घेऊन, त्यांनीं आपलीं मतें बेधडक प्रसिध्द केलीं व त्यांस अनुसरून सर्व गोष्टी अमलांत आणल्या. त्यांनीं असें केलें ह्मणूनच त्यांस यश आलें. नाहीं तर, आमच्या इकडे बड्या बड्या मंडळीचें हरएक प्रसंगीं जें धरसोडीचें वर्तन दृष्टीस पडलें आहे व पडत आहे, तें पहा! आज रंग दाखवावयाचा एक; तोच उद्यां पालटून निराळीच तऱ्हा दृष्टीस पडावयाची! बोलतांना हवें तसें वाहवत जावयाचें आणि करणी करावयाचा प्रसंग ठेपला कीं आयत्या वेळेस आंग काढून घ्यावयास मनांत शंकादेखील यावयाची नाहीं! हा प्रकार पुढारी ह्मणवणाऱ्या मंडळीनें आजपर्यंत कितीक वेळांतरी केल्यामुळें, आमच्यांत लोककल्याणाची बडबड मात्र पुष्कळ माजली आहे; पण वस्तुतः पाहिलें तर हातून कांहीं एक होत नाहीं, अशी मौज आहे.

असो; इतःपर आमचे देशबंधु केवळ प्रलाप करावयाचें काम सोडून देऊन, जें थोडेंबहुत आपल्या हातून होण्यासारखें असेल, तेवढें मनापासून झटून करून दाखवतील, व आपल्या देशाचें पाऊल आज मागें पडलें आहे तें पुढें सरकवण्याच्या तजवीजस लागतील, अशी आशा प्रगट करून, हा लेख आम्ही पुरा करतों.

हा विषय बराच लांबला, व याहूनही तो लांबण्यासारखा आहे, यांत संशय नाहीं. पण येथवर दाखविलेल्या गुणांच्या संबधानें आह्मांत व आमच्या पाश्चात्य आर्य-बंधूंत किती अंतर आहे, हें लक्षांत आणलें असतां, आमच्या वाचकांची बहुत करून खातरी होईल कीं, नुसत्या वरकांतीं अनुकरणापेक्षां अंतर्गत सद्गुणांचा कित्ता वळवणें, हेंच आपणास सांप्रत फार श्रेयस्कर आहे. ही गोष्ट त्यांच्या लक्षांत भरवून देण्याकरतां प्रस्तुत विषय आह्मी बुद्ध्या उचलला आहे. या आमच्या लेखानें जर आमच्या वाचकांच्या मनांत वरील तत्व थोडें तरी बिंबलें तर आमच्या कलमास विनाकारण शीण झाला नाहीं असें होईल.

नाहीं तर आमच्या शूद्र कवीचा 'सुवर्णकारनलिका' न्याय अनुभवसिद्धच आहे:—

नळी फुंकिली सोनारें। इकडुन तिकडे गेलें वारें॥

---

# देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता.

[ केसरी, तारीख १८ अक्टोबर सन १८८१ ]

आपल्या देशभाषेंत ग्रंथसंग्रह विपुल होऊन, ज्ञानप्राप्तीचें साधन सुलभ होणें, ही गोष्ट केवढ्या महत्वाची आहे, हें कोणासही सांगावयास पाहिजे असें नाहीं. आपली देशभाषा ह्मणजे जन्मभाषा, कीं जी आपणास केव्हां येऊं लागली, याचीसुद्धां आठवण नसते. हींतच नानाविध विषयांवर आयते ग्रंथ असले तर तें किती उपयोगाचें आहे ! वरील सोय म्हटली, म्हणजे नूतन बालकास किंवा वत्सास उपजल्याबरोबर जशी स्तनपानाची सोय सृष्टिकर्त्यानें करून ठेवली आहे, तशाच प्रकारची होय. पहा कीं, इंग्लंडांतील मुलांस वाचतां येऊं लागलें कीं लागलींच मोठमोठ्या नामांकित इंग्रजी ग्रंथकारांचा परिचय करावयास त्यांस सांपडतो, व नदींतून मौजेनें वहात जातां जातां जसें अफाट दर्यांत नकळत जाऊन पडावें, *त्याप्रमाणें विशेष आयास न पडतां, सहज पुष्कळ ज्ञानाचा सांठा करून त्यांस ठेवतां येतो. विलायतेंत होऊन गेलेल्या मोठमोठ्या ग्रंथकारांचीं चरित्रें वाचलीं असतां, हाच प्रकार त्यांत आढळून येतो. **जानसन**चा बाप पुस्तकें विकण्याचा धंदा करीत असे, हीच गोष्ट त्या ग्रंथकाराचा पुढें उदय होण्यास उपयोगीं पडली. दुकानांत बसल्या

---

* कालिदासानें 'रघुवंशां-' त रघूच्या संबंधानें ह्मटलें आहे:—
लिपेर्यथावद् ग्रहणेन वाङ्मयं
नदीमुखेनेव समुद्रमाविशत्।

बसल्या, शेकडों पुस्तकें इकडून तिकडे त्यानें चाळावीं. हा नाद लागल्यामुळें, त्यास दोन मोठे लाभ झाले; एक तर हा कीं, वाचण्याची गोडी लागली, आणि दुसरा हा कीं सहजासहजीं बहुश्रुतपणा अंगीं आला. **जान स्टुअर्ट मिल्** याच्या स्वरचित चरित्रांतही असेच उल्लेख आढळतात. गिबन्, ह्यूम अशासारख्यांचे प्रचंड इतिहास व दुसरेही अनेक मोठमोठाले ग्रंथ त्याने आठ दहा वर्षांच्या कोंवळ्या वयांतच पार झोकून दिले! तशांत आलीकडे लोकशिक्षणाकडे विलायत सरकाराचें विशेष लक्ष लागल्यामुळें, व लोकांसही वरील गोष्टीचे अगत्य वाटूं लागल्यामुळें, विशेषेंकरून लहान मुलांस व नवशिक्यांस उपयोगीं पडण्यासारखे सहस्रावधि ग्रंथ दरवर्षी त्या देशांत निर्माण होत आहेत. या सोईमुळें,ज्यास नुसती अक्षर ओळख झाली आहे, त्याससुद्धां, ह्मणण्यासारखी कोणाची मदत न लागतां, अनायासें पुष्कळ विषयांशीं परिचय करावयास सांपडतो. मागें विद्याध्ययन हें जसें गुरुमुखावांचून बहुधा अशक्यच होतें, तशी आतां बिलकुल स्थिति नाहीं. ज्यास थोडी बहुत बुद्धि आहे, असा मनुष्य सतत उद्योग करील, तर केवळ स्वतःच्या परिश्रमानें मोठी विद्वत्ता संपादन करणें हें हल्लींच्या काळांत त्यास अत्यंत सुकर झालें आहे. अशा प्रकारचीं विख्यात मनुष्यांचीं बहुत उदाहरणे आलीकडे युरोपांत घडून आलीं आहेत. कविता, कादंबऱ्या, इतिहास वगैरे सुगम व अश्रमसाध्य विषय तर राहोतच; पण पदार्थविज्ञानाचीं निरनिराळीं अंगें जीं ज्योतिष, रसायन, दर्शनानुशासन इत्यादि अनेक शास्त्रें, व अर्वाचीन काळीं नवीन नवीन शोध फार वाढल्यामुळें, पूर्वीं अज्ञात असलेलीं दुसरींही अनेक शास्त्रें, जीं नुकतीं नुकतीं निर्माण झालीं आहेत, या सर्वांचेंसुद्धां बऱ्याच प्रकारचें ज्ञान, कोणाचीं आर्जवें न करितां किंवा दीर्घ काळ व फार परिश्रम न लागतां, हवें त्यास करून घेण्याचा मार्ग आलीकडे फार सुकर होत चालला आहे.यावरून उघड दिसून येतें, कीं स्वभाषेंत अनेक विषयांवर ग्रंथरचना झाल्यामुळें व सुगम रीतीनें ती रचना होऊन स्वल्पमूल्यानें वाचकांस ग्रंथ मिळूं लागल्यामुळें

त्या राष्ट्राची उन्नति होण्याचें एक जबरदस्त साधन तेथील लोकांच्या हातीं आलें आहे.

आतां, आपल्या देशाकडे वळून, वरील प्रकार येथें कितपत दृष्टीस पडतो, तो पाहूं. हा विचार करावयाचा म्हणजे अगोदर देशभाषांची स्थिति काय आहे, ती मनांत आणायास पाहिजे. या देशभाषा सुधारणेच्या पंथाला लागल्या, ही गोष्ट इंग्रजी अमदानींतच घडली हें सर्वांस महाशूर आहेच. यापूर्वी त्यांस आळा म्हणून कोणताही नव्हता. रानझाडाप्रमाणें किंवा गिरिनदीप्रमाणे त्यांची स्वैरगति अकुंठित होती. पुढें इंग्रजी भाषेंत जशी आमची मंडळी पारंगत झाली, तशी त्यांच्या ठायीं स्वभावतांच अनुकरणाची प्रवृति जागृत होऊन, गद्यात्मक ग्रंथरचनेचा प्रकार सुरू झाला. गद्य हें पद्यापेक्षां भाषानियमन होण्यास विशेष अनुकूल होय. यास्तव आमच्या भाषेस छत्रे, जांभेकर, चिपळूणकर, ओक वगैरे ग्रंथकारांनीं हातीं धरतांच, तिला बरीच ठाकठिकी आली व व्यवस्थितपणा प्राप्त झाला. हा फेरफार किती हितावह झाला, हें ज्यास पाहणें असेल, त्यानें हल्लींच्या ग्रंथाचें एकादें पान आणि जुन्या बखरींचा एकादा बंद हीं परस्परांशीं ताडून पाहावीं, म्हणजे तेव्हांच खात्री होईल. देशभाषांची अभिवृद्धि होऊन, त्यांच्या द्वारें लोकांस ज्ञानप्राप्तीचा मार्ग खुला व्हावा, याविषयीं आमच्या सरकाराचाही पहिल्यानें मोठा कटाक्ष होता. हजारों रुपये खर्चून महाराष्ट्रभाषेचे दोन प्रचंड कोश त्यानें तयार करविले; कोणी चांगला ग्रंथ केला असतां, त्यास आश्रय मिळण्याकारितां विद्याखातें व दक्षिणा प्रेज कमिटी हीं दोन ठिकाणें स्थापन केलीं; तसेंच ग्रंथकर्तृत्व हें बढतीस व मानमान्यतेसही कारणभूत होत असे. शिवाय दोन्ही विद्यालयांतून 'दक्षिणा फेलो' म्हणून ज्या जागा केल्या, त्यातरी येवढ्याच करतां कीं, या 'फेलो' मंडळीनें आपलें इंग्रजी ज्ञान देशभाषांच्या द्वारें लोकांत प्रसृत करावें. या सर्व साधनांनीं मिळून, हल्लीं मराठी भाषा सांप्रतच्या व्यवस्थितपणाला येऊन पोंचली आहे असें म्हणावयास चिंता नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें, महाराष्ट्रभाषारूप भूमीची मशागत सध्यांच्या काळीं बऱ्याच प्रकारें झाली आहे हें खरें; पण अद्याप तींत पाश्चात्य-भूमींतल्याप्रमाणे प्रचंड व विस्तीर्ण वृक्षांची वाढ होऊं लागली नाहीं. ही वाढ होण्यास, ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्यांचा सध्यां येथें अभाव असल्यामुळें, फार कालांतरानें वरील कार्य कदाचित् सिद्ध होईल, अशी आशा आहे. 'कदाचित्' शब्दाचा प्रयोग करण्याचें कारण असें कीं, मोठमोठे ग्रंथकार निपजणें व त्यांच्या हातून काव्यें, नाटकें, इतिहास, शास्त्रीय ग्रंथ वगैरे निर्माण होऊन, ते लोकांच्या हातीं पडणें, हें केवळ दैवायत्तच होय. मोठा कुबेर जरी ह्मणेल कीं मी कालीदासासारखा कवि निपजवीन किंवा पाणिनीसारखा वैयाकरण उदयास आणीन, तरी त्याच्यानें तसें कांहीं होणार नाहीं. लाखों रुपये खर्च करून, गारगोटीला तरतऱ्हा पाडल्या, ह्मणून अगदीं सामान्य हिऱ्याचीतरी तिला सर येईल काय ? किंवा सामान्य हिऱ्यावर कितीही शिल्पप्रयोग केले ह्मणून कोहिनूराची झाक त्यांत निष्पन्न होईल काय ? कधीं होणार नाहीं. ईश्वराधीन जो गुण, तो मनुष्याच्या प्रयत्नानें कसा साध्य होणार ? तथापि मराठी भाषेची सध्यांची स्थिति पाहतां, इष्ट सिद्धि प्राप्त होण्याला आजलाही तिची बरीच तयारी आहे, एवढें मात्र स्पष्ट आहे. ज्याप्रमाणे उत्कृष्ट पीक यावें अशी इच्छा असेल, तर अगोदर भूमीची सिद्धता व्हावी लागते; त्याप्रमाणें आलीकडे पांच पंचवीस वर्षांत मराठी भाषेचें स्वरूप नीटनेटकें होऊन, ती उत्कृष्ट ग्रंथकारांच्या उपयोगीं पडेशी झाली आहे, हें आपलें मोठें भाग्य होय. पण इतक्यानें कांहीं झालें नाहीं. हा नुसता पाया झाला आहे, इतकें पराकाष्ठा ह्मणतां येईल. त्यावर कारागिरीचें काम उठायाचें, तें तर अझून दूरच आहे. तें होऊन, सारी इमारत जेव्हां पुरी होईल, तेव्हां तिची शोभा दिसूं लागेल व तिचा पूर्ण उपयोग होऊं लागेल, हें उघड आहे.

वर, मराठी भाषेची सध्यां काय स्थिति आहे, हें सांगीतलें. आतां, या आमच्या भाषेंत हवा तसा ग्रंथसंग्रह होत जाण्यास कोणकोणत्या

गोष्टींची जरूर आहे, याविषयीं विचार करावयाचा. त्यास पुढील खेपेपासून आरंभ करूं.

[ केसरी, ता ७ नोवेंबर सन १८८१ ]

कोणतीही भाषा परिपक्वदशेस येणें ही गोष्ट, मुख्यतः पाहतां, दैवाधीन आहे खरी; कांकीं विशाल बुद्धि ही परमेश्वराचीच देणगी होय, ती कांहीं मनुष्याच्या हातची गोष्ट नव्हे; तरी लोकाश्रयावरही वरील कार्याची सिद्धि बऱ्याच प्रकारें अवलंबून आहे, हें कबूल करणें भाग आहे. ज्याप्रमाणें उत्तम बीं आहे, पण तें जर खडकावर पडलें, तर त्यापासून कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच मोठा होतकरू ग्रंथकार असला आणि त्यास जर ग्रंथकर्तृत्वाचीं साधनें नाहींत किंवा लोकाश्रय अथवा राजाश्रय नाहीं, तर त्याच्या गुणाचें काय चीज होणार ? अर्थात् कांहीं होणार नाहीं. संस्कृतांत एक ह्मण आहे कीं, "विनाश्रयं न शोभंते पंडिता वनिता लताः" ( पंडित, वनिता, व लता हीं तीन आश्रयावांचून शोभत नाहींत ); ही म्हण सर्वथा खरी आहे.

आतां, अलीकडे मुद्रणादि साधनें झाल्यापासून, पंडितांचें वरील परायत्तत्व पुष्कळ कमी झाले आहे हें खरें; पण तें तरी जेथें वाचकांची संख्या पुष्कळ वाढली आहे अशा देशांतूनच खरें आहे. नाहीं तर आमच्याच देशांत पहा. इंग्लंडांत शेक्सपीयर, मिल्टन् वगैरे सारी मंडळी चार चार आण्याला सुद्धां खेरदी करतां येते; येथें अजून एकही मराठी किंवा संस्कृत कवि इतका स्वस्त झाला नाहीं; हें तर काय ? पण अद्याप त्यांचे ग्रंथ सुद्धां सगळे एकेकदा छापून निघाले नाहींत. शेकडों ग्रंथ दरवर्षी फाटून तुटून जात आहेत किंवा वाण्याच्या दुकानीं निर्वाणपदवीस पावत आहेत ! पण इतके पंडितशिरोमणि व लोककल्याणकर्ते चोहोंकडे मिरवत असतां, त्यांची वास्तापुस्तही कोणी करीत नाहीं ! लोकाभिरुचि व ग्रंथसमृद्धि या दोहोंचा अन्योन्याश्रय संबंध आहे; ह्मणजे लोकांत ग्रंथाभिरुचि असली, ह्मणजे ग्रंथाच्या खपास उत्तेजन मिळाल्यानें, पुष्कळ ग्रंथ होऊं लागतात, आणि याचप्रमाणें लोकांत अभिरुचि उ-

त्पन्न होणें हेंही पुष्कळ ग्रंथ निर्माण होऊन लोकांच्या हातीं पड-ण्यावरच अवलंबून आहे. जर पुस्तकेंच वाचायास मिळालीं नाहींत, तर त्यांची आवड उत्पन्न होणार कशी? व एक चांगलें व दुसरें वाईट ही निवडानिवड करण्याचें सामर्थ्यतरी लोकांत कसें येणार? तर, वरील दोनही गोष्टींचा याप्रमाणें परस्परसंबंध असल्या कारणानें, आपल्यासारख्या नूतन विद्याप्रविष्ट देशांत ग्रंथसंग्रह व्हावा तसा होत नाहीं यांत नवल नाहीं. लोकाभिरुचि नाहीं तर ग्रंथनिष्पत्ति व्हाव-याची नाहीं, व ग्रंथसमृध्दि नाहीं तर लोकाभिरुचि उत्पन्न होणें नाहीं, या कचाटींतून पार कसें पडावें, हा मोठा बिकट प्रश्न आहे. कचाटीही ह्मटली ह्मणजे दुष्काळांत शेतकऱ्यास जी पंचाईत पडते, तिच्यासा-रखी आहे. शेतकरी बीं जमिनींत पेरून शतपट किंवा सहस्रपट धान्य उत्पन्न करील खरें; पण तें बींच अगोदर त्यानें कोठचें आणावें? मुळीं हीच मोठी अडचण आहे. तरी तींतून मुक्त होण्याला एक मार्ग आहे; नाहीं असें नाहीं. तो कोणता, हें धान्याच्याच उदाहरणावरून लक्षांत येईल. देशांतील सारें धान्य फन्ना होऊन शेतकरी जेव्हां उघडे पडतात, तेव्हां लोकोपजीवनार्थ सरकारास जशी तगाईची तजवीज करणें जरूर पडतें, त्याप्रमाणेंच सरस्वतीचें दुर्भिक्ष पडलें असतांही राजा किंवा श्रीमान् लोक यांनींच केवळ लोकोपकारबुद्धीनें प्रथमतः वाग्देवीची कृपा राष्ट्रावर होईल अशाविषयीं यत्न केला पाहिजे. तें होत नसेल, तर विद्वान् लोकांनीं तरी निरपेक्ष बुद्धीनें आपल्या देवतेची उपासना चाल-विली पाहिजे; ती अशी कीं, त्यांनीं स्वार्थसाधनाविषयीं विशेष लालसा न दाखवितां, किंबहुना केवळ निष्काम बुद्धि धारण करून, लोकांत ज्ञानाचा व अभिरुचीचा प्रसार होण्याकरितां, कायिक, वाचिक व मानसिक परिश्रम करावे. निदान पक्षीं, शेवटला उपाय ह्मटला म्हणजे लोकांनीं एकवट होऊन, स्वतांचे प्रयत्नांनीं ही स्थिति सुधारण्याची खटपट करावी.

सामान्यतः पाहतां कोणत्याही देशांत ग्रंथसंग्रहाची वाढ होण्याला हेच उपाय कारण झाले आहेत, असें इतिहासावरून दिसून येतें. याशिवाय अन्य उपाय फारसे कामास येण्यासारखे नाहींत. आतां, वरील उपायचतुष्टयापैकीं हल्लीं आह्मास कोणकोणते कसकसे अनुकूल आहेत, ते पाहूं.

सर्वांत पहिला उपाय राजाश्रय. या उपायाची योग्यता किती आहे, हें जगांतील साऱ्या राष्ट्रांच्या इतिहासावरून कळून येण्यासारखें आहे. आमच्या देशांत विक्रमादित्य, भोज वगैरे नृपरत्नें होऊन गेलीं, तेव्हां त्यांच्या आश्रयानें या देशांत वाग्देवीचें येवढें भांडार बाहेर निघालें कीं, इतर सांपत्तिक वैभव जरी नष्ट झालें, तरी अद्यापपावेतों आमचें हें ऐश्वर्यमात्र तगून कायम राहिलें आहे. याप्रमाणेंच ग्रीस, रोम, इंग्लंड, फ्रान्स, इटाली वगैरे बहुतेक देशांत मोठमोठ्या प्रतापी राजांनीं विद्वज्जनांचा आदर व प्रतिपाळ करून आपली कीर्ति अजरामर करून ठेवली आहे. हल्लींसुद्धां आमच्या महाराणीसाहेबांच्या पदरीं टेनिसन् नामेंकरून एक नामांकित कवि, सालाचें तीनशे पौंड वेतन खात पडलेला आहेच. आतां हें वेतन त्याच्या इतर मिळकतीच्या पासंगालाही पुरण्यासारखें नाहीं हें खरें; पण ती गोष्ट निराळी; ती येथे जमेस धरावयाची नाहीं. यावरून काय सिद्ध होतें कीं, आजपर्यंत होऊन गेलेल्या मोठमोठ्या राजांनींच विद्येचा उत्कर्ष करून, आपल्या राष्ट्रास विद्वत्तेचा संस्कार लावला. आतां, हे सूत्र आमच्या शहाण्या व दयाळू हिंदुस्थान सरकाराकडे लावून पाहिलें, तर येवढें कबूल केलें पाहिजे खरें, कीं पहिल्या पहिल्यानें त्यानें या कामीं बरेंच लक्ष पुरविलें व विद्वज्जनांचा बराच परामर्ष घेतला. पण अलीकडे जों पहावें तों तो मनु अगदींच फिरल्यासारखा दिसत आहे. त्यांतून हल्लींचे विद्वन्मणि डायरेक्टरसाहेब विद्याखात्याचीं सूत्रें हातांत वागवूं लागल्यापासूनतर, आमच्या महाराष्ट्रभाषेचें व महाराष्ट्रीय लोकांचें नशीबच फिरलें असें ह्मटलें पाहिजे. ही मूर्ति या महान् अधिकारावर चढली, तेव्हां

एकंदर लोकांस अशी मोठी आशा लागली होती कीं, हे कामगार विद्याखात्यांस फार दिवस वहिवाटलेले आहेत, यांस येथील शिक्षण-पद्धतीची व एकंदर लोकसमुदायाची स्वानुभवावरून चांगली माहिती आहे, व स्वभावानेंही, ते पूर्वाश्रमीं असतांना, दयाळू असल्याबद्दल फार वाखाणलेले असत; त्यापक्षीं ते आपली कारकीर्द, माजी सर अलेक्झांडर ग्रांट यांच्याहूनही कांकणभर जास्त, गाजवितील. पण म्हणताातना, 'भरंवशाच्या म्हशीला ...... !' त्याप्रमाणें आमची गत झाली. मेहरबान चाटफील्ड साहेबांच्या येण्यापासून इकडील विद्याखात्याला अशी कळा येत चालली आहे कीं बा: ! या ऱ्हास-कळेला नेकनामदार टेंपल साहेबांच्या हातून वरीच मात्रा पोंचेल असें वाटलें होतें; पण या धर्मखात्याच्या कमनशिबानें व एकंदर देशाच्या नशिबानें ते वस्तान बिघडलें ! कारण ना. टेंपल साहेब गवर्नरी सोडून लौकरच स्वदेशीं निघून गेले, व यामुळें चाटफील्ड साहेबांस मुभा मिळून मनाप्रमाणें आपल्या खात्याची व्यवस्था ठेवण्यास सांपडली. परंतु याविषयीं आम्हास बोलण्याचें येथें कारण नाहीं. केवळ प्रस्तुत विषयानुसार दोन गोष्टी दाखल करण्यासारख्या आहेत, तवढ्या करतों म्हणजे झालें. एक ही कीं गरीब विचाऱ्या गांवठी मास्तरांच्या हितार्थ माजी हावर्ड साहेबांनीं एक लहानसें 'शालापत्रक' म्हणून, मासिक पुस्तक सुरू केलें होतें. आमच्या मेहरबानांनीं एका जाड्या विद्वानाच्या कुत्सित मताला मान देऊन, ते खाडदिशीं सफा बुडवून टाकल्याचे श्रेय घेतलें, आणि सरकाराचा मोठा फायदा करून दाखविला ! दुसरी ही कीं, सरकारानें फार दिवस मराठी ट्रान्सलेटर व दक्षिणाप्रैज कामिटीचे सेक्रेटरी हे दोन अधिकारी महाराष्ट्र-ग्रंथोत्तेजनार्थ ठेविले आहेत. आमच्या मेहरबानांनीं हीं दोन्ही आफिसें किती संपुष्टांत आणलीं आहेत, हें पुष्कळांस माहीत असेलच ! याशिवाय कित्येकांस हेंही माहीत असेल कीं साहेबांकडे तुम्ही कसलाहि उत्कृष्ट ग्रंथ किंवा मासिक पुस्तक पाठवून द्या; त्यावर मेहरबानांचा शेरा छापील:—'तुमच्या पुस्तकाची खात्याला जरूर नाहीं,' किंवा

'खात्याच्या खजिन्याला सध्यां तूट आली आहे.' पण तेंच 'उजळणीचें पहिलें पुस्तक' असूं द्या, किंवा गौरकायकृत 'शारीरशास्त्र' असूं द्या, कीं विद्याखात्याची गंगाजळी तुडुंब भरलेली! असले महासमर्थ प्रभु विद्याखात्याला मिळाल्यावर मग काय विचारावें! सांप्रत त्याची जी दैन्यावस्था आली आहे, ती थोडीच असें म्हटलें पाहिजे!

[ केसरी, ता० ८ नोवेंबर १८८१ ]

मागील खेपेस, ग्रंथोत्तेजनाचा पहिला उपाय राजाश्रय, त्याविषयीं विचार झाला; ह्मणजे आमच्या लोकांत विद्येचा प्रसार व्हावा, एतदर्थ देशाच्या पैशापैकीं अडीच हजार रुपये ज्यांच्या पोतडींत दरमाहा जात आहेत, त्या डायरेक्टर साहेबांच्या हातून वरील गोष्टींत किती मदत होत आहे, तें सांगितलें. आतां दुसरा उपाय, विद्वज्जनांची औपकारिक बुद्धि; तिजविषयीं विचार करूं.

या दुसऱ्या उपायाची योग्यता, मागें सांगितलेल्या तिन्ही उपायांत वस्तुतः अधिक आहे. कां कीं, राजांनीं ग्रंथोत्पत्तीस उत्तेजन देणें, किंवा लोकाश्रयावर नवीन नवीन ग्रंथ निर्माण होणें, हे दोन्ही उपाय, वस्तुतः पाहतां, जसे असावे तसे नाहींत. राजांच्या संबंधानें तर विशेष सांगायाला नकोच; त्यांच्यापर्यंत विद्येचा रिघाव होऊन, ते तींत प्रवीण होणें, व श्रीहर्ष किंवा शूद्रक यांच्याप्रमाणें ते स्वतः सरस्वतीच्या कृपेचें पात्र असणें, या गोष्टी केवळ असाधारणच होत. तेव्हां सामान्यतः पाहतां, जे स्वतः अनभिज्ञ, त्यांच्या हातून वरील हेतु कितपतसा सिद्धिस जाणार? फार झालें तर ते आमच्या डायरेक्टर साहेबांच्या प्रमाणें करणार. मे० चाटफील्ड साहेबांची वहिवाट अशी आहे कीं कोणताही ग्रंथ आला कीं तो मराठी असला तर मराठी ट्रान्स्लेटरांकडे आणि संस्कृत असला तर दक्षिण विद्यालयांतील संस्कृत विद्यागुरूकडे पाठवून द्यावयाचा; मग त्या पुस्तकावर वरील दोघा अधिकाऱ्यांचा काय शेरा पडेल तो रामबाण! बरें, हा शेरातरी ग्रंथकाराच्या दृष्टीस पडायाचा आहे काय?—छे! शांतं पापम्! तो पडला 'कान्फिडेन्शियल्;' मग डायरेक्टर साहेबांच्या गोशांतून वरील सरस्वती कोठली बाहेर पडायाला!! तात्पर्य हा प्रथम उपाय म्हटला,

तो अशा वसुलाचा. भर्तृहरीनें सदरील प्रकरणीं आपला खास-गत अनुभव प्रगट केला आहे, तो प्रसिद्धच आहे. तो असा:–

अभिज्ञांस तों ग्रासिलें मत्सरानें
धनाढ्य प्रभु व्यापिले दुर्मदानें ।
शिरीं थोर मूर्खांस अज्ञान ओझें
जिरालें निजांगींच पांडित्य माझें ॥

तसेंच, तिसरा उपाय जो लोकाश्रय, त्यासही वरील आक्षेपच लागू पडतो. कां कीं, एकंदर लोकसमुदाय ह्मटला ह्मणजे तो वरील प्रभूप्रमाणेंच जातीनें अनभिज्ञ; तेव्हां ग्रंथपरीक्षण व्हावयाचें, तें अर्थात् नियुक्त अधिकाऱ्यांच्या हातूनच! म्हणजे पुनः डायरेक्टर साहेबांच्या आफिसांतलीच व्यवस्था आली. यापूर्वी 'ग्रंथोत्तेजक मंडळी-'च्या संबंधानें जो मजकूर आह्मी लिहिला आहे, त्यावरून या तिसऱ्या उपायाला कोणता धोका येतो, हे वाचकांस कळून येणारें आहे. सदरील मंडळीचें काम दोघा रावबहादुरांकडे असल्यामुळें 'प्लेटोच्या प्रजासत्ताक राज्यांत-'ल्याप्रमाणें कसा कारभार त्यांनीं ठेवला, तो मागें सांगितलाच आहे. तो असा कीं कादंबरी, किंवा काव्य, अगर नाटक यांस सक्त मज्जाव; आणि दरवाजे खुले कोणाला?– तर आश्वलायनाचें गृह्यसूत्र, स्वाध्याय, किंवा मुसलमानांचा इतिहास, अशा पुस्तकांना. तसाच प्रकार वरील प्रसंगीं व्हावयाचा.

तेव्हां, वरील दोन्ही उपाय हे दोषयुक्त अतएव अनिश्चित होत, हे उघड आहे. आतां, सध्यां ज्याचें विवेचन करायाचें, तो उपाय कसा आहे, पहा! हा उपाय म्हटला म्हणजे केवळ विद्वानांच्याच हातचा असून, बिनतोड असा आहे. कां कीं, विद्येंत जे वस्तुतः निपुण व ग्रंथरचना करण्यांत कुशल आहेत त्यांनींच, राजाश्रयाची पर्वा न करतां, व लोकांनीं आपल्या श्रमाचें मोल आपणास द्यावें ही क्षुद्र बुध्दि न धरतां, केवळ लोकोपकारावर किंवा कीर्तीवरच मुख्यतः दृष्टि ठेवून, आपल्या ठायीं जो गुण परमेश्वरानें ठेवला आहे, त्याचा आविर्भाव निरपेक्ष बुध्दीनें केला, तर किती उत्तम गोष्ट हो-

णार आहे! आजपर्यंत सर्व देशांत जे महान्, महान् ग्रंथकार होऊन गेले, त्यांस त्यांच्या परिश्रमाबद्दल काय द्रव्यलाभ झाला हें पहा! वाल्मीकीनें आदिकाव्य निर्माण करून, आज हजारों वर्षे लक्षावधि लोकांचे मनोरंजन केलें व त्यांस सन्मार्गास लाविलें, याबद्दल कोणी काय त्यास दिलें? पाणिनीनें अष्टाध्यायीची बिकट रचना करून, येवढ्या अपरंपार गीर्वाणवाणीस सूत्रनिबध्द करून टाकलें, व आपल्या देशबांधवांच्या वाणीस परिपूत केलें, ह्मणून त्याला कोणी चांद बक्षीस दिला काय? आमच्या महाराष्ट्र कवींनीं महाराष्ट्रवाणींत रसपरिपाक ओतून देऊन, असंख्य जनांस रंजविलें, व हजारों हरदासांच्या बिदाग्या चालविल्या, ह्मणून आपल्या ग्रंथांवर त्यांनीं कधीं हक्क ठेवला काय? सॉक्रेटीस याने जन्मभर अथेन्सच्या लोकांस सदुपदेश केला, व प्लेटो, जिनोफन् यांच्या सारखे पठ्ठे तयार करून, आपल्या देशाची कीर्ति अजरामर करून टाकली, तो कधीं कोणापुढें हात पसरायाला गेला होता काय? मिल्टननें येवढें महाकाव्य अंधावस्थेंत व विपत्तींत रचून आपल्या देशास अक्षय्य भूषण आणलें, पण त्याबद्दल त्यास एका किताबवाल्यानें निष्क्रयद्वारा दान केलें, तें किती?— तर दीडशें रुपये! या सर्व उदाहरणांवरून ही गोष्ट सिद्ध आहे कीं, देशांत ग्रंथसंग्रह उत्तम रीतीचा होणें, हें, पूर्वोक्त थोर बुद्धीचा वास पंडितजनांच्या ठायीं असल्यावांचून, कधीं व्हावयाचें नाहीं. अर्थसंग्रहाविषयीं लालसा ठेवणारी जी क्षुद्रबुद्धि, तिच्या ठायीं ज्ञानाचा सांठा राहणें, व तो उत्कृष्ट कृतींच्या रूपानें प्रगट होणें, या दोन्ही गोष्टी वस्तुतःच अशक्य होत, असें म्हटलें असतां चालेल. यास्तव हल्लींच्या स्थितीला, आमच्या देशांतील विद्वान् ह्मणवून घेणारांनींच मुख्यतः वरील महात्मता पतकरली पाहिजे. आपले देशबंधु अज्ञान दशेंत आहेत, तर त्यांस तींतून काढणें हें आपले कर्तव्य होय असें समजून, जर ते सतत प्रयत्न करतील, व देशाच्या पैशानें आपण शाहणे झालों हा देशाचा उपकार फेडणें आपणास उचित होय हें लक्षांत वागवून, जर ते उद्योग करतील, तरच कांहीं कार्यसिध्दि होईल. नाहीं,

तर, आम्ही सरकारी काम अमुक अमुक तास करतों आणि त्याबद्दल आह्मास इतकी इतकी मजुरी मिळते, तर याच मानानें आमची सरस्वत्युपासनाही आम्हास फलप्रद झाली पाहिजे असें म्हणून जर ते अडून बसतील, व हातानें कांहीं न करतां नुसती देशहिताची यथेच्छ जल्पना करीत राहतील, तर आजपर्यंत जी तऱ्हा दृष्टीस पडत आली आहे, तीच पुढेंही येईल! अर्थात् लोकांनीं विद्वान् मंडळीच्या नांवानें हाका करीत असावें, व विद्वानांनीं लोकांस गुणपरीक्षा नाहीं म्हणून त्यांस दोष देत बसावें, येवढेंच काय तें होणार. खरोखरी पाहतां, सरकारानें आज इतके दिवस अट्टाहास करून आह्मास शहाणें करण्याकरतां परिश्रम काय थोडके केले? इंग्रजी भाषेंतील सर्वस्व, आमच्या गीर्वाण भाषेंतील सारी संपत्ति, हव्या त्या विषयाची माहिती, या सर्व गोष्टी जशा काय आमच्या स्वाधीन करून दिल्या आहेत. यापरतें आणखी त्यानें काय करावें? त्यांतून प्राचीन विद्वज्जनांप्रमाणें आमची मंडळी दारिद्र्यानें व संसारचिंतेनें ग्रासलेली आहे, असेंही केवळ नाहीं. पुष्कळांची स्थितितर 'सुखं च मे शयनं च मे' यांतलीच आहे. पण त्या मानानें आमच्या हातून काय होतें आहे?—कांहीं नाहीं! एवढेंचरीक होतें आहे,—वर्तमानपत्रें उलथीं पालथीं करावीं, गाड्याघोड्यांतून मिरवावें, पाश्चात्य प्रभूंच्या पुढें पुढें नाचावें, कधीं मधीं मजेखातर एकाद्या सभेचें मेंबर कीं सेक्रेटरी वगैरे व्हावें,—त्यांतून पराकाष्ठाच झाली तर आकाशांतील प्रभूच्या नांवानें नेत्रनिमीलन करून उपासना करावी! आटपला कारभार! सारा देश दिवसांदिवस बुडत चालला, लोकांस आपली स्थिति काय आहे याचीसुद्धां ओळख नाहीं, हें आमच्या युनिव्हर्सिटीपुत्रांपैकीं कितीकांच्या बरें मनांत उभ्या वर्षांत येत असेल! खरोखर, ही स्थिति अत्यंत शोचनीय होय. ही कधीं नाहींशी होईल ती होवो, व आमच्या नव्या बांडांस आपल्यावरची जोखीमदारी कधीं कळून येईल ती येवो; पण असें होईल, तोच दिवस खऱ्या सुधारणेचा पहिला समजायाचा!

[ केसरी, ता० १९ नोव्हेंबर १८८१ ]

यापूर्वीं सदरील विषयाच्या दोन भागांचें निरूपण केलें. आतां, देशभाषेंत ग्रंथसंग्रह वाढण्याचा तिसरा उपाय जो लोकपरिश्रम, त्याविषयीं विचार करूं.

वरील उद्देश सिद्धीस जाण्याकरतां लोकांनींच स्वतां खटपट करावयाची, ती कोणत्या प्रकारची, ती आज सर्वांस माहीत झालीच आहे. ती अशी कीं, बऱ्याचशा लोकांनीं आपल्यांतच वर्गणी करून पैसा जमवावा, आणि त्यांतून उत्तम ग्रंथकारांस बक्षिसें देऊन, त्यांच्या कृतींचा प्रसार करावा. हा उपाय चांगल्या रीतीनें अमलांत आणल्यास, त्यापासून पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे, हें खरें; पण तसें होण्यास अनेक अडचणी आहेत. व हल्लींच्या आमच्या स्थितीला तर वरील गोष्ट तडीस जाणें म्हणजे मोठीच पंचाईत आहे. हें असें कां, हें कोणासही सहज समजण्याजोगें आहे. तथापि विषयाच्या स्पष्टीकरणार्थ, वरील अडचणी कोणत्या, त्या येथें सांगतों.

पहिल्यानें मूळ अडचण म्हटली म्हणजे पैसा जुळण्याची. व्यवहारांत म्हण आहे कीं, सारीं सोंगें येतात पण पैशाचें सोंग येत नाहीं. या जगांत पैशावांचूनतर क्षणभर चालत नाहीं; बसतां पैसा, उठतां पैसा, असा जिकडे तिकडे प्रकार आहे. तेव्हां नवीन ग्रंथ रचण्याची उमेद उत्पन्न होण्याजोगी रक्कम प्रथमतः ग्रंथकारास द्यावयाची, नंतर तो छापायास जो खर्च लागेल तो सोसायाचा, आणि याशिवाय ग्रंथोत्तेजनाच्या कारखान्याचा एरवींचा किरकोळ खर्च सतत चालवायाचा,—हें सर्व म्हटलें म्हणजे केवढें अचाट काम आहे बरें! असलें काम सामान्य रीतीनें चालण्याससुद्धां, निदान पन्नास हजार रुपयेतरी पाहिजेत. येवढ्या रकमेची काय जरूर आहे, असें कोणास कदाचित् वाटेल; पण अंमळ विचार केला असतां, वरील पन्नास तोडे हेही कांहीं नव्हत, अशी कोणाचीही खात्री होईल. पहा कीं, अशी मंडळी निघाली, म्हणजे वर्षाच्या कांठीं दहा ग्रंथतर निपजले पाहिजेतना? मग एकेका ग्रंथका-

राची संभावना, दक्षिणा प्रेज कामिटीच्या धाऱ्याप्रमाणें, करायाची म्हटलें ह्मणजे चार हजार रुपये उडाले. या चार तोड्यांनीं नुसतीं दहा पुस्तकें पैदा झालीं ! पुढला विचार, तीं छापण्याचा. आतां ही पुस्तकें पुष्कळांच्या हातीं पडावीं असा जर विचार आहे, तर अर्थातच विद्याखात्यांतील पुस्तकांप्रमाणें, प्रत्येकाच्या निदान दोन हजार चार हजारतरी प्रति काढणें जरूर आहे. येवढें थोरलें प्रमाण धरल्याखेरीज पुस्तकाची किंमत कमी ठेवतां येणार नाहीं. तेव्हां हा छापण्याचा खर्च केवढा दांडगा झाला पहा ! याप्रमाणें पुस्तकें तयार होऊन बसलीं म्हणजे मग त्यांच्या विक्रयाचा विचार. त्याची व्यवस्था करण्यास अर्थातच कारकून, गडी वगैरे सर्व डीपोच्या आफिसाचा खर्च आला. सारांश एका वर्षांत, दहा नवीं पुस्तकें काढून, तीं लोकांस वाचायास मिळतील असें करायाचें, तर येवढ्या लहानशा कार्याच्या सिद्धीला एवढा थोरला खटाटोप करणे जरूर आहे. या मानानें पाहतां, विलायतेंतील मंडळ्यांप्रमाणें लाखो रुपये जेव्हां येथें खेळायाला लागतील, तेव्हां पुस्तकांची समृद्धि होऊन, लोकांच्या मनोरंजनाची व ज्ञानप्राप्तीची सोय होणार. यास्तव पुनः मूळपदावर येऊन आम्ही आमच्या वाचकांस विचारतों, कीं येवढी लाख पन्नास हजारांची मोठी थोरली रक्कम आमच्या देशांत जुळण्याचा संभव आहे काय? आमचें सरकार, आमचे संस्थानिक, आमचे शेठसावकार, आमच्यांतली बडी बडी मंडळी, या सर्वांचा अशा कामीं कितपसा भरंवसा धरतां येण्यासारखा आहे, हें सर्वांस महाशूर आहेच. छोटेखानी मंडळीनेंच येवढा विभु रचावा ह्मटलें, तर वारुळांतल्या मुंग्यांनीं मिसर देशांतल्यासारखे मनोरे रचावे हें इच्छिण्यासारखेंच तें होय! ज्या आम्हामध्यें नुसतीं जेवणावळीसारखीं कामेंही चार दिवस नेटानें चालवत नाहींत, त्या आमच्या हातून काय होणार? व असेंही करतां माराकुटीनें चार पैसे गोळा झालेच, तर भिक्षागृहाचे ट्रस्टी किंवा ग्रंथोत्तेजक मंडळीचे चिटणीस अशांसारखी खाशी मंडळी मिळायाला जेथें उशीर लागत नाहीं, तेथें ग्रंथोत्तेजनासारख्या सामान्य कामा-

निमित्त वरच्यासारखा टॉलेजंग फंड जुळणें म्हणजे 'अद्भुत वार्ता आणि कोल्हें गेलें तीर्था' यांतलाच अद्भुत प्रकार होय!

आतां, वरील सर्व अडचणी दुरापास्त तर खऱ्या; पण त्याही क्षणभर बाजूस ठेवल्या, तरी मुख्य अडचणी आहेत त्या आणखी निराळ्याच. त्या ह्या कीं, वरील लक्षसंख्याही जुळली म्हणा, तरी ग्रंथकारांकडून जीं पुस्तकें येतील, त्यांचे परीक्षण व शोधन जें करायाचें, तें कोणी करावें! वरील दोन्ही कामांचा सरसकट मक्ता एकाद्या रावबहादुरांकडे किंवा एकाद्या बड्या किताबवाल्याकडे तर देऊन टाकतां येत नाहीं? तसें करणें म्हणजे केवढी वेडगळपणाची गोष्ट होणार आहे,हें कोणालाही सांगणें नलगे. नामदारीपर्यंत जरी कोणाची बडेजावी वाढली किंवा युनिवर्सिटीचीं सारीं सोनेरीं पदकें जरी कोणी झोडलीं, तरी हव्या त्या विषयावर मत ठोकून देण्यास, किंवा पाहिजे तो ग्रंथ शोधण्यास, तो लायक होईल असें म्हणतां येत नाहीं. अर्थात हें काम वहिवाटण्यास एकाद्या कामिटीचीच योजना होणें जरूर आहे. ज्यास जो विषय चांगला अवगत असेल, त्याच्याकडे तो नेमून देऊन, पुस्तकाचे परीक्षण करविलें पाहिजे, व इतर कामेंही, योग्य मनुष्य निवडून काढून, त्यांजकडे सोंपवलीं पाहिजेत. याप्रमाणे मंडळी जुळवली तरच सगळा गाडा यथास्थित रेटला जाईल व इष्टसिद्धि होईल, हें उघड आहे.

पण हें होणार कसें? निरनिराळ्या विषयांत पारंगत असे विद्वान आमच्या देशांत नाहींतसे नाहींत; पण फुकाची बिगारी कोणीं करावी, असें त्यांस वाटणार. 'सरकारानें महिन्याची चंदी ठरवून देऊन मग पाठीवर चार कोरडे ओढले तरी चिंता नाहीं; सरकार मायबाप आहे, जें पाठीवर मारील तें पोटालाही देईल; पण प्राप्तीच्या नांवानें शून्य, आणि म्हणे, फुकाची बिगार वळा; हें नाहीं बोवा कोणाला पतकरायाचें!' असें म्हणणारे पुष्कळ गृहस्थ आहेत. आमच्या जुन्या पेनशनरांची कशी हालहवाल आढळते, ती सर्वांस माहीत आहेच. कोणास मानेवरचें जूं निघाल्यानेंच चैन पडेनासें होतें; तेव्हां मग म्हातारपणीं एकाद्या संस्थानांत डोकें घाल, किंवा एकादी महिनेमालीची मजुरी पतकर, हा प्रकार त्यांस करावासा वाटतो; निदान दहा वाजतां लग-

बगीनें जेवून, एकदा आपल्या जुन्या आफिसाचें दर्शन तरी घेऊन यावें, व साहेबी बुटांचा प्रसाद कोणा भाग्यवानास मिळत असला तर तो पाहून निदान नेत्रसुखतरी घ्यावें, असें वाटतें ! एका इंग्रेजी पुस्तकांत आह्मास अशी गोष्ट वाचल्याची आठवते कीं, एक मनुष्य फार दिवस बिनभाड्याच्या घरांत होता. पुढें त्याचा मोक्षसमय येऊन, सुदामजीची जशी द्वारकेस संभावना झाली, त्याप्रमाणें जुना पोषाक पुनः मिळून, स्वारीची बोळवणूक झाली. पण हे गृहस्थ आपल्या घरीं येऊन पाहतात, तों त्यांस कसेंसेंच वाटूं लागलें! हातापायांत वाळे, आणि तो कंबलकंचुक,—कीं जो अपयशाचें जणों पांघरूणच ! तें सर्व ऐश्वर्य घरीं कोठून मिळायाला? शेवटीं बहादरानें केलें काय, कीं मृच्छकटिकांतील शर्विलकाची कृति करून, पुनः आपल्या जिवलग संवगड्यांत जाऊन पडला ! असें झालें तेव्हां त्यास समाधान वाटलें ! तात्पर्य, श्वानसिंहवृत्ति म्हणून म्हटलेली जी राजसेवा, ती आलीकडे आमच्या इतकी आंगवळणीं पडून गेली आहे कीं, धाग्याला धागा जोडून देऊन, आम्ही पाहिजे तर पुनः ट्रान्सलेटर होऊन, 'मागून पुढून बाप नवरा' या म्हणीला सार्थकता आणूं: पण वर्षाच्या कांठीं उगीच फुकटाफुकट चार पुस्तकें उलथीं पालथीं करा म्हणून जर कोणी म्हणेल, तर ही जिकीर आपल्याला खपायाची नाहीं, असे उद्गार समजुतदार गृहस्थांच्या तोंडून निघालेले ऐकूं येतात. 'चाकरी करून भाकरी खावी' हें वरदानच मुळीं ब्रम्हदेवानें आम्हा हिंदूंना दिलेलें; मग त्यास हरताळ लावायाचा कीं काय ?—छे, बापजन्मींदेखील ही गोष्ट व्हावयाची नाहीं ! असो; अशी एकंदर स्थिति असल्यामुळें, ग्रंथपरीक्षण यथास्थित करण्याच्या कामाला योग्य मनुष्य मिळणें बरेंच कठिण आहे, यांत शंका नाहीं.

यावरून पाहतां, देशभाषेंत ग्रंथसमृद्धि होण्याची जी तिसरी तजवीज वर सांगितली, ती निदान सध्यांच्या काळीं तरी असून नसून सारखीच आहे, असें स्पष्ट म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

[ केसरी, तारीख २२ नोवेंबर सन १८८१. ]

मागील तीन अंकांत, वरील विषयाचा तीन सदराखालीं बराच ऊहापोह केला. आतां, देशभाषांतून ग्रंथसमृद्धि होण्याचा आह्मास एक निराळाच उपाय सुचला आहे, तो प्रगट करून, हा विषय आटपतों.

हा उपाय असा कीं, स्वतः आमच्या नवीन विद्वानांनीं मुद्रणकर्माचें आधिपत्य आपणाकडे घ्यावें. आजपर्यंत या देशांत अशी पद्धति चालत आली आहे कीं, इतर सर्व धंद्यांप्रमाणेंच छापखान्याचा धंदा हा अविद्वान् लोकांनीं करावा. अर्थात् इतर जे शेकडों उदरंभर उद्योग लोक करतात, त्यांतलाच मुद्रणकर्म हाही एक होऊन बसला आहे. विद्वान् मंडळी आजपर्यंत सरकारी चाकऱ्यांत मुरून गेल्यामुळें, व राजसेवा आजपावेतों बरीच फलप्रद असल्यामुळें, छापखान्यांच्या वांटणीस अविद्वान् वर्गांतीलच मंडळी आलेली आहे. शिवाय पाश्चात्त्य प्रभूंची सेवा ह्मणजे मोठी प्रतिष्ठादायक, व कामधंदा करून निर्वाह करणें ह्मणजे हीन कर्म, अशीही आणखी एक समजूत आज दीर्घकाळ पावेतों लोकांच्या मनास खिळून राहिली आहे. अशा अनेक कारणांस्तव छापखान्यांचें काम आजपर्यंत अडाणी मंडळीच्याच हातीं आहे. जें मुद्रणयंत्र अज्ञानाचा चुराडा करून टाकण्यास सर्वथा समर्थ, त्याची व्यवस्था कोणाकडे ?—तर ज्यांस चार ओळींचा मजकूरही लिहितां यावा न यावा, अशा मंडळीकडे! मग असली असमर्थ व दुर्बळ मंडळी गोलंदाजी काय करणार बरें ! व एकंदर राष्ट्रास गिळून बसलेल्या अज्ञानरूप महारिपूचा विध्वंस कसा होणार ? तर, हें काम विद्वान लोकांचेंच आहे, व त्याचें त्यांनींच तें हातीं घ्यावें अशी आमच्या नूतन विद्वज्जनांस आमची सूचना आहे. ती अमलांत आली असतां, कालेंकरून वरील अद्भुत अस्त्राचा प्रभाव सर्वांस थक्क करून सोडण्यासारखा होईल, याविषयीं आम्हास बिलकुल संशय नाहीं.

छापखान्याच्या कामावर विद्वान् मंडळीची देखरेख एकदा सुरू झाली ह्मणजे कसकसे फायदे होतील ते पहा. एक तर, काम चांगलें निघू

लागेल. चांगलें काम ह्मणजे सुरेख छापणी आह्मी म्हणत नाहीं, तर शुद्ध व व्यवस्थित मजकूर छापून निघत जाईल असा आमचा अभिप्राय आहे. हल्लीं मोठमोठ्या छापखान्यांतून अशी व्यवस्था आढळते, कीं मालकाच्या गैरमाहितीमुळें शोधनाच्या कामावर शास्त्री वगैरे कोणी ठेवावे लागतात. या पराधीनतेमुळें किती अव्यवस्था होते, हें कोणाच्याही सहज लक्षांत येईलच. वास्तव, ज्या मंडळीच्या नजरेखालून इंग्रेजी पुस्तकें नेहेमीं जावयाचीं, व ज्यांस देशभाषेचेंही चांगलें ज्ञान झालेलें आहे, अशांचाच अधिकार सदरील कारखान्यांवर असला, ह्मणजे अनायासेंच विलायती नमुन्यावर पुस्तकें निघूं लागतील. मग व्याकरणाच्या संबंधाचे, विचारसंगतीचे, व्यवस्थित छापणीचे वगैरे दोष सहज नाहींतसे होणार आहेत. शिवाय अशा प्रकारच्या सुधारणांत अग्रगण्य जे पाश्चात्त्य देश, त्यांच्या संबंधाची वरील मंडळीस माहिती असल्यामुळें, व उत्तरोत्तर ती विशेष होत जाण्याचाही संभव असल्यामुळें, अनेक प्रकारच्या इतर सुधारणाही नवीन सुरू होण्याचा संभव आहे, हेंही स्पष्टच आहे. हें नुसत्या कामाच्या संबंधानें झालें. पण याहून अत्यंत महत्वाची एक गोष्ट सांगायाचीच आहे. ती ही कीं, कोणतेंही पुस्तक प्रसिद्ध होवो; त्यास हल्लीं त्रिस्थळी यात्रा घडत असते. ती अशी कीं, प्रथम एकानें मोठे श्रम करून पुस्तक रचावें; मग तें दुसऱ्याकडे न्यावें, तेव्हां मोठ्या मारामारीनें तें छापण्याचा योग आणावा; शेवटीं येवढ्या भगीरथप्रयत्नानें निर्माण झालेला ग्रंथ, नवऱ्या मुलीची वरयोजना करतात त्याप्रमाणें, त्याचा खप होण्याकरतां ग्राहकांच्या घरोघर हेलपाटे घालून जोड्याचे टाके दिले करावे, किंवा एका तिसऱ्याच इसमाकडे तें विक्रयार्थ ठेवावें.—ही सारी पीडा, वरील सोय झाल्यानें, अर्थात् नाहींशी होणार आहे. जे विद्येचे भोक्ते, तेच ग्रंथरचना करूं लागले व छापखान्यांचे मालक असले, ह्मणजे वरील सर्व यातायात अर्थातच वांचणार आहे. निदान पक्षीं इतकें तरी होईल, कीं हल्लीं एकादें पुस्तक छापायास आलें असतां, त्याविषयीं छापखान्याचा मालक जसा बुचकळ्यांत पडतो, तसें होणार नाहीं. चांगलासा ग्रंथ दि-

सल्यास, त्याचा स्वीकार करतांना, त्याच्या मनाची साशंकता राहणार नाहीं. असें झाल्यानें, ग्रंथकारांची यातायात टळेल; व चांगले चांगले ग्रंथ प्रसिद्धीस येत गेल्यानें, लोकांस त्यांची गोडी लागून,त्यांचा खपही वाढेल. मग हळुहळू ग्रंथांच्या किमती उतरून, ते लोकांस सुलभतेनें घ्यावयास सांपडतील, हें उघड आहे.

इंग्लंडांत हल्लीं जो येवढा ग्रंथसंग्रह सिद्ध झाला आहे, व आणखी प्रतिवर्षी अपरिमित प्रमाणानें वाढतोच आहे, तो सगळा, अगदीं आलीकडे ह्मणजे सरासरी शंभर वर्षांच्या आंत, सिद्ध झालेला आहे. **जान्सन्**च्या वेळेपर्यंततर ग्रंथकार सरासरी उपाशीच मरत होते. पहा कीं, **जॉन्सन्**सारखा ग्रंथकार, आणि 'र्‍यांबलर–'सारखें निबंधपत्रक, पण त्याचे सारे ५०० अंक खपत असत. या एका गोष्टीवरूनच, इंग्लिश भाषेंतील ग्रंथसंग्रह व इंग्लिश ग्रंथकारांची भरभराट, या दोन्ही गोष्टी किती आलीकडच्या आहेत,हें कोणाच्याही लक्षांत येईल.खरोखर ही गोष्ट आम्हास मोठी उमेद आणण्यासारखी आहे, यांत शंका नाहीं. दुसरें असें कीं, वरील स्थित्यंतर झालें, तेंतरी राजाश्रयानें किंवा बडे लोकांच्या औदार्यानें झालें,असें नाहीं. अथवा प्रेज कमिट्या किंवा ग्रंथोत्तेजक मंडळ्या निघून, त्यांनीं वरील श्रेय घेतलें, असेंही नाहीं. तर फक्त 'बुकसेलर्स' म्हणजे पुस्तकविक्रीचा धंदा करणारे लोकांच्या हातूनच, हळुहळू, वरील परमोत्कर्षाची अवस्था त्या राष्ट्रास प्राप्त झाली. या किताबवाल्यांनीं ग्रंथकारांपासून पुस्तकांचा हक्क विकत घ्यावा, आणि तीं छापून त्यांच्या विक्रीचा धंदा चालवावा, अशी स्थिति आरंभीं होती, व तीच अद्याप धडाक्यानें चालू आहे. नवें पुस्तक झालें कीं त्याविषयीं वर्तमानपत्रांतून व मासिक पुस्तकांतून चर्चा चालू होते, आणि त्याची जितपत योग्यता असेल तितक्या मानानें लोकांकडून त्याची संभावना होते. कदाचित् त्या वेळच्या त्या वेळेस ती न झाली, तरी कालेंकरूनतरी होतेच होते. असा क्रम चालतां चालतां, हल्लीं अशी बहार आढळते कीं, अमुक अमुक पत्र ना, त्याच्या लाख प्रति दररोज उडतात व सार्‍या पृथ्वीभर रवाना होतात. तसेंच कांहीं कांहीं मासिक पुस्तकांनातर कोणी चांगलासा नि-

बंध लिहून पाठविला असतां, पारितोषिक ह्मणून त्याच्याकडे सबंद तोडा पाठविण्यांत येतो! याशिवाय आणखी ही मौज पहा—सबंद शेक्सपीयर, मिल्टन् , केवढ्याला ?—तर चार आण्याला किंवा आठ आण्याला! वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्या लवकरच दोन दोन आण्याला निघणार आहेत, असें नुकतेंच जाहीर झालें आहे! घ्या; आतां काय बाकी राहिलें? नाहीं तर आमच्याकडे पहा.नुसते तुकारामाचे साडेचार हजार अभंग आणि किंमत काय ? तर चार रुपये; आणि तीही पुनः स्वस्ताईची ! याप्रमाणेंच कालिदासाचा नुसता रघुवंश; किंमत रुपये दोन ! हें तरी भाग्य, दहा पांच वर्षांतलेंच. त्यापूर्वीं तर पंच महाकाव्यें सबंद पहायाला मिळायाची देखील पंचाईत असे. अमक्या शास्त्र्यापाशीं अमका सर्ग आहे, तर तमक्यापाशीं तमका आहे, ही दैन्यावस्था ! परंतु ही सगळी स्थिति, वर दर्शविलेल्या सूचनेस आमच्या विद्वानांनीं मान दिला, तर आपोआप नाहींशी होऊन, भाषेचें, वाचकांचें व ग्रंथकारांचें, असें सर्वांचेंच दैन्य फिटेल असें आह्मास वाटतें.*

---

*मराठी ग्रंथसंग्रहाच्या वाढीला ज्या अडचणी या निबंधांत दाखविल्या आहेत, त्या दूर करण्याकरतां वर अनेक उपाय सुचविले आहेत. त्यांत शेवटला व श्रेष्ठ उपाय ह्मटला ह्मणजे विद्वानांनीं, स्वतःच्या बळावर, थोर मनानें, ग्रंथसंग्रह वाढविण्यास झटावें, हा होय, असें शास्त्रीबुवांचें मत होतें. आणि तें पोकळ व वायफळ नाहीं असें स्वकृतीनें दाखविण्याकरतां, त्यांनीं आपले सत्तेचा छापखाना घालून, "पुणें - किताबखाना" या नांवाचें एक पुस्तकविक्रीचें दुकानही काढलें होतें. हें दुकान सांप्रत चांगलें चाललें आहे. सदर दुकानाच्या व्यवस्थापकांनीं,शास्त्रीबुवा वारल्यानंतर, विक्रीच्या पुस्तकांची जी यादी काढली, तिच्या प्रस्तावनेंत, ता. १८ अक्टोबर १८८१ च्या केसरीच्या अंकांतील वरील मजकूर उतरून घेऊन, शेवटीं पुढीलप्रमाणे उल्लेख केला आहेः—

"या पुस्तकालयाचा आरंभ सन १८७९ च्या जुलई महिन्यांत झाला. पुस्तकालय स्थापन करण्याचा उद्देश कोणता, तो या यादीबरोबर आपल्या प्रिय देशबंधूंस सविस्तर कळविण्याचा

सरतेशेवटीं आमच्या विद्यापीठीय बांधवांस येवढीच सूचना पुनः करायाची कीं, त्यांच्यापैकीं जर कोणी मामलेदार कचेरींत पुस्तीवर बसावयाचें सोडून देतील, किंवा विद्याधिपतींच्या बंगल्यावर जाऊन व नामदेवाच्या पायरीपाशीं उभें राहून, What do you want? ( कां आलां ? ) ही सलामी न घेतां, थोर मनानें सरस्वतीची उपासना करण्याचें मनांत आणतील, तर त्यांच्या हातें पुष्कळ चांगल्या गोष्टी होणार आहेत. ज्यांस आंग्लभौम व गीर्वाण या दो-

---

कैलासवासी **विष्णु शास्त्री चिपळूणकर** यांचा मानस होता. पण तो लेख लिहिण्यास त्यांची लेखणी जरी फिरली नाहीं, ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट झाली, तरी त्याचें दिग्दर्शन केसरींतील वरील निबंधांत यथास्थित झालें आहे. याशिवाय ........ विद्याखात्यांतून हल्लीं जीं पुस्तकें शिकवितात, तीं सर्वच चांगलीं आहेत असें नाहीं. ज्या पुस्तकांचा प्रसार होणें अगदीं अयोग्य, असल्या पुस्तकांचा सरकारांतून अत्यंत महिमा वाढला असून, आश्रय देण्यास जीं खरोखरच पात्र आहेत, असलीं पुस्तकें आज कीटकांच्या भक्षस्थानीं पडलीं आहेत ! ! तर तीं पुस्तकें. लोकाश्रयासाठीं पुढें आणावीं, असा कैलासवासी **विष्णुशास्त्री चिपळूणकर** यांचा उद्देश होता. सन १८८० सालाचे आरंभीं येथें **न्यू इंग्लिश स्कुलाची** स्थापना झाली, त्या वेळीं त्यांनीं जें एक सुरस व्याख्यान दिलें त्यांत वरील मुद्याचें फारच उत्तम रीतीनें स्पष्टीकरण केलें होतें. वरील हेतूनें, त्यांनीं विद्याखात्यांतून चालू असणारीं पुस्तकें आपल्या शाळेंत न चालवितां, स्वतांस पसंत पडलीं तींच पुस्तकें वर्गांतून चालू केलीं. ' इंबीरराव आणि पुतळाबाई, ' ' नवनीत भाग दुसरा ' असलीं कित्येक सुंदर पुस्तकें कीटकांच्या भक्षस्थानींचीं सोडवून, त्यांचा घोष त्यांनीं या आपल्या विद्यालयांतून सुरू करविला. याप्रमाणें सन १८८० सालापासून आजपर्यंत चांगलीं चांगलीं पुस्तकें या किताबखान्यांतून थोडीं विकलीं गेलीं असें नाहीं; आणि यापुढें तर तीं पुष्कळच जमविण्याचा त्यांचा बेत होता ! पण काळाची गति कांहीं विचित्र आहे; तिला उपाय नाहीं ! "— **संपादक.**

न्ही विद्या अनुकूल आहेत व अनेक शास्त्रांची माहिती आहे, त्यांस ग्रंथरचना करणें फार जड जाईल अशी गोष्ट नाहीं. त्यांतून, आणखी मुद्रणव्यापाराचेंही स्वामित्व जर त्यांनीं पतकरलें, म्हणजे किती अडचणी नाहींतशा होणार आहेत, व लोकांत ज्ञानाचा प्रसार किती झपाट्यानें होणार आहे, हें सांगावयास नकोच.तर,आपल्या या बंधूचा हा उपदेश आमची ज्ञगेवाली मंडळी, चान्सेलर साहेबांच्या हातून मिळालेल्या चर्मपत्राच्या गुंडाळींत गुंडाळून, एका बाजूस ठेवून देणार नाहीं, अशी उमेद बाळगून, सरस्वतीच्या उपकरणाचा न्यास करतों.

---

# नाटकें करावीं कीं करूं नयेत ?

[ केसरी, तारीख २९ नोवेंबर १८८१ ]

**सानुमती**–उत्सवप्रियाः खलु मनुष्याः ।

**शाकुंतल, ६.**

आलीकडे संगीतशाकुंतलाचे प्रयोग झाल्यापासून, वर्तमानपत्रांतून एक मोठा वाद माजला आहे. एक पक्ष वरील प्रयोगांच्या विरुद्ध आहे, व दुसरा त्यांस अनुकूल आहे. हाच वाद यापूर्वीही अनेक वेळां उपस्थित झालेला असून, पुढेंही तो अनेक प्रसंगीं होणारच आहे; यास्तव त्यांत तथ्य कितपतसें आहे, याविषयीं येथें ऊहापोह करणें उचित होय. आजपर्यंत या वादांत आम्ही मुळींच पडलों नाहीं; एके प्रसंगीं मात्र, एका पत्रकारास उत्तर देतांना, आपलें मत थोडक्यांत प्रदर्शित केलें होतें.हल्लीं तें आमच्या वाचकांस सामग्र्यानें सादर करतों.

नाटकें करणें बरोबर आहे कीं नाहीं, हा जर आह्मास कोणी प्रश्न केला, तर त्यावर आमचें उत्तर असें आहे कीं, अगदीं बरोबर आहे. तें कां?–तर त्यापासून लोकरंजन होतें ह्मणून. लोकरंजनाचा जो जो मार्ग असेल तो तो लोकांत अवश्य प्रवृत्त झाला पाहिजे; इतकेंच कीं, त्यापासून शरीरास किंवा मनास, साक्षात् किंवा परंपरेनें, इजा होण्या-

सारखी मात्र नसावी. यास्तव अशा तऱ्हेचे कर्मणुकीचे जेवढे म्हणून प्रकार आहेत, तेवढे सर्व अत्यंत ग्राह्य होत.

मनुष्याच्या मनाचा असा धर्मच आहे कीं, त्यास नेहेमीं कांहीं ना कांहीं तरी उद्योग लागत असतो; त्यास स्तब्धता बिलकुल आवडत नाहीं. यास्तव लोकनियमनाचें काम ज्यांनीं पत्करलें आहे, व आपल्या राष्ट्रानें निरंतर सुमार्गांत चालावें असें जे इच्छितात, त्यांनीं, अत्यंत उच्छृंखल जें मन, त्याच्या नियमनाची तजवीज अवश्य केली पाहिजे. या गोष्टीकडे आमच्या पूर्वजांनीं फार लक्ष्य दिलें होतें, असें, त्यांनीं लावून दिलेल्या नित्यक्रमावरून, दिसून येतें. 'भगवद्गीतें-'त एके ठिकाणीं मनास समुद्रावरील जहाजाची उपमा घेतली आहे; व कोणीही क्षणभर विचार केला असतां, त्यास ती सर्वथा यथार्थ वाटणारी आहे. जहाज हें जसें सर्वथा वाऱ्याच्या स्वाधीन असतें, त्याप्रमाणेंच मन हें मनुष्याच्या मनाला होणाऱ्या प्रेरणांच्या अधीन असतें. या प्रेरणा होतील तसतसें मनुष्याच्या हातून आचरण होणार आहे. पहा कीं, रिकामपण दुराचरणाला प्रवृत्त करणारें होय, असा मनुष्यमात्राचा अनुभव आहे. सकाळपासून संध्याकाळपावेतों काबाडकष्ट करणाऱ्या मजूराचें वर्तन, आणि चारी ठाव चमचमीत भोजन करून, ज्यानें काळ घालवावा व ज्यास काडीचेंही काम नाहीं, अशा खुशालचंदाचें वर्तन, यांत किती फरक असतो बरें! दुसऱ्या वर्गांतील मनुष्याच्या मनावर व्यसनांचीं एकावर एक किती पुटें बसलेलीं असतात म्हणून सांगावीं! ज्यास मुळीं कांहीं कामच नाहीं, त्यानें वेळ तरी घालवावा कसा? मग अर्थातच, जेवढे म्हणून ढंग मनुष्यास करावेसे वाटतात, तेवढ्यांच्या स्वाधीन या राजश्रीस व्हावें लागतें. साहा पेशव्यांच्या डोईवर राज्यकारभार होता, तेव्हां त्यांस ऐषआरामास कोठून वेळ फावणार? व फावला तरी तो किती! पण तेच शेवटले राजबिंडे पहा; त्यांच्या वडिलोपार्जित दोस्तांनीं राज्य निष्कंटक करून, त्यांस गादीवर झोप घेण्याचें काम तेवढें ठेवल्याबरोबर, पुण्यपत्तन लागलींच कसें रंगलें! पंतप्रधानांची स्वारी

शुक्रवारच्या वाड्यांत सुग्रास भोजन करून, वामकुक्षीला बुधवारच्या वाड्याकडे निघाली, कीं पहिल्या प्रथम सलामी बावन्न खिडक्यांतून! तेंच, त्यांचे वडील राघो भरारी* यांचें खोगीर दोन दोन दिवस घोड्यावरून निघत नसे, मग जेवणाची वार्ता कशाला? पारसीकांच्या एका राजाची गोष्ट अशी इतिहासांत प्रसिद्ध आहे कीं, जो कोणी नवीन कर्मणूक काढील त्यास त्याच्याकडून बक्षीस मिळत असे; इतकी त्याच्या मनाची अस्वस्थता होती. सारांश, मन हें मोठें चंचल आहे; यास्तव, पाऱ्यास जसें स्थिर करतात, त्याप्रमाणें त्यासही स्थिर करणें अवश्य होय. तें जर चांगल्या कर्मणुकीकडे गुंतवून ठेवलें नाहीं, तर अर्थातच तें हवें तिकडे बहकणार. जसें सुकाणूं सुटलें, कीं जहाज कोणत्या खडकावर जाऊन आपटेल, याचा नेम नाहीं, किंवा एंजिन भडकलें, कीं कोणिकडे गाडी नेऊन उलथील, हें सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणें, स्वभावतांच जें मनुष्याचें 'उत्सवप्रिय' मन, तें सत्कर्वांच्या कृतीकडे वैगेरे जर वेधलें नाहीं, तर किती छक्कडींत गुंगून जाईल याचा नेम लागायाचा नाहीं!

यावरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं मनुष्यास कर्मणूक तर पाहिजे, आणखी ती कर्मणूक चांगल्या प्रकारची पाहिजे. आम्हास वाटतें, कीं नाटक ही अशा प्रकारची कर्मणूक आहे. यास्तव नाटकें जसजशीं सुधरत जातील, तसतसा त्यांत आमच्या लोकांचा फायदाच आहे. अशी ही सुधारणा गेल्या वीस पंचवीस वर्षांत थोडी झाली असें नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वीं आमच्या लोकांस, नाटकाचे प्रकार म्हटले म्हणजे काय ते दोन माहीत होते; एक तमाशा व दुसरें ललीत. हे दोन्ही प्रकार किती हलकटपणाचे, किती विचकट व किती गांवढळ आहेत, हें कोणासही सांगावयास नको. स्त्रियांची गोष्ट तर राहोच; पण पुरुषांस देखील व-

---

* वरील नांव रघुनाथरावास पडलें होतें. त्याची दौड अशी होती कीं, एकेक दिवशीं पन्नास पन्नास, साठ साठ कोस त्यानें निघून जावें! त्यानेंच गिलच्यांस अटकेची पैलथडी दाखविली! पण एका दुर्गुणानें या सर्व गुणांचे पुढें केवळ मातेरें झालें!

रील दोहोंतले बीभत्स प्रकार पाहून पराकष्ठेची शरम वाटल्यावांचून कधीं राहणार नाहीं. जो निव्वळ ग्राम्य मनुष्य, त्याच्या जाड्याभरड्या अभिरुचीस, वरील नाट्य व त्यांतलीं भाषणें, हीं काय आवडतील तीं आवडोत! इतरांस तर तीं कधींही पसंत पडावयाचीं नाहींत. म्हणून आम्ही असें म्हणतों कीं, हल्लींची अगदीं रासवट नाटक्कार कंपनी आणि दगडया परटाचा तमाशा किंवा सख्यागोंधळ्याचें ललीत, यांत कोणास कांहींच अंतर दिसत नाहीं काय? सांप्रत झाली आहे, ही आम्हास तर बरीच सुधारणा वाटते. त्यांतून आलीकडे कांहीं मंडळ्यांनीं बऱ्याच प्रकारची आणखीही सुधारणा केलेली आढळते. इचलकरंजीकरांचा 'भ्रांतिकृत चमत्कार', आळतेकरांचे 'नारायणराव' आणि 'झांशीची राणी' यांचे फार्स (?), तसेंच आर्योद्धारकांचे 'अथेल्लो' आणि 'मल्हारराव' हे खेळ पाहून, मोठ्या पदकवाल्या उपपदधारींसही तोंडाला पदर लावण्याची पाळी येईल, असें आम्हास वाटत नाहीं!

तेव्हां, राष्ट्राच्या कर्मणुकी सुधारणें ही जर चांगली गोष्ट असेल, तर नाटकांची प्रवृत्ति जी आज इतके दिवस पडली आहे व आणखी पडत चालली आहे, तींत, आमच्या बुद्धीनें, कांहीं गैर दिसत नाहीं. उलटें असें म्हणायाससुद्धां आम्हास बिलकुल धास्ती वाटत नाहीं, कीं आमची विद्वान् मंडळी या कामांत परिश्रम करून, कालिदासादि संस्कृत कवि आणि शेक्सपीयरप्रभृत पाश्चात्य कवि यांच्या कृतींचा साक्षात् किंवा भाषांतरद्वारा लोकांस जितका अधिक परिचय करून देईल, तितके ते सर्वांच्या धन्यवादास आपणास अधिकाधिक पात्र करून घेतील. वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें, ग्रंथ, व्याख्यानें इत्यादिकांचा प्रसार जसा सर्वथा इष्ट आहे, त्याप्रमाणेंच नाटकांचीही गोष्ट होय. मिल्टन् कवीची कीर्ति आडिसन् यानें आपल्या निबंधांनीं जशी परम उज्वल केली, त्याप्रमाणेंच जॉन्सन्चा मित्र ग्यारिक, यानें आपल्या अप्रतिम नाट्यप्रयोगांनीं साऱ्या इंग्लंडास 'शेक्सपीयर, शेक्सपीयर' बोलायाला लावलें. प्राचीन काळच्या व अर्वाचीन का-

ळच्या सुधारलेला साऱ्या राष्ट्रांतून नाटकाचा संप्रदाय विद्वन्मान्य होऊन राहिलेला आहे. येवढा महापंडित सॉक्रेटीस, अतंत्य विरक्त स्थितींत राहणारा असतांनाही, त्याचा मित्र युरिपेडीज यानें रचलेल्या शोकरसप्रधान नाटकाचा प्रयोग पाहण्यास आदरपूर्वक जात असे. तेव्हां नाटकांची अभिरुचि विद्वत्तेस लांछनास्पद होय, अशांतला कांहीं एक प्रकार नाहीं. वर सांगितलेला प्रख्यात नट ग्यारिक, यानें तर साऱ्या जन्मभर रंगभूमीवरच निर्वाह करून, श्री व कीर्ति यांचा लाभ करून घेतला. त्यांतून, ज्या आमच्या विद्वज्जनांस साहेबी बूट खाण्याची व आपल्या गौरकाय प्रभूंचा मिथ्यास्तव करून जिव्हा विटाळण्याची बिलकुल शरम वाटत नाहीं, त्यांस नाटकगृहांत जाण्याची, किंबहुना रंगभूमीवर येऊन आपल्या देशबंधूंस रंजविण्याची, येवढी लाज कशाला वाटायाला पाहिजे, हें आह्मास समजत नाहीं !

[ केसरी, ता० ६ डिसेंबर १८८१ ]

मागील खेपेस, प्रस्तुत वादाच्या संबंधानें सामन्यतः निरूपण केलें. आतां, हा वाद ज्यावरून उपस्थित झाला, त्या 'संगीतशाकुंतला-'च्या संबंधानें चार शब्द लिहूं.

ही नवीन टूम रा. किर्लोसकर यांनीं गेल्या सालीं काढली. हे गृहस्थ रेविन्यू कमिशनराच्या आफिसांत नोकर आहेत; यास्तव तें आफिस बरसातीकरितां पुण्यास आलें असतां, चातुर्मास्यांत रंगदेवतेची उपासना करून, पुण्यजनमनोरंजन वर्षांतून एकदा करावयाचें, असा त्यांनीं संकल्प केला आहे असें दिसतें. या गृहस्थांस नाट्याचा व काव्यरचनेचा पहिल्यापासून फार नाद आहे म्हणून ऐकतों. 'शांकर दिग्जय' या नांवाचें एक नाटक त्यांनीं महाराष्ट्रभाषेंत यापूर्वींच निर्माण केलें आहे. या सर्व गोष्टींवरून 'संगीता-चे कर्ते रसिकांत मोडण्यासारखे आहेत असें उघड दिसतें. यास्तव, स्वतःची हौस फेडून घेऊन,लोकांसही चार घटका उत्तम रीतीची कर्मणूक करण्याचा संकल्प या नाट्याचार्यानें केला, हें ठीकच केलें. आतां जो सरकारी नोकर आहे, त्यानें नित्याची श्रवृत्ति आटपल्यावर घरीं जाऊन, हात जोडून

स्वस्थ बसावें, इतर कामधंदा कोणताच त्यानें करतां नये, हें बादशाही सूल आलीकडे निघालें आहे, तें त्यांच्या नाट्यकर्मास कितपत आडवें येईल हा विचार निराळा; पण एरवीं सामान्य समजुतीस अनुसरून पाहतां, आम्हासतर असें वाटतें कीं, राजकार्याच्या व्यतिरिक्त वेळांत वरिष्ठांच्या घरांचे उंबरठे पुजणें किंवा रिकाम्या चकाट्या पिटीत बसणें, यापेक्षां रा. किर्लोसकरांनीं केलेला कालक्षेप फार उत्तम होय. ख्रिस्ती धर्मांत आदितवारीं कोणतेंही काम करण्याची जशी सक्त मनाई आहे, त्याप्रमाणेंच राजसेवानिरतांसही इतर कामें करण्याचा नेहमींच प्रतिबंध आहे खरा; व यासंबंधानें कांहीं परोपकारी मंडळीनें कमिशनर साहेबापर्यंत वरील भरतपुत्राचा बोभाटा नेल्याचेंही ऐकिवांत आहे; तरी एकंदर लोकांच्या तर्फे वरील नवी ट्रम काढल्याबद्दल रा. किर्लोसकरांचे आभार मानल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. इंग्लंडांत 'आपरा' या नांवाचा एक नाट्यप्रकार आहे, त्याचाच हा नमुना वरील गृहस्थानें इकडे सुरू केला आहे, असें ह्मणायास हरकत नाहीं. त्याचा मासला, आजपर्यंत, एका पारशी खेळांत मात्र दृष्टीस पडत असे. पण त्याहून हल्लीं सुरू झालेलें संगीत किती उत्तम आहे, हें, दोन्ही चिजा ज्यानें ऐकल्या असतील व प्रयोग पाहिले असतील, त्यास सांगायास नकोच. एक तर, पारशी मंडळीचा एकच एक सूर कंटाळवाणा होतो; तसें इकडे नाहीं. शिवाय त्यांच्या व इकडच्या संविधानकांत व नाट्यांतही अतिशयच फरक आहे! तेव्हां, 'संगीत शाकुंतला'ची पहिली जी तारीफ करावयाची, ती येवढ्याकरितांच, कीं हा एक निराळा प्रघात आमच्यांत सुरू झाला. गायन हें मनुष्यमात्रास, किंबहुना पशुकोटींतील प्राण्यांसही, स्वभावतःच अत्यंत प्रिय आहे. यास्तव त्याच्या द्वारें मनोरंजनाची प्रवृत्ति पडणें हें किती इष्ट होय, हें सांगावयाला नकोच. दुराचार व ग्राम्यता यांच्या मूर्ति ज्या वेश्या, त्यांच्याखेरीज वरील चित्तरंजनाचा प्रकार जर उपलब्ध होऊं लागला, तर ही थोडी सुधारणा झाली असें नव्हे. येथें आज कित्येक वर्षे एक गायनसमाज निघाला असून, त्याच्या द्वारें ज्या प्रकारची नवी गोष्ट

प्रचारात आणण्याची कित्येकांची खटपट आहे, तोच प्रकार 'यासंगीता-'च्या योगानें सिद्ध होणार असल्यामुळें, त्याचें आम्ही अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों.

रा० किर्लोसकर यांच्या संगीतांतला* दुसरा गुण म्हटला म्हणजे त्यांतील गायनप्रकार. यापूर्वी शाकुंतल नाटकाचीं चार पांच भाषांतरें झालीं आहेत;पण सांप्रत सर्व प्रयोग संगीतपर करायाचा असल्यामुळें, तीं प्रस्तुत प्रयोगकारास अर्थातच विशेष उपयोगीं पडलीं नसावीं; व बहुतेक सर्व भाग त्यास स्वतःच्या बुद्धीनेंच बनवावे लागले असावे, असें आह्मास वाटतें. हें सर्व करून, नंतर आपापल्या कामांत प्रत्येक पात्रास निपुण करायाचें व ज्याच्या त्याच्याकडून यथास्थित अभिनय उठावयाचा, हेंही मोठें कठिण काम आहे. त्यांतून हें काम अशिक्षित नटांकडून करावयाचें ह्मटलें ह्मणजे बरेंच मेहेनतीचें आहे, हेंही उघड आहे. रा० किर्लोसकर यांनीं दोन गवय्ये मुख्य पात्रांत घेतले, हें फार उत्तम केलें, व यामुळेंच त्यांच्या प्रयोगांस इतकें यश आलें असें आह्मास वाटतें. पूर्वी कोणत्याही नाटकप्रयोगावर लोकांच्या इतक्या उड्यांवर उड्या पडल्या नाहींत. पद्यांच्या नवीन चालीसुद्धां लोकांस अत्यंत प्रिय होऊन गेल्या आहेत. सदरील नाटकाची एक हजाराची प्रत हं हं म्हणतां उडून गेली, ह्यावरून हें उघड दिसतें. याशिवाय भूमिका घेणाऱ्या पात्रांचीही यथायोग्य निवडणूक केल्यामुळें, या नाटकाचा प्रयोगही मनोहर होतो, व तो पुनः पुनः पाहण्याची प्रेक्षकांची फार उत्कंठा असते.

तिसरा गुण नाटकाचा यथास्थित अभिनय हा होय. हा अभिनय सर्व पात्रांचा यथोचित होणें, हें काम बरेंच कठीण असतें. पण प्रकृत प्रयोगांत केवळ दोष ठेवण्यासारखें असें एकही पात्र नसून, कांहीं तर चांगलींच आहेत. दुष्यंत, शकुंतला, भरत, कण्व, शार्ङ्गरव या पात्रांचीं कामें खरोखर वर्णनीय होत. तीं

---

*वरील निर्देश करण्याचें कारण स्पष्टच आहे. येथील संगीताची नक्कल लवकरच मुंबईस झाली. तिजविषयीं येथें कांहीं लिहितां येत नाहीं.

पाहूनही जो तटस्थ राहील व ज्यास कांहींच आनंद होणार नाहीं, त्या प्रेक्षकाची धन्य म्हटल्यावांचून राहवत नाहीं. 'स वै मुक्तोऽथवा पशुः' हा चरण वरील बहादरास लागू करण्यास आम्हास बिकुल हरकत दिसत नाहीं! आतां हें खरें आहे, कीं रा. किर्लोसकर यांनीं केलेलें भाषांतर छापील पुस्तकावरूनच जर वाचलें, तर कितपत गोड लागेल, हें आमच्यानें सांगवत नाहीं; व कांहीं ठिकाणींतर शब्दसौष्ठवांतही जो थोडा उणेपणा आहे, तो नुसतें पद्य ऐकल्याबरोबर उमगण्यासारखा आहे असें आह्मास वाटतें. तथापि त्याच्या तर्फेनें येवढें म्हणावयास चिंता नाहीं, कीं मूळ महाकवीच्या कृतीवरून होणारा आल्हाद सदरील प्रयोगावरून बऱ्याच प्रकारें होतो, व साऱ्या जगास मोहून टाकणारी जी कविकुलगुरूची करामत, तिचें चीज वरील प्रयोगकारांनीं बरेंच केलें, यांत शंका नाहीं.

याप्रमाणें सदरील नाट्यप्रकाराच्या संबंधानें जें लिहावयाचें होतें, तें आम्हीं लिहिलें. आतां सरते शेवटीं, त्यावरून घेण्यासारखी एक मोठी गोष्ट आहे, ती सांगून, हें विवरण पुरें करतों. ती गोष्ट ही कीं, जो कोणी एखाद्या कार्याविषयीं समंजसतेनें दृढ प्रयत्न करील, त्यास किती लवकर व केवढें थोर यश येण्यासारखें असतें, हें प्रस्तुत प्रयोगकाराच्या उदाहरणावरून चांगलें शिकतां येण्यासारखें आहे.आपला जिकडे कल आहे, तिकडेच मनुष्यानें आपली बुद्धि खर्चली असतां व दृढ निश्चयानें पिच्छा पुरवला असतां, कोणतीही गोष्ट साध्य होणार नाहीं असें बहुधा घडणार नाहीं. कांहीं अकल्पित अनर्थापात झाला तर गोष्ट वेगळी; पण सामान्यतः पाहतां, बुद्धीचें प्रावीण्य व सतत प्रयत्न हीं एकत्र झालीं असतां, कालेंकरून तरी सिद्धि अवश्य यावयाचीच. पण या दोन्ही गोष्टींचीच मुळीं आमच्या ठिकाणीं पंचाईत आहे. आमच्या हातून होण्यासारखें असतें कार्य एक, आणि आम्ही भलतेंच घेतों हातीं; मग तें तडीस जावें कसें? आणि त्यांतून त्याविषयीं प्रयत्न व्हावयाचा तोही कोता; नेटानें म्हणजे कांहीं दिवस कांहीं चालले आहे, ही गोष्टच बोलायाला नको. मग त्यांत यश आलें

नाहीं तर कोणाकडे बोल बरें! पण मनाचा कल व दृढनिश्चयाचा सतत उद्योग यांच्या बळावर, रा. किर्लोसकर यांनीं वर सांगितलें इतक्या योग्यतेचें यश संपादन केलें, हें त्यांस खरोखर मोठें भूषण आहे. यास्तव, जे 'नाटकशत्रु' लोक, अरसिकतेनें किंवा मात्सर्यानें प्रेरित होत्साते, संगितास नांवें ठेवतात, व रा. किर्लोसकर यांनीं कमावलेल्या तोड्यांच्या राशी म्हणजे वासुदेव. बळवंताचा दरवडा असें समजतात, ते जर अंमळ शांतपणानें व शोधपूर्वक विचार करतील, तर वरील तत्त्व त्यांच्याही लक्षांत येईल, असें आम्हास वाटतें. कोणीं कांहीं बहादुरीचें काम केलें, तर त्याचें अभिनंदन करणें, हें 'केसरीचें' कर्तव्य असून, त्याच्या प्रोत्साहनार्थ सटावधूननपूर्वक त्याची गर्जना अवश्य ऐकूं आली पाहिजे, अशी आमची समजूत आहे. यास्तव, रिकाम्या कोल्हेकुईस न जुमानतां, सदरहू नाट्याचार्यानें आरंभलेला क्रम असाच उत्साहानें पुढें चालवावा, अशी सूचना त्यास केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

[ केसरी, तारीख १३ डिसेंबर १८८१ ]

आतां, 'संगीता-'चे, व सामान्यतः सर्व नाटकांचे प्रतिपक्षी आपल्या तर्फेनें जो कोटिक्रम पुढें आणीत असतात, त्यांत तथ्यांश कितपत आहे, तो पाहूं.

नाटकांचे प्रतिपक्षी ह्मटले ह्मणजे तीन प्रकारचे लोक होत:—एक धार्मिक, दुसरे अरसिक, व तिसरे कृपण. धार्मिक म्हणजे परमार्थपरायण लोक. परमार्थ ह्मटला म्हणजे परलोकसाधनाच्या मार्गाचें अवलंबन व इंद्रियनिग्रह यांच्या योगानें साध्य व्हावयाचा. तेव्हां, अर्थातच लोकव्यवहारास व ऐंद्रिय सृष्टीस जो पराङ्मुख, व इहलोकीं आपणास वाटसराप्रमाणें चार दिवस काढणें आहेत, ते कसे तरी काढले ह्मणजे झालें, इतकाच ज्याचा हिशोब, त्यास प्रत्यक्ष भरत ऋषीनें इंद्रसभेपुढें रंभादि पात्रांकरवीं केलेला प्रयोगही तुच्छ होय, हें उघड आहे. इंग्लंडांतही एके काळीं असल्या विरक्त मंडळीची राशियत झाली होती; तेव्हां

पहिल्याप्रथम साऱ्या नाटकगृहांस कुलपें बसलीं. ग्रीक लोकांतला प्रख्यात तत्ववेत्ता प्लेटो यानेंही आपल्या मनःकल्पित ' प्रजासत्ताक राज्यांतू-'न नाटक्यांस व सोंगाड्यांस हाकून लाविलें आहे. नटाचें मुखावलोकन न करण्याविषयीं आमच्या देशांतील धार्मिक मंडळीचाही केवढा कटाक्ष आहे, हें सांगण्यास नकोच. तर, ऐहित मोहांत गुंतवि-णारे जे नाटकादि प्रकार, ते धार्मिक मंडळीच्या दृष्टीनें निषिद्ध होत, हें उघड आहे. हा पहिला प्रतिपक्षिवर्ग झाला.

दुसरा वर्ग अरसिकांचा. ही मंडळीसुद्धां जगांत थोडी आहे असें नाहीं. यांस खावें, प्यावें, ल्यावें, आणि सुखांत पडलेलें असावें, या-खेरीज दुसरें कांहीं दिसत नाहीं. मोठा उत्तम वनाचा देखावा असू द्या, मोठी उत्कृष्ट कादंबरी कोणी वाचीत असो, किंवा कोणच्याही प्रकारची मोठी मौजेची एकादी गोष्ट असो; वरच्या मठ्ठ मंडळीस कसची मजा आणि कसचा चमत्कार ? हें बिलकुल भासायाचेंच नाहीं. असल्या खबरदार गड्यांस अनुलक्षून एका संस्कृत कवीनें ब्रह्मदेवापाशीं प्रार्थना केली आहे, तीच बरोबर आहे. कवि म्हणतोः—

इतरपापफलानि यथेच्छया
वितरितानि सहे चतुरानन ।
अरसिकेषु कवित्वनिवेदनं
शिरसि मा लिख मा लिख मा लिख ॥

"हे चतुरानना ! माझ्या पातकाबद्दल मला आणखी काय पाहिजे तितकीं शासनें कर; पण बाबा, अरसिकाला कवित्व सांगत बसण्याची कटकट मात्र माझ्या कपाळीं नको, नको, नकोच लिहूं !" या प्रार्थने-वांचून आणखी काय म्हणावें ?

राहिला साहिला तिसरा वर्ग, कृपण मंडळीचा. यांचें मुळीं व्रतच, कीं या लोकचा परमसखा म्हणजे काय तो पैसा; यास्तव त्याच्या यत्किंचित् अंशाचा जरी वियोग झाला, तरी तो त्यांस प्राणहानीहूनही दुःसह ! तेव्हां, रुपया किंवा आठ आणे गमावून, नुसता तमाशा डोळ्यांनीं पाहवयाचा, यापरतें त्यांच्या दृष्टीनें कोणतेंही मूर्खत्व नाहीं, हें ठीकच! पण हें स्पष्टपणें बोलून कोणी दाखवावें ? तेव्हां अर्थातच 'इसापनीती-'तील

आंबट द्राक्ष्यांची हिकमत लढवणाऱ्या कोल्ह्याप्रमाणें कांहीं तरी खुस-पटें काढीत बसायाचीं. 'नाटकांत काय फायदा आहे ? नाटकांनीं लोकनीति बिघडते, नाटकवाले ह्मणजे दरवडेखोर होत, नाटकी लोक ह्मणजे काय हलकट' इत्यादि प्रवाद ऐकूं येतात, ते अशा कृपणांच्याच तोंडून निघालेले ऐकूं येतात.

याप्रमाणें नाटकांच्या प्रतिपक्ष्यांचे तीन मुख्य वर्ग सांगून, त्यांचें सामान्य स्वरूप वर्णिलें. आतां हे प्रतिपक्षी प्रस्तुत प्रघातावर काय दूषणें आणतात, तीं पाहूं.

नाटकवाल्यांवर सर्वांत पहिला मोठा टपका ह्मटला म्हणजे हा, कीं ते लोकांचा पैसा बुचाडतात. संगीतवाल्यांवर तर हा एक मोठाच गहजब आहे. किर्लोसकर आणि को. ह्मणजे सरासरी वासुदेव बळवंत आणि को. हिच्याच तोडीची कंपनी ! वा: केवढें जबरदस्त दूषण हें ! संगीतवाल्यांनीं लोकांच्या हातावर गुळखोबरें ठेवून, त्यांचें पागोटें कोठें हिरावून घेतलें काय? किंवा आमच्या कायदेकौंसलांत चार दाढ्या एके ठिकाणीं मिळाल्या, कीं लोकांपासून लक्षावधि रुपये लुंगावण्याचें हत्यार जसें ताबडतोब तयार होतें, तसा तर दुष्यंत महाराजांनीं एकादा आक्ट झोकून दिला नाहींना ! या विलक्षण आरोपावरून, आह्मास आथेल्लोवर आणलेल्या आरोपाची आठवण होते. त्याच्या श्वशुरांनीं जसें त्याजवर बालंट घेतलें, कीं या दुष्टानें माझी पोर भारून टाकली आणि त्यामुळें ती याच्या नादीं भरली आहे; त्यासारखाच प्रस्तुत भरतपुत्रावर या अरसिक किंवा मत्सरी मंडळीचा हा टोला आहे. यावर समर्पक उत्तर म्हटलें ह्मणजे शेक्सपीयरच्या नायकानें राजदरबारापुढें जें दिलें, तेंच होय. आमचें तर या प्रकरणीं असें ठरीव मत आहे, कीं उत्तम नाट्य ही मनोरंजनाच्या उत्तम पद्धतींपैकींच एक होय; ती अत्यंत निर्दोष असून तीस इतर कलांप्रमाणें लोकाश्रय अवश्य पाहिजे. निदान इतकेंतरी खरें कीं, ज्याप्रमाणें उत्तम पेढेबर्फी तयार करून, ती बाजारांत विकण्याचा हलवायास हक्क आहे, व असल्या हलवायाच्या दुकानीं गिऱ्हाईकांची दाटी झाली असतां, त्यानें

लोकांस टोपी घातली, असें होत नाहीं; त्याप्रमाणेंच, ज्याच्या अंगीं गाण्याचें किंवा अभिनयाचें कसब आहे, त्यानेंही आपल्या गुणावर द्रव्यप्राप्ति करून घेतली, तर त्यांत त्यानें कांहीं गैर केलें,असें आम्हास वाटत नाहीं. जर आमच्या शहाण्या,सद्धर्मी व दयाळू सरकारानें बाटलीबाईचा पुरस्कार करून, तिच्या जिवावर आझापासून प्रतिवर्षी लाखों रुपये काढण्याचा सपाटा चालवला आहे, किंबहुना वेशवाटाचेंही आधिपत्य आपणाकडे घेऊन,अखंड सुवासिनींस त्यांच्या सौभाग्याबद्दल स्वदस्तूरचें सर्टिफिकिट देऊन, भाधुक जनांच्या प्रीत्यर्थ, ' राजा प्रकृतिरंजनात् ' या महाकविवचनास सार्थकता आणण्याचें पतकरलें आहे; तर बिचारे डोंगरे किंवा किर्लोसकर यांनीं तरी यांत येवढें कोणते महापातक केलें बरें ? संगीतवाल्यांच्या पदरीं व्यर्थ पैसा पडतो ह्मणून जी लोकहितेच्छु मंडळी मनापासून हळहळते, तिनें, कलालांच्या दुकानीं जाणारा पैसा, अगर इंग्रजी व्यांडबाज्याची जी नवी फासन ऐन बाज्याच्या वेळीं चालू केली आहे, तिच्याकडे वेंचणारा पैसा, अथवा विलायती बूटवाले, विलायती चहाकाफीवाले वगैरे मंडळीस जो आह्मी आश्रय देत आहों, तो पैसा,-असे हजारों प्रवाह बंद करण्याचे जर प्रयत्न केले, तर फार बरें होईल,—असें आम्हास वाटतें. त्यांतून असेंही समजा, कीं नाटकशत्रूंच्या ओरडण्यानें संगीतें वगैरे चाटसारीं बंद झालीं,तर लोकांच्या खिशांत राहिलेला पैसा एकाद्या सत्कार्यालाच लागला, असें घडेल काय ? अर्थसंचयाच्या दृष्टीनें जरी पाहिलें, तरी संगीताची अभिवृद्धिच आम्ही इच्छितों. लोकांच्या कानींकपाळीं कोरड्या आरोळ्या आजपर्यंत काय थोड्यांनीं मारल्या ? पण त्यांपासून काय निष्पन्न झालें आहे ? शेकडों सभा व मंडळ्या निघतात, आणि तेरड्याचा रंग तीन दिवस या म्हणीला पुष्टीकरण आणतात! आह्मी उद्योग आरंभतों आकाशाला कवळायाचा, आणि खजिन्यांत पुरवठा पहावा तो जितक्यास तितका ! जेथें तेथें दामाजीपंतावांचून गति नाहीं. मग अशा स्थितींत लोकांचें मनोरंजन व हित करून, अर्थ जोडण्याचा जर कोणी एकादा उपाय काढला, तर

त्यांत काय गैर आहे? पुण्यग्रामस्थ संगीतवाल्यांनीं यापूर्वींच एक-दोन लौकिक कृत्यांस द्रव्यद्वारा मदत केल्याचें ऐकतों; तर हाच क्रम त्यांनीं पुढेंही चालवून, आपलें व आपल्या आश्रयदात्यांचें कल्याण करून घेण्याच्या कामांत बिलकुल कसर करूं नये, अशी त्यांस आमची सूचना आहे.

[ केसरी, ता० २० डिसेंबर १८८१ ]

नाटकांवर कांहीं मंडळीचा असा आणखी एक मोठा आरोप आहे, कीं त्यांच्यापासून लोकांची नीति बिघडते. आतां, या आरोपांत कितपत तथ्य आहे, याचा विचार करूं.

वस्तुतः पाहिलें असतां, वरील आरोप एका अर्थीं खरा आहे, व दुसरे अर्थीं खोटा आहे. दुसऱ्या चार्लस राजाच्या कारकीर्दींत ड्रायडन वगैरे जे बीभत्स नाटककार इंग्लडांत होऊन गेले, त्यांच्या कृति व त्यांच्या कृतींचे प्रयोग, हे दुराचारांस कितपत उत्तेजन देण्यास कारण झाले, याची कल्पना, त्या काळाचा इंग्लंडाचा इतिहास पाहिला असतां, कोणलाही सहज होणार आहे. हें खरेंच आहे, कीं जो मनुष्य नाचतमाशांच्या नादीं लागला, त्याची नीति धड कशी असेल? व ती चांगली नसेल तर कितपत सुधारणार हें उघड दिसत आहे. मनुष्याचा नैसर्गिक धर्म म्हटला म्हणजे अनुकरण करणे हा होय. मग जें आचरण त्यास प्रयोगद्वारा रंगभूमीवर मोठ्या थाटमाटानें दाखविलें जातें, त्याचाच त्याच्या मनावर खोल ठसा उमटल्यास नवल कसलें? त्यांतून, लहान वयांत मन फार कोवळें असतें, त्यामुळें त्यावर जो संस्कार प्रथमतां होतो, तोच मग दृढतर होऊन, बहुधा चिरकाळ राहतो. यास्तव जपण्याची मोठी वेळ ह्मटली ह्मणजे पूर्ववय होय. त्या वेळेस बुद्धीला जें वळण मिळेल, तेंच पुढें बळावत जाऊन, कायम राहील. तेव्हां, या रीतीनें विचार करतां, हें स्पष्ट आहे कीं बीभत्स नाटकें व त्यांचे प्रयोग, हे दोन्ही प्रकार, सर्वांस व विशेषतः अल्पवस्कांस, सर्वथा वर्ज्य होत. यास्तव ते जेवढे टाळवतील, तेवढे टाळण्याविषयीं

अवश्य प्रयत्न केला पाहिजे. या अर्थानें पाहतां, नाटकांवर येणारा वरील आरोप यथार्थ होय असें म्हणावें लागतें.

पण सर्वच नाटकें वर वर्णिलीं तशीं असतात, असें कोण नाटकशत्रु प्रतिपादन करूं शकेल ? संस्कृतांतलीं दहापांच नाटकें अद्याप तगून राहिलेलीं आहेत; त्यांपैकीं एकही वरील दोषास पात्र होईल असें आम्हास वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच अलीकडचे नाटकवाले पुराणांतील ज्या कथांचे प्रयोग करून दाखवितात,त्यांतही वरील दूषणास कितीसें स्थळ मिळेल, कोण जाणे ? आतां महाराष्ट्रदेशीय रंगभूवीवर आलीकडे पाश्चात्यांचे महानाट्याचार्यही चमकूं लागले आहेत; मग त्यांचे प्रयोग पाहिल्यानें लोकांची दुराचाराकडे प्रवृत्ति होते,हा आरोप त्यांच्यावर करावयाचा असल्यास नकळे! पण असें ह्मणणें केवढें धाडसाचें होय, हें तज्ज्ञांस सांगावयास नकोच. मग एतद्देशीय नाटकांविषयींच एवढी कोल्हेकुई काय ह्मणून? आतां हें खरें आहे कीं, नाटकवाल्यांची जी स्थिति हल्लीं आमच्या देशांत आढळते, ती प्रतिष्ठितपणाची नाहीं. जो जातीनें उनाड, तोच बहुधा नाटकांत शिरून, स्त्री, देव व राक्षस या पुत्र्यांतून पार जातां जातां, अगदीं कुचकामाचा होऊन, बाहेर पडतो. त्याप्रमाणेंच प्रयोगप्रेक्षणार्थ जी मंडळी जमते, तीही ह्मणजे रसिकतेनें प्रेरित होत्साती येते, असाही सामान्यतः प्रकार थोडाच. ज्यास कोठेंतरी रात्र करमावयाची असते, ज्यास काम ना धंदा, अशांनींच तंबाखूच्या फक्या मारीत व हसत खिदळत थेटरांत प्रवेश करावा. एक बूच उडाला कीं दुसरा उडवावा, किंवा ऑपरा ग्लास डोळ्यांस लावून निर्लज्जपणाचा प्रकार करावा,— हीच पुष्कळ अंशीं स्थिति ! हें सर्व जरी खरें असले, तरी त्यावरून, नाटकप्रयोग करण्याची प्रवृत्तिच मुळीं वाईट असें ठरतें काय ? कांकीं वरील तर्कशास्त्र एकदा लढूं लागलें ह्मणजे मोठा अनर्थ होणार आहे. पहा कीं, आमच्यांतील तालीमबाज मंडळी ह्मटली ह्मणजे अक्षरशून्य व दांडगेश्वर अशी आढळते; यावरून कोणी प्रतिगदाधर अशी कोटी करूं लागला कीं, तालीम करणें हें निंद्य होय, तर चालेल काय ? त्याप्रमा-

णेंच इंग्रजी शिकल्याचे परिणामही आजपर्यंत मद्यप्रीत्यादि अनेक प्रकारांनीं प्रगट झाले आहेत; यावरूनही वरील कार्यकारणभाव कोणी जुळवला, तर तें यथान्याय होईल काय ? आतां, वरील जन्य-जनकभाव आजमितीलाही पुष्कळांच्या मनांत वागत असून, तालीमबाजी ह्मणजे दांडगाईपेक्षां प्रतिष्ठितपणाची लुंगेशाही असें मानणारी, व इंग्रजी छचोरीपेक्षां अज्ञानावस्थेंतला साळसूदपणा पतकरणारी, मंडळी आमच्या देशांत थोडी निघेल असें नाहीं. पण हा सारा स्थूल अनुमानाचा व अतात्विक दृष्टीचा प्रकार होय ! जोडी पेलण्यांत व दांडगेपणांत कांहीं नित्यसंबंध आहे काय ? ए, बी, सी प्रभृति पाश्चात्त्य मातृका आणि बाटलाबाई, या परस्पर बहिणीबहिणी लागतात काय ? मग हीच तत्व दृष्टि रंगभूमीकडे फेंकली असतां, कोणाच्याही सहज लक्षांत येईल कीं, भरताचार्यप्रणीत नाट्य कलेचा आणि नीतिमत्तेचा उभा दावा आहे, अशांतला कांहीं प्रकार नाहीं. नाट्य व अनीति यांचें क्वचित् साहचर्य आढळलें, तरी तें केवळ आगंतुक होय. अग्नि व उष्णता यांचें जसें स्वभावसिद्ध सामानाधिकरण्य आहे, तसा कांहीं हा प्रकार नाहीं. जेथें सामानाधिकरण्य केवळ आगंतुक आहे, तेथें वैयाधिकरण्यही शक्य आहे, हें सांगावयाला नकोच.

तर, वरील सर्व गोष्टी मनांत आणल्या असतां, हें उघड दिसणारें आहे, कीं आलीकडे विद्वान मंडळीचें नाट्यकलेकडे अधिकाधिक लक्ष लागत चाललें आहे, ही गोष्ट शोचनीय नसून, सर्व प्रकारें अभिनंदनीयच होय. पूर्वोक्त वैयाधिकरण्य होण्यास, ह्मणजे रंगभूमि आणि अज्ञान व अनीति यांची सांगड जी लोकांच्या मनांत पडली आहे, तिची ताडातोड होण्यास, विद्वान लोकांचा जवनिकेंत प्रवेश होणें हेंच एक साधन होय. नाट्यकर्म हें लोकशिक्षणाचें केवढें साधन आहे, हें आमच्या लोकांस अद्याप कळूं लागलें नाहीं. जशा शाळा, वर्तमानपत्रें, सभा वगैरे एकेक जबर तरफा लोकशिक्षणार्थ उपयोगी आहेत, त्याप्रमाणेंच देशोन्नतीचें एक प्रचंड साधन वरील कला ही होय. आथेन्स शहरांत नाटककारांचें इतकें प्राबल्य असे, कीं मोठ-

मोठे सरदारही त्यांस नमून असत. प्रत्यक्ष साक्रेटीस याजवरही ग्रीक नाटककार आरिस्टाफेनिज, यानें प्रहसन रचून, त्याच्या देशबांधवांची त्याजविषयींची पूज्यबुद्धि नष्ट करण्याचा यत्न केला; व त्या यत्नास कालांतरानें काय फळ आलें, हें इतिहासज्ञांस विदित आहेच. नाटककाराच्या दुष्ट प्रभावाचें हें उदाहरण झालें; पण तेंच उलट पक्षींही लागू आहे. समजा कीं, हल्लीं जारीनें चालू असणारें जें कोल्हापूरप्रकरण, त्याचा कोणी चतुर कवीनें रंगभूमीवर प्रयोग करविला, किंवा परवां लाखों माणसांची आहुति टेंपल साहेबांनीं दामाजीशाही लढवून करून टाकली, तिचें प्रदर्शन प्रयोगद्वारा जर लोकांस कोणी करविलें, तर केवढें काम होणारें आहे बरें! फार तर काय?—पण वक्त्यासही नाट्याची आवश्यकता फार आहे, हें जगांतील दोनतीन अप्रतिम वक्त्यांच्या उदाहरणांवरून ढळढळीत दिसतें. एवढा प्रचंड डिमॉस्थेनीस, पण त्यास कोणी एकानें एके समयीं विचारलें कीं, 'महाराज! वक्त्याच्या अंगीं कोणता गुण प्रथमतः वसत असला पाहिजे?" वरील महावक्त्यानें उत्तर दिलें, "नाट्य!" "बरें दुसरा कोणता?"—"नाट्य!" "बरें तिसरा?" "नाट्य!" इंग्लंडांतला प्रतिडिमास्थेनीस् जो पिट्ट ऊर्फ व्यायाम, याच्याही भाषणांत बाह्य आविर्भाव किती असे, हें मेकालेनें सांगितलेंच आहे. तिसरी स्वारी शेरीड्यान. हेतर बोलून चालून नाटक्येच होते; वडीलापासून त्यांचा तोच क्रम चालत आलेला. तेव्हां, वारन हेस्टिंग्स् यास रामोशासारखा सभेपुढें उभा करून बर्क, आणि फाक्स यांनीं आपापला ताशेरा त्याच्यावर झाडल्यावर आणि ते मोकळे झाल्यावर, पुढें पाळी आली या ऐर्लंडवासी वक्त्याची; तेव्हां त्यानें भरतखंडाच्या माजी अधिपतीवर असा कांहीं तडाखा उडवून दिला, कीं विजापुरची, जणोंकाय, मुलुखमैदान तोफच! सारे सभाजन केवळ तटस्थ होऊन गेले. सर्व श्रोतृसमाज कावरा बावरा होऊन गेला. कोणास कांहीं सुचेना. यामुळें शेवटीं पार्लमेन्ट सभा तावडतोब बंद करावी लागली! यांत मुख्य गोष्ट ही कीं, बोलण्याचा भडिमार चालला असतां,

शेरीड्यान यानें असा अप्रतिम आविर्भाव आणला कीं, ऐन गर्दींत तो मूर्च्छित होऊन वर्कच्या अंगावर पडला; व बर्क यानें त्यास सांवरून धरिलें ! या सर्व देखाव्याचें, व विशेषतः या शेवटल्या नाट्याचें, मेकालेनें फार मनोवेधक वर्णन केले आहे, तें आमच्या वाचकांनीं एकवेळ वाचून पहावें, इतकेंच आह्मी म्हणतों. तें वाचलें ह्मणजे नाट्याभिनयाच्या ठिकाणीं केवढा अद्भुत प्रभाव आहे, याविषयीं त्यांची पुरती खात्री होईल असें आम्हास वाटतें.

[ केसरी, तारीख २७ डिसेंबर सन १८८१. ]

येथपर्यंत प्रस्तुत विषयाच्या संबंधानें बराच ऊहापोह झाला. आतां, चांगलीं नाटकें वाचल्यापासून व त्यांचे प्रयोग पाहिल्यापासून काय काय फायदे आहेत, ते सांगून, हें प्रकरण आटपतों.

नाटक हें मानवी संसाराचें चित्र होय; ह्मणजे जसा चित्रकार हा मनुष्याचा चेहरा, वनप्रदेश वगैरे आपल्या कलमानें कागदावर किंवा कपड्यावर उतरून देतो, त्याप्रमाणेंच नाटककार हा मनुष्यावर येणाऱ्या नानाविध प्रसंगांचे व तज्जन्य विविध मनोवृत्तींचें यथावत् वर्णन करतो. यास्तव उत्तम नाटकांचें वाचन किंवा प्रेक्षण हें उत्कृष्ट तसबीर पाहण्याप्रमाणेच अत्यंत आनंददायक होय. आतां, तसबिरींतही चांगला वाईट हा प्रकार जसा आहे, त्याप्रमाणेंच नाटकांतही तो आहेच आहे. पण कोणी चित्रकारानें बीभत्स तसबीर काढली, ह्मणून सारी चित्रकलाच जशी निंद्य होत नाहीं, त्याप्रमाणेच नाटकांतही कांहीं कवींनीं दुराचार घुसडून दिला, ह्मणून, मुळीं नाटक वाचणें किंवा पाहणे हें निषिद्ध आहे, असें मानणें बरोबर होणार नाहीं. यीं जगांत बहुतेक वस्तूंची अशीच स्थिति आहे, कीं सर्वथा निर्दोष असें कांहीं आढळणार नाहीं. गुण व दोष हे प्रायः सर्वत्र भिन्न भिन्न प्रमाणांनीं मिश्रितच आढळतात. यास्तव शेक्सपीयरचीं वगैरे नाटकें वाचतांना, ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेवली पाहिजे. वरील महाकवीनें स्वतःच्या अभिरुचीनें ह्मणा अगर तत्कालीन लोकांच्या दांडग्या

रुचीस अनुसरून ह्मणा, आपल्या नाटकांतून जागोजाग पुष्कळच पाचकळपणा आणलेला आहे. उदाहरणार्थ ऑथेल्लो नाटकांतला पहिलाच प्रवेश पहा ह्मणजे खात्री होईल. पण या बीभत्सत्वानें परावृत्त न होतां, वाचकानें आपला मार्ग पुढे क्रमला पाहिजे; कां कीं असे तो न करील, तर गुलाबाचे कांटे हाताला लागल्यानेच फुलाचा वास घेण्यापासून पराङ्मुख होणाऱ्या मनुष्यप्रमाणेच त्यास सदर कवीच्या कृतीपासून होणाऱ्या आनंदास मुकावें लागेल! पण नीरक्षीरविवेचनरूप हंसव्रत जर तो पतकरील, त्यास कोणत्याही नाटकांत बराच ग्राह्य अंश सांपडेल यांत संशय नाहीं. त्यांतून, आमच्या शाकुंतलादि नाटकांचीतर वरच्या प्रकारें कांहींच तरफदारी करायाला नको. आमच्या महाकवींच्या, शाकुंतल, उत्तररामचरित, वेणीसंहार इत्यादि कृति पाहून, कोणी बिघडेल ही गोष्टच कशाला? वाचणारा किंवा पाहणारा निवळ धोंडा जर नसेल, तर वरील वाग्विलास त्यास खचीत मोहून टाकतील; व त्याची मनोवृत्तिही प्रसन्नतर झालेली त्यास आढळेल. भवभूतीनें आपल्या उत्तररामचरित नाटकांत म्हटलें आहे—

अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम्।

"प्रत्यक्ष पाषाणही रडूं लागेल व वज्राचेंही हृदय उकलेल!"—हाच प्रभाव, आमच्या कविगुरूच्या अप्रतिम बुद्धिमत्तेचें फळ, जें शाकुंतल नाटक, त्याचा आहे. येवढे मठ्ठ व तत्वज्ञानाभ्यासजड थोरले मिल्ल,पण त्यांसही चवथ्या अंकांत हुंदका आवरेना, असें त्यांच्या इतिहासवाणीवरून स्पष्ट दिसतें. इतर पाश्चात्य पंडितजनांविषयींतर विचारूंच नका. कलकत्ता येथील सुप्रीम कोर्टाचा जज्ज,महाविद्वान सर विल्यम् जोन्स, यानें इ० स० १७८९ सालीं स्वतः संस्कृत शिकून,शाकुंतलाचें इंग्रेजींत भाषांतर केलें मात्र,तों त्या नाटकानें साऱ्या युरोपांतले महापंडित हालवून सोडले! फ्रान्स,जर्मनी वगैरे देशांतील रसिकवर्यांची दृष्टि आमच्या कविकुलगुरूच्या नायिकेनें दिपवून टाकली. आज टेम्स, ऱ्हाइन, मिसिसिपी वगैरे नद्यांच्या तीरीं वेदघोष चालू आहे, व साऱ्या जगभर संस्कृत विद्येची महती झाली आहे, त्या सर्वांस कारण झटलें

तर शाकुंतलाचें पूर्वोक्त भाषांतर! तात्पर्य म्लेंछांच्या मुलखांतून ज्या सरस्वतीचा येवढा प्रभाव गाजला, तिचा मूळजन्मभूमीचे ठिकाणीं मात्र ठणठणाट व्हावा, हें, शकुंतलापुत्राचें अभिधान धारण करणाऱ्या या देशास मोठें भूषणावह होणार आहे, असें आह्मास वाटत नाहीं!!

तर एतद्देशीय नाटकांच्या वाचनाचें किंवा प्रेक्षणाचें येवढें भय बाळगण्याची मुळींच जरूर नाहीं. त्यांपासून निदानपक्षीं मनोरंजन तरी होईल; आणि ज्याच्या त्याच्या रसिकतेच्या व ग्राहक शक्तीच्या मानानें त्याच्या हृदयवृत्ति उत्तम दशेला येऊन, दृढतर होतील. तेव्हां हा फायदा काय, लहान आहे? आतां हें खरें आहे, कीं वरील फळ नाट्यकला जेव्हां उत्कृष्ट अवस्थेस येऊन पोंचेल तेव्हां विशेष होणार आहे. पण कोणतीही कला अशा स्थितीस येऊन पोंचण्यास किती प्रयत्न सारखे चालू असावे लागतात व किती काळ जावा लागत असतो, हें कोणालाही सांगायाला पाहिजे आहे असें नाहीं. सध्यां आमच्या देशांत वरील कला केवळ बाल्यावस्थेंत आहे; तीस परिपक्वता यावयाची म्हटली म्हणजे दीर्घकाळाची व विद्वत्परिश्रमाची आवश्यकता आहे, हें उघडच आहे. तर, या रीतीनें विचार करतां, विद्याविशिष्ट मंडळीचें इकडे अधिकाधिक लक्ष लागण्याचीं जीं अर्लि- कडे चिन्हें दिसूं लागलीं आहेत, तीं दुश्चिन्हें नसून, सुचिन्हेंच होत, असा आमचा मुक्रर अभिप्राय आहे. एतद्देशीय लोकांत सदभिरुचीचा प्रसार होण्यास, स्वतःच्या प्राचीन स्थितीचें ज्ञान होण्यास, आणि भाषांची अभिवृद्धि होण्यास, उत्तम नाटकांच्या प्रयोगासारखें प्रबल साधन आह्मास दुसरें दिसत नाहीं. यास्तव 'नाटकशत्रू-'चे जे प्रलाप पत्रींपत्रीं प्रगट होताहेत, ते केवळ अरसिकतेचे उद्गार होत असें समजावें.

प्रस्तुत विषय संपवण्यापूर्वीं प्रसंगोपात्त एक महत्वाची सूचना आमच्या देशबंधूंस केल्याशिवाय राहवत नाहीं. हिजविषयीं यापूर्वीही क्वचित् उल्लेख केलेला आहेच. ती ही कीं, संस्कृत नाटकांपैकीं बहुतेकांचीं भाषांतरें केव्हांच होऊन गेलीं असून, यापूर्वीं छापून प्रसिद्ध

झालीं आहेत. पण आमच्या दुर्दैवानें तीं हल्लीं लुप्तप्रायच झालेलीं आहेत. 'शाकुंतल,' 'विक्रमोर्वशी,' 'मालविकाग्निमित्र,' 'महावीरचरित,' 'उत्तररामचरित,' 'मालतीमाधव,' 'मृच्छकटिक,' 'रत्नावली,' 'नागानंद,' 'प्रसन्नराघव,' हीं सर्व नाटकें एकवार छापून गेलीं आहेत खरीं, पण आतां त्यांपैकीं शोधाअंतींही किती जणांपाशीं कितीक सांपडतील, कोणजाणे? त्यांतून वरील भाषांतरें, कै० कृष्णशास्त्री चिपळूणकर, रा० ब० शंकर पांडुरंग, वे० शा० सं० कृष्णशास्त्री राजवाडे, गणेशशास्त्री लेले व माजी परशुरामपंत गोडबोले अशांसारख्या मंडळीचे परिश्रमांनीं झालेलीं असून, ऐवढा सरस्वतीप्रवाह आजपर्यंत लुप्त होऊन बसला आहे, ही केवढी खेद करण्यासारखी गोष्ट! आमच्यांत आलीकडे हें तत्त्वज्ञान माजून राहिलें आहे, कीं काव्यें, नाटकें वगैरे केवळ मनोरंजनपर ग्रंथांची या देशास तूर्त जरूर नाहीं; तर, जेणेंकरून घटकेत या भरतखंडाची उन्नति होऊन तो प्रतिइंग्लंड बनेल, तो उपाय योजावयाचा. याच धोरणावर आमच्या सुज्ञ व रसिक डायरेक्टर साहेबांनीं 'सायन्स् सेरीज' ह्मणजे भगर्भशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणिधर्मशास्त्र वगैरे कपाटें शोभवणारे ग्रंथ तयार करविले आहेत; व आमच्या नाममात्रावशेष ग्रंथोत्तेजक मंडळीनेंही आपल्या छोटेखानी अमदानींत 'कृषिकर्म,' 'स्वाध्याय,' 'आश्वलायनसूत्र' असले जाडे जाडे ग्रंथ पैदा करून, तीं लोढणीं बिचाऱ्या वर्गणीदारांच्या गळ्यांतून बांधलीं आहेत! इंग्लंडांत **आडिसनू**नें 'स्पेक्टेटरां'तल्यासारखे मनोवेधक निबंध न लिहितां, **मिल्ल**प्रमाणें 'तर्कशास्त्र,' इत्यादि ग्रंथ निर्माण करून लोकांच्या डोक्यावर दिले असते, तर काय मौज होती बरें! सरतेशेवटीं येवढीच विज्ञापना करतों, कीं वरील सूचनेचा आमच्या देशबंधूंनीं यथायोग्य विचार करावा. तो केला असतां, ती अमलांत येण्यास म्हणजे मोठासा प्रयास पडणार आहे, असें नाहीं.

# सिंहावलोकन.

[ केसरी, तारीख ३ जानेवारी सन १८८२ ]

मृगराजाची अशी चाल आहे, कीं पुढें मार्गक्रमण करित असतां, मध्येंच मागें मुरडून पाहावें, व या त्याच्या स्वभावावरूनच विषयाच्या पुनरालोचनालाही वरील नांव पडलेलें आहे. तर, या स्वभावसिद्ध धर्मास अनुसरून, आम्ही गत संवत्सरीं क्रमलेल्या मार्गाकडे वळून व एक वार मागें दृष्टि फेकून, पुढील उड्डानास आरंभ करतों.

गेल्या सालीं आम्ही बावन्न वेळां आमच्या देशबंधूंचें दर्शन घेतलें. इतक्या खेपांच्या भेटींत काय निष्पन्न झालें, व आम्हीं प्रथमतः मनांत योजिलेल्या संकल्पांपैकीं कितीसे एका वर्षांत सिद्धीस गेले, हें प्रस्तुत सिंहावलोकनांत पाहावयाचें. हें पाहतांना अगोदर आमच्या स्थितिविशेषाच्या संबंधानें थोडेसें लिहिलें पाहिजे. प्रस्तुत पत्राच्या प्रसिद्धिपत्रकावरून सर्वांस जाहीर होऊन चुकलेंच आहे, कीं त्याचे प्रकाशक हे सर्व प्रकारें स्वतंत्र आहेत; म्हणजे कोणत्याही प्रकारें सरकाराच्या मिंधेपणानें वागणारी वरील मंडळी नव्हे. वर्तमानपत्र- कर्त्यांच्या संबंधानें पाहतां, या स्वातंत्र्याची केवढी आवश्यकता आहे, हें येथें आज फोड करून सांगावयास पाहिजे असें नाहीं. कोणत्याही गोष्टीचा फाडकन निकाल सांगावयाचा झटलें, म्हणजे तें काम निस्पृह मनुष्यावांचून व्हावयाचें नाहीं; व खरी निस्पृहता व राजसेवा यांचातर हल्लींच्या काळांत बारावा बृहस्पति आलेला आहे. तेव्हां प्रस्तुत पंचाननास गेल्या सालीं वटोदर व करवीर या दोन स्थानीं जी मनसोक्त गर्जना करावयास सांपडली, ती वरील विशेषामुळेंच होय, हें उघड आहे. सदरील प्रकाराचा दुसरा विशेष हा होय, कीं ते विद्यापीठसंस्कारानें विशिष्ट आहेत. हा संस्कार बहुश्रुतपणा अंगी येण्यास किती अवश्यक होय हें सांगायाला नकोच. शिवाय वर्तमानपत्रांची प्रवृत्ति इकडे पाश्चात्यांपासूनच पडली असल्यामुळें, ज्यास या संबंधानें उत्कृष्ट उदाहरण घ्यावयाचें असेल, त्यानें विलायती नमुना

उचलल्याखेरीज चालावयाचेंच नाहीं. यास्तव, हा दुसरा विशेषही प्रस्तुत कार्याचा उत्कर्ष होण्यास सहायभूत झाला आहे, हें उघड आहे.

आतां, वरील दोन्ही विशेषांचा एकत्र समुच्चय झाल्यानें, काय काय कार्यें झालीं पहा. आरंभींच्या अंकांत, आम्ही आमच्या देशबंधूंस वचन दिलें होतें कीं, लोकांच्या वतीनें जितपत लेखणी उचलावयास सांपडेल तितकी उचलण्यास आम्ही कधीं कमी करणार-नाहीं. हें वचन, गुदस्त सालीं बडोदे-प्रकरण, कोल्हापुर-प्रकरण व पुणें म्युनिसिपालिटी यासंबंधानें विवेचन करतांना, आह्मी किती पाळलें हें आमच्या वाचकांच्या पूर्णपणें लक्षांत आलेंच असेल. वरील राजकीय प्रकरणांखेरीज इतर कित्येक विषयांचीही या पत्रांत बरीच चर्चा झाली. ब्राम्हणांतील जातित्रय, बालविवाह, स्वतंत्र व्यापार व उत्तेजन, प्रार्थनासमाज, सभा व मंडळ्या, अनुकरणाचे चांगले वाईट प्रकार इत्यादि अनेक विषयांचें उद्घाटन करून, आमच्या बुद्धीनें त्यांत जो ग्राह्य अंश आम्हास दिसला, तो आम्हीं आपले वाचकांस सादर केला. वरच्यासारखे विषय वरचेवर लोकांपुढें येऊन, त्यांजवर नेहमीं भवतिनभवति होत गेली असतां, केवढा उपयोग आहे, हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. यांतून, विशेष संतोष मानण्यासारखी गोष्ट गेले सालीं ही झाली, कीं वरच्यापैकीं कांहीं विषयांची नुसती चर्चा होऊनच राहिली नाहीं; तर त्यांच्या संबधानें आणखी निराळ्या सभाही भरल्या. या सभांची हकीगत आह्मीं त्या त्या प्रसंगीं जाहिर केलेलीच आहे.

वरील मुख्य भागांखेरीज आणखी वर्तमानपत्रांतले इतर ठरीव भागही, आमच्या इतर व्यवसायबंधूंप्रमाणें, यांत आलेच आहेत. यास्तव त्यांच्या संबंधानें येथें विशेष कांहीं लिहिणें नलगे. आतां सरते शेवटीं, आम्हास आश्रय देणाऱ्या व देऊं इच्छिणाऱ्या मंडळीस थोडीशी विज्ञापना करून, ही सलामी आटपतों.

विज्ञापना म्हणून एवढीच करावयाची, कीं आम्हीं जें काम हातीं घेतलें आहे त्याची योग्यता लक्षांत आणून, त्यास सर्वांनीं होईल तेवढी मदत केली पाहिजे. वर्तमानपत्र ह्मणजे कांहीं लहानसान चीज आहे असें नव्हे. विलायतेंतील पत्रांत अग्रगण्य जें ' लंडन,-टैम्स'त्यास युरोपांतलें साहावें संस्थान असेंच कोणी कोणी म्हणतात; *यावरून याचा प्रभाव केवढा आहे हें लक्षांत येतें. वरच्यासारख्या पत्रांच्या लाख लाख प्रति तिकडे उडून, साऱ्या दुनियेभर फैलावल्या जातात. पार्लमेंटांत एखाद्या वक्त्यानें भाषण केलें, तर तें लागलेंच दोन चार दिवसांत साऱ्या युरोपभर होऊन, महिन्या पंधरा दिवसांत साऱ्या जगभरही होतें. त्याप्रमाणें तिकडे स्वातंत्र्याचें वारें लहानथोरांच्या अंगांत इतकें खेळून राहिलें आहे कीं, मोठे पंतप्रतिनिधि असोत कीं खुद्द मलिकामा अझमा बाईसाहेब असोत, कोणी कोणाचा मुलाजा म्हणून करित नाहीं. ज्यास जें रास्त वाटतें, तें तो बेधडक वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध करतो. फार लांब कशाला ?—एवढे नेक नामदार सर रिचर्ड टेंपल साहेब व एवढे नेटिवांचे शत्रु कलमबहादर बांबेगझीटवाले म्याकमिलन साहेब, पण बिचाऱ्यांचा त्यांच्या देशबंधूंनीं कसा खरपूस समाचार घेतला पहा ! तर, आमच्या लोकांस आमच्या वास्तविक स्थितीचें ज्ञान होऊन, आपलीं कर्तव्यें काय, हें जर त्यांस समजविणें असेल, तर अति स्वस्त वर्तमानपत्रें निघून, जारीनें त्यांचा फैलावा सुरू झाला पाहिजे.असें होईल तरच देशाचें खरें कल्याण होणार आहे. आपली स्थिति सुधारण्यास, मुळीं तिचें यथार्थ ज्ञान अगोदर झालें पाहिजे व ती सुधारण्याचे उपाय कोणते, तेही स्पष्टपणें त्यांच्या लक्षांत आणून दिले पाहिजेत. आलीकडे आमच्या दयाळू सरकारानें खेड्यापाड्यांतूनसुद्धां शाळा घालून, लोकांस लिहितां वाचतां येण्या-

---

* युरोपांतलीं मोठमोठीं संस्थानें ह्मटलीं ह्मणजे इंग्लंड, फ्रान्स, प्रशिया, आस्त्रिया, व रशिया हीं होत. वर सांगितलेल्या वर्तमानपत्रास 'थंडरर' ह्मणजे कडकडणारें असेंही कोणी अभिधान देतात, यावरून, लोकांत त्याचा केवढा वचक व बोज आहे, हें उघड दिसून येतें.

पर्यंत मजल आणून ठेविलेली आहे; अशा वेळीं नुकत्या उघडलेल्या चोंचींतून जर थोडा थोडा चिमणचारा जाऊं लागेल, तर किती उत्तम गोष्ट होईल बरें ! त्यांतून वरील कृपानिधि राज्यकर्त्यांनीं आणखी दोन मोठ्या सोयी आमच्याकरतां करून देण्याचें योजलें आहे. त्यांपैकीं एक ही, कीं पोष्टखात्यांत झालेल्या ताज्या फेरफारामुळें टपाल हशील कमी केलें आहे; व दुसरी ही, कीं स्वातंत्र्यापहारक आक्टाची समाप्ति करण्याचा विचार चालविला आहे. या दोन्ही गोष्टींनीं कोणासही उमेद येण्यासारखी आहे. तर त्यांचें अभिनंदन करून, त्यांपासून आपलें हित करून घेण्याची संधी लोकांनीं दवडूं नये, अशी विनंति करतों, व हें साल आमच्या बांधवांस सुखाचें जावो अशी मनीषा प्रदर्शित करून लेखणीस तूर्त आज रजा देतों.

---

# भोजनगृह.

[ केसरी, तारीख १० माहे ज्यानेवारी १८८२. ]

वरील नांवाचा एक कारखाना आज साहा महिन्यांवर या शहरांत निघालेला आहे, हें आमच्या येथील वाचकांस व बाहेरच्यांसही माहित असेल. आजच्या अंकांत, प्रस्तुत गृहासारख्या लोकोपयोगी कृत्याच्या संबंधानें कांहीं मजकुर लिहिण्यासारखा आहे, तो वाचकांस सादर करितों.

वस्तुतः पाहतां, ही पाश्चात्यांच्या अनेक सुधारणांपैकीं एक होय.हा प्रकार आमच्या देशांत आजपर्यंत कधीं नव्हता. येथील पूर्वपरंपरागत रीत म्हटली म्हणजे अतिथिअभ्यागताचा सत्कार करणें, ही होय. प्रतिदिवशीं, दोन प्रहरीं बलीहरणोत्तर, चतुष्पथावर मुहूर्त मात्र उभें राहून, अतिथीची प्रतीक्षा करावी, आणि कोणी पथिक आल्यास, त्यास घेऊन भोजन करावें, हा गार्हस्थ्याचा धर्म होय. * ही पद्धति अ-

---

* गृहस्थ व आगंतुक या दोन्ही शब्दांचे मूळ अर्थ सध्यांच्या अर्थापेक्षां फार निराळे आहेत. गुरूची आज्ञा घेऊन, संपूर्णविद्य होत्सा·

यापद्दी या देशांत कित्येक प्रांतीं आढळते, व अभ्यागत कितीही आले तरी त्यांस तिकडे पाहुणचार मिळतो, हें प्रसिद्धच आहे. पण आलीकडे लक्ष्मी व अन्नपूर्णा या दोन्ही देवतांनीं या देशास सोडल्यामुळें, वरील प्राचीन पद्धति अर्थातच सामान्यतः लुप्त होत चालली आहे शिवाय अर्थशास्त्रही थोडेंसें इकडे डोकावूं लागलें आहे. त्याबरोबर, आमचे ठायीं ही एक समजूत बिबत चाललेली आढळते कीं, कोणालाही फुकट जेवूं घालणें म्हणजे निवळ आळस वाढविणें होय; यास्तव, मोठा स्नेही जरी चार दिवस घरीं येऊन उतरला, तरी त्याच्या हातांत जातांना बेलाशक बिल हजर करावें; त्यांत संकोच धरण्याचें प्रयोजन नाहीं.

येणें प्रमाणें पूर्वींच्या व आतांच्या काळांत भेद पडला आहे, व या भेदामुळेंच भोजनगृह, प्रस्तुतच्या कालमानाकडे पाहतां,मोठी आवश्यक गोष्ट होऊन बसली आहे.मोठमोठ्या शहरांतून तर असल्या कारखान्यांची अतिशयित आवश्यकता असते. पुणें किंवा मुंबई यासारख्या ठिकाणीं लोकांची रहदारी नेहमी असते.प्रत्यहीं शेंकडो किंबहुना हजारों माणसांस कामधामानिमित्त तेथें यावें लागतें. आतां वरील गृहाच्या अभावीं या फिरस्त्या मंडळीला फार पंचाईत होते. मग त्यांनीं तरी काय करावें ? त्यांस अर्थातच, बहुशः कोणा स्नेही गृहथास अडचणींत घातल्यावांचून गत्यंतर नसतें. यामुळें वारंवार असें होतें कीं घरचें जेवणखाण आटपून जों स्वस्थपणें अंमळ वामकुक्षी घ्यावयाला यजमानानें आरंभ करावा, तों कोणी आप्त किंवा स्नेही अगर बादरायणसंबंधी अचानक दत्त म्हणून उभा राहावा, व त्यानें खुंटीस गोवाळें अडकवावें ! आतां हा प्रसंग उभयपक्षीं किती अवघड आहे बरें!घरच्या यजमानास, एवढा थकून भागून, भुकेलेला, जो पाहुणा द्वाराशीं आला, त्याजवर अर्धचंद्रप्रयोग करण्याची पाळी येणें, हें घरंदाजाला मोठें कठिणच

---

ता जो तरुण दारपरिग्रह ह्मणजे विवाह करतो, तो गृहस्थाश्रमी अथवा गृहस्थ होय; आणि आगंतुक ह्मणजे वर सांगितल्याप्रमाणें अकस्मात आलेला पाहुणा होय.

म्हटलें पाहिजे. बरें, दुसऱ्या पक्षीं पाहतां, अतिथिव्रत चालविण्याची तरी सध्यां केवढी पंचाईत पहा! जो बिचारा पोट भरण्याकरतां, निरुपायास्तव मुंबईची नेभळी हवा पतकरून, इवल्याशा जागेंत, संकोचवृत्तीनें दिवस काढीत असतो व ज्याच्या प्राप्तीची या महिन्याची त्या महिन्याला जेमतेम गांठ पडत आहे, त्याला प्राघूर्णिकाची स्वारी येऊन अलक्ष म्हणून उभी राहिली असतां, केवढा संतोष होत असेल, याची कल्पना सहज करतां येईल. मोठया शुक्रयोगाद्रींचे घरीं उच्छिष्ट पडलें, व स्वर्गीच्या घंटांचा घणघणाट त्याच्या कानीं येऊन पडला, म्हणून नित्याचा नकारघंटेचा रव त्या घणघणाटानें लोपला जाईल काय? इंग्रेजी खराटा, चार हजार कोसांवरून इकडे धावत येऊन, या सुवर्णभूमीवर फिरूं लागण्याच्यापूर्वी येथें अशी स्थिति होती, कीं अन्नाला मोताद असा कोणीच नव्हता. खेरीज अर्थशास्त्रानें उपदेशिलेला जो शास्त्रोक्त भदत्तपणा, त्याचीही ओळख कोणास नव्हती. आमच्या पुणें शहरीं श्रावणमासीं लाख दोन लाख मंडळीचा महापूर लोटे; पण इतक्यांचीही सरबराई येथें घरोघर होत असे कीं नाहीं? पण येथें आतां इंग्रजी सुधारणा प्रतिबिंबित होऊन, इंग्रजी औदार्य सुरू झालें आहे! तें कसें?–तर तोंडानें नाहीं म्हणून सांगावयाचें नाहीं; अन्नार्थी याचकानें बोर्डाकडे नजर फेकावी, आणि त्यावरील वळणदार टोबळीं अक्षरें पाहून समाधान करून घ्यावें. तीं अक्षरें हीं:–एकीकडे ‘ जेवायाला अवकाश आहे ’ व दुसरीकडे ‘ जेवणें झालीं !’

ज्यापक्षीं हल्लींची स्थिति अशी चमत्कारिक झाली आहे, त्यापक्षीं पूर्वीचें वैभव आतां विसरून, कालानुरूप आपण आपलें वर्तन ठेवलें पाहिजे, हें उघड आहे. मागले लक्ष भोजनाचे दिवस गेले; आतां त्यांच्या जागीं लक्षोपवासाचे व लक्षमरणांचे दिवस येऊन ठेपले आहेत. मेघराजानें कृपा केली तर हीं भरतभूमीचीं लेंकरें आणखी एक वर्षभर जगणार,नाहीं तर एकदम शंभर वर्षांची निश्चंती, असें झालें आहे.मागले खुळे राजे कोठें अन्नसत्रें घालीत, कोठें सदावर्तें ठेवीत, असा अशा-

ख्र वर्तणुकीचा प्रकार असे. हल्लींच्या सुधारलेल्या अमदानींत पैशाचा असा अपव्यय कधीं व्हावयाचा आहे कीं काय? अन्नसत्राची व खिचडी-चीतर गोष्टच राहूंद्या; पण तूर्त अशी तऱ्हा आहे कीं भोजनगृह सुरू केलें तर लागली त्याच्या मागें उदीमपटी! सुमारें दहा वर्षांवर आमच्या स्थानिक सरकाराच्या कौंसलांत मेजवान्यांवर कर बसवावा असें घाटत होतें, हें पुष्कळांस आठवत असेलच. हाच बहारीचा कर पुढें केव्हां येईल, याचा काय नेम आहे? तो आला असतां, केवढी मौज होईल बरें! द्वादशीचे बारा ब्राम्हण घालावयाचे, तर एका हातांत जेव्हां पास घ्यावा, तेव्हां दुसऱ्या हातानें उदक सोडावें! तर, असली चोख सुधारणा येथें जारीनें चालू असल्यावर, राजरोस भोजनगृहेंच चालू झालीं पाहिजेत, हें उघड आहे. अशा ठिकाणीं, अर्थातच, यजमानास संकोच नको व पाहु-ण्यासही नको. पाहुण्यानें पाहिजे तेव्हां यावें, पाहिजे तितके दिवस रा-हावें व पाहिजे तितकी मंडळी आणावी; आणि पुन्हां उभयपक्षीं काडीइतकाही संकोच बाळगण्याची जरूरी नाहीं. पैसे टाकिले, कीं मनाजोगती हवी तशी सोय! युरोपीयन लोकांच्या हॉटेलांतून वरील सोई किती उत्तम प्रकारच्या असतात, हें पुष्कळांस ऐकूनतरी ठाऊक असेल. त्यांत कित्येक गृहस्थ, सहकुटुंब सहपरिवारसुद्धां, हवे तितके दिवस, राहूं शकतात. नाहीं तर, आमच्या येथील मौज पहा! पाहुण्यानें खालीं पडशी ठेवावी, तों घरांत तांब्या उपडा पाडावा; मग यजमानानें भाकर थोपटावी व पाहुण्यानें वर चढवावी! याशिवाय इलाजच नाहीं.

असल्या भोजनगृहांच्या योगानें, फिरस्त्या लोकांखेरीज, विद्यार्थ्यां-चीही मोठी सोय होणारी आहे. हल्लींच्या खाणावळींतून तरुण विद्या-र्थ्यांची बरदास्त हवी तशी न राहिल्यानें, त्यांची कुमार्गाकडे प्रवृत्ति होण्यास व छचोरपणा माजण्यास किती कारण होतें, हें सर्व प्रसिद्धच आहे. तर लोकनीतीच्या व विद्यावृद्धीच्या दृष्टीनें पाहतां, वरील विष-याकडे आमच्या देशबंधूंनीं लक्ष पुरविणें फार अगत्याचें आहे, असें आह्मास वाटतें. सदरील कारखाना याच शहरांत प्रथम निघून, तो

हल्लींही बऱ्याच रीतीनें चालला आहे, हें त्याच्या उत्पादकांस भूषणप्रद होय. तर, त्याची अभिवृद्धि करण्याविषयीं आमच्या पुण्यजनवृंदास सूचना करून, इतर ठिकाणींही त्याचा नमुना उचलण्यांत यावा असें इच्छितों.

---

# मुद्रणस्वातंत्र्य.

[ केसरी, ता० १७ जानेवारी सन १८८२ ]

मुद्रण म्हणजे छापणें, आणि स्वातंत्र्य ह्मणजे मोकळीक. तेव्हां, कोणताही मजकूर छापून प्रसिद्ध करण्याची जी मोकळीक सरकार प्रजेस देतें, त्यास आह्मी वरील नांव देतों. या स्वातंत्र्यावर सुमारें चार वर्षांपूर्वी एकाएकीं धाड पडून, मुद्रणयंत्राचें मुखस्तंभन कसें झालें, तें सर्वांस माहित आहेच. त्याप्रमाणेंच सध्यां छापखान्याच्या बांधलेल्या मुसक्या खुल्या करून टाकण्याबद्दल सरकारी कौंसलांत घाटत आहे, तेंही सर्वांस महशूर आहेच. प्रतिबंध कोठेंही असो; तो प्राणिमात्रास अनिष्टच; त्यांतही 'केसरी-'स तर तो किती दुःसह होण्यासारखा आहे, हें सांगण्यासच नको. यास्तव या भावी मुक्तीचें अगोदर अभिनंदन करून, मुद्रणस्वातंत्र्याचा महिमा आमच्या देशबंधूंच्या कर्णांत घुमवून देण्याचा आज आम्ही यत्न करतों.

मुद्रणकला ही मानव जातीच्या कल्याणास किती हेतुभूत झाली आहे, हें सांगण्याची आज फारशी गरज उरली नाहीं. सांप्रत अगदीं गरीबगुरिबांसही मोठमोठे ग्रंथ सुलभ होऊन गेले आहेत व विद्यावृद्धि फार झपाट्यानें होत चालली आहे,—हें सर्व श्रेय वरील अत्यंत उपयुक्त कलेसच विशेष आहे. इंग्लंडासारख्या देशांततर, दिवसा मोलमजुरी करावी व संध्याकाळच्या आरामाच्या वेळीं साऱ्या दुनियेची हालहवाल वर्तमानपत्रद्वारें पाहावी, अथवा मनोरंजनपर आणि बोधपर ग्रंथांनीं श्रमपरिहार करावा, अशी उत्कृष्ट रीतीची सोय वरील साधनाच्या योगानें झाली आहे. येथेंही, अगदीं कुणब्यामाळ्यांपर्यंतसुद्धां विद्येचा अल्पस्वल्प संस्कार जाऊन पोंचण्याची आलीकडे तजवीज झालेली आहे, तर एवढा ज्या अस्त्राचा प्रभाव, त्या मुद्रणा-

स्वयंत्राच्या तोंडावर सरकाराची मुद्रा बसल्यानें, त्याचा उपयोग असून नसून सारखाच होणार आहे. वास्तव, आरबी गोष्टींतील कोळयाच्या हातून प्रचंड राक्षसाच्या बंदिखान्याचें तकट मोकळें होतांच, त्या राक्षसानें आपलें पूर्वरूप धारण करून, तें पितळेचें भांडें लाथेनें झुगारून दिलें, तसें करूनच आपणास थांबतां कामा नये; तर राक्षसाप्रमाणें फसले न जातां, निघालेलें झाकण फिरून भांड्याचे तोंडावर बसणार नाहीं अशीही सक्त तजवीज ठेवली पाहिजे. त्याप्रमाणेंच यमलोकवासी बीकन्स्फील्ड बोवांनीं केसर इहिंदशाहीच्या पहिल्या अमदानीसच ७८ च्या नवव्या आक्टानें जो कालिमा लाविला आहे, तो चंद्राच्या खग्रासमोक्षाप्रमाणें पार निघून जाऊन, श्वेतद्वीपाचें परम भूषण जें स्वातंत्र्य, त्याचें निर्मळ तेज पुन्हां या भरतभूमीवर उदय पावून निरंतर चमकत राहील, अशाविषयीं जपलें पाहिजे. तात्पर्य, हा यहुदी राजश्रीरूप राहु अस्तंगत होऊन, पातालवासी झाला असतां, जी स्वातंत्र्यचंद्रिका आम्हा चकोरांस लाभणार, तिचा पहिल्यापेक्षांही चांगला उपयोग करण्याविषयीं व अधिक उपभोग घेण्याविषयीं सर्वांनीं उमेद धरावी, अशी आह्मी आमच्या देशबंधूंस सूचना करून, मूळ विषयाकडे वळतों.

प्रस्तुत विषयाचें विवेचन करतांना, त्याचा वर्तमानपत्रांशीं जेवढा संबंध आहे तेवढ्याविषयीं अगोदर विचार करून, नंतर सामन्यतः ग्रंथरचनेशीं जो त्याचा संबंध, त्याविषयीं विचार करण्याचा आमचा मानस आहे. तर आता, मुद्रणस्वातंत्र्य असल्यानें, वर्तमानपत्रांच्या द्वारा सरकार व प्रजा या दोघांचेंही कसें हित होण्यासारखें आहे हें दाखवितों.

वर्तमानपत्रांचें स्वरूप काय व त्यांचें कर्तव्य कोणतें, याविषयीं येथें फारसा मजकूर लिहावयास नको. आलीकडे वर्तमानपत्रांचें महत्व लोकांस बरेंच कळूं लागलें आहे. आतां, विलायतेंत तीं जशीं जड पारडीं होऊन बसलीं आहेत, तसा त्यांचा प्रभाव येथें अद्याप कांहींच दृष्टीस पडत नाहीं, हें जरी खरें आहे, तरी निदान परवांच्या कोल्हापुर प्रकरणावरून, सरकारास येथील कोल्हेकुई ऐकिली न ऐकिलीशी

करूनच केवळ बसतां येत नाहीं, हें सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलेंच आहे. यावरून पाहतां, वर्तमानपत्रें हीं लोकांची वकिली करण्याचें मोठें साधन होय हें उघड आहे. वेदांत अग्नीचें जसें देवमुखत्व वर्णिलेलें आहे, म्हणजे देवांस हविर्भाग अर्पण करावयाचा असतां, तो अग्नीच्या द्वारा करावा लागतो, त्याप्रमाणें लोकांचा अभिप्राय सरकारी अधिकाऱ्यांच्या कानांवर जाऊन आदळण्याचें जबरदस्त साधन म्हटलें ह्मणजे वर्तमानपत्र हें होय. यास्तव, अशा साधनाचा निष्प्रतिबंधतेनें उपयोग होत जाणें किती महत्वाचें होय, हें सांगणें नलगे.

सरकार म्हटलें म्हणजे, वस्तुतः पाहतां, लोकांच्या सुखाकरतां होय. प्रजेस कोणीच नियंता नसेल, तर हवें त्यानें हवें तें करावें असें होईल, व अरण्यांत किंवा जलाशयांत जसा प्रकार आढळतो, कीं जो मोठा प्रबळ असेल त्यानें लहानास उपद्रव द्यावा व खावें, तसा प्रकार होऊन, सर्वत्र झोटींग बादशाही सुरू होईल. ह्मणून चार लोकांनीं एकत्र समजून, आपसांतील व्यवहार सुरळीत चालण्यासाठीं कायदे केले, व ते त्यांनीं आपणाला लावून घेतले. हे जे कायदे तेंच सरकार होय. मग या कायद्याअन्वयें जे अधिकारी नेमले जातात, त्यांनीं आपल्या ताब्यांतील एकंदर राष्ट्राची हालहवाल नेहमीं एकून घेतली पाहिजे, व कोणात्याही तऱ्हेची पीडा कोणास विनाकारण होणार नाहीं, याबद्दल सतत तजवीज ठेविली पाहिजे, हें त्यांस योग्य नाहीं काय ? आपण करतों तेंच ठीक आहे व तसेंच प्रजेसही वाटलें पाहिजे, असा सरकारी अधिकाऱ्यांनीं आग्रह धरणें म्हणजे किती अप्रयोजकपणा आहे बरें ! अशा आग्रहाचा परिणाम एखादे वेळीं एवढाच होतो, कीं लोकांचे मनोव्यापार राजकर्त्यांस कळत नाहींत व तेणें करून सन १८५७ सालीं जसा एकदम गहजब झाला तसा होतो; व एकदम पाण्याचा बंधारा फुटला असतां, मग तें जसें आवरेनासें होतें, तशीच प्रजाही आवरेनाशी होते. पण असा आकांत अगोदर होऊं द्यावा, आणि मग धावाधाव करीत बसावें, त्यापेक्षां वरील जलौघाप्रमाणेंच जनौघालाहि एका बाजूनें खुली वाट करून द्यावी, हा शहाणपणा नव्हे काय ? यासाठींच, वर्त-

मानपत्रांस पाहिजे तो मजकुर बिनधिकत प्रसिद्ध करण्याची परवानगी जे चतुर राजकर्ते देत असतात, ते वेडे नव्हत. पण बीकन्सफिल्ड यांच्यासारखी लटपट ज्याला नेहमीं करावयाची असेल व स्ट्राची साहेबासारखी कोट्यवधि रुपयांची चूक दबवून ठेवायाची असेल, त्यांना हें स्वातंत्र्य अनिष्ट वाटतें यांत नवल कसचें? संस्कृतांत एक ह्मण आहे, कीं "चोराणां चंद्रमा रिपु:" चंद्राचें चांदणें नको कोणाला?--तर चोराला! अशांतलाच हा प्रकार आहे. तरी डिझ्रायली साहेबापासून तों बडोद्याच्या 'सरटी-'पर्यंत सर्व कारस्थानी मंडळीचा मुद्रणव्यापारावर जो एवढा मोठा कटाक्ष आहे, तो खऱ्या राजनीतीस कितपत अनुसरून आहे, हें सांगायाला नकोच!

वास्तव, सरकार जर आपणास सुज्ञ व न्यायी म्हणवीत असेल, तर अगोदर त्यानें वर्तमानपत्रांस पूर्ण स्वातंत्र्य देऊन,त्यांचे तडाखे खाण्यास नेहमीं सिद्ध असलें पाहिजे. कांकीं खऱ्या कारकुनानें जमाखर्चाची चोपडी लपवून न ठेवितां,भर चवाठयावर हिशोब देण्यास नेहमी सिद्ध असलें पाहिजे; हीच राजकर्त्यांचीही गोष्ट होय. प्रजेपासून कर घेऊन, सर्व प्रकारें तिचें पालन करण्याचा पतकर जर राजानें आपणाकडे घेतला आहे,तर अर्थात आपल्या सर्व कामकाजाचा झाडा त्यानें आपल्या यजमानांस दिला पाहिजे;व यजमानांसही वरील झडती घेण्याचा पूर्ण अखत्यार आहे, हें उघड आहे. त्यांतून ज्यांनीं भर राजदरबारीं अशी प्रतिज्ञा भोगिली, कीं आह्मी तुह्मावर अमल करतों तो तुमच्या कल्याणाकरतां, व तुम्ही करतेसवरते झालां, कीं आमचें येथलें काम आटपलें, मग आह्मी गाशा गुंडाळून निघालोंच समजा--त्यांनींतर या निःसीम भलेपणाच्या सोंगाची बतावणी किती चोख केली पाहिजे, हें सांगायाला नकोच. असो; तर या रीतीनें पाहतां, गेल्या चार वर्षांत आमच्या सरकारानें छापखान्यावर जो दपटशा बसविला होता, तो अन्ययाचा होता, व तो काढून टाकण्याविषयीं सध्यां चाललेला विचार फार शहाणपणाचा असून, त्यापासून सरकाराचें व प्रजेचें, असें उभय पक्षीं कल्याणच होणारें आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

[ केसरी, ता० २४ जानेवारी १८८२ ]

मागील खेपेस प्रस्तुत विषयाचा उपोद्घात करून, सरकार व प्रजा यांचा परस्परसंबंध कोणत्या प्रकारचा आहे, व तो तसा असल्यामुळें राज्यांत पूर्ण मुद्रणस्वातंत्र्य असणें किती आवश्यकतेचें आहे, हें आम्हीं आपल्या वाचकांस दाखविलें. या अंकांत, मुद्रणस्वातंत्र्याचा विचार कोणत्या तऱ्हेनें झाला पाहिजे, व वर्तमानपत्रांनीं आपलें काम चोख रीतीनें बजाविलें असतां, एकंदर देशाचा केवढा फायदा होण्यासारखा आहे, हें दर्शवितों.

मेंढरांच्या कळपाच्या भोंवताली जसा कुत्र्यांचा पाहरा असतो, कीं लांडग्यांची वगैरे कोठें चाहूल झाली, कीं त्यांनीं मोठ्यानें भुंकून सर्वांस इशारा करावा, व त्यांवर धावून एकदम तुटून पडावें, त्याप्रमाणेंच वर्तमानपत्रें हींतरी, राष्ट्रांच्या हितावर पाहरा ठेवून, लोकांचें रक्षण करणारींच होत. त्यांतून वरील मेषसमुदायाची उपमा आमच्या राष्ट्रास सध्यां किती समर्पक आहे, हें कोणालाही सांगावयास नकोच. इंग्रज लोकांस आपल्या स्वतांच्या राजाचा जुलूम सोसेनासा होतांच, त्यांनीं त्याच्याशीं उघड लढाईला उभें राहून, त्याचें शासन केलें; तोच कित्ता पुढें फ्रेंच लोकांनीं व इतर राष्ट्रांनींही उचलून, आपला ईश्वरदत्त अधिकार खरावून घेतला. एवढा बलाढ्य झार, रशियाचा बादशाहा, पण त्यासही आपल्या लोकांचा धाक! आतां, आमच्या इकडे काय मौज आहे, पहा! आमचे राजेरजवाडेतर केव्हांच कोणीकडे लोपले, त्यांचा ठिकाण नाहीं. आणि पोरक्या पोरांप्रमाणें आम्ही आज साऱ्या जगांत उघडे पडलों! पंचतंत्रांतल्या गोष्टीप्रमाणें "नाभूज्जारो न भर्ता च!"अशी आमची स्थिति आजला आहे.आमचे मूळचे धनी गेले, व त्यांच्याच बरोबर, चार दिवस येथें सत्ता बळकावून बसलले इमामभाई पण गेले. आणि आमच्या वांट्यास राहिले कोण?—तर साता समुद्रापलीकडील श्वेतद्वीपस्थ मंडळी! "उंटावरून शेळ्या हाकावयाच्या', ह्मणतात त्या अशा! या मंडळीनें चार हजार कोसांवरून येथील व्यवस्था करावयाची! बरें, तिकडे लक्षतरी कितीसें पुरवायाचें म्हणाल?—

तर हिंदुस्थानाचा मजकुर निघाला कीं, उठली मंडळी चहाकाफी घ्यावयाला ! इकडे एखादें मोठें बंड उसळून, बायकापोरांची जेव्हां कत्तल उडावी, तेव्हां आमचे हे पाश्चात्यबंधु झोपेंतून जरासे जागे व्हावयाचे ! तसेंच, लक्षावधि लोक यमसदनास जाऊन पोंचल्यानंतर, मागाहून कृतांतपुरींतली तार लंडनपुरीस जाऊन पोंचावयाची ! ही सर्व स्थिति केवढी भयंकर आहे, याची कल्पनाही करणें मोठें कठीण आहे ! सारांश, अशी जर एकंदर स्थिति आहे, तर एतद्देशीय वर्तमानपत्रांवर या स्थितीच्या मानानें जबरदस्त जोखीम येऊन पडलें आहे, हें विसरतां कमा नये.

यास्तव, वर्तमानपत्रकर्त्यांनीं राजाच्या व मंत्रिमंडळाच्या वागणुकीपासून तों अगदीं क्षुल्लक अधिकाऱ्यांच्या वर्तनापर्यंतसुद्धां फार बारकाईनें नजर पुरविली पाहिजे. सत्ता म्हटली ह्मणजे मोठी वाईट चीज आहे; तिचा यथार्थ रीत्या विनियोग करणारा दहांत एकादा, किंबहुना शंभरांतही एकादा सांपडला, तर भाग्य मोजायाचें ! पैसा मिळवण्याचें साधन, विषयवासना तृप्त करण्याचें साधन, वगैरे अनेक साधनें या सत्तेच्या अधीन; मग ती सत्ता प्राप्त झाली असतां, या मोहांपासून दूर राहणारा धन्य मनुष्य कोण सांपडेल ? तेव्हां, अधिकाराच्या जोरावर अनन्वित कृत्यें केल्याचे जे बोभाटे वरचेवर चोहोंकडे एकूं येतात, त्यांत नवल काय ? त्यांतून आमच्या देशांततर लोकनीति इतकी सुटलेली आढळते कीं, कोणाची मूठ दाबण्याचा प्रसंग आला आणि तो वायां गेला, असें प्रायः घडायाचेंच नाहीं. होईल तिकक्या रीतीनें अर्थसाधन करावें, हाच कायतो जीवितसाफल्याचा मार्ग अलीकडे निघाला आहे. मागें साध्याभोळ्या पापभीरू लोकांत जो कांहीं मनाचा धाक असे, तो अलीकडे नाहींसा झाला आहे; किंवा हल्लीं युरोपांतील लोक नेकीची योग्यता मोठी समजतात व लाचलुचपतीस नीचपणाचें कर्म समजतात, तसें इकडे थोडेंच, म्हटलें तरी चालेल. यास्तव अशा बिकट समयीं वर्तमानपत्रकर्त्यांनीं, निष्प्रांजळपणें सरकारी अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा तपास ठेवणें व

लोकांत देशहिताच्या कृत्यांची जागृति ठेवणें, हें किती अगत्याचें आहे ह्मणून सांगावें!

पण सर्वांत मुख्य गोष्ट ह्मटली ह्मणजे ही, कीं आमच्या सरकाराच्या संबंधानेंच आपणास अगोदर पहिल्या प्रतीचा बंदोबस्त ठेवणें जरूर आहे. कांकीं, आजमितीला खुद्द सरकारी अधिकाऱ्यांपासूनच आह्मा-ला ज्या स्थानिक पीडा होत आहेत, त्यांला कोठें तोडच नाहीं, म्हटलें तरी चालेल. नेकनामदार सर जेम्स् फरग्यूसन साहेब किंवा कलक-त्याचे थोरले लाट साहेब, हे जातीनें मोठें दयाळु, मोठे उदार व पराकाष्ठेचे सज्जन आहेत, यांत शंका नाहीं; पण तसें असल्यानें आमचे स्थितींत मोठासा फारक होतो असें मात्र नाहीं. ज्या कायद्यांनीं आह्मी बांधले गेलों आहों, व ज्यांच्या चरकाखालीं ही सुवर्णभूमि पिळून निघून, अस्थिपंजरशेष होऊन राहिली आहे, त्या कायद्यांचें स्वरूप एकंदर लोकांस समजेल व वरील स्थानिक दुर्धर पीडांचा परिहार होईल, तर उपयोग; नाहीं तर शेंकडों ठिकाणीं तिळगुळादाखल गोड गोड भाषणें झालीं, सभा झाल्या, दरबारें भरलीं, पुतळे उभे केले, म्हणून काय झालें? कोण-त्याही देशाची स्थिति सुधारण्यास, तेथील लोकांला आपली विद्यमान स्थिति अगोदर ओळखतां आली पाहिजे; आणि मग ती सुधारण्या-विषयीं त्यांनीं एका जुटीनें व सारख्या नेटानें झटलें पाहिजे. आम-च्या देशबंधूंची अवस्था पाहतां, तींत अद्याप एकही असा प्रकार दृष्टीस पडूं लागला नाहीं. त्यांस एक माहीत कीं, आपलें सरकार जो जो कायदा करील, त्यास निमुटपणें मान देत जावी. वस्तुतः पाहतां, सरकारानें, आह्मास जाणते करण्याकरतां, आज कितीएक वर्षें, आ-पण होऊन, फार खटपट केली आहे, व सारी पृथ्वी मोकळी करून देऊन, पाहिजे तिकडे संचार करण्याची आम्हास सोय करून दिली आहे. पण आह्मी असे बाहदर आहों, कीं कोणी आमच्या हातांत शस्त्र आणून दिलें असतांही, आमच्यानें त्याचा उपयोग करवत नाहीं. रडतराव घोड्यावर बसवून, त्याच्या हातानें जेव्हां

दुसऱ्यानें तलवार मारवावी, तेव्हां ते मारणार! रसेडेनसारख्यानें साता समुद्रांच्या पलीकडून जेव्हां आरोळी ठोकावी, कीं 'अरे वेड्यांनो! तुमची चामडी निघण्याची वेळ आली तरी अजून तुह्मी हूं कीं चूं सुद्धां करीत नाहीं, तुम्हास ह्मणावें तरी काय?' तेव्हां कदाचित् आह्मी डोळे चोळूं लागतों! नाहीं तर, आमची तयारी म्हटली ह्मणजे ही, कीं आपणास टेंपल साहेबांनीं चार रुपायांची कागद घासण्याची नोकरी देऊन तोंडावर तुकडा टाकला असला, तर आम्ही आपले त्यांच्या अश्वारूढ प्रतिमेपुढें खुशाल सांष्टांग नमस्कार घालावयाला तयार! व लार्ड डलहौसी साहेबांनीं एवढालीं अवदानें मारून, शेकडों राजे राजवाड्यांस बाजूस ठेवलें असलें, तरी ते निजधामास जावयास निघाले, कीं आम्ही आपले त्यांस दीपक ओंवाळून, त्यांच्या कपाळाला दृष्टीची तीट लावयाला उभेच!

आतां, ज्या कायद्यांचा अंमल आमच्यावर चालतो, त्याचीतर आम्हाला इतकी चोख माहिती कीं, एखाद्या शिपुरड्यानें जरी आम्हास दटाविलें तरी आम्ही मागें सरणार; किंवा म्युनिसिपालिटीच्या प्रिव्ही इन्स्पेक्टरानेंसुद्धां हुकूम फर्माविला तरी तो शिरसा वंद्य मानणार! ही स्थिति किती शोचनीय आहे बरें! यास्तव वर्तमानपत्रांनीं मुख्यतः लोकांचें हेंच अत्यंत लज्जास्पद व अत्यंत भयंकर अज्ञान नाहींसें करण्यास झटलें पाहिजे; व आमच्या दयाळु सरकारानें आह्मास किती कसे अधिकार दिलेले आहेत, व त्यांचा उपयोग केला असतां केवढालीं कामें आपल्या हातून होण्यासारखीं आहेत, याचा प्रत्यय लोकांस आणून दिला पाहिजे. या आमच्या उपदेशाची प्रचीति आमच्या देशबांधवांस रोकड आणून देण्याची कोणती अमोलिक संधि हल्लीं आह्मास आली आहे, ती आमचे वाचक जाणतच आहेत. केवळ गिरिगुहांत गर्जना करणें किंवा गजभ्रमानें पाषाणराशीवर खरनखरांचा मोघ प्रयोग करणें, हा आतांपर्यंतचा क्रम मोडला आहे, व एका मदांधाक्ष कुंजराची आम्हावर चाल होत आहे, हें त्याचा बृंहित नादच आपणास सुचवीत आहे. तर आतां, त्याच्या मदमलिन

गंडस्थळाचें विदारण करून, त्यांतील यशोमौक्तिकांचें उच्चूलन साऱ्या महाराष्ट्रांत करण्याकरितां, झांप मारण्याच्या तयारीस लागतो.

[ केसरी, ता० ३१ जानेवारी सन १८८२ ]

मागील अंकांत, वर्तमानपत्रांच्याच संबंधानें प्रस्तुत विषयाचा विचार केला. आतां, सामन्यतः ग्रंथरचनेच्या संबंधानें पाहतां, हवें तें छापण्याची मुभा किती उपयोगाची व किती आवश्यक आहे, तें पाहूं.

मनुष्य हा प्राणी जन्मतांच केवळ पशूप्रमाणें अज्ञान असतो, हें सर्वप्रसिद्धच आहे. पशूंत व त्याच्यांत अंतर एवढेंच कीं, त्याचे ठायीं न्यूनाधिक प्रमाणानें ज्ञानग्रहणाची योग्यता असते; पशूंत ती मुळींच नसते. पशूंस उपजत बुद्धि ह्मणून एका प्रकारचें ज्ञान एकदम प्राप्त होतें; त्यांस तेवढेंच कायतें; त्याच्या पलीकडे त्यांचें ज्ञान म्हणण्यासारखें जात नाहीं. व तें सर्वांस अनायासानें प्राप्त होऊन, सर्वांस सारखेंच असतें. मनुष्यांची गोष्ट याहून अगदीं वेगळी. त्यांच्या ज्ञानग्रहणास सीमाच नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. हल्लींची मनुष्यांच्या आयुष्याची शतवर्षांची सीमा दशगुणित व सहस्रगुणित जरी वाढली, तरी जगांतील अपार ज्ञानभांडार कधीं खल्लास होईल, अशी धास्ती करणें नलगे. न्यूटनसारख्यांनीं ज्ञानाच्या अपरंपार सागराविषयीं काय उक्ति प्रगट केल्या आहेत, त्या सर्वप्रसिद्धच आहेत. याप्रमाणें मनुष्याची बुद्धि एवढी थोर असतां, व तींत सांठविण्याचा ज्ञानसमुच्चय एवढा अक्षय्य असतां, वरील स्वल्पमात्र आयुर्दायांत त्या ज्ञानाचा संग्रह मनुष्य कोणत्या रीतीनें करतात हें आतां पाहूं.

ज्ञान प्राप्त होण्याचें एक मुख्य साधन म्हटलें म्हणजे श्रवण हें होय. मनुष्यास वाणी ही एक मोठी अमोलिक वस्तु परमेश्वरानें दिलेली आहे, तिच्या योगानें आपलें हृद्गत त्यांस दुसऱ्यास सुलभतेनें कळवितां येतें. मनुष्यांच्या ठायीं ज्ञानाचा जो सांठा नित्य होत जातो, त्यास आद्यद्वार म्हटलें म्हणजे श्रवणव्यापार हा होय. विद्येंत जो प्रथम प्रवेश व्हावयाचा, तोतरी गुरुमुखांतून निघालेली वाणी ऐकूनच होत असतो, हें सुप्रसिद्धच आहे. व लेखनकला निघण्याच्या पूर्वीं

ज्ञानाचें साधन श्रोत्रेंद्रियच काय तें एक होतें. पुढें लिहिण्याची युक्ति निघाल्यावर, ज्ञानाचा प्रसार होण्यास व तें चिरकाल राहण्यास, कोणतें नवें साधन झालें, हें आज कोणासही सांगावयास नकोच. हजारों वर्षांपूर्वी होऊन गेलेले विचार जसेचे तसे कळविण्यास, वरील साधन अत्यंत उपयोगी झालें. सिसरोनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, कीं लेखनकला जर नसती, तर मनुष्यें सदोदित अज्ञानावस्थेंतच राहिलीं असतीं! पुढें, लेखनकलेवरही ताण होऊन, मुद्रणकला निघाली. हिनेंतर ज्ञानाच्या प्रसारास किती वेग दिला, आजवर मनुष्य जातीचें किती कल्याण केलें व ती पुढेंही किती करील, हें सांगण्याची सोयच नाहीं! चारपांच शतकांपूर्वी मोठमोठया राजांस जो ग्रंथसंग्रह दुर्लभ होता, तो आतां एखाद्या लंगोटयासही सहज पैदा करतां येणार आहे. भगीरथानें महाप्रयत्न करून, कैलासराजाच्या जटाजूटांत विहार करणाऱ्या स्वर्णदीस ओढून खालीं आणिलें, आणि भूलोकास शोभा व पावित्र्य हीं प्राप्त करून दिलीं; त्याप्रमाणेंच वरील महाकलेच्या तावडींत सांपडल्यानें, सरस्वती ही केवळ सर्वजनगम्य होऊन राहिली आहे, व तिच्या प्रसादे योगें करून लोकांस अगणित लाभ झाले आहेत.

आतां, ही गोष्ट सर्वांस सहज कळण्यासारखी आहे, कीं बोलण्यानें किंवा छापण्यानें जें ज्ञान मनुष्यांस प्राप्त व्हावयाचें, तें खरें असलें तर उपयोगी. अवास्तव ज्ञान कांहीं उपयोगाचें नाहीं; हें तर काय? पण असत्य ज्ञान अज्ञानापेक्षांही वाईट. जसा खोटा रस्ता, हा रस्ता माहित नसल्यापेक्षां हजार हिश्शांनीं वाईट, किंवा खोटें औषध घेणें हें औषध न घेण्यापेक्षां शतपट भयंकर; त्याप्रमाणेंच केवळ अज्ञान पुरवेल पण मिथ्याज्ञान हें अत्यंत हानिप्रद मात्र होय! हें जर खरें आहे, तर वरील सत्य निष्पन्न होण्यास एकच मार्ग आहे; तो हाच कीं, भाषण व मुद्रण (लेखन हें मुद्रणांतच आलें, यास्तव त्याचा निराळा उल्लेख नलगे) यांस कोणत्याही तऱ्हेचा अटकाव उपयोगी नाहीं. ज्याच्या जें ध्यानास येईल व जें त्यास सयुक्तिक वाटेल, तें त्यानें वाग्द्वारा व मुद्रणद्वारा प्रगट केलें पाहिजे. कोणत्याही गोष्टीची खरी शहानिशा

व्हावयाची म्हटली, म्हणजे तिजवर दहा जणांचे दहा अभिप्राय जेव्हां पडतील तेव्हांच ती होत असते. निवळ एकानेंच आग्रह धरून, अमुक गोष्ट अमुक प्रकारची आहे असें प्रतिपादन करणें, हा केवळ अप्रयोजकपणा आहे. अशानें सत्याची निष्पत्ति कालत्रयींही व्हावयाची नाहीं, हें उघड आहे.

आपल्यांत आंधळ्यांची व हत्तीची एक गोष्ट आहे, ती प्रस्तुत प्रकरणीं अत्यंत समर्पक होय. चारपांच आंधळ्यांस हत्तीच्या अंगावर सोडून देऊन, नंतर त्यांस हत्तीचें वर्णन करावयास सांगितल असतां, एकेकानें आपापल्या परीनें जसें त्या प्रचंड पशूच्या सोंडेचें, पायाचें, कानाचें वगैरे पृथक् पृथक् निरूपण केलें, आणि एकेकाचें निरूपण दुसऱ्याच्याशीं न जमल्यानें, तें जरी एकाशिवाय बाकीच्यांस अयथार्थ वाटलें, तरी तें एकंदरीनें पाहतां खरेंच होतें, तशीच गोष्ट सत्याची आहे. प्रत्येक मनुष्यास जरी आपल्या मताचा आग्रह असतो व बाकीचीं सारीं त्यास खोटीं वाटतात, तरी इसापनीतींतल्या सरड्याच्या गोष्टीप्रमाणें, विचाराअंतीं इतरांचाही स्वीकार करणें त्यास पुष्कळ वेळां जरूर पडतें. निदान इतकें तरी खरें, कीं कूपमंडूकन्यायानें जो मनाचा आकुंचित प्रदेश मनुष्यांस सारी पृथ्वी ह्मणून भासत असतो, तो, इसापनीतींतील आकाशसंचारी मृगाप्रमाणें, त्याची दृष्टि दूरवर फांकली असतां, त्यास तसा भासेनासा होतो. मनुष्याची बुद्धि स्वभावतःच अल्पविषयगामी असते; तिचा एकटीचा टप्पा कितीसा दूर जाणार ? तेव्हां अर्थातच इतरांच्या विचारांशीं आपले विचार ताडून पाहून, जें स्वरूप अधिकाधिक लक्षांत येऊं लागतें, तेंचखरें म्हटलें पाहिजे. हें महातत्त्व जाणूनच, सुज्ञ आहेत, ते कोणत्याही विषयावर घाईनें आपलें मत प्रदर्शित करीत नाहींत, व कोणत्याही गोष्टीचा सिद्धांत करावयाचा, तर पूर्वपक्ष व उत्तरपक्ष या दोहोंचा, यथास्थित रीत्या, शांतपणानें, विचार करून, नंतर त्याचें निबंधन करतात. सारांश, संस्कृतांत म्हण आहे कीं "बुद्धेः फलमनाग्रहः" म्हणजे बुद्धिमत्तेचें फल काय ?—तर आग्रहाचा अभाव! ही म्हण सर्वथा खरी आहे, यांत शंका नाहीं.

आतां, वर सांगितलेल्या गोष्टी ह्मणजे कोणास माहित नाहींत व त्या आह्मी येथें नव्यानें सांगत आहों, असें नाहीं. ज्यानें थोडाबहुत विचार केला आहे, व ज्यास सत्य ह्मणजे काय व असत्य म्हणजे हें कळत आहे, त्याच्या सहज लक्षांत येण्यासारख्या त्या खचित आहेत. असें असूनही जगांतल्या व्यवहाराकडे दृष्टि दिली, तर इतर जसे ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगतांना सांगतात व आयते वेळीं पुराणांतलीं वांगीं पुराणांत गुंडाळून ठेवून, लौकिक न्यायासच, प्रसंग पडला असतां, अनुसरतात, त्याप्रमाणेंच वरील तत्वज्ञानाचीही हेळसांड झालेली आढळते.

असो, तर आतां ग्रंथरचनेच्या कामास वरील दुराग्रह कसा आड्या येतो, व त्यापासून काय काय अनिष्टें घडतात, याविषयीं पुढें विवेचन करूं.

[ केसरी, तारीख ७ जानेवारी १८८२ ]

मुद्रणस्वातंत्र्याचे मुख्य प्रतिपक्षी म्हटले ह्मणजे दोन; एक सरकारी अधिकारी व दुसरे धर्माधिकारी. आतां, दोघाकडून ग्रंथकारांच्या लेखणीला नेहमी कसा धोका पोंचत असतो, तें लिहितो.

जगांतील अधिकाराचीं मुख्य अंगें दोन होत, हें वर सांगीतलेंच आहे. ऐहिक प्रकरणांच्या संबधानें लोकांची शेंडी व्यावहारिक प्रभूच्या हातांत, आणि पारमार्थिक प्रकरणांच्या संबंधानें धर्मप्रभूच्या हातांत. तेव्हां, जेथें वरील दोन्ही देवता जागरूक असून, त्यांचा अंमल कडकडीत असतो, तेथें बिचाऱ्या ग्रंथकारांनीं करद्वय जोडून, खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान होऊन, नेहमीं दोन्ही अर्थांनीं बंदीजन बनून राहण्यावांचून गत्यंतर नाहीं. संस्कृतांत एक म्हण आहे की "शापादपि शरादपि–" शत्रूचा प्रतिकार करणें झाला तर शापेंकरून किंवा शरेंकरून करतां येतो! तर हीं दोन्ही अस्त्रें वरील दोघा प्रभूंच्या हातांत नेहमी सिद्धच असतात. एकानें, राजनिष्ठाभंग कोणी करतो कीं काय, ह्मणून डोळ्यांत तेल घालून व लॉर्ड लिटन्-प्रणीत 'प्रेस आक्ट' पुढें मांडून, बसावयाचें; व दुसऱ्या पवित्र मंडळीनें

'आकाशपितृप्रणीत श्रीशुभवर्तमाना-' चें पुरश्चरण करीत, व त्यांतील अध्यायाला किंवा ओवीला कोणी सैतानप्रेरित कुमनुष्य धक्का लावितो किं काय हें पहात, त्याला शाप देऊन त्याचा ननाट करण्याकरितां तिलोदकांजलि जशी काय नेहमी सिद्ध करून ठेवून, वाट पहात बसावयाची. आतां, वरील दोन्ही प्रकार आजपर्यंत किती जारीनें चालत आले आहेत, व तेणें करून आज स्वातंत्र्याचा कितपतसा संकोच झाला आहे, हें आपण पाहूं.

राजकीय प्रकरणीं जो स्वातंत्र्याचा झेंडा साऱ्या पाश्चत्य राष्ट्रांतून आजला उभारलेला आढळतो, तो कसा उभारला गेला, ही हकीगत समजण्याची ज्यास इच्छा असेल, व वरील जयप्राप्ति तरी केवढ्या दारुण व दीर्घकालिक युद्धप्रसंगानंतर झालेली आहे, हें ज्यास पुरतेपणीं ध्यानांत आणावयाचें असेल, त्यानें युरोपांतील राष्ट्रांचा व विशेषतः आमच्या राजकर्त्यांचा इतिहास साग्र ऐकून घेणें जरूर आहे. तसें केल्याखेरीज प्रस्तुत विषयाच्या स्वरूपाचा नीटसा बोधही एतद्देशियांस होणें कठीण आहे. कांकीं, वरील स्वातंत्र्याबद्दल युरोपांत जशा खटपटी व झटापटी झाल्या, तशा इकडे झालेल्या नाहींत. इकडील राजांनीं किंवा धर्माधिकाऱ्यांनीं ग्रंथकारांच्या भानगडींत आपण होऊन पडल्याचीं उदाहरणेंच मुळीं नाहींत. युरोपांत ग्यालिलियोनें पृथ्वीच्या दैनंदिन भ्रमणाची उपपत्ति काढली, तों लागलीच त्यास पोप महाराजांकडून पाचारण झालें, व एखाद्या चोराप्रमाणें त्याला पिंजऱ्यांत उभा करून, त्यांनीं त्याची चौकशी केली. सरते शेवटीं त्या बिचाऱ्याकडून, वरील महापातकाबद्दल प्रायश्चित्त करवून, त्यास बिनभाड्याच्या घरांत ठेवून दिलें. इकडे वरच्यासारखा प्रकार आर्यभट्ट किंवा भास्कराचार्य वगैरे कोणास भोगावा लागलेला बिलकुल ऐकण्यांत नाहीं. धर्मस्वातंत्र्याच्या संबंधानें पाहतां, तरी या देशांत लोकांची सामान्यतः अशीच समजूत आढळते, कीं ज्याचा जो परंपरागत धर्म तो त्यानें बाळगावा, व हेंच त्यांस उचित होय. गिझनीच्या महंमदानें हिंदूंचीं देवालयें उध्वस्त केलीं, पण हिंदूंनीं उठून मुसलमानांच्या मशिदी किंवा किरिस्तावांचीं देवळें मोडल्याची

कागाळी कानीं येत नाहीं. औरंगजेबानें पशुवत् आचरण करून, वेरुळच्या वगैरे लेण्यांसही, होईल तेवढा, उपद्रव देण्यांत कमी केलें नाहीं. पण शिंदा किंवा होळकर, हे ताजमहालाच्या राशीस लागल्याचें आढळत नाहीं. फार तर काय ?—पेशवाईत उलट असाही प्रकार जेथें तेथें झालेला आढळतो, कीं परधर्माच्या देवस्थानांस पूर्वींच्या नेमणुका, जशाच्या तशाच, त्यांनीं कायम ठेवल्या होत्या. तर, जें धर्मस्वातंत्र्य, एवढ्या लढाया व एवढी भवति न भवति करून, आमच्या पाश्चात्य बंधूंस प्राप्त झालें, तें आमच्या राष्ट्रासतर केवळ अंगभूत असल्याप्रमाणेंच येथें वास करीत आलें आहे, असें आम्हास वाटतें.

असो; आतां, ग्रंथकारांस आपले विचार प्रगट करण्यास पूर्णपणें मोकळिक दिली असतां, त्यापासून काय काय लाभ आहेत, व तसें नसल्यानें कोणकोणते तोटे आहेत, ते सांगतों. ग्रंथरचनेचा मुख्य उद्देश, सत्याचें प्रकाशन करणें,हा होय, हें उघडच आहे.वर्षानवर्षें एकाद्या विषयाचें मनन करून,आपल्या कल्पना व विचार प्रगट करण्याच्या प्रयासास जो कोणी लागतो, तो वरील उद्देशानेंच लागत असतो. शिवाय सत्यज्ञानाचा प्रसार होणें, हें जगास किती हितावह होय हेंही स्पष्टच आहे. मग असें जर आहे, तर सरकारानें किंवा धर्मखात्यानें, पंचतंत्रांतील ‘ कीलोत्पाटी ’ वानराप्रमाणें ‘अव्यापारेषु व्यापार’ करून जगांत आपलें हसें करून घ्यावें, यांत काय अर्थ आहे ? ग्यालिलियोच्या उदाहरणाहूनही आणखी हास्यास्पद गोष्ट ती कोणती हवी ? पोपसाहेब व त्यांचें आचार्यमंडळ, या बेट्यांस जोतिष शास्त्राची व गणिताची कितीशी माहिती होती बरें ! मग आपलें तुटपुंजीचें ज्ञान न ओळखतां, विश्वाच्या नियमांच्या गतीस प्रतिरोध करण्यास त्या मूर्खांनीं सिद्ध व्हावें, हे त्यांचें केवढें धाडस ह्मणावें ? खरोखर, ज्या प्रज्ञाशाली तत्ववेत्यानें स्वनिर्मित यंत्रसाधनांच्या साहाय्यानें व आपल्या विशाल बुद्धीच्या सामर्थ्यानें, शोधून काढलेलें वरील अद्भुत प्रमेय जगांत प्रगट केलें, त्याचे दासानुदास होण्यासही वरील वृद्ध बटुक योग्य नव्हता; तरी त्यानें त्या बिचाऱ्या तत्ववेत्याच्या हालअपेष्टा करून

केवळ आपल्या मौख्यांचा मात्र डंका सर्व दुनियेभर गाजविला, यांत शंका नाहीं. याच प्रमाणें फ्रान्स देशांतही व्हाल्टेर-प्रभृति महाविख्यात ग्रंथकारांचा तेथील अधिकाऱ्यांकडून कोणत्या प्रकारें छळ झाला, तो वृत्तांत बकल् नामक प्रख्यात इतिहासकारानें मोठ्या मनोवेधक वाणीनें रसभरित लिहिला आहे. राजमंडळापैकीं एकाद्यास वरील महापंडिताच्या एखाद्या ग्रंथांत कांहीं गैर दिसलें, कीं त्यानें ताबडतोब व्हाल्टेर यास पकडून आणावें, दंड करावा, तुरुंगांत टाकावें आणि भरचवाल्यावर वरील संबंधाचा त्याचा ग्रंथ, फाशीं देणाऱ्या मनुष्याच्या हातून, एकदम जाळून टाकवावा! अशा हकीगती वाचल्या, म्हणजे हसावें, कीं रडावें, कीं दांतओठ खावे, हें खरोखर कळत नाहीं. वरील प्रकार हे केवढ्या दांडगाईचे, केवढ्या अधमपणाचे, व केवढ्या मूर्ख-पणाचे होत म्हणून सांगावें! कोणी संस्कृत कवि, आपल्या पूर्वकालीन श्ववृत्तीचें खेदपूर्वक स्मरण करून, लज्जित होत्साता, 'द्विचरणपशूनां क्षितिभुजाम्' (दोन पायांचे पशु जे राजे) अशा विशेषणानें आपल्या प्रभूची धिक्कारयुक्त निंदा करतो, ती किती यथार्थ आहे, हें वर सांगितलेल्या अतित्याई घोर कृत्यांवरून स्पष्ट दिसून येतें.

[ केसरी, ता० १४ फेब्रुवारी १८८२ ]

येवढा वेळ जे जे प्रकार सांगण्यांत आले, ते आमच्या देशांत कि-तीसे दृष्टीस पडतात, हें आतां पाहावयाचें. परंतु तसें करण्यापूर्वी सरकारापासून किंवा धर्मखात्याकडून ग्रंथकारांच्या स्वातंत्र्यास आज-मितीस कांहीं धक्का पोंचत असतो कीं काय, याचा विचार अगोदर करणें जरूर आहे. यास्तव हेंच काम आतां हातीं घेतों.

वस्तुतः पाहतां, वरील सदराचा विचार करण्यासारखी आमच्या देशाची स्थितिच अद्याप आली नाहीं. कां कीं, एरवीं सर्व गोष्टींत आमची जशी अजून बाल्यावस्था आहे, तशीच ग्रंथरचनेंतही आहे. जन्मचा जन्म विद्याभ्यासांत घालवावयाचा, वर्षांचीं वर्षे खपून एकादा बडा ग्रंथ पैदा करावयाचा, 'ब्रह्मानंदीं लागली टाळी' या

न्यायानें तत्वविचारांत गढून जावयाचें, वगैरे ज्या गोष्टी पाश्चात्य ग्रंथकारांच्या चरित्रांत आढळतात, त्यांचा लवलेशही अद्याप इकडे दिसूं लागला नाहीं. इकडे ग्रंथकर्तृत्वाची मोठी सीमा म्हटली ह्मणजे एकाद्यानें एकादें इंग्रजी पुस्तक घ्यावें, वर्ष साहा महिने खपून त्याचा तर्जुमा करावा व डायरेक्टर साहेबांच्या चरणसंपुष्टापाशीं तो नेऊन हजर करावा. त्यांनीं तो इन्स्पेक्टराकडे झोंकून द्यावा, पुढें त्यानें कांहीं तरी कोंबडें त्यावर करून, त्याचा सोक्ष कीं मोक्ष एकदाचा ठरवावा. तो ठरला ह्मणजे मग पांचपंचवीस प्रतींची कृपा व्हावयाची, अगर अर्धचंद्रप्रयोग व्हावयाचा—अशी कांहींतरी ग्रंथकाराची संभावना व्हावयाची, अशी तऱ्हा आहे! बाकी, स्वतंत्र रीतीनें लेखण्या चालल्या आहेत, आणि लोकांकडूनच त्यांच्या श्रमाचें चीज होत आहे, असा योग आजमितीलातरी संभवनीय नाहीं. मग अशा स्थितींत युरोपांतील देशांतून नजरेस येणारा ग्रंथकारांच्या व सरकारी अधिकाऱ्यांच्या मधील झटापटीचा प्रकार कितपतसा आढळण्याचा संभव आहे?—मुळींच नाहीं. इकडे ग्यालिलियो, व्हॉल्टेर, मिल्ल, ब्रॉडला हे अद्याप निपजावयाचे आहेत. तेव्हां मुद्रणस्वातंत्र्याच्या प्रीत्यर्थ करावयाच्या युद्धाची वार्ता याच्या पुढेंच आहे!

तथापि येथें पूर्वोक्त प्रकार अद्याप अगदींच नाहींत, असें मात्र ह्मणतां येत नाहीं. सरकाराचा व सरकारी धर्मखात्याचा थोडाबहुत डोळा एतद्देशीय ग्रंथकारांवर आहेच आहे. तो याहूनही अधिक असता; पण युरोपांतील देशांत व या देशांत प्रस्तुत विषयाच्या संबंधानें एक फारच मोठा फरक आहे, त्यामुळें तो तितका कडक नाहीं इतकेंच. तिकडचीं सरकारें स्वराज्येंच असल्यामुळें, ग्रंथकारांची भाषा व राजकर्त्यांची भाषा एकच असते; इकडचा प्रकार तसा नाहीं. इकडे जेव्हां कोणी 'इंटरप्रिटर' म्हणजे दुभाष्या, ग्रंथकार व सरकार यांच्या दरम्यान उभा रहावा, व सरकारास किंवा खिस्ती धर्मास दिलेल्या शिव्यांचें भाषांतर इंग्रजींत करून सांगावें, तेव्हां त्याची दाद तेथपर्यंत पोंचणार! नाहीं तर, एकाद्या साहेबबा-

हादुरांशीं ' गुड मॉर्निंग ' करून, त्यांच्या देखतच 'जनांतिकम्' अशा तऱ्हेनें त्यांच्यावर यथास्थित पुष्पवृष्टि कोणी मूर्खानें केली, तरी ती त्यांस उमगावयाची नाहीं. हीच स्थिति देशभाषेंतील ग्रंथांचीही आहे. शेकडों वेळां जरी त्यांच्या आवृत्ति निघाल्या, तरी कोणी होऊन जेव्हां भाषांतराचें काम करावें, तेव्हां त्याची पुरतेपणीं खबर सरकारास कळणार! सरकारानें ट्रान्सलेटर व रिपोर्टर हे दोन कामदार नेमलेले आहेत खरे; पण या दोन द्वारांतूनही वरील वर्दी वरपर्यंत पोंचण्यास चांगलासा मार्ग नाहीं. कांकीं, एका अधिकाऱ्याचें काम, जे ग्रंथ हजर होतील, त्यांवर मात्र अभिप्राय ठोकून देण्याचें होय, व दुसऱ्याचा ताबा मुख्यतः वर्तमानपत्रांवरच काय तो आहे.

तरी अशा स्थितींतही वरील प्रकारचा बंदोबस्त होण्याचा एक तिसराच मार्ग आमच्या देशांत उपलब्ध आहे. हा मार्ग म्हटला ह्मणजे अस्सल व बनावट ख्रिस्तपुत्रांचा होय. यांच्या हातून वरील पोलीस-तपासाचें काम नेहमी बऱ्याच जागरूकतेनें होत असतें. आमच्या शहरांत सुमारें तीन वर्षांपूर्वी ' विचारलहरी ' म्हणून एक पाक्षिक पत्र निघत असे. यांत नेहमीं ख्रिस्ती धर्माची फजिती उडवलेली असे. तें सरासरी सात आठ महिने निघून, पुढें पवित्र मंडळीच्या उद्योगानें लवकरच बुडालें, ह्मणून ऐकण्यांत आहे. त्याप्रमाणेंच हल्लीं चालू असलेल्या ' निबंधमाले- ' सही ख्रिस्तशिष्यांची कृपादृष्टि पुष्कळ फळास आली, असें ऐकितों. कांहीं पवित्र बाळांनींतर संबंद अंकचे अंक, भाषांतर करून, खाविंदचरणारविंदीं अर्पण केले होते म्हणून समजतें. तथापि सन १८५७ सालापासून शुभवर्तमानवाली मंडळी सरकारी दरबारांत जराशी फिक्की पडली असल्यामुळें, मागले रे० मिचलशाहीचे दिवस आतां पुन्हा उगवण्याची फारशी धास्ती उरली नाहीं.

येथें, प्रसंगवशात्, माजी क्यांडी साहेबांच्या कारकीर्दीतले एक दोन चमत्कार सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हे साहेब पहिल्या प्रतीचे सरकारनिष्ठ व ख्रिस्तानिष्ठ होते. दोहों प्रकरणांच्या संबंधानें

यत्किंचित् ही वावगें कोणीं लिहिलेलें त्यांस खपत नसे. मराठी क्रमिक चौथ्या किंवा पांचव्या पुस्तकांत तुकारामाचे कांहीं अभंग घातलेले आहेत; त्यांतील एक मासला पहा:—

ज्याचा सखा हरि। त्यावरि विश्व कृपा करी॥

हा आमच्या भोळ्या अशिक्षित असद्धर्मी शूद्रकवीचा वाग्विलास. आतां, यावर ट्रान्स्लेटरी पेनाची सफाई कशी फिरली, ती पहा:—

ज्याचा सखा देव। त्यावरि कृपा करी विश्व॥

याप्रमाणेंच, सात आठ वर्षांपूर्वीं साहेबबहादुरांकडे 'प्रेमबंधन' नामें करून एक कादंबरी आश्रयार्थ आली होती. साहेबांच्या कसास-तर ती उतरली, व ग्रंथकाराची संभावनाही बरीच झाली. पण एका गोष्टीनें मात्र साहेबांच्या मस्तकास तिडीक गेली. ती गोष्ट ही, कीं कादंबरीकारानें आरंभीं 'ब्रह्मस्तुति' म्हणून एक ईश्वरस्वरूपवर्णन-पर लहानसें पद्यात्मक प्रकरण जोडलें होतें. त्यावर साहेबांनीं नाक मुरडून रिपोर्टांत शेरा मारला, कीं हें असद्धर्मप्रचारक प्रकरण जर ग्रंथकार काढून टाकील, तर त्यास बक्षीस द्यावें. मग करतां काय? साहेबांच्या मर्जीसाठीं तितक्या प्रतींतली 'ब्रह्मस्तुति' कातरून काढावी लागली!

बिचारी मराठी भाषा! असले करडे इमाम तिच्यार प्रभुत्व करा-याला असल्यावर, मग तिची वाढ आजमितीला जितकी दृष्टीस पडत आहे, तितकीच असल्यास नवल कसलें? पहा कीं, सावटाखालीं को-णतेंही झाड कोठें वाढलें आहे? एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे:—

नच गंधवहेन चुंबिता, नच पीता मधुपेन मंजरी।
पिहितैव कठोरशाखया परिणामस्य जगाम गोचरम्॥ *

अशी अवस्था आमच्या देशभाषेची झाली नाहीं, हेंच तिचें मोठें भाग्य मोजावयाचें; आणखी काय म्हणावें?

---

* "या लतेस वायूचा स्पर्श झाला नाहीं, व भ्रमरानेंही हिच्या मंजरीचें सेवन केलें नाहीं; पण बिचारी कठोर शाखांच्या कचाटींत सांपडल्यामुळें परिणाम दशेस जाऊन पोंचली!"

# देशोन्नति.

[ केसरी, तारीख २८ फेब्रुवारी १८८२. ]

देशोन्नति ऊर्फ सुधारणा ह्मणजे काय, या गोष्टीचा पोक्तपणें विचार करण्याचा काळ सांप्रत आला आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण आजपर्यंत आमचा जो काळ गेला, तो सामान्यतः बाल्यावस्थेंत गेला, असें ह्मटलें असतां चालेल. पहाकीं, आज साऱ्या जगांत ज्या नव्या सुधारणेचा प्रकाश फाकला आहे, व दिवसेंदिवस अधिकाधिक फाकत चालला आहे, ती गेल्या पांचपन्नास वर्षांत या लोकांस अगदींच अपूर्व असल्यामुळें, ते बिचारे अगदींच भांबावून गेल्यासारखे झाले होते. आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंच्या अश्रुतपूर्व कलाकौशल्याच्या व विद्येच्या प्रभावानें, आह्मास, आमचें नामधारी जे अमेरिकन इंडियन लोक, त्यांच्यासारखेंच चकित करून सोडलें होतें. वरील पातालवासी लोक, जसे स्पेनच्या लोकांचीं अवजारें, बंदुका वगैरे सामुग्री पाहून, त्यांस स्वर्गाहून आलेलीं माणसें समजूं लागले, त्याप्रमाणेंच आमची भांबावलेली मंडळीही, आपल्या राज्यकर्त्यांच्या अजब कृतीनें आश्चर्यस्तब्ध होऊन, ‘ इंग्रेजानें कुडींत जीव घालायाचा मात्र ठेवला आहे, बाकी सर्व कांहीं केलें आहे, ’ असें म्हणूं लागली होती. कुणऱ्यामाळ्यांच्या व बायकापोरांच्या तोंडींसुध्दां ‘ टोपीवाल्यानें केला कावा, आगीनगाडी घेते धावा ’ अशी आश्चर्यप्रेरित गीतें गोवून बसलीं होतीं. तेव्हां आजपर्यंत इंग्रज लोकांविषयीं व त्यांच्या सुधारणेविषयीं आमच्या मनांत एकेक विलक्षण कल्पना उद्भवून, हे कोणी अमानुष स्थितींतले प्राणी आहेत, व त्यांच्या पुढें आम्ही कोण “ कीटश्चकोटायते ”असे क्षुद्र प्राणी आहों, अशा समजुती दृढ होऊन बसल्या होत्या.

पण आलीकडे आमचें आमच्या राजकर्त्यांशीं जें अधिकाधिक दळणवळण पडूं लागलें आहे, व विशेषतः इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळें त्यांच्या स्थितीचें यथार्थ स्वरूप आम्हास समजण्यास जो मार्ग झाला

आहे, त्याच्या योगानें मागला बाऊ आतां दिवसेंदिवस कमी कमी होत चालला आहे; व इंग्रज लोक आम्हासारखींच माणसें आहेत, व त्यांस देवानें कांहीं दोन कान आमच्याहून अधिक दिलेले नाहींत, असें आतां आम्हास कळून येत चाललें आहे. आमच्यांत जसे बरे वाईट, शहाणे मूर्ख वगैरे लोक आहेत; व आमच्यांतले आचारविचार जसे कांहीं निंद्य व कांहीं स्तुत्य असे आहेत, तसाच प्रकार इंग्रेज लोकांतही आहे, असें आतां सर्वांस कळूं लागलें आहे. यामुळेंच इंग्रेजांचें सर्वथा अनुकरण करणें म्हणजे शहाणपणाची व सुखाची परमावधि झाली, अशी जी समज आरंभीं दृष्टीस पडत होती, व अद्यापही क्वचित दृष्टीस पडते, तीही आलीकडे पुष्कळ पालटली आहे. शिवाय आलीकडे महाराष्ट्रभाषेचें व संस्कृताचेंही ज्ञान लोकांत फैलावत चालल्यामुळें व पूर्वींच्या गोष्टींचा थोडाफार विचार होऊं लागल्यामुळें, वरील इंग्रजी तत्वज्ञानास बराच धक्का पोंचला असून, आम्ही केवळ रानटी नाहीं, असें दिवसेंदिवस आमच्या प्रत्ययास येत चाललें आहे. असो; एकंदरींत प्रस्तुत काळाचा हा महिमा आहे, कीं पूर्वींची सुधारणा व नवी सुधारणा या दोहोंचें यथार्थ स्वरूप काय आहे, हें समजून घेण्याकडे आज सर्वांचे लक्ष जाऊं लागलें आहे.

यास्तव आतां, सुधारणा म्हणजे काय, व देशोन्नतीचें स्वरूप कसें असतें, याविषयीं शांतपणें विचार करणें फार अगत्याचें आहे. वरील दोन शब्दांचा अर्थ राष्ट्राची उत्तम स्थिति हा होय, हें उघड आहे. आतां, काय असलें ह्मणजे राष्ट्र उत्तम स्थितींत आहे असें ह्मणावयाचें, हें आपण प्रथम ठरवूं या.

वरील उत्तम स्थितीचें पहिलें लक्षण देशाभिमान होय, असें आम्ही समजतों. घन पदार्थांत जसें दार्ढ्य आढळतें, म्हणजे त्यांतील परमाणु अगदीं परस्परसंलग्न असतात, त्याप्रमाणेंच राष्ट्रांतील लोकसमुदाय हा वरील अभिमानाच्या योगानें जितका जितका एकत्र जखडला गेला असेल, तितकी त्याची उन्नतावस्था समजली पाहिजे. ज्या देशांत आपण जन्मास आलों व जेथला सहवास आपणास पहिल्या-

पासून जडला, तेथल्या गोष्टींवर आपलें प्रेम जडणें व त्याविषयीं अभिमान वाटणें, हें अगदीं साहजिक आहे. यास्तव अत्यंत अज्ञानावस्थेंतल्या राष्ट्रांतही देशाभिमानाची वृत्ति पराकाष्ठेची प्रबळ आढळते. आपल्या घरांत कोणी शिरून, जर आपल्यास लुटूं लागला, तर तें जसें घरच्या मालकास पाहवणार नाहीं, त्याप्रमाणेंच आपल्या मुलखावर गनीम चालून आला असतां, त्याशीं सामना करायाला उभें राहणें व त्याला माघारीं पिटून लावणें, या गोष्टीही राष्ट्राच्या आद्यावस्थेंत अगदीं सहज असतात. परंतु अफगाणिस्थानांत अथवा झुलु लोकांच्या मुलखांत कोणी डिमॉसथेनिस अगर सिसरो पुढें येऊन, त्यास सभाग्रस्थानीं उभें राहून पांडित्य करावें लागलें नाहीं. प्रत्येक अफगाणाच्या व झुलूच्या अंगीं हा उपदेश जन्मतःच खिळलेला, कीं आपल्या देशांत जो जबरदस्तीनें घुसायाला पाहील त्याच्या अंगावर चालून जाऊन, त्याला जागच्या जागीं चीत करावा; किंवा तें नच होईल तर निदान त्याला पिटून तरी बाहेर घालवावा. साऱ्या जगाच्या इतिहासांत हीच गोष्ट नजरेस येतें. ग्रीक लोकतर अर्धेमुर्धे रानटीच होते; तरी प्राचीन पारसीक लोकांशीं त्यांनीं असे घनघोर संग्राम केले, कीं अजूनही सारें जग त्यांचा वृत्तांत वाचून तोंडांत बोट घालून राहतात! केवढी पारस देशाच्या चक्रवर्ती राजाची सत्ता, आणि ग्रीस देशांतलीं बारीकसारीक संस्थानें म्हणजे काय कथा?— सिंहमूषकन्यायानें सहज चिरडून जाण्याजोगीं! पण वीस लाख फौज व बाराशें जहाजांचा तांडा, या सर्वांचा आथेन्स व स्पार्टा या चिमकुल्या संस्थानांनीं पार धुव्वा उडवून दिला! याप्रमाणेंच रोमन लोकांची अव्वलची हकीगत. एवढा कार्थेजचा सरदार हानिबाल, कीं ज्यानें आपल्या सैन्यासह पहाडांवरून शत्रूंच्या मुलखावर चढाई केली, व दोनचार लढायांतच रोमची फौज अशी चीत करून टाकिली, कीं शहराच्या तटबंदीपुरतीही शिबंदी जाग्यावर राहिली नाहीं. पण धन्य ते रोमन लोक!—कीं एकजण तरी तसल्या भयंकर स्थितींत शत्रूंच्या गोटांत तहाचें बोलणे ला-

वायास जावयाचा होता! तहाचें बोलणेंतर दूरच, पण सेनेट सभेनें तावडतोब असा ठराव केला कीं, जो कोणी सभेंत तहाची गोष्ट बोलेल, त्यास ठार करून टाकलें जाईल. वरील राष्ट्राच्या आरंभींच्या या हकिगती. पण तेथेंच पुढें काय चमत्कार दृष्टीस पडूं लागले पहा! ज्या ग्रीक लोकांच्या खातरेस वीस लाख लष्कर नव्हतें, तेच पुढें असे पोंचट व निगरगट्ट होऊन बसले, कीं डिमास्थेनीसासारख्या अद्वितीय वक्त्यानें त्यांच्या कानीं कपाळीं ओरडण्याची आपणाकडून पुरेवाट केली, तरी कांहीं उपयोग झाला नाहीं. याचप्रमाणें वर सांगितलेले दगडाच्या छातीचे जे रोमन लोक, त्यांच्याही सार्वभौम राज्यांत अशी बेबंदशाही माजली, कीं सैन्यांतील लोकांनीं आज एकाला बादशाहा बनवावा व उद्यां त्याच जागीं दुसरें बाहुलें उभें करावें! तर राष्ट्राच्या व्यवस्थेंत, कालें करून, असे विलक्षण फेरफार झालेले आढळतात.

[ केसरी, ता० ७ मार्च, सन १८८२ ]

मागील अंकांत देशोन्नतीचें पहिलें मोठें अंग देशाभिमान होय म्हणून सांगितलें, व तो राष्ट्राच्या आद्यावस्थेंत किती पूर्णतेनें आढळतो, हेंही दाखविलें. आतां, राष्ट्राच्या उत्तर दशेंत वरील गुणाचा ऱ्हास कसा होत जातो, हें दाखवतों.

मागील खेपेस ग्रीस व रोम येथील लोकांचा आवेश पुढें कसा ढिला पडत गेला, हें दाखविलेंच आहे; हाच प्रकार सर्व राष्ट्रांतूनही कसा आढळतो, हें दाखवावयाचे. आमच्या देशांत मुसलमानांच्या व मराठ्यांच्या इतिहासाकडे लक्ष पुरविलें असतां, वरील गोष्टीची फार चांगली प्रचीति येते. बाबरच्या वेळचे, मूळ झाडापासून तुटलेले, जे मोगल हिंदुस्थानांत येऊन धडकले, त्यांची स्थिति कोणीकडे? आणि औरंगजेबाच्या सरंजामी लष्करांतले तिस्मारखान, कीं ज्यांस धनाजीचें किंवा संताजीचें नांव ऐकिलें कीं कांपरें भरे, ते कोणीकडे? त्याप्रमाणेंच शिवाजी महाराजांचे सिंहगड ओळकंबणारे व दिवसाढवळ्या साहा दिवस खुशाल सुरत शहर लुटणारे पठ्ठे कोणीकडे? आणि राव-

बाजीच्या पळपुट्या लष्करांतील–'ज्यासि मिळेना भाकर अर्धी। त्यासि बसाया घोडी जर्दी।'–अशा वसुलाचे जे एकेक महावीर होते, ते कोणीकडे? आतां, एवढें विलक्षण स्थित्यंतर प्रत्येक राष्ट्रांत कां आढळतें, याचा जर विचार केला तर यास कारण संपत्ति व ऐषआराम, हें कोणाच्याही लक्षांत येईल. सामान्यतः जगांत हा अनुभव सर्वांस माहित आहे, कीं उन्हाळ्यांत खपणाऱ्या कुणब्याची शरीरप्रकृति कशी धडधाकट असते, आणि बाळवाटी व तुपरोटी खाणाऱ्या विलासी मनुष्याची अवस्था कशी असते! आपल्या भाषेंत ह्मण आहे; कीं 'रानचा वारा आणि घरचाचारा' याची बरोबरी कशानेंही होणार नाहीं. याच न्यायानें जें राष्ट्र आरंभीं भुकेबंगाल असतें व ज्यास ऐषआरामाची चट लागलेली नसते, तें शूर, बाणेदार, अल्पसंतुष्ट, नेकीदार अशा प्रकारचें असतें. त्यांस शिवाजीसारखा किंवा बाबरा सारखाकोणी म्होरण्या मिळाला कीं पुरे! तें लागलींच वावटळीसारखें किंवा वणव्यासारखें पसरत जातें! पण कांहीं काळानें तीच स्थिति अगदीं बदलून जाते. ज्यास खावयाची भ्रांत असते, त्यास यथास्थित खुराक मिळूं लागला, किंवा ज्याच्या हातास सोन्यारुप्याचाही विटाळ झालेला नसतो, त्याच्या अंगावर रत्नें चमकूं लागली, ह्मणजे, मग पहिलें वारें गेलें! पहिले बाजीराव साहेब आपल्या परशुराम क्षेत्रांतल्या आळवाच्या भाजीची व ताकभाताची ओळख विसरले नव्हते. तेव्हां वेळ पडल्यास हुरडा व लोटाभर पाणी एवढेंच त्यांस बस होत असे. अशाच सरंजामानिशीं त्यांनीं दाभाड्याची खोड जिरविली, सुभेदार साहेबास जेरीस आणलें, आणि दिल्लीपतीस आपल्या मुठींत वागवून, नादीरशहासारख्यास आल्या वाटेनें परत जावयास लाविलें! पण तीच पुढें रावबाजीची मिजास काय वाढली व तिचा परिणाम काय झाला, पहा! आपल्या पूर्वजांनीं थोर कमाई कशी केली, व आपल्या आजापंजांची मूळची काय स्थिति होती, ती त्या बेट्याच्या कधीं स्वप्नींही वागली नाहीं. राज्य ह्मणजे त्याची कल्पना काय, तर ब्राह्मणभोजन, स्त्रियांचा आखाडा व हवें त्यास

लुटण्याची व ठार मारण्याची मुभा! मग असले राजश्री लवकरच सारा बखेडा करून भागीरथीच्या तीरीं लवकरच स्नानसंध्या व पितृतर्पण करावयास जाऊन बसले, यांत नवल तें कोणतें?

तर, राष्ट्रास उतरती कळा लागण्यास व देशाभिमान क्रमाक्रमानें विगलित होण्यास वर सांगितलेली अपार संपत्ति व तिचा उपभोग हींच कारण होत. कोणत्याही राष्ट्रांत आरंभीं जे शौर्यादि सद्गुण असतात, त्यांच्या जोरावर त्यांस संपत्तीचा लोभ सुटून, तिची उत्तरोत्तर समृद्धि होत चालली व ऐषराम वाढला कीं हळूहळू पहिली तरतरी कमी होत जाते; आणि तोच क्रम पुढें चालतां चालतां, अशी अवस्था येऊन पोंचते, कीं आपला एकट्याचा तळीराम चांगला गार होतो आहेना?—मग बुडेना आपला देश; होईना परकी लोकांचा अंमल; जाईना आपली व आपल्या देशाची अब्रू; करा फितुर! कांहीं फिकीर नाहीं!—अशा प्रकारचे लाल देशांत निर्माण होतात व हालकोलाहाल देश सफाई बुडतात! असले नराधम आमच्या देशांत कित्येक होऊन गेले असल्यामुळें, त्यांच्या कृतीनेंच आह्मी असल्या लाजिरवाण्या स्थितीस येऊन पोंचलों आहों, हें कोणास सांगावयास नकोच! रोमन लोकांत दंगेखोरास टार्पिया नांवाच्या टेंकडीवरून कडेलोट करीत असत; तसलीच शिक्षा असल्या मातृगामी नरपशूंस पाहिजे! पण लोक एकदा हतवीर्य, अभिमानशून्य, व पोंचट होऊन गेले म्हणजे मग कांहीं नाहीं. हीच स्थिति हल्लीं आमच्या घरीं ढळढळीत प्रत्ययास येत चालली आहे. ज्या शहरांत रामशास्त्र्यासारखे राजकार्यधुरंधरास देहान्तप्रायश्चित्ताचा रोकडा जबाब तोंडावर सांगणारे, व चापाजी टिळेकरासारखे स्वामिभक्त्यर्थ प्राण खर्चणारे, होऊन गेले, तेथें आजची हालहवाल काय म्हणाल?—तर लेडी फर्ग्युसनच्या मरणाबद्दल फुकाचे दोन अश्रु टाकावयाचे तर तेसुद्धां On Her Majesty's Service only अशा राजमुद्रेचा परवाना जेव्हां हातांत पडेल, तेव्हां टाकावयाचे; नाहीं तर, डायरेक्टर साहेबांकडून थप्पड आली तर करतां काय? ते म्हण-

तील कीं, साऱ्या मुलखांतली बदमाश जी सार्वजनिक सभा, तिच्यासारखे तुह्मी जर असले चार करायाला लागलां, तर आमच्या कामास पडावयाचें नाहीं! नुसत्या रडण्याच्या कामांत इतकी बहादुरी! मग असले रडतराव देशहिताच्या व मर्दुमकीच्या कामांत तर कितीसा दम धरतील, हें दिसतेंच आहे! इंग्रजी विद्येचा महिमा साऱ्या भूमंडळावर काय गाजतो आहे, पहा! तिचें सेवन ह्मणजे वाघिणीचें दूधपिणें ह्मणतात. पण या दुधावर पोसपोसून येथे पाहावें तों निवळ मेषपात्र मंडळी निपजते आहे! कौपर साहेब आपल्या जन्मभूमीची थोरवी गातात, कीं 'तिचा वारा लागतांच गुलामांचे बंध मोकळे होतात' आणि इकडे वरील वारा लागला असतां असले वीरभद्र निर्माण होतात, कीं कोणी यःकश्चित कां असेना, ते त्याला वाकलेच! आमच्यांत कित्येक आडनांवी रावबहादुरतर इतके राजभक्त बनलेले आहेत, कीं सांजसकाळ एकाद्या गोरकायापुढें लांगूलचालन केल्याखेरीज त्या ग्रामसिंहांस तुकडा गोडच लागावयाचा नाहीं. त्यांतून लोकहिताचें कार्य कोणीं उभारलें, आणि चालत्या गाड्याला खिळ घालावयाची संधी आली, कीं असली पर्वणीतर ही खाशी मंडळी कधींच फुकट जाऊं द्यावयाची नाहीं. विश्रामबागेचा जीर्णोद्धार करून तेथें लायब्ररीचा समावेश करावा असा कोणी संकल्प प्रगट केला कीं पुरे—उठले एकेक रावसाहेब झक मारायाला! जकातीच्या बाबतींत कोणी उठावणी केली, कीं ती हाणून पाडायाला दुसरे गोंडस सभासद सज्ज होऊन बसलेलेच! पण यांत नवल कसचें? पंडितांनीं ह्मणून ठेवलेंच आहे:—

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना
हावी धन्यास जठरार्थ कसें पहाना?

मग या श्वानांच्या गळ्यांतील पट्ट्यांवरून रा० सा०, रा० ब० किंवा के० सी० आय्० अशीं अक्षरें झळकत असलीं, तरी श्वत्वाचा

परिहार कसा होणार ? ' केसरी ' राजास अशा किताबतीची मुळींच पर्वा नाहीं. ह्मटलें आहे:—

> नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते मृगैः ।
> विक्रमार्जितराज्यस्य स्वयमेव मृगेंद्रता ॥

" सारे मृग मिळून सिंहास राज्याभिषेक करतात, किंवा इतर कांहीं संस्कार करितात, असें नाहीं; तर त्याचें मृगेंद्रत्व त्याच्या नैसर्गिक पराक्रमावरूनच सिद्ध होतें. "

[ केसरी, ता० १४ मार्च सन १८८२ ]

गेल्या अंकांत, आमच्या देशांत देशाभिमानाचें वारें कितपतसें उरलें आहे, हें दाखविलें. आतां, आह्मामध्यें वरील वृत्ति कशामुळें ऱ्हास पावली आहे व ती कशानें जागृत होईल, याविषयीं कांहीं विचार आमच्या वाचकांस सादर करितों.

गेल्या शंभर वर्षांत आमच्या देशाची काय दशा उडाली, तिच्याविषयीं जो कोणी विचार करील, त्याच्या लक्षांत ही गोष्ट सहज येईल, कीं इतक्या अवधींत आम्ही होतां होतां अगदींच निःसत्व होऊन गेलो आहों. व्यक्तिभूत मनुष्यांत किंवा राष्ट्रांत एक जातीचा पीळ असावा लागतो, तो क्रमाक्रमानें आमच्यांतून तूर्त अगदीं नाहींसारखा झाला आहे. इतर कोणत्याही देशांतल्या मनुष्याच्या थोबाडींत दिली असतां, तो परत थोबाडींत दिल्यावांचून राहणार नाहीं; पण आमच्या येथें मात्र येशूख्रिस्तप्रणीत जें सूत्र, कीं कोणी एका गालावर मारिलें असतां दुसरा पुढें करावा, तें पूर्णपणें लागू पडतें. ही नीचावस्था दीर्घकालिक स्वस्थतेनें व आमच्या सरकाराच्या काव्यानें, आम्हास प्राप्त झाली आहे, यांत संशय नाहीं; पण या अभिमानशून्यतेस आणखी बरींच कारणें झालीं आहेत, त्यांचाही येथें उल्लेख करणें अवश्य आहे.

प्रथमतः ही मोठी गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, कीं इकडील देशांतून देशाभिमान ही मनोवृत्तिच ह्मणण्यासारखी लोकांस माहित नाहीं. रोम, ग्रीस, इंग्लंड, अमेरिका वगैरे ठिकाणीं स्वदेश-

प्रीति म्हणून एक अत्यंत प्रबळ मनोवृत्ति जशी आजला आढळत आहे, तशी एशिया खंडांतील कोणत्याही देशांत आढळत नाहीं. सन १८५७ सालीं एकदम साठ पलटणी उठून, त्या स्वातंत्र्याचा झेंडा उभारतात, पण या झेंड्यांत व इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका येथील बंडांत अतिशयित अंतर आहे. वरील तिन्ही देशांतील दंगे करांच्या बाबतीवरून झाले, आणि इकडे इ. स. १८०७ व १८५७ सालीं बंडें झालीं, त्यांस कारण देशाभिमान बिलकुल नसून, केवळ धर्माभिमान होय! 'काडतुस' या एका शब्दानें सारा बंगाल इलाखा एका क्षणांत पेटवून दिला. पण इतकी काळी फौज जी एकाएकीं बिथरली, तिच्यापैकीं एकाही शिपायाच्या अंगीं ह्यामडन् किंवा वाशिंगटन् यांच्या अंगातला आवेश संचारला असेल असें बिलकुल ह्मणवत नाहीं! फार कशाला? सध्यांच आमची व करवीरस्थ आडनांवी 'बरव्या' राजश्रीची झुंज लागली आहे; परिणाम कांहीही होवो, त्याजविषयीं आह्मी बिलकूल फिकीर करीत नाहीं; कांकीं खरा शूर आहे तो लग्नकुंडली वर्तवून कांहीं लढाईस जात नसतो, व 'पराभवोप्युत्सव एव मानिनाम्*' हीच त्याची जयापजयाविषयीं उदासीनता असते; शत्रु दिसला कीं घुसून जावें एवढीच खबर तो ठेवीत असतो; हें ध्यानांत ठेवूनच आमचीही स्वतःची तयारी आहे! पण स्वातंत्र्यसूर्याचा केव्हांच अस्त होऊन पराधीनताधकारांत फार दिवस चाचपडत पडलेल्या व तदनुरूप ज्याच्या सर्व मनोवृत्ति बनून राहिलेल्या अशा जनसमूहाच्या एकेक कोट्या ऐकाव्या ह्मणजे धन्य वाटतें! त्यांचा कोटीक्रम येणें प्रमाणें!—"कोल्हापुरचा महाराज! आपल्याला काय त्याच्याशीं करावयाचें आहे? ही राजकीय प्रकरणें, यांत आपल्यासारख्या गरीब पत्रकर्त्यांनीं कशाला पडावें? लष्करच्या भाकरी भाजण्यावांचून आपलें काय अडलें आहे? शाळा चालवा, वर्तमानपत्रें चालवा, आणि सतरा हिसके पुणें-मुंबई, मुंबई-पुणें

* "मानी जे आहेत त्यांस, युद्धांत पराभव होणें हेंही उत्सवप्रसच होय."

असें घाला, हजारों रुपये खर्च करा, लोकांपुढें भिक्षां-देहि मागा, व शेवटीं व्यांकच्या खटल्याप्रमाणे सारेंच ऑफस झालें, किंवा एखाद्याच्या अंगावर बलामत आली ह्मणजे पंचाईतच कीं नाहीं? स्वस्थ खाविंदचरणारविंदीं 'हरी हरी' म्हणत बसावयाचें सोडून, या छोटेखानी मंडळीनें काय हा नसता उपद्व्याप आरंभिला आहे बरें" इ. इ. इ. वरच्या सारखें पोक्त तत्वज्ञान आमच्या वाचकांपैकीं शेंकडों किंवा हजारो जणांनीं ऐकिलें असेल!—तर हीच स्थिति आजपर्यंत आमच्या देशांत चालत आली आहे. लोकांस अभिमानास चढवावयाची बाजू कोणती?—तर यज्ञोपवीत, गोब्राम्हण इत्यादि. स्वातंत्र्य, जन्मभूमि, या शब्दांत वरच्यासारखा प्रभाव प्राच्य देशांत थोडाच आढळतो!

आमच्या देशांत जन्मभूमीचा अभिमान शिथिल होण्यास, या राष्ट्राचें विस्तीर्णत्व व जातिभेद हीं दोन मोठीं कारणें झालीं आहेत. सिंधुनदीकडचा मुलुख व त्रावणकोर, तसेंच कोंकण आणि बंगाल, हे प्रांत, परस्परांच्या संबंधानें म्हटले ह्मणजे आह्मी व आमचे पातालवासी अमेरिकन यांच्यासारखेच होत. आतां, दोघांची अगदींच फुटाफुट आहे असें म्हटलें असतां चालेल. कांकीं विद्या, देशाचार, रीतरिवाज यांच्या संबंधानें पाहतां, असले परस्परविप्रकृष्ट प्रांत म्हटले म्हणजे भिन्न भिन्न दोन देशच होत. मग अशांच्या मध्यें ऐकमत्य कितीसें उत्पन्न होणार? ही एक गोष्ट झाली; दुसरा प्रकार जातिभेदाचा. यानें तर या राष्ट्राची फुट अतिशयितच पाडली आहे. अठरा पगड जातींस अठरा टोपकरांनीं गुंडाळून टाकलें, व साऱ्यांच्या हातीं सारखीच करवंटी दिली; पण लोकांचे डोळे अजून उघडत नाहींत. शेणवी म्हणतात, आम्ही षट्कर्मी; ब्राम्हण म्हणतात, तुह्मी त्रिकर्मी, आणि वस्तुतः पाहतां या भांडणारांमध्यें असे शेंकडो सांपडतील कीं ज्यांस एकाही कर्माची ओळख नाहीं! येऊन जाऊन कलहकर्मांतमात्र दोघे पटाईत! पण षट्कर्माच्या व त्रिकर्माच्या वा-

हास कंटाळून बिचारें ब्राम्हण्य तर परद्वीपस्थ झालें, आणि टेम्स व रेणा यांच्या तीरांच्या आश्रयानें जाऊन राहिलें, या गोष्टीची दोघांही पक्षकारांस शुद्ध नाहीं!

असो, तर वरील निरनिराळ्या कारणांनीं हा देश पूर्वोक्त मनोवृत्तीस अगदीं पारखा होऊन गेला आहे. आतां, यास तोड काय, याचा थोडा विचार येथें करूं.

पहिली तोड ही कीं, ज्या पाश्चात्य लोकांनीं हा देश इतका काळपावेतों पादाक्रांत करून टाकला आहे, त्यांच्यापासूनच ही गुरुकिल्ली आपण घेतली पाहिजे. त्यांचे इतिहास वाचून, त्यांचा सहवास करून व त्यांच्या उलाढालींकडे सतत लक्ष पुरवून, आम्ही किती गचाळ लोक झालों आहों, याची प्रचीति आपल्या ठिकाणीं बाणली पाहिजे. ती बाणली असतां, 'लोहपरीस' न्यायानें आमचे नादान लोकही कालें करून बाणेदार होतील असा संभव आहे. त्याप्रमाणेंच आलीकडे सारें भरतखंड एकराष्ट्र बनलें आहे, यास्तव कालयोगें करून या अठारा धातूंचीही चांगली मूस बनून, सर्वांस साधारण जो देश, त्याविषयीं अभिमानवृत्ति सर्वांच्या हृदयांत स्फुरूं लागणें हेंही असंभवनीय आहे, असें नाहीं. याशिवाय सांप्रत हास्यास्पद होऊन राहिलेला जो जातिभेद, त्याच्या संबंधाचा वेडगळपणाचा पीळही कमी कमी होत जाऊन, या देशांतील सगळ्या जाति देशबंधुत्वाच्या थोरल्या नात्यांत अंतर्भूत होऊन, बारीक सारीक क्षुद्र भेदांची मातब्बरी लोक तादृश धरणार नाहींत, व ऐक्याप्यापासून सर्वांचें किती हित आहे, हें दिवसांदिवस अधिकाधिक समजूं लागतील, अशीही दृढतर आशा आहे.

# रसातळची मराठी भाषा.

[ निबंधमाला-अंक १४, फेब्रुवारी १८७५ ]

कोणी इंग्रज ग्रंथकारानें लिहिलें आहे, कीं राणीच्या राज्यावर सूर्य मावळतच नाहीं; व ज्या वेळीं पृथ्वीच्या कोणत्या तरी भागांतील हवेंत इंग्रजी शब्द उठत नाहींत, अशी सगळ्या अहोरात्राच्या चोवीसही तासांत वेळ नाहीं. हें त्याचें अभिमानाचें वचन केवळ यथार्थ होय, हें उघडच आहे; आणि जी इंग्रजी भाषा येवढी परिपक्क व रमणीय झाली आहे, तिचा वरील प्रसार कोणाही सुज्ञ व सहृदय मनुष्यास अनिष्ट वाटणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. असो; पण आमच्या बिचाऱ्या मराठी भाषेचें तिजसारखें नशीब उसकटेल, हें कोणाच्या कधीं स्वप्नींही नव्हतें. पेशवाई बुडून महाराष्ट्र देशाच्या वैभवाचा जेव्हां अस्त झाला, त्याबरोबरच तेथील भाषेच्या प्रसाराचीही आशा खुंटली, असें आजपर्यंत वाटत होतें. पण देवाची करणी अचिंत्य; त्यानें आपल्या आवडत्या लोकांकरवीं, जें कृत्य मराठयांच्या भाल्यांनीं झालें नाहीं, तें सहज घडविलें आहे. कोणी शरीराचे वैद्य ह्मणून, कोणी आत्म्याचे वैद्य ह्मणून, वरील परोपकारी लोकांनीं आमच्या मराठी भाषेचा मोठया कडाक्यानें अभ्यास करून, तीस या विस्तीर्ण भूगोलावरील फार दूरदूरचे देश दाखविले आहेत. हें पहा,–या आमच्या मेजावर न्यूयार्क येथें छापलेलें मराठी पुस्तक ! ! !

वरील गोष्ट ऐकून, आमचे वाचक अगदीं चकित होऊन जातील, व म्हणतील–" काय ? **न्यूयार्कांत** छापलेलें **मराठी** पुस्तक ! ! न्यूयार्क तर अमेरिकेंत, आणि तेथें मराठी भाषा केव्हां गेली ? मराठी ग्रंथकार, मराठी छापखाना, मराठी ठसे जुळणारे, ही सर्व सांगड अमेरिकेंत कशी ? " आमच्या वाचकांच्या या साहजिक शंकांचें समाधान प्रत्यक्ष प्रमाणावांचून व्हावयाचें नाहीं; यास्तव वर सांगितलेल्या पाताळांतून वर आलेल्या पुस्तकाचें मुखपत्रच साक्षात् त्यांस दाखवितों. हें पहा !–

लोकां साठीं

**मनोरम वार्ता.**

---

यांनीं शरीर संपत्तीचें संरक्षण

कसें करावें,

व

**आपला जीव**

कसे लांबवून,

**मोठी वृद्धावस्था संपादावी,**

यासंबंधीं एथें

दाखविलें

आहे.

---

## न्यूयार्क.

कां! आतां तर वर सांगितलेली अद्भुत गोष्ट खरी वाटेल कीं नाहीं? तरी अजूनही आमचे वाचक बुचकळ्यांतच पडले असतील असें वाटतें. वरील मुखपत्र दोनतीनदा वाचूनही, वरील पुस्तकाविषयींची त्यांची जिज्ञासा तृप्त होणें तर दूरच, पण गढूळ पाण्यानें जशी तहान उलटी वाढते मात्र, तशीच त्यांची अवस्था होईल. वर 'आपले जीव लांबवण्या' विषयीं जो मजकूर लिहिला आहे, त्याचा अर्थ 'आपली बुद्धि लांबवू-' नही त्यांस, फार करून, कळणारच नाहीं! यास्तव आमच्या वाचकांचा आणखी अंत न पाहतां, एकंदर मजकूर काय आहे, तो त्यांस थोडक्यांत कळवितों.

नव्या जगांत, **मरे** आणि **लानमन** नांवाचे केवळ अक्षरशः 'जगत्प्रसिद्ध' असे कोणी मोठे वैद्य व गंधी आहेत. यांनीं आलीकडे,

प्रोफेसर हॉलोवे यांचा कीर्तिदीप मालवून, सगळ्या जगभर आपलें 'सुगंधी पाणी' आणि 'साखरावगुंठित. गोळ्या' यांची रगाडीच रगाडी करून दिली आहे. आमच्या इंदुप्रकाशादि मराठी वर्तमानपत्रांस त्यानीं आपल्या जाहिराती वर्षानवर्षें छापण्याविषयीं एकदा सुपारी देऊन ठेविली आहेशी दिसते. वरील पत्रांतून 'सदा सुगंध' 'फ्लोरिडाचें पाणी,' 'मुलांचें भक्ष्य,' 'आजमावलेला (?) मित्र,' 'स्त्रियांचा पूर्ण मित्र,' वगैरे ज्या जाहिराती असतात; तशीच ती मौजेची नोटिस—'तुला—होतें आहे काय ?—रक्त शुद्धकर,'. आणि सर्व प्रश्नांच्या पुढें एका भल्या मोठ्या कंसांत—'तुला रक्त' शुद्ध करायाचें आहे काय ? आमच्या साखराव गुंठित गोळ्या घे ! या सर्वांवरून वरील दोन साहेबांची आमच्या सर्व वाचकांस ओळख पटली असेलच. असो; तर वर सांगितलेलें मराठी पुस्तक या दोहों साहेबांनीं, न्यूयार्क येथें तयार करवून, छापविलें आहे. ते आमच्या एका मित्रानें मोठें मजेदार म्हणून आम्हांस दाखविल्यावरून, अशी अजब चीज आमच्या प्रिय वाचकांसही दाखविल्यावांचून आमच्यानें राहवेना !

वरील 'मनोरम वार्ता' कोठें मिळते, हें आम्हास माहीत नाहीं. पण जर कोणास माहीत असेल, तर ती विकत घेऊन आपणापाशीं संग्रहास ठेवण्यास कोणी अनमान करूं नये, अशी आमची त्यांस शिफारस आहे. एक तर, वस्तुमाहात्म्य; म्हणजे या पुस्तकाची अंगची योग्यता. वर आमच्या वाचकांनीं वाचलें आहेच, कीं यांत 'जीव लांबवण्या-'ची व 'वृद्धावस्था संपादण्या-'ची युक्ति सांगितली आहे; शिवाय आंतील मजकूर वाचल्यावरून वाचकांस कळवितों, कीं केवळ दिव्य सुगंध व साऱ्या रोगांपासून मुक्तता हीं दोन ज्यांस पैदा करायाचीं असतील, त्यांस त्यांविषयींचा यांत रामबाण उपाय सांपडेल. दुसरें—स्थलमाहात्म्य. वरील 'वार्ता' न्यूयार्क येथें छापली; तेव्हां अमेरिकेसारख्या मोठ्या ठिकाणचें बुक आपणाजवळ झालेसें होऊन, खासगी सुंदर पुस्तकालयांत 'राणीच्या पुस्तका-' शेजारीं हें ठेवण्यास उपयोगीं पडेल. पण तिसरा लाभ तर वरील दोहोंहूनही

मोठा आहे. तो कोणता ह्मणाल?–तर यांतील अतिसुंदर भाषा. * 'पवित्र शास्त्र' किंवा 'साधारण प्रार्थना' हीं पुस्तकें सर्वांपाशीं असतातच असें नाहीं; यास्तव हें छोटेंसें पंधरावीस पानांचें बुक आण्या दोन आण्याला एकदा घेऊन ठेवलें, ह्मणजे मग दुसरीकडे बघण्याची बिलकुल गरज राहणार नाहीं.

वरील उत्कृष्ट शिफारशी वाचून, आमच्या वाचकांपैकीं कोणाच्या मनांत संशय तर नसेलना आला, कीं ज्या अर्थीं प्रस्तुत ग्रंथ घेण्या-विषयीं सर्वांस आमचा येवढा आग्रह चालला आहे, त्या अर्थीं पत्र-कर्त्यांच्या व पुस्तककर्त्यांच्या चालीप्रमाणें, **मरे आणि लानमन** साहेबांचा आणि आमचा कांहीं अंतस्थ ठराव झालेला असेल! पण आह्मी अगदीं इमानानें सांगतों कीं, तसा बिलकुल कांहीं एक प्रकार नाहीं. प्रस्तुत 'वार्ते-'ची येवढी तारीफ करण्याचें कारण तिचें 'मनोराम-'त्व हेंच एक होय. आणि आमच्या चालीप्रमाणें जें आह्मास उत्कृष्ट दिसेल, तें इतरांच्या मत्सराकडे वगैरे बिलकुल लक्ष न देतां, आह्मी अवश्य सर्वांस स्पष्टपणें सांगणार. यास्तव आतां प्र-स्तुत पुस्तकांत जीं जीं फारच नामी स्थलें आहेत, त्यांतील कांहींचा निर्देश करतों.

**लानमन** साहेब आपल्या सुरस व्याख्यानाची प्रस्तावना करतातः-

## 'चला वाटा वाट करूं.'

"तुम्ही कां रोगी आहां? असें विचारतों. त्याचें कारण कोणतें तरी असेल. माणसांनीं आपलें अर्धे आयुष्य दुखण्यांत घालावें, असें कांहीं देवानें योजिलें नाहीं. यामुळें स्पष्ट आहे कीं देवानें स्थापिलेल्या नियमाचा कोणत्याही रीतीनें माणसांनीं भंग केला असेलच. नाना प्रकारच्या शिरःपीडा, यकृत्, गुल्म, पखशूल जो खांद्यापावेतों चढतो, अजीर्णता, अंबलेलें पोट, वातप्रकृति, मलावरोध, गुदार्श, ओकारी, तोंड व मान व भुज यांवर पुटकुळ्या व खरखरीतपणा व कोडा, अस्या ज्या रोगांनीं माणसें पीडिलेलीं असतात, त्यांवरून स्पष्ट दिसतें, कीं ज्या नियमान्वयांनीं शरीरसंपत्ति प्राप्त होत असती, त्यांचा

भंग झालेला आहे, आणि जर उपाय लवकर केला नाहीं, तर बहुत करून दुःखें वाढत जाऊन, कदाचित् शेवटीं उपायातीत होतील. अशी अवस्था जर झाली, तर योग्य उपाय लवकर केला पाहिजे, म्हणजे तो उपाय जानें वाईट होणार नाहीं व पोटांत खणती न होतां प्रकृति बरी होईल. तो उपाय कोणता, कसा ह्मणून विचारलें, तर हें उत्तर, ह्मणजे,

### ब्रिस्टलच्या साखरावगुंटित गोळया घ्याव्या.

यांपासून मोठ्या कोमल प्रकृतीला अपाय होत नाहीं व बळवंतांस गुण येतात. त्या रोगवर्णीकर्त्या असून, शरीरांतील कुरस धोऊन टाकून, पोटास तेज व काळजास धमक आणितात, आणि अन्नांस बेतावर नेतात. त्या मोठ्या पित्तशामक व रोचक व जोम आणणाऱ्या अस्या आहेत. त्या तृणजातीच्या पदार्थांच्या केल्या आहेत.

फार दिवस मनन करून आणि फार श्रम घेऊन त्या सिद्ध केल्या आणि इतर सर्व रेचनांपेक्षां हें रेचन चांगलें. यास सर्वलोकमान्य आहेत म्हणून सांगितलें ह्मणजे पुरे."

प्रस्तुत प्रबंधांतील नायिका ज्या गोळया, त्यांचें वर्णनः—" जें औषध चांगलें विश्वासू व निर्भयी असें असतें, तेंच कुटुंबासाठीं असावें.

## असें औषध

### ब्रिस्टलच्या साखरावगुंटित गोळया,

ह्याच मात्र आहेत, असें बहुत करून वाटतें. बायका व मुलें यासाठीं त्या अशा मंद आहेत कीं भय वाटूं नये. आणि त्या अस्या तीव्र आहेत कीं बळवंतास रेचन आणण्याजोग्या सामर्थ्यवान असतात. त्यांची क्रिया शरीराच्या एकेच भागावर मात्र असती, असें केवळ नाहीं, तर आंतील सर्व इंद्रियांवरही त्यांचा गुण लागू असतो. आणि आपल्या मोठ्या तेजानें पोट धर्मावर नेतात. मग ज्या रसांनीं अन्न चांगलें पचतें, त्यांस बळ आणितात. यामुळें अन्न बरें पचूं लागलें, तर स्वच्छ रक्त पुष्कळ उत्पन्न होऊन अशा रक्तानें

सर्व देहधर्म यथास्थित चालतात. आणि यांचीं पुढील फळें प्राप्त होतात, म्हणजे,

**मोठें अंगबळ, चांगली शरीरसंपत्ति आणि उत्साह मन.**

असें आह्मी भलतेंच ह्मणत नाहीं. तर त्यांची पुष्कळ दिवसांची जी परीक्षा झाली आहे आणि ह्यांपासून जीं उत्तम फळें सिद्धीस आलीं आहे, यांवरून विचारपूर्वक सांगतों. आणि आह्मी धनी आहों म्हणून त्यांची वाखाण करितों असें नाहीं तर जीं हजारों हजार माणसें ह्या ब्रिस्टलच्या गोळ्या घेऊन बरीं झालीं तीं आपो-आप पुढें येऊन, आपल्या रोगांविषयीं जे दस्तऐवज दिले आहेत, त्यांवरून सांगतों.

**आहो मित्रांनो! तुह्मीं दुःखी आहां काय?**

आणि बरें होण्यास इच्छितां? तर ब्रिस्टलच्या गोळ्या घ्याव्या. त्यांपासून कोणतेंही नुकसान होणार नाहीं. परंतु मोठी आशा आहे कीं, थोडक्या दिवसांत बरे व्हाल, आणि रक्तांत मल असतो ह्मणून गोळ्यांसमेत ब्रिस्टलचा सार्सापरिलाही घ्यावा."

आणखी एक उतारा——अगदीं आरंभींचाच!

# शरीर संपत्ति आणि सुख.

"लहान शिस्यांमध्यें रुमालासाठीं जे खवट गंध महागाईनें विकतात, ते बहुत करून अनिष्ट पदार्थांच्या रसायनानुयायी सिद्धि असतात, आणि अशा निष्कर्षाचा उपयोग केला असतां रोग येतात, आणि बहुत करून कपाळशूळ व अस्वस्थता हीं उत्पन्न होतात. परंतु-

**मरे आणि लानमन यांच्या फ्लोरिडाच्या पाण्याच्या**

सुगंधाचे गुण त्यांसारिखे नव्हेत. याच्या सिद्धीमध्यें कोणताही रसायनीय पदार्थ पडत नाहीं. ते केवळ फूलांचा सुगंध निवळ व निर्दम जलाकार झालेला आहे. यापासून रोगीला समाधान, अरोगीला अनंद असें प्राप्त होतें. रुमालासाठीं त्यासारखें दुसरें नाहीं. तें कसें

नाजूक, कसें उजरणीकरण—कसें गोड तें ! चट्टीपट्टी करण्याचे समयीं त्याचें अगत्य सर्वास असतें. तोंडावरून खरखरीतपणा व सूर्यपुट व चकंदे हीं काढतें. स्नानाच्या वेळीं धातुपुष्ट, उजरणी व शरीर हीं करणारें दुसरें यासारखे नव्हे.

याचीं मिषें पुष्कळ असतात; यास्तव मरे व लानमन यांचें फ्लोरिडाचें पाणी जें लानमन व केंप यांनीं सिध्द केलें तेंच मागावें. "

इतके उतारे पुरेत. कोणत्याही सुंदर पदार्थाची कल्पना, तो प्रत्यक्ष नजरेखालींच घातल्याखेरीज, कधींही येत नसते; त्याप्रमाणेंच आमच्या 'मनोरम वार्ते-'ची गोष्ट आहे. तरी त्या 'मनोरम'-त्वाचें अंमळ विशेष वर्णन केल्याखेरीज राहवत नाहीं. वरील उताऱ्यांत कोठें अगदींच अपरिचित, कोठें अर्धवट इंग्रेजी, कोठें निवळ संस्कृत, कोठें निवळ गांवढळ अशा शब्दांचा प्रयोग; वाक्यरचनेची मजा; विरामचिन्हांचा सर्वथा अभाव; वगैरे गोष्टी आमच्या वाचकांच्या ध्यानांत येऊन चुकल्या असतीलच. पण याशिवाय लिंगवचनादिकांची मौज जी इतर ठिकाणीं केलेली आहे, ती कांहीं अपूर्व आहे. तिची थोडीशीं उदाहरणें घेतोंः—'पराकाष्टा झाला,' 'अर्धा पाणीभर पेल्यांत,' 'ब्रिस्टलचा सार्सापरिला हें दीपक रूपांतर कारक पथ्योदक सर्व ऋतुगण व सर्व देश ह्यांत उपयोगीं पडतो,' 'मरे आणि लानमन यांचे फ्लोरिडाचें पाणी कायचें ? असा दूर देशांपासून चहूंकडून आह्मास प्रश्न घालतात'!! असो; एकंदरींत सांप्रत पुस्तकावरून एकाद्यास अशी कल्पना होईल, कीं आमच्या भाषेस येवढ्या गोलार्द्धाचें भ्रमण केल्याच्या योगानेंतर वरील विलक्षण विकार जडले नसतीलना ! दीर्घ प्रवासानें मनुष्य जसें मूळचें ओळखूं येत नाहीं, त्याप्रमाणेंच न्यूयार्कवासी आमच्याच भाषेची आम्हास येथें ओळख बिलकुल पडेनाशी झाली काय ? कसेंही असो; तिची वरील स्थिति पाहून चित्तास फार खेद होतो. पण हो ! बरें आठवलें ! आमच्या साहेबांपाशीं हव्या त्या शरीरविकृतीच्या मारक अशा पसंत ब्रिस्टलच्या गोळ्या आहेतच. त्यातर आमच्या भाषेस पुनः 'धर्मावर नेण्यास' उपयोगीं पड-

णाऱ्या नसतीलना! असतील, तर मरे आणि लानमन साहेबांस आमची येवढीच विनंति आहे, कीं त्या जरा ज्यास्त 'साखराव-गुंठित' करून त्यांनीं आमच्या भाषेस द्याव्या, ह्मणजे तितक्या कडू लागणार नाहींत!

असो; आतां हें प्रकरण पुरे. मरे साहेबांच्या 'मनोरम वार्ते-' नें आमच्या वाचकांस जर बरेंच हंसविलें असेल, तर तेवढ्यानेंही वरील पुस्तकाचा हेतु अगदींच सफळ झाला नाहींसें होणार नाहीं. कारण इंग्रेजी वैद्यकाप्रमाणें खूप हंसणे हे शरीर प्रकृतीस अत्यंत हितावह आहे; त्याच्या योगानें मेंदू साफ होऊन, कोठयाच्या पचनशक्तीस साहाय्य होतें. तर प्रस्तुत पुस्तकाच्या 'धन्यां'स आह्मी अशी सूचना करतों कीं, तें त्यांनीं नाटक्कार मंडळयांस वाटलें असतां एकदम दोन हेतु सिद्धीस जातील. एकतर विदूषक बोवांनीं तें चांगलें मजेदार रीतीनें वाचलें असतां मंडळीस हंसतां हंसतां पुरेसें होऊन, वरील दोन शरीरसंबंधनीं नफे होतील आणि शिवाय गोरगरिबांस, पुस्तक विकत घेण्याचें कारण न पडतां, 'सदासुगंध' आणि 'साखरावगुंठित गोळ्या' यांच्या स्वरूपाचा बोध फुकटांत होईल.

असो; आतां सरते शेवटीं आमच्या पातालवासी साहेबांस आम्ही अशी सूचना (तेथपर्यंत जाईल तर!) करतों कीं, लोकांच्या रोगपरिहारार्थ त्यांनीं योजलेले उपाय कितीही उत्कृष्ट असले, तरी ते ज्या द्वारानें लोकांस कळायाचे, तीं वरच्यासारखीं अप्रयोजक असल्यानें, त्यांच्याच कार्याचा विघात होतो. वास्तव अशा पुस्तकांचीं भाषांतरें कर्तव्य असतां, अमेरिकेंतील महाविद्वान प्रोफेसरांकडून तें जितपत काम होईल, त्याच्या दसपट चांगलें दसपट कमी किमतीला एखाद्या शाळेंतल्या पोराच्या हातूनही तें येथें सहज होईल. अथवा एतद्देशीय लोकांचें पारलौकिक हित करण्याच्या हेतूनें जे त्यांचे बंधु या देशांत ठिकठिकाणीं येऊन राहिले आहेत, त्यांच्याही हातून तें बरेंच ह्मणण्यासारखे होईल. तथास्तु.

वरील सगळा मजकूर वाचल्यावर, आमच्या वाचकांपैकीं जे कोणी विशेष गंभीर स्वभावाचे किंवा विचारशील असतील, ते कदाचित् आम्हास विचारतील, कीं हे येवढें भारूड तुह्मीं येथें कशाला घातलें? याच्या जागीं एकादा लहानसा निबंध किंवा उपयुक्त विषय लिहितां आला नसता काय? अशा आक्षेपकांस आमचें उत्तर असें आहे कीं, ईश्वराने हंसण्याचा जो विशेष साऱ्या प्राणिमात्रांत एका मनुष्याचेच ठायीं काय तो ठेविला आहे, तो उगीच नव्हे. तो त्यास शरीर व मन अशा दोहोंसंबंधानें अत्यंत हितावह होय. यास्तव त्याच्या स्वाधीन होणें हे मनुष्याच्या थोरपणास अनुचितच आहे असें नाहीं. शिवाय, विनोद, थट्टामस्करी वगैरे प्रकार अगदीं न आवडणें, हें तर विशाल बुद्धीचें मुळींच लक्षण नसून, त्याच्या विरुद्ध प्रकारचे मात्र म्हणतां येईल. कोणी इंग्रज ग्रंथकाराने म्हटलें आहे, कीं सर्वांत अत्यंत गंभीर पशु म्हटला ह्मणजे गाढव, आणि गंभीर पक्षी म्हटला ह्मणजे घुबड होय! तेव्हां यावरून सादृश्य काढलें तर गंभीर स्वभाव पतकरणारा मनुष्य फार थोडा निघेल! याप्रमाणेंच प्रस्तुत प्रसंगीं 'सुभाषितेन गीतेन' इत्यादि संस्कृत श्लोक व इसापनीतींतील देवशर्मा पंडित आणि धनुष्य यांची गोष्टही आमच्या वाचकांनीं लक्षांत आणावी. असें केलें असतां, त्यांची खात्री होईल, कीं असे मजकूर सर्वथा निरुपयोगी नसतात. पण इतकेंच नव्हे. जे खरे मार्मिक व तत्वज्ञ असतात त्यांस अशांत गर्भित बोध असतो, तोही कळतो; व तो अशा मौजेच्या रीतीनें दिला असल्यामुळेतर त्यांस ज्यास्तच पसंत पडतो. असो; असा बोध प्रस्तुत लेखांत आमच्या वाचकांस हा मिळेल कीं, नव्या जगांत राहणारे मनुष्य जरी असले, व साऱ्या जगभर जरी त्यांची कीर्ति पसरली असली, तरी त्यांकडूनही असमंजसपणा घडत नाहीं असें नाहीं. तसेंच परभाषेत, तिच्या शुध्द सरणीप्रमाणें मजकूर लिहिणें हें परक्यास किती दुर्घट; व तसें केलें असतां, लेखास वहुधा किती हास्यास्पदता येते, हेंही वरील

लेखावरून त्यांच्या मनावर फार चांगलें ठसेल. सारांश, वरील सारा लेख **लानमन** साहेबांच्या 'साखरावगुंठित गोळी-' सारखा आहे. गोळी तोंडांत टाकली असतां, नुसतें तोंडच गोड करून राहील असें नाहीं, तर कोठ्यांत उतरून 'रक्तशुध्दि' ही करील; त्याप्रमाणेंच प्रस्तुत लेखाचाही आमच्या वाचकांच्या मनावर व्यापार होईल अशी आशा आहे!

---

# आत्मविषयक उद्गार.

## नंबर १.

[ निबंधमाला-अंक १, जानेवारी १८७४ ]

**सूचना**—या निबंधमालेचा उद्देश मुख्यतः भाषाशोधनाचा तर आहेच; पण त्याबरोबर मनोरंजन व बोधही कांहीं होईल असा भरंवसा आहे. हा बेत लोकांच्या पसंतीस जर पडेल, तर आम्ही आपलें काम बजावण्यांत यत्किंचित्‌ही आळस करणार नाहीं, हें सांगायास नकोच.

यांतील मजकुराच्या तर्फेनेंही येथें कांहीं विनंती करणें अवश्य वाटतें. ती इतकीच कीं, तो कोणाच्या द्वेषबुद्धीनें आह्मी कधींही लिहिणार नाहीं. जर त्यांत कोणास कांहीं गैर दिसून, आम्हास कळविण्यांत येईल, तर आमची चुकी आम्ही मोठ्या संतोषानें पदरांत घेऊं. तसेंच त्यांत जें जें कांहीं अहंकरोक्तीसारखें कोणास दिसेल, त्यांत सत्यनिरूपणाखेरीज दुसरा उद्देश कधींही असणार नाहीं, हेंही आम्ही एकवार खात्रीनें सांगून ठेवतों.

---

## नंबर २.

[ निबंधमाला-अंक ५, मे १८७४ ]

**आमच्या पुस्तकावर टीका**—या अंकासुद्धां आमच्या पुस्तकाचे एकंदर पांच अंक निघाले. पण येथपर्यंत त्याच्याविषयीं अनुकूल किंवा प्रतिकूल असें मत कोणीं दिलेलें आम्हास आढळलें नाहीं. याबद्दल जी एका तऱ्हेची दिलगिरी आह्मास वाटत होती, ती नुकतीच दूर झाली. मार्च महिन्याच्या अंकांत **भाषापरिज्ञान** या सदराखालीं जो थोडा मजकूर आम्ही लिहिला होता, त्यावर **विश्वामित्र** या सहीचें एक पत्र आम्हाकडे आलें आहे; तें उत्तरासहित या अंकांत प्रसिद्ध केलें आहे. तसेंच नुकतें **दंभहारकाच्या** एप्रिलच्या अंकांत आमच्या पुस्तकावर कोणीं लिहून पाठविलेला मजकूर छापला आहे. त्यावरही या ठिकाणीं कांहीं लिहिणें अवश्य वाटतें.

हा मजकूर जरी आम्हास मोठासा आवडण्यासारखा नाहीं, व विशेष मान्यही नाहीं, तरी तो प्रसिद्ध केल्याबद्दल त्या लिहिणाराचे आभार मानणें अवश्य आहे; कां कीं, पहिल्या दोन अंकांच्या शेवटीं ज्या सूचना आह्मीं केल्या होत्या, त्याचा प्रत्यय आमच्या वाचकांस आणून देण्याची त्यानें चांगली संधी आणली. आणि ग्रंथकार, पुस्तककार, पत्रकार, यांनीं परस्परांशीं कसें वागावें, याचा मासला सध्यांच्या लेखावरून जर दिसून येईल, तर आम्हीं एक मोठेंच काम बजावलेसें होईल असें वाटतें.

प्रस्तुत लिहिणाराचे आभार आम्हीं वर मानले; पण ते केवळ तो मजकूर त्यानें लिहिला इतक्याचबद्दल. आह्मास जें हावें होतें तें त्याच्या लेखांत फारसें दृष्टीस पडत नाहीं. कोणताही मनुष्य सर्वज्ञ नसतो, व सर्वांस खारखी माहिती नसते, यास्तव एकाच्या लेखांत दुसऱ्यास कांहींतरी दोष किंवा चुका सांपडण्याचा नेहमीं संभव असतो. यास्तव तसें आमच्या निबंधांत जर कोणास दिसलें, तर तें आम्हास कळविल्यास आह्मी आनंदानें छापूं, असें आह्मी मागें लिहिलें होतें, त्याप्रमाणें यांत कांहीं असेलसें पहिल्यानें पाहतांक्षणीं

वाटलें. पण मजकूर सगळा वाचून पाहतां, लिहिणाराचा उद्देश स्वतांचेंच समाधान करण्याचा जितका होता, तितका दुसऱ्याचें करण्याचा नव्हता, असें आम्हास दिसून आलें. त्याच्या गुरूविषयीं जे कांहीं थोडे विचार इतर मासिक पुस्तकांबरोबर आम्हीं प्रगट केले होते, त्यांत त्याच्या गुरूचा आह्मीं बुद्ध्या अपमान केला असें त्यास भासून, त्यानें आमच्या 'मळमळीत विचारां-' बद्दल आपले 'अवसानी' विचार आम्हास सादर केले आहेत. आणि खरोखर पाहतां, त्यांत अर्थापेक्षां 'अवसान'च ज्यास्त आहे! अशा लिहिणारास मुळींच उत्तर न देणें आमच्या अगोदर मनांत होतें; कां तर, आपल्या आवडत्या पुस्तकाचा कैवार घ्यावा हाच त्याचा मुख्य उद्देश असून, आमच्या पुस्तकावर जी त्यानें टीका केली आहे, ती तादृश विचारपूर्वक केली आहेशी दिसत नाहीं. तीस मुळींच उत्तर न दिल्यानें, त्याच्याही मनाजोगतें होऊन, आमचा ही व्यर्थ श्रम वांचता. पण त्यांत असे कांहीं विचार दाखल केले आहेत, कीं जे एकंदर सर्व पुस्तककारांस उद्देशून आहेत, व तसे खोटे समज पुष्कळांच्या मनांत वागत असतील असें आम्हास वाटतें. यास्तव त्यांसच मुख्यतः उद्देशून पुढील मजकूर आह्मी लिहितों.

या लिहिणारानें दोन तीन ठिकाणीं मासिक पुस्तकें कशीं असावीं, त्यांत विषय कोणते असावे, याविषयीं आपलें मत प्रदर्शित केलें आहे:—"पण ऐहिक सुखें वृद्धिंगत करून, मानवी प्राण्यांच्या संख्यावृद्ध्यर्थ व त्यांस विविधज्ञान प्राप्त होऊन त्यांची स्थिति सुधारणार्थ नानाप्रकारच्या कलाकौशल्यांची उपपति योजण्यास्तव उचित कर्तव्यांचें विवेचन प्रतिपादन होत गेल्यावांचून केवळ भाषा व शब्द यांच्या ज्ञानानेंच कार्यसिध्दि होईल असें आह्मास तर वाटत नाहीं."—"दारिद्र्यापासून जनांस मुक्त करण्यास सदुपदेशयुक्त, समयोचित स्वतंत्र विषयांचेंच साद्यंत विवेचन व यथार्थनिरूपण किंवा प्रतिपादन न करतां, केवळ भाषासुधारणार्थ निबंध, सुभाषित, विनोद व महदाख्यायिका अशा एकदेशी व विलासप्रचुर विषयांचेंच उद्घा-

टन होत गेल्यास, लोकस्थिति सुधरून, देश मातबरीस कधीं तरी चढेल असें वाटत नाहीं."—पुस्तकें कोणत्या तऱ्हेचीं असावीं येवढ्या विषयाचें येवढ्या झोकानें व सफाईनें ज्यानें घाटन करायाचें काम आपणावर घेतलें, त्यानें अगोदर अंमळ शुध्दतरी लिहिण्यास शिकावें असें आह्मास वाटतें!—पण हें सध्यां एकीकडे ठेवूं. अगोदर या महालक्षणांतच तथ्य कितपत आहे तें पाहूं. हीं लक्षणें प्रस्तुत लिहिणारानें कितीसा विचार करून लिहिलीं असतील बरें! आम्हास तर वाटतें कीं, 'नुसत्या मनगटाच्याच जोरानें शौर्याचीं व अवसानाचीं कामें सहज करूं शकणाऱ्या' अद्भुत वीरांसारखातर हा प्रकार नसेलना! **स्पेक्टेटर, गार्डियन, ट्याटलर** अशा अनेक पुस्तकांनीं, किंवा आलीकडच्या **मेकाले**सारख्यांच्या निबंधांनीं इंग्लंडांत कितीशी प्रजावृद्धि झाली? कितीसें धन देशांत आलें? कितीसे कारखाने निघाले? मासिक पुस्तकांचा जर येवढा अद्भुत प्रभव असला, तर आपल्यासारख्या विपन्न देशासही इंग्लंड, अमेरिका अशांच्या योग्यतेस चढविण्यास फार उशीर नको! 'गल्लीगल्लीं छापखाने होऊन, घरोघर पत्रें, मासिक व इतर पुस्तकें लक्षसंख्येनें निघूं लागून, तीं राजापासून रंकापर्यंत सर्वांच्या हातीं आसनीं, शयनीं, भोजनीं घोळूं लागलीं, म्हणजे झालें!' वाः! येवढा सोपा उपाय आमच्या या 'सुज्ञ' लिहिणारास कोठें आढळा असेल तो असो! त्यानें **ब्रूअर**चा जो उतारा घेतला आहे त्यांतही 'ऐहिक सुखें,' 'संख्यावृद्धि,' 'कलाकौशल्यें,' 'देश मातबरीस चढण्याचे उपाय' वगैरे गोष्टींची गर्दी दृष्टीस पडत नाहीं! बरें, हींच लक्षणें सध्यां असणाऱ्या मासिक पुस्तकांसच जर लाविलीं, तर या कसास त्यांतली कितीक उतरतील? आम्ही 'त्या पुण्यग्रामीं नूतन उपजलेल्या **निबंधमाले**-' विषयीं बोलत नाहीं (कारण तिचें नांव काढल्याबरोबर आमच्या 'सज्जन' व 'सुज्ञ' लिहिणाराच्या मस्तकास तिडीक उठेल असें वाटतें!) तर त्याच्या पूज्यत्वबुद्धीस विषय झालेलीं जीं इतर पुस्तकें, व विशेषतः **दंभहारक** त्याजविषयींच पहा!

हीं सुरू झाल्यापासून वरच्यापैकीं एकही उद्देश यत्किंचित् तरी सिद्धीस गेला असेल असें आम्हास वाटत नाहीं; आणि असें असूनही त्यांचें जिणें सर्वथा व्यर्थ, असेंही आमच्या समजुतीनें अद्याप कोणास वाटत नाहीं.

पण वरील लक्षणांत आमच्या पुस्तकाला आपणाकडून येवढी कोटबंदी करून टाकली असतांही आमच्या निबंधांस, सुभाषितांस, विनोदास, महदाख्यायिकांस, आणि दुसरे आणखी या लिहिणारास न आवडणारे विषय कितीही घातले तरी त्यांस, खुशाल शिरतां येण्याजोगी खूप ऐसपैस जागा एके ठिकाणीं त्यानें ठेविली आहे, हें त्याच्या ध्यानांत नाहीं. वरच्या दोहोंपैकीं पहिल्या लक्षणांत 'विविधज्ञान' हे शब्द आले आहेत. तर या 'विविधज्ञाना-' च्या एका कोनाकोपऱ्यांत वरील सर्व लटांबर खपलें जाणार नाहीं काय?

येथवर वरील लक्षणाचें विलक्षणत्व दाखविण्याकारतां व त्याच्याच संबंधानें आमच्या पुस्तकाच्या तर्फेनें जें आम्हास लिहिणें अवश्य वाटलें, ते लिहिलें. आतां वरील आक्षेपांवर आमचें स्वतःचें म्हणणें कळवितों.

पत्र, मासिक पुस्तक किंवा स्वतंत्र ग्रंथ प्रसिद्ध करणें म्हणजे जरी नेहेमी 'पोटासाठीं केलेलें ढोंग-'च नसतें, तरी तो व्यापार दुकानदारासारखाच होय, यांत संशय नाहीं. म्हणजे जेणेंकरून लोकहित होऊन, त्यांत आपणासही लौकिक किंबहुना पैसाही मिळेल, अशाच उद्देशानें तो क्रम आरंभिलेला असतो. या तिहींचीही ज्यास पर्वा नाहीं, तो असल्या कृत्यास कधीं हात घालणार नाहीं हें उघड आहे. तेव्हां 'धनिका-' ने किंवा 'किताबवाल्या-' नेंही असें काम हातीं घेतल्याची त्यास मोठीशी शरम वाटण्याची गरज आहे असें आम्हास वाटत नाहीं! हें एक झालें. आतां दुसरें हें उघडच आहे कीं, ज्यानें दुकान घातलें तो आपणापाशीं जो माल असेल तोच आणील, व तो आणण्यास तो मुखत्यारही आहे. जर उद्यां कोणी बुधवारांत जाऊन गंध्यांच्या, माळ्यांच्या, किंवा पक्वान्नांच्या दुकानांस तेथून काहं

लागला, आणि म्हणाला, "लुच्चांनो! तुम्हीं आपला 'विलासप्रचुर' माल विकून लोकांचीं मनें बिघडवितां; चला निघा येथून! अरे, लोकांवर केवढा प्रसंग गुदरला आहे! काळ कोणता, वेळ कोणती, तुम्ही कांहीं पाहतां! अरे, घरीं दारीं चोहोंकडे विलायतेनें ग्रासलें! व्यापार बुडाला, देश दरिद्री होत चालला; तुम्ही कसेरे सुस्त! चला, उठा, दुकान आटपा, आणि मी सांगतों तसें करा! स्वदेशी कापडाचे माग घाला, आगपेट्या तयार करा, वक्त्यांचे वर्ग काढा, नव्या तऱ्हेचीं कीर्तनें करा, धर्म सुधारा! समजलांत! येथपर्यंत लोकसुधारणा झाली, म्हणजे मग लवकरच हातीं बंदुका, बेगनेटें देऊन स्वदेशी पलटणी तयार करायाच्या आहेत. त्यांवर युनिवर्सिटींत तयार झालेले खासे विद्वान्, कोणी कपतान्, कोणी एडिकांप्, कोणी जनरल्, कोणी कमांडर इनचीफ्, असे मग सहज करतां येतील! याप्रमाणे सगळीं कर्तव्यकर्में उरकल्यावर मग सरतेशेवटीं कोणाचा आदितवारांत, कोणाचा कारकोळपुऱ्यांत असे संगमरवरी पुतळे उभे करून खालीं **लोककल्याणेच्छु** अशीं ठळठळीत सोन्याचीं अक्षरें खोदूं!!" याप्रमाणें जर त्या गृहस्थानें त्यांस सदुपदेश केला, तर त्या दुकानदारांनीं असें उत्तर कां करूं नये:—"अहो! तुम्ही नुकतेंच कोठून वक्तृत्व किंवा कीर्तन ऐकून आलांसें वाटतें, तरीच देशैकनिष्ठेनें तुमचें मस्तक अगदीं फिरून जाऊन या अत्तरांचा तुम्हास वास येत नाहीं, फुलांनीं डोळ्यांस व घ्राणेंद्रियास आनंद होत नाहीं, आणि हीं उत्तम अन्नें पाहूनही रसना तशीच तटस्थ राहते! अहो, जे तुह्मी ज्यास त्यास आपलें शहाणपण सांगत फिरतां, त्या तुह्मीं आपल्या बोलण्याचा पुरतेपणीं विचार केला असालच! पण आह्मास येवढें सांगा बरें, कीं ज्या इंग्रज लोकांपासून तुम्ही देशकल्याणाचें हें शब्दाडंबर उचलिलें, त्यांच्याच देशांत आमच्या सारखे 'विलासप्रचुर' जिनसा विकणारे दुकानदार आहेत कीं नाहींत; व केवढेही दुर्धर प्रसंग त्यांच्यावर गुदरले तरी देखील त्यांची विकरी चालते कीं नाहीं? तुम्ही कदाचित् म्हणाल कीं, मद्यादिकांचीं जशीं

दुकानें आहेत तशींच हींही आहेत, ह्मणून हीं कांहीं चांगलींच ह्मणायाचीं असें नाहीं. असें म्हणाल, तर आमच्या गिऱ्हाइकांत 'सज्जन' असे तुम्हास कितीक दाखवून देऊं? व ज्यापक्षीं वरची हलकट उपमा तुम्हीं आम्हास दिली, त्यापक्षीं तुम्हावरही अंमळ झाडून तुम्हास विचारतों कीं, आपणासारखे सदासर्वदा आंबलेले व मठ्ठ—कीं ज्यांनीं आपल्या अरसिकतेस वैराग्य या नांवानें गौरवूं पाहावें—असेही आम्हास पुष्कळ माहीत नसतीलसें तुम्हास वाटतें काय? तशीच तुमची हीतरी केवढी धष्टाई, कीं तुम्ही कराल तेवढाच देशहिताचा मार्ग; बाकीचे सगळे एका तुमच्या म्हणण्यानें पार नाहींसे झाले? बरें, तसेंही घटकाभर म्हटलें; पण तुमचें लोककल्याण करण्यापुरती सर्वांच्याच अंगीं शक्ति अगर हिंमत आहे, हेंतरी तुह्मीं कशावरून ताडलें? उद्यां वर ह्मटल्याप्रमाणें तुह्मी पलटणी तयार करण्याचा घाट घालून, जो सांपडेल त्यास मारून मुटकून जर शिपाई करूं लागाल, तर तुमच्या शहाणपणास लोक काय ह्मणतील?—तर, महाराज, आमचा माल जर तुमच्या पसंतीस पडला नाहीं, तर त्यांत कांहीं मोठेंसें बिघडलें नाहीं! आपण आलां त्या वाटेनें चालते व्हा ह्मणजे झालें. जे अजून पोरबुद्धि आहेत, किंवा ज्यांची आपणाप्रमाणें अजून वैराग्यवृत्ति बाणली नाहीं, असे आम्हास पुष्कळ दुसरे गिऱ्हाईक आहेत. आपण एकट्यानें नाक मुरडलें, म्हणजे अवघे लोक आपणास अनुसरून, न जाणों आम्हास गाशा गुंडाळण्याचीच कदाचित् पाळी आणतील, या भयानें परोपकारबुद्धीस्तव जर आपण हा उपदेश आम्हास केला असेल, तर तुमचे आम्ही खरोखर उपकारी झालों! पण या अज्ञ जनांचे दोन शब्द जर आपण मनास आणाल—ते आपल्या अंगच्या अत्यंत लीनतेमुळें आपण आणणारच नाहीं अशी आमची खात्री आहे—तर त्या उपकारांची शतांशानें तरी फेड होईल, अशी आमची आशा आहे! आतां आपणास विनयपूर्वक सांगणें येवढेंच आहे कीं, आपल्या अभिप्रायावांचून म्हणजे जगाचें नेहेमी खोळंबेलच ही व्यर्थ भ्रांति

टाकून द्या; आणि तुम्हास खचीत सांगतों कीं, जो आपला विषय नव्हे, ज्यांत आपली गति नाहीं—व इतःपर होण्याचा संभवही नाहीं,—ज्यांत आपणास कांहीं कळत नाहीं, त्यांत बोलून फशीं पडण्यापेक्षां आपलीच आपण शोभा राखणें हें फार उत्तम ! ! "
सारांश, आक्षेपकांस आमचें इतकेंच सांगणें आहे कीं, ज्यास जो लोकसेवेचा मार्ग आवडेल तोच त्यास उत्तम होय, व तोच त्याच्या हातून चांगला निभावला जाईल; त्यास दुसऱ्यांनीं इतर मार्गाचा उपदेश करणें ह्मणजे दुहेरी मूर्खपणा आहे. एक तर, त्याच्या मनांतूनच तें नसलें तर त्याविषयीं त्यास आग्रह करणें व्यर्थ होय; व दुसरें असें कीं, जरी मनांतूनही असलें, तरी तीं दुसरीं सर्व कामें त्यास साधतीलच असेंही नाहीं. याप्रमाचेंच जर आमचें पुस्तक सर्वांस आवडलें नाहीं, तर त्यांत दोष कोणाचा ? व आश्चर्य तरी कसचें ? जे येवढे बहादर कीं गेल्या वर्षीं कित्येक महिने श्रम करून कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं केलेला नाटकप्रयोग—कीं ज्यास खऱ्या रसिकांनीं व विद्वानांनीं माना डोलविल्या, आणि एकंदर लोकांस तर ज्यानें केवळ तटस्थ करून टाकलें—तो पाहूनही ज्यांच्या हृदयास विकार झालाच नाहीं, तर नाटकगृहांत देहमात्रेंकरून असून ज्यांचें मन त्यांच्या दुकानीं व स्वदेशी कापडाच्या मागांतच रंगून राहिलें होतें, आणि ज्यांनीं नाटकप्रयोगाच्या उपयोगाविषयीं पुढें कित्येक महिने मोठ्या निकरानें वाद चालविला, अशा महारसिकांनीं जर आमच्या **निबंधमालेचा** अव्हेर केला, तर तें तीस दूषण होय कीं भूषण होय बरें ! आम्हास तर असें वाटतें कीं, जर या पुस्तकाच्या शिफारसी आम्हास लिहिणें झाल्या, तर वरील रसिकशिरोमणीची उपेक्षा किंवा तिरस्कार त्या सर्वांच्या शिरोभागीं आम्ही घालूं !

तसेंच **दंभहारकां**तील लिहिणारासही आमचें हेंच सांगणं आहे कीं, आमचें पुस्तक जर त्याच्या पसंतीस पडलें नाहीं, तर न पडेना ! सर्व विश्व जर तो नटला असता, व सर्व लोक त्याच्या

विभूति असत्या, तर बरीक आम्हास मोठी पंचाईत येऊन पडती. पण तसें मुळींच नाहीं. त्याच्यापेक्षां मराठी भाषा ज्यांस पुष्कळ चांगली समजते, ज्यांच्या अंगीं विद्वत्ता, रसिकता, समंजसता इत्यादि गुण त्याच्याहून अनेकपटीनें अधिक वास करतात, अशा वाचकांच्या बुद्धीस तो आपल्या 'अवसानोत्पादक' अभिप्रायानें भ्रंश पाडूं शकेल हें अगदींच संभवत नाहीं. आतां तो कदाचित् आम्हास विचारील कीं, मग तुम्हींतरी आमच्या **दंभहारका**विषयीं अभिप्राय प्रगट कां केला ? त्यावर आमचें त्यास उत्तर हें आहे कीं, आमच्या पुस्तकावर त्यानें अभिप्राय दिल्याबद्दल आमचें कांहीं बोलणें नाहीं; इतकेंच कीं, जो अभिप्राय द्यावयाचा तो केवळ 'अवसान' उत्पन्न करण्याकरितां किंवा 'नुसत्या मनगटाचा जोर' दाखविण्याकरितां देणें हा पोरकटपणा आहे. ज्यांत मुद्दातर कांहीं नाहीं, अर्थविरोध मनस्वी, रचना धड नाहीं, शब्द अशुद्ध, आपण ज्यावर लिहावयास आरंभ केला त्याचीसुद्धां नीट माहिती नाहीं, अशा प्रकारचा मजकूर सर्व लोकांपुढें पुस्तकद्वारें प्रसिद्ध करणें, हें साहस, रागानें जो वेडावून गेला, त्याखेरीज इतरांकडून होणें नाहीं असा मनुष्य 'सुज्ञां-'च्या व 'सज्जनां-'च्या क्षमेस व दयेस मात्र पात्र होतो. व अशाच समजुतीनें त्याच्या मजकुरावर जेवढी कडक चर्चा करणें एरवीं हावें होतें तितकी आम्हीं केली नाहीं.

आतां या लिहिणारावर वरील मोठमोठीं दूषणें कोणत्या आधारावर दिलीं तें लिहिणें अवश्य आहे. पहिल्यानें केवळ भाषेच्या संबंधानें. हा मजकूर चांगला व्यवस्थेनें जुळला नसल्यामुळें, तो पुष्कळ दुर्बोध झाला आहे; चांगला दोन तीन वेळां मननपूर्वक वाचल्याखेरीज अगोदर अर्थच कळत नाहीं. हें तो मजकूरच वाचल्याखेरीज उतान्यांनीं नीट ध्यानांत येणार नाहीं. पण कित्येक शब्दतर किती अशुद्ध आहेत हें पाहिलें असतां वरील गोष्टीचा कांहीं तर्क करतां येईल;— 'संन्यायता' (सन्यायता), 'व्याकरणनियमांनुसार' (अनुस्वार नको), 'साद्यंत्य' (साद्यंत), 'वरील दूषणोक्त (?) उद्गार,'

'निस्पृही' ( निस्पृह ), 'उत्पत्तिकारण मयत बाळ गंगाधरशास्त्री,' 'अवसानी क्रिया,' 'अवसानोत्पादक,' इत्यादि. 'शंका वितळत चालली आहे,' 'श्रम उभारले आहेत' वगैरे. हा मुंबईकडच्या मराठीचा तर प्रकार नसेल ना!– 'केवळ भाषा व शब्द यांच्याच ज्ञानानें कार्यसिद्धि होईल असें आम्हास तर वाटत नाहीं;' 'केवळ भाषासुधारणार्थ निबंध, सुभाषित, विनोद—इ०'; 'हवे तितके शब्दप्रचुर व व्याकरणसूत्रांनीं ( अं! हीं सूत्रें यांस कोठें आढळलीं असतील तीं असोत! आम्हास तर येवढ्या पंडितानें दिलेली ही **पाणिनीची** योग्यता अंगीं नसतां नको!) ओतप्रोत भरलेले निबंध, किंवा '**मजेची**' (?) अशीं आरबी भाषेतील सुरस गोष्टींसारखीं भाषांतरें अथवा सुभाषित, विनोद, महदाख्यायिका, असे असे चुटके घालून—इ०'; याप्रमाणें भाषा, शब्द, व्याकरण इत्यादिकांस तुच्छ करणारानें, आणि शत्रूस 'नुसत्या मनगटाच्याच जोरानें' शासन करणाऱ्या, 'जरत्कारु' नसणाऱ्या महावीरानें, वरील पोरकट चुक्या कराव्या हें अनुरूप खरें! आम्हास तर वाटतें कीं, आमच्या **निबंधमालेनें** अशा 'सुज्ञ' लोकांस, भाषा शुद्ध कशी लिहावी, येवढेंच शिकविलें तरीसुद्धां बस आहे! या लेखांतील अर्थविरोध, मासिक पुस्तकांच्या स्वरूपाविषयीं जें वर लिहिलें आहे, त्यांततर एक मोठा आधीं दाखविला आहेच. त्याशिवाय दुसरा मोठा विरोध आह्मास हा दिसतो कीं, आम्ही ज्यास त्यास नांवें ठेवितों म्हणून हाका मारीत असतां, त्याच तोंडानें 'आर्जवप्रिय' ( काय सुंदर समास !) 'तोंडपुजे,' 'लुबरे,' 'दुबळे,' 'खुशामती' अशींही अमोलिक विशेषणें त्यानें आम्हास दिलीं आहेत! हा वर्षाव आमच्यावर कशावरून झाला हें हा 'सज्जन' गृहस्थ सांगेल तर बरें होईल! तसेंच आमचे अंकही यानें नीट लक्षपूर्वक वाचले नाहींत, हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट दिसतें:–"भाषांतरानें अपरिचित गोष्टींचीं वर्णनें मासिक पुस्तकांत नसावीं, अशी चिळस दाखवीत असतांना आपणही तशाच प्रकारच्या चुटक्यांनीं बरीच जागा भरून काढणें अथवा उपमाउत्प्रे-

क्षादि अलंकार दाखविण्याच्या हेतूनें सुभाषित घालीत असतां " चंद्राचें अमृत प्राशन करण्यास असतांही अप्सरांच्या अधराचें मद्यही आवडतें " असा रंगेल्या जनासारखा हलकट प्रकार दाखवावा हें नीट दिसतें काय ? " आमच्या चुटक्यांत 'अपरिचित गोष्टींचीं वर्णनें' कोणतीं आहेत ? आणि आमच्या सुभाषितांचा उद्देश आमच्या वाचकांस अलंकारशास्त्र शिकवावें असा असल्याचें आम्हास तर ठाऊक नाहीं, मग आमच्या मुंबईकर मित्रास तो कसा कळला असेल, ईश्वर जाणे ! आमच्या निबंधांत त्यास 'व्याकरणसूत्रें' दिसलीं तसा तर हा कांहीं प्रकार नसेलना ! बरें, वरच्या अवतरणचिन्हांतर्गत शब्दांत त्यास रंगेल जनासारखा हलकट प्रकार कोणता दिसला असेल बरें ? 'मद्य' शब्दाचा भलताच अर्थ समजून तो त्याच्या अंतःकरणांत झणाणला असेलसें दिसतें. असें असेल तर बरीक त्या शब्दाविषयीं त्यास येथें इतकेंच सुचवितों कीं, त्याचा सरळ अर्थ येथें विवक्षित नसून, लाक्षणिक अर्थ घ्यावयाचा. तें मद्य अत्यंत निर्दोष असून, त्याशिवाय हें जग एकदम दोहोंप्रकारें ओसाड होऊन जाणारें आहे !

आतां, आमच्या मतांचें खंडन यांनीं कितपत केलें आहे, तेवढें मात्र येथें सांगून, हें टीकेचें खंडन संपवितों. आमचे प्रतिपक्षी शेवटीं म्हणतातः—

" असो, विस्तार फार झाला, आतां पुरे करतों, त्यांच्या स्वतंत्र विचाराच्या प्रत्येक मासल्यावर टीका करूं गेल्यास, एक मोठी **निबंधमालाच** होईल. पहा, त्यांणीं मागील काळच्या अशा कांहीं पुस्तकांविषयीं लिहितांना, " त्रैमासिक ज्ञानदर्शन " याचें उत्पत्तिकारण मयत बाळ गंगाधर शास्त्री होते, असें जें म्हटलें आहे, ती चूक आहे. तें पुस्तक, त्यांच्या मागें, भाऊ महाजन म्हणून एक मराठी भाषाभिज्ञ व निस्पृही विद्वान् काढीत असत व ते अद्याप जिवंतही आहेत. "

**वाः ! आमच्या 'स्वतंत्र विचाराच्या मासल्याचें' काय नामी खंडन झालें हो ! पण लवकरच त्यांनीं हात आटपला म्हणून बरें झालें. नाहीं तर, आमच्या पुस्तकाचा सांचा द्वादशपत्री आहे, आमचें**

पुस्तक ‘ पुण्यग्रामीं ’ निघतें, त्याचा कागद सरासरीच असतो, अशा ‘ आमच्या विचाराच्या मासल्यां-’वर जबरदस्त टीका होऊन, ‘ एक मोठी **निबंधमालाच** ’ झाली असती ! ‘ ज्ञानदर्शना-’वर जे आम्हीं आक्षेप काढले होते, त्यांचें निराकरण वरील चूक काढल्यानें कसें झालें, तें आम्हास समजत नाहीं ! आम्हास **भाऊ महाजन** यांचें नांव माहीत नव्हतें हें आम्ही कबूल करतों, व तें कळवून आपल्या भाषेच्या हितकर्त्यांपैकीं एकाची माहिती आह्मास करून दिली, याबद्दल या लिहिणाराचे आम्ही आभार मानतों. पण एका नांवाची माहिती करून दिल्यानें, आमचे सर्व विचार एके क्षणांत शुष्क कसे ठरले, हें या लिहिणारानेंच दाखविलें पाहिजे !

हा मजकूर लांबतां लांबतां बराच लांब झाला. तरी ज्याअर्थी मुख्य विषयाखेरीज दुसऱ्याही कित्येक महत्वाच्या गोष्टींचें यांत विवरण झालें आहे, त्या अर्थी या विस्ताराबद्दल आमचे वाचक आम्हास फारसा दोष लावणार नाहींत, अशी आम्ही आशा करितों. आणि ज्यानें हा लेख विशेषतः वाचावा अशी आमची इच्छा आहे, त्यास सुभाषित, विनोद इत्यादि हलके प्रकार आवडत नाहींत; यास्तव इकडूनही पाहिलें असतां, झालें तें बरेंच झालें, असें ह्मटलें असतां चालेल. असो; तरी शेवटीं आणखी एक दोन गोष्टींच्या संबंधानें येथें प्रसंगानुसार थोडेंसें लिहिणें इष्ट दिसतें.

एक, आमच्या नवीन विद्वानांविषयीं आम्ही प्रसंगवशात् कोठें कोठें लिहितों, तें. असा मजकूर, गर्वानें, मत्सरानें, किंवा व्यर्थ मानखंडना करण्याच्या उद्देशानें, आह्मी लिहितों, असें जर कोणी समजत असतील तर ती त्यांची मोठी चूक आहे. तसें करण्यानें आमच्याकडे प्रतिष्ठा येणार आहे, किंवा त्याविरुद्ध प्रकार होणार आहे; हें आमचे वाचक जाणत असतीलच. त्यांचे—अथवा या ठिकाणीं ‘आमचे’ असेंही म्हटलें असतां चालणार आहे—जे कित्येक मोठे दोष आहेत ते कोण जाणत नाहीं ? त्यांवर कोण चर्चा करीत नाहीं ? युनिव्हर्सिटीच्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं अध्यक्षांच्या भाषणांत, वर्तमानपत्रांतून, एकंदर

लोकसमाजांत, प्रत्यक्ष आमच्या आमच्यांतच त्याविषयीं वाटाघाट होत नाहीं काय? मग पुस्तकांतील लेखाच्याही रूपानें तींच मतें प्रगट केल्यांत कोणता गुन्हा झाला? आपले खरेखुरे दोष उघडपणें कोणीं सांगितले असतां, तें न आवडून, तसें करणारावर भलभलत्या शंका घेणें, हें खऱ्या विद्वत्तेचें लक्षण काय? थोर थोर ग्रंथकारांचें अध्ययन करून, त्यांच्या प्रगल्भ विचारांनीं ज्यांचें मन उज्वल झालें, त्यांस जर मोठेपणाची समजूत येऊं नये, तर मग यावी कोणास? नुसत्या गुणांबद्दल आपली प्रशंसा केलेली ऐकावी, आपले वास्तविक दोष उघडकीस न आणतां, त्यांजवर घालवेल तितकें पांघरूण घातलेलें पाहावें, अशी जर आमच्यापैकीं कोणाची इच्छा असेल, तर त्याच्या विद्वत्तेस धिक्कार असो; त्यानें आपला किताब सोडून देऊन, मी भरसमुद्रांत कोरडा निघालों असें म्हणून घ्यावें! निदान आमच्या हातीं येवढें तरी आहे, कीं वरील मत्सरादि दोष आम्हावर आणखीही जरी कोणी घातले, तरी त्यांचें भय धरून वर सांगितलेलें जाणून बुजून लबाडीचें लाजिरवाणें कृत्य आम्ही कधीं करणार नाहीं; व आमच्या समजुतीनें आम्हास जें वाटेल तें निर्भीडपणें लिहिण्यास आम्ही कधीं चुकणार नाहीं!

हें, आमच्या नव्या लोकांविषयीं जें आमच्या लिहिण्यांत येतें, त्याविषयीं झालें. आतां, पहिल्या अंकांत मराठी भाषेच्या संबंधानें जीं कित्येक मतें प्रदर्शित केलीं आहेत, तीं लोकमतविरोधाच्या हौसेनें किंवा उगीच फुगवून लिहिलीं आहेत असें कित्येकांस कदाचित् वाटलें असेल. पण त्याच विषयावर सुमारें चार वर्षांमागें 'एज्युकेशनल रेकर्ड' या पुस्तकांत आमचे सर्वमान्य व महाविद्वान् असे माजी प्रिन्सिपाल **वर्ड्स्वर्थ**साहेब यांनीं जे आपले सखोल विचार प्रदर्शित केले आहेत, ते वाचून त्यांचें मनन करण्यास आमच्या सशंक वाचकांस आम्ही शिफारस करतों. आमचा निबंध आटपल्यावर आमच्या मतांशीं त्यांचा अगदीं बरोबर मेळ बसलेला पाहून आम्हास फार उमेद आली. तर आमची खात्री आहे, कीं त्यांचा नीट

यथास्थितपणें विचार केला असतां, आह्मीं प्रदर्शित केलेली मतें सर्वांस अगदीं खरीं भासतील.

आमच्या पुस्तकास निघण्यास बराच उशीर होतो, यास्तव त्यासंबंधेंही थोडेंसें लिहिलें पाहिजे. तें येवढेंच कीं, हा प्रकार जरी सध्यां कांहीं महिने कदाचित् चालेल, तरी तो पुस्तककर्त्याच्या आळसामुळें किंवा दुसऱ्या कोणत्याही अशा प्रकारच्या कारणांनीं होईल, असें आमच्या आश्रयदात्यांनीं समजूं नये. जें त्यांस सादर करायाचें, तें जितकें निर्दोष करतां येईल तितकें करावें, अशी त्याची इच्छा आहे. यास्तव सध्यांच्या उशीराबद्दल माफी करून, पुस्तक चालू असण्याविषयीं वगैरे त्यांनीं बिलकूल शंका मनांत धरूं नये. आणि सध्यां जी अव्यवस्था झाली आहे, ती लवकरच मोडेल, हेंही त्यांस पुनः विनयपूर्वक कळवितों.

आतां सरतेशेवटीं आमचा बंधु **दंभहारक** यासही थोडीशी विनंति करणें आहे. ती इतकीच कीं, वर जो वाद झाला तो फक्त आमच्या प्रतिपक्ष्याचा व आमचा. यास्तव त्यांतील कांहीं शब्द जर स्वतःस लागण्यासारखे त्यास वाटले, तर ते केवळ त्या मजकुराच्या संबंधानेंच आह्मास लिहावे लागले, असें त्यानें समजलें पाहिजे. आमच्या बंधूंशीं कोणाशींही मुद्दाम भांडण्याचा आमचा उद्देश नाहीं; आणि जरी कदाचित् तसाही प्रसंग आला, तरी मोठ्या कडाक्याच्या भांडणांतही आह्मी बंधुप्रीति व नियम यांस विसरणार नाहीं.

---

## नंबर ३.

[ निबंधमाला, अंक २६, फेब्रुवारी १८७६ ]

[ **दर्पोक्ति**—रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—वि० वि० तुह्मीं माझें पहिलें पत्र, माहे डिसेंबर अंक २४ यांत, कृपा करून छापिलें, त्याविषयीं मी तुमचा आभारी आहें. तुह्मी प्रकृत निबंधाच्या मुखपृष्ठावर जें अवतरण लिहिलें आहे, तें केवळ सदोदित आपल्यासच लावूं पाहातां, तसे न करितां माझे पत्राकडे त्याची योजना केली असती,

तर तें पत्र रागावून लिहिलें आहे असें तुह्मास वाटलें नसतें. कारण त्या पत्रास उत्तर लिहितांना, पंडित दयानंद यांच्या संबंधानें मजवर मिथ्यास्तुतिपाठ करण्याचा जो आरोप तुह्मीं आणिला आहे, तो खरा असून, हा गुण माझे आंगीं असता, तर तुमच्याही निबंधमालेची मिथ्यास्तुति करून तुमची प्रीति संपादन करण्याचा यत्न मीं केला असता. परंतु मला तशी संवय नाहीं, व मला तसें करणें अगदीं अनुचित वाटतें; यास्तव तुमच्या मालेंत कित्येक चांगले गुण असून जे दोष मला फार अपकारक दिसले, व हल्लींही दिसत आहेत, ते स्पष्टपणें सांगितले. परंतु तें तुह्मास रुचलें नाहीं, असें, तुह्मी रागावून प्रकृत निबंधांत जी अगदी अनर्गळ बरळाबळ केली आहे तीवरून स्पष्ट होतें. याचें कारणही, तुह्मी इतरांच्या उद्देशानें "अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः" हें जें अवतरण लिहिलें आहे, त्यांत उघड सांगितलें आहे. आजपर्यंत तुमची मौज पाहणारांनीं तुह्मास यथेच्छ लिहूं दिलें, यामुळें तुह्मास सर्वज्ञतेचा भ्रम होऊन, तुमच्या ज्ञानचक्षूंवर जी आंधेरी आली आहे, ती काढून टाकण्याविषयी चिकित्सा व पथ्य यांची तजवीज करूं लागतांच, तुह्मास तें अत्यंत अप्रिय लागलें. तुमची माला घेणारांची संख्या वाढली, येवढ्यावरूनच ती निर्दोष आहे असें अनुमान तुह्मी बांधूं नका. ज्या "बांबे ग्याझेट" कर्त्यास एतद्देशीय लोकांची विनाकारण निंदा करणें फारच गोड वाटतें, त्याच्याही पत्रास आपल्या लोकांतसुद्धां पुष्कळ वर्गणीदार आहेत; यावरून एतद्देशीय लोकांविषयीं त्याचें ह्मणणें खरें, किंवा त्याची लिहिण्याची पद्धति निर्दोष, असें त्यास वाटलें असतां, तें सर्वथैव मिथ्या आहे. तोच न्याय तुमच्या मालेसही लागू आहे. अशा प्रकारचें एकादें नवीन पत्र किंवा मासिक पुस्तक, कितीएक लोक प्रथम केवळ अपूर्व जिज्ञासेनें घेतात. कित्येकांस त्यांत कांहीं दोष आढळलेत तरी काळें करून ते नाहींसे होतील व त्यांतील गुण विशेष दृढ होतील, अशा आशेनें घेतात. कित्येक अशा प्रकारचा उद्योग आरंभीं कितीही अप्रयोजक असला तरी तो दिवसानुदिवस सुधारून प्रचारांत यावा या बुद्धीनें मदत करितात. असें कांहीं नसून, केवळ तुमच्या ओढून आणलेल्या सर्वज्ञतेस भुलून, तुमच्या निबंधांत कांहीं अद्वितीय गुण पाहिल्यावरून निबंधमालेस पुष्कळ वर्गणीदार मिळाले अशी तुमची समजूत असेल, तर तुह्मी मोठी चूक करीत आहां. व हें कांहीं वेळानें तुमच्याही प्रत्ययास आल्यावांचून राहणार नाहीं, अशी

माझी पूर्ण खात्री आहे. तसेंच तुमच्या मालेवर फारशी टीका करण्याचा यत्न कोणी करीत नाहीं, यावरून तुमचें लिहिणें सर्वसंमत व तुमची सर्वज्ञता निर्विवाद आहे, असें अनुमान जर तुह्मी करीत असाल, तर तीही तुमची मोठी चूक आहे. तुह्मासारख्या वितंडवाद करणाऱ्यांबरोबर विवाद करून कांहीं फल नाहीं, असें पक्कें समजून, पुष्कळ लोक उदासीन, किंवा केवळ तुमची मौज पहात राहात नाहींत असें अनुमान कशावरून होत नाहीं? तर या दोन गोष्टींच्या संबंधानें तुह्मीं जी आपली दर्पोक्ति प्रकट केली आहे, ती अगदीं निर्मूल आहे, असें ह्मटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. तुह्मीं आपल्या उत्तरांत, मीं दाखविलेले दोष उडविण्याचा जो यत्न केला आहे, तो सत्य, विवेक, व विनय या तिन्ही गोष्टींकडे अगदीं दुर्लक्ष करून, इतका विलक्षण प्रकारचा केला आहे, कीं त्यावरून तुमचे दोष पूर्वींपेक्षांही विशेष स्पष्टपणें तुमच्या प्रकृत उत्तरांत दिसून येत आहेत, याचें मला फार वाईट वाटतें. आणि तुमच्या निबंधमालेचें हित व्हावें अशी माझी मनापासून इच्छा आहे ह्मणून तुमची आणखी एक वेळ कानउघाडी करावी, या हेतूनें हें दुसरें पत्र लिहिलें आहे. आतां तुमच्या उत्तरांतील प्रत्येक मुद्यावर सर्व समंजस लोकांची खात्री होण्यासारखें प्रत्युत्तर सहज देतां येईल. परंतु हल्लींपेक्षां विशेष शांततेनें, मर्यादेनें, व सत्यशोधक बुद्धीनें लिहूं लागापर्यंत तसें करण्यांत हांशील नाहीं, ह्मणून मी तो यत्न आज करीत नाहीं. फक्त एक दोन गोष्टींविषयीं जो तुह्मीं उलट दोषारोप केला आहे, तो अगदीं निर्मूल आहे, हें दाखविण्याकरितां मात्र चार ओळी लिहितों.

दयानंदजींविषयीं लिहितांना, त्यांचे आंगीं जे गुण मला यथार्थ दिसले ते मी आपल्या पत्रीं सांगितले असून, मीं त्यांचा मिथ्या स्तुतिपाठ केला असें तुह्मी ह्मणतां तें कशावरून? मनांत एक असून बाहेरून मात्र स्तुति केली, किंवा एके ठिकाणीं निंदा करून अन्यत्र कांहीं आपमतलबानें स्तुति केली, असें झालें असेल तर माझें ह्मणणें मिथ्या ठरेल. परंतु तसें झाल्याचें एकही प्रमाण तुह्मीं दिलें नाहीं. दयानंदजींचा व माझा कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं. त्यांणीं स्थापिलेल्या कोणत्याही समाजाचा मी सभासद नाहीं, व अशा समाजाचा उल्लेखही माझ्या पूर्वींच्या पत्रांत कोठें नाहीं. त्यांचीं वेदादिकांविषयीं मतेंही मला संमत नाहींत, हें मी आपल्या पहिल्या पत्राखालील टीपेंत सांगितलेंच आहे. व त्यांची वादविवादाची

पद्धतही मला आवडत नाहीं. तथापि त्यांची एकवार गांठ पडून जें पुष्कळ वेळ संभाषण झालें व त्यांचें जें एक व्याख्यान माझ्या ऐकण्यांत आलें, त्यावरून, व बाबू केशव चंद्रसेन, बाबू प्रतापचंद्र मुजुमदार, व 'इंडियन मिरर-' चे कर्ते वगैरे कित्येक बंगाली ब्राह्म यांचा बहुत दिवसांचा अनुभव, त्यांच्याच (बाबूंच्या) मुखानें ऐकिल्यावरून, व हे पंडित निस्पृहतेनें आज कित्येक वर्षे ठिकठिकाणीं जाऊन, हलकट लोकांची टवाळी व व्यर्थ निंदकांनीं केलेली निर्भर्त्सना यांची बिलकुल पर्वा न करतां, स्वदेशसुधारणेच्या कामीं यथामति यत्न करीत आहेत, हें पाहून जे गुण त्यांच्या आंगीं दिसले तेच यथार्थ सांगितले. असें असून केवळ तुमचा त्यांजविषयीं ग्रह उलटा आहे, ह्मणूनच मीं लिहिलें तो मिथ्या स्तुतिपाठ आहे असें ह्मणणें अगदीं साहसाचें आहे, असें कोण कबूल करणार नाहीं ?

दुसरें, तुह्मी आपल्या उत्तरांत, पृष्ठ ३३ यावरील टीपेंत, "ज्या अधमाधमाची लीला" मला "लडिवाळपणाची वाटते" ह्मणून माझी "धन्य आहे," असा अत्यंत निंद्य आरोप मजवर केला आहे, व ज्याणें "शें दोनशें रुपयांच्या लालचीस भुलून दगेखोरपणाचें काम पतकरलें व आपल्या आर्यजननीस अक्षय्य काळोखी लावून, देशबांधवांस गळफांस लावण्याचा प्रयत्न केला," तो 'अधमाधम' कोण, व तुह्मी ज्या निंद्य वर्तणुकीचा उल्लेख केला आहे ती कोठें, कोणच्या प्रसंगीं, व कशी घडली, याविषयीं मला पूर्वीचें पत्र लिहिते वेळीं व अजूनही कांहींएक श्रुत नसतां, त्याचा मी कैवार घेतला, हें तुह्मास कसें समजलें बरें ? व त्यावरून मी त्याच्याच माळेंतला, हा जो अभिप्राय तुह्मीं ध्वनित केला आहे, तो करितांना तुह्मी या गोष्टीच्या सत्यासत्यतेविषयीं काडीमात्रतरी विचार केला काय ? मी व माझ्या येथल्या कित्येक मित्रांनीं, अशी एखादी गोष्ट प्रसिद्ध झालेली आठवते कीं काय, हें पाहण्याचा यत्न केला, परंतु कोणासही अशी एक देखील गोष्ट स्मरत नाहीं. व माझें पत्रही त्या मित्रांनीं पुनःपुनः वाचून पाहिलें, परंतु त्यांत उल्लेख केल्यापैकीं कोणची व्यक्ति या तुमच्या 'अधमाधम' पदवीस पात्र आहे याचाही पुष्कळ विचार केला, परंतु कोणासही तसें कांहीं दिसत नाहीं व ऐकिल्याचेंही स्मरत नाहीं. कदाचित् तुमच्या पुण्यक्षेत्रीं एखाद्या कोना कोपऱ्यास कधीं तरी तुह्मीं लिहिलेली गोष्ट घडली असेल. परंतु 'कूपमंडूक' न्यायानें ती सर्व जगास माहीत असली पाहिजे,

अशी जर तुमची समजूत असली, तर ती व्यर्थ आहे. कारण येथें तर आह्मा कोणास ती ठाऊक नाहीं, व इतर ठिकाणींही बहुत लोकांस ती माहीत असेल असें वाटत नाहीं. तेव्हां कोणच्या प्रमाणावरून अशा मनुष्याची लीला मला लडिवाळपणाची वाटते असें तुह्मीं ह्मटलें, एवढें कृपा करून आपले येत्या अंकांत सांगाल तर, व तसेंच इतर असंख्य लोकांस, असें अद्भुत साहस करणारा, ज्याच्याविषयीं "आमच्या महाराष्ट्र भाषेंत जेवढे ह्मणून कठोर शब्द आहेत व तिच्या अंगीं निंदाव्यंजकत्व जेवढें ह्मणून आहे तेवढ्या सर्वांचा असल्या महापातकी मनुष्यावर वर्षाव केल्याखेरीज आह्मी कधीं राहणार नाहीं" ह्मणून तुह्मीं आपल्या उत्तरीं "आपला कृतसंकल्प" लिहून कळविला आहे, त्याची माहिती होऊन, आह्मीही सर्व मिळून शब्दांचा व निंदावचनांचा वर्षाव करून त्याची चटणी कोशिंबीर करून टाकूं.

परंतु निबंधमालाकर्तेरावजी, तुह्मी ज्या गोष्टीविषयीं लिहितां, ती जरी खरोखरी अतिनिंद्य आहे व ती आचरणारा मनुष्य जरी खरोखर अत्यंत निंदेस पात्र आहे, तरी आपण त्याजविषयीं जो "कृतसंकल्प" आपल्या उत्तरीं कळविला आहे, त्यावरून असा अजमास दिसतो कीं, आपल्यास या विशाल जगामध्यें असा 'अधमाधम' एकच व आजच दृष्टीस पडला आहे. यावरून, तुमच्या ऐतिहासिक ज्ञानाचें, प्रस्तुत काळच्या या व इतर देशांतील स्थितीच्या अनुभवाचें व सौजन्याचें बरेंच अनुमान करितां येतें. ईश्वरकृपेनें आमच्या देशांत हा एवढाच 'अधमाधम' असता, तर आह्मी खचीत मोठे भाग्यवन्त असतों. परंतु आमच्या दुर्दैवानें जागोंजाग अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें दृष्टीस पडतात. व द्रव्यलोभानें, किंवा विषयलोभानें, किंवा मिथ्या प्रतिष्ठेच्या व अधिकाराच्या लोभानें, "दगेखोरपणाचें काम पतकरून आपल्या आर्यजननीस अक्षय काळोखी लावून देशबांधवांस गळफांस लावण्याचा प्रयत्न करणारे" लोक सोधण्यास आपल्या पुण्यक्षेत्रांत देखील आपल्यास फारसें दूर जावयास नको. व प्रत्येक मनुष्यानेंही, क्रियेस कारणभूत जी मनःप्रवृत्ति, ती प्रसंगविशेषीं कामक्रोधादिकांच्या प्रबलतेमुळें किती निंद्य व कलुषित होते, याचा शांतपणें आपल्याठायीं विचार केला असतां, वर सांगितलेल्या प्रकारचा मनुष्य 'अधमाधम' असल्यामुळें, तो आमरण अत्यंत द्वेष्य व कठोरभावानें निंद्य होणें योग्य

आहे, असें कोणासही वाटणार नाहीं. मनुष्याच्या मानसिक दुर्बलतेकडे लक्ष्य दिलें असतां, अत्यंत निंद्य कर्म करणाराविषयींही, तुह्मी 'कृतसंकल्प' केला आहे अशा प्रकारचा कठोर भाव मनांत सतत वागविणें कोणासही श्लाघ्य होणार नाहीं. जसा सतत साधुवृत्त असा एकही मनुष्य आढळणें कठीण, तद्वत् सतत दुर्वृत्त असाही मनुष्य आढणें कठीण. यास्तव कोणीही मनुष्य केवळ आपल्या एखाद्या दुर्वृत्तामुळें सुजनांच्या सतत द्वेषास किंवा निंदेस किंवा कठोर वचनांस पात्र झाला असें आढत नाहीं. परंतु यावरून ज्या कृत्याचा उल्लेख तुह्मीं केला, तें पराकाष्टेचें निंद्य मला वाटत नाहीं असा मात्र तर्क तुह्मीं किंवा तुमच्या वाचकांनीं करूं नये. तो मनुष्य कोण हें जेथवर मला माहीतदेखील नाहीं, तेथवर मी त्याचा कैवार घेऊन लिहितों असें कोणी ह्मटलें, तर तें एखाद्या लहान मुलास देखील खरें वाटणार नाहीं. असो; निबंधकर्ते महाराज, आपण विलंब न करितां, एकवार कृपा केली तशीच पुनः करून, हेंही पत्र आपल्या येत्या अंकीं द्याल अशी आशा करितों. इतउत्तर आपल्यास तूर्त तसदी देण्याचा माझा हेतु नाहीं, हें मीं वरचे सुचविलें आहे. कळावें हे विनंति. मुक्काम रत्नागिरी, ता० २२ फेब्रुवारी १८७६.—**निबंधमाला-हितेच्छु.** ]

---

**दर्पोक्तीस कारण निंदाद्वेषव्रत नव्हे.**—वरील पत्र पाहून आम्हास खरोखर फार वाईट वाटलें. तें, त्यांत आमच्या पुस्तकावर कडाका उडविला आहे, ह्मणून नव्हे. असले प्रतिकूळ लेख आजपर्यंत आमच्या मालेंत थोडे आले आहेत असें नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत किंवा इतर ठिकाणीं आमच्या लेखांवर जी चर्चा केलेली कधीं मधीं आढळते, ती पाहून आह्मास कधीं यत्किंचितही खेद वाटत नाहीं. उलटा मोठा आनंदच वाटतो, कीं आम्हीं आमच्या विपन्न भाषेच्या व लोकांच्या प्रीत्यर्थ जो यत्न चालविला आहे, तो अरण्यरुदितवत् निष्फळ न होतां, लोकांचें त्याकडे चांगलें लक्ष आहे. आलीकडील कित्येक देशहितेच्छूंचा जसा प्रकार आढळतो, कीं स्तुति ह्मणून जेवढी येईल तेवढी घेण्यास मात्र नेहेमी आंकेलेला

आसायाचा, पण निंदेचा इवलासा घासही विषापेक्षां कडू लागून, लागलींच वेडींवाकडीं तोंडें करायाचीं,—( या गोष्टीचा प्रत्यय आमच्या गेल्या दोन तीन अंकांवरून आह्मास व पुष्कळांस चांगलाच आला! ) तो आम्हास अगदीं मान्य नाहीं. आमच्या लेखांवर टीका करण्याची जेव्हां जेव्हां आमचे कोणी देशबंधु मेहरबानी करतात, तेव्हां तिचें आम्ही नेहमीं प्रांजळ बुद्धीनें मनन करतों. जर सदरील टीका खरी व यथार्थशी आह्माला वाटली, तर लिहिणाराचे आभार मानून त्याचे विचार आह्मी कबूल करतों. पण तसें नसून जेथें दुरभिमानाचा, मत्सराचा, किंवा मूढबुद्धीचाच केवळ विकास झालेला आम्हास भासतो, तेथें लिहिणाराच्या असमंजसतेची व यत्नवैफल्याची आम्हास केवळ मौजच वाटते; आणि येवढाच विषाद वाटतो कीं, बिचाऱ्यानें अक्षरजननीस व्यर्थ कींहो शिणविली, व आपलें डोकें उगीच तापवून घेतलें !

वरील पत्राचा प्रकार असा नाहीं. त्यांत आमच्या पुस्तकाच्या एकंदर पद्धतीविषयीं व टीकाविषयक लेखाविषयीं जरी बराच कडक मजकूर लिहिला आहे, तरी तो वरील हेतूंच्या प्रेरणेचें फळ बिलकुल नसून, आमच्या हिताच्याच बुद्धीनें लिहिला आहे, याचा आह्मास बिलकुल संशय नाहीं. व यास्तवच वरील पत्राचा आह्मास तिळप्रायही राग न येतां, आमच्या ' हितेच्छू-' चें पूर्वीचें पत्र जसें आमच्या वाचकांस सादर केलें तसेंच हेंही वर केलें आहे. सदरील पत्रकर्त्याच्या विचारांवर आम्ही आपले विचार जसे गेल्या चोविसाव्या अंकांत स्पष्टपणें प्रदर्शित केले, त्याचप्रमाणें ' हितेच्छू ' नीं आमच्या उत्तरावर पुनः आपला अभिप्राय पाठविला असतां तोही वाचकांस सादर करणें आम्हास भाग आहे. असो; आतां प्रस्तुत पत्राविषयीं वर जो खेद दर्शविण्यांत आला, तो केवळ येवढ्याच करितां, कीं गेल्या चोविसाव्या अंकांतील आमच्या उत्तरानें ' हितेच्छू-'चें मन दुखावलें जाऊन, आमच्या पुस्तकाविषयीं त्यांचे कित्येक मोठे विलक्षण गैरसमज होऊन गेले. असें होणें कांहीं अंशीं साहजिकच होतें.

कारण त्या अंकांत कित्येक प्रसिद्ध व्यक्तींस अनुलक्षून वगैरे जो मजकूर आह्मीं लिहिला आहे, तो दूरच्या लोकांस चांगलासा कळण्यासारखा नसून, सगळा आमच्या साक्षात् प्रतिपक्ष्याच्या संबंधानेंच लिहिला आहे, असा सकृद्दर्शनीं भास होण्याचा संभव आहे. तसेंच कांहीं अंशीं 'हितेच्छूं-'स होऊन, आमच्याविषयीं अविनीतत्वादि दुर्गुणांची त्यांस कल्पना झाली असावी. पण आम्ही त्यांस व सर्वांस येथें स्पष्ट कळवितों कीं, कोणाही मनुष्याचे लौकिक संबंधाचे खरे दुर्गुण सर्वांस समजण्यासारख्या रीतीनें जर बोलून दाखविले, तर असें केल्यानें कोणाचाही उपमर्द केलासा होतो असें आह्मास बिलकुल वाटत नाहीं. येवढें आमचें इंग्रेज सरकार, जें आज आमच्या अवाढव्य देशाचा केवळ स्वेच्छेनें राज्यकारभार हाकीत आहे, तेंही यथार्थ दूषकांच्या किंबहुना निंदकांच्या शब्दांचा मार सोसण्यास जर केवळ आपखुषीनें निमूटपणें तयार आहे, व वरील कृत्यास तें राजद्रोह ह्मणून बिलकुल समजत नाहीं; तर आमच्या पुण्यासारख्या छोटेखानी शहराचा पुढारीपणा पतकरणारांनीं, किंवा आर्यसमाजासारख्या तुटपुटल्या धर्मपंथाच्या पुरस्कर्त्यांनीं, केवळ चार खरमरीत शब्दांमुळें इतकें घाबरें होऊन जावें, व 'जुक्ती'चें सामर्थ्य खुंटून जाऊन 'याचें लिहिणें काय अप्रयोजक आहे,' 'यानें अजून काय पाहिलें आहे,—कीं 'कौशल्यशिक्षक मंडळी' स्थापली आहे, कीं 'उजळणीचें पहिलें बूक' केलें आहे, कीं भरसभेंत उभें राहून कणादपाणिन्यादिकांचा नित्यशः उद्धार करून मीमांसेवर व्याख्यानें देतां येत आहेत—याला समजतें आहे काय?' असें फुकाचें सोपें समाधान आपआपसांत करून घेऊं पाहाणें, हें केवढें नवल आहे! आमच्या देशाची जी सुधारणा होणार व युरोपांतील देशांशीं टक्कर मारण्यास तो तयार होणार, तें सर्व वरच्यासारख्या नाजूक व सकुमार देशहितेच्छूंकडून होणार काय? निंदेचा शब्द यथार्थ असतांही तो ज्यांच्या जिव्हारीं जाऊन झोंबतो, व त्या वैतागासरसे देशकार्याच्या धुरेस झुगारून देण्यास जे एका क्षणांत तयार होतात, त्यांस

लोककल्याणेच्छु कोण म्हणेल? वरील नांवानें ज्या महापुरुषांची इतिहासांतून प्रसिध्दि आहे व अद्याप इंग्लंड वगैरे देशांत जे तसे लोक आहेत त्यांची प्रकृति वरच्यासारखी कोमळ आहे काय? पण हें साम्य हवें कशाला? हिरा तो हिरा; आणि कांच ती कांच. घणावर घण हाणले असतांही अभंग राहणें हा धर्म हिऱ्याचाच; कांचेनें कितीही लकाकी मारली तरी कोणाचा अंमळ धक्का लागला कीं पुरे,—तिचें वैभव आटपलें!

तर, याप्रमाणें आमच्या देशांतील कित्येक सभांविषयीं व प्रसिध्द व्यक्तींविषयीं आमच्या गेल्या अंकांत बहुधा सर्वसंमत असणारे अभिप्राय आम्हीं कितीही उघडपणें व कितीही कडक रीतीनें जरी लिहिले असले, तरी तसें केल्यानें आह्मावर अविनयाचा दोष येतो असें आह्मास अगदीं वाटत नाहीं. सदरील विषयावर आमच्या पुस्तकाच्या एका अंकांत सरासरी एका वर्षापूर्वी वरच्यासारखींच मतें प्रगट केलेलीं आहेत. तीं वाचून पाहिलीं असतां आमच्या वाचकांस कळून येईल कीं, तीं प्रस्तुत प्रसंगाला उपयोगीं पडण्याकरतां आह्मीं नवीं बनविलीं आहेत असें नाहीं. असो; पण वरील दूषण आमच्या लेखावर देण्यांतला 'हितेच्छूं' चा अभिप्राय कदाचित् स्वतःच्या संबंधाचाच असेल; ह्मणजे मागील उत्तरांत त्यांच्याशींच आह्मी उद्दामपणाची वृत्ति दाखविली असें त्यांचें म्हणणें असेल. पण हा दुसरा प्रकारही आह्मावर लागू होईल असें आम्हास वाटत नाहीं. गेल्या उत्तरांत सभ्य लोकांच्या वादविवादाच्या रीतीपासून आम्ही विशेष भ्रष्ट झालों आहों असें आमचें मन घेत नाहीं. आमच्याहूनही अधिक कडकपणाचे व विशेष निंदात्मकतेचे लेख मोठमोठया थोर मानलेल्या ग्रंथकारांचे ठायीं आम्हास सहज दाखवितां येतील; व वर्तमानपत्रांतून तर असले प्रकार हरहंमेश दृष्टीस पडतात. देशांतील हल्लींच्या उलाढालींसंबंधानें 'हितेच्छूं' नीं जे आपले विचार प्रकट केले होते, त्यांच्या संबंधानें आह्मास बरेंच सविस्तर जें लिहावें लागलें, त्यांत पुष्कळांस न आवडण्यासारखा व कित्येकांस राग येण्यासारखा

बराच मजकूर होता हें खरें; पण त्याबद्दल आमच्याकडे काय बोल आहे ? चितान्यानें तजवीर काढली आणि ती मोठीशी सुरेख आली नाहीं, किंवा आपला चेहेरा पाहण्याकरतां पुढें आरसा धरला आणि त्यांत मना जोगतें प्रतिबिंब दिसलें नाहीं, तर वरील दोन्ही गोष्टींब- द्दल चितान्यावर किंवा आरशावर चरफडून काय उपयोग आहे ? जशी अस्सल चीज असेल तशी नक्कल निघेल; चांगलें रूप देण्याचें चितान्ययाच्याही हातीं नाहीं, व आरशाच्याही स्वाधीन नाहीं. मूळ- च्यांत बळेंच जर फेरफार करील तर त्याबद्दल चितान्यास नांव ठेवणें वाजवी होईल; व तसेंच प्रतिच्छाया जर वेडीवाकडी पडेल, तर भिंगास खराब ह्मणतां येईल. पण आमच्या वादविषयक लेखावर तोंडी व लेखी अशी दोहों प्रकारची जी टीका आह्मीं आजपर्यंत ऐकली व वाचली, तींत वरच्यासारखा प्रकार केल्याचा आरोप आह्मावर कोणाकडूनही आला लाहीं. तेव्हां आम्ही काढलेलीं दूषणें अयथार्थ आहेत असें बहुधा कोणासही वाटत नाहीं असें ह्मणणें भाग आहे; व यास्तवच तसें केल्याबद्दल 'हितेच्छूं' नीं प्रकृत दोषाचा आरोप आम्हावर केला असेल असें आम्हास खास म्हण- वत नाहीं. ज्यापक्षीं त्यांच्या पत्रास उत्तर देण्यास व आपली बाजू संभाळण्यासच आम्ही निघालों, त्यापक्षीं त्यांच्या विरुद्ध लिहिणें जरू- रच झालें. पण येवढ्याच करण्यास ते वरील कठोर शब्द लावणार नाहींत अशी आमची खात्री आहे; कारण आपले अभिप्राय मोक- ळेपणानें बोलून दाखविण्याची सर्वांस सारखी मोकळीक आहे.

याप्रमाणें वरील दोन्ही प्रकारांनीं आम्हावर वरील दोष लागू पडत नाहीं. पण याखेरीज वरील पत्रकर्त्यांचें मनोगत असें जर असेल, कीं गेल्या चोविसाव्या अंकांत त्यांस खुद्द लावून आम्ही कांहीं मजकूर लिहिला आहे, तर आह्मी येथें स्पष्ट कळवितों कीं, तसें बिलकुल झालेलें नाहीं. केवळ प्रांजळ बुध्दीनें ज्यानें आम्हाकडे छापण्याकरतां मजकूर पाठविला, व जो आपणास आमचा 'हिते- च्छु' म्हणवितो, त्याशीं अशी अयोग्य व निंद्य वर्तणूक आम्हाकडून

खास व्हावयाची नाहीं; व झाल्याचें जर कोणी आमच्या पदरांत घातलें तर वरील पत्रांतील सर्व दूषणांस आम्ही पूर्णपणें पात्र झालों म्हणून खुशाल कबूल करूं. आमच्या पुस्तकांत पुष्कळ सभांविषयीं चळवळीविषयीं व व्यक्तींविषयीं निंदेचा जरी मजकूर येतो, तरी अगदीं प्रममारंभीं कळविल्याप्रमाणें तो कोणाच्या द्वेषबुध्दीनें कधींही येत नाहीं. आमचें तर असें ठरीव मत आहे कीं, ज्याप्रमाणें नटानें रंगभूमीवर पाऊल टाकलें कीं मूळचें रूप त्यानें अगदीं विसरून गेलें पाहिजे, किंवा न्यायाधीश न्यायासन चढला कीं त्याचे एरवींचे रागद्वेष न्यायासनाखालीं राहिले पाहिजेत, त्याचप्रमाणें वर्तमानपत्रकर्त्यांचीं व विशेषतः मासिक पुस्तककारांची प्रतिज्ञा असली पाहिजे. त्यांनीं लेखणी हातांत धरली, कीं ते निराळे व मूळचा मनुष्य निराळा, असें असलें पाहिजे. दोघांचाही निर्वाह लोकांच्या आश्रयावर; यास्तव सरकारी नौकराप्रमाणें घरगुती व खासगी संबंध सर्व विसरून जाऊन, लोकांचे शत्रु ते त्यांचे शत्रु व लोकांचे मित्र ते त्यांचे मित्र, असें पूर्ण तादात्म्य त्यांचे ठायीं बिंबलें पाहिजे. असें असलें तरच वर्तमानपत्र किंवा मासिक पुस्तक लोकाश्रयास वास्तविकपणें पात्र होऊन त्यापासून लोकांचें हित होईल. नाहीं तर, वरील पत्रांत सांगितलेल्या 'बांबे ग्याझिटा' प्रमाणें त्यास कोणीही सुज्ञ व समंजस मनुष्य न चाहून, त्यापासून कांहीं झालें तर अनर्थ मात्र होईल. असो; तर आह्मी कोणावर जें शस्त्र धरतों तें आपला खासगी दावा उगवून घेण्याकरितां किंवा आमच्या टांकाचा जोर दाखविण्याकरितां धरतों असें कोणीही समजूं नये. जें कृत्य लोकांस अनर्थावह होय तें करणारा, व जीं मतें केवळ भ्रमात्मक होत किंवा लोकांस अपायकारक होत त्यांचा चोहोंकडे प्रसार करणारा किंवा करविणारा, हे सर्वजण लोकांस फसविणारे किंवा त्यांचा नाश करूं पाहणारे होत असें जाणूनच केवळ सर्वांची त्यांच्याविषयीं यथार्थबुद्धि करण्याचा आमचा यत्न असतो. मग 'हितेच्छु' सारख्या आमच्या मित्रांशीं आमची द्वेषबुद्धि नसून त्यांस विनाकारण दुखविण्याची तर आमची मुळींच इच्छा नाहीं हें काय सांगायाला पाहिजे?

आतां सरते शेवटीं 'हितेच्छूं' नीं आह्मास जे दोन प्रश्न विचारले आहेत, तेवढे सांगून हा मजकूर पुरा करतों. पहिला प्रश्न दयानंद स्वामींविषयीं. यांची 'मिथ्यास्तुति' व 'स्तुतिपाठ' केल्याचा दोष आह्मी त्यांस कशावरून दिला असें ते विचारतात. यावर आमचें उत्तर येवढेंच आहे कीं, वरील शब्दांचा प्रयोग 'हांजी हांजी' अशा निंद्य अर्थानें आम्ही केला नव्हता. आमच्या ह्मणण्याचा भाव येवढाच होता कीं, प्रार्थनासमाजाच्या येथील सभासदांनीं स्वामींचीं मतें आपल्या तर्फेचीं व आपणास उपयोगीं पडण्यासारखीं जाणून त्यांचा जसा बडेजाव मांडला होता, व त्यांची योग्यता होती तीहून ज्यास्त वाढविली होती, त्याचप्रमाणें वरील हेतूस्तव 'हितेच्छूं-' चाही कल स्वामींस अंमल चढविण्याकडेच असावा असें आह्मास वाटलें. स्वामींच्या मतांचा 'हितेच्छूं' स बिलकुल अभिमान नाहीं किंबहुना तीं त्यांस पुष्कळ अंशीं अयुक्तिकही वाटतात, हें आम्हास पहिल्यानें माहीत नव्हतें. यास्तव केवळ सामान्य अनुमानावरून आह्मी वरील शब्दांची योजना केली होती. तरी तींत 'हितेच्छूं' स वाटली अशी निंदा व्यक्त करण्याचा आमचा खास हेतु नव्हता.

दुसरा प्रश्न 'अधमाधमा-' विषयीं. या व्यक्तीविषयीं लिहितांनाही 'लडिवाळपणा' अशा शब्दाचा जो आह्मी प्रयोग केला होता, त्याविषयींही 'हितेच्छूं' च्या मनांत पुष्कळच निराळा अर्थ आला. तोही आमच्या मनमांत बिलकुल नव्हता; व पुष्कळ वाचकांच्या मनांत आला नसेल असें वाटतें. आतां वरील येवढे बडे गृहस्थ कोण, व वरील बडा किताब त्यांस कशावरून दिला, हें आम्ही येथें विशेष विस्तारानें सांगत नाहीं. येवढेंच कळविणें पुरें आहे कीं, वरील गृहस्थ आमच्या 'पुण्यक्षेत्रांतील कोनकोपऱ्यां-' तले नव्हत; तर नुकताच कित्येक वर्षें सगळ्या ठाणें जिल्ह्यांत 'मोठे देशहितेच्छू,' 'मोठे निस्पृह,' व 'मोठे वक्ते' ह्मणून त्यांचा लौकिक होता; व गेल्या वर्षापासून तर ते सगळ्या महाराष्ट्र देशास महशूर झाले असावे. या लोककल्याणेच्छूंनीं, गेल्या सालच्या बडोदे प्रकरणांत, इतर कित्येक

बऱ्या गृहस्थांबरोबर, आपल्या योग्यतेनुरूप थोडाबहुत कार्यभाग उचलून इंग्रेज सरकाराचे ठिकाणीं मोठी स्तुत्य राजनिष्ठा दाखविली. **तुकारामा**च्या सर्वप्रसिद्ध अभंगाप्रमाणें, अजूनही यांचा 'देशाभिमान,' राजनिष्ठेचा तत्वोपदेश इतका कानीं पडला असतांही, सर्वथा विगलित झाला नाहीं; अद्यापही कोठें कोठें त्याचा प्रकाश पडल्याचें ऐकण्यांत येतेंच. असो; येवढ्या नामांकित गृहस्थांचा लौकिक रत्नागिरीपर्यंत कसा गेला नाहीं, याचें आम्हास आश्चर्य वाटतें; तरी त्याबद्दल मोठासा खेद वाटत नाहीं, व येवढ्याच करितां तें नांव येथें देतही नाहीं. तें आमच्या देशबंधूंच्या स्मृतींतून जितकें लवकर जाईल तितकें चांगलेंच. 'हितेच्छू-' स तें चांगलें माहीत असावें असा आमचा पक्का समज होता; व त्यांचा एकंदर स्वभाव जो आम्हास माहीत आहे—कीं जो वरील पत्रांतही 'मानवी स्वभावाच्या दुर्बलते-'विषयींच्या मजकुरांत त्यांनीं प्रगट केला आहे—त्यावरून आम्हास वाटलें कीं, येवढ्या घोर व लज्जास्पद अपराधाचीही क्षमा करण्याडे त्यांच्या अंतःकरणाचा कल सकृपत्वास्तव झाला असावा. पण तशा हृदयवृत्तीस वरील मनुष्य मुळींच पात्र नसल्यामुळें, ती आह्मास अत्यंत दोषरूप वाटली; व हेंच आम्ही वरील शब्दानें व्यक्त केलें होतें. आमच्या पत्रकर्त्यास जो त्यांत ध्वन्यर्थ गर्भित केलासा वाटला तसें बिलकुल अर्थातच कांहीं नाहीं.

हें उत्तर आम्हास वाटलें होतें त्यापेक्षां फारच लांबलें. तरी याच्या योगानें 'हिच्छू' चें मन आह्माविषयीं जर पुनः स्वच्छ होईल, व आमच्या लेखांचें स्वरूप इतर वाचकांस पूर्वीपेक्षां विशेष यथार्थत्वानें कळूं लागेल, तर वरील गोष्टीची आम्हास अगदीं पर्वा वाटणार नाहीं. आतां सरते शेवटीं येवढेंच सांगून आमच्या पत्रकाराचा आम्ही निरोप घेतों कीं, आमच्या मालेंत मजकूर पाठविण्याचें आमच्या गेल्या उत्तरावरूनच बंद करण्याचें जर त्यांनीं मनांत आणलें, तर आह्मास अतिशय वाईट वाटेल. प्रस्तुत प्रसंगीं आह्मीं आपलीं

हकीकती जी त्यांस कळविली आहेत, त्यांवरून आमच्याविषयीं क्षणभर झालेला त्यांचा गैरसमज उडून जाईल, याविषयीं आम्हास भरंवसा आहे, व त्याप्रमाणें व्हावें असें मनापासून इच्छितों.

---

नंबर ४.

# जातिभेदाविषयीं.

[ निबंधमाला अंक ३८. फेब्रुवारी १८७७ ]

[ रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः—वि० वि० आपल्या मालेच्या डिसेंबरच्या अंकांत बाविसाव्या पानावर सत्यदीपिकेविषयीं लिहितांना आपण असे लिहिलें आहेः—

" याचे वर्गणीदार पाहिले तर ते अर्थातच भाविक युरोपियन, धर्मांतर झालेले लोक, व हिंदुधर्माच्या अज्ञानास्तव त्याची टवाळी केलेली ज्यांस आवडते असे परभू, शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीन जातीचे लोक, हेच आढळतात." याचा अर्थ बरोबर ध्यातांत येत नाहीं, यास्तव आपल्या दुसऱ्या अंकांत याचा खुलासा कराल तर बरें होईल. मनांत ज्या शंका येतात त्या अशा. आपल्या लिहिण्याच्या झोंकावरून अज्ञान लोक काय ते परभू शेणवी वगैरे यांत मात्र असतात; चित्पावन, कऱ्हाडे, देशस्थादि ब्राह्मणांत नसतात. असा आपला ग्रह आहे असें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं. पण प्रत्येक देशांत व प्रत्येक लोकांत सज्ञान व अज्ञान लोक असतात व असलेच पाहिजेत या नियमाकडे आपलें दुर्लक्ष कसें झालें हें समजत नाहीं.

दुसरें. " शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीन जातीचे लोक " असें लिहीत असतां, शेणवी यांजला अतिहीन जातीच्या लोकांपेक्षां जरासे वरच्या पायरीवर बसविलें आहे. महाराष्ट्र देशांत ज्यांना शेणवी ब्राह्मण असें ह्मणतात, ते दशविध ब्राह्मणांपैकीं सारस्वत ब्राह्मण असून, उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र मान्य आहेत, व या महाराष्ट्र देशांतही अनेक प्रसंगीं तंटे उपस्थित होऊन, यांच्या ब्राह्मण्याविषयीं शतशः निर्णय झाले आहेत, ही गोष्ट आपणास माहीत नाहीं असें

वाटतें. सातारा मुक्कामीं शाहू छत्रपतीच्या कारकिर्दीत महादेवभट आठले प्रभृति मंडळीनें परभूप्रकरण उपस्थित केलें होतें, त्या वेळीं काशीपासून रामेश्वरापर्यंत मोठमोठे पंडित जमून, शेणवी ज्ञातीविषयीं ठराव झाला आहे, तो पाहावा, म्हणजे भ्रांतीचें निरसन होईल. माहितीशिवाय कोणतीही गोष्ट लिहिली तर उपहास मात्र होतो.

सदरील लागट मजकूर आपल्या हातून सहजवृत्त्या लिहिला गेला असल्यास, ती गोष्ट निराळी; परंतु बुद्धिपुरःसर लिहिला असल्यास,त्याचा खुलासा करणें आपणास उचित होय. येत्या अंकांत या पत्रास कृपा करून जागा द्याल या आशेनें लिहीत आहें. मुक्काम मुंबई, ता० १० मार्च सन १८७७.—**कोंकण्या.**]

---

[ याच आशयाचें, 'मकरंद' या सहीनें, दुसरें एक पत्र आलें होतें. ]

वर आमच्या दोघा शेणवी बंधूंकडून जीं पत्रें आलीं आहेत, तीं पाहून आम्हास एकंदरीनें मोठा संतोष होतो. त्यांत आम्हावर व आमच्या सजातीयांवर जरी बरेच आक्षेप केले आहेत, तरी पाश्चात्य विद्येनें सुप्रकाशित झालेल्या नव्या मंडळींत जी अभिमानशून्यता पूर्ण बाणलेली सामान्यतः दृष्टीस पडते, तिजशीं ताडून पाहतां, वरील कडाकाही आम्हास पुरवतो. ज्या विद्येच्या संसर्गानें युरोपांत देशाभिमानास स्फुरण चढतें, व सदसद्विवेचनशक्ति प्रखर होऊन, ज्ञानौत्सुक्यादि वृत्ति प्रबळ होतात, तिचाच प्रभाव इकडे कृतकृत्यताबुद्धि, आलस्य, गर्व इत्यादि प्रकारें दृष्टीस पडून, स्वदेशप्रकरणीं अत्यंत औदासीन्य हें बुद्धीच्या परिपक्वतेचें लक्षण मानलें जातें, ही आलीकडील स्थिति ज्यानें पूर्णपणें लक्षांत आणली असेल, त्यास जातिनिर्णयासारख्या प्रसंगींही आवेशाचा आविर्भाव पाहून चित्तास खेद होईल असें आम्हास वाटत नाहीं. सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या राष्ट्रांस आपल्या पायतणांचीही बेअदबी झालेली जर खपत नाहीं, व रूक्ष प्रदेशास रूक्ष म्हटल्यानेंही चिरड येते, तर यांहून फार महत्त्वाच्या प्रकरणीं वेळेनसार तब्बेत जरा गरम झाल्यास आमच्यांतील अत्यंत प्रचंड विद्वानांसही शरम वाटण्याची विशेष जरूर नाहीं हें उघड आहे !

याप्रमाणें विचार करतां, वरील दोन लेख जरी बरेच कडक आहेत, तरी ते आम्हास अमान्य आहेत असें नाहीं. आपल्या जातीची किंवा देशाची निंदा विनाकारण केलेली पाहून किंवा ऐकूनही, जो केवळ निर्विकार राहतो, तो जसा शहाणा होत नाहीं, त्याचप्रमाणें वरच्यासारख्या प्रसंगीं कोणीं तापटपणा दाखविला असतां त्यासही असमंजस म्हणणें बरोबर नाहीं. आपली वास्तविक योग्यता जो खालीं करूं पाहील, त्याजवर प्रतीकार करणें हें सर्वांस उचितच होय. आणि तसें केलें असतां, जो समंजस व समबुद्धि आहे, त्यास राग येण्याचेंही कारण नाहीं. असो; तर याच बुद्धीनें वरील दोन पत्रांस आम्ही स्थळ देऊन, आतां त्यांवर आपलें मत कळवितों.

प्रस्तुत पत्रकारांनीं दोघांनींही आम्हास विचारलें आहे कीं, सदरील अंकांतील वादविषयक वाक्य आम्हीं द्वेषभावानें लिहिलें आहे कीं काय ? या प्रश्नाचें उत्तर फार विस्तारानें देण्याची बहुधा गरज नाहीं, असें आह्मास वाटतें. कां कीं, यापूर्वींचा तीन वर्षांचा क्रम जे लक्षांत आणतील, त्यांची या गोष्टीविषयीं बहुत करून खात्री असेल, कीं आमच्या देशबंधूंत आपआपसांत कलागत लावावी अशा प्रकारचा आमचा बिलकुल उद्देश नाहीं. ' मकरंदां-' नीं पत्रारंभीं जें म्हटलें आहे, कीं भांडणाच्या पायीं आज या देशास इतकी विपन्नतेची स्थिति येऊन पोंचली आहे, व सर्व सुज्ञ लोकांचा यत्न हे बखेडे मोडण्याविषयीं सतत चालू असावा, तें आह्मास सर्वांशीं मान्य आहे. आह्मीं यापूर्वीं अनेक वेळां वाचकांस कळविलेंच आहे, कीं आमचा पुस्तककर्त्यांच्या नात्यानें जगाशीं जो शत्रुमित्रत्व संबंध आहे, तो केवळ सत्य व स्वदेशप्रीति या दोहोंच्या संबंधानेंच काय तो आहे; ह्मणजे आपल्या जन्मभूमीचा योग्य अभिमान असून, ज्यांस सत्य आवडतें ते आमचे मित्र, व स्वदेशाची टवाळी करण्यांत ज्यांस भूषण वाटतें व जे असत्यास जाणून बुजून भजतात किंवा त्याच्या निरसनाविषयीं अनास्था प्रगट करतात, ते आमचे द्वेष्य. याखेरीज इतर संबंध आम्ही कोणतेही ओळखीत नाहीं.

आतां, वादाच्या मुख्य विषयावर आमचे विचार काय आहत त वाचकांस कळवितों. वादास्पद वाक्य कोठलें आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस आठवत असेलच. गेल्या डिसेंबरच्या अंकांत 'सत्यदीपिका' या सदराखालीं आरंभींच तें आहे:—

"या पुस्तकाचे वर्गणीदार पाहिले तर ते अर्थातच भाविक युरोपियन, धर्मांतर झालेले लोक, व हिंदुधर्माच्या अज्ञानास्तव त्याची टवाळी केलेली ज्यांस आवडते असे परभू शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीन जातीचे लोक, हेच आढळतात." या वाक्यांत 'ही' या पदेंकरून परभू व शेणवी यांची जात ब्राह्मणांच्याहून खालची असा जो गर्भितार्थ निघतो तो वरील पत्रकारांस न आवडून, ते असें सिद्ध करूं पाहत आहेत कीं, ब्राम्हणांचें उच्चत्व मानण्यास, कोणत्याही रीतीनें पाहिलें असतां, आधार नाहीं. प्राचीन ग्रंथांवरून पाहतां गौड ब्राह्मणांचे अधिकार इतरांप्रमाणेंच आढळतात, व अर्वाचीन काळींही त्यांची पायरी ब्राह्मणांच्या बरोबर असल्याविषयीं अनेक प्रमाणें आहेत. पण हेंही एकीकडे ठेविलें, तरी एकंदर वर्तनावरून पाहतां, शेणवी व परभू हेच ब्राह्मणांहून श्रेष्ठ ठरतील. वरील दोन्ही पत्रांतील सारांश येणेंप्रमाणें आहे.

आतां हा जो वाद प्रस्तुत पत्रांवरून उपस्थित होणारा आहे, त्यावर विस्तार करण्याची किंवा तो होऊं देण्याची आमची बिलकुल इच्छा नाहीं. कां कीं, एक तर असले वाद प्राय: शुष्क व अनर्थावह मात्र होत; व शिवाय त्यांविषयींचा ऊहापोह मासिक पुस्तकांत शोभत नाहीं. आजपर्यंत शेंकडों वेळां असले जातिप्रकरणीं कलह उपस्थित होऊन पुष्कळ भवति न भवति झाली आहे व अद्यापही प्रसंगोपात्त तसला प्रकार पुन्हा सुरू झाल्याचें केव्हां केव्हां ऐकूं येतें. तेव्हां शेकडों वर्षें धुमसत आलेला हा तंटा, कीं जो यापूर्वीं मोठमोठ्या प्रसंगींही मिटला नाहीं, तो यापुढें नाहींसा होण्याचा मुळींच संभव दिसत नाहीं. आतां हें खरें कीं, प्रस्तुत वाद कसाही असला, तरी त्या संबंधानें आपले विचार प्रगट करण्यास सर्वांस मोकळीक

आहे; व त्यांतून प्रमाणयुक्त व समर्पक असा थोडक्यांत लिहिलेला एकादा लेख असला तर दोहों पक्षांच्या प्रांजल लोकांस तो मान्य झाल्याशिवाय राहणार नाहीं. ' मकरंद ' या पत्राचा पूर्वार्द्ध अशा तऱ्हेचा आहे, व यास्तव आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस तो बहुधा पसंत होईल असें वाटतें.

सदरील वादावर अनेक ग्रंथ आजपर्यंत लिहिले गेले असतील, परंतु त्यांपैकीं आम्हीं अद्याप एकही पाहिला नाहीं; तशींच ' मकरंद ' यांनीं आपल्या तर्फेनें जीं प्रमाणें पुढें केलीं आहेत, तींहि सारीं आह्मास माहीत नव्हती. आमच्या वाचकांपैकींहि पुष्कळांस तीं बहुधा नवींच वाटण्यासारखीं आहेत, यास्तव पत्रकर्त्यांच्या सूचनेप्रमाणें तीं त्यास सादर केलीं आहेत. आतां अशी गोष्ट असतांही, आह्मी आमच्या पत्रकारांच्या सजातीयांवर बळेंच हीनत्व कां स्थापित केलें अशी जर कोणी शंका घेईल, तर तिजवर आमचे सामान्यतः असें उत्तर आहे कीं परभू व शेणवी यांस ब्राह्मणांहून कमी मानण्याचा जो आजपर्यंत सांप्रदाय चालत आला आहे व जो सर्वसंमत आहे, त्यासच अनुसरून वरील उल्लेख केला आहे. भर पेशवाईत मोठमोठ्या शास्त्रीपंडितांच्या अनुमतानें जरी वरील लोकांचे धर्माधिकार कदाचित् सर्वसंमत झाले असतील, तरी ज्या अर्थीं पुनर्विवाहविषयक प्रसिद्ध शास्त्रार्थाप्रमाणें ते पुढें चालले नाहींत, त्या अर्थीं सध्यांचा आढळणारा प्रकार यथावत् लिहिण्यास कोणताही बाध दिसत नाहीं. याखेरीज अमेध्याहार हा जातिभ्रंशाचें एक मोठें कारण आहे हें सर्वप्रसिद्धच आहे

तर आमच्या पत्रकर्त्यांच्या जातिबांधवांस ब्राम्हणांहून खालची पदवी जी आम्हीं दिली आहे, तिचीं कारणें वरील होत. त्यांच्या निर्देशावरून सहज लक्षांत येईल कीं, सदरील उल्लेख करण्यांत आमचा कांहीं वाईट मतलब होता असें नाहीं, तर आम्हास जी गोष्ट तथ्य वाटली ती आम्हीं लिहिली. जाणून बुजून आमच्या देशबंधूंची मानहानि करावी असा आमचा उद्देश नाहीं; व कोणाची खरी स्थिति

व वास्तविक योग्यता प्रगट केल्यानें त्याची मानखंडना होते असेंही आम्हास वाटत नाहीं.

पण हा सर्व वाद, वस्तुतः पाहतां, केवळ गौण आहे. वादविषयक वाक्यांत प्रस्तुत पत्रकर्त्यांच्या बंधूंवर जो मुख्य अक्षेप केला आहे, त्याचा दोघानींही विचार केला नाहीं. हा मूळ मुद्दा असा आहे कीं, परभू व शेणवी यांच्यांतलेच वर्गणीदार ‘ सत्यदीपिके ’ सारख्या हिंदुधर्मनिंदक पत्रांचे फार करून आढळतात; व याचें कारण एक तर स्वधर्माचें अज्ञान व दुसरें कारण त्याची विटंबना करण्याची व करून घेण्याची हौस ही होय. आपली जात ब्राम्हणांच्या बरोबरीची नाहीं असें कोणीं म्हटलें असतां तें जर आमच्या बंधूंस बिलकुल खपत नाहीं, तर तुमचे पूर्वज महामूर्ख व महापातकी होते, अशी जे आज वर्षांचीं वर्षें बडबड करीत आहेत त्यांचा तर त्यांस किती राग यावा ? पण हा प्रकार पाहूं गेलें असतां, उलटा मात्र दृष्टीस पडतो. ‘ ज्ञानोदय,’ ‘ सत्यदीपिका ’ वैगेरे पत्रांचे कर्ते जें पवित्रज्ञान आजतागाईत आमच्या देशांत ओतीत आहेत, त्याविषयीं ‘ मकरंदा-’ चे बंधु केवळ उदार्सानच राहतात असें नाहीं. तर एतद्देशीय धर्माचें विटंबन हें जणूं काय मोठें पुण्यकर्मच आहे, अशा समजुतीनें वरील पत्रांस त्यांचा आश्रय बराच भरपूर दृष्टीस पडतो. याखेरीज त्यांचीं सामान्यतः मतें पाहतांही, तीं इंग्रेजी कलाचींच आढळतात. पारशी लोकांस हिंदुस्थानच्या राजकर्त्यांचें अनुकरण करण्यांत जसें मोठें भूषण वाटतें, व त्यांचे आचारविचार दिवसेंदिवस इंग्रेजी नमुन्याचे होत चालले आहेत, त्याप्रमाणेंच परभू शेणवी यांचाही मासला बराच दृष्टीस पडतो. आतां, स्वदेशनिष्ठेंत ते इतरांहून उणे आहेत, असें आमचें म्हणणें नाहीं; पण धर्माच्या प्रकरणीं त्यांचीं मतें सामान्यतः भकलेलीं दृष्टीस पडतात. एकाद्या मिशनरीनें किंवा बाऱ्यानें आपल्या पवित्र शास्त्रावर पांडित्य आरंभिलें असतां, तें आमच्या सजातीयांवर जितकें ठसेल, त्याच्यापेक्षां वरील लोकांवर त्याचा प्रभाव अधिक गाजेल यांत संशय नाहीं. यांचें कारण उघडच आहे कीं, स्वधर्मप्रकरणीं माहिती

त्यांची तितपतच असते. याविषयीं प्रमाण फार मोठें पाहायाला नको. स्वभाषेच्या ज्ञानावरूनच वरील गोष्ट सहज लक्षांत येईल. वर जें 'मकरंदा-'नीं पत्र लिहिलें आहे, तितपत तर काय, पण नुसतीं दोन पानेंही मराठींत शुद्ध लिहिण्याची शक्ति त्यांच्या बंधूपैकीं कितीकांचे ठायीं आढळेल? मग स्वदेशाच्या भाषेविषयीं ज्यांची इतकी अनास्था, त्यांस तींत असणारे जे स्वधर्मविषयक ग्रंथ, त्यांचें ज्ञान कितपत असावें, हें कोणासही सहज कळेल.

याप्रमाणें वरील दोन पत्रांविषयीं एकंदरींत विचार झाला. आतां सरते शेवटीं आमच्या बंधूंस व सर्वांस येवढेंच कळविणें आहे कीं, आम्ही कोणाविषयींही द्वेषभावानें व मत्सरानें न लिहिण्याविषयीं यत्न करीत आहोंच, त्याप्रमाणें बहुधा आमच्या वाचकांच्याही प्रत्ययास येत असेल. कोणाविषयीं यथार्थ उल्लेख केला असतां, तोमात्र वरील वृत्तींस वश होऊन केला आहे असें कोणी समजूं नये. आपल्या मनास निःपक्षपात बुद्धीनें जें वाटेल, तें प्रांजळपणानें जो लिहूं लागेल त्याचे अभिप्राय सर्वांस आवडण्यासारखे निघतील असें नाहीं, हें स्पष्टच आहे. तर हेंच ध्यानांत ठेवून, आमच्या 'मकरंद' प्रभृति देशबंधूंनीं आमच्या पुस्तकाविषयीं अन्यथा कल्पना मनांत आणूं नये. त्यांच्यांत जे जे श्लाघ्य गुण आहेत ते आह्मास मान्य नाहींत असें नाहीं. रामचंद्रबाबा शेणवी, जिऊबादादा बक्षी इत्यादि इतिहासप्रसिद्ध विख्यात पुरुषांची कीर्ति त्यांच्या सजातियांस जशी अत्यंत प्रिय आहे, त्याहून ती आम्हास कमी आहे असें नाहीं. तसेंच आलीकडेही वरील दोन ज्ञातींतले जे जे पुरुष नामांकित होऊन गेले व सध्यां स्वदेशास भूषित करीत आहेत, त्यांसही प्रत्येक देशाभिमानी पुरुषांप्रमाणें आम्ही चाहत आहोंच. परंतु इश्वरी नियमाप्रमाणें कोणताही मनुष्य, जाति किंवा राष्ट्र हीं सर्वथा दोषशून्य असत नाहींत; यास्तव प्रसंगानुसार दोषाचा उल्लेख करणें अवश्य येतेंच. तर हें अपरिहार्य समजून सुज्ञ जनांनीं त्याबद्दल यथार्थ निरूपण करणारावर व्यर्थ टपका ठेवूं नये.

## नंबर ५.

# प्रश्नोत्तराचा मासला.

[ निबंधमाला, अंक ४५ सपटेंबर १८७७ ]

[ **रा० रा० निबंधमालाकर्ते यांसः**—साष्टांग नमस्कार विनंतीविशेष. आपणाकडे कसाही स्तुतिपर, शंकापर, सूचनापर, दूषणपर इ० मजकूर पाठविला असतां, त्याचा स्वीकार करून, सत्यता व सुजनता यांस अनुसरून योग्यायोग्य विचार करालच. ह्मणून पुढील मजकुराचा यथायोग्य परिणाम होऊन, त्याबद्दल गेलेला काळ व श्रम यांचें सार्थक्य होईल अशी आशा आहे.

( १ ) आपल्या मालेच्या प्रत्येक अंकाकमलाच्या तर काय—केवळ त्याच्या प्रत्येक पत्राच्याही—आमोदानें मनोवृत्ति अगदीं तल्लीन होऊन जाते. तेव्हां अर्थातच मालानिबद्ध व्हावें लागतें. परंतु तुह्मी आपल्या लिहिण्याच्या दृढीकरणार्थ वगैरे ज्या इंग्रेजी टिपा जोडितां, त्या त्या भाषेच्या अनभिज्ञ वाचकांस न समजल्यामुळें, त्यांस शिंक आल्यासारखें होऊन, पूर्वीच्या आमोदानंदांत बराच व्यत्यय येतो. व पुनः पूर्ववत् आनंदनिमग्न होण्यास बऱ्याच पंक्ति पुढें वाचीत जावें लागतें, असें अनुभवास येतें.

याकारितां सूचना करितों कीं, यापुढें मालेंत जे इंग्रेजी लेख येतील त्यांचें यथावत् मराठींत भाषांतर देत जावें. कदाचित् मुळींच इंग्रेजी उतारे घेतले नाहींत तरीही मोठेंसें अनहित होईलसें वाटत नाहीं; कारण, मूळ इंग्रेजी लेखाप्रमाणें प्राकृत लेखानेंही वाचकांच्या मनांत अर्थ बिंबवणें आपणास सुकर आहे; आणि केवळ इंग्रेजीच भाषा जाणणारे असे आपले वाचकांत कोणीही नाहींत, हें उघड आहे. शिवाय स्वार्थसमर्थनार्थ घेतलेले उतारे सर्व वाचकाचे मनांत अर्थाचें समर्थन न करतील, तरच त्यांचें चीज झालें असे ह्मणतां येत नाहीं.

( २ ) पिशाच्याच्या अस्तित्वाविषयीं लोकांचे असत्यग्रह झाले आहेत असें सिद्ध करण्याकारितां आपण श्रम व यत्न केले. त्यांवर वाचकांनीं आक्षेप घेतले आहेत, त्यांचें यथायोग्य दूरीकरण झालें पाहिजे. नाहीं तर आक्षेपकांची व त्यांच्याच सारखे समजत असतील त्यांची आपल्या लेखाच्या सत्यतेविषयीं पूज्यबुद्धि राहणार नाहीं, आणि अशा समजुतीचे थोडे आहेत असेंही नाहीं.

( ३ ) तुह्मीं अलंकारांविषयीं लिहितां, त्यांत कित्येक ठिकाणीं समजूत पडत नाहीं. तर ती उत्तरीं द्याल अशी उमेद धरून शंका कळवितोंः—

"हो सुप्रसन्नमति ह्मा जननि जननि जननि मग्न नरकीं हो" व "न धरीं बादर हादर सादर हे वाजवूं पुन्हा नीट" यांतील प्रथमार्धातील अलंकारास जर प्रास हें नांव लागतें, तर द्वितीयार्धातील अलंकारासच अनुप्रास कां ह्मणावें ?

दुसरी—" वित्त पाहतां पित्त येतसे चित्त पाहिजे मला " व " पंकेरुहदृशमध्वनि तं केवलमंगनानुजानुगतम्। शंक धावितमीक्षितुमंकेविस्मृत्य शिशुमपिस्त्रीभिः " यांतील श्लोकांत जर अनुप्रास नामक अलंकार होतो, तर वरील पद्यांतच प्रास कसा होतो ? वरील चारही मतें आपलींच आहेत.

( ४ ) आपण **जान्सन्**विषयीं घेतलेला निबंध ( कर्मकथाच ) केव्हां संपेलसें झालें होतें. आणि असाच क्रम राहील, तर आपल्या मालेची मोहकता कमी झालीच समजावयाची. कारण त्यांतील विनोदपर महदाख्यायिका वगैरे पूर्वीप्रमाणें बहारीच्या नसून कित्येक सुभाषित पद्यांचेंही मान उतरतेंच आहे. याकरितां लोकप्रिय असेच निबंध घेणें अवश्यक आहे. आतां असे निबंध थोडे आहेत, असें नाहीं; परंतु त्यांतही आपल्या देशाच्या संबंधाचेच असले ह्मणजे विशेष प्रिय होतील असें वाटतें. त्यांत प्रथम आपल्या कर्तव्यास, रसिकतेस व बहुश्रुतत्वास योग्य असा प्राकृत कवितेवर सविस्तर निबंध लिहिणें विशेष लोकप्रिय होईल असा अजमास आहे. या विषयावर माजी शालापत्रकांत दोन निबंध लिहिले गेले, तोंच महाराष्ट्र भाषेच्या दुर्दैवानेंच काय—ते मागें पडले. ( हे निबंध लिहिण्याच्या शैलीवरून आपलेच असावे असें वाटतें. )

( ५ ) आपल्या 'पोंच' या सदराखालीं बरींच पुस्तकें आलीं, परंतु वेदार्थयत्न व रसायनशास्त्र यांशिवाय इतरांवर टीका ह्मणून एक अक्षरही बाहेर पडलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर इतर सामान्याप्रमाणें त्या पुस्तकाचा विषय, किंमत इ॰ ही प्रकट केलीं नाहींत. हें मनांत येतांच मोठें आश्चर्य वाटतें. तसेंच मयूरकवीच्या मुक्तामाला काव्यावर आपला सविस्तर अभिप्राय प्रकट होईल अशा उत्सुकतेनें वाट पाहात असतां वरीलप्रमाणेंच निराशा झाली.

आता शिवार्या या मधुर काव्यांतील तरी गुण स्पष्ट दाखवून अज्ञ वाचकांस कवितेची गोडी लावून द्याल अशी आशा आहे.

( ६ ) आपल्या मालेंत साहित्य हें सदर पाहून आनंद होत आहे तोंच "माहिती थोडी बहुत होण्याकरितां इ० " वाक्य पाहून उमेद खचूं लागते व पुढें तर अगदींच निराशा होते. यास्तव सूचना करतों कीं, हा विषय विस्तारानें लिहावा कारण पूर्णतेनें लिहिलेल्या एका विषयाची बरोबरी अपूर्ण असे तीन विषय तरी करूं शकतील काय?

( ७ आपण संस्कृत कवितेचे निबंध प्रसिद्ध करितां, त्यांत अशीं कित्येक अनुमानें आहेत कीं:—"अमुक कवीनें अमुक श्लोकावर धोरण ठेवून अमुक रचना केली असावी, इत्यादिकांवरून अमुक कवि जुना व अमुक आलीकडचा, तसेंच अमुक दुसऱ्याचें वर्णन चोरणारा इ० " तीं व आपण मालेंत दिलेलें अर्थसादृश्य यांचा विचार करतांच, माझीही कल्पना चटकन् उडून धावली, व तिनें पटकन् अनुमान धरून आणलें कीं, पाश्चात्य कवि व आपले संस्कृत कवि यांचा परस्पर निकट संबंध असावा किंवा निदान एका पक्षाचे ग्रंथ तरी दुसऱ्या पक्षानें सतत अभ्यासिले असतील ! ! !

विस्तार फार झाला ह्मणून आतां निरोप घेतों. श्रम वगैरे सफल होतीलच. लोभ असावा ही विनंती.—**जिज्ञासु** ]

---

वरच्या सारखीं पत्रें येऊन, त्यांस उत्तरें देण्याचा प्रसंग येणें हे आह्मास किती संतोषावह होय याविषयीं यापूर्वी अनेक वेळां आह्मीं उल्लेख केलेलेच आहेत. यास्तव प्रस्तुत प्रसंगीं पुनरुक्ति न करतां, उत्तरासच आरंभ करतों. क्रम अर्थात् मूळचाच आहे.

( १ ) 'जिज्ञासूं-' चा आमच्या पुस्तकावर पहिला मोठा आक्षेप हा आहे कीं, आम्ही प्रकृत अर्थाच्या समर्थनार्थ इंग्रेजी जे उतारे देतों, त्यांचें एक मराठी भाषांतर तरी द्यावें, किंवा ते मुळींच न दिलें असतांही चालेल. आतां या प्रकरणीं आमचा अभिप्राय काय आहे हें कळविण्यापूर्वी, आमच्या पत्रकाराची एक मोठी चूक त्यास कळविणें प्राप्त आहे. ती ही कीं, मनुष्यमात्राच्या साधारण कलाप्रमाणें त्यानें एकंदर जनसमूहाशीं आपला अभेद कल्पिला आहे, ह्मणजे जें आपणा एकट्यास लागू तेंच सर्वांसही लागू असें त्यानें मानलें आहे. निबंध-

मालेचे इतर वाचक आपणाहून अभिरुचि व ज्ञान यांच्या संबंधें भिन्न असतील, ही कल्पनाही त्याच्या मनांत आली नाहीं असें दिसतें. ती आली असती तर सदरील पत्रांतील आक्षेप त्यानें जसे निक्षून लिहिले आहेत, तसे तो न लिहिता. हा आमचा प्रत्याक्षेप कसा लागू पडतो हें पुढील लिहिण्यावरून स्पष्ट होईल.

'जिज्ञासु' ह्मणतात कीं, ज्यांस इंग्रेजी येत नाहीं त्यांचा इंग्रेजी टिपांनीं हिरमोड होतो, यास्तव त्यांचें भाषांतर देत चलावें, किंवा नुसतें भाषांतरच दिलें तरीही बरें; मूळ अर्थाचें समर्थन उताऱ्यांनीं कसें होतें हें जर साऱ्या वाचकांच्या लक्षांत उतरलें नाहीं तर त्या उताऱ्यांचें फारसें चीज झालेंसें म्हणवत नाहीं. आतां प्रस्तुत आक्षेपाच्या तर्फेनें आम्हास येवढें कबूल करणें भाग आहे कीं, आमच्या पुस्तकांत जेवढा म्हणून मजकूर असतो तेवढा टिपा वैगेरे सर्व आमच्या साऱ्या वाचकांस कळावा व त्यांतील हृद्यही त्यांच्या पूर्णपणें लक्षांत यावें, ही आमची पूर्ण मनीषा खरी; व कोणीही कांहीं ग्रंथ रचला असतां, त्याचा हेतु अर्थात् असाच असतो. पण हा केवळ इष्टतेचा प्रकार झाला. सामान्यतः मराठी वाचकांची स्थिति वस्तुतः कशी आहे हें जर पाहिलें, तर ती फारच निराळी आहे असें आढळून येईल. आमच्या पुस्तकांतील इंग्रेजी व संस्कृत टिपा समजण्याचें तर राहोच, पण मूळ निबंधांतील पुष्कळ शब्द व एकंदर विषयरचना यांचें सुद्धां त्यांस आकलन होण्यास बरेंच कठीण जात असेल असें आह्मास वाटतें. मग अशी जेथें स्थिति आहे तेथें उपाय काय ? आमचें पुस्तक एका अमुक स्थितीच्या लोकांकरितां सुरू केलें आहे असें नाहीं,—कीं जसें माजी 'शालापत्रक' हें शाळामास्तरांकरितांच निघत असे, किंवा माजी 'स्त्रीज्ञानप्रदीप' व हल्लींचें 'अबलामित्र' हें स्त्रियांसच उद्देशून आहे; किंवा विलायतेंत कांहीं पुस्तकें मुलांकरितां, कांहीं विद्यार्थ्यांकरतां, कांहीं विद्वान् लोकांकरतांच निघत असतात, तसा प्रकार आमचा नाहीं. आमचा उद्योग सामान्यतः सर्वांकरतां आहे. आह्मीं निवडलेले विषय जरी सामान्यतः सर्वांस

कळण्यासारखे असतात, तरी त्यांवरील विवरण पूर्ण, हवें, तसें, मनांत उतरण्यास वाचकाचे ठायीं पुढील गुणांची आम्ही अपेक्षा करतों एक तर बहुश्रुतपणा, दुसरा महाराष्ट्र भाषेचें चांगलें ज्ञान, व शिवाय सामान्यतः प्रवेशपरीक्षेच्या बेताचें तरी इंग्रेजीचें व संस्कृताचें ज्ञान. यांपैकीं कोणतेंही अंग ज्याचें कमी असेल त्याची 'जिज्ञासूं-' प्रमाणें तकरार राहीलच. आतां वरील अपेक्षित गुण एकंदरीनें थोड्याच लोकांचे ठायीं असतील हें खरें; तरी पहिल्या दोहोंची अनुकूळता हल्लीं बऱ्याच लोकांचे ठायीं आढळते व दिवसेंदिवस ती अधिकही होत चालली आहे. दुसरे दोन मात्र वरच्यांहूनही थोड्या लोकांचे ठायीं असणार खरे; पण मुख्य विषयाचें ज्ञान होण्यास त्यांची तादृश आवश्यकता नाहीं. इंग्रेजी किंवा संस्कृत टिपा ज्या कोठें कोठें प्रसंगवशात् येतात, त्या मुख्यतः समर्थनार्थच असल्यामुळें त्या न कळल्या तरी मुख्य विषयाच्या ओघास प्रतिबंध होण्यासारखा असतो असें नाहीं. जेथें त्यांतील मजकूर तसा प्रतिबंधक असतोच, तेथें त्याचें भाषांतर देण्याची तजवीजही ठेवलेली असते.

पण 'जिज्ञासूं'-चें म्हणणें असें आहे कीं, असे समर्थनपर उतारे सर्व वाचकांस कळून मूळांतील मतांचें दृढीकरण कसें झालें, हें जर त्यांच्या ध्यानांत येणार नाहीं, तर त्यांचें मोठेंसें चीज झालेंसें ह्मणतां येत नाहीं. हें त्यांचें ह्मणणें वस्तुतः खरें आहे. पण वरील चीज होणें हें केवढें दुरापास्त आहे याचा त्यांनीं विचार केला नाहीं. ज्यांस इंग्रेजी भाषेचा चांगला परिचय असेल त्यांस सहज कळून येईल कीं, काव्य तर दूरच, पण गद्यात्मक लेखाचेंही यथावत् भाषांतर मराठींत उतरणें हें किती कठीण आहे. प्रसंगविशेषीं तर 'मूळ इंग्रेजीचा अर्थ वाचकांच्या मनांत बिंबवणें सुकर' नसतें येवढेंच नाहीं, पण साधारण रीत्याही भाषांतर होणें दुर्घट असतें. 'जिज्ञासूं-'स संस्कृत भाषेचा थोडा बहुत तरी परिचय असावा असें दिसतें. (कारण तो नसता तर इंग्रेजीच्या संबंधानें जें त्यांनीं गाऱ्हाणें केलें, तेंच त्या भाषेच्याही संबंधानें ते करते), तो जर त्यांस बराच असेल

तर संस्कृतांतून मराठींत उतरतांना अर्थाची हानि कितपत होते हें त्यांस सहज समजेल. मग यावरून, परस्परांहून अत्यंत विसदृश ज्या इंग्रजी व मराठी भाषा, त्यांच्या संबंधानें तर भाषांतराची पंचाईत केवढी पडेल, याची कल्पना त्यांस बरीच करतां येईल. आतां साऱ्याच टिपांची वरच्यासारखी गोष्ट आहे असें नाहीं; पण कांहींचें भाषांतर जरी बरेंच बरोबर उतरलें, तरी अशा पुष्कळ असतील कीं, ज्याच्या भाषांतरापासून मराठी वाचकांचें समाधान होण्यापेक्षां मूळची त्यांची शोभा मात्र गमावल्यासारखी होईल. शिवाय दुसरी मोठी गोष्ट अशी आहे कीं, प्रत्येक भाषेचें कांहीं विशेष संकेत असतात, प्रसंगवशात् विशेष नामांचा उल्लेख केलेला असतो, आणि त्यांतून उतारा म्हटला म्हणजे तो अर्थात् तुटक असायचा, त्यांमुळें संदर्भ तुटल्यामुळें मूळ भाषा जाणणारासही तो सुबोध होतोच असा नेम नाहीं. मग भाषांतरद्वारा तर असा उतारा सामान्य वाचकांच्या सर्वांच्या ध्यानांत उतरणें म्हणजे केवढा दूरचा पल्ला आहे हें सांगायाला नकोच !

इंग्रजी टिपा अवतरणरूपानें जशाच्या तशाच ठेवण्याचें दुसरेंही एक मोठें कारण आहे. तें हें होय, कीं तेणेंकरून मूळ ग्रंथांत आफरातरफ केल्याचा टपका ठेवण्यास जागा राहात नाहीं, मूळचे शब्द जसेचे तसे पुढें उतरून दिले म्हणजे भलतेंसलतेच भाषांतर करून दिलें किंवा मूळच्या शब्दांत फेरफार केला वगैरे आरोपांची कल्पनाही प्रतिपक्ष्यास मनांत आणायास सांपडत नाहीं. आमच्या पुस्तकावर दांतओठ खाणारे पवित्र सत्यबुद्धीचे मिशनरी व डोळ्यांत तेल घालून त्यांतील राजद्रोह हुडकणारे 'एलिफास्' चे बंधु, यांची तोंडें बंद करण्यास विलायती लिपीसारखें दुसरें साधन नाहीं. ही इंग्रजी तटबंदी जेथें तेथें करून टाकल्यामुळें आजपर्यंत आमच्या शुभवर्तमानी बंधूंचा कोठेंच इलाज चालला नाहीं; फार तर काय, पण त्यांच्या पक्षाचे येवढे धुरंधर जे 'एलिफास्' त्यांच्या टकरांनींही आमच्या कोटीक्रमास बिलकुल धक्का पोंचला नाहीं !

याखेरीज आणखीही कांहीं गोष्टी ' जिज्ञासू-' च्या सूचनेस आडव्या येणाऱ्या आहेत. एक तर ही कीं, इंग्रेजी टिपा मुळीं पृष्ठाच्या खालीं असणार, मग त्यांच्याही खालीं त्यांचें भाषांतर कोठें द्यावें? दुसरें असें कीं, इंग्रेजी टिपांचें जर भाषांतर द्यावें तर संस्कृत टिपा कोठें येतात, त्यांचेंही कां देऊं नये? हें तर काय, पण पुस्तकांतील लेख सर्वांस समजणें जर अवश्य होय, तर अपरिचित संस्कृत शब्दांवर वगैरेही टिपा कां नसाव्या? तर याप्रमाणें हीं प्रकरणें एकापुढें एक वाढणार आहेत; यास्तव हें सर्व मनांत आणून ' जिज्ञासू-' प्रमाणें कित्येकांनीं जरी सूचना अनेक वेळां आम्हाकडे पाठविल्या तरी मूळचाच क्रम कायम ठेवणें आम्हास बरें वाटलें. *

( २ ) पिशाचांविषयीं वगैरे. या संबंधाचीं आजपर्यंत सुमारें तीन वर्षांत दहा बारा पत्रें आमच्याकडे आलीं असतील. यांतील मजकूर बहुतेक भूतसंचाराचे व कांहीं सृष्टिचमत्काराचे असे आहेत. ' लोकभ्रम ' या सदराखालीं आह्मीं तीन विषयांवर लिहिलें होतें; एक भुतांविषयीं, दुसरें शकुनांविषयीं, व तिसरें ज्योतिषाविषयीं. या तिहींपैकीं दुसऱ्या व तिसऱ्या प्रकरणीं आमच्याकडे एकही पत्र आलें नाहीं. यावरून असें अनुमान होतें कीं, शकुनांचे किंवा प्रश्नांचे ठोके आल्याचें एकही खात्रीचें उदाहरण आमच्या वाचकांपकीं कोणासही लिहून कळविण्यासारखें आढळलें नाहीं. आतां पहिल्या विषयावर मात्र पुष्कळांचीं मनें अद्याप निर्भ्रांत झालीं नाहींत असें

---

*' जिज्ञासू-' नीं टिपांच्या भाषांतराविषयीं जी सूचना केली आहे ती अमलांत आणण्याचें स्थळ निराळें आहे. आमचे निबंध पुनः सर्व एकत्र छापण्याचा जर प्रसंग आला, तर संस्कृत नाटकांच्या छायांप्रमाणें सदरील टिपांचा होईल त्या रीतीचा तर्जुमा शेवटीं जोडण्यास सवड होईल. त्याप्रमाणेंच वर्तमानपत्रांच्या नमुन्यावर साल अखेर अनुक्रमणिका किंवा सूचीपत्र देण्याविषयीं कित्येकांनीं सुचविलें आहे त्याप्रमाणेंही व्यवस्था करतां येईल. वरील प्रसंग येऊन ठेपला असतां, पुष्कळ स्थलींच्या स्पष्टीकरणार्थ अनेक तऱ्हेच्या टिपाही जोडण्याचा आमचा बेत आहे.

'जिज्ञासु' आह्मास कळवितात, व वर सांगितलेल्या पत्रांतील आक्षेप दूर करण्याविषयीं आम्हास सुचवितात. तर यावर आमचें उत्तर असें आहे कीं, सदरील पुस्तकाच्या तेराव्या अंकांत पिशाचाच्या असंभाव्यतेबद्दल जें आह्मीं निरूपण केलें आहे, त्याचें आजपर्यंत आलेल्या पत्रांनीं साक्षात् खण्डन होतें असें नाहीं. जोंपर्यंत साक्षात् भूत कोणाच्या दृष्टीस पडलें नाहीं, किंवा इतर कोणत्याही रीतीनें ज्याची उपपत्ति संभवत नाहीं, असा कांहीं चमत्कार जोंपर्यंत कोणाच्या दृष्टिगोचर झाला नाहीं, तोंपर्यंत आम्हीं दाखल केलेलीं प्रमाणें कायमच समजलीं पाहिजेत. आतां या ठिकाणीं 'जिज्ञासु' व इतर शंकित आम्हास विचारतील कीं, पूर्वोक्त पत्रांत अंगांत संचार झालेल्या मनुष्यांचीं भाषणें व त्यांची स्थिति यांची उपपत्ति अन्यथा कशी करावी ? तर यावर आमचें असें म्हणणें आहे कीं, एकाद्या गोष्टीची उपपत्ति सहज लक्षांत येण्याजोगती नसली म्हणून तेवढ्यावरून पिशाचांच्याच व्यापाराची कल्पना केली पाहिजे असें नाहीं. बाह्यसृष्टीचे व अंतःसृष्टीचे म्हणजे मनाचे असे अनेक गूढ व्यापार आहेत कीं, त्यांचें स्वरूप समजून येण्यास फार शोध व्हावा लागतो. तर अशा मनोव्यापारांचेंच फळ. ज्यास लोक संचार म्हणून म्हणतात तें मानलें असतां चालणार आहे. भूताविष्ट झालेला मनुष्य बहुशः आपली देशभाषाच कां बोलतो ? इंग्रेजी किंवा फारसी कां बोलत नाहीं ? तसेंच आमच्या देशांत इतके युरोपियन राहतात त्यांच्या अंगांत एकादे नेटिव भूत कधीं कां संचार करीत नाहीं ? व ताककण्या किंवा दहीभात कां मागत नाहीं ? तेव्हां मनावर जे पूर्वसंस्कार घडलेले असतात, त्यांचाच विकारविशेष भ्रांतावस्थेंत उत्पन्न होतो असें मानायास काय हरकत आहे ?

सध्यांच्या पक्षीं वर सांगितलें इतकेंच समाधान आमच्यानें करवतें. आमच्या पत्रकारांनीं पाहिलेले चमत्कार जातीनें अनुभवायाचा योग येईपर्यंत प्रस्तुत प्रकरणीं आमच्यानें कांहीं ज्यास्त लिहवत नाहीं. तरी येथें प्रसंगवशात् एका मोठ्या उदाहरणाचा उल्लेख

केल्यावांचून राहवत नाहीं. वर सांगितलेल्या तेराव्या अंकांत एका टिपेंत एका पौर्णिमेच्या रात्रीं घडलेला प्रकार सांगितलाच आहे. त्यावर एका अमावास्येच्या रात्रींही वरच्याप्रमाणेंच आमची पुनः निराशा झाली. या खेपेस या शहराच्या स्मशानभूमींत 'मालती-माधवां-'तील पांचव्या अंकांतील पिशाचक्रीडा आह्मास प्रत्यक्ष दृष्टिगोचर करविण्याचें एका भूतवाल्यानें पत्करलें होतें. पण मंडळी बरीच जमलीशी पाहतांच, बोवांचें मंत्रतंत्र गडबडूं लागले, व त्यांनीं घरांतूनच निरोप पाठविला कीं आज कांहीं संधान जमत नाहीं. त्यानंतर अगदीं आलीकडे दुसऱ्या एका जबरदस्त मांत्रिकाचें बेंड बाहेर पडलें. आमच्या वाचकांपैकीं कित्येकांनीं कदाचित् येथील 'ज्ञानप्रकाशां-'त दक्षिण हैदराबादचीं व बडोद्याचीं पत्रें वर्षा दोन वर्षांपूर्वीचीं वाचलीं असतील. त्यांत एका मिरजकर जादूगिरानें केलेले कांहीं फारच विलक्षण चमत्कार लिहिलेले होते. ते असे कीं, तो शालजोडींतून हवे तितके जिन्नस काढतो, मंडळीस जेवायाला बसवून त्यांस अन्न पुरवितो; फार तर काय, पण त्यानें एके प्रसंगीं दिवाणखान्यांत कळवंतिणीचा नाच उभा केला, व त्या पाहणारांस दिसत मात्र, पण स्पर्श करायाला जावें तो कांहीं नाहीं!! येवढी ज्याची तारीफ चांगल्या समंजस लोकांकडून कांहीं दिवसांपूर्वीं झाली होती, त्याची कांहीं महिन्यांपूर्वीं येथें जी फटफजिती झाली ती कांहीं पुसूं नये! आपलें मंत्रसामर्थ्य दाखविण्यास त्यानें येथील कित्येक बड्या बड्या मंडळीस पाचरण केलें होतें; पण शेवटीं त्यांची बोलण्याची लटपट सर्वांच्या लक्षांत येऊन, आपला झाडा द्यावयास तो जेव्हां आंतल्या खोलींत जाऊं लागला तेव्हां पाठीशीं बांधलेलें गांठोडें सर्वांच्या दृष्टीस पडलें. सरते शेवटीं मंडळी कुचेष्टेखोर व नास्तिक आहे, असा पाद्री कावा करून बोवा आंतल्या आंतच गुप्त झाले. मंडळीही बोवांचें स्वरूप ओळखून लागलीच उठून चालती झाली. तर या वृत्तांतावरून हें तात्पर्य लक्षांत आणावें कीं, ऐकण्यांत व पाहण्यांत पुष्कळ वेळां

अतिशयित अंतर असतें. यास्तव स्वतः पाहिल्याखेरीज कोणतेही गोष्टीविषयीं साफ मत देववत नाहीं.

( ३ ) प्रास व अनुप्रास. प्रास, अनुप्रास, व यमक या तिहींचीं लक्षणें जीं आह्मीं आरंभीं दिलीं आहेत, तीं लक्षांत आणलीं असतां, 'जिज्ञासूं-'स उक्त उदाहरणांत जो विरोध भासत आहे, त्याचा परिहार होईल.* आतां हें खरें आहे कीं, वरील लक्षणें संस्कृत साहित्यास पूर्ण अनुसरून नाहींत. संस्कृतांत यमक ( मराठी अर्थाचें ) तर मुळींच नाहीं, हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. इंग्रेजींत जीस 'ब्लांक् व्हर्स्' ( blank verse ) म्हणतात तोच पद्यरचनेचा प्रकार साऱ्या संस्कत कवितेंत आढळतो.† तसेंच 'प्रास' हेंही नांव संस्कृत साहित्यांत नाहीं. तेव्हां राहिल्यापैकीं अनुप्रास मात्र महाराष्ट्र कवितेंत व संस्कृत कवितेंत दोहोंतही आहे. याचें लक्षण आम्हीं दाखल केलें आहे तेंच संस्कृत कवितेसही लागू पडतें.‡ याशिवाय यमक हाही शब्दालंकार संस्कृतांत आहे; पण मराठींतल्यापेक्षां तो निराळा. उदाहरणार्थ पुढील श्लोक घ्याः—

फिरविते रवितें दधिभीतरीं । मिरविते रवितेज नगांवरी ॥
स्वकरिं ते करि चंचलता मनीं । उपरमे परमेश्वर गायनीं ॥

या श्लोकांत 'रविते' या अक्षरांची चारदां आवृत्ति झाली आहे, व 'करिते' याची दोनदा व 'परमे' यांची दोनदा; या आवृत्तीस यमक म्हणतात. मराठींतलें यमक म्हटलें म्हणजे वरील श्लोकांत चरणांतीं 'री' व 'नी' हीं जीं अक्षरें आहेत तीं होत.

---

* 'मुक्तामालें-'तील चवथे पद्य जे 'जिज्ञासूं'नीं दाखल केलें आहे त्यावर मात्र वरील लक्षण बसणार नाहीं. त्यांतील अलंकारास संस्कृताच्या रीतीनें आह्मी अनुप्रास हें नांव दिलें आहे.

† संस्कृतांत 'घटकर्परा'दि कांहीं यमककाव्यें आहेत; पण तीं चित्रकाव्यांत मोडतात. मराठींत यमकाशिवाय जशी कविताच नाहीं, तसें संस्कृतांत नसून, अगदीं उलटा प्रकार आहे.

‡ अनुप्रासाचें साहित्योक्त लक्षण—

अनुप्रासः शब्दसाम्यं वैषम्येऽपि स्वरस्य यत् ।

दंडी.

( स्वर भिन्न असतांही जेथें शब्दांचें साम्य असतें तेथें अनुप्रास होतो. )

तेव्हां वरील भिन्नभाव ज्या अर्थी मराठींत अगोदर झालाच आहे, त्या अर्थी आम्हीं बांधलेलीं प्रास, अनुप्रास व यमक यांचीं लक्षणेंही तशींच मूळच्याहून निराळीं असल्यास, आमच्या मतें कांहीं हरकत नाहीं. मराठी व्याकरण जसें महाराष्ट्र भाषेस अनुसरून स्थलविशेषीं संस्कृताहून निराळें केलें आहे, त्याप्रमाणेंच महाराष्ट्र कवितेच्या पद्धतीस अनुसरून साहित्याचीं लक्षणेंही अमळ निराळीं होण्यास आमच्या बुद्धीनं बाध नसावा.

( ४ ) **जॉनूसनूचा** निबंध 'जिज्ञासूं-' स कर्मकथाच वाटला, व विनोद सुभाषित वगैरे यांचें मान त्यांच्या मतें उतरतेंच आहे. या अपेक्षांवर आरंभीं आम्हीं त्यांस आमचा अभिप्राय कळविलाच आहे. तो अर्थात् 'भिन्नरुचिर्हि लोकः' हा होय. 'जिज्ञासूं-'स इंग्रजीचें ज्ञान नसल्यामुळें वरील कथानक त्यांस कंटाळवाणें वाटलें हें कांहीं अंशीं साहजिक होय; तरी आम्ही आपणाकडून वरील चरित्र एतद्देशीय वाचकांसही सुबोध व चित्तवेधक करण्याचा बराच यत्न केला आहे, व तो सर्वत्र निष्फळ होईल असेंही आम्हास वाटत नाहीं. 'जिज्ञासु' महाराष्ट्र कविता हा विषय सुचवितात, तो या अंकापासून आम्हीं सुरूही केला आहे, पण हाही सर्वांस 'जिज्ञासूं-'च्याप्रमाणेच पसंत पडेल असें आम्हास वाटत नाहीं. कदाचित् **जॉनूसनू**पेक्षां **मोरोपंता**कडे बरेंच बहुमत पडेल; तरी विषयाची लांबण लागली असतां, कित्येक मंडळी आम्ही भाकीत केल्याप्रमाणें खास डुलायाला लागेल ! असो; तर हें सर्व, असले आक्षेप करणारांनीं मनांत आणणें अवश्य होय. प्रत्येकाचें मत व अभिरुचि हीं भिन्नभिन्न असल्यामुळें, एकाच गोष्टीविषयीं मनुष्यांचे नेहमी निरनिराळे अभिप्राय पडत असतात. यांपैकीं कांहीं आमच्या पुस्तकाच्या संबंधाचे येथें दाखल करतों; त्यांवरून वरील **कालिदासीय** वचनाची 'जिज्ञासूं-' स व इतर वाचकांस बरीच यथार्थता भासेल. कोणी वाचक आमचा अंक हातांत येतांच, तेव्हा निबंध मात्र वाचून टाकून, बाकीच्या पुरवण्या सटरफटर ह्मणून टाकून देतात. मासिक

पुस्तकांत नकलीं असणें हा त्यांस पोरखेळाचाच प्रकार वाटतो, व सुभाषितेंही 'सुभाषितरत्नाकरा-' वरून वगैरे घेतलें, असेल असें गृहीत धरून त्याकडे बहुधा दुर्लक्ष करितात. 'अर्थसादृश्या-'दि इतर भागही पुस्तकाच्या भरतीकरतांच घालून दिलेले आहेत, असा कित्येकांचा समज असतो. दुसरे कोणी असतात, त्यांची नजर अगोदर वरील सटरफटराकडेच जाते; सुभाषितांत काय मौज आज आहे, विनोदांत व महदाख्यायिकांत काय गमतीचा व चातुर्याचा प्रकार आहे, हें पाहण्याकडेच त्यांची प्रवृत्ति असते. निबंधाकडे मग ते सावकाशीनें वळतात. बरें, या निबधांतील मजकुराच्या संबंधानेंतरी सर्वांचें ऐकमत्य असतें काय? कसें असेल? येथें तर अभिरुचिभेदांत आणखी मतभेदाचीही भर पडते. जें विवेचन एका वाचकास अत्यंत प्रिय होतें, तेंच दुसऱ्यास अतिशय झोंबून जातें. ज्याचीं जशीं मतें असतील तशा धोरणावर जर आमचे अभिप्राय पडले, तर ते त्यास अभिमत होतात; नाहीं तर अर्थातच अत्यंत अनिष्ट होऊन तिरस्कारास व द्वेषास कारणभूत होतात. आमच्या देशबंधूंस विशेषतः मानवलेले जे आठवा व तिसावा हे अंक, तेच आपणास देशहितेच्छु ह्मणविणारे जे 'ज्ञानोदय-' कर्ते व 'दीपिका-' कर्ते, त्यांस किती दुःसह झाले, हें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच. त्यांतून आमच्या 'ज्ञानोबां-'चा क्रोधाग्नि भडकून, त्याचा जो आगगाडीच्या बंबांतल्याप्रमाणें पहिल्या तडाक्यास काळा मिचकूट धुराचा भपकारा बाहेर पडला, तोतर आह्मास अद्याप आठवतो आहे. आमच्या वृद्ध आजोबांनीं नूतन अर्भकावर 'उर्मट, गर्विष्ठ, पोरकट, हलकट, मूर्ख' अशा तऱ्हेची मोठी मासलेवाईक पुष्पवृष्टि केली होती, व 'मयत जननी' म्हणजे माजी 'विचारलहरी' हिच्याशीं त्याचें साम्य दाखविलें होतें. विचारलहरी जी बंद करण्यांत आली, ती कोणत्या कारणांवरून, हें सर्वांस माहीत असतां, 'ज्ञानोबां-'नीं तिसऱ्या ठिकाणीं उगीच फुशारकी मारली, व त्याप्रमाणेंच आपल्या नवीन प्रतिपक्ष्याचाही समाचार सहज घेतां येईल, अशी त्यास घमंडी वाटली

असावी; पण तो भ्रम आज चार वर्षांत बहुधा निघून गेला असावा. असो; याप्रमाणेंच आमच्या तेविसाव्या व चोविसाव्या अंकांच्या वेळींही कित्येक बडी मंडळी बरीच तापली होती; व त्यांची आमच्यावर इतराजी होऊन अशीं भाकितें झालीं होतीं कीं, महाजनांच्या अधिक्षेपाचें पातक जर आम्ही माथ्यावर घेऊं तर लवकरच त्याचें फळ आमच्या अनुभवास येऊं लागेल. पण त्या गोष्टीस आज दोन वर्षें लोटत आलीं तरी अद्याप वरील अनिष्टाचा प्रकार घडून आला नाहीं. हें तर काय, पण ज्यापासून आमच्या पुस्तकास अपाय होणार होता, तेंच त्याच्या प्रसारविशेषास कारणभूत झालें असें मात्र आमच्या अनुभवास आलें! तर याप्रमाणें हरएक संबंधानें जगांत रुचिवैचित्र्य आहेच आहे. तेव्हां एकंदर जनसमूहाच्या कृपेवर जो उद्योग चालायाचा, त्यावर व्यक्तिशः भिन्नभिन्न अभिप्राय पडणारच; यास्तव सर्वांवर धोरण ठेवून चालणें अवश्य होय. याकरतां आमच्या आक्षेपकांनीं आपापले विचार मोकळे मनानें आम्हास व एकंदर लोकांस कळवावे, हें त्यांस योग्य आहे, पण त्याप्रमाणें पुस्तककारास नियमानें वर्ततां येईलच असें मात्र कोणीं समजूं नये.†

(५) पुस्तकांवर टीका. या सदरावर विशेष कांहीं लिहावयास नकोच. आम्हाकडे आलेल्यांपैकीं साहा पुस्तकांचा निकाल यापूर्वीं केलेला वाचकांच्या लक्षांत येईलच. बाकीच्यांचाही तसाच सवडीप्रमाणें होईल. 'मुक्तामाले-' वरील अभिप्रायाविषयीं नि-

---

† अनेकांच्या अनेक सूचना झाल्या असतां, पुस्तककर्त्यास कशी पंचाईत येऊन पडते, याचा उत्कृष्ट मासला वॉशिंगटन् इर्विंग् नामक अमेरिकन् ग्रंथकाराच्या 'स्केचबुका'– च्या शेवटील लेखांत दृष्टीस पडण्यासारखा आहे. हा लेख 'जिज्ञासु' प्रभृति आंग्लभौम भाषानभिज्ञ मंडळीस अर्थात् असून नसून सारखाच होय. बरें, याचें भाषांतर करावें तर तो आहे दोन पानें लांब; व शिवाय त्यांतील खुबी व विनोद मराठींत कितपत उतरतां येईल, याचा अजमास इंग्रेजी जाणणारे वाचक करतीलच !

राशा झाल्याचें 'जिज्ञासु' कळवितात; पण तो देण्याविषयीं आम्ही कधींहि वचन दिलें नव्हतें. आमचा उद्देश फक्त सदरील ग्रंथ अप्रसिद्ध होता, तो लोकप्रसिद्ध करावा इतकाच होता. त्यांतून जागोजाग टिपांत 'मुक्तामालें-' तील रसविशेषात्मक स्थलें दर्शविण्यांत आलीं होतींच.

( ६ ) साहित्य. या विषयावर सविस्तर लिहिण्याविषयीं 'जिज्ञासु' सुचवितात. आतां हा विस्तार विषयाच्या संबंधानें असावा, असें जर त्यांचें मनोगत असेल, म्हणजे प्रस्तुत शास्त्राचें सांग ज्ञान होण्याचा मार्ग व्हावा असें जर ते सुचवीत असतील, तर त्यावर उत्तर थोडें आहे. एकतर प्रकृत शास्त्राचें पूर्ण अध्ययन आमचें अद्याप झालें नाहीं; सदरील विषयाची आम्हास सरासरी कच्ची माहिती आहे. दुसरें असें कीं, वाचकांच्या संबंधानें पाहिलें तरी त्यांस प्रथमतःच नायकांचे भेद आणि स्थायिभावांचे प्रकार सांगितले असतां, विशेष रुचतील असें वाटत नाहीं. आम्ही जसें सुरू केलें आहे त्याप्रमाणेंच सांप्रत विषयांत त्यांचा सहज प्रवेश होईल व त्यानंतर पूर्णतेनें त्याचें अध्ययन करण्यास त्यांस उमेद येईल. कोणतेंही शास्त्र अथपासून इतिपर्यंत आरंभींच मासिक पुस्तकाच्या द्वारें कधीं प्रसिद्ध होत नसतें. त्याचें प्रणयन तसें व्हावयाचें म्हणजे स्वतंत्र ग्रंथाच्या रूपानेंच व्हावें लागतें. परंतु 'जिज्ञासूं-' ची विस्ताराविषयीं सूचना नुसती साधारणतः जर असेल, तर तिजप्रमाणें आमचा मूळचाच संकल्प आहे. महाराष्ट्र कवितेंतील अलंकार, रस वगैरे गोष्टींच्या संबंधानें जेवढें निरूपण करतां येईल, तेवढें विस्तारपूर्वक करण्याचा आमचा उद्देश आहेच.

( ७ ) अर्थसादृश्य. या सदराखालीं आलेल्या मजकुरावरून 'जिज्ञासूं-' नीं जें अनुमान काढलें आहे, तें सर्वांशीं बरोबर नाहीं. मनुष्याच्या मनाचे धर्म जेथून तेथून प्रायः सारखेच असल्यामुळें, एका कवीस जो विचार सुचला, तोच त्या देशांतील किंवा द्वीपांतरींच्या कवीसही सुचेल, हें संभवदुक्तिक आहे हें खरें; पण जेथें दोन अर्थांचें पुष्कळ निकट साम्य दृष्टीस पडतें, किंबहुना स्थलविशेषीं शब्दसाम्यही

आढळतें, तेथें आमच्या पत्रकाराचें कल्पनाचापल्यजनित अनुमान तोकडें पडतें असें ह्मटलें पाहिजे !

याप्रमाणें ' जिज्ञासू- ' च्या साऱ्या आक्षेपांचा व सूचनांचा विचार झाला. आतां सरतेशेवटीं सदरील आक्षेपांवरून व सूचनांवरून आमच्या पुस्तकाच्या संबंधाच्या अनेक गोष्टीविषयीं खुलासा करण्याचा प्रसंग आणल्याबद्दल आमच्या पत्रकारास आभार प्रदर्शित करून त्याचा निरोप घेतों.

---

## नंबर ६.

[ निबंधमाला, अंक ६० १८७८ ]

**निबंधमाला**—येथें आमच्या पुस्तकाचें पांचवें वर्ष समाप्त झालें. या ठिकाणीं पूर्वक्रमाप्रमाणें गेल्या सालची कांहीं हालहवाल लिहावयाची; पण तसें या खेपेस करवत नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं, ' गेलें साल ' हे शब्द प्रस्तुत समयीं अनर्थक होणारे आहेत. गेल्या ४८ व्या अंकांत आम्हीं लिहिलें होतें कीं, साहा महिन्यांचा पडलेला खाडा भरून काढण्याची आम्हास चांगली उमेद वाटते; पण पुढें येणाऱ्या अडचणींची कल्पना मनुष्यास अगोदर फार करून होत नसल्यामुळें वरील आमचा अजमास अगदीं चुकला. अनेक कारणांमुळें वरील तूट भरून येण्याचें एकीकडेच राहून आमच्या पुस्तकाच्या सालांत व खऱ्या सालांत अधिकाधिकच अंतर पडत चाललें. तेव्हां शेवटीं काळास आटपण्याची व्यर्थ यातायात सोडून देऊन पुष्कळांनीं उपदेशिलेली मंडूकप्लुति करण्याचाच विचार केला. सरकारी दरबारांत ही जर सहा वर्षांची नोकरी बजावल्यानंतर खुशाल साहा महिने घरीं राहण्यास मुभा असते, तर आमची प्रिय वाचकमंडळी ही पांच वर्षांच्या अखेर आम्हास एका वर्षाची सुट्टी मंजूर करण्यास फारशी कुरकुर करणार नाहीं असें आम्हास खास वाटतें. तर ही मंजुरी अमलांत आणून आज दोन वर्षें चहा प्यायलेलें आमचें घड्याळ येत्या

सालच्या आरंभापासून अह्मी वेळेबरोबर लावणार. आयते साठ अंक झालेलेच आहेत; तेव्हां कांटा फिरविण्याचीही तसदी नलगे !

वर सांगितल्याप्रमाणें साठ अंक हिंडून आमच्या पुस्तकाचा कांटा मूळपदावर पुनः येऊन ठेपला आहे, व एक महिनाभर निश्चळ राहून नंतर तो पुनः मार्गक्रमणास लागणार; यास्तव या संधीस सिंहावलोकन करून आजपर्यंत क्रमलेल्या मार्गाचें क्षणभर पुनरालोचन केलें असतां तें विशेष अप्रासंगिक होईल असें वाटत नाहीं.

साहा वर्षांपूर्वी आह्मीं आपल्या पुस्तकास जेव्हां सुरवात केली, तेव्हां आमच्या देशाची व भाषेची स्थिति फार निराळी होती.पूर्वीपासून अबाधितपणें चालत आलेल्या मतांचा प्रचार तेव्हां जारीनें सुरू होता. आपल्या देशांत जें जें दृष्टीस पडतें तें तें प्रायः अप्रयोजक व निंद्य,व आपली देशभाषा ह्मणजे अडाणी व कोती, हीं दोन मुख्य तत्त्वें विद्वज्जनांस संमत असल्यामुळें व त्यांनीं त्यांचें नेहेमीं प्रणयन केल्यामुळें तीं लोकांच्या मनास बळकट खिळून राहिलीं होतीं. वरील दोन ग्रह आमच्या लेखांच्या योगानें शेकडों लोकांचे शिथिलित झाले असतील असें म्हणण्यास मोठीशी हरकत दिसत नाहीं. हल्लीं मराठींत ग्रंथरचना करण्याचा प्रघात किती वाढला आहे, व आमच्या आचारविचारांच्या संबंधानेंही लोकांत किती चलबिचल होऊं लागली आहे, या दोन गोष्टींकडे कोणाही शोधक मनुष्याचें लक्ष गेलें नसेलसें नाहीं. आह्मीं लेखणी हातीं धरण्याचे पूर्वीं हीही एक चमत्कारिक गोष्ट आह्मास आढळून येत असे कीं, नवीन मंडळींतून कोणाचे मनांत देशहितार्थ ग्रंथरचना करण्याचें आलें असतां, विषय सांपडण्याचीच त्यांस मारामार पडे. लिहावयास विषय तरी काय आहे, बहुतेक लोकांस माहीत असणाऱ्या गोष्टींचेंच चर्वितचर्वण करायाचें कीं नाहीं, या प्रकारचे उद्गार कधींमधीं कानावर येत ! जो लिहावयास लागेल त्यास सारा लोकव्यवहार व अवघी सृष्टि हीं अनंत वर्षें पुरण्यासारखें विषयभांडार होय, व संस्कृतादि प्राचीन भाषा व इंग्रजी वगैरे अर्वाचीन भाषा यांच्या ठायीं ज्ञानाचीं केवढालीं अपरंपार कोठारें आहेत, या गोष्टी

फार करून कोणाच्याही मनांत येत नसत. इंग्रेजी भाषेंत आजपर्यंत हजारों हजार ग्रंथ होऊन गेले असून, अद्याप कोणा ग्रंथकाराची लेखणी विषयाच्या अभावामुळें थांबली आहे असें आढळत नाहीं; आणि आमच्या इकडे अजून कशास कांहीं ठिकाण नसतां काय पंचाईत येऊन पडते पहा ! ! हें सर्व फळ आलीकडील चमत्कारिक शिक्षणपद्धतीचें होय, हिच्या योगानें मनुष्य चोहोंकडून गुंडा बनतो खरा; पण या गुंडेपणाचे परिणाम ह्मटले ह्मणजे चोहोंकडे गुडघाभर पाणी, विषयविशेषावर अरुचि, हे होऊन बसतात. असें झाल्यावर यापूर्वी शेकडों वेळां उल्लिखित केलेले नवीन मंडळीचे दोष, जे पंडितम्मन्यता, कृतकृत्यताबुद्धि, श्रमविमुखता इत्यादि, ते सहजच उत्पन्न होतात. जे देशकार्यधुरीण त्यांची अशी स्थिति असल्यावर, मग त्यांच्या वृष्टीवर निर्वाह करणाऱ्या प्राकृतजनांची हालअपेष्टा तर काय विचारावी ! तेव्हां वरील कारणांमुळें अशी कांहीं चमत्कारिक लोकस्थिति होती कीं, एकादा मजकूर छापलेला असला, कोणी बड्या मनुष्यानें एकादें मत प्रगट केलें असलें, आणि त्यांतून एकाद्या इंग्रेजी ग्रंथकाराचा एकादा उल्लेख असला, कीं मग बोलण्याची कांहीं सोयच उरली नाहीं-ब्रम्हवाक्यो जनार्दनः ! आमच्या पुस्तकाच्या आठव्या अंकांत **मेकॉले, मिल्ल, मॉरिस्** या त्रयीला कोर्टापुढील पिजऱ्यांत आणून उभी करून त्यांवर जेव्हां आम्हीं दोषारोप केला, व **डा० विल्सन्**सारख्या महाचार्यांच्या संबंधानें आमचे विचार निर्भीडपणें प्रगट केले, तेव्हां आमची ख्रिस्ती भावंडें ‘ ज्ञानोदय ’ व ‘ सत्यदीपिका ’ यांनीं ‘ अब्रम्हण्यम् ’ ‘ शांतं पापं शांतं पापम् ’ असा आपल्या भाविक सद्धर्मी मंडळींत केवळ हाहाःकार करून दिला. अरे, हें आहे काय वर्तमान ! **मेकॉले** आणि त्याच्या लिहिण्यांत चूक ! **मिल्ल**साहेबांच्या प्रचंड इतिहासावर ‘ निबंधमाले ’ सारख्या टारग्या पुस्तकांत टीका ! अरेरे, हें नेटिव लोकांस विद्यादान केल्याचें फळ बरें ! **विल्सन्** साहेब जें सांगतील तें आमच्या हिताचेंच सांगतील, त्यांत तिलप्राय दोष कालत्रयींही सांपडावयाचा नाहीं,

असा आमचा आपला पक्का विश्वास; नाहीं तर हा धट्टाईचा व कृतघ्नपणाचा प्रकार पहा! कॉलेजांतून मि० वर्ड्स्वर्थ्-प्रारख्या नामधारी ख्रिस्त्यांच्या हाताखालीं तयार होऊन क्षुद्र खद्योतांप्रमाणें आपलें अत्यल्प तेज मिरवीत निघाले भराऱ्या मारायाला! ईश्वरदत्त विवेचनशक्तीचा उपयोग ईश्वरदत्त पवित्रशास्त्रावर करणें, सरकारानें परमौदार्यानें दिलेलें ज्ञानांजन डोळ्यांत घालून सरकाराचे दोष काढणें, इंग्रजी ग्रंथकारांच्या परिशीलनानें आलेलें बुद्धिप्रखरत्व त्यांचें दोषाविष्करण करण्याच्या कामीं लावणें, हीं कृत्यें केवढीं अधमपणाचीं होत!! इंग्रजी इतिहास वाचल्याचें हेंच फळ काय? **वॉशिंग्टन्, ग्यालिलियो, जॉसनन्** यांचीं चरित्रें वाचून त्यांचें हेंच चीज करायाचें काय? असो; याप्रमाणेंच बड्या नांवास भुलून हुरळून जाण्याचाही प्रकार आमच्या देशांत बराच आढळतो. दोन चार बड्या मंडळींनें एकादा डोलारा कोणत्याही उद्देशानें उभारला, कीं दुल्ला करून' मंडळी लागलीच मागें! मग हें प्रकरण आहे काय, आपण काय करीत आहों, याचा कांहीं विचार नाहीं. न्यूयॉर्क्वासी मंडळीच्या कानीं आमच्या परमहंसांचा वेदघोष पासिफिक महासागरावरून गेला असतां तो ऐकून ते चकित होऊन राहिले तर मोठेंसें आश्चर्य नाहीं; किंबहुना साहा हजार कोसांवरून त्यांनीं स्वामींच्या पायांवर लोटांगण घालून स्वर्गीयांपैकीं एकाच्या प्रेतास आपल्या आर्यगुरूकडून डाकमार्गें आलेल्या मंत्रांनीं अग्नीकरणसंस्कार करून त्याचे अस्थि महापवित्र मेक्सिकोतीर्थीं झोंकून दिले, तर यांतही विशेष नवल करण्यासारखी गोष्ट नाहीं; कां कीं, 'दूरतः पर्वता रम्याः' या न्यायानें वरील दोन्ही गोष्टींची उपपत्ति तेव्हांच होण्यासारखी आहे.* पण पर्वताच्या पायथ्याशीं उभें राहून

*मुंबईस कांहीं महिन्यापूर्वीं 'थिऑसोफिस्ट' नांवाची एक अमेरिकन मंडळी येऊन दाखल झाली आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुधा सर्वांस विदित असेलच, या मंडळीनें दयानंदजींस आपले गुरू केले आहेत, व त्यांच्या द्वारें वैदिक धर्माविषयीं शोध करण्याचा त्यांचा संकल्प असून तदनुसार त्यांचा उद्योगही चालू आहे. या

ही जर त्याचें विषमत्व व रुक्षत्व आपल्या लक्षांत येणार नाहीं, व दूरस्थ प्रेक्षकाप्रमाणेंच 'हा डोंगर काय, गालिच्यासारखा मऊ आहे हो !' अशी जर आपणही त्याची प्रशंसा करूं लागलों, तर मग काय ह्मणायाचें? दयानंदजीचें येथें चार वर्षांपूर्वी जें दोन तीन महिनें प्रस्थ माजून राहिलें होतें, त्यास, आमच्या लोकांच्या वर सांगितलेल्या स्वभावाखेरीज दुसरें कांहीं कारण नाहीं. त्या वेळेस हिंदुधर्माचे **लूथर** ह्मणून जे गृहस्थ चोहोंकडे गाजत होते, ते आतां आकशांतील धूमकेतूप्रमाणें अस्तंगत होऊन कोणीकडे जाऊन बसले आहेत, कोण जाणे! त्यांच्या शिष्यांनीं भाकित केल्याप्रमाणें त्यांच्या समाजाची वृद्धि आजपर्यंत झालेली कोणाच्या कानीं येत नाहीं, हें तर [illegible]य?—पण त्यांचें नांवसुद्धां इतक्यांतच अर्धेमुर्धे लोपून गेल्याप्रमाणें [illegible] आहे. वाहवा रे **लूथर** !!*

तर, आमच्या गेल्या साहा वर्षांतील उद्योगापासून हीही एक गोष्ट

---

लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा परित्याग केला असून, त्यांचें नांव काढल्याबरोबर त्यांच्या कपाळाला आंठ्या पडतात. यांनीं इकडे येण्यापूर्वी दयानंदजीस तिकडून जें अत्यंत नम्रभावपूर्वक पत्र लिहिलें होतें तें मोठें मासलेवाईक होतें. ते वर्तमानपत्रांतून वाचून पुष्कळ मंडळींस हसें आल्याशिवाय राहिलें नसेल. वर सांगितलेला मंत्राग्नीचा प्रकारही, कांहीं काळापूर्वी अमेरिकेंत घडून आलेला, वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला होता.

* आर्यसमाजाच्या जगद्गुरूविषयीं आमचीजी प्रत्यक्ष अनुभवावरून समजूत झाली व जीआजपर्यंत या पुस्तकांत अनेक वेळां आम्हीं खात्रीनें दाखल केली, ती केवळ आमच्या दुराग्रहाचें फळ होय असें आमच्या कित्येक मित्रांस वाटलें आहे, व वरील लेख वाचून पुनः ही वाटेल. यास्तव पुढील थोडासा लेख येथे वाचकांस सादर करतों. तो कोणाच्या हाताचा आहे हें बहुधा कोणासही कळविण्याची जरूरी

आमच्या देशबंधूंच्य मनांत बरीच बिंबली असेल, कीं पुरा कस लाविल्याखेरीज सोन्याचा सोनेपणा धरूं नये. तसेंच कोणी लौकिकानें मोठा, येवढ्यावरच जाऊन, त्याच्या वचनाचें जें प्रामाण्य मानायाचें, त्यापेक्षां आपण स्वतः होईल तितकी यथातथ्य परीक्षा करून नंतर कोणाचेंही मत ग्राह्य कीं अग्राह्य तें ठरवावें. हें ठरविण्याचा अधिकार लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांस सारखा आहे, हेंही तत्त्व आमच्या पुस्तकावरून सर्वांस कळण्यासारखें आहे.

आजपर्यंत झालेल्या पंचवार्षिक उद्योगाच्या संबंधानें वर लिहिलें, तेवढें बस आहे. आतां, आमच्या संबंधाच्या एका गोष्टीविषयीं मात्र लिहून हा अंक पुरा करतों.

ही गोष्ट आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कळलीच असेल, कीं आमचा व सरकारी नोकरीचा संबंध तुटून, आह्मी स्वातंत्र्यस्थितीच अनुभव घेऊं लागलों आहों. हें स्वातंत्र्यावलंबन कां करावें लाग याविषयीं आमच्या वाचकांपैकीं बहुधा थोड्यांसच गूढ पडेल अ

---

नाहीं—"**दयानंद सरस्वती**—यांच्या अंगीं 'दूरस्थाः पर्वता रम्याः याप्रमाणें दूरच्या लेखांवरून जी झाक दिसत होती ती येथें कांहींच प्रत्ययास आली नाहीं. आजवर प्रत्येक भेटीमध्यें अनेक सुज्ञांच्या प्रत्ययास जें काय आलें तें हेंच, कीं सर्वज्ञत्वाचा गर्व. औद्धत्य, वाचालत्व, असंबद्धप्रलापित्व, असत्यवादित्व, धूर्तता इत्यादि इत्यादि. ' न भेतव्यं न बोद्धव्यं न श्राव्यं वादिनो वचः । झटिति प्रतिवक्तव्यं सभासु विजिगीषुभिः ' हा उपदेश यांजपाशीं पुरा वसत आहे. समक्ष गेल्यास हे यद्वातद्वा बोलतात, व लेखी प्रश्नांचे जबाब देण्यास टाळाटाळ करतात, असा अनुभव आह्मीं स्वतः घेतला आहे. यांचीं जीं मतें आह्मास समजलीं आहेत त्यांतलीं कांहीं कांहीं आह्मास मान्य आहेत, व त्यांचें कदाचित् हे व्याख्यानद्वारा प्रतिपादन करीत असतील; परंतु त्यांचें स्थापन करणाराच्या अंगीं गांभीर्य, शांति, सभ्यता वगैरे गुणांनीं युक्त असें अगाध पांडित्य असणें अवश्य आहे. या प्रकारचे गुण यांच्यांत मुळींच दिसत नाहींत. तर ते संपादन करण्यास दयानंद सरस्वतींनीं प्रथम प्रयत्न करून, मग अशा प्रवासास निघावें हें बरें, असें आह्मी त्यांस केवळ प्रेमभावानें सुचवितों."

आम्हास वाटतें. स्वतःच्या अनुभवावरून, किंवा थोड्या कल्पनेवरून, आमचें प्रयाण रत्नागिरीस कां झालें व तेथें थोडें वास्तव्य करून, सर्वांस येवढी स्पर्धास्पदभूत जी राजसेवा तिजविषयीं शेवटीं आम्हीं अनास्था कां प्रगट केली, हें फार करून बहुतेकांस कळेलच. ज्यांस वरील दोन रीतींनीं उमज पडणार नाहीं, त्यांनीं 'इसापनीतीं-' तील 'कुत्रा आणि लांडगा' यांची गोष्ट वाचून. तिचें मनन करावें. असो; आतां या नूतन संपादित स्वातंत्र्याचा आम्हीं काय उपयोग करण्याचें योजिलें आहे, हेंही येथें थोडक्यांत सांगतों. गेल्या साहा वर्षांच्या अनुभवावरून आह्मास एका तत्वाचा पक्का बोध झाला आहे, कीं लोकोपयोगार्थ ज्यास ग्रंथरचना करणें असेल, किंबहुना लोककल्याणाविषयीं केवळ वाग्डंबर मिरवावयाचें नसून, हातून जर कांहीं कृति करायाची असेल, तर त्यास मुख्य गोष्ट स्वतंत्रता ही पाहिजे. पारतंत्र्याच्या व्यवसायांत ऐन उमेदीचें वय व दरएक दिवसांतील बहुतेक भाग घालवून, बाकी राहिलेलें वय व काळ ज्ञानसंपादनाकडे किंवा लोकहितार्थ उद्योग करण्याकडे लावून कितीसा उपयोग होणार? शिवाय स्वातंत्र्य, हें,आपले विचार निर्धास्तपणें प्रगट करण्यास व हवें तें काम हातीं घेण्यासही, अत्यंत आवश्यक होय. या स्वातंत्र्याची आलीकडील बादशाही अमलांतर किती जरूरी आहे, हें बहुधा कोणासही सांगावयास नको. हे सर्व विचार मनांत आणून, आज साहा वर्षें भोगलेल्या राजाधिकारावर आह्मी पाणी सोडून मोकळे झालों आहों.

इतउत्तर अध्ययन, अध्यापन, व ग्रंथरचना या तीन उद्योगांत आम्ही कालक्षेप करणार. आमच्या चार विद्यालयबंधूंनीं ही आपला अशा प्रकारचाच संकेत दोन तीन महिन्यांपूर्वी आह्मास कळविल्यावरून, ते व आम्ही मिळून एक स्वतंत्र शाळा काढणार आहों. आमच्या एका मित्राच्या मेहरबानीनें एक मोठा छापखाना मोठ्या सोईवार रीतीनें आम्हास मिळाला आहे. या साहित्याच्या योगानें वरील तिन्ही हेतु निर्बाधपणें चालण्यासारखे आहेत. असो; आतां सरतेशेवटीं हें आमचें लहानसें तारूं ज्याच्या कृपेनें खडक, वादळ वगैरे शेकडों

विघ्नांतून व संकटांतून आजपर्यंत सुखरूप निभावलें, त्या जगन्नियंत्या परमेश्वराचे उपकार स्मरून, व ज्या आमच्या देशबंधूंनीं वरील अडचणींतही सुकर्णधाराविषयींचा आपला विश्वास न ढळूं देतां, लवमात्रही अनास्था प्रगट केली नाहीं, त्यांचेही आभार मानून, हा लेखणीरूप कांटा बरोबर बाराच्या आंकड्यावर आणून ठेवतों !

---

## नंबर ७.

# पुढील व्यवस्था.

[ निबंधमाला, अंक ७३ जानेवारी १८८१ मळपृष्ठ. ]

पुढील सालापासून आह्मी या पुस्तकाच्या संबंधानें कांहीं निराळ्या व्यवस्था करणार आहों. तर त्यांकडे आमचे वर्गणीदार मेहरबानी करून लक्ष देतील अशी आशा आहे. त्या व्यवस्था अशाः—

( १ ) पहिली व्यवस्था ही, कीं सर्वांनीं वर्षाची वर्गणी आगाऊच भरली पाहिजे. तर १८८० साल अखेरपर्यंत ज्यांनीं मागली सगळी वर्गणी अद्याप भरली नसेल, त्यांनीं ती पाठविण्याची त्वरा करावी. वरील रकमेबरोबरच १८८१ सालाबद्दलची वर्गणीही पाठवावी.

( २ ) वर्गणीदारांस जर सोईवार पडेल तर दोघांनीं किंवा अधिकांनीं मिळून आपला कोणी मुकत्यार नेमावा. या मुकत्याराच्या नांवावर आह्मी अंक रवाना करीत जाऊं. येणेंकरून पुष्कळ टपालहशील वांचणारें आहे. या मुकत्याराच्या बद्दल सर्वांचें संमतिपत्र आमच्याकडे आलें पाहिजे. सर्वांची वर्गणी प्रथमतः त्याच्या मार्फत आमच्याकडे यावी, व सर्व व्यवहार आह्मी त्याच्याशीं ठेवीत जाऊं. पुस्तकें पोंचविण्याची वगैरे जबाबदारी सारी मुकत्याराच्याच माथीं राहील. ही व्यवस्था ज्यांस सोईची पडेल, त्यांनीं आह्मास तसें कळवावें. मुकत्यार बदलल्यास त्याबद्दल अर्थातच आम्हास कळविलें पाहिजे.

( ३ ) आम्ही कोणाकडेही खात्याचे उतारे पाठविणार नाहीं. ज्याचें ज्याचें वर्ष भरेल, त्यानें सावधगिरी ठेवून पुढील सालाची वर्गणी रवाना करीत जावी. न केल्यास अंक येणार नाहीं. नवीन अंक सुरू करणारानेंही प्रथमत:च वर्गणी भरली पाहिजे.

( ४ ) वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलें नांव व पत्ता सुवाच्य बाळबोध अक्षरांनीं लिहून पाठवीत जावा.

( ५ ) ही व्यवस्था अमलांत आली म्हणजे आमच्या गांवों-गांवच्या पूर्वींच्या मुकत्यारांची अर्थातच जरूर राहणार नाहीं. तर, १८८१ ालापासून वर्गणीदारांनीं पैसा पाठविणें तो खुद्द आमचे क-ेच प ीत जावा.

वरील सूचनांवरून कित्येक वर्गणीदारांचा गैरसमज होण्या-ारखा आहे, असें दिसून आल्यावरून, सदरील नवीन नियम कर-ण्याबद्दलचीं कारणें येथें नमूद करणें अवश्य वाटतें. पुढील नवीन व्यवस्था करण्याचें जें आह्मीं योजिलें, तें आमच्या वर्गणीदारांविषयीं किंवा मुकत्यारांविषयीं आमच्या मनांत अविश्वास उत्पन्न झाल्यामुळें योजलें असें नव्हे. यास मुख्य कारण, सर्व घोटाळा एकदम मोडून जाऊन, आम्हास व आमच्या आश्रयदात्यांस जी विनाकारण वरचेवर तसदी पडते, ती न पडतां, एका सपाट्यास सबंद वर्षाची खटखट नाहींशी व्हावी, हें होय. शिवाय आगाऊच्या सरसकट धारा एकदा घालून दिला ह्मणजे कित्येक पंचाईती आपोआप मोडणार आहेत. मागाहूनच्या दराप्रमाणें वर्गणी देण्याबद्दल जी पुष्कळांची नाखुषी असते, ती यानें मो जाईल. कित्येकांचें ह्मणणें पडतें कीं, तुम्हीं आमच्याकडे आगाऊबद्द खात्याचा उतारा कां पाठवीत नाहीं, ही कुरकूरही सदरील व्यवस्थेनें . र्थातच नाहींशी होणार आहे; शिवाय दूरदूर गांवच्या वर्गणीदारांच्या नांवांवर सालोसाल वर्गणी ओढून, सरते शेवटीं ‘ मालक सांपडत नाहीं ’ किंवा ‘ या नांवाचा इसम या गांवांत नाहीं ’ अशा ज्या अनेक भानगडी कधींकधीं उपस्थित

तात, त्याही होण्यास बिलकुल थारा उरणार नाहीं. हल्लीं टपालख
त्यांतील नवीन व्यवस्थेनें वर्गणी पाठविण्याची सर्वांस किती उ
सोय झाली आहे, ती सर्वांस माहीत आहेच. शिवाय ( २ ) या न
मांत सुचविलेली व्यवस्था जे अमलांत आणतील, त्यांस दोन्ही
तींनीं कोणती सोय होण्यासारखी आहे हें सांगायाला नकोच. सारां
प्रस्तुत 'माले'ची टवटवी चांगली राहण्यास, एकंदर बागेची दुरुस
होणें अगदीं जरूर आहे. आजपर्यंत पाटांच्या गैरदुरुस्तीमुळें पुष्क
पाणी ठिकठिकाणीं मुरून जात असे; तर आतां आमच्या सरकाराच
मेहरबानीनें शानदार चुनेगच्ची पाट बांधण्याची जर आयती
झाली आहे, तर तिचा आपण उपयोग कां करून घेऊं न? वि
कारण भुईत पाणी जागजागीं जिरणार, तेंच, तर एक टिपूं
न जातां, दरएक झाडाच्या आळ्यांत आ तिहते जलसंचयापा
आनंदाची गोष्ट होणार आहे! वरील अ ा मासला सदरील अं
कोणकोणतीं कार्यें होण्यासारखीं आहेत, या
वरून वाचकांच्या दृष्टीस पडेलच!

६१ शाखा

REFBK-0000061